OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M181-4/J61A Accession No. M 4374

Author ज्ञानेश्वर महाराज

Title अमृतानुभव 1878 Snake.

This book should be returned on or before the date last marked below.

श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत सिद्धानुवादरूपी

अ मृ ता नु भ व

(सुबोधविवरणासहित)

*

अनुवादक

हरिभक्तिपरायण श्रीज्ञानेश्वरसंप्रदायानिष्ठ

दत्तात्रय केशव पाठक

*

किंमत आठ रुपये

चि त्र शा ळा प्र का श न, पु णें २.

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति,
गुरुवार पौष शु. २
शके १८७८.

सर्व हक्क स्वाधीन.

श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत सिद्धानुवादरूपी

अमृतानुभव

(सुबोधविवरणासहित)

अनुक्रमणिका

पृष्ठें

प्रकरण पाहिलें–शिवशक्तिसमावेशन

१. मंगलाचरण–परब्रह्माची एकरूपतादर्शक संस्कृत पांच श्लोक, जीवब्रह्माचें ऐक्य, अनुबंधचतुष्टय, उपक्रम-उपसंहार.... १–१६

२. मंगलाचरण–मराठी ओंवी, एकच एक ब्रह्म तेंच बहु-रूपानें शिवशक्ति, ईश्वर–माया, देवदेवी १७–५८

प्रकरण दुसरें–श्रीगुरुस्तवन

१. श्रीगुरूंचें स्वरूप, श्रीगुरूंचें सामर्थ्य, श्रीगुरूंचें वैभव, श्रीगुरूंचा प्रसाद ५९–९९

प्रकरण तिसरें–वाचाऋणपरिहार

१. चारी वाणींचें स्वरूप, बंधमोक्षाचें निरसन, हरिहरांचा अभिप्राय, यथार्थस्वरूपदर्शन १००–११९

प्रकरण चौथें–ज्ञान-अज्ञान-भेदकथन

१. अविद्येचें कार्य असणारें ज्ञान व अज्ञान यांच्या भेदाचें दिग्दर्शन व आत्म्याच्या सिद्धज्ञानाचें स्वरूप १२०–१३७

प्रकरण पाचवें–सच्चिदानंदपदत्रयविवरण

१. असत्–जड–दुःख यांच्या निरसनासाठीं सत्–चित्–आनंद या पदांची योजना १३८–१४९

२. परब्रह्म परमात्म्याचें सत् तेंच चित्, चित् तेंच आनंद, केवलस्वरूप हें सर्व भावांच्या अतीत कसें हा निर्णय १५०–१६३

प्रकरण सहावें–शब्दखंडन पृष्ठें

१. जीवाला आत्मस्वरूपाच्या विस्मरणाचें ज्ञान करून
देण्यांत वेदान्तशास्त्राचें सामर्थ्य केवढें व महत्त्व किती ?.... १६४–१९२
२. "तैसा आत्मा सच्चिदानंदु । आपणया आपण सिद्धु ।
आतां काय दे शब्दु । तयाचें तया ?" ॥९३॥ हा सिद्धान्त .. १९३–१९९

प्रकरण सातवें–अज्ञानखंडन

१. जसा व्यतिरेकदृष्टीनें तसा अन्वयदृष्टीनेंहि आत्म-
स्वरूपाच्या ठिकाणीं अज्ञानाचा अत्यंत अभावच, हा कसा !
अजातवादाचें निरसन व नित्यसिद्ध स्वरूपाचा निर्णय.... २००–२२१
२. चित्स्फूर्तीची सिद्धि– "अगा ऐसिया ज्ञानातें ।
अज्ञान म्हणजें केउतें ?" २२२–२७३

प्रकरण आठवें–ज्ञानखंडन

१. सत्त्वगुणजन्यज्ञान हेंहि अविद्येचेंच कार्य याचें आविष्करण...
२. निजस्वरूपप्राप्तीच्या आविर्भावाचें स्वानुभवपूर्ण विवेचन. २७४–२७९

प्रकरण नववें–जीवन्मुक्तदशाकथन

१. सिद्धज्ञानस्वरूप अशा स्थितप्रज्ञ, जीवन्मुक्त महापुरुषाची
अभेदस्थिति असते कशी ! २८०–३०४

प्रकरण दहावें–ग्रंथपरिहार

१. उपसंहारपूर्वक ग्रंथमाहात्म्य, फलश्रुति, श्रीज्ञानराजांचें
प्रसादपूर्ण अभिवचन ३०५–३२२

शुद्धिपत्र ३२३–३२४

——



श्री ज्ञानेश्वर महाराज

निवेदन

भगवान् श्रीकृष्ण द्वारकेहून पंढरीस—मालुकविकृत नवनाथभक्तिकथासारामृतांत म्हटलें आहे –" असो कलिप्रारंभीं रमापति। नवनारायणा पाचारी ॥ २७ ॥ " " उद्धवासी बैसवोनि सन्निध। कनकासनीं यादववृंद। तंव ते नवनारायण प्रसिद्ध। प्रविष्ट झाले द्वारके ॥२८॥" याप्रमाणें भगवंतानें या ब्रह्मनिष्ठ नवनारायणांस उद्धवाहातीं निरोप पाठवून द्वारकेस आणविलें व त्यांचा सर्व षोडशोपचारांनीं मोठा सत्कार करून पुढील अवतारकार्याचा आपला हेतु त्यांना कळविला. तुम्ही आम्ही सर्वांनीं मिळून हा द्वापरयुग संपल्यानें धर्मरक्षणार्थ या पुढील कलींत अवतरून जावयाचें आहे. " श्रीहरि म्हणे जी महाराजा। मनीं काम वेवला माझा। कलींत अवतार घेणें वोजा। तुम्ही आम्ही चलावें" ॥३५॥ "मागुती बोले द्वारकाधीश। कवि नारायण जो कां प्रत्यक्ष। तेणें **मच्छिद्र** होऊनि दक्ष। जगामाजीं मिरवावें ॥ ३७ ॥ यावरी हरी जो महादक्ष। तो तंव शिष्य होऊनि प्रत्यक्ष। नामें तो महाराज **गोरक्ष**। सर्वत्र विलसावें ॥ ३८ ॥ मीहि प्रत्यक्ष अवतरोन। **ज्ञानदेव** नामें मिरवीन। आणि धवलारी जो पंचानन। **निवृत्तिनाथ** होईल कीं ॥४८॥ सत्यनाथ चतुरानन। तो स्वनामें होईल **सोपान**। जी योगमाया मानसमोहन। **मुक्ताबाई** विराजेल॥ ४९ ॥ भक्ति प्रौढी जांबुवंत। तो नरहरि होईल नितांत। प्रत्यक्ष जो बलराम भ्रात। **पुंडलिक** होईल तो ॥५०॥ उद्धव **नामदेव** होऊन। भक्तिसुख वाढवील ॥ ९६ ॥ ऐसें सांगोनिर मारमणें। संतुष्ट केलें नवनारायण। मग परस्परें नमनानमन। करोनिया उठले ते ॥९७॥ "

याप्रमाणें **बलरामदादा हे पुंडलिक** होऊन भगवंताच्या आधीं पंढरीस प्रकटले. द्वारकेस अवतारसमाप्तीच्या वेळीं एके दिवशीं रुक्मिणीदेवी भगवंतावर रुसून त्या ज्या अन्तर्धान पावल्या, तेथून गुप्त झाल्या, त्या पंढरीस चंद्रभागेच्या तीरावरील वाळवंटांत प्रकट झाल्या. पंढरीस हें स्थान " वाळवंटांतली रुसकी रखमाबाई " म्हणून अद्याप प्रसिद्ध आहे. यांच्या शोधार्थ भगवंत आले, ते तसेच पुंडलिकाच्या भेटीस गेले असतां त्यांनीं भगवंताच्या पुढें वीट केली, तीवर ते मौनरूपानें कटीवर हात ठेवून उभे राहिले ते अद्याप तसेच आहेत. पुढें श्रीमदाद्यशंकराचार्य पंढरीस भगवंताच्या दर्शनास गेले असतां त्यांना ज्या

स्वरूपांत दर्शन झालें त्याचें वर्णन त्यांनीं रचलेल्या श्रीपांडुरंगअष्टकांत आलें आहे, तें असें–"**महायोगपीठे** तटे भीमरथ्यां, वरं पुंडरीकाय दातुं मुनींद्रः। समागत्य तिष्ठन्तमानंदकंदं, **परब्रह्मलिंगं** भजे **पांडुरंगम्** ॥१॥ **वरं त्विष्टिकायां समन्यस्तपादं**, परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम्॥ २ ॥" नामदेवरायांनीं केलेल्या आरतींतहि म्हटलें आहे– "युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ॥" अर्थात् प्रत्येक मनूच्या मन्वंतरांत अल्प चार युगें होत असतात. पूर्वीचीं सहा मनूंचीं प्रत्येकाचीं चार मिळून चोवीस युगें संपून हें सातवें मन्वंतर वैवस्वत याचीं सत्य, त्रेत, द्वापर अशीं तीन होऊन गेलीं. मिळून सत्तावीस व हें चालूं कलियुग अठ्ठाविसावें त्याच्या प्रारंभापासून "**युगें अठ्ठावीस**–" "या अठ्ठाविसाव्या युगाच्या आरंभीं" "**विटेवरी उभा**" हें ध्यान विटेवरी उभें आहे. तें निज परमानंदीं मौनव्रत धारण करून असल्यानें गीतेचा गूढार्थ मराठी भाषेंत स्पष्ट करण्यासाठीं **भगवंत ज्ञानदेवरूपानें** अवतरून आले.

भगवद्गीतेचा आशय—अर्जुनानें भगवंतास शरण होऊन विनविलें कीं, "कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः। यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्" – "दैन्यरूपी दोषानें स्वभाव नष्ट झालेला व धर्मासंबंधानें चित्त मोहित झालेला (देवा,) मी तुला विचारीत आहें. जें खरोखरीच श्रेयस्कर असेल तें मला सांग. मी तुझा शिष्य आहें. तुला शरण आलेल्या मला उपदेश कर." ही वैदिक उपनिषत्परंपरा आहे. शास्त्रांतील रहस्याचा उपदेश शिष्यानें हात जोडून विनयपूर्वक विचारल्यावांचून गुरूनें आपण होऊन त्यास सांगूं नये. "स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं" – श्रुतिशास्त्रांत निष्णात अशा ब्रह्मनिष्ठ गुरूंच्याकडे हातांत दर्भ घेऊन हात जोडून त्यानें (शिष्यानें) जावें असें श्रुतिवचन आहे. या श्रुतिवचनानुरूप अर्जुनानें त्याला झालेल्या मोहाच्या भ्रमाचें निरसन व्हावें म्हणून भगवंतास शरण होऊन विनविलें. आत्मज्ञानाचा उपदेश ग्रहण करण्यास लागणारें वैराग्य उत्पन्न होऊन स्ववर्णास अनुलक्षून कर्म–उपासनेच्या आचरणानें त्याचें चित्त शुद्ध झालेलें होतें. द्रोणगुरूंच्या आज्ञेप्रमाणें त्यानें द्रुपदराजाला बांधून आणलें. उत्तर वैराट राजाच्या गाई दुर्योधनानें पळविल्या त्या सोडवून आणल्या. निवातकवच नांवांच्या राक्षसांचा नायनाट केला. त्यानें इंद्रापासून कवचकुंडलें मिळविलीं. भगवान् शंकराशीं दोन हात करून त्यांच्याकडून 'पाशुपत' अस्त्र मिळविलें. अशा रीतीनें क्षात्रधर्माला अनुसरून त्याची कर्म व उपासना हीं पूर्ण

होऊन चित्तशुद्धि झाल्यानें तो साधनचतुष्टयसंपन्न व्हावा म्हणून त्याला आत्मानात्म विचाराचा उपदेश करण्यास भगवंतानें सुरुवात करून त्यानें स्थितप्रज्ञ व्हावें यासाठीं उपनिषदांमधील वाक्यांना अनुलक्षून अर्जुनास त्यांतील रहस्य समजाविलें. कर्म, उपासना व ज्ञान या वेदांतील तीन कांडांचें निदर्शन गीतेंतील तीनच श्लोकांनीं होणारें आहे.

कर्माविषयीं—भगवंत सांगतात—" कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ (श्रीगीता अ. २–४७)॥ – " तुला फक्त कर्माच्याविषयीं अधिकार आहे. त्या कर्माच्या फलांच्या विषयीं अधिकार नाहीं. केव्हांहि कर्मफलांविषयीं इच्छा धरूं नकोस. (आणि) कर्म न करण्याविषयीं (मनाचा) कल होऊं देऊं नकोस (अ. २–४७). "

भक्तीविषयीं— " पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः " ॥ (श्रीगीता अ. ९–२६) " ॥ – " पत्र, पुष्प, फल अथवा उदक जो मला भक्तीनें अर्पण करतो त्या शुद्धचित्त मनुष्याचें भक्तिपूर्वक अर्पिलेलें तें (पत्र, पुष्प, फल इत्यादि) मी ग्रहण करतों. " ॥

ज्ञानाविषयीं—" सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ (श्रीगीता अ. १८–६६) " ॥ – " सर्व धर्म्य कर्मांचा (व अधर्म्य कर्मांचा) त्याग करून मला एकट्याला शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. (त्याबद्दल) तूं शोक करूं नकोस ॥ (अ. १८–६६). " असा गीतेंतील थोडक्यांत आशय लक्षांत येणारा आहे.

ज्ञानेश्वरीचा अभिप्राय—वरील तीन श्लोकांवरील ज्ञानेश्वरीचा अभिप्राय काय तो पाहूं—**कर्माविषयीं**—" म्हणोनि आइकें पार्था । याचिपरी पाहतां । तुज उचित होय आतां । स्वकर्म हें (ज्ञाने. २–६४), आम्ही समस्तही विचारिलें । तंव ऐसेंचि हें मना आलें । जें न सांडिजे तुवां आपलें । विहितकर्म ॥ परी कर्मफळीं आस न करावी । आणि अकर्मीं संगती न व्हावी । हें सत्क्रियाचि आचरावी ॥ हेतूविण ॥ – २६६ ॥ देखें जेतुलालें कर्म निपजे । तेतुलें आदिपुरुषीं समर्पिजे । तरी परिपूर्ण सहजें । जाहलें जाण ॥ – २७१ ॥ देखें सतासत कर्मीं । हें जें सरसेंपण मनोधर्मी । तेंचि योगस्थिती उत्तमीं । प्रशंसिजे ॥–२७२॥

भक्तीविषयीं–ज्ञानेश्वरी—"मग निःसीमभावउलहासें । मज अर्पावयाचेनि मिसें । फल एक आवडे तैसें । भलतयाचें हो ॥ (९–२६–३८२) ॥, पैं गा भक्तीचेनि नांवें । फूल एक मज द्यावें । तें लेखें तरि (समज कीं) म्यां तुरंबावें

(हुंगावें) । परि मुखींचि घालीं ॥ – ३८४ ॥, हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जाहालें । तें साजुकही न हो सुकलें । भलतैसें ॥ – ३८५ ॥ अथवा ऐसेंही एक घडे । जे पालाही परी न जोडे । तरि उदकाचें तंव सांकडें । नव्हेल कीं ॥ – ३८७ ॥ तें भलतेथ निमोलें । न जोडितां आहे जोडलें । तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें मज ॥ – ३८८ ॥ तेणें वैकुंठापासोनि विशाळें । मजलागीं केलीं राउळें । कौस्तुभाहोनि निर्मळें । लेणीं दिधलीं ॥ – ३८९ ॥ मग अमृताहूनि सुरसें । बोनीं वोगरिलीं बहुवसें । ऐसा भक्तांचेनि उदकलेशें । परितोषें गा ॥ – ३९३ ॥ हें सांगावें काय किरीटी (अर्जुना) । तुवांचि देखिलें आपुलिया दिठी । मी सुदामयाचिया सोडी गांठी । पव्हयासाठीं ॥ – ३९४॥ पैं भक्ती एकी मी जाणे । तेथ सानें थोर न म्हणे । आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ॥–३९५॥ येर पत्र पुष्प फळ । हें भजावया मिस केवळ । वांचूनि आमुचियालागीं निष्कळ (शुद्ध) । भक्तितत्त्व ॥ – ३९६ ॥ म्हणोनि अर्जुना अवधारीं । तूं बुद्धी एकी सोपारी करीं । तरी सहजें आपुलिया मनोमंदिरीं । न विसंबें मातें ॥ – ३९७ ॥"

ज्ञानाविषयीं–ज्ञानेश्वरी—"तैसें स्वर्ग नरक सूचक । अज्ञान व्यालें धर्मादिक । तें सांडूनि घालीं अशेख । ज्ञानें येणें ॥ १८–१३९१ ॥ हातीं घेऊनि तो दोर । सांडिजे जैसा सर्पाकार । कां निद्रा त्यागें वराचार । स्वप्नींचा जैसा ॥१८–१३९२॥ तैसें धर्माधर्माचें टवाळ (बंड) । दावी अज्ञान जें कां मूळ । तें त्यजूनि त्यजीं सकळ । धर्मजात ॥ १८–१३९५ ॥ मग अज्ञान निमालिया । मीचि एक असें अपैसया । सनिद्र स्वप्न गेलया । आपणपें जैसें ॥१८–१३९६॥ तैसा मी एकवाचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोऽहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्य होय ॥ – १३९७ ॥ पैं आपलेनि भेदेंविण । माझें जाणिजे जें एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥ – १३९८ ॥ म्हणौनि मी होऊनि मातें । सेवणें आहे आयितें । तैसें करीं हातां येतें । ज्ञानें येणें ॥ – १४०५ ॥ तैसें अद्वयत्वें मज । शरण रिघालिया तुज । धर्माधर्म हे सहज । लागतील ना ॥ – १४०६ ॥"

श्रीनिवृत्तिनाथांनीं आज्ञा केल्यावरून भगवद्गीतेच्या गूढार्थाचें स्पष्टीकरण करणारा ग्रंथ भावार्थदीपिका ज्यास भाविकजन "ज्ञानेश्वरी" म्हणून संबोधूं लागले, तो लिहून होतांच तो श्रीज्ञानदेव श्रीगुरुचरणीं सादर करीत असतां श्रीनिवृत्तिनाथ त्यांस म्हणाले–"ज्ञानदेवा, आपण गीतेवर टीका लिहिली हें ठीक झालें. पण आतां आपण स्वबुद्धीच्या उत्कर्षानें अमृत म्हणजे अखंड अशी परमात्मवस्तु जिचा अनुभव सर्वकाळीं, सर्वदेशीं, सर्व अवस्थांमध्यें सर्वांस आहे व जी सिद्धच

आहे, तिचा अनुवाद करावा." यावर "अवश्य म्हणोनि तये क्षणीं। मस्तक ठेविला सद्गुरुचरणीं। मग स्वात्मबुद्धीनें विचारूनी। अनुभवामृत नामें "अमृतानुभव" ग्रंथ केला॥"

अनुभवामृताचें अमृतानुभव नांव—गीतार्थाचा आविष्कार भावार्थ-रूपानें श्रीज्ञानेश्वरांनीं केलेल्या टीकेस 'भावार्थदीपिका' नांव स्वतः ग्रंथकार श्रीज्ञानेशांनीं जरी दिलें होतें तरी बहुजनसमाजाचें आवडतें नांव 'ज्ञानेश्वरी' असें पडून तेंच कायमचें रूढ झालें. तसेंच अमृतानुभवनांवासंबंधीं झालें आहे. स्वतः श्रीज्ञानेश्वरमहाराज 'अनुभवामृत' असें या ग्रंथास संबोधित असलें तरी त्यांच्याच नाथपरंपरेंतील शिवकल्याणस्वामींनीं अनुभवामृतावर ओवीबद्ध केलेल्या टीकेंत 'अमृतानुभव' असें या ग्रंथास नांव दिलें आहे व तेंच आतां कायमचेंच रूढ झालेलें आहे. त्यानंतरच्या सर्व टीकाकारांनी 'अमृतानुभव' हेंच नांव आतांपर्यंत चालूंच ठेवलें आहे.

अमृतानुभवाचें वैशिष्ट्य—या ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय असा कीं—परब्रह्म परमात्मस्वरूप हें एकच एक अद्वितीय असें सर्वत्र ओतप्रोत भरलेलें असून या अनंतदृश्यरूपविश्वांत परब्रह्माशिवाय अन्य कांहीं एक नाहीं. जीवहि परब्रह्मरूपच आहे. जगताची जनकजननी, देवदेवी, ईश्वरमाया व त्यांनीं निर्मित अनंतकोटिब्रह्मांडरचनारूप जगत् व त्यांतील अनंतजीव हीं सर्व एकच एक परब्रह्मरूप होत. अशा अक्षर, अनिर्वचनीय, आनंदघन परमामृतस्वरूप केवल नित्य सिद्धस्वरूपाचा अनुवाद या अमृतानुभवग्रंथभर निर्णयपूर्वक सिद्ध केला आहे. तो अनुवाद वेदाचें उत्तरकांड जें ज्ञानकांड उपनिषदांनीं प्रतिपादन केलेलें त्यांतील सिद्धान्ताला अनुरूप असें हें बालबोध विवेचन या ग्रंथांत आलेलें आहे.

नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त असें जीवाचें मूळचें स्वरूप तें त्याला प्राप्त व्हावें म्हणून चित्तशुद्धीसाठीं नित्यनैमित्तिक कर्मांचें अनुष्ठान त्याच्याकडून घडावें यासाठीं वेदांतील कर्म व उपासना मिळून एकच जें कर्मकांड त्यांतील परस्पर-विरोधी वाक्यांची व्यवस्था लावून बारा अध्यायांचें **पूर्वमीमांसाशास्त्र** मुनि जैमिनींनीं निर्मिलें. उपासना म्हणजे ध्यानधारणा हें मानसकर्मच आहे हें जाणून त्याचा त्यांनीं कर्ममध्येंच अन्तर्भाव केला. ज्ञानकांडाचें योग्य फल प्राप्त व्हावें म्हणून अन्तःकरणाची सूक्ष्मता व स्थिरता यांसाठीं कर्म व उपासना असे दोन भाग प्रतिपादन केलेले आहेत. ज्ञानकांड प्रतिपादन करणाऱ्या ज्या श्रुति आहेत

त्या जशा जीवाला निरतिशय आत्मसुख प्रत्यक्ष प्राप्त करून देण्यास साहाय्यभूत होतात तशीं कर्म व उपासना हीं नसून तीं फक्त चित्तशुद्धि करविणारीं होत. तीं प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करून देणारीं नव्हत. श्रुतीचा हा अभिप्राय लक्षांत न येणारा यास्तव सर्व श्रुतिवाक्यांचा परस्परांतील विरोध परिहार व्हावा म्हणून प्रत्यक्ष भगवदवतार वेदोनारायण व्यासमुनींनीं वेदांचें जें उत्तरकांड, जें उपनिषदांनीं प्रतिपादन केलेलें ज्ञानकांड त्याचा ज्याला 'ब्रह्मसूत्र', वेदान्तदर्शन अथवा **उत्तरमीमांसाशास्त्र** म्हणतात असा चार अध्याय व सोळापाद असलेला प्रकरणात्मकग्रंथ निर्माण करून उपनिषद्वाक्यांची व्यवस्था लावली. या ब्रह्मसूत्रग्रंथाच्या स्पष्टीकरणार्थ त्यावर भाष्यें व पुष्कळ व्याख्यानेंहि झालीं. तथापि ज्यांना संस्कृत येत नसून शास्त्रसंस्काररहित अशा प्राकृत जनांची करुणा भगवान् श्रीज्ञानेश्वर महाराजांस येऊन सर्वांस त्या ज्ञानाची प्राप्ति व्हावी म्हणून उपनिषदांतून श्रुतींनीं प्रतिपादन केलेलें जें परमगूढ तत्त्वज्ञान तें त्यांनीं प्राकृत भाषेंत या अमृतानुभवग्रंथरूपानें प्रतिपादन करून दयार्द्र अन्तःकरणानें सर्वांच्या उद्धाराची केवढी मोठी सोय करून ठेविली आहे.

अमृतानुभवाचा रचनाकाळ—"स्वल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखम्" थोडक्या अक्षरांनीं स्पष्टार्थाचें सर्व सार सांगण्याऱ्या या सूत्ररूपग्रंथाचीं दहा प्रकरणें आहेत. श्रुतींच्या गहन अर्थाच्या विरोधाचा परिहार करून विस्तारपूर्वक स्पष्टीकरण करून पूर्वपक्षाच्या खंडनपूर्वक मुख्य प्रमेयाची सिद्धि करणारा असा हा प्रमाणग्रंथ आहे. भगवद्गीतेंतील गूढरहस्याचा आविष्कार करणारी भावार्थदीपिका जी ज्ञानेश्वरी ती "शके बाराशें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें। सच्चिदानंदबाबा आदरें। लेखकु झाला"—शके बाराशें बारांत लिहून होतांच त्याच वेळीं लगेंच अमृतानुभवाची रचना होऊन त्याचें लिखाण झालें.

अमृतानुभवांतील प्रमेय—ज्ञानेश्वरीचा उपसंहार केला तो असा—"तैसा प्रबंध हा श्रवणीं। लागतखेवो समाधि आणी। ऐकिलियाही वाखाणी। काय व्यसन न लवी॥ ज्ञाने. १८–१७४५॥—तसा हा माझा ग्रंथ (त्याचें नुसतें नांव) श्रवणांत (कानीं) पडतांक्षणींच तो जर समाधिसुख, मनास समाधान देतो; तर मग त्याचें व्याख्यान ऐकल्यावर तो पुन्हां ऐकण्याविषयींचा नाद लागणार नाहीं काय?" "तैसें अध्यात्मशास्त्रीं यिये। अंतरंगचि अधिकारी"-आत्मानात्मविचार करणाऱ्या या ग्रंथाचे अधिकारी विहित कर्म–उपासनेच्या अनुष्ठानानें चित्त शुद्ध झालेले ते होत. (सूर्याच्या बिंबाचें प्रतिबिंब दगडावर

किंवा अशा घनपरमाणूंच्या पदार्थांवर पडलें असतां त्यांचे परमाणु घन असल्यानें तें तिथें उमटत नाहीं. तेंच तें प्रतिबिंब स्वच्छ पाण्याच्या पातळीवर किंवा स्वच्छ कांचेवर ताबडतोब उमटतें; कारण त्यांचे परमाणु अतिशय विरळ असल्यानें हुबेहूब त्याचें परावर्तन होतें. तसेंच रजतमाच्या आवरणानें युक्त असलेल्या मलिन अन्तःकरणांत आत्मस्वरूपाचें शुद्धज्ञान उदय पावत नाहीं. तेंच सत्त्वगुणाच्या शुद्ध अन्तःकरणांत आत्मस्वरूप तेव्हांच प्रकट होतें.) " मनन निदिध्यास श्रवणें । जिंतिलें आतां " तसें हें अमृताहून सुरस आयतें कवित्व श्रीगुरुप्रसादानें उत्पन्न झालेलें यांतील आत्मस्वरूपाच्या श्रवणानें मनन व निदिध्यास हीं सहजच होऊं लागतात व अशा अधिकारी जनांस आत्मानंदाची प्राप्ति होते. "ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें । गौरव आहे जी साचें । ग्रंथ नोहे, हें कृपेचें । वैभव तिये ॥ ज्ञाने. १८–१७५१ ॥" असें हें श्रीशंकरापासून परंपरेनें आलेलें अद्वयानंदसुखाचें आपलें हें ऐश्वर्य मत्स्येंद्रनाथांनीं गोरक्षनाथांस दिलें. तें गहिनीनाथांनीं गोरक्षनाथांपासून संपूर्ण संपादन केलेलें तें श्रीनिवृत्तिनाथांना प्राप्त झालें. अशा प्रकारें गुरुपरंपरेनें प्राप्त झालेलें ब्रह्मरसाचें समाधिसुख श्रीनिवृत्तिनाथांनीं मजला दिलें. कलींतल्या दुःखांनीं पीडित झालेल्या जनांस दुःखापासून सोडवावें या कळकळीनें गीतेचा अर्थ करण्याच्या मिषानें ब्रह्मरसाचा जो श्रीगुरूंनीं वर्षाव मजकडून करविला तो हा ग्रंथ होय. याप्रमाणें ज्ञानेश्वरीचा उपसंहार होऊन नंतर लगेंच अमृतानुभवाची निर्मिति झाली.

श्रवण—उपनिषत्संप्रदायांत उपक्रम व उपसंहाराची एकरूपता, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद व उपपत्ति हें असें 'षड्लिंग' जें वेदान्तवाक्यांच्या तात्पर्याचें दर्शक यानें अद्वैतब्रह्माच्या निरूपणाचा निश्चय करणें हें श्रवण होय.

मनन—जीव व ब्रह्म यांच्या भेदाचीं वाचक व अभेदाचीं साधक अशीं जीं अनुमान, उपमान, अर्थापत्ति, अनुपलब्धि हीं प्रमाणें आहेत, त्यांच्याद्वारां अद्वैतब्रह्माचें चिंतन करणें, हें मनन होय. " सदेव सोम्य, इदमग्रे आसीत् " हे सोम्य, इदं सर्वं यत् इदं जगत् तत् अग्रे सत् ब्रह्म एव आसीत् । "– हे प्रिय शिष्या, हें सर्व जगत् उत्पत्तीच्या पूर्वी 'सत्'च, नित्य असणारें होतें; हा उपक्रम ब्रह्मस्वरूपविषयाचा आरंभ असा असून 'एतत् आत्म्यं इदं सर्वं, तत् सत्यं, स आत्मा, तत् त्वम् असि, श्वेतकेतो, –हें सर्व जगत् एतत्रूप, सत् ब्रह्मरूप आहे, तें सत्य आहे, तो आत्मा आहे, हे श्वेतकेतु, 'तें तूं आहेस' हा उपसंहार. हे उपक्रम व उपसंहार सद्रूप ब्रह्मविषयक असल्यामुळें त्या दोहोंचें ऐक्यरूप हें

एकलिंग म्हणजे ऐक्याचें दर्शक आहे. या विषयींचा अधिक खुलासा या ग्रंथांत पहिल्या प्रकरणांत आलेला आहेच. अशा या उपनिषत् तात्पर्याच्या सिद्धान्ताचें दिग्दर्शन या अमृतानुभवग्रंथात आलेलें आहे.

या अमृतानुभवग्रंथाचा **उपक्रम** व **उपसंहार** वरील प्रमेयानुरूपच आहे तो असा—

अविनाशी अनिर्वचनीय आनंदघन श्रीमत् निवृत्तिनाथ सद्गुरु परब्रह्म-परमात्मस्वरूपाशीं मी ज्ञानेश्वर सदैव एकरूप आहें. 'जीव हा नित्य ब्रह्म-रूपच' असें जीवब्रह्माचें ऐक्य सूचित करून ग्रंथारंभ केलेला आहे. हेंच परब्रह्म लीलेसाठीं स्फूर्तिरूप होऊन आपण आपल्या स्वरूपीं अनेकरूप व्हावें म्हणून आपणच शिवशक्ति अशीं त्या एकपणांतलींच दोन रूपें होऊन तें जगताचीं निर्मिति करतें, तरी या अनंतकोटिब्रह्मांडरचनेंत आदि, मध्य, अंतीं ते आपणच पूर्णत्वानें ओतप्रोत असतें. हीं निरुपाधिक द्वंद्वरहित एक परब्रह्मरूप अशीं या जगाचीं जनक—जननी, देव—देवी त्यांना मी ज्ञानेश्वर ऐक्यरूप वंदन करून त्यांची लीला वर्णीत आहें. "स्त्रीपुरुष नामभेदें। शिवपण एकलें नांदे। जग सगळें अधार्धे—। पणें जिहीं ॥अमृ. प्र. १—१७॥ जैसि कां समिरेसकट गति। कां सोनेयासकट कांति। तैसी शिवेंसि शक्ति। अवघिचि जे॥ अमृ. प्र. १—४१॥ शिवशक्तिसमावेशें। नमन केलें म्यां ऐसें। रंभागर्भ आकाशें। रिगाला जैसा॥ (अमृ. प्र. १—६४॥"

तेंच परमात्मस्वरूप आपणच गुरु व शिष्य होऊन आपल्या स्वानंद-सुखाची लीला कशी करीत असतें त्याचें दिग्दर्शन असें—

"आतां उपायवनवसंतु। जो आज्ञेचा आहेवतंतु। अमूर्तचि परि मूर्तु। कारुण्याचा॥ अमृ. प्र. २—१॥ मोडूनि मायाकुंजरु। मुक्तिमोतियाचा वोगरु। जेवविता सद्गुरु। निवृत्ति वंदूं।॥ अमृ. प्र. २—३॥"

"जयाचेनि अपांगपातें। बंध मोक्षपणीं आते। मेटे जाणतया जाणतें। जयापाशीं॥ अमृ. प्र. २—४॥ जयाचेनि अनवसरें। द्रष्टा ले दृश्याचे मोहिरें। जो भेटतचिवेंव सरे। बहुरूपचि हे॥ अमृ. प्र. २—९॥" अशा तऱ्हेनें हा उपक्रम करून वाचाऋणपरिहार, सच्चिदानंदपदत्रयाविवरण, अज्ञानखंडन, जीवन्मुक्तदशाकथन अशा निरनिराळ्या प्रकरणांनीं उपनिषदांचा मुख्य सिद्धान्त 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन" — "एकच एक परब्रह्म, त्या वांचून जगांत दुसरें कांहींहि नाहीं" तें सिद्ध करून शेवटीं उपसंहार केला कीं— "शिवशिवा, समर्था स्वामी। येवढीये आनंदभूमि। घेपे दीजे एकें आम्हीं। ऐसें

केलें ॥ अमृ. प्र. ९–६५ ॥ – शिवाशिवा, परमकल्याणस्वरूपा, "समर्था, स्वामी–" धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे सर्व चारी पुरुषार्थ ज्यांच्या ठिकाणीं पूर्णत्वानें असलेल्या परमश्रेष्ठ सद्गुरुराया, आपण आमच्यासारख्या एकाकडून एवढी परमानंदास्थिति उपभोगली जावी, त्याला ती उपभोगतां यावी, असें आपण मला करून ठेवलें आहे." "परि गा श्रीनिवृत्तिराया। हातातळीं सुखविलें तुं या। तरी निवांताचि मिया। भोगावें कीं तें ॥ अमृ० प्र.१०-१ ॥– हे श्रीगुरु निवृत्तिराया, तुम्ही माझ्या मस्तकावर हात ठेवून मला परमसुखमय केलें, तर तें सुख मी निवांत अनुभवावें हें खरें. "परी महेशें सूर्याहातीं। दिधली तेजाची सुती। तया भासा अंतर्वर्ती। जगचि केलें ॥ अमृ० प्र. १०–२ ॥ – परमात्मा महाईशानें सूर्याच्या ठिकाणीं तेज निर्माण केलें, त्याचा त्याला स्वतांला लाभ मिळून तो प्रकाश सर्व जगाला लाभावा. तसा या अमृतानुभवग्रंथांतील परमसुखाचा लाभ मला स्वतांला अनुभवतां आला तसा तो सर्वांना घेता यावा. आणि म्हणून या ग्रंथरचनेंतील हें सामर्थ्य तें माझें स्वतांचें नसून तें सर्व आपलें आहे. "म्हणौनि हें असंवर्य। हें दैविकीचें औदार्य। वांचोनि स्वातंतर्य। माझें नाहीं ॥ अमृ० १०–६ ॥ – यास्तव हे गुरुराया, श्रीनिवृत्तिनाथमहाराज, ही जी ग्रंथरचना हें आपल्या दैवीसंपत्तीचें अफाट औदार्य होय. त्यावांचून हें ग्रंथप्रतिपादन करण्याचें स्वतंत्र सामर्थ्य माझ्यांत नाहीं. "ययापरौतें कांहीं। संविद्रहस्य नाहीं। आणि हें तया आधींहि। असताचि असें ॥ प्र १०–११ ॥" मागील नऊ प्रकरणांपर्यंत प्रतिपादन केलेल्या सिद्धान्तापेक्षां या स्वयंज्ञानरूप परमात्म्याचें त्याहून अधिक रहस्य नाहीं, व तें रहस्य या वर्णनानें सिद्ध झालें असेंहि नाहीं. कारण या प्रतिपादनाच्या पूर्वी तें परमात्म्याचें नित्य सिद्धस्वरूप आहे तसेंच आहे. "तऱ्ही ग्रंथप्रस्तावो। न न घडे, हें म्हणों पावो। तऱ्ही सिद्धानुवाद लाहों। आवडी करूं ॥ प्र० १०–१२ ॥ –यामुळें या ग्रंथाचा आरंभ घडत नाहीं–या ग्रंथाच्या निर्मितीचें प्रयोजन उरत नाहीं, असें म्हणणें कदाचित् संभवेल, तर त्याचें उत्तर कीं जें नित्यसिद्धच आहे, त्या परमात्मस्वरूपाचा हा अनुवाद आम्ही आमच्या परमात्म्याविषयींच्या त्या सुखमय प्रेमभरांत केलेला आहे. "पढियंते सदा तेंचि। परी भोगीं नवी नवी रुची। म्हणोनि हा उचितुचि। अनुवाद सिद्धु ॥ १०–१३ ॥– आवडती वस्तु (घरांतली) नेहमींची तीच असली तरी तिच्या उपभोगांत नवी नवी आवड उत्पन्न होत असते ही गोष्ट लोकानुभवसिद्ध आहे. त्याच न्यायानें हा

आमचा नित्यसिद्ध अशा परमात्मस्वरूपाविषयींचा अनुवाद उचितच आहे." "एवं दशोपनिषदें। पुढारी न ढळती पदें। देखोनि बुडी बोधें। येथेंचि दिधली ॥ प्र० १०–१८ ॥–याप्रमाणें आम्ही या ग्रंथांत परब्रह्मस्वरूपाचें वर्णन केलें आहे. त्याहून अधिक पुढचीं पावलें दशोपनिषदांचींहि पडलेलीं नाहींत. जरी दशोपनिषदांमध्यें पुष्कळ विस्तृत वर्णन आलें असलें तरी सर्व विस्ताराचें तात्पर्य परमात्मस्वरूपाविषयींचा सिद्धान्त प्रतिपादन कारणें एवढेंच आहे. हें पाहून परमात्मस्वरूपाच्या बोधानें आमच्या या ग्रंथांत पण आपला तळ देऊन त्यानें आपला मुक्काम इथेंहि ठेवला आहेच. "ज्ञानदेवो म्हणे "श्रीमंत। हें अनुभवामृत"। सेवोनि जीवन्मुक्त। होचि होतु ॥ १०–१९–श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रेमपूर्वक आशीर्वचन देऊन म्हणतात कीं, सर्व वैभवाचें श्रीमंत असें या "अनुभवामृत"– ग्रंथांतील अनुभवरूप अमृत सेवन करून ते जीवन्मुक्त-दशेंतील अमृतानुभव होऊन राहोत!" "तैसी तये ईश्वरीं। अंगुळी नव्होचि दुसरीं। किंबहुना सरोवरीं। शिवेंशिचि ॥ १०–३० ॥– तसेंच या परमात्म-शिवस्वरूपाच्या ठिकाणीं अंगुलि निर्देश करून म्हणजे बोटानें तें असें तसें एवढें तेवढें आहे असें त्याचें वर्णन करून सांगतां येणारें नाहीं. फार काय सांगावें? कारण सर्व विश्व एकच एक परब्रह्मशिवरूपच आहे, त्यावांचून दुसरें कांहींहि नाहीं." "म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे। अनुभवामृतें येणें। सणु भोगिजे सणें। विश्वाचेनि ॥ १० – ३१ ॥–यासाठीं या अमृतानुभवरूप ग्रंथांतल्या आनंदाचा सर्वविश्व शिवमय पाहून मोठ्या सोहळ्यानें सदैव अनुभव घेत राहावें." तथास्तु.

श्रीगुरूंच्या उपदेशद्वारां जीवब्रह्माच्या ऐक्यज्ञानाचा उपदेश होऊनहि असंभवादि प्रतिबंधामुळें त्या ऐक्यज्ञानाचा निश्चय होत नाहीं. तो व्हावा म्हणून आत्मप्राप्तीचें श्रवण करवणारी जशी ज्ञानेश्वरी तसाच अमृतानुभव हा आत्म-प्राप्तीच्या श्रवणाचें मनन करवून देऊन मुमुक्षूला स्वस्वरूपप्राप्तीच्या स्वानंदाच्या भरांत एकसारखें सुखमय होऊन राहातां यावें म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं या ग्रंथाची योजना केली. हा श्रीव्यासांच्या 'ब्रह्मसूत्र' ग्रंथाप्रमाणें सिद्धान्ती ग्रंथ आहे.

या ग्रंथाची भाषा फार जुनी व सूत्ररूप असल्यानें समजण्यास कठीण आहे. तसेंच यांतील अभिप्रायहि गहन आहेत. यासाठीं पहिल्या पांच श्लोकांचीं पदें, अन्वय, स्पष्टार्थ, सुबोधविवरण देण्यांत येऊन ओव्यांच्या बाबतींतहि तेंच केलें असल्यानें बरीचशी सुलभता होऊन शक्य तितका स्पष्टीकरण करण्याचा

प्रयत्न करण्यांत आला आहे, हें वाचकांच्या सहज लक्षांत येणारें आहे. या बाबतींत आम्हांला आतांपर्यंतच्या या ग्रंथावरील टीकाकारांचें बरेंच साहाय्य झालें आहे. तथापि त्यांतल्यात्यांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या नाथसंप्रदायांतल्या परमहंस शिवकल्याणस्वामींच्या ओवीबद्ध टीकेचें विशेष साहाय्य झालें. श्रीक्षेत्रकाशी येथील सुविख्यात परमहंस स्वयंप्रकाशस्वामीमहाराज यांच्या दुर्गाघाटावरील मठांत उपनिषद्ग्रंथांवरील पाठ चालत असे त्यासाठीं आम्ही पुण्याची मंडळी वैकुंठवासी हरिभक्तिपरायण विनायकबुवा साखरे, येथल्या मुंजाबाच्या बोळांतील आजचे श्रीशंकराचार्य शिरोळकर स्वामी असे आम्ही जमत असूं. त्यामुळें तेथल्या सन १९०२ पासूनच्या आमच्या मुक्कामांत प्रस्थानत्रयीच्या पाठाचा आम्हांस लाभ झाल्यानें ज्ञानेश्वरी, अमृतानुभवासारख्या अतिगूढ प्रमेयाच्या ग्रंथांत आम्हांस सहजगति मिळवितां आली. तसेंच श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे समकालीन संत कान्होबा पाठक ज्यांना माउली विनयानें 'काका' म्हणत. त्यांचें कीर्तन आळंदीस कार्तिक वद्य द्वादशीस माउली समाधींत बसण्याच्या आदल्या दिवशीं झालें, त्या आधीं सांप्रदायिक परंपरेची दीक्षा माउलींनीं संत कान्होबांस दिली होतीच. त्यावेळेपासून परंपरागत श्रीगीता, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपांसष्टी, हरिपाठ, अभंग-गाथा, योगवासिष्ठ या माउलींच्या ग्रंथांचें पठन–पाठनपूर्वक परिशीलन आमच्या-पर्यंत चालत आलें असल्यानें अमृतानुभवग्रंथांतलें हें स्पष्टीकरणाचें काम आम्हांस त्यामुळें करतां आलें. सन १९०६ पासूनच्या पुढील कांहीं काळांत पुण्यांतील चिमण्यागणपतीनजीकचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पूर्णकृपेंतले प्रसिद्धिविन्मुख असलेले असे वैकुंठवासी संत श्रीहरिरामकृष्ण बोकीलमहाराज यांच्या सहवासांत श्रीकृष्णजयंतीनिमित्त दरसाल होणाऱ्या त्यांच्या श्रीज्ञानेश्वरी–अमृतानुभवाच्या सताहवाचनसोहळ्याच्या सुखाचा लाभ आम्हांस प्राप्त होत गेल्यानें या दोन्ही ग्रंथांच्या गूढ अर्थांचा अंतरांत सहजच प्रकाश होई. तसेंच पुण्यांत त्या वेळचे सुप्रसिद्ध एकनिष्ठ भागवतवारकरीसंप्रदायी वैकुंठवासी हरिभक्तिपरायण गुरुवर्य श्रीविष्णुबुवा जोगमहाराजांच्या पंढरी–आळंदी–देहू इत्यादि नेहमींच्या वारीच्या वेळच्या सान्निध्यांत सांप्रदायिक कीर्तन–प्रवचनांच्या श्रवणसुखाचा लाभ आम्हांस बराच लाभला. तसेंच हरिभक्तिपरायण वैकुंठवासी श्रीकेशवराव देशमुखमहाराजांच्या आमचेवरील स्नेहाच्या लोभामुळें त्यांच्या श्रीज्ञानेश्वरी-अमृतानुभव-श्रीमद्भागवता-वरील प्रवचनांतील कार्यक्रमांत आमच्या तेव्हांच्या प्रवचनांचाहि त्यांनीं समावेश करून ठेवला असल्यानें तें प्रवचनसुख आम्हांस अद्यापहि मिळत राहिलें आहे, याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत.

ग्रंथाच्या शेवटीं समालोचन दिलें असल्यानें सूचीचीहि जरुरी राहिली नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक ओवीखालीं शब्दांचा अर्थ, भावार्थ, सुबोधविवरण दिल्यानें शब्दकोशाचीहि आवश्यकता नाहीं. प्रकरणवार विषयांचें आकलन व्हावें म्हणून खुलाशाची अनुक्रमणिका देऊन शुद्धिपत्रहि सोबत जोडलें आहेच. तसेंच श्रीज्ञानेश्वर महाराजांचें अलौकिक असें उद्बोधक चरित्र पण दिलें आहेच. अशा तऱ्हेनें शक्य तितक्या रीतीनें या प्रासादिक गूढसिद्धान्ताच्या ग्रंथाची सुलभता व्हावी म्हणून प्रयत्न केला गेला आहे.

पुणें येथील चित्रशाळेनें या ग्रंथाच्या प्रकाशनाचें काम आपल्यावर घेऊन तें उत्तम रीतीनें पार पाडलें. पुस्तकाच्या निर्मितीच्या कामीं जें जें साहाय्य लागलें तें तें चित्रशाळेच्या प्रकाशनखात्याकडून आम्हांस तत्परतेनें देण्यांत आलें. त्यामुळेंच या ग्रंथाचें प्रकाशन लवकर व चांगलें होऊं शकलें. म्हणून या मंडळींचा मी अत्यंत आभारी आहें.

पुणें शहर, १७ डिसेंबर १९५६.
मार्गशीर्ष शुद्ध १५ दत्तजयंती
शके १८७८.

श्रीमाउलीचरणीं सदैव लीन
दत्तात्रय केशव पाठक

॥ श्रीपांडुरंग प्रसन्न ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें अलौकिक चरित्र

भगवंत म्हणतात—

" तेणेंसीं आम्हां मैत्र । एथ कायसें विचित्र ।
परि तयाचें चरित्र । ऐकती जे ॥ ज्ञाने. १२–२२६ ॥
तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें ।
जे भक्तचरित्रातें । प्रशंसती ॥ " ज्ञाने. १२–२२७ ॥

पूर्ववृत्तान्त—श्रीमहाविष्णुभगवंताच्या चरणांच्यापासून निघून भगवान् श्रीशंकरांच्या जटेंत प्रकटलेली ती गौतमऋषींच्या प्रार्थनेवरून नाशिकजवळच्या त्र्यंबकेश्वरक्षेत्राच्या लगतच्या ब्रह्मगिरीवरून वाहात आलेली गंगा तीच महानदी गोदावरी होय. इच्या कांठीं दक्षिणेकडील काशीक्षेत्र समजलेलें असें फार पुरातनचें वसलेलें एक महान् क्षेत्र त्याचें नांव पैठण. इथून जवळच अदमासें चार कोसांवर ज्याला पूर्वी आपस्तंब क्षेत्र म्हणत तेंच आपेगांव. हेंहि गोदावरी या महानदी तीर्थावरचें म्हणून क्षेत्रांत गणलें जातें. याच आपेगांवांत वत्सगोत्री माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदी ब्राह्मणाचें बऱ्याच प्राचीन कालचें कुलकर्णवृत्तीचें एक घराणें. या घराण्यांत हरिपंतांचे पणतु त्र्यंबकपंत नांवाचे मोठे कुलदीपक गृहस्थ जन्मास आले. हेच आमच्या चरित्रनायकाचे म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे पणजोबा. ते पुढें लवकरच वेदशास्त्रसंपन्न झाले. आपल्या कुलकर्णपणाच्या कामांतहि त्र्यंबकपंत हे अतिशय दक्ष असत. तसेच त्यांचा ते फार शूर व पराक्रमी असल्याचा लौकिक तेथल्या सर्व पंचक्रोशींत सर्वत्र विश्रुत होता. याच वेळीं भगवान् श्रीकृष्णाच्या वंशजांतल्या यादवघराण्यांतला जयत्रपाळ नांवाचा अकराव्या शतकांतल्या मध्यांत मोठा धार्मिक, प्रजापालनदक्ष राजा राज्य करीत होता. त्याच्या कानापर्यंत त्र्यंबकपंतांच्या शूर व पराक्रमी स्वभावाची व लौकिकाची हकीकत गेलेली होती. म्हणून राजानें त्र्यंबकपंतांना दरबारीं बोलावून घेऊन त्यांचेवर बीडप्रांताचा सर्व अधिकार पांच वर्षांच्या मुदतीचा सोंपवला, व त्याबद्दल त्र्यंबकपंतांनीं एकदम एकाच वेळीं दहा हजार मुद्रा 'कर' म्हणून दरबारच्या खजिन्यांत भरावयाच्या होत्या. त्या त्यांनीं भरल्यावर त्यांना राजाकडून अधिकार-

वस्त्रें पण लगेंच देण्यांत आलीं. पुढें पांच वर्षेपर्यंत त्यांनीं विशेष दक्षतेनें बीडराज्याचा कारभार चालवून सर्व प्रजाजनांचा लौकिक मोठ्या जिव्हाळ्याचा व आदराचा संपादून त्यांतून ते निवृत्त होऊन आपेगांवीं येऊन राहिले.

त्र्यंबकपंतांना गोविंदपंत व हरिपंत असे दोन मुलगे. त्यांपैकीं धाकटे हरिपंत. हे सिंधणराजाचे सेनापति असून ते एका लढाईच्या हातघाईच्या प्रसंगांत कामीं आले. त्याचा परिणाम त्र्यंबकपंतांच्या उतारवयांतल्या मानसिक स्थितीवर फार होऊन त्यांनीं सर्व कारभार आतां त्यांचे थोरले चिरंजीव गोविंदपंतांच्यावर सोंपवून देऊन आपण स्वतः श्रीगोरखनाथांच्या योगवैभवांतल्या सहवासांत तसेंच गुरुपरंपरेंतल्या श्रीकृष्णाच्या उपासनेंतल्या आध्यात्मिक श्रवण-मनननिदिध्यासनपूर्वक आत्मचिंतनांत सदैव घालवूं लागल्यानें पुढें पुढें ते अगदीं स्थितप्रज्ञाच्या त्या उन्मनींतल्या अंतरंगांत निमग्न असत. तें इतकें कीं याच परिणत अवस्थेंत ते नंतर एका मोठ्या तुळशीवृंदावनांतल्या सारख्या जागेंत जिवंत समाधींत कायमचेच बसले. यांत त्यांच्या कंबरेपासूनचा वरचा भाग पिंडीसारखा व खालचा शाळुंका होऊन शिवलिंग बनत असलेला या तुळशीवृंदावनाच्या जीर्णोद्धारकालीं प्रत्यक्ष पाहिल्याचा अलीकडचा दाखला आहे.

त्र्यंबकपंतांच्या मागें त्यांचे चिरंजीव गोविंदपंत हे महान् भगवद्भक्त असून घरचें कुलकर्णपणहि पाहात असत. त्यांची भार्या नीरूबाई (नीरादेवी) ह्याहि मोठ्या साध्वी होत्या. असें हें एक सात्त्विक जोडपें होतें.

श्रीगोरखनाथांचे परमशिष्य श्रीगहिनीनाथ हें एकदां फिरत फिरत आपेगांवीं आले. त्या वेळीं त्यांनीं गोविंदपंतांचा अधिकार पाहून त्यांना सोहंस्वरूपाची ओळख करून देऊन नाथपंथांतली श्रीकृष्णाची उपासना सांगून त्यांना कृतार्थ केलें होतें. तथापि त्यांना संतान नसल्यामुळें तीं उभयतां अगदीं उदासीन असत. त्यासाठीं त्यांना गहिनीनाथांनीं सांगितल्यावरून त्यांनीं गायत्रीपुरश्चरण केलें आणि गायत्रीपुरश्चरणाच्या योगानें गायत्रीदेवीच्या प्रसन्नतेमुळें गोविंदपंतांना नंतर पुत्रसंतान लाभलें. त्याचें नांव विठ्ठल ठेवण्यांत आलें. ज्योतिष्यांनीं या वेळीं भविष्यहि वर्तविलें होतें कीं हा मुलगा मोठा तपस्वी व विरक्त राहील व याच्या वंशांत हरिहरविधि अवतरतील. गायत्रीदेवीच्या प्रसादाचा प्रभाव असा कीं, लहानपणापासूनच या मुलाचें खाण्यापिण्याकडे किंवा खेळण्याकडे लक्ष नसून अखंड हरिभजनाकडेच लागलेलें दिसून येई. सातव्या वर्षी विठ्ठलाची मुंज झाली. नंतर पैठणास मातुलगृहीं त्याची अध्ययनास सुरुवात झाली. एक वेळ पाठ

दिलेला तो लगेंच त्यानें मुखोद्गत म्हणून दाखवावा. अशी उपजत ग्रहणशक्ति व तीव्रबुद्धि विठ्ठलाची पाहून पैठणचें शास्त्रीपंडितहि चकित होत. लवकरच ते वेदसंहिताषडंगपरायण होऊन न्याय, वेदान्त, योग, सांख्य, मीमांसादि शास्त्रांत तसेंच भारत, भागवत, योगवासिष्ठ व शारीरभाष्यांत पारंगत झालेले आणि अनेक गायत्रीपुरश्चरणांच्यामुळें तेजःपुंज तपोनिष्ठ बनलेले परमविरक्त आत्मनिष्ठ असले विठ्ठलपंत आतां आपल्या घरीं पैठणाहून आपेगांवीं आले. आणि गायत्रीपुरश्चरणाच्या नंतर ब्रह्मचाऱ्यास तीर्थाटन अवश्य असल्याचें त्यांचें ध्यानीं येतांच त्यांचा तीर्थयात्रेस निघण्याचा पण लगेंच बेत झाला व वृद्ध आईवडिलांची परवानगी तीहि मोठ्या कष्टानें त्यांनीं मिळवून ते लवकरच बाहेर पडले. त्या वेळीं त्यांच्या मातुश्री उद्गारल्या "बाळ, आम्ही दोघेहि आतां वृद्ध झालों आहोत, हें लक्षांत बाळगून लवकरच तूं आपली तीर्थयात्रा संपवून परतावें. वाटेंत तुला क्षुधा, तृषा, ऊन, वारा, पाऊस इत्यादि सर्व कांहीं सोसावें लागेल, तरी नीट जपून असावें. संध्याकाळ होतांच पुढें प्रवास न करतां तिथेंच थांबून दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुढें जाण्याचें करावें, असो. आमची आठवण तुला असूं दे" असें म्हणून आईनें पंतांच्या पाठीवरून हात फिरवून त्यांस कुरवाळलें व गहिंवरून त्यांना यात्रेस जाण्याचा निरोप मोठ्या कष्टानें पण दिलाच. मग मातापित्यांना वंदन करून पंत यात्रेस निघाले. पावलोंपावलीं श्रीहरीचें ध्यानपूर्वक मुखीं नामस्मरण करीत करीत मार्ग क्रमून ते लवकरच द्वारकेस पोंचले. येथें भगवंत द्वारकाधीशाची आनंदमय मूर्ति दृष्टीस पडतांच प्रेमाश्रूंनीं त्यांचा कंठ दाटून येऊन सर्वांगावर हर्षभरित रोमांच उभे असलेल्या स्थितींतच ते कांहीं काळ तसेंच आनंदभरित अगदीं स्तब्ध अवस्थेंत होते. द्वारकेस तीन रात्र राहून नंतर पिंडारक, सुदामपुरी, प्रभासतीर्थ, सोरटीसोमनाथ करून सप्तशृंगीच्या भगवती देवीचें दर्शन घेऊन नाशिकपंचवटींतल्या रामरायाची भेट होऊन पुढें त्र्यंबकेश्वरीं कुशावर्तांत स्नान करून ब्रह्मगिरीस उजवी घालून तो ओलांडून ते भीमाशंकरावरून पंढरीस जाण्याच्या वाटेवरील आळंदीस येऊन थांबले. व तिथें आल्यावर भगवान् श्रीशंकराच्या प्रसन्नतेनें इंद्रास वर मिळून झालेलें तीर्थ इंद्रायणी ही प्रतिगंगाच असल्यानें इथें स्नान करणाराचें शरीर निर्मळ होऊन मनास प्रसन्नता प्राप्त होतें असें पुराणांतरीं वाचल्याचें त्यांना स्मरलें. आळंदीतलें ग्रामदैवत म्हणून प्रसिद्ध असलेल्या सिद्धेश्वरमंदिरांतील सुवर्णपिंपळालगतच्या एका ओवरींत पंतांचा आतां मुक्काम झाला होता. दुसऱ्या दिवशीं ते तेथून तीर्थस्नानादि उरकून पुढें पंढरीकडे निघणार होते.

आळंदीस सिद्धेश्वर ऊर्फ सिद्धोपंत नांवाचे चोवीस गांवचे वतनदार, मोठे संपन्न, सदाचारी, सत्पुरुषवृत्तीचे व परंपरागतचें कुळकर्णपण असलेले सद्गृहस्थ. त्यांची साध्वी भार्या उमाबाई. यांची एकुलती एक जिवलग सद्गुणी मुलगी रुक्मिणी. आपलें नित्याचें ब्रह्मकर्म उरकल्यावर भोजनापूर्वी सिद्धेश्वराचें दर्शन घेऊन झाल्यावर तिथें कुणी एखादा पांथस्थ आला असल्यास त्याची विचारपूस करण्याचा सिद्धोपंतांचा नित्याचा क्रम असे. आज ते नित्याप्रमाणें मंदिरांत गेले असतां त्यांना कुणी तरी तेजःपुंज तपोनिष्ठ ब्रह्मचारी यात्रेकरी ध्यानस्थ असल्याचें आढळून आल्यावरून ते तिथें कांहीं वेळ थांबले. नंतर विचारपूस होऊन त्यांची खात्री झाल्यानें त्या यात्रेकरूस त्यांनीं जेवायचा बराच आग्रह करून आपल्या घरीं घेऊन गेले. जेवणाच्या वेळीं विठ्ठलपंतांची ती अंतरंगीं ध्यानस्थ वृत्ति पाहून व जेवणाखाण्याकडे त्यांचें विशेष लक्ष नसल्याचें दिसून येतांच हा मोठा शांत, गंभीर, सात्त्विक स्वभावाचा पण अत्यंत विरक्त पुरुष असावा असें सिद्धोपंतांचें ध्यानांत आलें. आपली रुक्मिणी पण आतां अगदीं उपवर झाली असून तिला आज कित्येक दिवस योग्य वर शोधण्याचें आपलें चाललें आहेच. तरी हा वर तिला योग्य होईल आणि अनायासेंच योगहि पण जुळून आल्यासारखें दिसत आहे; तरी ईश्वरी इच्छा काय असेल तसें घडून येईल, असो. जेवणानंतर विठ्ठलपंतांना त्यांच्या तीर्थयात्रेच्या प्रवासाची हकीकत सिद्धोपंतांनीं विचारतांच ते उद्गारले, "पैठणजवळच्या आपेगावचे आम्ही कुलकर्णी. आमचें गोत्र वत्स. आम्ही यजुर्वेदी माध्यंदिन शाखीय ब्राह्मण. माझें नांव विठ्ठल. घरीं वृद्ध आईवडील. वडिलांचें नांव गोविंदपंत व आईचें नांव नीराबाई. पैठणास माझें षडंगशाखाध्ययन व षट्शास्त्रांचेंहि पण अध्ययन झालें आहे. गायत्रीपुरश्चरणानंतर ब्रह्मचाऱ्यास तीर्थ-यात्रा अवश्य असल्यानें त्याप्रमाणें यात्रेस निघालों असून येथून पुढें पंढरीस जाऊन रामेश्वरची यात्रा पुरी करून घरीं परतणार आहें. ही हकीकत ऐकून सिद्धोपंतांच्या मनाचा हा वर आपल्या रुक्मिणीला योग्य असल्याचा निश्चय झाला व याला त्यांच्या भार्येची व घरांतील व गांवांतील इतर मंडळीचीहि संमति मिळाली. तथापि वराच्या बाजूनें इथें दुसरें कुणी त्याचे आप्त नाहींत व त्याचे आईवडील तर फारच दूरच्या अंतरावरचे. आणि लग्नाच्या तिथि तर संपत आल्या असून एकच व तीहि शेवटचीच. अशा विशेष चिंतेंत ते असतांनाच त्याच रात्रीं त्यांना श्रीपंढरीरायाचा दृष्टान्त झाला "हा वर तूं निश्चित करून यालाच आपली मुलगी द्यावी. इच्या पोटीं हरिहरब्रह्माचे अवतार जन्मास येणार

आहेत." हा स्वप्नदृष्टान्त सिद्धोपंतांनीं दुसऱ्या दिवशीं उजाडतांच घरांतील सर्वांस तसाच तो विठ्ठलपंतांनाहि सांगितला. त्यावर विठ्ठलपंत बोलले कीं, मला तसा कांहीं दृष्टान्त झाला नाहीं. तथापि आमची यात्रा संपून झाल्यावर मग याचा विचार करतां येईल. पण दैवी घटना कांहीं निराळी असल्यानें विठ्ठलपंतांनाहि त्या रात्रीं तुळशीवृंदावनाशीं ते निजले असतांना श्रीपांडुरंगाचा दृष्टान्त झाला कीं, "तूं आधीं सिद्धोपंतांच्या मुलीचें पाणिग्रहण करून मग यात्रेस जावें. इच्या पोटीं हरिहरब्रह्मा अवतार घेऊन धर्मरक्षणाकरितां येणार आहेत." हा आपला दृष्टान्त विठ्ठलपंतांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठतांक्षणींच सर्वांना सांगून टाकला. त्यामुळें पुढें लगेंच सिद्धोपंतांनीं वधूवरपक्षाची दोन्हीकडील तयारी आपणच करून लग्नसमारंभाचा सोहळा अतिशय उत्साहपूर्वक चार दिवसपर्यंत मोठ्या थाटाचा केला.

याप्रमाणें विधिपूर्वक वेदीवर सप्तपदी होऊन वरानें पाणिग्रहण करून होतांच सिद्धोपंतांना धन्यता वाटली व ही सर्व कांहीं पंढरीरायाचीच घटना होय असे त्यांचे उद्गार निघतांच त्यांचे डोळे त्यामुळें आनंदाश्रूंनीं भरून गेलेले सर्वांस दिसत होते. नंतर वैदिक, शास्त्री, आप्तइष्ट, स्नेहीजन व आश्रित लोक या सर्वांना यथाधिकार देकार देऊन सिद्धोपंतांनीं त्यांचा आदरपूर्वक सन्मान केला. पुढें लगेंच आषाढी एकादशीनिमित्त पंढरीस जाण्याची व नवीन लग्नकार्य घरांत झाल्यास त्याचें ओव्हर–जोडपें श्रीपांडुरंगदर्शनास नेण्याची परंपरागत चाल सिद्धोपंतांच्या घराण्यांत असल्याची, जामात विठ्ठलपंत यांचे कानावर त्यांनीं घालतांच तेहि पण निघण्यास फारच उत्सुक दिसले. त्याप्रमाणें सर्व मंडळीसह ठिकठिकाणीं मुक्काम करीत करीत सिद्धोपंत पंढरीस येतांच राउळांत श्रीपंढरीनाथचरणीं कन्या–जामाताची बडव्यांच्याकरवीं भेट करविली. पुढें काल्यापर्यंत पंढरीस राहून सर्व सोहळा पाहून कन्या, भार्या व आश्रितजन यासर्वांसह ते आळंदीस येण्यास परतले. आणि विठ्ठलपंत आपल्या पूर्वीच्या संकेताप्रमाणें रामेश्वरयात्रेस सर्वांच्या संमतीनें निघाले. शिवकांची, विष्णुकांची, गिरीचा बालाजी, सेतुरामेश्वर करून गोकर्णमहाबळेश्वरावरून परतून कोल्हापुरीं महालक्ष्मीचें दर्शन घेऊन माहुलीच्या संगमतीर्थी स्नान करून आळंदीस येऊन पोंचले. ते येतांच त्यांचा सिद्धोपंतांनीं मोठा सत्कार करून त्यांना राहवून घेतलें. तथापि मातापितरांच्या दर्शनास जाण्याची विठ्ठलपंतांनीं आपली बरीच निकड दर्शवितांच सिद्धोपंतांनींहि त्यांना प्रोत्साहन देऊन आपण सर्वच आपेगांवीं जाऊं असें जावयास सांगितलें. आणि नंतर ती सर्व मंडळी

आपेगांवास येऊन दाखल झाली. मग सिद्धोपंतांनीं इष्टान्तापासूनची तें लग्नमुहूर्त अखेरचा अगदीं घाईचा तो साधण्यापर्यंतची सर्व हकीकत गोविंदपंतांना निवेदून आपली चूक झाल्याचें त्यांना मोठ्या आर्जवानें गाहिंवरून सांगितलें व व्याही-विहिणींची क्षमा मागितली. सुनेला पाहून गोविंदपंतांना समाधान वाटलें. आणि आश्वासून म्हणाले, "अहो, तुमचें तसें आमचेंहि पण तें लेंकरूंच कीं ! तरी आपल्या कन्येची आपण कांहींहि काळजी करूं नका व झाल्या गोष्टी सर्व विसरून जा. जें कांहीं होत असतें तें परमेश्वरी योजनेनेंच होत असतें. आपण मात्र निमित्त होत असतों, असो." यानंतर सिद्धोपंतांनीं व्याहीविहिणींचा व त्यांच्या आप्त-इष्टांचा देकारपूर्वक सन्मान करून चार दिवस राहून ते आपेगावीं परतले आणि सर्व कांहीं यथास्थित झाल्याचें समाधान वाटून ते निश्चिंत झाले होते.

विठ्ठलपंतांस आपेगांवीं कांहीं दिवस लोटतांच सृष्टिक्रमानुसार त्यांची वृद्ध माता व पिता हीं दोन्ही दिवंगत झालीं. आतां प्रपंचाचा भार त्यांच्या शिरावर पडला होता खरा. तथापि त्यांच्या ध्यानींमनीं सदासर्वदा श्रीपंढरीनाथाचें चिंतन असल्यानें व स्वभावतःच ते अगदीं विरक्त म्हणून त्यांचें लक्ष प्रपंचाकडे नसेंच. याचा परिणाम रुक्मिणींच्या मनावर फारच होऊन त्या अहोरात्र सचिंत असत. हें वर्तमान आळंदीस सिद्धोपंतांस कळतांच ते आपेगांवीं येऊन जावयाची वृत्ति पाहून त्यांच्यासह कन्येला घेऊन आळंदीला आले. "आणि सर्व कांहीं श्रीपंढरीरायाच्या प्रेरणेनेंच होत असतें. तरी त्याच्यावरच विसंबून राहावें" असें सिद्धोपंतांनीं सांगून रुक्मिणीचें समाधान केलें. "प्रभु सर्व ठीक करील. तरी तूं कांहीं चिंता करूं नकोस." असें ते उद्गारले.

विठ्ठलपंतांचा आतांचा आळंदीस आल्यानंतरचा दररोजचा कार्यक्रम म्हणजे सकाळीं प्रातःस्नानानंतर गायत्रीचा एक हजार जप, सूर्यनमस्कार, गीतापठन, भागवत, भारत, योगवासिष्ठ यांचें वाचन आणि "श्रीकृष्ण, गोविंद, हरे, मुरारे" हें अहोरात्र मुखांत चाललेलेंच. ते दरसालच्या आषाढी-कार्तिकेच्या पंढरीच्या यात्रेस जात. असा हा क्रम त्यांचा पुष्कळ वर्षें चालतच होता. पण आतां उतार वय होत चाल्ल्यानें संततीचा योग नाहीं असा निश्चय होऊन वाटूं लागलें कीं संन्यास घ्यावा, हें बरें. पण याला स्त्रीची संमति असावी लागते. म्हणून त्यांनीं ही गोष्ट रुक्मिणींच्याजवळ एकदां काढून पाहिलेंहि. "पुत्रसंतानावांचून पितृऋण फिटत नसतें. यामुळें संन्यास घेतां येत नाहीं," असें

रुक्मिणींनीं निक्षून सांगितल्यावर कांहीं दिवस थांबून नंतर विठ्ठलपंतांनीं मधून मधून पण एकसारखा संन्यास घेण्याच्या परवानगीचा लकडा रुक्मिणींच्या पाठीमागें त्यांनीं सुरूच ठेवला. तो इतका कीं एके दिवशीं त्या अत्यंत घाईच्या कामांत असतांना विठ्ठलपंत म्हणाले कीं, "गंगास्नान करून येतों बरं कां!" "या, अं." असें त्या सहज नकळत बोलून गेल्या मात्र कीं विठ्ठलपंतांनीं दरकूच करीत करीत थेट काशीच्या श्रीपाद–रामानंदस्वामींचा मठ गांठला. तिथें लग्न न झाल्याचा बहाणा करून विठ्ठलपंतांनीं थोड्याच दिवसांत श्रीपादस्वामींची मर्जी संपादून संन्यास ग्रहण करून चैतन्य नांव धारण केलेलें ते स्वामी होऊन बसलेहि.

आळंदीस रुक्मिणीबाई पतीची वाट पाहून पाहून दमल्या. आणि शेवटीं निरुपाय होऊन त्यांनीं सिद्धेश्वरमंदिरांतील सुवर्णमय अश्वत्थनारायणाची सेवा दररोज सकाळपासून तें दुपारच्या बारापर्यंत प्रदक्षिणा घालण्याची सुरुवात केली. तोंच त्यांच्या कानावर विठ्ठलपंत काशीस असून संन्यास ग्रहण करून आहेत असें आलें व आपल्या नशिबीं पतिसुख नाहीं याचा त्यांना राहून राहून खेद वाटे. ही बातमी त्यांनीं लगेच वडलांच्याहि कानावर घातली. त्यामुळें त्यांनाहि फार दुःख होऊन पश्चात्ताप वाटूं लागला. तथापि रुक्मिणींनीं दृढनिश्चयानें अश्वत्थसेवा चालविलीच होती. त्या अश्वत्थनारायणास दररोज नाक घासून विनवीत कीं, "नारायणा, त्यांच्या ठिकाणचें तें तीव्र वैराग्य पार लोपून जाऊन त्यांनीं पुन्हा संसाराकडे वळावें" हीच या अनाथ दासीची तुला हात जोडून प्रार्थना आहे. साध्वी पतिव्रतेच्या या प्रार्थनेचा परिणाम पण अखेरीस झालाच.

काशीस श्रीपादस्वामींच्या मनांत एकाएकीं आलें कीं आपण रामेश्वर–यात्रेस निघावें. व त्याप्रमाणें मठाची सर्व व्यवस्था, त्यांची मर्जी संपादून विश्वासास पात्र झालेल्या चैतन्यावर सोपवून ते लगेंच शिष्यमंडळीसह संचारार्थ बाहेर पडून दर मुक्काम करीत करीत वाटेवरील आळंदीस अवचित सहजच येऊन पोंचले. इथें ते एका प्रसिद्ध मारुतीच्या मंदिरांत उतरले होते. व याच मारुतीला रुक्मिणींचा दररोज दर्शनास जाण्याचा नियम म्हणून त्या आजहि आल्या. त्या वेळीं त्यांना कुणी एक स्वामी दिसले म्हणून त्या स्वामींना वंदन करीत असतांच "पुत्रवती भव" म्हणून स्वामीमहाराज उद्गारले. तोंच रुक्मिणी ह्या आश्चर्य-चकित होऊन संकोचल्यासारख्या दिसल्या. तेव्हां स्वामींनीं कारण विचारतांच त्या उद्गारल्या, "आज बारा वर्षें झालीं पतिदेवाचा पत्ता नाहीं. तथापि ते काशीस श्रीपादस्वामींच्याकडून संन्यास घेऊन असल्याचें नुकतेंच ऐकलें."

तत्काळ स्वामींच्याहि पण तें लक्षांत येऊन चुकलेंच कीं, "चैतन्य म्हणून जो तोच हा." असा निश्चय होऊन स्वामींनीं रामेश्वरयात्रेचा बेत रहित करून सिद्धोपंतांची गांठ घेऊन ते रुक्मिणीसह काशीस तसेच परतले. सिद्धोपंत व रुक्मिणी यांची उतरण्याची व्यवस्था लावून स्वामींनीं चैतन्यास पुकारून खरी हकीकत काय आहे हें सांगण्यास मोठ्या रागाच्या आवेशानें विचारलें असतां चैतन्यांनीं सर्व खरी हकीकत सांगून झाल्यावर सिद्धोपंतांना बोलावून रुक्मिणीला चैतन्यांच्या स्वाधीन करून स्वामी म्हणाले, "स्वस्त्रीची आज्ञा नसतांना घेतलेला संन्यास शास्त्रविरुद्ध ठरतो. म्हणून तूं खुशाल गृहस्थाश्रम स्वीकारून राहावें. व इच्या पोटीं "हरिहरब्रह्मदेव" अवतरून येणार आहेत," अशी पुढील भविष्याची त्यांस जाणीव करून दिल्यानंतर ती सर्व मंडळी आळंदीस येऊन दाखल झाली. त्याआधींच विठ्ठलपंतांनीं संन्यास घेतलेला तो टाकून देऊन पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्याची बातमी आळंदीस येऊन पोंचली होती. त्यामुळें सिद्धोपंत गांवीं येतांच त्यांच्यावर बहिष्कार घालण्यांत येणार असल्याचें त्यांना व विठ्ठलपंतांना कळतांच विठ्ठलपंतांनीं आपण होऊनच सहकुटुंब गांवाबाहेर सिद्धबेटांत राहण्याचें ठरवून ते तसेच तिकडे निघालेहि. व तिथें एक झोंपडी झाडाच्या फांद्यांच्या लाकडांची पानांनीं आच्छादलेली तयार करून तींत उभयतां राहूं लागले, तरी सुद्धां ते कोरान्नभिक्षेस गांवांत जात त्या वेळीं त्यांची उघड उघड तोंडावर निंदा होऊन त्यांना छळ सोसावा लागल्यानें त्यांचे फारच हाल होत. पुरेशी भिक्षा मिळत नसे. म्हणून कधीं नुसत्या पाण्यावर तर कधीं रानांतल्या कंदमुळेंफळांवर ते दिवस काढीत. असे कांहीं दिवस जातांच रुक्मिणींच्या ठिकाणीं गर्भधारणा होऊन नऊ महिने पुरे होतांच त्या पुत्ररत्न प्रसवल्या. ते प्रत्यक्ष शंकरभगवानच अवतरून येणार असल्याचें आधींच विठ्ठलपंतांना व रुक्मिणींना स्वप्नांतल्या दृष्टान्तानें सूचित झालें होतें. म्हणून त्यांनीं या सुंदर तेजःपुंज मनोहर बाळाचें नांव 'निवृत्ति' ठेवलें. हा दिवस माघ, वद्य प्रतिपदा, सोमवार, प्रातःकाळ, श्रीमुखनाम संवत्सर, शके अकराशें नव्वद असावा. दुसरें अपत्य श्रावण, वद्य गोकुळ अष्टमी, गुरुवार, मध्यरात्र, युवानाम संवत्सर, शके अकराशें त्र्याण्णवांत जन्मलें. ते भगवान् महाविष्णुच प्रत्यक्ष अवतरून आलेले. या बाळाचें नांव दृष्टान्ताप्रमाणें ज्ञानदेव ठेवण्यांत आलें. तिसरें अपत्य जन्मलें तो दिवस कार्तिक, शुद्ध पौर्णिमा, रविवार, प्रहररात्र, ईश्वरनाम संवत्सर, शके अकराशें शाण्णव. हे प्रत्यक्ष ब्रह्मदेवच प्रकटलेले. यांचें नांव 'सोपान'. चवथ्या

भगवती चित्कला मुक्ताबाई नांवानें प्रसिद्धिल्या. हा दिवस आश्विन शुद्ध प्रतिपदा शुक्रवार, मध्याह्न, प्रमाथिनाम संवत्सर, शके अकराशें नव्याण्णव. (हे शक ज्ञानेश्वरीचे लेखक सच्चिदानंदबाबाकृत 'ज्ञानेश्वरविजय' यांतील आहेत.) "ज्ञानेशो भगवान् विष्णुर्निवृत्तिर्भगवान् हरः। सोपानो ब्रह्मदेवश्च मुक्ताख्या चित्कला च सा ॥" असें हें सर्वविश्रुत आहेच. या वरील जन्मशकांसंबंधीं जनाबाईचा अभंग असा आहेः—"शालिवाहन शके अकराशें नव्वद। निवृत्ति आनंद प्रगटले ॥ १ ॥ त्र्याण्णवाच्या सालीं ज्ञानेश्वर प्रगटले। सोपान देखिले शाण्णवांत ॥ २ ॥ नव्याण्णवाच्या सालीं मुक्ताई देखिली। जनी म्हणे केली मात त्यांनीं ॥ ३ ॥"

सच्चिदानंदबाबाकृत ओव्या— "ऐसीं इच्छेसारखीं बाळें। बालार्कसम तेजाळें। पाहुनी मातापित्यांचे डोळे। भरती सदा आनंदें ॥ १ ॥ असो संतति जन्मली भली। मातापिता सुखावली। परी झाली जातीवेगळी। म्हणुनी कष्टी उभयतां ॥ २ ॥ कांहीं सुचेना पुढील उपाय। तिळातिळ तुटे त्यांचें हृदय। मुलांचा उपनयनसमय। सन्निध येत चालला ॥ ३ ॥ मग ब्रह्मसभा मेळविली ॥ वर्तली मात जाणविली ॥ गुर्वाज्ञेनें मज घडली। प्रपंचस्थिति यति म्हणे ॥" यावर सभास्थानीं जमलेल्या वैदिक, शास्त्री, पंडित, धर्मनिष्ठ, तपोनिधि तसेंच ब्रह्मनिष्ठ, तत्त्ववेत्ते अशा सर्व अधिकारांच्या ब्रह्मवृंदांनीं सर्व शास्त्रार्थांचा साधक बाधक विचार करून मग एकमतानें आपला निर्णय विठ्ठलपंतांना सांगण्यांत आला— "तुम्ही एकदां गृहस्थाश्रम सोडून विधिपूर्वक संन्यास घेतल्यानंतर त्या यतिधर्मांचा त्याग केल्हांहि करतां येत नाहीं, तो तुम्ही टाकून देऊन पुन्हा गृहस्थी झालांत; हें करणें अत्यंत निंद्य असून तुमचेकडून हें घोर पातक घडलें आहे म्हणून याला देहान्तप्रायश्चित्त घेण्याखेरीज अन्य उपाय नाहीं. प्रयागतीर्थीं गंगाप्रवेश करून मुक्त होणें, हेंच एक प्रायश्चित्त." "सभेमाजीं शास्त्री वैदिक। ब्रह्मनिष्ठ धार्मिक। सर्वांनुमतें शास्त्रार्थ एक। निर्णय यतीतें सांगती ॥ १ ॥ "शोधावया शास्त्रार्थ। अवलोकिले अनेक ग्रंथ। परी कृतदोषपरिहारार्थ। प्रायश्चित्त दिसेना ॥ २ ॥ एकदां तुम्ही होउनी यती। गृहस्थाश्रम केला मागुती। आतां देहान्तावीण अन्यगती। नसे तुम्हांकारणें ॥ ३ ॥" ब्रह्मवृंदाचा हा कठोर निर्णय कानीं पडतांच विठ्ठलपंतांनीं सर्वतोपरी त्रस्त होऊन स्त्रीमुलांसहवर्तमान आळंदीक्षेत्र सोडून ते त्र्यंबकेश्वरच्या ब्रह्मगिरीस जाऊन त्याला सर्वांच्यासह प्रतिदिनीं एक प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. असा कांहीं दिवस क्रम चालला असतां एके दिवशीं त्या प्रदक्षि-

णेच्या वाटेवर ते सर्वजण आहेत तोंच एका वाघाच्या डरकाळीनें सर्वच भयभीत होऊन पांगले असतांना त्यांत निवृत्तिनाथांना एक गुहा दिसली. तींत ते आंत प्रवेशतात तोंच तिथें गहिनीनाथ सहजावस्थेंतल्या परमानंदांत एकासनीं स्थित होते. त्यांना साष्टांग प्राणिपात करून हात जोडून निवृत्तिनाथ उभे असतांना प्रार्थना करून "म्हणे मी बाळ अल्पमती। उपदेशावी योगयुक्ति। जेणें मज स्थितप्रज्ञस्थिति। प्राप्त होये सवेग॥ १॥ मग सप्तदिनपर्यंत। पाजिले त्यासि तत्त्वमस्यादि बोधामृत। निवृत्ति झाला योगी पूर्ण ज्ञानवंत। गुरुकृपें करूनी॥ २॥ श्रीकृष्णाची उपासना। करावी ऐसे निवृत्तीच्या मना। बिंबवूनि घाडिला स्वस्थाना। गहिनीनाथें तयासी॥ ३॥ हेंचि तत्त्वज्ञान पुढती। आपुल्या सहोदरांप्रती। उपदेशावें त्वां निगुती। ऐसें तया आज्ञापिलें॥४॥" अशा रीतीनें गहिनीनाथांच्या सहवासांत त्या गुहेंत निवृत्तिनाथ सात दिवस राहून तेवढ्या अवकाशांत त्यांची कुंडलिनी जागृत होऊन प्राणस्थैर्यानें मनोजयामुळें त्यांना अन्तर्मुखता प्राप्त झाली व सद्गुरुकृपाकटाक्षद्वारां ते उन्मन बनले ते कायमचेच. आणि हाच आमचा प्रसाद भावंडांना पोंचव अशी त्यांना गहिनीनाथांनीं शब्दशक्ति पण देऊन ठेवली. नंतर गहिनीनाथांची आज्ञा होऊन ते गुहेबाहेर येतांच त्यांना अन्तर्ज्ञानानें आपली मातापिता व भावंडें ज्या ठिकाणीं होतीं तें कळल्यानें तिथें नेमके ते गेले. मग निवृत्तिनाथांची सर्वांशीं पुन्हा भेट होतांच "निवृत्ति भेटतां मागुती। संतोषले सर्व चित्तीं। गहिनीनाथ भेटले कैशा रीती। सांगे निवृत्ति वृत्त तें॥ १॥ उपदेश घेतला तेहि मात। सकलांसी केली विदित। सर्व झाले आनंदित। शुभ-चरित ऐकुनी॥ २॥" यावर सर्वांना उद्देशून विठ्ठलपंत म्हणाले कीं देहान्त प्रायश्चित्त घेण्यासाठीं मी आतां प्रयागास जात आहें. तरी तुम्ही सर्वांनीं तुमच्या जन्मभूमीस आळंदीस जावें. तेव्हां रुक्मिणी म्हणाल्या जिकडे पतिदेव जातील तिकडे मीहि येणार. "मग सोडुनी त्र्यंबकेश्वर। संगें घेतलीं मुलें चार। निघे चैतन्य यतीश्वर। वाराणशीं जावया॥ १॥ मार्गीं येउनी आपेगांवीं। चैतन्य तेथें बालकें ठेवी। म्हणे "मुलांच्या असेल दैवीं। कैसेंही घडो यापुढें॥ २॥" मग विठ्ठलपंत आपेगांवावरून रुक्मिणीदेवींच्यासह प्रयागाकडे निघाले व तिथें त्या दोघांनीं एकदम गंगाप्रवेश करून ते दोघे जलतत्त्वरूप असे आपोनारायण झाले.

आपेगांवीं ब्रह्मवृंदसभेस निवृत्तिनाथ प्रार्थून म्हणाले कीं, "आतां आमची गति काय?" त्यावर "मग आज्ञापिती त्यांसी विप्र। पैठण क्षेत्रीं जाउनी क्षिप्र। आम्ही देतों तें पत्र। ब्रह्मसभेसी दाखवा." त्याचप्रमाणें आपेगांवच्या

ब्रह्मवृंदाचें पत्र घेऊन हीं भावंडें पैठणक्षेत्रीं आल्यावर आपल्या आजोळच्या घरीं उतरलीं. आणि लगेंच तें आपेगांवचें आणलेलें पत्र पैठणच्या ब्राह्मणसभेस दाखविलें. पण असल्या प्रायश्चित्ताचा विधि सर्वशास्त्रग्रंथ धुंडाळून पाहतां पैठणच्या ब्राह्मणसभेस आढळेना. तथापि तुम्हांस एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे "आतां पातकाची निष्कृती। होऊनी पावाल सद्गती। ऐसा उपाय "हरिभक्ति"। एकाचि आम्हां दिसतसे ॥ १ ॥" "ऐसा द्विजांचा निर्णय। ऐकुनी चौघांचें हृदय। संतोषलें कीं जें प्रिय। तेंचि देवें दीधलें ॥"

नंतर हीं भावंडें आपल्या आजोळच्या बिऱ्हाडीं परत जाण्यास निघण्याच्या बेतांत असतांना तेथल्या एका ब्राह्मणसभासदानें या मुलांना त्यांचीं नांवें काय म्हणून सहज कौतुकानें विचारल्यावर निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता अशीं मोठमोठीं नांवें ऐकून होतांच त्याच वेळीं तिथून एक पखालवाहक रेडा पण चालला होता. त्याला पाहून एकानें चेष्टेनें ज्ञानदेवास म्हटलें कीं या रेड्याचेंहि नांव 'ज्ञान्या–ग्याना' असें आहे. "नांवें तुमचीं थोर थोर। नानापरि चमत्कार। करूनी दावाल साचार। तरी ज्ञानेश्वर तुम्ही ॥" "तंव 'ज्ञान्या'नामें रेडा एक। देखिला पुष्ट पखालवाहक। याच्या मुखें वेद सम्यक। बोलवूनि दाखवा ॥" "ज्ञानदेव म्हणती यांत अधिक। कायसें आहे कौतुक। त्याचा तुमचा आत्मा एक। देहीं व्यापक सारिखा ॥" "तेव्हां बोले एक पंडित। चैतन्य सर्वगत हें निश्चित। परि त्याचा अनुभव येथ। कांहीं तरी पाहिजे।" मग तेथल्याच एकानें त्या पखालवाल्याचा आसूड घेऊन रेड्यास तडाखे मारूं लागतांच त्याचे सर्व वळ मात्र ज्ञानोबांच्या पाठीवर उमटून दिसूं लागले. "मग प्रतोद मारिले हल्ल्याचे पाठीं। तितुके वळ ज्ञानोबाचे पृष्ठीं। उमटले तें नवल दृष्टीं। विप्रवृंदीं विलोकिलें ॥" तरी पण तेवढ्यानें त्या लोकांचें समाधान न होतां नामदेवांचा अभंग "म्हणती द्विजवर, "अहो ज्ञानदेवा। या पासोनि उच्चारावा, वेदध्वनि ॥ १ ॥ तरीच तुमची सत्ता, आम्हां येईल कळों। नाहीं तरी बोलों, नका कांहीं" ॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे, बोले रे ऋग्वेद। ओंकार मूळशब्द, प्रणवाचा ॥ ३ ॥ वेदाचा आरंभ, करितां झाला पशु। विधि उपन्यासु सांग पढे ॥ ४ ॥ करिती आश्चर्य, सकळ द्विजवर। हे तिन्ही अवतार, तीन देवांचे ॥ ५ ॥ आदिमाता मुक्ताई, मुक्तपणें अवतरली। आम्हांपासुनी झाली थोर चुकी ॥६॥" तसेंच (सच्चिदानंदबाबाकृत ओंव्या)–"तंव प्रथम अष्टकाचें सूक्त। अग्निमीळे पुरोहित–। मिति स्वरवर्णसहित। ऋग्वेद हल्या पढतसे ॥ १ ॥

यजुर्वेदाचे अनुवाक कांहीं । सामवेदाच्या ऋचा त्यांही । ऐसे पढला जे विप्र तहि । म्हणों न शकती सुस्वर ॥ २ ॥

अशा प्रकारचा तो रेड्याच्या मुखांतून वेदघोष एकसारखा अस्खलित एक प्रहर चाललेला पाहून त्या सर्व पंडितांचा गर्व हरण होऊन ते त्या आश्चर्यानें अगदीं लज्जित होऊन गेले. "रेड्याचें मुखें एक प्रहर । वेदघोष शुद्ध सुस्वर । वदविते झाले ज्ञानेश्वर । तें दृश्य काय वर्णावें ॥ १ ॥ तेव्हां विप्र थोरथोर । म्हणती "हे विधि-हरिहर । देवांश होत साचार । नसे शंका आम्हांसी ॥ २ ॥ धन्य धन्य ज्ञानेश्वर । मूर्तिमंत ज्ञानसागर । तेजःपुंज प्रतिभास्कर । भूमंडळीं उगवला ॥ ३ ॥ प्रत्यक्ष विष्णूचा अवतार । प्रकटला ज्ञानेश्वर । कराया जगदुद्धार । ऐसे उद्गार सकळांचे ॥४॥" अशा ईश्वरविभूति यांना आतां शुद्धिपत्र देऊन पावन करण्याचें कोणास सामर्थ्य आहे ? यावर श्रीज्ञानदेव मोठ्या आदरयुक्त लीनतेनें उद्गारले कीं हा सर्व महिमा आपल्या सर्व सज्जनांच्या कृपेचाच होय. "ऐशीं ऐकुनी विप्रभाषणें । तयांसी ज्ञानदेव म्हणे । केवळ आपल्या आशीर्वचनें । घडलें असें समग्र ॥" नंतर ज्ञान-देवांचें तें दैवी तेज प्रत्यक्ष अवलोकून त्या सर्व अधिकारसंपन्न ब्राह्मणसभासदांची पूर्ण खात्री होऊन गेल्यानें त्यांनी ज्ञानदेवांची समक्ष प्रार्थना केली कीं आम्हां ब्रह्मवृंदांस आत्मदर्शनाचा लाभ होण्याविषयींचे आपल्याकडून मार्गदर्शन व्हावें. "कुंडलिनी जागृत होऊन प्राणाचा प्रवेश सुषुम्नेंत झाल्यानें भृकुटींतल्या अंतरांतल्या मनोजयामुळें साहजिकच लाभणारें आत्मसुख प्राप्त व्हावें" अशी त्या पंडितजनांनीं आपली अपेक्षा असल्याचें ज्ञानदेवांना दर्शाविलें. त्या सर्व पंडितांच्या आग्रहावरून "असें भक्तिमार्गी जन । लावावया प्रतिदिन । ज्ञानदेव कीर्तन-पुराण । करूं लागले त्या स्थळीं ॥ १ ॥ भागवत योगवासिष्ठ । गीताब्रह्मसूत्र ग्रंथ श्रेष्ठ । वाचुनी पुराण उत्कृष्ट । ज्ञानेश्वर सांगती ॥ २ ॥ ऐसा कीर्तनपुराणद्वारें । भक्ति आणि योगपंथ ज्ञानेश्वरें । संस्थापिला त्यासि अत्यादरें । जन सारे अनुसरले ॥" आतां या सर्व भावंडांचा प्रभाव लक्षांत घेऊन पैठणांतल्या साऱ्या ब्रह्मवृंदांनीं सभा भरवून एकमतानें शुद्धिपत्र लिहून तें त्यांचा मोठ्या उत्सवपूर्वक गौरव करून निवृत्तिनाथांच्या हातीं देऊन आदरयुक्त प्रेमानें अर्पण केलें, तेव्हां निवृत्तिनाथांनीं तें मोठ्या नम्रतेनें शिरसा वंदिलें आणि ते उद्गारले "आपल्या चरणांचा महिमा । जाणूं न शके ब्रह्मा । वर्णितसा तैसे आम्हां । सामर्थ्य अंगीं वसेना ॥" पैठणक्षेत्रीचा हा रेड्यामुखीं वेद बोलवल्याचा दिग्विजय सर्वत्र महशूर झाल्यामुळें या अवतारी महात्म्यांच्या दर्शनास झुंडींच्या झुंडी लोटूं

लागल्या. आतां ही मंडळी नेवाशाला निघण्याच्या बेतांत असतांनाच ज्यांच्या घरीं ते उतरले होते, तिथें दुसऱ्याच दिवशीं श्राद्ध होतें. पण संन्याशाचीं मुलें घरांत ठेवणाऱ्या त्याला गांवच्या कांहीं टवाळांच्या कडून त्या श्राद्धाला ब्राह्मण मिळूंच नयेत अशी मोठी खटपट झाली होती. हें ज्ञानेश्वरमहाराजांस कळतांच त्यांनीं स्वर्गलोकांतून त्या ब्राह्मणाच्या पितरांना आमंत्रून क्षण देऊन प्रत्यक्ष पितरच येऊन जेवून गेल्याचें टवाळलोकांनीं दाराच्या फटींतून अवलोकिल्यामुळें तर सर्वांची आतां तर या विभूतिसंबंधींची त्यांच्या ठिकाणीं कर्तुमकर्तुम् सामर्थ्य असल्याची पूर्ण खात्री होऊन ते सर्वच ज्ञानदेवांच्या आतां भजनीं लागले. असा हा भक्ति–ज्ञान–वैराग्याचा सोहळा थाटून तेथल्या पैठणच्या आबालवृद्धांचा निरोप घेऊन ही मंडळी नेवाशास वेद पढलेल्या 'ग्यान्या' रेड्यासह येऊन पोंचली. "पैठणीचे नारीनर। दुःखित झाले अपार। ज्ञानेश्वर गेले दूर। हळहळ सर्वांसि लागली॥" असो.

नेवाशास येऊन उतरल्यावर यांच्या मुक्कामाच्या ठिकाणावरून एक स्त्री पतीच्या प्रेताबरोबर सहगमन करीत असलेली तिनें या दिव्यमंडळीस पाहतांच पुढें येऊन वंदन केलें. म्हणून ज्ञानदेवांनीं 'पुत्रवती भव' असा तिला आशीर्वाद देतांच तिनें पतीच्या प्रेताकडे बोट करून दर्शविलें तोंच श्रीज्ञानदेव प्रेताजवळ जाऊन त्याचें नांव विचारतांच "शवाचें नांव सच्चिदानंद। ऐकुनी झाले ज्ञानदेव सखेद। काय सत्–चित्–आनंद। प्रेतरूप जाहला?॥१॥ मग निकट जाऊनी ज्ञानदेव। चाळवूनी पाहिलें शव। तंव देह जाहला सजीव। उठूनी उभा राहिला॥ २॥ ज्ञानेश्वरीचा लेखक। म्हणौनी ज्याचा उल्लेख। त्या ग्रंथान्तीं केला सकौतुक। सच्चिदानंदबाबा तोचि हा॥३॥" श्रीज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीच्या अखेरीस त्यांचा उल्लेख असा केला आहे:— "शके बाराशते बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें। सच्चिदानंदबाबा आदरें। लेखकु जाहला॥"

नेवाशास मोहनीराज म्हणून प्रसिद्ध असलेली श्रीम्हाळसादेवी तिचें वर्णन ज्ञानेश्वरींत आलेलें तें–त्रैलोक्यांत पवित्र व अनादि पंचक्रोश क्षेत्र नेवासें, ज्या ठिकाणीं सर्व जगताचें जीवनसूत्र श्रीमोहनीराज आहेत– "त्रिभुवनैक पवित्र। अनादि पंचक्रोशक्षेत्र। जेथ जगाचें जीवनसूत्र। श्रीमहालया असे." याच मंदिरांत याच सच्चिदानंदबाबांच्या लेखणींतून भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाजांनीं अभूतपूर्व अलौकिक अशा 'ज्ञानेश्वरी' व 'अनुभवामृत' जो अमृतानुभव या दोन्ही ग्रंथांची निर्मिती केली. श्रीकृष्णप्रभूच्या भगवद्गीतेंतल्या त्या त्या भूमिका आणि ते ते भाव अतीव स्पष्ट करणारी ती ज्ञानेश्वरी, आणि श्रुतींच्या अर्थांचा विरोधपूर्वक

विपर्यास होत असलेला त्याचा परिहार करून एकवाक्यतेनें समन्वय करणारा ग्रंथ अनुभवामृत तो हा अमृतानुभव होय. नेवाशास महान् महान् तपस्वी, योगी, भक्त, ज्ञानी, विरक्त, हंस, परमहंस, संन्यासी, जीवन्मुक्त अशा मोठ्या थोरल्या मेळाव्यांत चर्चापूर्वक या प्रासादिक ग्रंथांची निर्मिति झाली. पुढें नेवाशाहून या विभूति आळंदीस येत असतां वाटेंत अळ्यास आल्यावर 'ग्यान्या' रेड्याचें देहावसान झालें म्हणून त्यास श्रीज्ञानराजांनीं स्वहस्तें समाधि दिली. तो आजपावेतों नवसास पावणारा असा त्या गांवची देवताच झालेला आहे. तिथें आतां श्रीज्ञानेश्वरमहाराजांची मनोहर सुबक संगमरवरी मूर्ति मुद्दाम जयपूरहून तयार करवून आणून या 'ग्यानी' देवाच्या समाधीचा जीर्णोद्धार नुक्ताच आळ्यास झाला त्या वेळीं गांवकरी मंडळींनीं ती मोठ्या समारंभानें बसविली आहे. या बालसंतमंडळींनीं पैठणास मोठा दिग्विजय करून शुद्धिपत्र मिळविल्याची बातमी आळंदीस आधींच येऊन पोंचली असल्यानें सर्व लहानथोर आळंदीकर यांना मोठ्या उत्साहपूर्वक सामोरे जाऊन अगदीं थाटाच्या मिरवणुकीनें त्यांना गांवांत आणलें व त्यांच्या सन्मानार्थ सर्व गांवभर दिवाळीसारखा समारंभ झाला.

आळंदीस येऊन यांना कांहीं दिवस झाल्यावर पुढें दिवाळीचा सण आला. त्यानिमित्त मांडे खाण्याची श्रीनिवृत्तिनाथांना इच्छा झाली. म्हणून त्यासाठीं डेरा लागतो, तो आणण्याकरितां मुक्ताबाई कुंभारवाड्याकडे जात असतां वाटेंत विसोबा खेचर या अत्यंत कर्मठाची गांठ पडतांच त्यानें अगदीं रागाच्या आवेशांत येऊन संन्याशाची पोरटी म्हणून मुक्ताबाईना ताकीद देऊन परतविलें, त्यामुळें त्यांना अतिशय वाईट वाटलें. व ती हकीकत श्रीज्ञानदेवांस कळतांच त्यांनी योगबलानें आपली पाठ लाल करून त्यावर मुक्ताबाईनीं लगेच मांडे भाजून तयार करून ते निवृत्तिनाथमहाराजांना यथेच्छ वाढून ते अगदीं तृप्त झाले. हें सर्व विसोबांनीं दाराच्या फटींतून पाहिलें, तोंच त्यांची पुण्यफलोन्मुखभावना जागृत होऊन ते एकदमच जोरानें दार उघडून आंत प्रवेशून भानरहित अशा अवस्थेंत जें कांहीं अवशेष 'प्रसाद' म्हणून मिळालें तें भक्षण करीत असतांनाच श्रीज्ञानेश्वर "परता सर खेचरा"—"चिदाकाशांत प्रवेशून राहणारा ऐस"—असें उद्गारतांच तीच विसोबांची कायमची अवस्था होऊन गेली. पुढें ते औंढ्या नागनाथीं असतांना नामदेवांना यांनींच कृतार्थ केलें.

पैठणक्षेत्रीं रेड्याच्या मुखांतून श्रीज्ञानेश्वरांनीं एक प्रहरपर्यंत वेदांतील अनुवाक अस्खलित बोलविल्याचें आश्चर्य एका यात्रेकरी ब्राह्मणानें प्रत्यक्ष

पाहिल्याचें तो चांगदेवांच्या गांवीं गेला असतां त्यांना तें ऐकविलें. तेव्हां चांगदेवानें अन्तर्दृष्टीनें पाहतांच त्यास समजलें कीं, हें हरिहरब्रह्मा अवतरून आले आहेत. म्हणून त्यांचें दर्शनास जाण्याची उत्सुकता त्यास तत्काळ उद्भवली. तथापि आधीं पत्र पाठवून खुलासा मागवावा म्हणून हातीं कागद घेतला, तोंच त्यांच्या मनांत आलें कीं नमस्कार लिहावा तर आपण चौदाशें वर्षांचा. म्हणून आशीर्वाद लिहावा तर त्या तर सर्व थोर विभूति. तेव्हां अशा गोंधळांत त्यानें शिष्या-हातीं कोराच कागद पाठविला असतां तो आळंदीस येतांच त्याला प्रथम भेटल्या त्या मुक्ताबाईच. त्यांनीं तो कोरा कागद तसाच श्रीज्ञानेश्वरमहाराजांना दाखवून त्या उद्गारल्या कीं दादा, हा चौदाशें वर्षांचा योगी पण अजून कोराच राहिलेला दिसतो. हें वर्तमान श्रीनिवृत्तिनाथांनीं ऐकतांच ते ज्ञानराजांना बोलले कीं चांगदेवाला बोधपर उत्तर पाठवावें. तो बोध श्रीज्ञानेश्वरांनीं पांसष्ट ओव्यांनीं केलेला असून त्यालाच "चांगदेवपांसष्टी" म्हणतात. चांगदेवाला हें पांसष्ट ओव्यांचें पत्र मिळतांच त्याचा अर्थ कळावा म्हणून तो आपल्या नेहमींच्या डहाण्या व्याघ्रवाहनावर आरूढ होऊन हातांत मोठ्या नागाचा आसूड घेतलेला आपल्या चौदाशें शिष्यांसह आळंदीस ज्ञानदेवांच्या दर्शनास येऊन पोंचला. सकाळची वेळ असल्यामुळें हीं भावंडें एका लहानशा भिंतीवर ऊन खात बसलेलीं असतांनाच त्यांना चांगदेव येत असल्याचें समजलें. म्हणून त्याला आडवें जाण्या-साठीं ज्ञानदेवांनीं त्या भिंतीलाच म्हटलें, "चल बये," तोंच ती तुरूं तुरूं चालू लागून चांगदेवाला सामोरी झाली. हें दृश्य चांगदेवानें पाहून तो फार खजील होऊन त्यानें त्या अक्राळ व्याघ्रावरून चटकन् खालीं उतरून त्या बाल-विभूतींना साष्टांग घातलें. तेव्हां "ऐसी चांगदेवाची अहंता दूर। सांडूनी गेली त्याचें शरीर। ज्ञानदेवें फिरविला कर। त्याच्या देहावरोनी ॥ १ ॥ पांसष्टीचा तुज भावार्थ। मुक्ताबाई करील व्यक्त। तरी तियेसी तुवां त्वरित। जाऊनियां प्रार्थावें ॥ २ ॥ मग मुक्ताईनें पांसष्टीचा अर्थ विशद। करूनी केला त्यासि बोध। चांगया पावे परमानंद। कृतार्थ झालों बोलिला ॥ ३ ॥"

पंढरीस दरसालच्या कार्तिकी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्रीज्ञानेश्वरादि संतमंडळी जमून काला झाल्यावर श्रीपंढरीनाथचरणीं काशीयात्रेस नामदेवांना घेऊन जाण्याचा आपला मानस ज्ञानराजांनीं निवेदिला. तेव्हां मोठ्या कष्टानें देवानें नामदेवास ज्ञानदेवांच्या बरोबर जाण्याचा निरोप दिला.

"जीवन्मुक्तज्ञानी जरी झाले पावन। तरी देवतीर्थ भजन। न सांडती ॥"

याप्रमाणें पंढरीहून देवाची आज्ञा घेऊन ही संत-मंडळी द्वारकेस श्रीकृष्णदर्शन घेऊन प्रभास, उज्जयनी, प्रयागावरून काशीक्षेत्रीं आल्यावर तिथें मनकर्णिकेच्या घाटावरील मुद्गलाचार्योंनीं चालविलेल्या यज्ञांतल्या अग्रपूजेचा मान कोणास द्यावा या वादाचा निर्णय हत्तिणीनें त्या समारंभांतल्या समुदायांतील श्रीज्ञानेश्वरांच्या गळ्यांत नेमकी माळ घातल्यानें वाद आपोआपच मिटून अग्रपूजेचा मान श्रीज्ञानेश्वरांना मिळून तो यज्ञसमारंभ पूर्ण झाला. नंतर ही मंडळी पंजाबांतल्या आज ज्या अमृतसरच्या शिखांच्या गुरुसाहेबाग्रंथांत गुरुनामदेवांचा उल्लेख आहे, त्या शिखांच्या सुवर्णमंदिरास भेट देऊन दिल्ली, मथुरा पाहून मारवाडांतून परत येत असतां वाटेंतल्या एका अतिशयच खोल विहिरीचे पाणी तें आंत उतरून पिण्यास कठीण म्हणून नामदेवांनीं देवाचा धांवा करतांच तें वर उचंबळून येऊन त्यानें सर्व तृप्त झाले.

महाशिवरात्रीच्या रात्रीं औंढ्यानागनाथीं नामदेवांचें कीर्तन चालूं असतांच तें नागनाथास महारुद्राचा अभिषेक करीत असलेल्या वैदिकांनीं त्यांना अडथळा होतो म्हणून मंदिराच्या पिछाडीस करण्यास सांगितलें. म्हणून नामदेव कीर्तनास मागील बाजूस वळून गेले आहेत तोंच सर्व मंदिरच गरकन फिरून नामदेवांसमोर झालें, तें अद्यापहि तसेंच आहे. नंतर ही संतमंडळी यात्रा परिपूर्ण होऊन पंढरीस आल्यावर एक मोठें थोरलें मांवदें झालें. (मी यात्रा केल्याचें "मा वद"–बोलूं नकोस असा याचा लाक्षणिक अर्थहि लावतात).

नंतर लगेंचच दर वर्षीचा कार्तिकी यात्रेचा सोहळा असल्यानें कार्तिक शुद्ध नवमीपासून सर्व संतमंडळी पंढरीस यात्रेस जमूं लागली. दशमीच्या दिवशीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांसह चंद्रभागेचें स्नान उरकून पुंडलीकमहामुनीचें दर्शन घेऊन श्रीरुक्मिणीपांडुरंगाचें भेटीस ही मंडळी राउळांत जमली. सर्वांचें हितगुज पंढरीरायाशीं आलिंगनपूर्वक सांगून झालें. दुसरे दिवशीं एकादशीनिमित्त वाळवंटांत आपआपले फड उभारून दिंड्या पताकांच्या थाटांत तो भाग कीर्तनभजनांनीं दुमदुमून जाऊन तिथें रात्रभर हरिजागर झाला. द्वादशीस पारणें होऊन चातुर्मास्य संपल्याचा प्रबोधउत्सव झाला. "त्रयोदशीचे दिनीं। सप्रेम देवीरुक्मिणी। षड्रस पक्वान्न भोजनीं। तोषवी ज्ञानदेवांसहित ॥ १ ॥ मग ज्ञानेश ज्ञानमणी। मस्तक ठेवी विठ्ठलचरणीं। वंदिली भावें सती रुक्मिणी। "येतों" ऐसें बोलतां ॥ २ ॥ सर्वांसी आला गहिंवर। कंठ दाटला अपार। नयनीं लोटले बाष्पनीर। कळवळलें हृदय चवघांचें ॥ ३ ॥ तेव्हां वदे रुक्मिणीपती। "तुम्ही कष्टी न व्हावें



श्रीज्ञानेश्वर महाराज यांची समाधि, क्षेत्र आळंदी.

चित्तीं। तुम्हांमागें शीघ्रगती। आळंदीस आम्ही येतसों ॥ ४ ॥" ऐसें बोलुनी दिधला वर। "शुक्ल एकादशी पंढरपूर। कृष्णपक्षीची आळंदीक्षेत्र। कार्तिकी यात्रेसी नेमिली ॥ ५ ॥" तेव्हां सकल संतवृंद। देवाचे ऐकुनी शब्द। टाळ्या पिटुनी अत्यानंद। जयजयकारें पावले ॥ ६ ॥"

आळंदीस निघण्याच्या वेळीं श्रीज्ञानराजांनीं देवास विनवून प्रार्थिलें कीं देवा, तुमचें सुंदर सगुणरूपाचें सुख मी आतांपर्यंत खूप उपभोगलें. आतां निरंतरच्या निर्विकल्पचिन्मयसुखांत मला ठेवावें. ही ज्ञानदेवांची प्रार्थना ऐकल्यावर देवाला संतोष वाटून देव उद्गारले कीं "देव म्हणती तुझी कामना। आधींच आहे पुरविली ॥ १ ॥ गोडी आणि गूळ। कापूर आणि परिमळ। परस्पर एकचि केवळ। तुम्ही आम्ही त्यापरी ॥ २ ॥ ऐकुनी देवाचें वचन। ज्ञानेश्वरें केलें वंदन। पुनः पुन्हा धरिले चरण। रोमांच अंगीं ताठले ॥ ३ ॥ आला प्रेमाचा उमाळा। मिठी दिधली चरणकमळा। तेव्हां परमात्मा सांवळा। उठवी ज्ञानदेवासी ॥ ४ ॥ हा प्रसंग पाहुनी डोळां। नामदेवाचा दाटला गळा। नेत्रीं वाहे जळ खळखळां। आवरेना मन त्याचें ॥ ५ ॥ तेव्हां वदे रुक्मिणीकांत। कां नामया होसी सचिंत। मी आणि ज्ञानेश्वर निश्चित। एकरूप जाण तूं ॥ ६ ॥ आतां मदंश तो ज्ञानराय। आत्मस्वरूपीं पावेल लय। यासाठीं तूं निजहृदय। कष्टमय करूं नको ॥ ७ ॥"

मग श्रीज्ञानराज आपल्या भावंडांसह आळंदीस येतांच सिद्धेश्वरमंदिरांतली सिद्धेश्वरसन्मुख असलेली जागा पाहून झाल्यावर तिथें गुहा तयार करून होतांच पुढें त्रयोदशीला आंतमध्यें नामदेवांच्या दोन्ही मुलांनीं दर्भ पसरून त्यांवर दुर्वा, तुळशी, बेल आंथरून याप्रमाणें समाधीची तयारी केली. नामदेवरुक्मिणींसह देवहि पंढरीहून लगेच आले होतेच. "समाधीसी ज्ञानेश्वर। बैसेल शीघ्र साचार। जाणुनी आळंदीसी सत्वर। रुक्मिणीवर पातला ॥ देखावया समाधिसोहळा। सकल संतांचा मेळा। आणि भक्त इतर झाले गोळा। आळंदीसी तेकाळीं ॥"

श्रीज्ञानेश्वरमाउलीचें समाधिसोहळ्याचें अखेरचें दर्शन घडावें म्हणून लांबलांबची मंडळी येऊन दाखल झाली त्यांतले मुख्य गोरोबा, सांवतोबा, विसोबा खेचर, जनाबाई, चांगदेव, कान्होबा पाठक, तसेच अनेक साधुसंत, ज्ञानी, योगी, सिद्ध, महंत, हरिदास, आत्मनिष्ठ, वैदिक, शास्त्री, पंडितजन अशा लांबलांबच्या झुंडींच्या झुंडी आळंदीस येऊन दाखल झाल्या. "संतभक्त येउनी थोर थोर। हरिनामाचा केला गजर। अहोरात्र दिवस चार। आळंदीक्षेत्र गजबजलेलें

॥ १ ॥ एकादशीसी हरिजागर। नामदेवें केली कथा सुंदर। द्वादशीसी दोन प्रहर—। पर्यंत घडलें पारणें ॥ २ ॥ तेचि रात्रीं प्रासादिक। हरिदास कान्हु पाठक। कीर्तन करिती परमभाविक। श्रोते कथेसी रंगले ॥ ३ ॥ ”

समाधींत बसण्याची वेळ साधली जावी म्हणून माध्यान्हीं सूर्य आला असल्याचें देवांनीं सुचवितांच श्रीज्ञानराज ती वेळ साधण्यासाठीं लगेंच उठले आणि त्यांनीं सोपान, मुक्ताबाईस पोटाशीं धरून कुरवाळलें तोंच त्यांनीं हंबरडाच फोडला. तेव्हां जवळच श्रीनिवृत्तिनाथमहाराज बसले होते. ते सुद्धां आपल्या नेहमींच्या उन्मनींत असलेल्या अवस्थेंतून यावेळीं विचलित होऊन ज्ञानेश्वरांना डोळे भरून पाहून अगदीं गहिंवरून पाझरून गेले. मग श्रीपंढरीरायांनीं ज्ञानराजांच्या कपाळीं केशराचा मळवट व सर्वांगास तीच उटी स्वतः हातानें लावून त्यांना पीतांबर नेसवून अंगावर शाल पांघरवून गळ्यात तुळशीचे हार घालून झाल्यावर रुक्मिणीमातेनें नीरांजनानें त्यांस ओवाळलें. नंतर ज्ञानराजांनीं समाधिस्थानास तीन प्रदक्षिणा घातल्या. तेव्हां देव बोललें “ ज्ञानदेवें समाधिस्थाना। केल्या तीन प्रदक्षिणा। तंव देव बोलिले कष्ट नाना। जगासाठीं त्वां केलें ॥ ” मग देवांनीं ज्ञानराजांचा एक हात व दुसरा हात निवृत्तिनाथांनीं धरून सर्वजण हळू हळू समाधिस्थानीं उतरून झाल्यावर तेथल्या एका व्यासपीठासारख्या लांबरुंद चौरंगावर ज्ञानराजांनीं उत्तराभिमुख होऊन पद्मासन घालून अर्धोन्मीलित दृष्टीनेंच निवृत्तिनाथांना व देवाला पाहून हात जोडून त्रिवार नमस्कार करून होतांच ते एकदम अंतरंगीं चित्तासह प्राणास आत आकर्षून सर्वरूपपरायण होऊन गेले. “ मग देव आणि निवृत्तिनाथ। समाधीसी शिळा त्वरित। घालिती तें देखुनी भक्त। खेद अत्यंत पावले ॥ ” मग सर्व मंडळींनीं भजन करून समाधीवर सर्वांची पुष्पवृष्टि करून झाल्यावर त्यांनीं “ जय हरि विठ्ठल ” या नामाचा एकसारखा जयघोष केला. “ तेव्हां देव म्हणे पंढरपुरीं। सख्या नामा जाऊं सत्वरीं ” असें देवांचें म्हणून होतांच सर्व मंडळी आपआपल्या स्थानीं जावयास निघाली. खालीलप्रमाणें या सर्वांचे समाधिशक व त्यांच्या यात्रातिथि व स्थानें आहेत:—

श्रीज्ञानेश्वर महाराजांचा समाधिशक १२१५, कार्तिक वद्य १३, आळंदी.

श्रीसोपानकाकांचा समाधिशक १२१५, मार्गशीर्ष वद्य १३, सासवड.

श्रीमुक्ताबाईचा समाधिशक १२१६, वैशाख वद्य १२, मेहुण (तापीतीरीं).

श्रीनिवृत्तिनाथमहाराजांचा समाधिशक १२१६, ज्येष्ठ वद्य ११, त्र्यंबकेश्वर (नाशिक).

श्रीचांगदेव समाधिशक १२१५, माघ वद्य १३, पुणतांबें (नाशिक).

या विभूतिविषयींचे नामदेवरायांचे शेवटचे उद्गार— " गेले दिगंबर ईश्वरविभूति । राहिल्या त्या कीर्ति जगामाजीं ॥ १ ॥ वैराग्याच्या गोष्टी ऐकल्या त्या कानीं । आतां ऐसे कोणी होणें नाहीं ॥ २ ॥ " सांगतील ज्ञान म्हणतील खूण । " नयेचि साधन निवृत्तीचें ॥ ३ ॥ " परब्रह्म डोळां दाऊं ऐसें म्हणती " । कोणा नये युक्ति ज्ञानोबाची ॥ ४ ॥ " करतील अर्थ, सांगतील परमार्थ । " नये पा एकान्त सोपानाचा ॥ ५ ॥ नामा म्हणे देवा सांगूनिया कांहीं । न ये मुक्ताबाई गुह्य तुझें ॥ ६ ॥ " " पूर्वी अनंत भक्त जहाले । पुढेंहि भविष्य बोलिलें । परी निवृत्ति–ज्ञानदेवें सोडाविलें । अपार जीवजन्तु ॥ १ ॥"

ऐसें ज्ञानदेवमाहात्म्य अगाध । कथा ऐकतां होईल बोध । तैसाचि उपजेल परमानंद । पातकें हरतील सर्वथा ॥

अवतारकार्य — व्यासमहर्षीनीं कर्म–उपासना–ज्ञान अशा प्रवृत्ति–निवृत्तिधर्मांतील रहस्य वैदिक धर्मीयांना समजून येऊन त्याचें योग्य रीतीनें परिपालन व्हावें म्हणून भारत, भागवत असे राष्ट्रीय ग्रंथ निर्माण करून उपनिषदांतील श्रुतिवाक्यांच्या अर्थाचा विपर्यास करणारे जैन, बौद्ध, पाशुपत, चार्वाक, कपिल, कणाद अशांच्या विरोधाचा परिहार करून त्यांच्या मतांचें अप्रत्यक्ष रीत्या खंडन व्हावें म्हणून 'ब्रह्मसूत्र' नांवाचा ग्रंथ निर्माण करून वैदिक धर्माचा पाया स्थिर केला. त्यानंतर आद्य श्रीशंकराचार्यांनीं भगवद्गीता, दशोपनिषदें, ब्रह्मसूत्र या ग्रंथांच्यावर विस्तारपूर्वक भाष्यें लिहून अनात्मवादी परमतांचा खरपूस समाचार घेऊन अध्यात्मज्ञानप्रातीचें निशाण सर्व भारतभर फडकविलें. हेंच धर्मप्रचाराचें कार्य स्वयंसिद्ध अशा नवनाथांनीं प्रकट–अप्रकट असें करीत ठेवलेलें त्याचा श्रीज्ञानराजांनीं मोठ्या थोरल्या विस्तारानें परधर्मीयांच्या हल्ल्याचें पाऊल कितीहि जोरीं पडत राहिलें तरी त्याचा परिणाम टिकून राहूं नये, या साठीं सर्व महाराष्ट्रभर ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, पांसष्टी, अभंगगाथा, योगवासिष्ठ, हरिपाठ अशा ग्रंथद्वारां मराठी भाषेंतल्या प्रांतांत ब्रह्मसाम्राज्य निर्मून सततच्या प्रचाराचें कार्य म्हणून " माझे जिवींची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ॥ १ ॥ " पंढरीच्या आषाढी-कार्तिकीच्या वारीसाठीं दरवर्षी मोठ्या सोहळ्यानें आळंदीपासून तें थेट पंढरीपर्यंत स्वतः दर मुक्कामांत भजन, कीर्तन, प्रवचनांच्या गजरांच्या द्वारां हजारों वारकऱ्यांच्याकडून पंढरीच्या वारीचें हें व्रत धारण करवून श्रीहरिभक्तीच्या या भागवतधर्माचा संप्रदाय वाढवून पाया पक्का घालून ठेवला

व भागवतवारकरीसंप्रदायधर्माची परंपरा एकसारखी, अव्याहत खेडोंपाडींसुद्धां चालत राहावी एवढें मोठें कार्य सुरू करून ठेवल्यानें तें आज जवळ जवळ सातशें वर्षें चालत आलें आहे. आतांपर्यंत राजकारणांतल्या कितीतरी उलढाली होऊन गेल्या व यापुढें त्या होत राहिल्या तरी या भक्तिप्रधान मार्गांतल्या संप्रदायांत खेडुतांतल्या अडाणी वर्गापासून तों वरच्या थरांतल्या सर्व दर्जाच्या व्यक्तींना केव्हांहि सुलभ वाव असल्यानें त्यांतल्या निर्मळ, निर्विकार प्रेमळपणामुळें तो असाच वाढत्या प्रमाणावर एकसारखा चालतच राहावा अशी घटना श्रीज्ञानेश्वर-माउलीच्या अवतारकार्यानें निर्माण झालेली आहे.

श्रीज्ञानराजांच्या सहज अंगभूत वैभवाचें तुकोबाराय वर्णन करतात—

" जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ १ ॥ करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥ २ ॥ जयानें घातली मुक्तीची गवादी । मेळविली मादी वैष्णवांची ॥ ३ ॥ तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्तांचिया ॥ ४ । "

"संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥ १ ॥ ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिले देवालया ॥ २ ॥ नामा तयाचा किंकर । तेणें केलासें विस्तार ॥ ३ ॥ जनार्दनएकनाथें । ध्वज उभारिला भागवत ॥ ४ ॥ तुका झाला तेथें कळस । भजन करावें सावकाश ॥ ५ ॥ "

श्रीमच्छेंद्रनाथ गोरखनाथांस सुचवितात तें असें:—

सोही कच्चा बे कच्चा । नहि गुरूका बच्चा ॥ ध्रु० ॥ दुनिया त्यजकर खाक लगाई, जाकर बैठा बनमों ॥ खेचरीमुद्रा बज्रासनपर ध्यान धरत हैं मनमों ॥ सोही कच्चा ॥ १ ॥ गूपत होकर परगट होवे, जावे मथुराकाशी ॥ प्रान निकाले सिद्ध भया हैं सत्यलोकका वासी ॥ सोही कच्चा ॥ २ ॥ तीरथ कर कर ऊमर खोई, जोगजुगतमें सारी । धन कामिनिको नजर न लावे, जोग कमाया भारी ॥ सोही कच्चा ॥३॥ कुंडलिनिको खूब चढावे, ब्रह्मरंध्रमों जावे ॥ चलता है पानीके ऊपर, मुख बोलेसो होवे ॥ सोही कच्चा ॥ ४ ॥ शास्तरमें कछु रही न बाकी, पूरा ग्यान कमाया । बेदबिधीका मारग चलकर तनका लकरा कीया ॥ सोही कच्चा ॥ ५ ॥ कहे मछिंदर सुनरे गोरख, तीनो ऊपर जाना ॥ कृपा भई जब सद्गुरुजीकी आपआपकू चिन्हा ॥ सोही सच्चा बे सच्चा वोही गुरूका बच्चा ॥६॥

श्रीपुंडलीकवरदा हरिविठ्ठल । श्रीज्ञानदेव तुकाराम ।

श्रीज्ञानेश्वरकृत सिद्धानुवादरूपी

अमृतानुभव

(सुबोधविवरणासहित)

प्रकरण पहिलें

शिवशक्तिसमावेशन

मंगलाचरण

श्रीज्ञानेश्वरमहाराज ग्रंथारंभ निर्विघ्नपणानें सिद्धीस जाण्यासाठीं वैदिक-शिष्टाचारास अनुसरून वस्तुनिर्देशरूप मंगल करून खालील श्लोकानें सगुणनिर्गुण-रूपअशा श्रीगुरुनिवृत्तिनाथ–चरणीं ऐक्यभावानें नमन करीत आहेत, तें असें.—

यदक्षरमनाख्येयमानंदमजमव्ययम् ।
श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥ १ ॥

अन्वयः—यत् अक्षरं, अनाख्येयं, आनंदं, अजं, अव्ययं, श्रीमत्, निवृत्ति-नाथ, इतिख्यातं (तत्) दैवतं (अहं श्रीज्ञानेश्वरः) आश्रये.

अर्थ—जें (ब्रह्म) विकाररहित,अवर्णनीय,सहजसुखमय, अनादि, अविनाशी, श्रीमत् (अणिमादि अशा अंगभूत सहज–सिद्धिसहित असलेलें) समर्थ, निवृत्तिनाथ नांवानें प्रसिद्ध असलेल्या अशा उपास्य गुरुदैवताचा मी ज्ञानेश्वर आश्रय करतों–श्रीगुरुचरणांस समरसतेच्या शरणागतीनें वंदन करतों.

सुबोधविवरण—अक्षरब्रह्म जें नित्य निवृत्त सत् स्वरूप अशा निवृत्ति-नाथरूपाशीं सदैव एकरूप असा चित्–संवित्, ज्ञप्तिस्वरूप मी ज्ञानेश्वर, असा महाराजांनीं "**जीवो ब्रह्मैव नापरः**" (जीव हा नित्य ब्रह्मरूपच आहे, निराळा नाहीं) ह्या श्रुतिवचनानुरूप परब्रह्म श्रीगुरुनिवृत्तिनाथस्वरूपाशीं आपला ऐक्यभाव दाखविला आहे. तो सच्चिदानंदस्वरूप परमात्मा हा श्रीमन्निवृत्तिनाथ अशी संज्ञा असलेला होय, अशा त्या दैवताचा मी आश्रय करतों. "आश्रय करतों" यानें

परमात्म्याशीं महाराजांनीं आपलें ऐक्य दाखविलें आहे. आरंभिलेल्या ग्रंथाचा विषय, त्याचें प्रयोजन, त्याचा अधिकारी व त्यांतील संबंध काय, **हें अनुबंधचतुष्टय** देण्याची वेदान्तग्रंथांची पूर्वापार प्रथा आहे. त्याप्रमाणें परमात्म्याशीं आपलें जीवाचें ऐक्य **"जीवो ब्रह्मैव नापरः"**—जीवः ब्रह्म एव न अपरः–जीव हा नित्य ब्रह्म रूपच. हा जो देहभाव, दुसरें हें जें दृश्य जगत तें तो नव्हे असा हा या ग्रंथाचा विषय. ग्रंथज्ञानद्वारां ऐक्याची प्रतीति येणें हेंच प्रयोजन, हेंच फळ, हाच मोक्ष, हीच जीवन्मुक्तस्वरूप स्थिति. ह्या ऐक्य प्रतीतीची तीव्र इच्छा करणारा तो या ग्रंथाचा अधिकारी, मुमुक्षु होय. येथें अधिकारी आणि फल ह्यांमध्यें संबंध सुचविला आहे. " साधनचतुष्टयसंपन्नः प्रमाताधिकारी " साधनचतुष्टयसंपन्नाला अधिकारी म्हणतात. तें **साधनचतुष्टय असें—**

नित्यानित्यवस्तुविवेकः–अविनाशी एक असा आत्मा नित्य व अनित्य, तीं ब्रह्मादि पिपीलिकापर्यंतचीं, मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंतचीं सर्व शरीरें नाशवंत आहेत असा निश्चित विचार, तो विवेक. **इहामुत्रफलभोगविरागः**—इहलोकचें क्षणिकसुख व अमुत्र जें स्वर्गादि ब्रह्मदेवापर्यंतच्या लोकांतील प्राप्त होणाऱ्या कर्मफलाच्या भोगाचें अपुरें सुख त्याविषयीं विरक्ति, पूर्ण निरिच्छा तो विराग. **३. शमादिषट्कम्**—शम, दम, उपरति, श्रद्धा, तितिक्षा, समाधान हे सहा. **शम**–मनोनिग्रह; **दम**–इंद्रियनिग्रह; **उपरति**–प्रापंचिक सुखाची अप्रीति, वैराग्य; **श्रद्धा**–गुरुवचन व वेदान्तवाक्यें (तत्त्वमसि इत्यादि) यांवर विश्वास असणें, ती. " **मुमुक्षुत्वं** "—आत्मसाक्षात्काराची तीव्र इच्छा असणें; असें हें **साधनचतुष्टय** ज्यानें प्राप्त केलेलें आहे, तो या ग्रंथाविषयींचा अधिकारी होय असें हें वरील **अनुबंधचतुष्टय**–(विषय, प्रयोजन, अधिकारी व संबंध) महाराजांनीं सूचित केलें आहे.

पदांचा विग्रह व पदांचा अर्थ–यदक्षरं–यत्–जें. **अक्षरम्**–(न क्षरतीति)–पाझरत नाहीं, गळून जात नाहीं. "अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते" (गीता ८–३). **अक्षरं**–ज्याला कोणताहि विकार नाहीं; **ब्रह्म**–(बृहत् इति) अति सूक्ष्म व अति मोठें; **परमं**–परम श्रेष्ठ; **स्वभावः**–(स्वस्य भावः) जें आपल्या सहज स्थितीनें सर्वत्र असणारें; **अध्यात्मं**–(आत्मानं अधिकृत्य) वस्तुमात्राचे ठिकाणीं आत्मा आहे असें ज्ञान. (श्रीभगवान् उवाच–**अक्षरं**)— " मग म्हणितलें सर्वेश्वरें । जें आकारीं इये खोकरें । कोंदलें असत न स्विरे । कवणे काळीं ॥ (ज्ञाने.८–३–१५) येन्हवीं सपुरपण तयाचें पाहावें । तरि शून्याचि नव्हे स्वभावें । वरि गगनाचेनि पालवें ।

गाळूनि घेतलें ॥ (ज्ञाने. ८–३–१६). जें ऐसेंही परि विरुळें । इये विज्ञानाचीये खोळे । हालवलें ही न गळे । तें परब्रह्म ॥ (ज्ञाने. ८–३–१७). मग सर्वेश्वर श्रीकृष्ण म्हणालेः–जें या फुटक्या, गळक्या, अनंत छिद्रमय आकारांत, या देहांत ओतप्रोत भरलेलें असून कोणत्याहि वेळीं नाश पावत नाहीं ॥ १५ ॥ बरें, त्याचा सूक्ष्मपणा पाहावा तर तें स्वभावतः शून्य, अभावरूप नव्हे; पण अति पातळ, विरळ अशा आकाशाच्या पदरानें गाळून घेतलेलें असावें, असें आहे ॥ १६ ॥ अशा प्रकारचें जें विरळ–सूक्ष्म आहे व जें या प्रापंचिक ज्ञानाच्या पिशवींतून, या शरीरांतून कितीहि हालचाल झाली असतांहि गळून जात नाहीं; कमी अधिक होत नाहीं, त्याला **अक्षर**, परब्रह्म म्हणतात ॥ १७ ॥ **यत् अनाख्येयं**–(यत् आख्यायितुं न शक्यते) असें वर्णनातीत. "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह" (श्रुतिः)–जेथपर्यंत उपनिषदादिक–अविद्या कार्य अशी वेदवाणी–ही सुद्धां मनाच्या कल्पनेसह "न इति, न इति" हें दृश्य, तें, तें ब्रह्म नव्हे, हें तें नव्हे, असा निषेध करीत करीत जाते व शेवटीं त्या वर्णनातीत अक्षर–स्वरूपापासून परतते.

तसेंच "शास्त्रयोनित्वात्" (श्रीव्यासकृत ब्रह्मसूत्र १–१–३). **ब्रह्म**–शास्त्राचें (वेद, शास्त्रें, इतिहास, पुराणें, काव्य, नाटकें इत्यादिकांचें), **योनित्वात्**–योनि–मूळ कारण, त्वात्–त्यामुळें सर्वज्ञ आहे. तसेंच वर्णनातीत तें कसें, हें ज्ञानेश्वरींत दिलेलें वर्णन—"ऐसे शब्दजात माघौतें सरे । तेथ संकल्पाचें आयुष्य पुरें । वाराही जेथ न शिरे । विचाराचा ॥ (ज्ञाने. ६–३१९). **यत् आनंदम्**–"आनंदमयोऽभ्यासात्" (ब्रह्मसूत्र १–१–१२). (अभ्यासात्–वारंवार, आनंदमयः–आनंदघन) असा ब्रह्माविषयीं प्रयोग श्रुतींमधून बराच केलेला आहे. "एष ह्येवानन्दयति, रसो वै सः।" आनंदस्वरूपच परमात्मा आहे (तैत्ति. उप. ब्रह्मवल्ली ६, अनुवाक् २–७); "विज्ञानमानंदं ब्रह्म" (बृह. उप. ३–९–२८) तसेंच ज्ञानेश्वरींत "जें उन्मनियेचें लावण्य । जें तुर्येचें तारुण्य । अनादि जें अगण्य । परमतत्त्व" (ज्ञाने. ६–३२०), जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचें फळ । **जें आनंदाचें केवळ । चैतन्य** गा" (ज्ञाने. ६–३२१). **यत् अजं**–(अतः) **यत् अव्ययं**–(न जायते तत् अजं, न व्येति व्ययतीति वा तत् अव्ययं) उत्पत्ति, नाशरहित म्हणून अविनाशी. **(यत् अजं–)** "आणि आकाराचेनि जालेपणें । जन्म धर्मातें नेणें । आकारलोपीं निमणें । नाहीं कही (कधीं) ॥ (ज्ञाने. ८–३–१८); **(यत् अव्ययं–)** ऐसिया आपुलियाचि सहज स्थिति । जया ब्रह्माची नित्यता असती ।

तया नाम सुभद्रापती । अध्यात्म गा ॥ (ज्ञाने.८–३–१९), तें (**अविनाशी-ब्रह्म** होय.) **श्रीमत्**–(श्रियः ऐश्वर्याणि विद्यन्ते यस्य तत्, अणिमादयः अनन्ताः सहजाः सिद्धयः नाम विभूतयः विद्यन्ते यत्र)–अणिमादिक अनन्त विश्वरूप, ज्या विराट् स्वरूपान्तर्गत अघटित घटना अशा या सिद्धि जेथें सहज नित्य असतात व प्रगट होतात तें श्रीमत् (निवृत्तिनाथ परब्रह्म)— " तरि तुवां पुसलिया विभूती । तयांचें अपारपण सुभद्रापती । जे माझियाचि परी माझिये मती । आकळती ना ॥ (ज्ञाने. १०–१९–२०९). " " अंगींचिया रोमा किती । जयाचिया तयासि न गणवती । तैसिया माझिया विभूती । असंख्य मज ॥ (ज्ञाने. १०–१९–२१०). " **दैवतम्**–(दिव्यते इति देवः, तस्य भावः)–देवत्वं स्वयमेव प्रकाशते यत्र तत् स्वयंप्रकाशकं). एकच एक परब्रह्म " एकमेवाद्वितीयं ब्रह्म, " तेथें मी बहुत व्हावें " एकोऽहं बहुस्याम् " असा संकल्प उठला, हें जें स्फुरण तें त्याचें साकार सगुणरूपाचें मूळ होय. " पैं निर्विकल्पाचें बरडीं । फुटे **आदिसंकल्पाची** विरूढी । आणि तें सर्वेचि मोडोनि ये ढोंढीं (आकारांनीं) । ब्रह्मगोळकांच्या ॥ (ज्ञाने. ८–३–२२) " तें निवृत्त, निर्गुण स्वरूप सगुण, साकार दैवत भगवान् श्रीनिवृत्तिनाथरूपानें प्रगट झालें. " यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणवर्य । वसती जेथ ॥ (ज्ञाने. ६–३७)" असे सहा मुख्य गुण जेथें प्रगट होत असतात, तो भगवान्. " जें महाभूतांचें बीज । जें महातेजाचें तेज । एवं पार्था जें निज । स्वरूप माझें ॥ (ज्ञाने. ६–३२३) " " ते हे चतुर्भुज कोंभेली (अवतार घेते) । जयाची शोभा रूपासी आली । देखोनि नास्तिकीं नोकिलीं (छळलीं असतां) । भक्तवृंदें ॥ (ज्ञाने. ६–३२४) " ऐसें चराचरैक्यभाग्य । जें ब्रह्मेशां आराधने योग्य । **योगियांचें भोग्य । भोगधन** जें ॥ (तें चतुर्भुज सगुण मूर्तस्वरूप ज्ञान्यांच्या आत्मसुखाचा तो आनंद–भोगच जणुं) ॥ (ज्ञाने. ८–२८–२६८). "

निवृत्तिनाथ इतिख्यातं (तत् दैवतं अहं ज्ञानेश्वरः) आश्रये—" तें **अनिर्वाच्य** महासुख । पैं आपणचि जाहले जे पुरुष । **जयांचें कां निष्कर्ष । प्राप्तिवेरी** ॥ (त्यांच्या प्रयत्नांचा शेवट अगदीं स्वस्वरूपप्राप्तीपर्यंतचा असतो) – (ज्ञाने. ६–३२५). " " नाहीं रूपाची जेथें सोये । तेथें दृष्टीचें कांहींचि नव्हे । आम्हां फळले हे पाये । ऐसियादशे ॥ (अमृ. प्र. २–५०) किंबहुना इया भाखा । द्वैताचा जेथ उपखा । फेडोनिया स्वसखा । श्रीगुरु वंदिला ॥ (अमृ. प्र. २–५४) (निर्विकार आकाररहित अशी जेथें सद्गुरूंची अवस्था, त्यांचें तें स्वरूप, तिथें दृश्य,

द्वैत, सगुणरूप पाहणाऱ्या या चर्मचक्षूचा कांहींच उपयोग नाहीं, असल्या त्यांच्या या सर्वव्यापक दशेचा, निजस्वरूपप्रातीचा श्रींच्या चरणकृपेनें आम्हांला लाभ झाला. ॥५०॥ फार काय सांगावें कीं, असलें द्वैताचें हें बोलणें अशा स्तुतीचें हें वर्णन देखील जिथें शीण होतो, तें टाकून स्वसखा, स्व–परमात्मा, त्याची ओळख करविणाऱ्या जिवलग श्रीगुरूंना वंदन असो." असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अमृतानुभवांतल्या प्रकरण दोनमध्यें सद्गुरुस्वरूपाचें वर्णन केलें आहे). तसेंच "**तुज सगुण म्हणों का निर्गुण रे । सगुण निर्गुण एक गोविंदु रे ।।**" (ज्ञानदेव–अभंग गाथा). निर्गुण-सापेक्ष सगुणरूप अशीं हीं दोन्ही गोविंदु च, परब्रह्मच. बर्फाचा खडा, पाहिलें तर तें ओतप्रोत पाणीच पाणी त्या खड्यांत असतें. त्यांत पांढरेपणाचा केवळ भास दिसतो. कारण त्या विरळ पाण्यांतले परमाणु हवेच्या दाबानें अधिक घन झालेले असतात म्हणून. तथापि तेव्हांहि ते पाणीरूप असे द्रवरूपच असतात. हे द्रव आणि घन दोन्ही भाव पाण्याचा तो स्वाभाविक नित्य पातळ, द्रवरूपपणा ह्या मूळ स्वरूपावर आभासरूप सापेक्षतेनेंच असतात. तसेंच श्रीमत्–अणिमादिसिद्धि ज्यांचे ठिकाणीं सहज प्राप्त असणारे व यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य असे सहज भगवदैश्वर्यवान् अशा श्रीमान् श्रीगुरु भगवान् श्रीनिवृत्तिनाथमहाराजांचें स्वयमेव सकल वैभव श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे ठिकाणीं एकमयतेच्या संपूर्ण शरणागती-मुळें सहजच आलेलें होतें. " तैसा मी एक वांचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोऽहंबोधें तयांच्या ठायीं । अनन्य होय ॥ (ज्ञाने. १८–१३९७). पैं आपलेनि भेदेंविण । माझें जाणिजे एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥" (ज्ञाने. १८–१३९८). अशा त्या अक्षरब्रह्मरूप श्रीगुरूंचा "**आश्रये**" मी शरणागत होऊन ऐक्यरूप आश्रय करीत आहें, अशा एकतेचेंच अनन्यनमन महाराजांनीं केलेलें आहे. श्रीज्ञानेश्वर या सगुणरूपाच्या सापेक्ष जे नित्यनिवृत्त निवृत्तिनाथ निर्गुण-स्वरूप त्या स्वरूपाचें अक्षरपरमात्मगोविंदूशीं **आश्रये** या नमनानें नित्य ऐक्य असल्याचें श्रीज्ञानराजांनीं सूचित केलें आहे. कारण अधिष्ठित पदार्थ अधिष्ठानरूपच असतात. एका पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो, तो तद्रूपच असतो.

आरंभलेल्या ग्रंथाची समाप्ति निर्विघ्नपणानें व्हावी म्हणून ग्रंथारंभीं नमन करण्याचा शिष्टसंप्रदाय आहे व तो आरंभ **ॐ** किंवा **अथ**नें करावा. " **ॐकार-श्चाथ** शब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा । कंठं भित्त्वा विनिर्यातौ तस्मान्माङ्गलिकावुभौ ॥ " असें वेदवचन आहे. कल्पारंभीं ब्रह्मदेवाचा कंठ भेदून **ॐ** व **अथ** हे दोन शब्द बाहेर पडले. म्हणून हे दोन मंगल होत. ह्यांपैकीं कोणत्याहि एकानें शिष्ट ग्रंथारंभ

करतात. **अथातो धर्मजिज्ञासा**–असें मुनिराज जैमिनींनीं, तसेंच भगवान् श्रीव्यास महर्षीनीं ब्रह्मसूत्रांचा आरंभ "**अथातो ब्रह्मजिज्ञासा**" **अथनें** व भगवान् आद्य श्रीशंकराचार्योंनीं भगवद्गीताभाष्यारंभ"ॐ नारायणः परोऽव्यक्तादण्डमव्यक्तसंभवम्" ॐनें तसाच भगवान् श्रीज्ञानराजांनीं ज्ञानेश्वरीचा आरंभ "ॐनमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।" असा ॐनें केलेला आढळतो. मंगलचरणाच्या आरंभाचा हा जसा शिष्टाचार तसा तो उपक्रम–उपसंहाराचाहि असाच आहे. त्यांतच ग्रंथारंभीं केलेला जो सिद्धान्त तोच ग्रंथसमाप्तीसहि केलेला असतो. त्यांतच जो **उपक्रम** तोच **उपसंहार** कसा हेंहि **दिसून** येणारें आहे. कारण पूर्वाचार्योंनीं अनुसरलेला वैदिक तसाच उपनिषत् संप्रदाय आतांपर्यंत असा हा चालत आलेला आहे. तोच जसा श्रीमद्भगवद्गीतेंत तसाच ज्ञानेश्वरींतहि आहे. त्याचेंच दिग्दर्शन येथें अमृतानुभवग्रंथांतहि आहे. "उपक्रमोपसंहारावभ्यासोऽपूर्वता फलम्। अर्थवादोपपत्ती च लिङ्गं तात्पर्यनिर्णये॥" इति। तत्र सदेव सोम्येदमग्र आसीत्–इत्युपक्रमः। ऐतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं, स आत्मा, तत्त्वमसि, श्वेतकेतो, इत्युपसंहारः। तयोर्ब्रह्मविषयत्वेनैक्यरूपमेकं लिङ्गं, असकृत्तत्त्वमसीत्युक्तिरभ्यासः। मानान्तरागम्यत्वमपूर्वत्वम्। एकविज्ञानेन सर्वविज्ञानं फलम्। सृष्टि–स्थिति–प्रलय–प्रवेश–नियमनानि पञ्च अर्थवादाः। मृदादिदृष्टान्ता उपपत्तयः। तस्मादेतैर्लिङ्गैर्वेदान्तानां ब्रह्मपरत्वं निश्चेयम्॥" असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ—तीं सहा लिंगें पूर्व आचार्योंनीं अशीं दाखविलीं आहेत—१ उपक्रम–उपसंहार, २ अभ्यास, ३ अपूर्वता, ४ फल, ५ अर्थवाद व ६ उपपति हें तात्पर्यनिर्णयाचें लिङ्ग म्हणजे दर्शक आहे. त्यांतील छांदोग्योपनिषद्च्या सहाव्या अध्यायांतील १ "सदेव सोम्य इदमग्रे आसीत्" हे सोम्य, इदं सर्वं यत् दृश्यं–जगत्–तत् अग्रे सत् ब्रह्म एव आसीत्। म्हणजे हे प्रिय शिष्या, हें सर्व जगत् उत्पत्तीच्यापूर्वी 'सत्'च, नित्य असणारें होतें; हा असा उपक्रम, विषयाचा आरंभ आहे व 'ऐतत् आत्म्यं इदं सर्वं, तत् सत्यं, स आत्मा, तत् त्वम् असि, श्वेतकेतो,' म्हणजे हें सर्व जगत् एतत् रूप, सत् ब्रह्मरूप आहे, तें सत्य आहे, तो आत्मा आहे, हें श्वेतकेतो, तें तूं आहेस, हा उपसंहार, शेवट होय. ते उपक्रम व उपसंहार सद्रूप ब्रह्मविषयक असल्यामुळें त्या दोहोंचें ऐक्यरूप हें एक लिंग म्हणजे ऐक्याचें दर्शक आहे. २ वारंवार 'तें तूं आहेस' सांगणें हा अभ्यास. ३ तें सद्रूपब्रह्म उपनिषद् प्रमाणावांचून दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणांनीं विषय होत नाहीं म्हणजे समजणारें नाहीं, हेंच त्याचें अपूर्वत्व आहे. ४ एका सद्रूप ब्रह्माच्या विज्ञानानें म्हणजे प्रत्यक्ष अनुभवानें सर्वविज्ञान–सर्वानुभव हें फळ आहे; ५ त्या सत्नें

ईक्षणपूर्वक–विचारपूर्वक सृष्टि करणें, स्थितीचें कारण होणें, प्रलयाचा आश्रय होणें, उत्पन्न केलेल्या कार्यांत–शरीरांत प्रवेश करणें व नियमन करणें हे पांच अर्थवाद आहेत व ६ एका मृत्तिकेला जाणलें असतां सर्व त्या मातीचे झालेले घट, रांजण भिंती, कोनाडे, चुली वगैरे विकार जाणले जातात त्याप्रमाणें एका सद्रूप ब्रह्माला जाणलें असतां सर्व तें ब्रह्मच आहे असें जाणलें जातें, इत्यादि प्रकारें मृत्तिका, लोखंड इत्यादिकांचे दृष्टान्त ही उपपत्ति, मुळांतला खुलासा आहे. यास्तव या सहा तात्पर्यलिंगावरून या निर्णयाचे स्वरूपावरून छांदोग्याचा सहावा अध्याय सद्रूप ब्रह्मपर आहे, असा निश्चय होतो.

छांदोग्याच्या या सहाव्या अध्यायाच्या आरंभींहि भगवद्गीतेंतील उपदेशाचें कारण दाखविणाऱ्या ग्रंथाप्रमाणें असा हा कारणदर्शक ग्रंथ आहे—पूर्वी एक अरुणपुत्र श्वेतकेतु होता. त्याला त्याचा पिता म्हणाला, "बा श्वेतकेतु, आपल्या कुलगुरूकडे जाऊन ब्रह्मचर्य पाळ म्हणजे ब्रह्म जे वेद त्यांचें अध्ययन कर. त्यायोगानें आमच्या कुळांत झालेला पुत्र अध्ययन न केलेला ब्रह्मबंधू-सारखा–अधम ब्राह्मणासारखा–होत नाहीं." तें ऐकून तो त्या वेळीं बारा वर्षांचा असलेला श्वेतकेतु गुरुगृहीं गेला व बारा वर्षें तेथें राहून त्यानें वेदाध्ययन केलें. त्यामुळें तो गंभीर मनाचा, विद्वन्मन्य, उद्धट, अनम्र स्वभावाचा होऊन घरीं परत आला. तेव्हां त्याची वृत्ति पाहून त्याचा पिता त्याला सद्धर्म विचारांत प्रवृत्त करण्याच्या इच्छेनें म्हणाला, "श्वेतकेतु, तूं असा गंभीर मनाचा विद्वन्मन्य व अनम्र असा झाला आहेस तेव्हां तूं आपल्या आचार्याला तो उपदेशगम्य पदार्थ, आदेश विचारलास का, कीं ज्याच्या योगानें सर्व अश्रुत–न ऐकलेलें श्रुत होतें. सर्वं अश्रुतं श्रुतं भवति, सर्वं अमतं मतं भवति, सर्वं अनिश्चितं निश्चितं भवति ।' अमत म्हणजे न तर्क केलेलें, तें मत म्हणजे तर्क केलेलें होतें, सर्व अनिश्चित निश्चित होतें. त्यावर श्वेतकेतु म्हणतो, "भगवन्, तो आदेश कसा आहे?" पुत्राचा हा प्रश्न ऐकून उद्दालक म्हणाला, "एकेन मृत्पिण्डेन सर्वं मृन्मयं भवति, वाचा ह्यभणं विकारो नामधेयं, मृत्तिका इत्येव सत्यं।"—ज्याप्रमाणें एका मातीच्या गोळ्याच्या ज्ञानानें सर्व मातीचा बनलेला विकार—रांजण, मडकीं, चुली, भिंती, बोळकीं हीं मातीरूपच, मातीमयच असतात, असें ज्ञान होतें. कारण विकार हे वाणीनें उच्चारण्यापुरतेच असतात. वास्तविक मातीच सत्य असते; याप्रमाणें तो आदेश आहे." हें ऐकून श्वेतकेतु म्हणाला, "आमच्या गुरूंना तो आदेश माहीत नव्हता. ते त्याला जाणत नव्हते. जर जाणत असते तर त्यांनीं मला त्याचा उपदेश

केला असता. बरें, तर आतां तो तुम्हीच मला सांगा." त्यावर बरें आहे, असें म्हणून उद्दालकानें 'सदेव सोम्य, इदमग्रे आसीत्' येथून 'तत् सत्यं स आत्मा तत् त्वम् असि श्वेतकेतो' येथवर पुढील पंधरा खंडांत उपदेश केला आहे, व येथें पूर्वीच्या कथाभागाला उपक्रम म्हटलेलें नाहीं, तर 'सदेव सोम्य इदमग्र आसीत्' या वाक्याला उपक्रम म्हटलें आहे. उपक्रम नेहमीं वाक्यानें दाखविला जातो. तो अध्यायानें, अनेक वाक्यांनीं किंवा स्वतंत्र प्रकरणानें अथवा कथासंदर्भानेंहि कधींच दाखविला जात नाहीं. भगवान् श्रीशंकराचार्यांच्या गीताभाष्यांतहि छांदोग्यांतील सहाव्या अध्यायाच्या पहिल्या खंडाप्रमाणेंच गीतेचा पहिला अध्याय व दुसऱ्या अध्यायाचे दहा श्लोक यांना साक्षात् गीताशास्त्र न म्हणतां गीतेच्या उपदेशाचें व शोकमोहादि दोषोद्भवाचें कारण दाखविणारा ग्रंथ म्हणून म्हटलें आहे. अर्थात् आचार्यांच्या मतानें पहिला अध्याय उपक्रम नव्हे. दुसऱ्या अध्यायाचा 'न योत्स इति गोविंदमुक्त्वा तूष्णींबभूव ह' येथपर्यंतचा भागाहि उपक्रम नव्हे, तर 'अशोच्यानन्वशोचस्त्वं' अध्याय २, श्लोक १० हा उपक्रम व 'इति ते ज्ञानमाख्यातं' (अध्याय १८–५६) हा उपसंहार आहे. गीताशास्त्राचा उपक्रम ज्ञानानें आहे; तो आत्मज्ञानानें, सांख्यनिष्ठेनें जसा आहे तसाच उपसंहारहि आत्माज्ञानानें आहे. गीतेचें तात्पर्य आत्मज्ञानांत आहे. गीताशास्त्र निवृत्तिपर आहे. अर्जुनाला गीताशास्त्रांत ज्ञानाचीं अनेक साधनें सांगितलीं आहेत. **'ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे'** असें प्रत्येक अध्यायाचे शेवटीं म्हटलेलें असल्यामुळें ब्रह्मप्राप्तीचें तें योगशास्त्र म्हणजे साधनशास्त्र आहे. त्या अनेक ज्ञानसाधनांपैकीं निष्कामकर्मयोग हें एक आहे. निष्कामकर्म हें निवृत्तकर्म होय. त्यानें चित्तशुद्धिरूप कार्य होतें. साक्षात् कर्माचा त्याग करावयाचा नसून कर्मफलाचा, आसक्तीचा व कर्तृत्वाभिमानाचा त्याग करावयाचा असतो. तें कर्म ईश्वराला अर्पण करीत राहिल्यानें त्याच्या प्रसादानें चित्त शुद्ध होतें म्हणजे आत्मस्वरूप अतिसूक्ष्म असल्यानें त्या अतिसूक्ष्म स्वरूपाचें ग्रहण करण्यास चित्त समर्थ होतें. 'लभ्यते त्वग्रया बुद्धया' इति. अशी सूक्ष्म, एकाग्र बुद्धि स्वरूपीं समरस होऊन राहते. गीतेचा उपक्रम व उपसंहार जसा एका वाक्यानें केलेला आहे, तसाच भगवान् श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं ज्ञानेश्वरीचाहि उपक्रम 'ॐनमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय **स्वसंवेद्या। आत्मरूपा** ॥१॥' 'हे स्वसंवेद्य **एकमेव** परब्रह्मा, असा हा उपक्रम असून 'शतेंसातशें श्लोक। अठरा अध्यायाचे लेख। परि देव बोलिलें **एक**। दुजें नाहीं॥ "**एकमेवाद्वितीयं ब्रह्म**,

नेहनानास्ति किंचन " उपसंहार केला आहे. तसेंच येथें अमृतानुभवग्रंथांत उपक्रम 'यदक्षरम् अनाख्येयं, आनंदं, अजं, अव्ययं' असें हें **अक्षरब्रह्म** " एकमेव अद्वितीयं " एकच एक सर्वत्र ओतप्रोत भरलेलें असें आनंदघन आहे. त्याहून कांहींहि नाहीं. तसेंच आरंभींची ओवीहि " ऐशीं हीं निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें " अशीं हीं मागील श्लोकांतून वर्णन केलेलीं हीं निरुपाधिक म्हणजे निरहित, उपाधि–द्वैत. द्वैतरहित म्हणजे द्वैत जें हें दृश्य जगत्–अनंतकोटि ब्रह्मांडें व त्यांचे जननी, जनक हीं निराळीं दिसत असलीं तरी तीं तशीं निराळीं नसून अद्वितीय असें एक परब्रह्ममयच तीं आहेत. " एकमेव अद्वितीयं ब्रह्म " या श्रुतीप्रमाणें हा उपक्रम म्हणजे ग्रंथारंभ करून उपसंहार, शेवटीं ग्रंथसमातिहि " तैसी तये ईश्वरीं । अंगुळी नव्हेचि दुसरी । किंबहुना सरोवरीं । शिवें शिवीं ॥ (अमृ. ग्रंथपरिहार प्रकरण १०–३०) ॥ तसेंच या परब्रह्म–परमात्म–स्वरूपाचे ठिकाणीं सर्वच शिवमय म्हणून इथें निराळेपणानें अंगुलिनिर्देश करितां येत नाहीं, म्हणजे तो परमात्मा बोटानें येवढा, तेवढा, असा, तसा असें सांगतां येत नाहीं. पहिल्या प्रकरणांतील पहिल्या श्लोकांत आरंभाला म्हटल्याप्रमाणें जें परमात्मस्वरूप **यत् अक्षरं अनाख्येयं** ' जें असें तसें सांगतां येत नाहीं, तेंच येथें ग्रंथाचे शेवटीं फार काय सांगावें— **'किंबहुना'**, **'सरोवरी'** सर्व विश्व केवळ शिवरूपच आहे, इथें दुसरेपणाचा संबंध नाहींच. " एकमेव अद्वितीयं ब्रह्म, नेहनानास्ति किंचन". तसेंच पुढील शेवटची ओवी–पहिल्या श्लोकांतील " **यत् आनंदं** यालाच **उद्देशून** म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें । **सणु** भोगिजे सणें । विश्वाचेनि ॥ (१०–३१) म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात या अमृतानुभवरूप आनंदाचा (सणु) सर्व विश्वानें सोहळ्यानें (सणें) उपभोग घ्यावा व सुखमय होऊन जावें. असा हा ग्रंथाचा उपसंहार आहे. हा अमृतानुभव ग्रंथ अलौकिक आहे. नेवाशास ज्ञानेश्वरीनंतर लगेंच अनुभवामृत ज्याचें मूळचें नांव पण रूढीनें अमृतानुभव पडलेलें त्या ह्या अमृतानुभव ग्रंथाची निर्मिति झाली आहे. आचार्यांचें गीता भाष्य व ज्ञानेश्वरी या दोन्हीहूनहि या अमृतानुभवग्रंथनिर्णयांतील प्रमेय स्वतंत्र भूमिकेचें आहे.

मूळ अज्ञानजन्य आभास, जे अन्तःकरणाचे धर्म आत्म्यावर व आत्म्याचे धर्म अन्तःकरणावर आरोपित होतात, असा जो अन्योन्य, एकमेकांवर भासणारा आभास त्याची निवृत्ति आत्मज्ञानानें व्हावी व जीवास अत्यंत दुःखनिवृत्तिरूप परमसुखाची प्राप्ति व्हावी, म्हणून गुरुशिष्यसंवादरूपानें, वादीसंवादी, पूर्वपक्ष व सिद्धान्ती अशा भूमिकांनीं भाष्यें झालीं. भगवद्गीताभाष्याचे उपोद्घातांत भगवान्

श्रीशंकराचार्यांनीं केलेलें दिग्दर्शन तें हि असें कीं, " युद्धाच्या प्रत्यक्ष धामधुमींत गुंतलेल्या अर्जुनास भगवंतांनीं केलेल्या उपदेशामुळें होणाऱ्या अज्ञाननिरसनानें आत्मप्राप्ति वास्तविक व्हावी. आणि ती ब्राह्मीस्थिति मनन निदिध्यासनाच्या अभ्यासपूर्वक एका ब्रह्मामध्यें जें अवसान त्या एकासनावर एकान्तांत राहून प्रत्यक्ष अनुभवण्यास अवकाश मिळावयास हवा तो त्यास मुळींच मिळाला नाहीं. म्हणून भगवंतानीं त्यास नंतर उत्तरगीता सांगितली. "अनुगीतासु तंत्र एव उक्तं स अर्जुनः तूष्णीं एकासने लीनः स्यात् किंचित् अचिन्तयन्" असें भगवान् भाष्यकारांनीं गीताभाष्याच्या उपोद्घातांत "इमं एव गीताधर्मं उद्दिश्य तत् निःश्रेयसं कैवल्यं सर्वकर्मसंन्यासपूर्वकात् आत्मज्ञाननिष्ठारूपात् धर्मात् भवति भगवता एव अनुगीतासु उक्तं" म्हटलें आहे. त्याच भगवद्गीतेचा आविष्कार करणारी भावार्थदीपिका जी ज्ञानेश्वरी, तिचें पर्यवसान भगवंतांनीं अर्जुनास केलेल्या ब्राह्मीस्थितिप्राप्तीचें स्पष्ट दिग्दर्शनपूर्वक 'पूर्णब्रह्म पार्थ जाहला' असें केलें आहे. ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांत "ऐसा हा जी आघवा । श्रीकृष्णें तया पांडवा । उगाणा (प्रत्यय) दिधला जीवा (आत्मभावाचा) । जीवाचिया (स्वतःचा)॥ (ज्ञाने. १३–३–११४५)" "येर कलशींचें येरीं । रिचविजे जयापरी । आपणपें तया श्रीहरी । दिधले तैसें ॥ ११४६ ॥" असा श्रीहरिमय अर्जुन झालेला, तींच त्याची नंतरची अवस्था अध्याय अठरांत वर्णिली आहे, ती— " ऐसें सर्वरूपरूपसें । सर्वदृष्टिडोळसें । सर्वदेशनिवासें । बोलिलें श्रीकृष्णें ॥ (ज्ञाने. १८–६६–१४१७). मग सांवळा सकंरुण । बाहु पसरोनि दक्षिण । आलिंगिला स्वशरण । भक्तराज तो ॥ १४१८ ॥ " ऐसें जें कांहीं एक । बोला बुद्धीसीही अटक । तें द्यावया मिष । खेंवाचें केलें ॥ १४२० ॥ द्वैया द्वैय येक जालें । ये द्वैयीचें तें द्वैयीं घातलें । द्वैत न मोडितां केलें । आपणा ऐसें अर्जुना ॥ १४२१ ॥ दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंग तो जाला । द्वैत न मोडतां केला । आपणपें पार्थ ॥ १४२२ ॥ " अशी अर्जुनाची परमबोधस्थिति ज्ञानेश्वरींत स्पष्ट केलेली आहे. तशीच अमृतानुभवांत ही बोधस्थिति दृष्टिक्षेपानें कशी केली जाते त्याचें दिग्दर्शन आलें आहे. तथापि अमृतानुभवाची भूमिका अगदीं स्वतंत्र असल्याची दिसतें. " जयाचेनि **अपांगपातें** (दृष्टिक्षेपानें) बंध (जीवभाव) मोक्षपणीं आते (ब्रह्मरूप होतो) । भेटें जाणतया जाणतें । जयापाशीं ॥ (अमृ. प्र. २–४)" सत् तेंच चित्, सत्ता तोच प्रकाश, शिव तींच शक्ति, शिष्य श्रीगुरुरूपच, असें सर्व एकमेव अद्वितीयं अक्षरब्रह्मच. " कां सुवर्ण आणि लेणें । वसतें येकें सुवर्णें । वसतें चंद्र चांदणें । चंद्रेंचि जेविं ॥

(अमृ. प्र. २–६२) " " तैसा गुरुशिष्य मिसें । हाचि एकु उल्हासे । जन्ही कांहीं दिसे । दोन्हीपणें ॥ (अमृ. प्र. २–६४) " असें सर्व कांहीं ईश्वर, माया, जगत्, अनंतकोटि ब्रह्मांडांतला सोहळा सर्व एक, अक्षर, परब्रह्मच. असें जें सिद्धस्वरूप त्याचाच अनुवाद, एकरूपता सर्व ग्रंथभर सिद्धान्तपूर्वक सिद्ध केली आहे. म्हणून या ग्रंथास "सिद्धानुवाद असलेला अमृतानुभव" म्हटलें आहे. तो स्वानुभवाचा परमानंद कसा असतो, तेंच येथून पुढें वर्णिलें आहे. भगवान् श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं प्रथम श्लोकानें सद्गुरूस एकभावरूप वंदन करून त्याचेंच निजरूप असलेल्या ब्रह्मविद्याशक्तीस आतां नमन करीत आहेत—

गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्याहि शांकरी ।
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरन्तरम् ॥ २ ॥

पदच्छेदः—गुरुः इति आख्यया लोके साक्षात् विद्या हि शांकरी जयति आज्ञा नमः तस्यै दयार्द्रायै निरन्तरम् ॥ २ ॥

अन्वयः—हि लोके गुरुः इति आख्यया साक्षात् शांकरी विद्या (वर्तते, सा) आज्ञा जयति तस्यै दयार्द्रायै निरन्तरम् (मम) नमः (अस्तु).

पदांचा अर्थ—**हि**–कारण, **लोके**–लोकांमध्यें, **गुरुः**–श्रेष्ठ, **इति**–अशा, **आख्यया**–नांवानें **साक्षात्**–प्रत्यक्ष, **शांकरी**–शंकरस्वरूपमय, सत्तामय, परब्रह्म-सत्स्वरूपमय; **विद्या**–चित्कला, ज्ञप्ति; **वर्तते**–असते, **सा**–ती, **आज्ञा**–ज्ञानस्वरूपा तिचा **जयति**–जयजयकार असो, **तस्यै**–तिला, त्या **दयार्द्रायै**–अत्यंत दयाळूला, **निरंतरं**–नित्य, अखंड, **मम**–माझें, **नमः**–नमन, **अस्तु**–असो.

स्पष्टार्थ—कारण सर्वश्रेष्ठ म्हणून प्रसिद्ध असलेली, **शांकरी**–शंकर, नित्य सुखकर, शांत स्वरूपाशीं एकरूप असलेली, शंकरस्वरूपमय, विद्या जी चित्कला सर्व लोकांमध्यें सर्वत्र प्रत्यक्ष असणारी, अशा त्या ज्ञानमयी आज्ञेचा जयजयकारानें उत्कर्ष असो; दयेनें ओथंबलेल्या त्या पूर्णदयाघन नित्यनिवृत्तिनाथरूप चित्कला देवीमातेला अखंड अहर्निश या नमनानें माझें तिजशीं ऐक्य असो.

सुबोधविवरण—**अध्यात्मविद्या विद्यानां** (गीता १०–३२), " कां जे तुवां पुसलिया विभूती । म्हणोनि तिया आईक सुभद्रापती । तरि विद्यांमाजि वस्तुती । **अध्यात्मविद्या** ते मी ॥ (ज्ञाने. १०–३२–२६६). " या भगवद्-वचनाप्रमाणें जगांतील सर्व विद्यांमध्यें अध्यात्मविद्या, आत्मज्ञानरूपा ही भगवद्-विभूति आहे. ही ब्रह्मविद्या सकलदुःखनिवृत्ति आणि निरतिशयानंदप्राप्ति करून

देणारी आहे. म्हणून हिला गुरु, श्रेष्ठ अशी संज्ञा आहे. **शं** आणि **कर** असा शंकर, नित्य सुखरूप, सत्स्वरूप, **अक्षरब्रह्म** त्याची चिद्विलासरूपा शांकरी, त्याचे अंगभूत असणारी चित्शक्ति. कापराच्या ठिकाणीं जसा एकरूप सुवास किंवा गुळाच्या आंगीं जशी तद्रूप गोडी " नाना कापुरु आणि परिमळु । कापुरचि केवळु । गोडी आणि गुळु । गुळुचि जेवीं ॥ (अमृ. प्र. २– ओ. ६३). " तशी ही अध्यात्मविद्या स्वयंसत्स्वरूप परमात्मा शंकर श्रीनिवृत्तिनाथ " निवृत्तिर्भगवान् हरः " त्यांच्या स्वरूपाशीं सदासर्वकाळची स्वसंवित् निजप्रतीति जे श्रज्ञानेश्वर " ज्ञानेशो भगवान् विष्णुः " तीच अभिन्नपणानें विद्यमान असणारी ही " **शांकरीविद्या** होय." "अहो ऐक्याचें मुदल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे । तरी स्वतरंगाचीं मुकुळें । तुरंबु कां पाणी ॥ (अमृ. प्र. २ ओ. ५९)". तसेंच बादरायण ब्रह्मसूत्रांतहि निर्देश असाच आहे—" **शास्त्रयोनित्वात्** " (ब्रह्मसूत्र १–१–२)–(**ब्रह्म**) **शास्त्राचें**–वेदांचें, **योनित्वात्**–कारण असल्यामुळें, सर्वज्ञ आहे. "सर्वज्ञता नास्ति शिवं विना क्वचित् "–सर्व प्रकारच्या ज्ञानाची खाण असलेले ऋग्वेदादिसंज्ञकशास्त्र तीच विद्या, तोच वेद, त्याची उत्पत्ति पुरुषाच्या निःश्वासाप्रमाणें " यस्य निःश्वसितं वेदः " प्रयत्न केल्याशिवाय कारणरूप ब्रह्म अशा शिवापासून झालेली, त्याचे ठिकाणीं निरतिशय सर्वज्ञत्व व सर्वशक्तिमत्त्व आहे, हें काय बरें सांगावें, असें बृहदारण्यक श्रुति म्हणते. तात्पर्य हें कीं, कापूर हें सगुणव्यक्तरूप व त्यांत ओतप्रोत भरलेला सुगंध हें त्याचें निर्गुण अव्यक्तरूप. प्रत्यक्ष दृश्यस्वरूप कापूर, त्याचें अदृश्यस्वरूप त्यांतील सुगंध, तो दाखवितां येणारा नसून फक्त अनुभवितां येणारा आहे. सुगंधामध्यें कापूर हा आकार, दृश्यपदार्थ केव्हांहि कोणासहि कशानेंहि दाखवितां येणारा नाहीं. तो सर्व सुगंधच सुगंध. गुळांत गोडीच गोडी. गुळाच्या प्रत्येक परमाणूमध्यें, त्याच्या कणाकणांमध्यें गोडीच गोडी ओतप्रोत भरलेलीच. गोडीमध्यें गूळ हा आकार, केवळ व्यतिरेक, आभासच. पण गुळामध्यें ओतप्रोत असलेली गोडी हा अन्वय, एकसारखा तो त्यांतला प्रत्यक्ष प्रत्ययरूप अनुभवच. " कसें बोटानें दाखवूं तुला । घे अनुभव गुरूच्या मुला ॥ (ज्ञानदेव गाथा). " " मग म्हणितलें सर्वेश्वरें । जें आकारीं इये खोंकरें । कोंदलें असत, न खिरें । कवणें काळीं ॥ (ज्ञाने. ८–३–१५). " या बहु छिद्रमय शरीरांत जें ओतप्रोत कोंदून भरलेलें आहे, तें परब्रह्मस्वरूप कोणत्याहि काळीं यत्किंचितहि क्षरण पावत नाहीं, कमी होत नाहीं, असतें तसेंच नित्य असतें. हें शरीर आभास मात्र केवळ, तो हा आकार त्या

परब्रह्म अमृतस्वरूपाचे ठिकाणीं गोडींतला गुळाचा आकार जसा सदागोडीमयच असतो, तसाच तो आभास नित्यपरब्रह्म अमृतरूपच होय. प्रत्येक पदार्थ उत्पन्न होण्याचे पूर्वी नसतोच, अभावरूप असतो. " नासतो विद्यते भावः " अशी भगवदुक्ति आहे. पण तो आभास भावरूप पदार्थावर भासतो. म्हणून " सदेव सोम्य इदमग्र आसीत् " (छांदोग्य उप. अ. ६ खंड १), हें सर्व दृश्य उत्पत्तीपूर्वी सद्ब्रह्मच होतें. दृष्टान्त—" मृत्तिका इत्येव सत्यं, वाचारंभणं विकारो नामधेयं " माती हीच सत्य. रांजण, घागरी, मडकीं, डेरे, पणत्या इत्यादि मातीचे विकार नांवाला उच्चारण्यापुरतेच. ते सदैव मृत्तिकारूपच असतात. रांजण, घागरी वगैरे उत्पत्तीपूर्वी मातीरूपच. उत्पत्तीनंतर व नाशानंतर मातीच. तसेंच त्या अक्षर निर्विकार शंकर नित्यसत् परमात्माच असलेली चिद्रूपा त्याची नित्य अंगभूत असणारी विद्याशक्ति शांकरी होय. केवळ निरतिशय परमानंद शंकर स्वरूपाचा आविर्भाव अनंतकोटिब्रह्मांडांतील मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत अनेक रूपांनीं होतो. तो आपल्या निजानंदाचा द्वितीयत्वानें भोग घडावा म्हणून आपणच " एकोऽहं बहु स्याम् " मी एकमेव त्यानें बहुत व्हावें, मीच बद्ध, तो मी मुक्त व्हावा, हा जो निजस्वरूपाचा, आपलें परम प्रेमस्वरूपभक्तिसुख घेण्याचा उठणारा मूळ संकल्प, तोच हा जो दयार्द्रभाव, तीच त्या मूळ शंकर सत्स्वरूपांतली अत्यंत दयार्द्ररूप स्फुरणारी स्फूर्ति, अशा त्या नित्य चित्कला, शांकरी, विद्यादेवीमातेशीं माझें असें तन्मयतेनें नित्य एकरूप होऊन असणारें हें नमन असो.

अक्षर, परब्रह्म, केवळ, शुद्धस्वरूप, तेंच शिवशक्ति, ईश्वरमाया, स्त्रीपुरुष, देवोदेवी, प्रकृतिपुरुष अशीं रूपें आपण एकलेंच धारण करतें. " स्त्रीपुरुष नामभेदें । शिवपण एकलें नांदे । जग सगळें अधार्धे— । पणें जिहीं ॥ (अमृ. प्र. १—१७) " तें परब्रह्मशिव आपणच एकलें स्त्रीपुरुष नांवांनीं शिवशक्ति, ईश्वरमाया, प्रकृतिपुरुष, देवदेवी वेषांनीं अर्धे अर्धे भाग एकत्र मिळून सर्व जग होऊन असतें. हेंच कसें तें पुढील तिसऱ्या व चौथ्या श्लोकानें दाखवीत आहेतः— ब्रह्म, माया व मायेंतील प्रतिबिंब या तिघांनीं मिळून होणारें जें एकस्वरूप, त्यास ईश्वर म्हणतात, " मायाबिंबं वशीकृत्य तां स्यात् सर्वज्ञ ईश्वरः ॥ (पंचदशीतत्त्वविवेकः १६) " ॥ मायेंत प्रतिबिंबित झालेला आत्मा मायेला स्वाधीन ठेवून सर्वज्ञ ईश्वर होतो, म्हणून जगाची उत्पत्ति, स्थिति, लय इत्यादि करणारा व सर्व जीवावर अनुग्रह करणारा तोच आहे. मनुष्याचें ठिकाणीं जीवभाव आहे, तोंपर्यंत त्यास वेदान्त, गुरु आणि ईश्वर ह्यांच्या अनुग्रहानें जें ज्ञान प्राप्त होतें, तेंहि

प्रथम ईश्वरभक्तिद्वारां त्याच्या प्रसन्नतेनें वेदान्त शास्त्रांत गति प्राप्त होऊन मग सद्गुरुप्राप्ति. म्हणून ह्या शिष्टसंप्रदायानुरूप ईश्वरास आधीं महाराज वंदन करीत आहेत. ॥२॥

सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः ।
ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः ॥ ३ ॥

पदच्छेदः—सार्धं केन च कस्य अर्धं शिवयोः समरूपिणोः ज्ञातुं न शक्यते लग्नं इति द्वैतच्छलात् मुहुः ॥ ३ ॥

अन्वयः—मुहुः द्वैतच्छलात् समरूपिणोः शिवयोः कस्य अर्धं केन च सार्धं लग्नं (संलग्नं) इति ज्ञातुं न शक्यते ॥ ३ ॥

पदांचा अर्थ—**मुहुः**—वारंवार, एकसारखें; **द्वैतच्छलात्**—(द्वैतस्य छलात्) द्वैतभासामुळें, दोन असल्याच्या दृश्यामुळें; **समरूपिणोः**—एकरूप अशा, **शिवयोः**—शिवशक्तिरूपामध्यें, **कस्य**—कोणकोणाचा, **अर्धं**—अर्धा भाग, **च**—तसेंच, **केन**—कोण-कोणाशीं, **लग्नं**—(संलग्नं)—मिसळलेले, **इति**—हें, **ज्ञातुं**—समजणें, **न शक्यते**—शक्य नाहीं. ॥ ३ ॥

स्पष्टार्थ—सतत किंवा वारंवार दोन रूपांनीं विलसणारें, मृगजळवत् भासणारें, हें जें शिवशक्तिस्वरूप त्यांतील दोन्ही भाग समानरूप असल्यानें अशा दोन्ही स्वरूपांत कोणाचें कोण अर्ध व कोणाशीं कोण संलग्न, जडलेलें, एकरूप आहे, हें समजणें शक्य नाहीं, कठीण आहे. ॥ ३ ॥

सुबोधविवरण—ह्या श्लोकांतील प्रतिपादन असें कीं, प्रथम शक्ति हीच ती, जिला प्रकृति, देवी, माया म्हणतात व ज्याला या शक्ति—मायेमुळें देव, ईश्वर, पुरुष अशी संज्ञा प्राप्त झाली आहे, तोच शिव, परमात्मा, तेंच अक्षरब्रह्म होय. तसेंच ह्या दोघांचा संबंध कसा अनिर्वचनीय, वर्णनातीत आहे हें दाखवून त्या असल्या अनिर्वचनीय संबंधापासून सृष्टिसमयकालीं हीं अशीं दोन रूपें स्वीकारून तीं संयुक्त कशीं होत असतात हें समजणें कठीण आहे. ॥ ३ ॥

तेंच पुढील श्लोकानें स्पष्ट करीत आहेत कीं, हीं शिवशक्तिरूपें एकमेक दोन दिसतात तशीं तीं नसून उभयतां नुसतीं समानरूपच नव्हत, तर तीं सदैव एकरूपच असतातः—

अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् ॥
तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥ ४ ॥

पदच्छेदः—अद्वैतम् आत्मनः तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् तौ वन्दे जगतां आद्यौ तयोः तत्त्वाभिपत्तये ॥ ४ ॥

अन्वयः—आत्मनः अद्वैतं तत्त्वं मिथस्तराम् तौ जगतां आद्यौ **दर्शयन्तौ** (स्तः) अतः तयोः तत्त्वाभिपत्तये (अहं) वंदे.

पदांचा अर्थ— **आत्मनः**–आपलें, **अद्वैतं**–द्वैतरहित, **तत्त्वं**–मूळस्वरूप, **मिथस्तराम्**–एकांत एक मिसळलेलें, एकरूप असलेलें, **तौ**–तीं दोघें, **जगतां**–अनेक ब्रह्मांडांच्या, **आद्यौ**–आरंभींचीं असें दाखवींत आहेत म्हणून अशा मूळच्या असलेल्यांना, **तयोः**–त्या दोघांच्या, **तत्त्वाभिपत्तये**–(तत्त्व+अभिपत्तये तत्त्वस्य अभिपत्तये) मूळस्वरूपाचे प्राप्तीसाठीं, (**अहं ज्ञानेश्वरः**) **वंदे**–मी वंदन करतों.

स्पष्टार्थ—(द्वैतरूपानें, दोन भिन्नरूपांनीं दिसणारी अशी ही शिवशक्ति, देवदेवी, ईश्वर मायारूप अमा त्यांचा स्त्रीपुरुषरूप विलास होत असल्याचें भासत असलें तरी) आपलें मूळस्वरूप एकच एक अद्वैततत्त्व, अक्षरपरब्रह्म आहे, हें एकमेकांच्या एकरूपतेनें तीं दोघें दाखवीत आहेत. त्या या जगतांच्या आद्य शिवशक्तिस्वरूपाला त्यांचें मूळस्वरूप अद्वैत अक्षर निर्विकार ब्रह्म त्याच्या प्राप्ती-साठीं मीं ज्ञानेश्वर वंदन करतों, की तें अद्वितीय निर्विकार अविनाशी तत्त्वस्वरूप मी आहें असा बोध व्हावा म्हणून. आतां श्रीज्ञानेश्वरमहाराज "अध्यारोपापवादाभ्यां तत् ज्ञातव्यं." अध्यारोप आणि अपवाद ह्या क्रमानुसार पदार्थाच्या अस्तित्वाची आधीं कल्पना करणें म्हणजे त्याच्या अस्तित्वाबद्दलची आधीं शंका उपस्थित करणें यास अध्यारोप म्हणतात व त्या कल्पनेचा निषेध करणें, ती केलेली शंका निरसन करणें यास अपवाद म्हणतात. यासच पूर्वपक्ष व सिद्धान्त, वादी व संवादी असेंहि म्हणतात, त्यास अनुसरून परमात्म्याचें स्वरूप वर्णन करून हें मंगल संपवितात—

मूलायाग्रायमध्याय मूलमध्याग्रमूर्तये ।
क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥ ५ ॥

पदयुक्त अन्वयः—मूलाय (नमः), अग्राय (नमः), मध्याय (नमः), मूल–मध्य–अग्र–मूर्तये– (नमः), क्षीण–अग्र–मूल–मध्याय, पूर्णाय शंभवे नमः

अर्थ— **मूलाय**–जगताचें मुळास, उत्पत्तीस; **अग्राय**–जगताचे प्रळयास, **मध्याय**–जगताच्या स्थितीस अशा मूलमध्याग्ररूपाच्या, **मूर्तये**–मूर्ति, कारणभूत जें अधिष्ठान, अक्षरब्रह्म, त्या कारणब्रह्माला (नमः–नमन असो). तसेंच **क्षीण**–रहित असलेले, मुळींच नसणारे अग्र, मूल, मध्य हे भाव ज्याचे ठिकाणीं त्या

क्षीणाग्रमूलमध्याला–क्षीण आहेत म्हणजे अग्र–अंत, मूल–उत्पत्ति, मध्य–स्थितिकाल असे हे सर्व जगताचे भाव, विकार ज्याचे ठिकाणीं मुळींच नसतात, अशा त्या **क्षीणाग्रमूलमध्यस्वरूपाला** माझें नमन असो. **पूर्णाय**–असा जगताचे विकारास कारण भासणारा व जगताचे विकार त्यांनीं रहित असणारा अशा परिपूर्णाला, **शंभवे**–शिवपरब्रह्माला, **नमः**–माझें नमन असो.

सुबोधाविवरण——जगताची उत्पत्ति, स्थिति व प्रळय याचा आरंभींचा काळ, मध्य काळ व अंतिम काळ हे सर्व विकार, हे भाव या भावरूप आभासिक पदार्थांच्या अस्तित्वाचा त्या शुद्ध परमात्म शिवस्वरूपावर आरोप किंवा कल्पना करणें हा अध्यारोप होय; व जगताच्या या उत्पत्तिस्थितिप्रळयरूप अशा विकारमय भावाचें अस्तित्वाचा पूर्ण निषेध करणें, शंका नाहींशी करणें, आरोप किंवा कल्पना किंवा वाद निरसन करणें, आणि मुख्य तत्त्व सिद्ध करणें यास अपवाद, संवाद किंवा सिद्धान्त म्हणतात. जगताचे मूळ उत्पत्तीस, त्याच्या स्थितीस, त्याच्या प्रलयास अशा या सर्व विकाररूपास, या आभासास कारणभूत असणारें अक्षरब्रह्म, अधिष्ठानरूप त्या शिवमूर्तीला, कारण परमात्माच सर्वत्र एकच एक असा श्रुतींचा सिद्धान्त असल्यामुळें त्या परमात्म शिवस्वरूपावर हें जगत्,ईश्वरमाया व जगताची उत्पत्ति स्थिति, प्रळय हे असले आभास या कल्पना मुळींच नाहींत, अशा त्या क्षीणाग्रमूलमध्य परिपूर्ण परमात्म शंभूस माझें नमन असो. ईशावास्य उपनिषदांत " ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावाशिष्यते ॥"हें शिवशंभुस्वरूप अगदीं परिपूर्ण, निर्विकार कसें तें दाखविलें आहे. " कां तरी आधारु । सिंधु जैसा दुर्भरु । तैसा विरुद्धेयां पाहुणेरु । याच्या घरीं ॥ " (अ.मृ. २–५८). ग्रीष्मऋतूंत समुद्राला मिळणाऱ्या नद्या सर्व आटल्या किंवा पावसाळ्यांत त्या तुडुंब भरून मिळत असल्या तरी समुद्र दुर्भर म्हणजे पूर्णच असतो. नद्यांच्या त्या असल्या कमीअधिक होण्यामुळें समुद्र कमी होत नाहीं व अधिकहि होत नाहीं, तो सदैव परिपूर्णच असतो. तसेंच शिवपरमात्मस्वरूपावर विरुद्ध धर्माचा पाहुणेर अगदीं रेलचेल झाला आणि असलें अनंतकोटि ब्रह्मांडरूप अनेक विकार उठले नि मावळले तरी शिवरूप अगदीं नित्य, निर्विकार परिपूर्ण असेंच असतें. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं पांच श्लोकांनीं परमात्म्याच्या अक्षर निर्विकार स्वरूपाचें वर्णन करून हें मंगलाचरण येथें संपविलें आहे.

वरील तिसऱ्या व चौथ्या श्लोकांत वर्णिलेल्या शिवशक्तिरूपाच्या केवलस्वरूपाचें सिद्धान्तपूर्वक वर्णन या **शिवशक्तिसमावेशन** प्रकरणानें आरंभिलेलें त्याचा अधिक विस्तार श्रीज्ञानेश्वरमहाराज आतां येथून पुढें करीत आहेत.

ऐसीं इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ॥
तियें वंदिलीं मियां मूळिकें । देवोदेवी ॥ १ ॥

अन्वय—ऐसीं इयें निरुपाधिकें, जगाचीं जियें मूळिकें जनकें, देवोदेवी तियें मियां वंदिलीं ॥ १ ॥

शब्दार्थ—**ऐसीं** (ऐशीं) – अशीं, अशीं अशीं, अशा तऱ्हेचीं (मागें मंगलाचरणांतील तिसऱ्या व चौथ्या श्लोकांत निर्देश केलेलीं, अक्षरब्रह्ममय): **इयें**–हीं दोन्हीं, शिवशक्तिजोडपें; **निरुपाधिकें**–(निर् + उपाधिकें)–**निर्**–निःशेष, नसलेलीं, रहित, वांचून; **उपाधिक–उपाधि**–द्वैत, दोन, दुजेपणा; **उपाधिक**–द्वैतरूप, दोन रूपांनीं; **उपाधिकें**–(एकारान्त नपुंसकलिंगी अनेकवचनी विशेषण.) द्वैतरूपांनीं, दोनपणांनीं असणारीं; **निरुपाधिकें**–द्वैतरहित, दोन रूपांनीं नसणारीं, निःशेष दुजेपणांनीं रहित असणारीं;**आभासात्मक,अभावरूप**–कालत्रयीं न झालेलीं, अगदीं अस्तित्वांत नसणारीं; **जगाचीं** – (जायते गच्छतीति जगत् इति) जग–(ज+ग) ज – जन्मणारें, उत्पन्न होणारें, विकार पावणारें व ग–गतिमान असणारें, गतिमान होऊन संपणारें, नाहींसें होणारें) जग–जन्मून, उत्पन्न होऊन, दिसत राहून, नाहींसें होणारें; **जगाचीं**–जगासंबंधींचीं; **जियें**–जीं (नपुंसकलिंगी एकारान्त संबंधी सर्वनाम, अनेकवचन); **मूळिकें**– (एकारान्त नपुंसकलिंगी अनेकवचनी विशेषण **मूळिक** याचें. सं. मौलिक शब्दापासून झालेलें) मूळचीं, प्रारंभींचीं; **जनकें**–(जननं करोतीति जनकः या संस्कृत शब्दाचें ए. न. अ. रूप) जन्मदातीं, जन्म देणारीं, आईबापें, सृष्टिनिर्माण करणारीं; **देवोदेवी**–(देवो + देवी)–देव व देवी, ईश्वरमाया, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति; **तियें**–तीं एकारान्त नपुं. अने. **तीं** सर्वनामाचें), तीं दोघें, देवदेवी; **मियां**–मीं (मीचें म्यां, तृतीयेचें एकवचन. काव्यांत मियां), मीं ज्ञानेश्वरानें; **वंदिलीं**–(वंद्–वंदन करणें याचें भूतकालीं कर्मणिप्रयोगरूप) नमिलीं, नमन केलें.

भावार्थ—अशा प्रकारचीं हीं द्वैतरूप नसलेलीं, दोन रूपांनीं रहित जगाचीं जीं मूळ कारण आईबापें देव आणि देवी, अशा त्या शिवशक्तीला मीं–ज्ञानेश्वरानें वंदन केलें.

सुबोधविवरण–परमात्म्याव्यतिरिक्त यत्किंचिताहि पदार्थ नाहीं. "ईशावास्यमिदं सर्वं यत्किं च जगत्यां जगत् । " असें ईशावास्योपनिषदांत वचन आहे कीं, परब्रह्म परमेश्वरानें हें सर्व जगत् व्यापलेलें, ओतप्रोत भरलेलें आहे. अधिष्ठित पदार्थ

हा नेहमीं अधिष्ठानरूपच असतो. एका पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो, तो भासणारा पदार्थ कल्पित असल्यानें, त्या मूळपदार्थरूपच असतो. " तेजाचा तेजोनि निघाला। परि तेजींचि असे लागला । तया रश्मि ऐसा भला । बोध व्हावा ॥ (ज्ञाने. अ. १४–३८५) "–" सूर्यबिंब तेजोमय असतें. त्याचाच तो अफाट पसरणारा प्रकाश तोहि तेजोमयच. त्यापासून निघणारे प्रकटरूप अनंतकोटि किरण तेहि तेजोमयच. " परमात्मा, शिवशक्ति, देवदेवी, ईश्वरमाया, प्रकृतिपुरुष, प्राणेश्वरीप्रिय व अनंतकोटिब्रह्मांडमय जगत्, हीं एकरूपच आहेत. म्हणजे तीं सर्व निरुपाधिक आहेत. तीं अनेकपणानें भासणारीं तरी एकरूपच आहेत. असें या शिवशक्तिसमावेशन प्रकरणांत प्रतिपादन केलेलें आहे. ' एष योनिः सर्वस्य ' या मांडुक्य उपनिषदांतील वाक्यावरून हा परमात्मा सम्पूर्ण विश्वाचें कारण आहे. तो निरुपाधिक, अद्वितीय, आनंदमय आहे. **"एकमेवाद्वितीयं ब्रह्म, नेह नानास्ति किंचन "** (एकं एव अद्वितीयं ब्रह्म न इह नाना अस्ति किंचन.) **एकं एव**–एकच एक; **अद्वितीयं**–दुसरें नाहींच नाहीं, तें ब्रह्म. **इह**–येथें, या ब्रह्माचें ठिकाणीं; **नाना**–अनेकपणा, **न अस्ति**–(नास्ति)–नसतो, नाहींच; **किंचन**–यत्किंचित्हि, असें श्रुति वचन आहे. " अहो, **एकं**–एवढें पद एक या शब्दार्थाचा निर्देश करण्यास, स्पष्ट करण्यास पुरें असतांना **एव** शब्दाची विशेष आवश्यकता कां असावी ! " तर एक सापेक्ष दोन, दुसरें जें द्वैत, तें रहित, असें निश्चयपूर्वक म्हणून ती एव शब्दयोजना. " अहो, **एकं एव** असें निश्चयार्थी पद असतांना **अद्वितीयं** पदाची आणखी आवश्यकता कां ? " एक सापेक्ष अद्वितीयत्वानें भासणाऱ्या ब्रह्मांड-रहित. " **इह किंचन नाना न अस्ति** " पुन्हा पुन्हा " एकच एक, अद्वितीय, ब्रह्म " ह्या भावाचा तोच तो वारंवार निश्चय व्हावा म्हणून " इह किंचन नाना न अस्ति " ह्या वाक्यानें **इह**–या " **एकच अद्वितीय ब्रह्म** " **स्वरूपाचें ठिकाणीं यत्किंचिताहि नानात्व नाहींच, नाहीं** असें निषेधपूर्वक निश्चयानें दृढ व्हावें म्हणून ही वाक्ययोजना आहे. **निरुपाधिक** असें एकच अक्षर परब्रह्मस्वरूप उपाधिरहित असतांना त्या स्वरूपाहून भिन्न, द्वैतरूप भासणारीं अशीं देवदेवी म्हणजे शिवशक्ति हीं मूळकारण व त्यापासून होणारें कार्य हें जगत् अशीं त्या निर्विकार, निरुपाधिक स्वरूपांतूनच आविर्भूत झालेलीं हीं आहेत असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं म्हटलेलें तें वरील श्रुतिवचनाविरुद्ध दिसतें, अशी शंका साहजिक येण्याचा संभव आहे. परंतु शास्त्रसिद्धान्त वर वर्णिल्याप्रमाणें कीं, अधिष्ठित वस्तु अधिष्ठानरूपच असते. एका पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो तो तद्रूपच असतो. " **सदेव सोम्य,**

इदमग्र आसीत्" ॥ छांदोग्यांत ६–१–१ मध्यें श्रुतिप्रमाणानें सिद्ध केलें आहे– हे सोम्य, इदं अग्रे सदेव आसीत्–हे सोम्य, **अग्रे**–उत्पत्तीच्या पूर्वी, **इदं**–हें दृश्य विश्व, **सत् एव**–सत्यरूपानेंच (परमात्ममय), **आसीत्**–होतें. असें सांगून जगन्मिथ्यात्वाविषयीं " यथा सोम्य, एकेन मृत्पिंडेन सर्वं मृन्मयं विज्ञातं स्यात् वाचारंभणं विकारो नामधेयं, मृत्तिका इत्येव सत्यं " (छां. उ. ६–१–१), असा दृष्टान्त सांगितला आहे. हे सोम्य, जसें मातीच्या एका गोळ्यापासूनचीं सर्व कांहीं बोळकीं, डेरे, मडकीं, घागरी, रांजण, चुली वगैरे मृत्तिकेचीं कार्यें हीं एक मृत्पिंड जाणला असतां सर्व जाणल्यासारखीं होतात; डेरे, रांजण, मडकीं इत्यादिकांचें नाम आणि रूप हा विकार केवळ शब्दमात्र (मिथ्या) आहे. (वस्तुतः त्यांना सत्यत्व मुळींच नाहीं.) मृत्तिकाच फक्त सत्य आहे. नामरूपात्मक जगत् हें उत्पत्तीच्या पूर्वी सत् असें परमात्ममयच असून नंतर उत्पन्न झालेलें जगत् ब्रह्मच होय. म्हणजे वस्तुतः जगत् म्हणून पदार्थ नाहींच–आहे तें सर्व परमात्माच आहे, असें " **एतदात्म्यमिदं सर्वं, तत्सत्यं, स आत्मा, तत् त्वम् असि** " (छां. उ. ६–८–७) या वाक्यानें श्रुति सांगते—एतत् इदं सर्वं, यत् दृश्यं जगत् तत् सर्वं आत्म्यं–हें सर्व जें दृश्य जगत् म्हणून दिसतें, तें सर्व आत्मरूप आहे. तें तो सत्य आत्मा आहे. तें आत्मस्वरूप तूं आहेस. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा असा हा **स्फूर्तिवाद** आहे, व तोच सर्व या अमृतानुभवग्रंथभर प्रतिपादिला आहे.

तसेंच " **आत्मैवेदं सर्वम्** " – (छां. उ.) (आत्मा एव इदं सर्वं)– आत्माच हें सर्व. " **ब्रह्मैवेदं सर्वं** " (मुं. उ.) " **इदं सर्वं यदयमात्मा** ", " **नेह नानास्ति किंचन** " या सर्व वाक्यांचा थोडक्यांत अर्थ असा कीं, हें सर्व दिसणारें जगत् आत्मरूप असून तेंच सत्य आहे; आणि तेंच तूं आहेस. हें सर्व ब्रह्मच आहे. परमात्मस्वरूपाशिवाय नानात्व यत्किंचित्हि नाहीं. या वाक्यांत कल्पित पदार्थ अधिष्ठानरूप असतो, या नियमानें दिसणारें सर्व जगत् ब्रह्मरूप आहे. तद्व्यतिरिक्त नामरूपात्मक " रज्जौ सर्प इव " (दोरीवरील सर्पाप्रमाणें) मिथ्या आहे. दोरीवर सर्प कधीं झालाच नाहीं. **हाच अजातवाद** होय, असें स्पष्ट करून सांगितलें आहे. त्याचप्रमाणें " **न रूपमस्येह तथोपलभ्यते** " या स्मृतीनें– भगवदुक्तीनेंहि " अर्जुना, ज्याप्रमाणें हें जगत् तुला दिसतें, त्याप्रमाणें तें सत्य नाहीं " असेंच सांगितलें आहे. श्रुति-स्मृति प्रामाण्य न मानणारे पण युक्तिमात्र कबूल करणारे असे कांहीं चिकित्सक असतात. " जगत् मिथ्या आहे," असा निश्चय हीच प्रतिज्ञा. " कारण तें अविद्याकार्य आहे, म्हणून "–हें अनुमान

म्हणजे हा हेतु. युक्ति म्हणजे अनुमान व अनुमानानें जग मिथ्या ठरतें, तें असें– जें जें अविद्याकार्य असतें, तें मिथ्या असतें— जसें रज्जुसर्प—या उदाहरणानें सिद्ध होतें. या युक्तीनें जगन्मिथ्यात्व ठरतें. " **नासतो विद्यते भावः नाभावो विद्यते सतः** " (श्रीगीता २–१६) – असतः भावः न विद्यते—**असतः**–जें झालेंच नाहीं त्याला भाव – अस्तित्व नसतें. सतः अभावः न विद्यते—जें **सतः**–सत्‌रूप त्या सत्यस्वरूप परब्रह्माला **अभावः**–मिथ्यापण नसतें. जें सत्य तें सत्यच. जें मिथ्या तें मिथ्याच. " या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असें सर्वगत । तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ॥ (ज्ञानेश्वरी २–१६–२६). या **उपाधिमाजीं**–जगत् त्यामध्यें, **गुप्त**–सूक्ष्मरूपानें (ओतप्रोत भरलेली), **चैतन्य**–चिच्छक्ति ज्ञानस्वरूपा, ज्ञप्ति, **सर्वगत असे**–ओतप्रोत भरून राहिलेली. (हें सर्व जग चिन्मयस्वरूप आहे.) " हा लोकत्रयआकार । तो जयाचा विस्तार । तेथ नाम वर्ण आकार । चिन्ह नाहीं ॥ ज्ञाने. (२–१७–३४)" " मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना " (गीता ९–४), (ज्ञाने. ९–४–६४)–' अव्यक्तमूर्तिना मया ततम् इदं सर्वं जगत् '–अप्रकट अशा अदृश्यरूपानें मीं हें सर्व दृश्य व्यापलेलें आहे. " माझेया विस्तारलेंपणाचेंनि नावें । हें जगचि नोहे आघवें । जैसें दूध **मुरालें** (थिजलें) स्वभावें । तरि तेंचि दही॥(९–६४)॥ कां बीजचि जाहलें तरु । अथवा **भांगारचि** (सुवर्ण) अलंकारु । तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥ ९–६५ ज्ञाने. ॥ (बीजानेंच वृक्ष व्हावें अथवा सुवर्णानेंच अलंकाररूप व्हावें तसेंच माझ्या एकाचाच (एकमेव अद्वितीय) विस्तार तें हें जग. यावरून शास्त्रसिद्धान्त हाच कीं परमात्मा ओतप्रोत आपणच सर्व आहे. कल्पित जगत्, त्याची जीं कल्पित मूळजनक देवोदेवी, शिवशक्ति हीं सर्व निरुपाधिक म्हणजे निराळीं नाहींतच. सर्व कांहीं परमात्माच. "जैसि कां समीरेसकट गति । कां सोनियासकट कांति । तैसी शिवेंसि शक्ति । अवघीचि जे ॥अमृ. १–४१॥ कां कस्तुरीसकट परिमळु । का उष्मेसकट अनळु । तैसा शक्तीसि केवळु । **शिवुचि जो** (अमृ.१–४२)॥ तेथ मी नमस्कारालागीं उगें **दुसरा** । तन्ही **लिंगभेद पन्हा** । जोडूं जावो ॥ (अमृ.१–५१) अशा एकमय परमात्मअक्षरस्वरूपांत मी नमस्काराला निराळा राहीन तर " **लिंगभेदपन्हा** " निराळा द्वैतभाव उत्पन्न होईल. मुमुक्षूस झालेला स्वरूपविस्मृतीचा भ्रम शास्त्रास जेव्हां निवृत्त करावयाचा असतो, तेव्हां नसत्या मायेची कल्पना करून ती परमात्म्याची उपाधि मानून जगत्‌निर्मिति कल्पून सांगावें लागतें. माया ही परमात्मअक्षरपरब्रह्माची उपाधि केव्हांच अस्तित्वांत नसते. तसेंच परमात्मा

केव्हांहि अस्तित्व नसलेल्या मायेचें अधिष्ठान होत नसतो. कारण तीं दोघेंहि **निरुपाधिकच** होत.

आतां परमात्मा आपणच आपल्या ठिकाणीं आपल्या विलासाकरितां बहु व्हावें म्हणून होऊन पाहतो.—

जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोभरीं ॥
चारुस्थळीं येकाहारी । येकांगाची ॥ २ ॥

अन्वय—जो प्रियुचि आवडीचिये सरोभरीं चारुस्थळीं येकाहारी येकांगाची प्राणेश्वरी उलथे ॥ २ ॥

शब्दार्थ—जो **प्रियुचि**–पति, प्रियकर, आनंदब्रह्म, शिव, परमात्मा; **आवडीचिये**–प्रेमाच्या, स्वेच्छेच्या; **सरोभरीं**–भरांत, वेगांत, आविर्भावांत; **चारुस्थळीं**–निज सुंदर स्वस्वरूपावर, अधिष्ठानावर; **येकाहारी**–एकाच पंक्तीमध्यें, एका ओळींत; **येकांगाची**–एका कुशीवर, एका बाजूवर, एकरूपांतच. **प्राणेश्वरी**–(प्राण+ईश्वरी) प्राणजीवन, प्राणाची धनीण, शक्तिरूप; **उलथे**–उलथा होतो, उलथतो, प्रगट होतो.

भावार्थ–जो आनंदमय, शिव, परमात्मा, अक्षरब्रह्म, स्वेच्छेच्या प्रेमभरांत **मी अनेकरूप व्हावें**, म्हणून तो प्रिय प्रेमस्वरूप आपल्या सुंदर स्वरूपावर, निज-अधिष्ठानावर एकरूपांतील एक अंगानें आपणांशींच सदृश असें शक्तीचें, आपल्या प्राणेश्वरी पत्नीचें रूप स्वीकारतो.

सुबोधविवरण—'**एकोऽहं बहु स्याम्**'—अहं एकः सन बहु स्याम्–मी जो एक, त्यानें "**आपण बहुत व्हावें**" ह्या स्वरूपभूत आनंदाचा उपभोग घेण्याच्या संकल्पाच्या आवडीच्या भरांत जो एकमेवाद्वितीय परमात्मा तोच प्राणेश्वरी–अहंस्फुरणरूप जो मूळ अहंकार, महाप्राण त्याचें नियमन करणारी शक्ति (तो उलथें) तिचें रूप धारण करतो. प्राण हा भोगाचा संपादक आहे. परमात्म्यानें शक्तिरूप धारण केलें असतां त्याच्या स्वरूपांत पालट होऊन तो शिवरूप भोक्ता होतो. "**स. एव आत्मा द्विविधो भवति**" या श्रुतीप्रमाणें तोच परमात्मा आपणच आपलें भोग्य व आपणच आपला भोक्ता अशा रीतीनें द्विविध (**चारुस्थळीं**) आपल्या सुंदर स्वरूपभूत आनंदसदनांत एक पुरुष व एक स्त्री अशीं दिसण्यांत जरी रूपें दोन पण त्या दोघांचें अंग, शरीर (**येकांगाचि**) स्वरूप एकमेव अद्वितीय असें एकच एक सारखेंच तें शिवशक्तिनामक अर्धनारीनटेश्वर जोडपें त्या

अद्वितीय अशा आपल्या स्वरूपभूत आनंदाचें आरोगण करीत आहे, असा भावार्थ. त्या एका परमात्म्याचींच प्रिय आणि प्राणेश्वरी अशीं हीं दोन रूपें झालेल्यासारखीं दिसतात, तीं भिन्न नसून परमात्मपरमानंदरूपच आहेत; हें पुढें कसें तें पाहा.

आवडीचेनि वेगें । येकयेकातें गिळिती अंगें ॥
कीं द्वैताचेनि पांगें । उगळितें आहाती ॥ ३ ॥

अन्वय-- (तीं) आवडीचेनि वेगें येकयेकातें अंगें गिळिती, कीं द्वैताचेनि पांगें (त्यातें) उगळितें आहाती.

पदार्थ—हे शिवशक्ति दंपत्य आपल्या **आवडीच्या**–प्रेमाच्या, **वेगें**–भरांत प्रेमाच्या भरांत; **एकएकातें** एकमेकांस; **अंगें**–निजस्वरूपांत; **गिळिती**–गिळतात नाहींसें करतात (प्रळय झालेला दिसतो); एकरूप होतात, एकमेक एकमेकांच्या मूळरूपामध्यें सामावतात; **कीं**–पुन्हा; **द्वैताचेनि पांगें**–दोन रूपांच्या मिषानें, निमित्तानें; **उगळितें आहाती**–ओकत असतात, प्रकट होत असतात, जगाची उत्पत्ति होतांना दिसते.

भावार्थ—(मी एक, अद्वितीय असूनहि विलासासाठीं अनेक व्हावें ही **अहं** स्फूर्ति उठते, तेव्हां परमात्मा आपणच आपल्या परमानंदाच्या विलासासाठीं बहुत व्हावें अशी जी **अहं इच्छास्फूर्ति**, तीच अपरा प्रकृति, शक्ति, आणि तिला जाणणारी जी ज्ञप्ति, जें ज्ञानस्वरूप, तीच पराप्रकृति, तो शिव. अर्से शिवशक्तिरूप परमात्मा आपण (होऊन) आपल्या ह्या निज–स्वानंदांतील प्रेमाच्या भरांत तें (शक्तीचें प्रकट सृष्टिरूप बनलेलें) पुन्हा बहुत नसावें अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, प्रलयरूपानें शिवरूप होतें, तेव्हां तें शिवशक्तिस्वरूप आपल्या मूळच्या निजस्वरूपांत परमात्म्यांत सामावतें. पुन्हा स्फूर्ति **'मी बहुत व्हावें'** उठते, तेव्हां तीं दोन रूपांच्या निमित्तानें प्रकट होतात व विश्वनिर्मिति होते. असा हा त्या प्रभूचा आदिमायेच्याद्वारें खेळ, विलास होतच असतो. **तात्पर्य**–असें विश्वाचें प्रकट होणें, विलीन होणें, प्रकट होणें, पुन्हा विलीन होणें, हें चालूच असतें. तेंच कसकसें तें हा श्रुतींचा गूढार्थ महाराज पुढें सांगणार आहेतच.

सुबोधविवरण—**" स्वमायेचें आडवस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र "** ॥ ज्ञाने.–१८–६३–१३०३ ॥ असें वरती निर्देश केल्याप्रमाणें त्या अनंतकोटिब्रह्मांडनायकप्रभूचा स्वमायेचें आडवस्त्र लावून म्हणजे पडदा पुढें

ओढल्याचें निमित्त करून आपण **एकला**, म्हणजे आपल्या एकमेव, अद्वितीय अशा निर्विकार स्वरूपावरचा ब्रह्मांडाच्या रचनेचा खेळ आपणच सर्व रूप बनून निज विलासानें करीत असतो. भगवान् श्रीव्यासमुनिकृत सूत्रांतून श्रुतींचा अर्थ-विपर्यास करणाऱ्या वादीमतांचा निषेध दर्शवून श्रुति अर्थाचा समन्वय करणाऱ्या ब्रह्मसूत्रांतून सिद्धान्त केला आहे कीं, परमात्मा परब्रह्म स्वरूप एकचएक (एकमेवाद्वितीयं ब्रह्म)– सर्वत्र ओतप्रोत असून तेंच बहुत झाल्याचें दिसलें, तरी तें त्या एकमय स्वरूपांतलेंच. तें कसें तें पाहूं. '**शास्त्रयोनित्वात्**' ब्रह्मसूत्रं ॥१–१–३॥ **शास्त्र**–वेदश्रुति; **योनि**–(जगताचें) कारण. श्रुतीमध्यें ब्रह्म जगताचें कारण असें वर्णन आहे. " एष योनिः सर्वस्य " (मां. उ. ६) **एष**–हा परमात्मा सर्व जगताचें कारण आहे. " यतो वा इमानि भूतानि जायन्ते, येन जातानि जीवन्ति, यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञास्व । तद् ब्रह्म इति (तै. उ. ३–१)–हे सर्व दिसणारे प्राणी ज्याचेपासून उत्पन्न होतात, ज्या आधारानें जगतात, अंतीं ज्यांच्यांत प्रवेश करतात–लीन होतात, त्याला जाणण्याची इच्छा कर, तेंच ब्रह्म होय.

" सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म " (तै. उ. २–१) वेदांत ब्रह्म 'सत्य, ज्ञान, अनंत असें म्हटलें आहे तसेंच तें जगत्कारण आहे, असेंहि त्यांत म्हटलें आहे.

संबंध—मृत्तिका या उपादान, मूळ कारणापासून घटादिकांची उत्पत्ति करणाऱ्या कुंभाराप्रमाणें ब्रह्माला जगताचें निमित्त कारण म्हणणें सयुक्तिक होईल. पण तें ब्रह्म उपादान कारण कसें, तर " परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च । (श्वेता० ६–८) "

या परमेश्वराची ज्ञान, बल व क्रियारूप स्वाभाविक दिव्यशक्ति नाना प्रकारची ऐकली जाते. तें मूळ कारण कसें मानलें जातें ?—**तत्तु समन्वयात्** (ब्रह्मसूत्रं १–१–४); तु–तसेंच; **तत्**–तें ब्रह्म; **समन्वयात्**–(सर्व जगतांत) पूर्णत्वानें ओतप्रोत भरलेलें आहे. **उपादान**–मूळ कारणहि, तेंच आहे.

संबंध—सांख्यमतांत त्रिगुणात्मिका प्रकृति ही समस्त जग व्यापून असते. या व्यातीरूप कारणामुळें जगताचें उपादन मूळ कारण ब्रह्मच कां मानावें–प्रकृति कां नाहीं ?

ईक्षतेर्नाशब्दम्—(ब्र. सू. १–१–५१) 'ईक्षतेः अशब्दम् न ' **ईक्षते**–ईक्ष्–ईक्षण करणें, संकल्प करणें असा **ईक्ष्** धातूचा प्रयोग श्रुतीमध्यें आलेला आहे. यावरून **शब्दम्**–वेदप्रमाण, **अशब्दम्**–वेदप्रमाणशून्य, असें प्रधान (त्रिगुणात्मिका जड प्रकृति), **न**–जगत्कारण नाहीं.

व्याख्या—उपनिषदांमध्यें जेथें सृष्टीचा प्रसंग आला आहे, तेथें **ईक्ष्** धातूचा प्रयोग आहे. जसें– **सदेव सोम्य, इदमग्रे आसीत् एकमेवाद्वितीयं ब्रह्म** ॥ (छां. उ. ६–२–१) असा आरंभ करून **तदैक्षत बहु स्यां प्रजायेय**– व्याख्या–त्या सत् ब्रह्मानें ईक्षण म्हणजे संकल्प केला कीं बहुत व्हावे, अनेक प्रकारानें उत्पन्न व्हावें. परंतु त्रिगुणात्मिका प्रकृति जड आहे. तिच्यांत **ईक्षण किंवा संकल्प होऊंच शकत नाहीं, तो चेतनाचा धर्म** आहे. म्हणून **वेदप्रमाणरहित प्रधानाला (जडप्रकृतीला)** जगताचें **उपादानकारण** मानलें जात नाहीं.

व्याख्या—**तदात्मानं स्वयमकुरुत** (तै. उ. वल्ली २ अनुवाक् ७) मध्यें स्पष्ट उल्लेख आहे कीं– तें ब्रह्म स्वतः आपणच या जड चेतनात्मकरूपानें प्रकट झालें. श्रीगीतेमध्यें भगवद्वचनाहि (अ. ७–४) असेंच आहे–

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च। अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ७–४ ॥

श्लोकार्थ— **भूमिः**–पृथ्वी, **आप**– जल, **अनल**– अग्नितेज, **वायु**– वारा, **खं**–आकाश, **मन**–संकल्पशक्ति, **बुद्धि**–जाणीवशक्ति. **अहंकार**– 'मी' अशी उठणारी स्फुरणारी वृत्ति. **इति**–अशी, **इयं**– ही, **मे**–माझी (ईश्वराची), **भिन्ना प्रकृतिः अष्टधा**—आठ रूपानें विभागलेली माझी **प्रकृति**–माझें प्रकट झालेलें जडरूप. " अपरेयमित्यन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्। जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ गी. अ. ७–५ ॥ हें महाबाहु पराक्रमी **अर्जुना, ही अपरा**–गौण प्रकृति होय. इच्याहून वेगळी जी माझी **परा** म्हणजे जीवभूता प्रवृत्ति, ती श्रेष्ठ आहे, असें समज. तिचा या जगताला आधार ती अधिष्ठान आहे. " आप तेज गगन। मही मारुत मन। बुद्धि अहंकार हे भिन्न। आठ भाग ॥ (ज्ञाने. ७–४–१८) " (ही आठ प्रकारांनीं कशी निराळी आहे अशी शंका जर तूं मनांत आणशील, तर तोच विचार सांगतों, ऐक ॥ १७ ॥) उदक, तेज आकाश, पृथ्वी, वायु, मन, बुद्धि आणि अहंकार हे तिचे आठ निरानिराळे प्रकार आहेत. " या आठांची जें **साम्यावस्था**–(एकीकरण) ते माझी परम (चेतन) प्रकृति पार्था। तिये नामव्यवस्था । जीव ऐसी ॥ ज्ञाने. ७–४–१९ ॥

" **एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।**
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा " ॥ (गीता ७–६)

" मत्तः परतरं नान्यत् किंचिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव " ॥ (गीता ७–७)

अर्थ—या दोन्ही प्रकृति सर्व भूतांच्या उत्पत्तीला कारण आहेत असें समज. (आणि म्हणून) मी सर्व जगाचा उत्पत्तिकर्ता आणि संहारकर्ता आहें ॥ श्लोक ६ ॥

ओवी—" हे सूक्ष्म प्रकृति कोडें (आवडीनें) । जैं स्थूलाचिया (महाभूतांच्या) आंगा घडे । तैं भूतसृष्टीची पडे । टांकसाळ " ॥ (ज्ञाने. ७–६–२२).

ओवी अर्थ—ही सूक्ष्म (परा) प्रकृति जेव्हां स्वेच्छेनें स्थूल महाभूत प्रकृतीशीं संयुक्त होते, तेव्हां सृष्टींतील प्राण्यांची टांकसाळ सुरू होते ॥ २२ ॥

श्लोकार्थ—हे धनंजय अर्जुना, माझ्याहून जगाला दुसरें कारण कांहीं नाहीं. सोन्याचे सुतांत जसे सोन्याचे मणि ओंवावे, **तसें हें सर्व जग ओतप्रोत माझ्यांत ओंविलेलें आहे.** (अर्थ श्लोक ७)

ज्ञाने. ओवी— " हें रोहिणीचें जळ । तयाचें पाहातां येइ जें मूळ । तैं रश्मि नव्हती केवळ । होय तें भानु ॥ २९ ॥ (हें दृश्य विश्व मृगजळासारखें आहे). मृगजळाचें मूळ पाहूं गेलें असतां तें केवळ सूर्यकिरण नसून सूर्यच होय ॥ २९ ॥ तयाचि परी किरीटी । इया प्रकृति जालिये सृष्टी । जैं उपसंहरू–नि कीजेल ठी । तैं मीचि आहे ॥ ३० ॥ त्याप्रमाणें अर्जुना, जीपासून ही सृष्टि झाली आहे, ती प्रकृति आणि सृष्टि यांचा उपसंहार करून, यांना वजा करून, यांना शून्य समजून पाहिलें तर अवशिष्ट तत्त्व **मीच** आहें ॥ ३१ ॥

ज्ञाने. ओवी—**सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुतीं वोंविले । तैसें म्यां जग धरिलें । सबाह्यांभ्यंतरीं ॥ ३२ ॥ (सोन्याचे मणि करून ते सोन्याच्याच तारेंत ओवावे, त्याप्रमाणें हें सर्व जग अंतर्बाह्य मींच व्यापलें आहे) ॥ ३२ ॥**

तात्पर्य—मागील ओवी दोनमध्यें म्हटल्याप्रमाणें एका परमात्मसच्चिदानंद स्वरूपावर प्रिय आणि प्राणेश्वरी हीं दोन रूपें वरीलप्रमाणें रचना झालेली आहेत. एक पर, चेतनस्वरूप ईश्वर, तोच पुरुष, तोच प्रिय व अचेतन स्वरूप माया, तीच प्रकृति, तीच प्राणेश्वरी. जसें आवडीच्या प्रेमभरांत तो परमात्मा प्राणेश्वरी बनून अनेक विश्वरूपानें नटतो, म्हणजे सहज विश्वरचना होते. तसेंच हा बहु होण्याचा विलास नको वाटतें तेव्हां हा झालेला उत्कर्ष ही

रचना पुन्हा संहाररूपानें तो परमात्मा निजस्वरूपीं "आवडीचेनि वेगें। येक येकातें गिळिती अंगें" लीन करतो. 'कीं द्वैताचेनि पांगें। उगळितें आहाती॥' तसेंच पुन्हा आपण एकमय नसावें वाटतांच पुन्हा दोन रूपांनीं होण्याच्या पांगें, इच्छेनें तोच प्रिय आणि प्राणेश्वरी होऊन पुन्हा प्रकट होतो. आतां हीं प्रिय-प्राणेश्वरी रूपें, जीं प्रकृति पुरुषें ह्यांचें साकार स्वरूप कसें अनिर्वचनीय आहे, हें पुढील ओवीनें श्रीज्ञानराज सांगतात. प्रकृति-पुरुषाचें अनिर्वचनीय स्वरूपाचें वर्णन.—

जें एकचि नव्हे एकसरें। दोघां दोनीपण नाहीं पुरें॥
काइ नेणों साकारें। स्वरूपें जियें॥ ४॥

अन्वय—जें येकचि एकसरें नव्हे, दोघां दोनी पण पुरें नाहीं, जिये साकारें स्वरूपें काइ (हें) नेणों.

शब्दार्थ— **जें येकाचि**–जें एकच (आहे) असें म्हणणें, **एकसरें**–एकदम **नव्हे**–होत नाहीं. **दोघां**–तीं दोन (आहेत) हें म्हणावें तर तें, **पुरें नाहीं**–तें पुरतें नाहीं; (म्हणून) **जियें**–जीं, **साकारें**–साकार–आकारास आलेलीं, **स्वरूपें**–सगुण दृश्यरूपें, **काइ**–कशीं (आहेत हें) **नेणों**–(आम्ही) न जाणों, हें कोण जाणें? म्हणून तीं अनिर्वचनीय आहेत.

भावार्थ—हीं दोघें अगदीं एकसारखीं आहेत असेंहि म्हणतां येत नाहीं. तीं दोन म्हणावीं तर पुरीं दोनहि नाहींत. तरी यांचीं साकार स्वरूपें कशीं आहेत, कोण जाणे? तें कांहीं समजत नाहीं.

सुबोधविवरण—एकट्या पुरुषापासून किंवा एकट्या स्त्रीपासून प्रजेची उत्पत्ति होत नाहीं तशी एकट्यापासून जगाची उत्पत्ति होत नाहीं. हीं प्रकृति-पुरुषें दोघें एक नाहींत व भिन्नभिन्नहि नाहींत म्हणून यांचीं साकार स्वरूपें कशीं आहेत तें "**काइ नेणों साकारें स्वरूपें जिये**" कोण जाणें! हें सांगतां येणें कठीण आहे. अशीं हीं दोघें अनीर्वचनीय अनादि आहेत. "प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि" हीं प्रकृति पुरुषें अनादि आहेत, असें समज, अर्जुना ॥ गीता १३-२९ ॥ तसेंच—"तरी पुरुष अनादि आथी। आणि तैंचिलागोनि प्रकृती। सवें सरिसी दिवोराती। जयापरी॥ (ज्ञाने. १३-२९-९६०) कां रूप नोहे वायां। परी रूपा लागली छाया। निकण वाढे धनंजया। कणेसी कोंडा ॥९६१॥ तैसी जाण जवटें (जुळीं)। दोन्ही इयें एकवटें। एकच प्रकृतिपुरुषें प्रकटें।

अनादि सिद्धें ॥९६२॥ जणुं काय जुळीं असल्यासारखीं हीं दोन्ही प्रकृतिपुरुषें एकत्र अनादि सिद्ध म्हणजे यांचा आदि, आरंभ केव्हांचा हें सांगतां येत नाहीं असा हा सिद्धान्तच आहे. कारण अभिन्न म्हणणें किंवा भिन्न म्हणणें हें संभवत नाहीं, हें ओंवीच्या प्रथम अर्धानें दाखविलें. भिन्नाभिन्न हे विरुद्ध धर्म एका ठिकाणीं राहात नाहींत, म्हणून कानांवर हात ठेवून यांचीं स्वरूपें कशीं आहेत, कोण जाणें ? हें ओंवीच्या उत्तरार्धानें सांगून महाराजांनीं हें ध्वनित केलें कीं, परमात्म्यावरती हीं प्रकृतिपुरुषांचीं स्वरूपें अधिष्ठित असून अनिर्वचनीय आहेत ! तेव्हां यांचीं साकार स्वरूपें कशीं आहेत, कोण जाणे ? एका पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो तो त्या मूळ पदार्थाहून भिन्न नसतो, तद्रूपच असतो. अधिष्ठित पदार्थ हा अधिष्ठानाहून निराळा नसतो, तद्रूपच असतो, हा सिद्धान्त आहे. " सत् एव सौम्य, इदम् अग्रे आसीत्, एकेन मृत् पिण्डेन सर्वं मृन्मयं भवति, " या श्रुतिवचनानुरूप परमात्म्यावरती ही प्रकृतिपुरुषें अधिष्ठित, आभासरूप असून अनिर्वचनीय आहेत. जो पदार्थ **सत्** सत्य म्हणतां येत नाहीं, व **असत्**, असत्य म्हणतां येत नाहीं, जो खराहि म्हणतां येत नाहीं, खोटाहि म्हणतां येत नाहीं; तसेंच **सदसत्** (सत्, असत्) सुद्धां म्हणतां येत नाहीं, त्यास **अनिर्वचनीय** म्हणतात. रात्रींच्या वेळीं पूर्ण काळोख नसतो व पूर्ण उजेडहि नसतो; अशा साधारण अंधुक स्थितींत एखादी पडलेली काळसर लांबट चिंधी किंवा एखादी पाण्याची रेघ असते, त्या ठिकाणीं भासणारा सर्प जर **सत्** म्हणावा तर त्या चिंधीच्या अथवा रेघेच्या ज्ञानानें म्हणजे तिच्या ओळखीनें तो सर्प भास निवृत्त होतो. त्या भ्रमाची बाधा होते, तो मिथ्या, खोटा ठरतो. तो सर्व भ्रम **असत्** ठरतो. पण भ्रमकाळीं तो सर्प **सत्**, सत्य, खरा, प्रत्यक्ष वळवळल्यासारखा प्रतीत होतो म्हणून असत् म्हणतां येत नाहीं, कारण असत् म्हणजे अभाव. ज्याची उत्पत्ति झालेली व अस्तित्व असलेलें कधींच नसतें, तो कल्पित, कल्पना केलेला पदार्थ असतो. सशाचें शिंग, (शशविषाणं,) वंध्यापुत्र, खपुष्प, गंधर्वनगरी, बागुलबुवा अशी अभावरूपपदार्थांचीं उदाहरणें शास्त्रांत आढळतात. त्याप्रमाणें हा प्रत्यक्ष भासणारा सर्प असत् अभावरूप म्हणतां येत नाहीं. **सदसत्**–सत् आणि असत् हे दोन्ही भाव एकमेकांशीं विरुद्ध आहेत. एकच पदार्थ एकाच वेळीं तो सत् म्हणजे तो आतां आहे व असत् म्हणजे तो आतां नाहीं, असें ते विरुद्ध धर्म आहेत, म्हणून ते एके ठिकाणीं राहात नाहींत. त्यांचें वर्णन कोणत्याहि वचनांनीं सिद्ध होत नाहीं, म्हणून शास्त्रकारांनीं त्यास **अनिर्वचनीय** म्हटलें आहे. तेच श्रीज्ञानेश्वर

महाराजांनीं म्हटलें कीं, त्या प्रकृतिपुरुषांचीं साकार स्वरूपें कशीं आहेत, कोण जाणें ? तीं **अनिर्वचनीय** आहेत. आतां या प्रकृतिपुरुषांची सुखाची आवड कशी आहे, तें पुढील ओवीवरून दिसेल ती ओवी अशी—

कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपणा मिळोनि येकीं ॥
नेदितीचि कवतिकीं । येकपण फुटों ॥ ५ ॥

पदार्थ—**कैसी**–केवढी; **स्वसुखाची आळुकी**–निजसुखाची आवड; **जे**–कीं, **दोनीपणा**–प्रकृति–पुरुष हा द्वैत भाव; **येकीं**–एका परमात्म्याचे ठिकाणीं **मिळोनि**–एकत्र मिळून एकरूप असा असतो. तें **येकपण**–ऐक्य; **कवतिकीं**–कौतुकानें, सहज देखील; **फुटों**–भंगूं; **नेदितीचि**–अगदीं, यत्किंचित्हि दूर होऊं देत नाहींत.

भावार्थ—यांची निजसुखाची आवड किती विलक्षण आहे कीं, (आपलें अधिष्ठान जें मूळ परमात्मस्वरूप त्या स्वरूपावर विलासाकरितां आभासलेला) प्रकृतिपुरुष हा दोनपणा हा द्वैतभाव परमात्मएकपणांत मिसळून आपला एकपणा कौतुकानें मोडूं देत नाहींत, हें मोठें आश्चर्य होय !

आतां हीं प्रकृतिपुरुष दोघें, यांचेपासून कितीहि जगतादि दृश्य उत्पन्न झालें, तरी तीं त्यांचें स्वरूप विघडूं देत नाहींत, हें पुढील ओंवीवरून दिसेलः—

हा ठाववरी वियोगभेडें । जें बाळ जगायेवढें ॥
वियालीं परी न मोडे । दोघुलेंपण ॥ ६ ॥

पदार्थ—(हीं दोघें) हा **ठाववरी**– (ह्या ठिकाणापर्यंत) म्हणजे येथपर्यंत म्हणजे इतकें कीं, **वियोगभेडें**–वियोगाच्या **भयानें** जें **जगायेवढें बाळ** म्हणजे हें विश्वाचें एवढें दृश्य, अनंतकोटी ब्रह्मांडरूप मूल, **वियालीं परी**–प्रसवलीं, तरी पण **दोघुलेंपण**–आपलें दोघांमधील स्त्री-पुरुष प्रेम, **न मोडें**–विघडूं देत नाहींत.

भावार्थ—अनंत विश्वाचा रचनारूप हा (बाळ) विकार दिसूं लागल्याची अशी ही (हा ठाववरी) एथपर्यंतची अवस्था त्यांच्या एकपणांत (प्रसवली) द्वैत निर्माण करण्यासारखी जरी दिसली आणि त्यामुळें त्यांच्यांत असा हा वियोग उत्पन्न होऊन तीं एकमेकांपासून अलग होण्याचें भयहि वाटलें, तरीहि त्यायोगानें त्यांच्यांतलें स्त्री-पुरुष प्रेम, तो त्या उभयतांचा ऐक्यभाव यत्किंचित् कमी होत नाहीं.

सुबोधविवरण—" **शिवशक्त्यात्मकं जगत्**"–अखिल चराचर विश्व हें **प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, माया–परमात्मा रूप आहे. ह्याचेखेरीज तिसरा पदार्थ नाहीं**

परमात्मा आपणच आपल्या विलासाकरितां प्रकृतिपुरुष होऊन अनंतविश्वरूप (एकोऽहं बहु स्याम्) बहुपणाच्या सोहळ्यांतल्या त्या परमानंदाचा (कारण द्वैताबांचून भोग नाहीं,) तो भोग व्हावा म्हणून आपलेंच आपल्या ठिकाणीं द्वितीयत्व कल्पितो. "**मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना**" (गीता ९–४) । **मया अव्यक्तमूर्तिना**–मी माझ्या सूक्ष्म रूपानें (**इदं सर्वं जगत् ततम्-व्याप्तम्**) हें सर्व जग ओतप्रोत व्यापून भरलेलें आहे कीं, " बीजचि झालें तरु । कीं भांगाराचि (सुवर्ण) अलंकारु । तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥ (ज्ञाने. ९–४–६५). असें हें शिवशक्तिपरमात्मस्वरूप प्रकृतिपुरुषजोडपें तिसरेपणाचें आपल्या ठिकाणीं वारेंहि दिसूं देत नाहीं, तें पुढील ओंवींत देत आहेत.

आपुलिये आंगीं संसारा । देखलिया चराचरा ॥
परि नेदितीची तिसरा । झोंक लागों ॥ ७ ॥

पदार्थ—**आपुलिये आंगीं**–आपल्या ठिकाणीं; **चराचरा संसारा**–चेतन अचेतन जग; **देखिलिया**–दिसलें, भासलें; **तरी तिसरा झोंक**–तथापि जग हें तिसरें वारें, स्पर्श; **लागों नेदितीची**–लागूंच देत नाहींत.

भावार्थ—या प्रकृतिपुरुषजोडप्यानें अखिल जगत् आपल्या योगानें उत्पन्न झालें असें पाहिलें तरी जगत् म्हणून तिसरा पदार्थ आपल्याहून वेगळा आहे, असा वारा सुद्धां तीं आपल्याला लागूं देत नाहींत. आपण जणूं दोघेंच्या दोघेंच काय तीं. ॥ ७ ॥

या प्रकृतिपुरुषांस एक परमात्म्याची सत्ता अधिष्ठान आहे, हें आतां दाखवीत आहेत.

जयां येक सत्तेचें बैसणें । दोघां येका प्रकाशाचें लेणें ॥
जे अनादी येकपणें । नांदती दोघें ॥ ८ ॥

पदार्थ—**जयां दोघां**–ज्या दोघांना, (ज्या प्रकृतिपुरुषांना); **येक सत्तेचें**–एक सत् ब्रह्माचें; **बैसणें**–बसण्याचें ठिकाण, बैठक, स्थान; (जयां दोघां) **येका प्रकाशाचें**–एकच ज्ञानस्वरूप, चित्स्वरूप ब्रह्माचें; **लेणें**–अलंकार, शोभा; **जे दोघें**–जीं प्रकृतिपुरुष दोघेंजण; **येकपणें**–ऐक्यभावानें; **अनादि**–(अन् + आदि) नाहीं आरंभ ज्यांस अशीं, ज्यांचा आदि, आरंभ, उत्पत्ति, जन्म (केव्हांचा तें) **अन्**–(सांगतां येत) नाहीं; **नांदती**–नांदतात, एकत्र राहतात, असतात.

सविवरण भावार्थ—त्या दोघां शिवशक्तिरूप प्रकृतिपुरुषजोडप्याचें एक सत् ब्रह्मच बसण्याचें–नित्य राहण्याचें ठिकाण आहे. तीं दोघें एकाच चित्स्वरूप, ज्ञानमय, परमात्मरूप सुवर्णाचें लेणें–अनंतकोटिब्रह्मांडरचनारूप सतेज अलंकार आहेत. हीं अशीं अनादिकालापासून आपलें अधिष्ठान जें अक्षरपरब्रह्म त्याशीं अगदीं एकरूप होऊन असतात.

ह्या दोघाचा भेद दाखविणारें द्वैत कधींच निर्माण होत नाहीं, हें श्रीज्ञानराज सांगत आहेत—

भेदु लाजौनि आवडी । येकरसीं देत बुडी ॥
जो भोगणया ठाव काढी । द्वैताचा जेथें ॥ ९ ॥

अन्वय—जो भेदु जेथें द्वैताचा भोगणया ठाव काढी, तो त्या येकरसीं आवडी देखोनि लाजौनि बुडी देत.

पदार्थ—**जो भेदु**–हा द्वैतभाव, हें अनंतकोटिब्रह्मांडमय जगत्रूपी द्वैत; **जेथें**–ज्या परमात्म्याशीं एकरूप असणारें प्रकृतिपुरुषजोडपें त्यांच्यामध्यें; **द्वैताचा भोगणया**–द्वैतभावाच्या सुखाचा; **ठाव काढी**–शोध काढूं लागला असतांना तो भेद; **त्या एकरसीं**–त्या (जोडप्याच्या) ऐक्यभावांतली; **आवडी देखोनि**–तो प्रेमरस पाहून (त्या त्यांच्या ऐक्यांत द्वैत नाहीं पाहून, तीं दोघें निराळीं नसल्यांची पाहून); **लाजौनि**–लाज वाटून; **बुडी देत**–(त्यांच्यांत आपणहि) नाहींसा होतो.

सविवरण भावार्थ—नित्य परमात्ममय हें अधिष्ठानरूप असणारें शिवशक्तिप्रकृतिपुरुषजोडपें त्यांच्या त्या एकरसांत, ऐक्यभावांत अनंतकोटिब्रह्मांडरूप विश्वरचनेचा कितीहि भेद उठला, तरी तो भेदाचा देखावा कसा आभास आहे हें **" सदेव सोम्य, इदमग्रे आसीत् एकमेवाद्वितीयं "** या श्रुतिवचनानुरूप **इदं**–हें दृश्य जगत्, **अग्रे**–सृष्टिपूर्वकालीं, **सद्एव**–सत्, नित्य असणारें ब्रह्मच होतें. तें **एकं एव**–एकच एक, **अद्वितीयं**–द्वितीय जें त्यारहित, एकच परब्रह्म, परमात्मस्वरूप होतें. तेथें हा शिवशक्तिप्रकृतिपुरुषभाव एकरूप, एकरस असल्यानें विश्वरचनेचा अनेकपणाचा हा भेद तोहि तेथें लाजल्यासारखा होऊन आपण होऊनच अभेदानें त्यांच्यांत समरस होऊन जातो.

याप्रमाणें शिवशक्ति, त्यांचें कार्यभूत जगत् यांच्या परमात्ममय स्वरूपाचा निर्णय ठरवून एका परमात्मस्वरूपावरच देवदेवी, शिवशक्ति, प्रकृतिपुरुष हे भाव कसे सापेक्ष आहेत, तें येथें श्रीज्ञानेश्वरमहाराज दाखवीत आहेत:—

जेणें देवें संपूर्ण देवी । जियेविण कांहीं ना तो गोसावी ॥
किंबहुना येकोपजीवी । येकयेकांची ॥ १० ॥

पदार्थ—**जेणें देवें**–ज्या देवाच्या, शिवाच्यामुळें; (ती) **देवी**–ती शक्ति; **संपूर्ण**–पूर्णपणें आहे; **जियेविण**–ज्या शक्तिदेवीवांचून; **तो गोसावी**–तो स्वामी; **कांहींना**–कांहींच नव्हे; **किंबहुना**–एवढेंच नव्हे तर (तीं दोघें) **येकयेकाची**–एकमेकांची, **येकोपजीवी**–एक दुसऱ्यावर अवलंबून असलेलीं, आधारलेलीं आहेत.

सविवरण भावार्थ—या शिवामुळें शक्तीला संपूर्ण देवीपणा, मालकीण-बाईपणा आलेला असतो. तसेंच ज्या शक्तिदेवीवांचून तो गोसावी, स्वामी, मालक कांहींच नाहीं. ज्याचें अस्तित्वच नाहीं, नसतेंच, इतकेंच नव्हे तर तीं एकमेक परस्परांवरच जणूं जगतात. या परस्परांच्या अस्तित्वामुळेंच एकमेकांना **शिवशक्ति** नांवें आहेत. एक नसेल तर दुसरा नाहींच. थोडक्यांत हेंच कीं, परमात्मस्वरूपावर हे दोन्ही भाव एकमेकांसापेक्ष असे परस्परावलंबी दिसतात. **"तरी केवळ हे सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता । प्रकृतीतें समस्तां । क्रिया नाम ॥"** ज्ञाने. १३–१९–९६६ ॥

या दोघांमधील ऐक्यभाव किती आहे तें खालील दोन ओव्यांनीं दाखवतात–

कैसा मेळु आला गोडिये । दोघे न माती जगीं इयें ॥
कीं परमाणुहि माजीं उवायें । मांडलीं आहातीं ॥ ११ ॥
जिहीं येकयेकावीण । न कीजे तृणाचेंहि निर्माण ॥
जिये दोघें जिऊं प्राण । जियां दोघां ॥ १२ ॥

पदार्थ—**कैसा**–किती म्हणून सांगावें; **गोडिये**–गोडीचें, प्रेमाचें; **मेळू**–मेळ, मेलन, मिळवणें, ऐक्य; **आला**–असल्याचें; **दोघें इयें जगीं**–दोघेंहि तीं या जगांत; **न माती**–ओतप्रोत असूनहि सामावत नाहींत; **कीं**–इतकीं कीं, **परमाणुहि माजीं**–अणूचा सहावा भाग त्यांतसुद्धां; **उवाये**–आनंदानें, सहजच; **मांडलीं आहातीं**–ओतप्रोत भरलेलीं असतात. ॥ ११ ॥

पदार्थ—**जिहीं**–ज्यांनीं (दोघांनीं), **एकएकावीण**–एकमेकांवांचून; **तृणाचेंहि**–गवताच्या काडीचेंसुद्धां; **निर्माण**–निर्मिति, उत्पत्ति; **न कीजे**–केली जात नाहीं; **जिये दोघें**–जीं दोघें, एकमेक; **जियां दोघां**–ज्या दोघांजणांस, एकमेकांस; **जिऊं प्राण (असती)**–जीव कीं प्राण असतात, एकमेकांवर जिवाइतकें अति प्रेम करीत असतात. ॥ १२ ॥

भावार्थ—या शिवशक्तिजोडप्याच्या प्रेमाचें ऐक्य, जिवलगपणा किती म्हणून सांगावा ? हीं दोघें या ब्रह्मांडमय विश्वांत सामावत नाहींत, इतकीं कीं, अणुरेणूंमध्येंसुद्धां जणूं आनंदानें, सहज अशीं ओतप्रोत असलेलीं दिसतात, अगदीं सख्यभावानें नांदत असतात ॥ ११ ॥ ज्या एकमेकांवांचून गवताच्या काडीचीहि उत्पत्ति केली जात नाहीं; इतकीं हीं दोघें एकमेकांस जीव कीं प्राण आहेत.॥१२॥ सर्व विश्वांत या दोघां प्रकृतिपुरुषांशिवाय एकहि पदार्थ नाहीं.

आतां प्रकृतीकडे कोणतें काम तें सांगतातः—

घरवातें मोटकीं दोघें । जैं गोसावी सेजे रिघे ॥
तैं दंपत्यपणें जागे । स्वामिणी जे ॥ १३ ॥

पदार्थ—(तीं) **घरवातें**- (सर्व) घरादारांत, (विश्वरूप घरांत); **मोटकीं**–मोजकीं, नेमकीं; **दोघें**–दोघेंजण; **जैं**–जेव्हां; **गोसावी**–स्वामी, धनी, मालक; **सेजे**–अंथरुणावर, शयनासाठीं; (**सेज**–शयन); **रिघे**–निघतो, जातो; **तैं**–तेव्हां, **दंपत्यपणें**–कुटुंबपणानें; **जे स्वामिणी**–जी घरधनीण; **जागे**–जागी असते.

भावार्थ—या विश्वरूप घरादारांत मोजकीं दोघेंच–प्रकृतिपुरुषेंच असतात. जेव्हां शिवपुरुषास बहुरूप होण्याची इच्छा होते तेव्हां त्यास निजस्वरूपाची विस्मृति होऊनच तो झोंपतो. त्या वेळीं घरमालकीणमायेस कुटुंबपणानें जागें राहावें लागतें.

सुबोधविवरण—तो एकच शिव आपल्या बहुपणाच्या शक्तिरूप सोहळ्यानें नटतो, तेव्हां मूळ शिवस्वरूपाचें तिरोधान होणें, तें आच्छादन पावणें, हें त्याचें (**सेजे रिघणें**) झोंपीं जाणें होय. तेव्हां जो विश्वपणाचा अनेकपणा, हें त्या **स्वामिणी**शक्तीचें जागणें होय. वास्तविक जें **सत्**–नित्य असणेंपण, तेंच **चित्**–नित्यज्ञप्तिपण, जें **सत्**–तेंच शिवस्वरूप, जें **चित्**–तेंच शक्तिस्वरूप होय. हें जसा समुद्राचा जलसंचय एकच असून जेव्हां लाटा उसळतात, तेव्हां त्याच जलसंचयास काय समुद्र खवळला आहे, असें म्हणतात. वास्तविक अक्षरब्रह्म म्हणजेच पाणी. हेंच शिवरूप होऊन त्या समुद्रांत शक्तिरूप अनंत लाटांनीं, विश्वरूप अनंत तुषारांनीं, एकपणानेंच असतें. त्याला हा विकार होतच नसतो. तसेंच कितीहि लाटारूप विश्वरचना झाली तरी ती त्या अफाट ब्रह्मरूप समुद्रावरील त्या एका भागावर कोठेंतरी होते. हें सर्व अनंतब्रह्मांडरूप विश्व माझा एक अंश होय, असें भगवंत म्हणतात. मूळअधिष्ठान, अक्षरब्रह्म हें निर्विकार जल होय. तेंच धनी होऊन समुद्र होतें. हा जो स्वरूपाचा विसर तेंच त्याचें झोंपणें होय. या वेळीं ही विश्वरूप होण्याची जी लाट तीच ही शक्ति घरधनीण जागत राहते.

वरील ओवींतील या घरादाराचा म्हणजे परमात्मस्वरूपसमुद्रावर उसळलेल्या लाटारूप जगताचा नाश केव्हां होतो, तें सांगतातः—

जियां दोघांमाजीं येकादें। विपायें उमजलें होय निदे ॥
तरी घरवात गिळूनि नुसधें। कांहीं ना कीं ॥ १४ ॥

पदार्थ—**जियां दोघांमाजीं**–ज्या ह्या दोघांमधील; **येकादें**–एकजण; **विपायें**–कदाचित्; **निदे**—निद्रेतून; **उमजलें होय**–जागें झालेलें होतें; **तरी**–मग तर; **घरवात**–घरदार, विश्वरूपलाटा जो संसार; **गिळूनि**–गट्ट करून, संहार होऊन; **नुसधें**–केवळ, जलमय; **कांहीं ना कीं**–दुसरें कांहींच नसतें, केवळ अक्षरब्रह्म.

भावार्थ—ज्या ह्या दोघांपैकीं शिवशक्तिरूप विश्वघरधनी, धनीण ह्यांपैकीं एक जरी झोपेंतून–स्वरूपनिद्रेपासून जागृतीस–निजस्वरूपस्थितीस आलें, तर सर्व विश्वसंसार नाहींसा होऊन केवळ हें सत्–चित्, शिवशक्ति भावरहित केवळ अक्षर निर्विकार ब्रह्मस्वरूप मात्र असतें, दुसरें कांहींहि नसतें.

ह्या शिवशक्तिस्वरूपाची आटणी झाली तर कांहींच राहणार नाहीं असा शून्यवादप्रसंग येईल तो न यावा म्हणून पुढील ओवींत श्रीज्ञानराज सांगतातः—

दोहों अंगाचिये आटणीं । गिंवसीत आहाती येकपणीं ॥
जाली भेदाचिये वाहाणी । अधार्धीं जियें ॥ १५ ॥

पदार्थ—**दोहों**–दोन्हीं; **अंगाचिये**–आपल्या अंगाची, निज दोन रूपांची; **आटणी**–एकत्र मिळवणी, लय; **येकपणीं**–एकपणांत, मूळ स्वरूपांत, अधिष्ठानांत; **गिंवसीत आहाती**–शोधीत असतात; **भेदाचिया**–द्वैताच्या, दोन होण्याच्या, विलासाच्या; **वाहाणीं**–प्रवाहांत, उभारणींत; **जियें**–तीं दोघें; **अधार्धीं**–दोन अर्धें, शिवशक्ति; **जाली**–होतात.

भावार्थ—शिवशक्ति ही आपल्या दोन्ही रूपांचा लय **एकपण** जें **मूळ, अधिष्ठान**, अक्षरब्रह्म त्यांत करतात, समरस होतात व द्वैताविलासाकरितां पुन्हा अर्धीं अर्धीं होतात.

सुबोधविवरण—जसें एकाच सोन्याच्या पत्र्यावर ठशांत दाबून उमटवलेलीं शिवपार्वतीचीं रूपें त्याच पत्र्यांत ठोकून पुन्हा सपाट केलीं जातात, तेव्हां त्या दोघांच्या रूपांची आटणी, त्यांचा तो लय शून्य न होतां एक **अधिष्ठान सुवर्ण**-पत्रामयच होतो. पुन्हा भेदव्यवहाराचा विलास झाला तर तेंच **मूळसुवर्णरूप** दोन ठशांनीं अर्ध, अर्ध, असे दोन विभाग झाल्याचें दिसतें.

हीं दोघें प्रकृतिपुरुषें एकमेकांचें विषय व विषयी भोग्य व भोक्ता, कशीं तें सांगतात—

विषो येकमेकांचीं जियें । जियें एकमेकांचीं विषइयें ॥
जियें हीं दोघें सुखिये । जियें दोघें ॥ १६ ॥

पदार्थ—**जियें एकमेकांचीं विषो**–जीं एकमेकांची, **विषो**–विषय,प्रकाश; **जियें एकमेकांचीं विषइयें**; **विषयीं**–जीं एकमेकांचीं विषयीं, प्रकाशक; **जियें**–जीं; **हीं दोघें**–हीं प्रकृतिपुरुषें; **जियें दोघें**– ज्या दोघांमुळें; **सुखिये (असतीं)**– सुखी, आनंदी असतात.

सविवरण भावार्थ—जो पदार्थ दुसऱ्यानें प्रकाशित केला जातो, तो विषय. जो दुसऱ्याला प्रकाशित करतो, तो विषयी. जसें प्रकाश हा विषय व दीप, सूर्य हे प्रकाशक, विषयी. तसें जीं प्रकृतिपुरुषें एकमेकांची एकमेकांस विषय म्हणजे प्रकाश होतात व तींच एकमेकांची एकमेकांस प्रकाशक होतात. दीप किंवा तेज व तेजाचा प्रकाश ते दिसण्यांत दोन, पण दोन्ही एकच. ते एकमेक एकमेकांचें एकरूप जसे प्रकाश व प्रकाशक तशींच हीं प्रकृतिपुरुषें एकमेक एकमेकांहून दिसण्यांत भिन्न भासलीं तथापि तीं दोन्ही एकमेकांशीं एकरूपच. तशींच हीं दोघें एकमेक सुखमय, आनंदरूप अशीं एकमेकांत मिळून असतात; जसें पाणी व पाण्यावरील लाटा हीं एकमेक एकमेकांशीं एकरूप सुखमय असतात, तशींच ही शिवशक्ति, प्रकृतिपुरुषें होत. तींच स्त्रीपुरुष होतात तेव्हां त्या स्त्रीपुरुषाचें व जगताचें वास्तविक स्वरूप काय तें आतां यापुढें श्रीज्ञानेश्वरमहाराज स्पष्ट करून सांगत आहेतः—

स्त्रीपुरुष नामभेदें । शिवपण येकलें नांदे ॥
जग सगळें आधार्धें– । पणें जिहीं ॥ १७ ॥

पदार्थ—**शिवपण येकलें**–एकच शिवपरमात्मा; **स्त्रीपुरुष या नामभेदें नांदे**–आपणच स्त्री व पुरुष, शिवशक्ति, प्रकृतिपुरुष अशा भिन्न नांवांनीं नांदतो, वेष धारण करतो; **जिहीं अधार्धेपणें**–ज्यांच्या अर्ध अर्ध भागानें; **सगळें जग**– सर्व जग, (व्यापलें आहे).

सविवरण भावार्थ—एकलें शिवस्वरूपच स्त्री व पुरुष नांवानें आपणच नांदत असतें, विलास करतें, नटतें. सर्व जग, अखिल विश्व, अनंत ब्रह्मांडमय असलेलें त्यांत हीं स्त्रीपुरुषें आपल्या अर्ध्या अर्ध्या भागानें ओतप्रोत भरलेलीं जीं

दिसतात, तें सर्व शिवपरब्रह्म आपणच एकटें एकच **एकमेव अद्वितीयत्वानें** असतें. तें पाणी जरी समुद्र, लाट–तीहि एक भलीमोठी समुद्रभर दिसणारी अशी जिच्या पोटांत असंख्य लहान लहान लाटा, त्यांच्यांतून उसळणारे असंख्य तुषार, बुडबुडे इतक्या भिन्न भिन्न रूपांनीं, वेषानें, विलासानें **मी एकच, त्या एकानें अनेक, बहुत व्हावें** 'एकोऽहं बहु स्यां' या श्रुतिवचनानें दिसलें, तरी तीच श्रुति सांगते कीं तें जें अनेकपण तें त्या एका पाण्यांतलेंच— "**एकमेवाद्वितीयं ब्रह्म, नेह नानास्ति किंचन**" एकच एक दुसरें कांहींहि नाहीं तें ब्रह्म, **न इह नाना अस्ति किंचन**–एथें या ब्रह्मामध्यें जरी अनेकपणाचा सोहळ्याचा, विलासाचा, वेष धारण केल्याचा विकार दिसला, अनंत जगें, शिवशक्ति, प्रकृतिपुरुष, हे असे अनेक भाव दिसले तरी तें सर्व एक **शिवपरब्रह्मच** होय.

प्रत्यक्ष द्वैताचा प्रत्यय येत असतांनाहि अद्वैत सिद्धि कशी हें श्रीज्ञानेश्वर-महाराज व्यावहारिक दृष्टान्तानें दोन ओव्यांनीं आतां दाखवीत आहेत:—

दो दांडीं येकि श्रुति । दोहों फुलीं येकि दृति ॥
दोहों दिवीं दीप्ति । येकीचि जेवीं ॥ १८ ॥
दो ओठीं येकी गोठी । दो डोळां येकि दिठी ॥
तेवीं दोघीं जिहीं सृष्टी । येकीच जेवीं ॥ १९ ॥

पदार्थ—दो–दोन; दांडीं–टिपऱ्यांत; येकि श्रुति–एकच ध्वनि, नाद निघतो; दोहों–दोन्ही; फुलीं–फुलांमध्यें; येकि–एकच; दृति–सुवास, सुगंध सुटतो; जेवीं–ज्याप्रमाणें; दोहों दिवीं दीप्ति–दोन्ही दिव्यांतला प्रकाश; येकीचि–एकच एक दिसतो; जेवीं दो ओठीं येकी गोठी–जसें दोन्ही ओठांतून एकच गोष्ट, एकच शब्द ऐकूं येतो; दों डोळां येकि दिठीं–दोन्ही डोळ्यांतून एकच दृष्टि, नजर असते; तेवीं–त्याचप्रमाणें; जिहीं दोघीं (ही सृष्टि) ज्या दोघांनीं ज्या दोन प्रकृतिपुरुषांनीं व्यापलेली ती; येकीच–एकानेंच,एका परब्रह्मानेंच ॥१८–१९॥

भावार्थ—दोनपणानें दोन निरनिराळ्या दिसणाऱ्या टिपऱ्या असल्या तरी त्या दोहोंचा नाद, आवाज एकच निघतो; दोन एका जातीचीं फुलें निरनिराळीं असलीं तरी त्या दोहोंचा सुवास एकच. ज्याप्रमाणें दोन दिव्यांचा प्रकाश एकच, दोन ओठांतून निघणारा शब्द एकच, दोन डोळे पण दृष्टि, नजर एकच ज्या-प्रमाणें, तसेंच दोघां स्त्री-पुरुष अशा शिवशक्ति, सत्‌चित् रूपानें या अनेकविध सृष्टींत एकच शिवपरमात्मा ओतप्रोत भरून आहे.

आतां हीं प्रकृतिपुरुषें द्वैत भाव दाखवूनसुद्धां आपलें एकपणाचें सुख कसें अनुभवीत असतात तें सांगतातः—

दाऊनि दोनीपण । येकरसाचें आरोगण ।
करीत आहे मेहूण । अनादि जे ॥ २० ॥

पदार्थ–**जे अनादि मेहूण**– जें अनादि (अन् नाहीं, आदि–आरंभ, उत्पत्ति ज्यांस) उत्पत्तिरहित, (स्वप्न, मृगजळाप्रमाणें) अनादिकालचें असें; **मेहूण**–हें जोडपें; **दोनीपण**–दोन रूपें; **दाऊनि**–प्रकट करूनहि; **येकरसाचें**–अखंड येकपणाचें; **आरोगण**–भोजनसुख, भोग, आनंदभोग; **करीत आहे**–उपभोगीत आहे.

भावार्थ–असें हें अनादिकालचें दंपत्य, तें जोडपें दोन असल्याचा द्वैत–भास दाखवीत असलें, तरीसुद्धां तीं त्यांचें मूळ अधिष्ठान अशा त्या परमात्म, अखंड, एकमेव अद्वितीय परमानंदाचें सुख नित्य अनुभवून असतात, त्या परमात्म-स्वरूपाशीं नित्य तादात्म्यानें असतात ॥ २० ॥

आतां हीं एकमेक एकमेकांस साहाय्यभूत कशीं असतात, तें पाहाः—

जे स्वामीचिया सत्ता– । वीण असो नेणें पतिव्रता
जियेवीण सर्व कर्ता । कांहीं ना जो ॥ २१ ॥

अन्वय––जे पतिव्रता स्वामीचिया सत्ताविण असो नेणें; जो (स्वामी) जियेवीण सर्वकर्ता कांहीं ना; **पदार्थ**–जे–जी; **पतिव्रता**–शक्तिदेवी, पतिरूप असणारी; **स्वामीचिया**–स्वामी, धनी, मालक, पति,त्याच्या; **सत्तावीण**–सत्तेवांचून, सांनिध्यावांचून, अस्तित्वावांचून; **असो नेणें**–असणें, अस्तित्व माहीत नाहीं; **जो**–तो स्वामी, पति; **जियेवीण**–तिच्यावांचून; **सर्वकर्ता**–सर्वकर्तेपणा, कर्तृत्व; **कांहीं ना**– कांहींच नाहीं.

सविवरण भावार्थ–जी पतिरूप असणारी, प्रकृति, शक्तिदेवी, आपल्या पतीच्या, पुरुषाच्या त्या शिवाच्या अस्तित्वावांचून ती स्वतः स्वतंत्रपणें असूं शकत नाहीं. पतीवांचून तिला स्वतःचें अस्तित्व नाहीं, तो तिच्यावांचून सर्व विश्वाचा कर्ता मुळींच होऊं शकत नाहीं; अशीं हीं दोघें एकमेकांस साहाय्यभूत आहेत. जें अक्षर परब्रह्माच्या ठिकाणाचें–सत्‌रूप, जी सत्ता नित्य अस्तित्व, असणेंपणा, तोच पति, स्वामी, शिव तेंच चित्‌रूप, ज्ञान, ज्ञप्ति, चित्कला ह्या नांवांनीं जी ओळखली जाते, तीच शक्ति, पत्नी, स्त्री स्वामिनी, देवी असें कितीहि रूपक केलेलें असलें, तरी तें मूळ अक्षर, सत्‌चित्, परब्रह्म आपणच सर्वमय

होऊन असतें. हा मुख्य सिद्धान्त मुमुक्षूंच्या चित्तावर नीट दृढ व्हावा, त्या सूक्ष्म-स्वरूपाचें आकलन व्हावें, म्हणून श्रीज्ञानराज अनेक दृष्टान्तांनीं तोच तो मुद्दा **अभ्यास**पूर्वक म्हणजे वारंवार तेंच दृढ करीत राहणें– आनंदमयो अभ्यासात् ॥ १।१।१२ ॥ यः भगवान् व्याससूत्राप्रमाणें इथें **अभ्यासात्**–वारंवार अशा अर्थी प्रयोग केलेला आहे; कीं, श्रुतींनीं तें परब्रह्म " **आनंदघन** " असें **वारंवार** म्हटलें आहे. त्याप्रमाणें महाराज आतां पुढें सांगत आहेत कीं पुरुष, जो भ्रतार त्यावांचून प्रकृति जी स्त्री तिला स्वतंत्र सत्ता किंवा ज्ञान नसतें, तर सदैव त्या दोघांचें अतिशयच ऐक्य असतें:—

जें कीं भातारायें दिसणें । भातारुचि जियेचें असणें ॥
नेणिजती दोघेंजणें । निवडूं जियें ॥ २२ ॥

पदार्थ—**कीं**–कारण; **जें भातारायें**–भातार, भ्रतार, भर्ता, नवरा, त्याचें जें; **दिसणें**–दृश्यस्वरूप, ज्ञान, चित् तें; **भातारुचि**–तो भ्रतारच; **जियेचें**–जिचें, **असणें**–अस्तित्व, असणेंपण, नित्यपण, सत्पण, सत्ता, सत्स्वरूप, ब्रह्म; **नेणिजती**–जाणलीं, ओळखलीं जात नाहींत, कळत नाहीं; **जियें दोघेंजणें**–जीं दोघेंहि, हा नवरा, ही बायको, हा पुरुष, ही प्रकृति, हा शिव, ही शक्ति, असें; **निवडूं**–निवडून दाखविणें; **जियें दोघेंजणें निवडूं नेणिजती**–जीं दोघें भिन्न भिन्न करून दाखविणें हें कळत नाहीं.

भावार्थ—असें कीं, जें पुरुषाचें किंवा भ्रताराचे ठिकाणचें **दिसणें** म्हणजे त्यांचें जें मूळ परब्रह्म, ज्ञानस्वरूप, व जें त्याचें **असणें** म्हणजे त्याचें जें सत्तारूप, परब्रह्म सत्स्वरूप तेंच ज्ञान व सत्तास्वरूप स्त्रीचें, त्या प्रकृतीचें. भ्रतार जो पुरुष त्याच्याहून निराळी सत्ता किंवा निराळें ज्ञान त्याच्या प्रकृतींत नाहीं, म्हणून त्या दोघांमधील प्रकृति कोणची आणि पुरुष कोणचा हें निवडणें, तें निरखणें कठीण म्हणून कळत नाहीं ॥ २२ ॥

असें त्यांच्या त्या स्वरूपाचें अभिन्नत्व कसें हें दृष्टान्तांनीं आतां सिद्ध करून दाखवितातः—

गोडी आणि गुळु । कापुरु आणि परिमळु ॥
निवडुं जातां पांगळु । निवाडु होये ॥ २३ ॥

पदार्थ—**गुळु आणि गोडी**–गूळ आणि त्या गुळांतील मधुरपणा, (तसेंच) **कापुर**–कापूर, **आणि परिमळु**–आणि त्यांतला परिमळ, सुगंध, हीं **निवडुं**

जातां–निराळें करूं लागल्यास, **निवाडु**–तो निवाडा, निर्धार; **पांगुळु होये**–पांगळा, अनिश्चित, होतो.

भावार्थ—गूळ आणि त्यांतली गोडी अथवा कापूर व त्यांतील सुगंध निरनिराळें करूं लागल्यास तो प्रयत्न अनिश्चित, अर्धवट, व्यर्थ ठरेल.

गुळामध्यें गोडी ओतप्रोत भरलेली असते. कापरांत सुगंध ओतप्रोत असतो. पण सूक्ष्म गोडीमध्यें स्थूलभाव गूळ केव्हांच नसतो. सुगंधामध्यें कापूर हा स्थूलभाव कधींच असत नाहीं. सर्व गुळामध्यें गोडीच गोडी त्याच्या कणाकणांमधून भरलेली असते; तसेंच अति सूक्ष्म परमात्म स्वरूप सर्व स्थूल विश्वांत भरून राहिलेलें आहे, त्यांत विश्व केव्हांहि नाहींच !

समग्र दीप्ति घेतां । जेविं दीपुचि ये हातां ॥
तेविं जियेचिया तत्त्वतां । सिवुचि लाभे ॥ २४ ॥

पदार्थ—**समग्र दीप्ति**–सर्वच प्रकाश; **घेतां**–घेऊं गेलें असतां; **जेविं**–जसा; **दीपुचि**–दिवाच, दिव्याची ज्योत; **हातां ये**–हातीं येतो, हातांत येते; **तेविं**–तसें; **जियेचिया तत्त्वतां**–जिच्या, ज्या शक्तीच्या मूळ स्वरूपाचा निश्चय करूं जातां; **सिवुचि**–अधिष्ठान शिवस्वरूपच; **लाभे**–प्राप्त होतें.

भावार्थ—दिव्याचा सर्व प्रकाश घेऊं गेल्यास जशी त्याची ज्योतच हातीं येते, त्याप्रमाणें शक्तीच्या तत्त्वाचा म्हणजे मूळ स्वरूपाचा विचार करूं गेल्यास तें मूळ अधिष्ठान, शिवस्वरूपच प्राप्त होतें.

त्यांच्या स्वरूपांतील हा अभेद आणखी दोन ओव्यांनीं स्पष्ट करीत आहेतः—

जैसी सूर्यीं मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा ॥
तैसी भेद गिळीत शोभा । येकचि जे ॥ २५ ॥

पदार्थ—**जैसी**–ज्याप्रमाणें; **सूर्यीं**–सूर्याचे ठिकाणीं, सूर्यामध्यें; **प्रभा**–प्रभेमुळें, प्रकाशाच्या योगानें; **मिरवे**–शोभा असते; **प्रभे**–प्रभेला, प्रकाशाला; **सूर्यत्वाचि**–सूर्यपणा, सूर्याचें तेज हेंच; **गाभा**–अंतरंग, आंतील भाग, अधिष्ठान, आधार; **तैसी**–तसेंच; **भेद**–द्वैत, दुजेपणा; **गिळीत**–नाहींसा होऊन; **जे**–जी; **एकचि**–एकच; **शोभा**–स्वरूप, जें एकच परमात्मस्वरूप (काय तें ओतप्रोत असतें).

सविवरण भावार्थ—जशी सूर्याच्या ठिकाणीं जी प्रभा जें त्याचें तेज एकरूपानें शोभून असतें, प्रभेतील आंतील भाग, तिचें अंतरंग तें जसें सूर्यतेजच; तसाच

प्रकृतिपुरुष हा द्वैतभेदाचा आभास नाहींसा होऊन त्यांची एकच शोभा केवळ मूळ परब्रह्म शिवस्वरूपच असते; सूर्य आणि सूर्याची प्रभा हीं दिसण्यांत मात्र दोन दिसतात. ते जरी हा सूर्य, ही त्याची प्रभा असे दोन भाग निरानिराळे दिसले तथापि ते दोन सूर्य आणि प्रभा मिळून एकच सूर्यतेज असतें; तद्वत् प्रकृति व पुरुष हे दोन भेद (शब्दानें उच्चारण्यापुरतेच) दिसतात खरे, पण तीं दोन्ही मिळून एकच परब्रह्म पुरुषाचींच तीं दोन रूपें, तो विलास त्याचाच तो बहुरूपी खेळ होय ॥२५॥

तोंच सिद्धान्त दुसरा दृष्टान्त देऊन महाराज सांगतातः—

कां बिंब प्रतिबिंबा द्योतक। प्रतिबिंब बिंबा अनुमापक।
तैसें द्वैतमिसें येक। बरवतसे ॥ २६ ॥

पदार्थ—**कां**—अथवा; **बिंब**—मूळचें स्वरूप; **प्रतिबिंबा**—मूळच्या स्वरूपाच्या उलट दिसणारें; **द्योतक**—प्रकाशक, दर्शक, स्पष्ट करणारें, दाखविणारें. **प्रतिबिंब**—आभासस्वरूप; भ्रमस्वरूप; **बिंबा**—खरें स्वरूपास; मूळस्वरूपाचें; **अनुमापक**—अनुमान किंवा कल्पना करून देणारें, ज्ञान करून देणारें; **तैसें**—तसेंच; **द्वैतमिसें**—द्वैताच्या मिषानें, निमित्तानें. (**द्वैत**—दोन, दृश्य, आभास, कल्पना, भ्रम, माया, मिथ्या, अविद्या, मृगजळ, खपुष्प, गंधर्वनगर बागुलबोवा, वंध्यापुत्र, हे सर्व एकाच अर्थाचे शब्द वेदान्तांतील पारिभाषिक असून ते नेहमीं योजण्यांत येतात). **येक**—एकच शोभा, एक परब्रह्मच; **बरवतसे**—शोभत आहे, मिरवत आहे.

सविवरण भावार्थ—अथवा मूळस्वरूप बिंब हें त्याच्या उलट भासणाऱ्या त्याच्या प्रतिबिंबाची कल्पना करून देतें; हें तें प्रतिबिंब म्हणून त्यास दर्शवितें, दाखवितें; प्रतिबिंब हेंहि आपल्या मूळस्वरूप बिंबाचें अनुमानयुक्त ज्ञान करून देतें. तसेंच द्वैत जें दृश्य जगत्रूप प्रकृतिपुरुष यांच्या निमित्तानें येक आपणच अक्षर परब्रह्म मिरवतें—विलास करतें. आरशाचा आधार घेण्यापूर्वी त्या तेथल्या मुखाच्या ठिकाणीं दिसणारें बिंब तेथें तें पूर्वी नसतांनाहि आरसा घेतल्यानंतरच त्याच्यायोगानें मुखावरती बिंब दिसूं लागलें व तेंच त्या आरशांत लगेंच परावर्तन पावून प्रतिबिंब झालें व तें प्रतिबिंब आतां मूळच्या मुखास पाहूं लागलें म्हणून बिंब प्रतिबिंबास दाखवितें व प्रतिबिंब बिंबाची ओळख करून देतें. तें एकच मुख आपणच एक बिंब व आपणच तें दुसरें प्रतिबिंब झाल्यासारखें भासलें तरी तें बिंब, प्रतिबिंब म्हणून आपल्या मूळच्या एकपणानेंच मिरवत असतें. ॥ २६ ॥

तसेंच आतां येथून पुढें या प्रकृतिपुरुषाचें स्वरूप निरनिराळ्या प्रकारें वर्णन करून दाखवितात—

सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया बाइला केला पुरुषु ॥
जेणें दादुलेन सत्ताविशेषु । शक्ति जाली ॥ २७ ॥

अन्वय व पदार्थ—**जिया बाइला**–ज्या बाइलीनें, ज्या स्त्रीनें, ज्या प्रकृतीनें; **सर्व शून्याचा**–(न इति, न इति) **नेति नेति**–असा श्रुतीनें केलेला सर्व दृश्याचा, जगताचा, अभावाचा निषेध, तें शून्य, त्या सर्व शून्य अनंत जगताचा; **निष्कर्षु** (निष्कर्ष)–शेवट, परमावधि (परम+अवधि–अत्यंत शेवट, अखेर) शेष अधिष्ठान (परब्रह्म), आधार–त्यास; **पुरुषु** (पुरुष)–पुरुषपणा, पौरुषत्व; **केला**–आणिला, तयार केला, बनविला; **जेणें दादुलेन**–ज्या दादल्यामुळें, ज्या नवऱ्याच्या योगानें, पतीमुळें, **सत्ताविशेषु** (अस्तित्वपणा)–सान्निध्याचा भाग अंश, त्यानें जी; **शक्ति**–शक्तिपणास, स्त्रीपणास; **जाली**–प्राप्त झाली; **शक्ति जाली**–स्त्री झाली.

भावार्थ—सर्व शून्याचा निष्कर्ष–सर्व शून्य, आभासरूप या दृश्य जगताचा शेवट असा परम अवधि, जो परमात्मा जें अधिष्ठान, त्याला ज्या बाईनें पुरुषपणास आणलें, त्याच्यावर पुरुषपणाचा आरोप केला, कल्पना केली, त्यामुळें त्या दादल्याच्या त्या नवऱ्याच्या सत्ता विशेषानें, सत्तेनें, अस्तित्वानें, आधारानें, आपण शक्तिपणा पावली–स्त्रीभावास प्राप्त झाली.

सुबोधविवरण—" इंद्रियाणि पराण्याहुः, इंद्रियेभ्यः परं मनः, मनसस्तु पराबुद्धिः, यो बुद्धेः परतस्तु सः " या भगवंताच्या वचनानुरूप–(स्थूलशरीरापेक्षां अवयव, अवयवापेक्षां) इंद्रियें सूक्ष्म, इंद्रियांहून मन सूक्ष्म, मनापेक्षां बुद्धि सूक्ष्म असा क्रम सांगून तीं परप्रकाशक आहेत, म्हणून तीं जड आहेत. पण जो बुद्धीहून अतिसूक्ष्म, तो आत्मा या सर्वांना प्रकाशित करणारा आहे. हीं सर्व उत्पन्न झालेलीं म्हणून नाशवंत आभासात्मक आहेत. तो 'तु यो बुद्धेः परतः सः।' पण जो बुद्धीहून या आभासाहून निराळा तो आत्मा सत्ता असून बुद्धि त्या सत्तेनें प्रकाशित होते. " तरी केवळ हे सत्ता । तो पुरुष गा पंडुसुता । प्रकृतीतें समस्ता क्रिया नाम " (ज्ञाने. १३–१९–९६६) बुद्धि इंद्रियें अंतःकरण । इत्यादि विकारभरण । आणि ते तिन्ही गुण । सत्त्वादिक ॥ ९६७ ॥ हा आघवाचि मेळावा । प्रकृती जाहला जाणावा । हेचि हेतु संभवा । कर्माचिया ॥ ९६८ ॥ " असो. वेदांनीं सर्व दृश्याचा नेति नेति म्हणून निषेध केला व शेवटीं वर्णनातीत अवर्णनीय असा परमात्मा सर्व दृश्य शून्याचा निष्कर्ष, निषेधाचा शेवट होय, असा निर्णय केला. यालाच येथें **निषेधावधि** निष्कर्ष म्हटलें आहे. आतां या अशा माया प्रकृतीनें

याला पुरुष दादला, नवरा केला; आणि याच दादल्याच्या, या नवऱ्याच्या सत्ताविशेषानें म्हणजे त्याच्या अस्तित्वावर ही अशी प्रकृति, शक्ति झाली. यापुढें शिवाच्या या दादला होऊन राहण्याच्या सुखाचें वर्णन करतातः—

जिये प्राणेश्वरीवीण । शिवींही शिवपण ॥
थारों न शके, ते आपण । शिवें घडली ॥ २८ ॥

पदार्थ—**जिये**—ज्या; **प्राणेश्वरी**—प्राणाची—जिवाची; **ईश्वरी**—स्वाधीन ठेवणारी; **प्राणेश्वरीवीण**—जीव जिच्या अधीन ती धनीण तिच्यावांचून; **शिवींही**—शिवाच्या ठिकाणीं; **शिवपण**—धनीपणा; **थारों न शके**—राहूं, टिकूं शकणार नाहीं; **ते**—ती प्राणप्रिया, तिला; **आपण शिवें**—शिवानें स्वतःच; **घडली**—धारण केली.

भावार्थ—ज्या प्राणेश्वरी प्रकृति-शक्तीवांचून शिवपुरुषाच्या ठिकाणीं आलेला पुरुषपणा राहूं शकणार नाहीं, तिला शिवपुरुषानें स्वतः आपल्या ठिकाणीं आभासरूप धारण केलें.

ऐश्वर्येंसीं ईश्वरा । जियेचें आंग संसारा ॥
आपण होऊन उभारा । आपणचि जे ॥ २९ ॥

शब्दार्थ—**ऐश्वर्येंसीं**— ऐश्वर्यास; **ईश्वरा**— शिवास; **जियेचें आंग**—जिचें स्वतःचें अंग म्हणजे जें स्वरूप त्रिगुण; (या) **संसारा**—अनंत विश्वाचा; **उभारा**—उभारणी, रचना, उत्पत्ति; **आपणाचि जे आपण होऊन**—एकलीच जी आपण स्वतः (करते).

भावार्थ—ईश्वराला ऐश्वर्यास आणण्यासाठीं जिचें स्वतःचें अंग, स्वरूप, जे त्रिगुण त्यांच्या योगानें सर्व विश्वसंसाराची उभारणी जी आपण स्वतः एकलीच करते.

सुबोधविवरण—ती प्रकृति, माया, त्रिगुणरूपा आतां ईश्वराच्या ठिकाणीं ऐश्वर्य दाखविण्यासाठीं ती अनंत विश्वरचनावैभवाची उभारणी आपण होऊन एकटीच करीत आहे. ती उभारणी कसकशी तें पुढें अडीच ओव्यांनीं तिच्या उत्कर्षाचें स्वरूप श्रीज्ञानराज दाखवीत आहेत, तें असेंः—

पतीचेनि अरूपपणें । लाजोनि आंगाचें मिरवणें ॥
केलें जगायेव्हढें लेणें । नामरूपाचें ॥ ३० ॥

पदार्थ—**पतीचेनि**—पतीचें असलें; **अरूपपणें**—नामरूपरहितपणानें; (ती प्रकृति) **लाजोनि**—(प्रकृतीला) लाज वाटून; **अंगाचें मिरवणें**—स्वतः अंगच्या

सामर्थ्यानें; **नामरूपाचें**–नामरूपात्मक; **जगाएवढें**–अनंत विश्व हा एवढा मोठा थोरला; **लेणें**–अलंकार; **केलें**–तयार केला, रचना केली, उभारणी केली.

भावार्थ—आपल्या पतीला, परमात्म्याला नामरूप कांहीं नाहीं, हें पाहून प्रकृतीला लाज वाटून तिनें अनंत नामरूपांनींयुक्त असें ब्रह्मांडाएवढें मोठें लेणें, तो अलंकार आपल्या अंगच्या स्वसामर्थ्यानें निर्माण केला.

नित्य परमानंदस्वरूप निर्विकार परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं या भाग्यवान् प्रकृति देवीनें बहुपणाचा सोहळा करून दाखविला, तो कसा तें सांगतातः–

ऐक्याचाही दुकाळा । बहुपणाचा सोहळा ॥
जियें सदैवेचिया लिळा । दाखविला ॥ ३१ ॥

पदार्थ—**ऐक्याचाही**–(ज्याच्या ठिकाणीं) एकपणाचादेखील; (**जेथें**) **दुकाळा**–दारिद्र्य, दुष्काळ, दुर्मिळता; (तेथें) **बहुपणाचा**–अनेकपणाच्या विश्वरचनेचा; **सोहळा**–विलास, ऐश्वर्य; **जियें**–जिनें; **सदैवेचिया**–दैववान् भाग्यवती बायकोनें; **लिळा**–सहजलीलेनें; **दाखविला**–शोभविला.

सुबोधविवरण—एकमेव, अद्वितीय, असें म्हणणेंसुद्धां जेथें खपत नाहीं असा एकटा परमात्मा, जेथें हा एकपणाचा देखील दुकाळ, अभाव इतका दरिद्री नवरा, पण त्याच्या ठिकाणींहि ज्या दैववान् मायेनें, बायकोनें नामरूपात्मक अनंत-विश्वरचनेचा थाट सहजलीलेनें दाखविला आहे.

असला हा सोहळा कोणाचे सत्तेवर होतो तें आतां दाखवितातः—

अंगाचिया आटणिया । कांतु उवाया आणिला जिया ॥
स्वसंकोचें प्रिया । रूढविली जेणें ॥ ३२ ॥

पदार्थ—**अंगाचिया**–स्वतांचें शरीराच्या; **आटणिया**–आटण्यानें, कमी झाल्यानें, झिजण्यानें, झिजून, अंगमेहनतीनें; **कांतु**–कांत, (क + अंत = **क** म्हणजे सुख त्याची, **अंत**–पराकाष्ठा जेथें, सुखाची पराकाष्ठा देणारा, पति, नवरा); **जिया**–जिनें; **उवाया आणिला**–उदयास, वैभवास आणला; **जेणें**–ज्यानें; **स्वसंकोचें**–स्वस्वरूपाच्या संकोचानें; **प्रिया**–प्रिय स्त्रीस; **रूढविली**–नांदविलें.

सविवरण भावार्थ—त्या प्रकृति, शक्ति स्त्रीनें आपल्या अंगच्या स्वरूपानें झिजून कमी होऊन शिवकांताच्या स्वरूपास उदयास आणलें (आणते). तसेंच त्या शिवकांतानें स्वस्वरूपाच्या संकोचानें प्रियेला नांदविलें (नांदविते), उदयास आणतो. स्वस्वरूपाचा विसर म्हणजे मायेच्या अंगचा प्रभाव जें मूळ

अज्ञानाचें आवरण तें कमी होतांच, निरास पावतांच, अगदीं दूर होतांच, शिव-स्वरूप जें मूळ ज्ञानस्वरूप तें उत्कर्षास येतें, उदय पावतें. त्या शिवस्वरूपाच्या विस्मृतिरूप संकोचानें, तिरोधानानें, आच्छादनानें पुन्हा मायेचा प्रभाव होतो, ती रूढविली जाते, नांदूं लागते, उदय पावते ॥ ३२ ॥

श्रीज्ञानराजांनीं वरीलप्रमाणें पुढेंहि शिवशक्ति, प्रकृति–पुरुष, कांतकांता, प्रियकर–प्रिया असें निरानिराळें रूपक करून मुमुक्षु जीवास स्वस्वरूपाच्या नित्यानंदाची एकसारखी ओळख, जागृति राहावी म्हणून ते निरानिराळ्या दृष्टान्तांनीं तोच तो सिद्धान्त मांडून दृढ करीत आहेत. परमात्म्याच्या **केवळ एकमेव अद्वितीय अक्षर**स्वरूपास मायेची कधींहि ओळख नसते. तेंच आतां ब्रह्मारीच्या रूपकानें एकमेक ब्रह्म व माया एकमेकांस पाहूं गेल्यास काय होतें, हें नेहमींच्या एखाद्या विलासी जोडप्याची तें संसार करीत असतांना अवस्था कशी होत असते, त्या स्थितीचें हुबेहूब वर्णन करून आतां पुढें सांगतात. एवढा मोठा वेदान्ताचा गहन विषय त्याचें किती सहज मौजेचें वर्णन करून तो अगदीं विनोदाच्या भाषेंतल्या संसारी जोडप्याच्या वर्णनाच्या दृष्टान्तानें सोपा करून दाखवीत आहेत. तथापि तोहि अधिकारावांचून सहज लक्षांत येणें कठीण आहे. म्हणून एकसारखा या सिद्धान्ताचा पुन्हा पुन्हा विचार करीत गेल्यास बुद्धि अति सूक्ष्म, सूक्ष्म होत जाऊन त्या शरणागतीनें महाराजांच्या कृपाप्रसादास आपण तसतसें पात्र होत राहून त्या प्राप्त अधिकारानें वरील गूढ प्रमेयांचें आकलन झाल्यास निजस्वरूप प्राप्तीचा तो नित्य परमानंदाचा भोग खास लाभल्यावांचून राहाणार नाहीं. श्रीज्ञानेश्वर माउलीनें ज्ञानेश्वरीच्या शेवटीं जो जो जें वांच्छील तें त्यास मिळावें असें सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथमहाराजांकडून वरदान मागून **पसायदान** केलेलें, तेंच येथें या अमृतानुभवग्रंथरूप सिद्धान्त प्रतिपादनानें तेच स्वतः प्रत्ययास आणून देण्याचें करीत आहेत. तेंच आतां पुढें पाहूं.––

परमात्म्याला आपल्या अशा मायारूप कुटुंबाला पाहण्याची जर इच्छा झाली तर त्या उभयतांची स्थिति कशी होते, तें वर्णन असें:––

जियेतें पाहावयाच्या लोभा । चढे द्रष्टृत्वाचिया क्षोभा ॥
जियेतें न देखतु उभा । आंगचि सांडि ॥ ३३ ॥

पदांचा अर्थ––**जियेतें**–ज्या मायारूप स्त्रीला; **पाहावयाच्या लोभा**–आपण बहु होऊन पाहावें या; **लोभा**–प्रबळ इच्छेनें; **द्रष्टृत्वाचिया**–द्रष्टेपणाच्या पाहणेपणाच्या, बहुपणाच्या; **क्षोभा**–विकाराला; **चढे**–पावतो; **जियेतें**–ज्या

मायेला–तिच्या अनंतब्रह्मांडरचनेचा विकार; **न देखतु**–न दिसतांच; **उभा**–उभ्याउभ्यानेंच, तसाच, त्या क्षणींच; सहजच; **आंगचि**–स्वतांचा बहुपणाच **सांडि**–सोडतो (टाकतो) ॥ ३३ ॥

सुबोधविवरण व भावार्थ—हा परमात्मा-शिव ज्या मायारूप शक्तिदेवी स्त्रीला तिचा तो आभास पाहण्याच्या तीव्र इच्छेनें द्रष्टेपणाच्या "एकोऽहं बहु स्याम्" या बहु होऊन पाहावयाच्या दशेला पावतो, तोंच जिचा अनेक दृश्य ब्रह्मांडरचनेचा तो देखावा न दिसल्यानें सहजच त्याची ती बहु होण्याची इच्छा निजस्वरूपींच जिरते. कारण तें परमात्मस्वरूप कांही विकार न पावता स्वस्वरूपानें नित्य असतें तसेंच असतें.

परमात्मा शिव आपल्या या शिवशक्तिमायेचा बहुजगत् होण्याचा सोहळा तिला अनुकूल होऊन करतो, तें कसें ते सांगतातः—

कांतेचिया भिडा। आवला होये जगायेव्हढा ॥
आंगविला उघडा। जियेविण ॥ ३४ ॥

पदांचा अर्थ—**कांतेचिया**–पत्नीच्या; **भिडा**–भिडेनें; **आवला**–नवरा; **होये**–बहु होतो, नटतो; **जगायेव्हढा**–अनंतकोटिजगाइतका मोठा; **अंगविला होय**–मोठा थोरला, विराटरूप देहधारी पुरुष होतो; **जियेविण**–ज्या प्रकृतीवाचून; **उघडा**–एकटाच, एकपणानेंच (**होय**) होतो, असतो.

भावार्थ—कांतेच्या स्वप्रकृतीच्या भिडेच्या योगानें हा आवला, नवरा शिव अनंतविश्वाचें विराटरूप धारण करणारा असा आंगविला, वेषधारी पुरुषाप्रमाणें होतो. पण जियेविण–जिच्यावांचून मात्र अगदी उघडा, एकटाच एकमेव अद्वितीय अशा निजरूपानें असतो. यांतील मथितार्थ एवढाच कीं, एकमय, निर्विकार, अक्षर ब्रह्म हें आपणच असतें तसेंच नित्यसच्चिदानंदघनच असतें. शिवशक्ति, अनंतकोटिजगद्रूप हा अभाव कधींच दृश्य होत नाहीं. जसें प्रत्येक पदार्थ उत्पन्न होण्यापूर्वी तो नसतोच, तो अभावरूप असतो. हा अभाव अनादि म्हणजे केव्हां झाला हें सांगतां येणार नाहीं. तसेंच शिवशक्ति, जगत् हीं अभाव रूप कशीं हें पुन्हा रूपकांनीं दृष्टान्त देऊन परमात्म एकमय स्वरूपाचा दृढ निश्चय व्हावा म्हणून तेंच पुढें आतां सांगतातः—

जो हा ठावो मंदरूपें। उवायिलेंपणेंचि हारपे ॥
तो झाला जियेचेनि पडिपें। विश्वरूप ॥ ३५ ॥

पदांचा अर्थ—जो–हा परमात्मा; **ठावो**–(ठाव–ठिकाण) हें आपलें स्वरूपठिकाण तेथें; **मंदरूपें**–सूक्ष्मरूपानें, एकमेवरूपानें; **हारपे**–हारवतो, एकरूप होऊन असतो; **उवायिलेंपणेंचि**–(आपण बहु व्हावें) या उत्कर्षानें, आनंदभरानें; **जियेचेनि पडिपें**–त्या प्रकृतीच्या साहाय्यानें, तिच्या वैभवानें; **तो**–परमात्मा शिव; **विश्वरूप**–विराट्रूप; **झाला**–झालेला दिसतो.

भावार्थ—हा परमात्मा निजस्वरूपाच्या ठिकाणीं अतिव्यापक सूक्ष्मस्वरूपमय होऊनच असतो. तो बहुपणाच्या उत्कर्षाच्या आनंदभरांत प्रकृतिरूप चित्शक्तीच्या शोभेनें विलासाकरितां अनंतविश्वरूप बनतो. म्हणजे सर्वविश्वाचा हा आभास देखावा मायेच्या योगानें भासतो हें दाखवून महाराज आतां परमात्मस्वरूप नित्यस्वसंवित्-रूप असल्यानें विश्वाभास कसा बाधित होतो तें रूपकानें दाखवितात—

जिया चेवविला शिवु । वेद्याचें बोणें बहु ॥
वाढि तेणेंसि जेऊं । धाला जो ॥ ३६ ॥

पदांचा अर्थ—**जिया**–ज्या शक्तिदेवीनें; **शिवु**–हा शिवदेव परमात्मा-याला; **चेवविला**–जागे केलें असतां; (तो) **वेद्याचें**–विषयाचें, दृश्यजगताचें; **बहु**–अनंत, अनेक प्रकारचीं; **बोणें**–खाद्यें, पक्वान्नें; **वाढि**–जी वाढते; **तेणेंसि**–तिच्यासह; **जो जेऊं**–तो जेवून; **धाला**–तृप्त झाला, तृप्त होतो.

भावार्थ—महाराजांनीं हें बहारीचें रूपक करून वेदान्तांतील रुक्षपणा दूर केला आहे. तें रूपक असें—या शक्तिदेवी मायेनें आपल्या शिवदेवपति-परमात्म्यास जागें केलें आणि त्याला आपल्या अंगच्या चातुर्यानें अनंत जगद्रूपी नाना तऱ्हेचीं पक्वान्नें त्याच्या भोजनाकरितां केलीं व वाढलीं, पण तो त्या वाढणाऱ्या देवीशक्तीसह सर्व विश्वरूप पक्वान्नें खाऊन तृप्त झाला. सारांश–परमात्मस्वरूपाचा उदय झाला असतां माया व मायाकार्य विश्व हें सर्व परमात्ममय होऊन जातें. द्वैतभाव तसाच देहभाव हा तिथें मुळीं उरतच नाहीं.

तसेंच प्रकृतीशीं परमात्मसंबंध झाल्यानें चराचर विश्वाची उत्पत्ति कशी होते तें दाखवितातः—

निदेलेनि भातारें । जे विये चराचरें ॥
जियेचा विसांवला नुरे । आंबुलेंपणही ॥३७॥

पदांचा अर्थ—**भातारें**–भ्रतार, नवरा; (एकारान्त नपुंसकलिंगी एक-वचनी शब्द); **निदेलेनि**–निजला असतां, जे–जी प्रकृति; **चराचरें**–(चर+अचरें)

जंगम–जीवसृष्टि व स्थावर–जडसृष्टि अशी मिळून, **विये**–विते, उत्पन्न करते, प्रसवते; **जियेचा विसांवला**–जिच्या विसांवल्यानें, जी लीन झाल्यानें; **आंबुलेंपणाहि**-पतिपणदेखील, नवरेंपणाहि; **नुरें**–(न उरे) उरत नाहीं, लोप पावतें; नवरा झोपला कीं ती जग उत्पन्न करते; ती झोपली तर ह्याचें नवरेपणाहि उरत नाहीं ॥ ३७ ॥

सविवरण भावार्थ—नवरा झोपला असतां म्हणजे त्याच शिवपरमात्मस्वरूपाचें आच्छादन, विस्मरण झालें असतां मायेच्या आवरणशक्तीच्या प्रभावाच्या योगानें हें जगतभान होऊं लागतें. तसेंच आत्मज्ञानानें परमात्मस्वरूपाचा उदय झाला असतां मूळची अज्ञानरूप प्रकृति विसांवते, लय पावते; त्यामुळें त्याच्या ठिकाणच्या शिवस्वरूपाचें नवरेपणाहि राहात नाहीं. केवल शुद्धपरमात्मस्वरूपाचा आविर्भाव, साक्षात्कार होत असतांना या शिवमायेच्या अनंतकोटिविश्वरचनेचा आभास जिरून जातो. विश्व विश्वरूपानें न दिसतां ब्रह्मरूपच दिसूं लागतें ॥३७॥

पुन्हा हीं दोघें एकमेकांसापेक्ष कशीं असतात, तें त्याच दृष्टीनें दृढ करीत आहेतः—

जंव कांतु लपों बैसे । तंव नेणिजे जिच्या दोशें ॥
जियें दोघें आरिसे । जियां दोघां ॥३८॥

पदांचा अर्थ—**जंव**–जेव्हां; **कांतु**–कांत; **लपों बैसे**–लपून बसतो, तिरोधान पावतो; **तंव**–तेव्हां, त्या वेळीं; **जिच्या दोशें**–जिच्या उद्देशानें, जिच्या उदयाच्या योगानें; **तो नेणिजे**–तो जाणला जात नाहीं; **जियें दोघें**–जीं दोघें, कांत-कांता, **आरिसे**–दर्शक, रूप दाखविणारें, **जियां दोघां**–जीं एकमेकांस (होत).

सविवरण भावार्थ—जेव्हां पुरुष आपलें ज्ञानस्वरूप आच्छादित करतो. हें तरी त्याचें असें आच्छादित होणें, **नेणिजे**–जें जाणले जात नाहीं, तेंहि तिच्या **दोशें**, त्या प्रकृतीमुळेंच हें पुरुष स्वरूपाचें होणारें ज्ञान समजतें; प्रकृतीच्या सत्त्वगुणाचा उदय म्हणजे पुरुषाचें ज्ञानस्वरूप प्रगट होणें होय. म्हणजे प्रकृति आपल्या सत्त्वगुणाच्या आरशांत पुरुषाला आपले ज्ञानस्वरूपरूप दाखविते. तसेंच पुरुषाच्या सत्तारूप आरशांत प्रकृति आपलें अस्तित्व पाहते. पुरुषाच्या सत्तेवर प्रकृतीचें अस्तित्व व प्रकृतीमुळें पुरुषाला स्वसत्तेचें ज्ञान, असे हे एकमेक एकमेकांचे आरसे, आपआपले स्वरूपाचे दर्शक होत ॥३८॥

जियेचेनि आंगलगें । आनंद आपणा आरोगूं लागे ॥
सर्व भोगत्रुत्वही नेघे । जियेविण कांहीं ॥३९॥

पदांचा अर्थ—**जियेचेनि** आंगलगें–जिच्या अंगस्पर्शानें, **अंगच्या** अस्तित्वानें; **आनंद**–निजस्वरूप सुख; (तो शिव) **आपणा**–आपला आपण; **आरोगूं लागे**–भोगूं लागतो; **जियेविण**–जिच्यावांचून; **सर्व कांहीं**–कोणतें एकहि, कांहीं एक; **भोगत्रुत्वही**–भोक्तेपण देखील. (तो) **नेघे**–त्याला घेतां येत नाहीं, घेऊं शकत नाहीं.

सविवरण भावार्थ—परमात्मा शिव आपल्या एकमेव अद्वितीयपणाचा सुखसोहळा आपण बहुत व्हावें या इच्छेनें स्फूर्तिरूप होऊन त्या प्रकृतीच्या अंग-स्पर्शानें आपणच अनंतरूप नटून विलासासाठीं आपला स्वरूपानंद आपल्या ठिकाणीं भोगूं लागतो; तो कांहींहि भोग असो, त्याचें तें भोक्तृत्व, तें विलासमुख त्याला त्या शक्तीवांचून होत नाहीं.

या सुखविलासाचें दोघांचें चांगुलपण एकमेकांवरच कसें असतें, तें स्पष्ट करतातः—

जया प्रियाचें जें आंग । जो प्रियु जियेचें चांग ॥
कालउनी दोन्ही भाग । जेविते आहाति ॥ ४० ॥

पदांचा अर्थ—**जया**–ज्याला; **प्रियाचें**–त्या प्रियेचें, ज्या प्रकृति शक्तीचें; **जें आंग**–तिचें स्वरूप; **चांग**–(तेंच ज्याला) चांगलें आहे; **जो प्रियु**–तो शिव परमात्मा; **जियेचें चांग**–त्या प्रकृतिशक्तीची शोभा होय, **दोन्ही भाग**–दोघेजण; **कालउनी**–एकत्र होऊन; **जेविते आहाति**–द्वैतविलासाचें जेवण जेवीत आहेत.

सविवरण भावार्थ—ज्याला (जया) ज्या शिवपरमात्म्याला प्रकृतिशक्ति-देवीचें स्वरूप हेंच ज्याला चांगलें म्हणजे शोभा आणण्यास कारण आहे, त्या प्रकृतीला ही विश्वाची चांगली शोभा आणणारा (तो प्रियु) शिवपरमात्माच होय. असे परमात्मा व माया एकमेकांमध्यें आपापले भाग कालवून एकत्रपणानें **जेविते आहाति**, द्वैतविलास तीं दोघें दाखवीत असल्याचीं दिसतात खरीं. पण सिद्धान्त असा कीं जो शिव जें सत् स्वरूप तीच शक्ति चित्स्वरूप. सत्ता–प्रकाश एकरूपच, तेंच पुढें दृष्टान्तानें स्पष्ट करीत आहेतः—

जैसि कां समिरेसकट गति । कां सोनियासकट कांति ॥
तैसि शिवेंसि शक्ति । अवघिचि जे ॥ ४१ ॥

पदाचा अर्थ—**जैसि कां**–जणुं काय, जशाचीं तशीं, ज्याप्रमाणें **अगदीं**; **समिरेंसकट**–वाऱ्यासह वाऱ्याबरोबरच, वाऱ्याशीं एकरूप; (त्याची) **गति**–

त्याचा स्पर्श, त्याचें वाहणें; **कां**–किंवा अथवा; **सोनियासकट**–सोन्यासह, सोन्याशीं मिसळून (त्याची) **कांति**–त्याचें तेज असतें; **तैसि**–तसेंच; **शिवेंसि**–शिवस्वरूप परमात्म्याशीं एकरूप **जे शक्ति**–जें त्याचें शक्तिरूप (अनंतकोटिब्रह्मांडरचनारूप); **अवघिचि**–हें सर्व अवघें परमात्माच होय.

भावार्थ—जशीं वाऱ्यासह एकरूप वाऱ्याची गति, त्याचा स्पर्श असतो, किंवा सोन्याशीं (सहित) जशी एकरूप त्याची कांति, त्याचें तेज असतें; तसेंच परमात्मशिवाशीं एकरूपानें तें शक्तिस्वरूप अनंतकोटिब्रह्मांडरूपानें विस्तारलेलें, **अवघिचि**–अवघें परमात्मसत्‌चितरूप होय. हेंच आणखी दृष्टान्तानीं स्पष्ट करीत आहेतः—

कां कस्तुरीसकट परिमळु । कां उष्मेसकट अनळु ॥
तैसा शक्तीसि केवळु । शिवुचि जो ॥ ४२ ॥

पदांचा अर्थ—**कां**–अथवा; **कस्तुरीसकट**–कस्तुरीशीं एकरूप; **परिमळु**–परिमळ, सुगंध; **कां**–अथवा; **उष्मेसकट**–उष्मेसहित; **अनळु**–अनळ, अग्नि; **तैसा**–तसाच; **शक्तीसि**–शक्तीसहित; **शिवुचि**–शिवुचि, शिवसुद्धां; **जो केवळु**–तो परमात्माच केवळ.

भावार्थ—अथवा कस्तुरीशीं एकमय तिचा सुगंध असतो, किंवा केवळ अग्नीशीं त्याची उष्णता एकरूप असते. तसेंच अगदीं शिव आपल्या शक्तीसहित **केवळु** जो–जो केवळ, शुद्ध निर्विकार तें परमात्ममय अक्षरब्रह्मरूपच असतो.

शिवसापेक्ष शक्ति, शक्तिसापेक्ष शिव, तसेंच ईश्वरमाया, देवदेवी व त्यांनीं निर्मितजगत हें सर्व परमात्मस्वरूपावर भासणारें आभासमात्र, खोटें कसें तें महाराज सिद्ध करून दाखवितातः—

राति आणि दिवो । पातलीं सूर्याचा ठावो ।
तैसीं आपुला साचि वावो । दोंघेंही जियें ॥ ४३ ॥

पदांचा अर्थ—**राति**–रात्र;**आणि दिवो**–तसाच दिवस (हीं दोघें);**सूर्याचा ठावो**–सूर्याच्या ठिकाणीं, घरीं; **पातलीं**–पोहोंचलीं तर नष्ट होतात; **तैसीं**–तशींच; **आपुला साचि**–आपल्या सत्यस्वरूपावर, मूळ अधिष्ठानावर; **जियें दोघेंहि**–जीं दोन्हीं (शिव आणि शक्ति) हीं; **वावो**–व्यर्थ, नाहींतशीं (होतात).

सविवरण भावार्थ—रात्र आणि दिवस सूर्याच्या घरीं गेलीं असतां नाहींशीं होतात, व्यर्थ होतात, तशीं निर्विकार ब्रह्माचें सत्य स्वरूपाचें ठिकाणीं हीं प्रकृति–

पुरुषें, शिवशक्तिरूपें व्यर्थ होतात, तीं नाहींतच. "अर्जुना कांहींच जेथ नाहीं। तो प्रकृतीचा भर्तार पाहीं। कां भोगणें ऐसयाहि। सुखदुःखाचें ॥ (ज्ञाने. १३-२१-९८४). तो तरी अकर्ता। उदास अभोक्ता। परि इया पतिव्रता। भोगविजे ॥ ९८५ ॥ हा महद्ब्रह्मगोसावी। ब्रह्मगोलकलाववी। अपारपणें मवी। प्रपंचातें ॥ १०२७ ॥ पैं या देहामाझारीं। **परमात्मा** ऐसी जे परी। बोलिजे तें अवधारीं। ययातेंची ॥ १०२८ ॥ हें रूप, हे छाया। पैल जळ, हे माया। (—मृगजळ)। ऐसा निवाड धनंजया। जेवीं कीजे ॥ १०३१ ॥ ऐसा तया एक। प्रकृतिपुरुषविवेक। उपकार अलौकिक। करी पैं गा ॥ १०३५ ॥ हा नाशतां भूताभास। एथ **आत्मा** तो अविनाश। जैसा केयूरादिकीं कस। सुवर्णाचा ॥ १०६७ ॥ तरि परमात्मा म्हणिपे। तो ऐसा जाण स्वरूपें। जळीं जळे न लिंपे। सूर्य जैसा ॥ १०९५ ॥ ज्ञानेश्वरी ॥

हीं रात्र आणि दिवस सूर्याच्या राहण्याच्या ठिकाणीं दोन्हीहि भेटीस गेलीं असतां तीं दोघेंजणें पोहोंचतांच तात्काळ नाश पावलीं. दोघेंहि सूर्यरूप झालीं. सूर्य नित्य स्वयंप्रकाश असून त्याच्यावर भासणारे दोन्ही दिवस व रात्र हे भाव त्याला माहीतहि नसतात. पण त्याच्या सत्तेवांचून त्या दोहोंचेंहि अस्तित्व नाहीं. तसेंच परमात्म्याच्या अधिष्ठानावर भासणारीं हीं प्रकृतिपुरुषें, शिवशक्तिरूपें, त्याच्या ठिकाणीं अगदीं अभावरूप असून परमात्माच सर्वत्र ओतप्रोत निर्विकार असाच असतो. ॥ ४३ ॥

शिवशक्तीच दोघेंजणें जगताचीं वैरी कशीं तें सांगतातः—

किंबहुना तियें। प्रणवाक्षरीं विरूढतियें ॥
दशेचीं हीं वैरियें। शिवुशक्ति ॥ ४४ ॥

पदांचा अर्थ—**किंबहुना**—फार काय सांगावें; **तियें प्रणवाक्षरीं**—ज्या ओंकारापासून; **विरूढतियें**—वाढलेल्या जगाच्या, उत्पन्न झालेल्या जगाच्या; **दशेचीं**—मूळ स्वरूपाचीं, ओंकाराचीं हीं शिवुशक्ति; **वैरियें**—वैरी, नाशक; (होत). त्याच्याशीं ह्यांचें साम्य नाहीं.

भावार्थ—श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात कीं, फार काय सांगावें, कीं ज्या प्रणव ओंकारापासून जगत् उत्पन्न होतें, त्याच्याशीं यांचा, या दोघां शिवशक्तींचा विरोध होतो, त्याच्याशीं यांचें साम्य नसतें. कारण ह्यांच्या वास्तविक अधिष्ठानास, परमात्म्यास जग हा पदार्थच माहीत नसतो. मग तेथें त्या जगाचें

अधिष्ठान, मूळ जें प्रणवरूप त्याचें अस्तित्व कोठून असणार ? " जेथ **ओम्** हें स्मरों सरें " ॥ ज्ञाने० ॥ असो. ॥ ४४ ॥

पूर्वी वर्णिलेल्या त्या शिवशक्तिद्वय जोडप्यास महाराज आतां वंदन करतातः—

हें असो नामरूपाचा भेदसिरा । गिळित येकार्थाचा उजिरा ॥
नमो तया शिववोहरा । ज्ञानदेउ म्हणे ॥ ४५ ॥

पदांचा अर्थ—**हें असो**–आतां हें (वर्णन) पुरें; **नामरूपाचा**–नाम-रूपात्मक जगरूप हाच; **भेदसिरा**–भेदरूप शिरा; **गिळित**–खाऊन टाकून, पूर्ण गिळून टाकून, नाहींसा करून टाकून; **येकार्थाचा**–एकतत्त्वाचा, एक परमात्मा त्याचा; **उजिरा**–उदय करणारे; **तया शिववोहरा**–त्या शिवशक्तिदंपतीस; **वोहरा**–वधूवरास; **ज्ञानदेउ म्हणे**–ज्ञानदेव म्हणतात; **नमो (अस्तु)**–नमस्कार असो.

भावार्थ—आतां पुरें असो तें वर्णन ! याप्रमाणें नामरूपाचा मिळून झालेला (हें विश्व) हाच भेदरूप शिरा गिळून टाकून म्हणजे भेद नाहींसा करून टाकून, अद्वैत एकतत्त्व, जें अद्वितीय परमात्मस्वरूप–त्याचा उदय करणारें, त्यास प्रकट करीत असणारें तें शिवशक्तिदांपत्य त्यास ज्ञानदेव म्हणतात माझा नमस्कार असो. ॥ ४५ ॥

या शिवशक्तिस्वरूपाचा पुन्हा विचार पुढें चालूः—

जया दोघांच्या आलिंगनीं । विरोनि गेलीं दोन्ही ॥
आघवियाचि रजनी । दिठीचि जे ॥ ४६ ॥

पदांचा अर्थ—**जया दोघांच्या**–ज्या शिवशक्तींच्या; **आलिंगनीं**–आलिंग-नांत, एक होण्यांत, एकत्र मिसळण्यामध्यें; **दोन्ही**–दोघेंहि; **विरोनि गेलीं**–विर-घळलीं, तद्रूप झालीं, नाहींशीं झालीं; **जे आघवियाचि रजनी**–जी अवघी रात्र, सर्व काळोख, अज्ञानरात्र; **दिठीचि**–ज्ञानदृष्टीच (होते), सर्व काळोख प्रकाश होतो.

सविवरण भावार्थ—या शिवशक्तींच्या आलिंगनामध्यें दोघें एकमेक विरून जातात, व सर्व अंधार जें अज्ञान, ते प्रकाश होतें, ज्ञानमय होतें; तीं दोघेंहि अधिष्ठानरूप होतात. शक्ति हें अज्ञान शिवरूप असें ज्ञानमय होऊन जातें. सूर्योदय होतांच रात्रीचा काळोख प्रकाशमय होतो. रात्रीमुळें प्रकाशाला सापेक्ष दिवसपणा येत असतो. तो दिवसपणा रात्र नाहींशी होतांच नाहींसा होतो, पण प्रकाश मात्र नाहींसा होत नाहीं. तसेंच परमात्मस्वरूपावरचा शक्ती-

मुळें येणारा तो शिवपणा जातो आणि मूळचें परमात्मा हें अधिष्ठानस्वरूप मात्र कायम राहतें. ॥ ४६ ॥

तें अधिष्ठान, या शिवशक्तीचें जें वास्तविक मूळ स्वरूप तें कसें अवर्णनीय आहे तें सांगतातः—

जयांच्या रूपनिर्धारीं । गेली परेसी वैखरी ॥
सिंधूसीं प्रळयनिरीं । गंगा जैशी ॥ ४७ ॥

पदांचा अर्थ—**जयांच्या**—ज्या शिवशक्तींच्या; **रूपनिर्धारीं**—स्वरूपाचा निश्चय करीत असतां; **जैशी**—जशी; **गंगा**—गंगा नदी; **सिंधूसीं**—समुद्रासह; **प्रळयनिरीं**—प्रळयकाळाच्या जलमयांत (तीं नाहींशीं होतात); तशीच **वैखरीवाणी**—जी स्थूलदेहांतील जागृतींतील स्पष्ट उच्चार करणारी ती; **परावाणी**—जी नाभिस्थानीं असणारी ज्ञानवाणी तिच्यासह परमात्मस्वरूपांत लय पावते; त्या एकरूप होऊन जातात.

सविवरण भावार्थ—त्या शिवशक्तींच्या मूळ रूपाचा, परमात्मस्वरूपाचा निश्चय, दृढ विचार करूं लागलें असतां त्या स्वरूपाच्या वर्णनांत जागृतींत स्पष्ट उच्चार करणारी वैखरीवाणी ही तिच्या नाभिस्थानच्या सूक्ष्म, ज्ञानवाणीसह लय पावते. त्या वर्णनातीत अतिसूक्ष्म स्वरूपाचें या दोन्ही जडवाणी वर्णन करूंच शकत नाहींत. मृगजळवत् त्या त्यांत नाहींशा होऊन जातात. जसें सर्व विश्व जलमय होऊन जातें, तेव्हां त्यांत गंगा व समुद्र लय पावतात. "**यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्यमनसा सह**" त्या परमात्म स्वरूपापर्यंतचें वर्णन करीत त्या वाणी मनासह या स्वरूपास प्राप्त न होतांच परततात, असें श्रुतिवचन आहे; व हें वर्णन पूर्वी मंगलाचरणाच्या पहिल्या श्लोकांतील '**यत् अनाख्येयम्**' याच्या स्पष्टीकरणांत विस्तारपूर्वक आलेलें आहेच; असो. ॥ ४७ ॥

आणखी दोन ओव्यांनीं वरील सिद्धान्त दृष्टान्तानें स्पष्ट करतातः—

वायु चळवळेशीं । जिराला व्योमाचिये कुशीं ॥
आटला प्रळयप्रकाशीं । सप्रभ भानु ॥ ४८ ॥
तेविं निहाळितां ययातें । गेले पाहणेंनसीं पाहते ॥
पुढती घरौतें वरौतें । वंदिलीं तियें ॥ ४९ ॥

पदांचा अर्थ—**वायु**—वारा; **चळवळेशीं**—गतीसह, चलनवलनासह; **व्योमाचिये**—आकाशाच्या; **कुशीं**—कुशींत, अन्तःस्वरूपांत; **जिराला**—जिरून

जातो, लोपतो; **भानु**–सूर्य; **सप्रभ**–प्रकाशासह; **आटला**–आटतो, लय पावतो. ॥ ४८ ॥

तेविं–तसेंच; **ययातें**–ज्याच्या मूळ स्वरूपास; **निहाळितां**–सूक्ष्म दृष्टीनें पाहतां; **पाहतें**–पाहणारा, द्रष्टा; **पाहणेंनसीं**–पाहण्याचें स्वरूप; **गेले**–हीं जातात, नाहींशीं होतात; **तियें**–तीं, शिवशक्तिरूपें; **घरौतेंवरौतें**–घरांतदारांत, आंतबाहेर सर्वत्र असणारीं; **पुढती**–पुन्हा पुन्हा, आणखी; **वंदिली**–वंदन केलें (त्यांना). ॥ ४९ ॥

भावार्थ—वारा चलनवलनासह आकाशाच्या पोटांत नाहींसा होतो, जिरून जातो; प्रकाशासह सूर्य प्रळयकाळच्या महातेजांत लय पावतो; तसेंच यांचें मूळ स्वरूप सूक्ष्म रीतीनें पाहूं गेलें तर तें स्वरूप पाहणें व त्या स्वरूपास पाहणारा हीं दोन्ही एकरूप होतात; अशा त्या आंतबाहेर, घरांतदारांत सर्वत्र ओतप्रोत व्यापून असणाऱ्या परमात्ममय शिवशक्तींना मीं वंदन केलें. ॥ ४८–४९ ॥

तोच भाव पुन्हा दृष्टान्त देऊन दृढ करतातः—

जयांच्या वाहाणीं । वेदकु वेद्याचें पाणी ॥
न पिये पण सांडणी । अंगाचिहि करी ॥ ५० ॥

पदांचा अर्थ—**जयांच्या वाहाणीं**–ज्यांच्या (शिवशक्तींच्या स्वरूप-) निर्धारांत, निश्चयांत; **वेदकु**–निश्चय करणारा, वेत्ता, ज्ञाता; **वेद्याचें**–जाणण्याच्या विषयाचें (ठिकाणीं); **पाणी न पिये**–पाण्याचा थेंब पिण्याइतकासुद्धां थांबूं शकत नाहीं; **पण**–तर; **अंगाचिहि**–जीवभावाची; **सांडणी**–लय, त्याग करतो.

भावार्थ—ज्या शिवशक्तिस्वरूपाचा निश्चय करावयास लागलें असतां तो विचार करणारा ज्ञाता ज्ञेयविषय जें निजस्वरूप तिथें पाण्याचा थेंब पिण्याइतका क्षणभरदेखील थांबण्यास उरत नाहीं, तर जीवभाव जें स्वतःचें अंग त्यासुद्धां त्या शिवशक्तीच्या मूळ परमात्मस्वरूपांत एकमय होतो. ॥ ५० ॥

मग शिवशक्तीच्या या ऐक्यभावांत मी निराळ्या द्वैतभावानें वंदन करतों, हें कसें, अशी शंका या ओवीनें उत्पन्न करून पुढच्या ओवीनें तिचें निरसन करतातः—

तेथ मी नमस्कारा । लागीं उरों दुसरा ।
तंव्हीं लिंगभेद पव्हा । जोडूं जावों ॥ ५१ ॥

पदांचा अर्थ—**तेथ**–त्या ठिकाणीं (त्या शिवशक्तिस्वरूपाच्या ऐक्यांत); **मी**–ज्ञानेश्वर; **नमस्कारालागीं दुसरा**–नमस्कार करणारा असा निराळा; **उरों**–उरलों, राहिलों; **तन्हीं**–तर मग; **लिंगभेद**–द्वैतभाव, भेदभाव, दुजेपणा; **पाहा**–निराळा; **जोडूं जावों**–जोडून ठेवल्यासारखें होईल ना ?

भावार्थ—त्या भेदातीत शिवशक्तीच्या ठिकाणीं मी नमस्काराकरितां कोणी निराळा राहिलों, तर मीच दुसरा भेदभाव जोडून ठेवल्यासारखें होईल. ॥ ५१ ॥

आपणच अशी शंका घेऊन तिचें आतां निरसन करीत आहेतः—

परि सोनेंनसिं दुजें । नव्हतु लेणें सोना भजे ॥
हें नमन करणें माझें । तैसें आहे ॥ ५२ ॥

पदांचा अर्थ—**परि**–पण; जसें **सोनेंनासिं**–सोन्याच्या मूळस्वरूपाहून; **लेणें**–अलंकार; **दुजें नव्हतु**–भिन्न न होतां; **सोना**–त्या सोन्याशीं; **भजे**–एकरूप असतो; **तैसें**–तसेंच अगदीं; **हें माझें नमन करणें आहे**–असें ऐक्यरूप माझें वंदन करणें होय.

भावार्थ—हें पहा, सोन्याच्या मूळस्वरूपाहून अलंकार भिन्न न होतां, सोन्याशीं अगदीं एकरूप असतो व सोन्याला शोभा आणतो; तसेंच अगदीं शिवशक्तींहून निराळें न होतां त्यांच्याशीं ऐक्यभावाचें हें माझें नमन करणें आहे. ॥५२॥

हाच भाव पुढील दृष्टान्तांनीं निश्चित करीत आहेतः—

सांगतां वाचेतें वाचा । ठाउ वाच्यवाचकांचा ॥
पडतां काय भेदाचा । विटाळु होये ? ॥ ५३ ॥

पदांचा अर्थ—**वाचा**–वाणीनें; **वाचेतें**–'वाचा' अशा शब्दाला; **सांगतां**–उच्चारले; तर (तो) **वाच्य**–शब्द; (व) **वाचकांचा**–तो उच्चार करणारा; यांचा भेद; **ठाउ पडता**–ठाऊक झाला (असला), तरी (त्यांचें मूळ जी वाणी, जीभ तिला); **भेदाचा विटाळु**–या भेदाचा, दुजेपणाचा स्पर्श; **होये ?**–होतो काय ? नाहीं.

भावार्थ—वाणीनें 'वाणी' असा शब्द जर उच्चारला तर तेथें तो वाणी शब्द उच्चारणारा एक, व ज्या शब्दाचा उच्चार केला तो एक,—असे दोन शब्द जरी निराळे ठाऊक झाले, तरी वाणीला, त्या वाचेला त्या भेदाचा स्पर्श तरी होतो का ? होत नाहीं. कितीहि शब्द उच्चारले गेले तरी त्याची जाणीव जिभेला कधींहि नसते. ती असते तशी निर्विकार अभेदरूपच असते. ॥ ५३ ॥

सिंधु आणि गंगेचि मिळणी । स्त्रीपुरुष नामाचि मिरवणी ॥
दिसतसे तरि काय पाणी । द्वैत होईल ॥ ५४ ॥

पदांचा अर्थ—**सिंधु**–समुद्र; **आणि**–तसेंच; **गंगेचि मिळणी**–गंगेचें मिसळणें, संगम; **स्त्रीपुरुष नामाचि**–गंगा हें नांव, हा शब्द स्त्रीनामवाचक, समुद्र हा शब्द पुरुषनामवाचक, अशी; **मिरवणी**–भेद; **दिसतसे**–दिसला जरी; **तरि (मिळणी) पाणी द्वैत होईल काय**–तरी त्यांचें संगमांत पाणी निराळें (द्वैत) असतें का ? नाहींच.

भावार्थ—समुद्र आणि गंगा नदी हीं दोन स्त्रीपुरुषवाचक नांवें निरनिराळीं जरी दिसलीं, तरी संगमांत त्यांचें पाणी काय निराळें असतें ? नसतेंच. गंगा ही समुद्राला मिळण्याच्या आधीं निराळी दिसते; पण एकदां ती समुद्रांत मिसळून गेल्यावर गंगा म्हणून निराळी न दिसतां समुद्रमय होते, तेव्हां समुद्र हा व गंगा ही असे भेद उरत नाहींत. समुद्राचें तें फक्त पाणीच एकमय दिसतें. ॥५४॥

पाहातां भास्यभासकता । आपुला ठाईं दावितां ।
एकपण काय सविता । मोडितसे ॥ ५५ ॥

पदांचा अर्थ—**पाहातां**–पाहूं गेल्यास; **सविता**–बिंब, तेज, प्रकाश; **आपुला ठाईं**–आपल्याच अंगीं; **भास्य**–प्रकाश; **भासकता**–प्रकाशकता; **दावितां**–दाखविल्यानें, धारण केल्यानें; **एकपण**–त्याचें ऐक्य, एकता, एकपण; **मोडितसे काय**–भंग पावतें काय ? ढासळतें, कमी होतें काय ? नाहींच.

भावार्थ—पाहूं गेलें असतां, सूर्य स्वतःच्या ठिकाणीं प्रकाश, प्रकाश करणारा हे दोन्ही धर्म, हें आपलें द्वैत दाखवीत असला, धारण करीत असला, तरी त्याचें तें प्रकाश, प्रकाशक हें सर्व मिळून एकच एक जें तेजोमय सूर्यपण–सूर्यबिंब, त्यांतलें तेज, तेजाचा प्रकाश, किरण, हें ऐक्य त्याचें नाहींसें होतें का,–तर नाहीं; तें कमी होत नाहीं. तें सर्व मिळून त्याचें एकपणच असतें. ॥ ५५ ॥

चांदाचिया दोंदावरी । होत चांदणियाची विखुरी ।
काइ उणें दीप्तिवरी । गिंवसों पां दीपु ॥ ५६ ॥

पदांचा अर्थ—**चांदाचिया**–चंद्राच्या; **दोंदावरी**–बिंबावर; **चांदणियाची**–चंद्रप्रकाशाची; **विखुरी होत**–विस्तार होतो; **उणें काइ**–तो (चंद्राहून) निराळा का आहे; **दीपु**–दिवा; **दीप्तिवरी उणें**–प्रकाशावांचून; **गिंवसों पां काइ**–शोधतां येईल काय ?

भावार्थ—चंद्राच्या बिंबावर पडणारा चांदण्याचा प्रकाश निराळा असतो का ? (तसेंच आम्हांला फक्त दिवाच हवा, प्रकाश नको असें म्हणून) प्रकाशावांचून कोणी दिवाच शोधूं लागेल, तर तो त्याला शोधूं शकेल काय ? नाहीं; कारण दोघें एकच. ॥ ५६ ॥

मोतियाची कीळ । होय मोतियावरी पांगूळ ॥
आगळें निर्मळ । रूपा ये कीं ॥ ५७ ॥

पदांचा अर्थ—**मोतियाची कीळ**–मोत्याचें तेज; **मोतियावरी पांगूळ होय**–मोत्यावरच जडून राहतें; **आगळें**–अधिकच; **निर्मळ रूपा ये कीं**–स्वच्छ तेजाला अधिक चढतें, अधिक खुलतें.

भावार्थ—मोत्याचें तेज मोत्याच्याच अंगीं जडून राहतें, आणि तें त्यांना अधिकच शोभा आणतें; तें त्याच्याहून निराळें नसतें. एकमय म्हणून अधिकच शोभूं लागतें. ॥ ५७ ॥

मात्राचिया त्रिपुटिया । प्रणवु केला चिरटिया ॥
कीं णकार तिरेघेटिया । भेदवला काई ॥ ५८ ॥

पदांचा अर्थ—**प्रणवु**–प्रणव, ओंकार; **त्रिपुटिया**–तीन; **मात्राचिया**–अ, उ, म, या तीन अक्षरांनीं; **चिरटिया**–(चिरफळ्या) चिरलेला; **केला काइ**–केला जातो काय; **कीं**–अथवा; **णकार**–ण हें अक्षर; **तिरेघेटिया**–तीन रेघांनीं; **भेदवला काई**–भेदेल काय ?

भावार्थ—ओंकार जो ॐ हा तीन मात्रांनीं एक झालेला असतो, तो त्या तीन मात्रांनीं तीन प्रकारचा चिरलेला झाला, असें म्हणावें काय ? किंवा ण हें अक्षर तीन रेघांनीं मिळून तयार होतें. त्यामुळें त्याचा तो भेद झाला असें होईल काय ? तर नाहींच. ॥ ५८ ॥

अहो ऐक्याचें मुदल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे ॥
तरी स्वतरंगाचीं मुकुळें । तुरंबु कां पाणी ॥ ५९ ॥

पदांचा अर्थ—**अहो**–असें पहा, कीं, **ऐक्याचें**–आपलें एकत्वाचें; **मुदल**–मूळ स्वरूप; **न ढळे**–न ढळतां, न बदलतां; **आणि साजिरेपणाचा**–आणि जर शोभेचा, विलासाचा; **लाभु मिळे**–लाभ मिळत असेल; **तरी**–तर मग; **पाणी**–पाण्यानें; **स्वतरंगाचीं**–आपल्या लाटारूपीं; **मुकुळें**–पुष्पें; **तुरंबु कां**–हुंगूं नयेत कां ? वास कां घेऊं नये ?

भावार्थ—आपलें ऐक्याचें मूळ स्वरूप न बदलतां आणखी जर विलासाचा लाभ मिळत असेल, तर पाण्यानें आपल्यावर अनेक उसळणाऱ्या लाटारूपी पुष्पांचा वास कां न घ्यावा ? ॥ ५९ ॥

म्हणोनि भूतेश–भवानी । वंदिलीं न करूनि सिनानीं ॥
मी रिघालों नमनीं । तें हें ऐसें ॥ ६० ॥

पदांचा अर्थ—**म्हणोनि**–म्हणून; **भूतेश–भवानी**–शिवशक्ति हीं; **सिनानीं**–वेगळीं, निराळीं, भेदभावानें; **न करूनि**–न मानून; **वंदिलीं**–वंदन केलें; **तें हें ऐसें**–तें अशा ह्या एकरूपतेंत वंदनाचा विलासाचा सोहळा व्हावा या हेतूनें; **नमनीं**–वंदनास; **रिघालों**–प्रवृत्त झालों.

भावार्थ—म्हणून मी स्वतांहून शिवशक्तींच्या रूपामध्यें निराळा भेदभाव न करून, न मानून वंदनसोहळा ऐक्यभावानेंच व्हावा ह्या हेतूनें हा असा वंदनास प्रवृत्त झालों आहें. ॥ ६० ॥

असेंच आणखी चार ओव्यांनीं दृष्टान्तपूर्वक तोच सिद्धान्त मांडीत आहेत—

दर्पणाचेनि त्यागें । प्रतिबिंब बिंबीं रिगे ॥
कां बुडी दीजे तरंगें । वायूचा ठेला ॥ ६१ ॥

पदांचा अर्थ— **दर्पणाचेनि त्यागें**–आरसा टाकल्यानें, आरशाचा त्याग केल्यानें; **प्रतिबिंब**–बिंबाचें हुबेहूब रूप; **बिंबीं**–मूळ रूपांत; **रिगे**–प्रवेश करतें, मिळतें; **कां**–अथवा; **वायूचा ठेला**–वाऱ्याच्या निश्चलपणानें, थांबण्यानें; **तरंगें**–लाटांनीं; **बुडी दीजे**–लय पावावें.

भावार्थ—आरसा दूर केल्यावर प्रतिबिंब हें मूळरूप बिंबांत जाऊन मिळतें, किंवा वाऱ्याच्या निश्चलपणानें तरंग, उसळणाऱ्या लाटा लय पावतात–जिरतात. ॥ ६१ ॥

नातरी निद जात खेंवो । पावे आपुला ठावो ॥
तैशी बुद्धित्यागें देवीदेवो । वंदिलीं मियां ॥ ६२ ॥

पदांचा अर्थ—**नातरी**–अथवा; **निद**–झोंप, निद्रा; **जात खेंवो**–जातांचक्षणीं; (**जसें**–ज्याप्रमाणें); **आपुला ठावो**–आपली जागृति, हें ठिकाण; **पावे**–प्राप्त होतें; **तैशी**–तशीच; **बुद्धित्यागें**–अहंबुद्धि त्यागानें, मीपणानें, द्वैताच्या त्यागानें, त्यागपूर्वक एकत्वानें; **मियां**–मीं ज्ञानदेवानें; **देवीदेवो**–शिवशक्तींना; **वंदिलीं**–वंदन केलें.

भावार्थ—अथवा निद्रा जातांक्षणींच आपण आपल्या मूळच्या जागृतीचें ठिकाणीं पोंचतों, आपण जागे होतों, तसेंच मी ही अहंबुद्धि,–जीवपणाची उपाधि,–तिचा त्याग करून, असा द्वैतभावरहित होऊन एकपणानें देवीदेवो त्या शिवशक्तीला वंदन केलें. ॥ ६२ ॥

सांडूनि मीठपणाचा लोभु । मिठें सिंधुत्वाचा घेतला लाभु ॥
तेविं अहं देऊनि शंभु–। शांभवी झालों ॥ ६३ ॥

पदांचा अर्थ—**मिठें**–मिठानें; **मीठपणाचा**–अहंभावाचा; **लोभु**–अभिमान; **सांडूनि**–टाकून देऊन; **सिंधुत्वाचा**–सिंधुपणाचा; **लाभु घेतला**–प्राप्ति केली, ऐक्य केलें, मीठ सिंधूएवढें व्यापक झालें; **अहं देऊनि**–अहं हा जीवभाव त्यारहित होऊन; **शंभु–शांभवी**–तें शंभु–शिव, शांभवी–शक्ति मिळून शिवशक्तिस्वरूप; **झालों**–मी ज्ञानदेव, तें स्वरूप होऊन गेलों.

भावार्थ—मीठपणाचा लोभ सोडून देऊन तें मीठ सिंधुपद पावतें, सिंधूएवढें व्यापक होतें. तसाच माझा अहंभाव निरसन झाल्यानें मी स्वतःच परमात्मरूप असा शिवशक्तिमय होऊन गेलों आहें. ॥ ६३ ॥

शिवशक्तिसमावेशें । नमन केलें म्यां ऐसें
रंभागर्भ आकाशें । रिगाला जैसा ॥ ६४ ॥

पदांचा अर्थ—**जैसा**–ज्याप्रमाणें;**रंभागर्भ**–केळीच्या आंतील भाग,पोकळी; **आकाशें**–आकाशाशीं; **रिगाला**–जाऊन मिळतो, एकरूप होतो; तसेंच **शिवशक्तिसमावेशें**–परमात्ममय या शिवशक्तिऐक्यरूपांत; **ऐसें**–असें, तादात्म्यानें; **म्यां नमन केलें**–मीं ऐक्यभावानें समरस होऊन नमन केलें.

भावार्थ—जशी केळीचीं सोपटें काढल्यावर ती पोकळी आकाशांत मिळून जाते, वास्तविक ती आकाशस्वरूपच नित्य असते; तसा जगताचा गर्भच मूळ स्वरूप अशा त्या शिवशक्तीच्या एकमय स्वरूपाशीं सदैव एकरूप असलेला मीं त्यांना ऐक्यभावानें हें नमन केलें. ॥ ६४ ॥

याप्रमाणें नित्यपरमात्ममय अशा शिवशक्ति ऐक्यस्वरूपाचें वास्तविक व यथास्थित वर्णन करून, त्यांचें अभेदरूप नमन तें जसें या प्रकरणाच्या आरंभींच्या ओवींतील नमनानें दर्शविलें कीं, " ऐसीं इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें " अशीं जगताला निर्माण करणारीं ईश्वरमाया, देवदेवी, शिवशक्ति हीं सर्व निरुपा-

धिक, द्वैतरहित एक असें परब्रह्मच, असा केलेला सिद्धान्त; तो येथें जो उपक्रम तोच उपसंहार करून तेंच असें नमनपूर्वक हें प्रथम प्रकरण महाराजांनीं समाप्त केलें.

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे शिवशक्ति-समावेशनं नाम प्रथमं प्रकरणं समाप्तम्॥

असें श्रीसिद्धानुवाद असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें शिवशक्तिसमावेशननामक पहिलें प्रकरण समाप्त.

प्रकरण दुसरें

श्रीगुरुस्तवन

सद्गुरूंना वंदन करण्यापूर्वी त्यांचें यथार्थ स्वरूपाचें वर्णन श्रीज्ञानदेव करीत आहेतः—

आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा आहेवतंतु ॥
अमूर्तचि परि मूर्तु । कारुण्याचा ॥ १ ॥

पदांचा अर्थ—**आतां**–नंतर, (शिवशक्तिसमावेशन वर्णनानंतर); **उपायवनवसंतु** (उपाय+वन+वसंतु)–**उपाय**–साधनें हेंच; **वन**–अरण्य, त्याला; **वसंतु**–वसंताप्रमाणें सुखदायक; **जो**–जे गुरुराज; **आज्ञेचा**–ब्रह्मविद्येचा; **आहेवतंतु**–सौभाग्यसूत्र, मंगळसूत्र; **अमूर्तचि**–निराकारच (असूनहि); **परि**–तरीसुद्धां; **कारुण्याचा मूर्तु**–पूर्णदयेची मूर्तिच, मूर्तिमंत दयाच, दयाघन.

भावार्थ—अनेक साधनें गहनवनाप्रमाणें असणाऱ्यांस सुखविणारे वसंतऋतुच जणुं, असे हे विद्येचे मंगल, स्त्रीला जसें सौभाग्यसूचक, मंगलदायक मंगळसूत्र, तसेंच शरणागतांना मंगलमय करणारे ते निराकार परब्रह्मरूप असूनहि भक्तांसाठीं कृपाघन सगुण झालेले. ॥ १ ॥

सुबोधविवरण—योगवासिष्ठामध्यें श्रीरामरायाला वसिष्ठमुनि सुचवितात कीं, "यावन्नानुग्रहः साक्षात् जायते परमेश्वरात् । तावन्न सद्गुरुः कश्चित् सच्छास्त्रं नापि लभ्यते"–जोंवर परमेश्वराचा प्रत्यक्ष अनुग्रह, कृपाप्रसाद होणार नाहीं, तोंवर सत्स्वरूपाची प्राप्ति करून देणाऱ्या एखाद्या महापुरुषाचा, तसेंच सत्स्वरूपाची ओळख करून देणाऱ्या, अशा एखाद्या शास्त्राचा लाभ होणारच नाहीं. ह्याच आशयानें सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं पहिलें प्रकरण परमात्मा परमेश्वरस्वरूपाच्या यथार्थस्वरूपाचें दिग्दर्शन यथास्थित करून संपविलें, तें याच हेतूनें कीं, निजस्वरूपप्राप्तीची तीव्र जिज्ञासा होऊन त्यासाठीं एकसारख्या तळमळणाऱ्या साधकांस पूर्ण मार्गदर्शन व्हावें. अनंतकोटिब्रह्माण्डमय विश्व, ईश्वरमाया, देवदेवी, शिवशक्ति, हीं कोणीहि अन्य नसून "एकोऽहं बहु स्याम्" एकच एक मी अनेक रूपांनीं स्वानंदभोगाच्या विलासासाठीं नटत असलों, तरी तो सोहळा एकपणांतलाच. "तुज सगुण म्हणो का निर्गुण रे । सगुण निर्गुण गोविंदु रे ॥" अशीं हीं श्रीहरिभगवंताचीं दोन्ही स्वरूपें

आठवून प्रेममय स्थितींतून श्रीज्ञानराज उद्गारलेले दिसत आहेत. " सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा अमृतस्वरूपा च " या परमात्मा श्रीहरिविषयींची अनिवार प्रेमस्फूर्ति एकसारखी सतत त्याच्याशीं तन्मय होऊन **अमृतरूप** ती भक्ति असें भक्तराज नारदमुनि आपल्या भक्तिसूत्रांत स्फुरलेले आहेत. आशय हा कीं, श्रीहरिअनंतकोटि-ब्रह्माण्डनायकाविषयींच्या प्रेममयी देहभानविवर्जित अन्यन्यभक्तीचा उदय झाला कीं, तोच श्रीहरिपरमात्मा आपणच सद्गुरुरूप होऊन त्या सद्भक्त, प्रेमळ शिष्याला कृतार्थ करीत असतो. " माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥ " असें श्रीतुकोबाराय आपला स्वानुभव सांगत आहेत. एकरूप तन्मयभक्तीचा परिपाक झाला असतां तें उपास्य दैवतच गुरुरूपानें प्रकट होतें आणि असें होतांच तीं अनेकविध साधनांचीं वनें " योगयागविधि येणें नोहे सिद्धि ॥ वायांची उपाधी दंभधर्म ॥ १ ॥ भावेंविण देव न कळे संदेह । गुरुविण अनुभव कैसा कळे ॥ २ ॥ " असें स्वतः श्रीज्ञानराज आपल्या हरिपाठांत निवेदितात; कीं योग, यज्ञयाग, अनेक प्रकारचीं विधियुक्त कर्मानुष्ठानें, जपजाप्यादिक उपासनें हीं सर्व देहाभिमान वाढविणारीं आहेत. तीं सर्व फलद्रूप होतात जेव्हां भगवत्कृपेनें सद्गुरुप्राप्तीचा वसंत-ऋतूचा सुखमय उदय होतो तेव्हांच. स्वरूपतः निर्गुण निराकार असलेले ते दयाघन सद्गुरु सगुणसाकार, मूर्तस्वरूप धारण करून सौभाग्यसूचक स्त्रियांच्या मंगलसूत्राप्रमाणें निजाङ्गीच्या ब्रह्मज्ञानाचें मंगलस्वरूपच जणूं असे श्रीनिवृत्तिनाथमहाराज कसे निजभक्ताचा कैवार घेऊन दयार्द्र होऊन त्यावर कृपा करतात तें सांगतातः—

अविद्येचे आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे ।
तया चैतन्याचे धांवे । कारुण्यें जो कीं ॥ २ ॥

पदांचा अर्थ—**अविद्येचे**–आत्मस्वरूपविस्मृतिरूप मूलअज्ञानाचे; **आडवे**–अरण्यांत; **जीवपणाचे भवे**–जन्ममरणाचे फेरे; **भुंजीत**–भोगत असलेल्या; **तया**–त्या; **चैतन्याचे**–जीवाचीं; **कारुण्यें**–दया, करुणा येऊन; **जो कीं धांवे**–जे अगदीं निश्चयानें धांवून जातात.

भावार्थ—आत्मस्वरूपविस्मृतीमुळें एखाद्या गहन अरण्यांतल्या अनेक वाटा चालून जाऊनहि बाहेर पडण्याची वाट न सांपडणाऱ्याच्यासारख्या जन्ममरणरूप फेरे फिरत असलेल्या त्या जीवाची करुणा येऊन जे तात्काळ धांवून जाणारे होत. ॥२॥

मोडूनि मायाकुंजरु । मुक्तिमोतियाचा वोगरु ।
जेवविता सद्गुरु । निवृत्ति वंदूं ॥ ३ ॥

पदांचा अर्थ—मायाकुंजरु–(माया+कुंजर)–मायारूप, स्वरूपविस्मृतिरूप मूलअज्ञान हाच कुंजर–मदोन्मत्त हत्ती; **मोडूनि**–नाहींसा करून, मारून टाकून; **मुक्तमोतियाचा**–असल्या मत्त हत्तीच्या गंडस्थळांत सांपडणारा मोती, ज्याला मुक्तमोती म्हणतात त्या मुक्तमोत्याचें; **वोगरु**–पक्वान्न; **जेववितां**–जेवूं घालणारे; **सद्गुरुनिवृत्ति**–अशा सद्गुरु निवृत्तिनाथमहाराजांस; **आम्ही वंदूं**–माझें वंदन असो.

भावार्थ—एखाद्या अतिनिबिड अरण्यासारख्या साधनांचा अनेक वाटा चालून चालून थकून जाऊन त्यांमधून बाहेर पडण्याची वाट न सांपडण्यानें होणारा मोठा थोरला भ्रम हाच कोणी एक स्वस्वरूपविस्मृतिरूप **मायाकुंजर**–मत्त हत्ती–त्याला मारून टाकून त्यानें मोहनिरास पूर्ण झाल्यानें मुक्तिरूप मोत्याचें पक्वान्न जेवूं घालणाऱ्या सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथमहाराजांना माझें ज्ञानेश्वराचें वंदन असो.

सुबोधविवरण—" स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोतियं ब्रह्मनिष्ठं " या श्रुतिवचनानुरूप असलेले असे अध्यात्मशास्त्रनिपुण, पूर्णब्रह्मनिष्ठ श्रीनिवृत्तिनाथमहाराज होत. त्यांनींच " मनाचा मार न करितां । इंद्रियां दुःख न देतां । येथ मोक्ष आयता । श्रवणाचिमाजि ॥ " या ज्ञानेश्वरींतल्या चवथ्या अध्यायाच्या शेवटच्याप्रमाणें तसेंच "आत्मा वारे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः" अशा अंतरंगसाधनद्वारां तत्त्वमसिवाक्यांनीं केलेल्या बोधाच्या परिपाकानेंच त्या मायाकुंजरूचा नाश करून मला जीवन्मुक्ति सुखसोहळ्याचें भोजन घालणाऱ्या सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथमहाराजांस कृतज्ञतापूर्वक सामरस्याचें वंदन मी ज्ञानेश्वर करतों. ॥ ३ ॥

अशा सद्गुरुनाथांच्या कृपादृष्टीचें सामर्थ्य केवढें तें आतां आत्मनिवेदनपूर्वक श्रीज्ञानेश्वरमहाराज स्वानुभव सांगताहेतः—

जयाचेनि अपांगपातें । बंध मोक्षपणीं आते ।
भेटे जाणतया जाणतें । जयापाशीं ॥ ४ ॥

पदांचा अर्थ—जयाचेनि–ज्यांच्याच केवळ; **अपांगपातें**–अद्वैत दृष्टीनें, ज्ञानमय दृष्टीनें; **बंध**–स्वरूपाचें अज्ञान, जीवभाव; **मोक्षपणीं**–आत्मरूप, मोक्षरूप, स्वरूपमयज्ञान; **आते**–होतें, पूर्ण प्राप्त होतें; **जयापाशीं**–ज्यांच्यापासून; **जाणतया**–परोक्षज्ञान्यास, शब्दज्ञान्यास; **जाणतें**–अपरोक्षज्ञान, प्रत्यक्षज्ञानप्राप्ति; **भेटे**–पूर्णपणें होते.

भावार्थ—ज्यांच्या केवळ ज्ञानदृष्टीनें स्वस्वरूपाचा विसर हा जो बंध, जीवभाव, तो आतां निरसन होऊन स्वस्वरूपाची प्रातिरूप बंधनातीत स्थिति, तो मोक्ष पूर्णपणें प्राप्त होतो, व त्यांच्याच त्या सान्निध्यांत तो परोक्षज्ञानी अपरोक्षज्ञानमय असा पूर्णब्रह्म होतो.

सुबोधविवरण—पूर्णसिद्ध सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथमहाराजांसारखे त्यांच्या नुसत्या कृपाकटाक्षानेंच पूर्ण स्वरूपविस्मृति हा जो मुमुक्षूला झालेला दृढबंध तो जीवभाव तात्काळ नाहींसा होतो, व स्वरूपजागृतीमुळें जीवभाव हा शिव-स्वरूप होतो, व त्यांच्याच त्या सान्निध्यांत तें शिवस्वरूपाचें द्वैतभान तेंहि अगदीं नाहींसें होऊन अपरोक्षानुभव पूर्णपणें होतो. "तैसेनि अन्यथाज्ञानें । जियें घेपती जागरस्वप्नें । तियें दोन्ही केलीं लीनें । अव्यक्तामाजी ॥ ज्ञाने. १८-५४-११०० ॥ मग तेंही अव्यक्त । बोध वाढतां झिजत । पुरला (पूर्ण) बोधीं समस्त । बुडोनि जाय ॥ ११०१ ॥" तसेंच श्रीतुकोबाराय स्वानुभव सांगतात कीं, सद्गुरूंनीं "नेत्रीं माझ्या केली ओळखण" नेत्रकटाक्षानें मला स्वस्वरूपाची ओळख करून दिली. तसेंच आद्य श्रीशंकराचार्य शतश्लोकींत म्हणतात कीं, "स्वीयं साम्यं विधत्ते श्रितचरणयुगे सद्गुरुः स्वीयाशिष्ये"—सद्गुरु शरणागत शिष्याला आपलें स्वरूपपण देतात. "आपणासारिखें करिती तात्काळ । नाहीं काळवेळ तयालागीं" असें श्रीतुकोबाराय सांगतात. ॥ ४ ॥

श्रीगुरूंचें ऐश्वर्याचें वर्णनः—

कैवल्यकनकाचिया दाना । जो न कडसी थोर साना ।
द्रष्ट्याच्या दर्शना । पाडाउ जो ॥ ५ ॥

पदांचा अर्थ—**कैवल्यकनकाचिया**—कैवल्य—निर्गुणस्वरूप केवल अवस्था, मोक्ष हेंच; **कनक**—सोनें; त्याच्या **दाना**—दानाला; **जो**—जे श्रीगुरु; **थोरसाना**—हा मोठा—हा लहान; **न कडसी**—निवडीत नाहींत; **द्रष्ट्याच्या**—द्वैतमय जगत् पाहणाऱ्या जीवाच्या; **दर्शना**—भेददृष्टीला जे; **पाडाउ करी**—पाडाव करितात, नाहींसे करितात.

भावार्थ—निर्गुणस्वरूप कनकाच्या दानाला हा लहान—हा मोठा असा द्वैतभाव हे श्रीगुरु मुळींच जाणतच नाहींत; तर उलट त्या अनंतकोटिब्रह्माण्डाचें अनंतरूप दिसणारें दर्शन पाहणाऱ्या त्या द्रष्ट्या जीवाची ती भेददृष्टि नाहींशी करून टाकतात. ॥ ५ ॥

अशा सद्गुरूंच्या सामर्थ्याचें वर्णनः—

सामर्थ्याचेनि बिकें । जो शिवाचेंहि गुरुत्व जिंके ।
आत्मा आत्मसुख देखे । आरसा जिये ॥ ६ ॥

पदांचा अर्थ—**सामर्थ्याचेनि बिकें**–निर्विकार ब्रह्मनिष्ठपणाच्या–समर्थपणाच्या **बिकें**–अधिकारानें; **जो**–जे श्रीगुरु; **शिवाचेंहि गुरुत्व**–ब्रह्माविष्णुमहेशादिकांचा सृष्टिरचनादि अनेकपणाचा जो त्यांच्या ठिकाणचा मोठेपणा; **जिंके**–जिंकून, नाहींसा करून टाकून; तो **आत्मा**–असा सर्वव्यापक अभेदरूप एकमय पाहणारा तो; **जियें आरसा**–ज्या परमबोधमय शुद्धस्वरूप सद्गुरुदर्पणांत; **आत्मसुख**–केवल एकमेव सच्चित्सुख; **देखे**–अनुभवितो.

भावार्थ—वसिष्ठसांदीपनादिकांनीं तसेंच नारदसनत्कुमारादिकांनीं आपआपल्या स्वबोधरूप ब्रह्मनिष्ठपणाच्या समर्थपणाच्या अधिकारानें श्रीरामकृष्णादिकांच्या स्वरूपविस्मृतीचें निरसन केल्यानें ते आपलें निज आत्मसुख सद्गुरूंनीं कृपावलोकन केलेल्या त्या स्वबोधमय आरशांत उपभोगूं लागले. असा ब्रह्मनिष्ठ श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंचा अधिकार आहे, हें येथें सुचविलें आहे. ॥ ६ ॥

तेंच पुन्हा दृष्टान्तानें आणखी स्पष्ट करितातः—

बोधचंद्राचिया कळा । विखुरलिया येकवळा ।
कृपापुनीव लीळा । करी जयाची ॥ ७ ॥

पदांचा अर्थ—**बोधचंद्राचिया विखुरलिया कळा**–बोधरूप चंद्राच्या निरनिराळ्या शास्त्रज्ञानाच्या शिष्याच्या विस्तारलेल्या वृत्तिरूप कला; **येकवळा**–येकवटलेल्या; **जयाची कृपापुनीव**–ज्या सद्गुरुकृपेची पौर्णिमा; **लीळा**–सहज; **करी**–करते.

भावार्थ—बोधरूपचंद्राच्या अनेक शास्त्रज्ञानाच्या भेदाच्या योगानें होणाऱ्या शिष्याच्या निरनिराळ्या कळा, वृत्ति ज्या सद्गुरुकृपेच्या पौर्णिमेनें पूर्णबोधानें एकमेव अद्वितीय स्वरूपज्ञानाच्या प्राप्तीनें सहज एक होतात. ॥ ७ ॥

जो भेटलियाचि सवे । पुरति उपायांचे धांवे ।
प्रवृत्तिगंगा स्थिरावे । सागरीं जिये ॥ ८ ॥

पदांचा अर्थ—**जो**–जे श्रीगुरु; **भेटलियाचि सवे**–भेटतांक्षणींच, स्वस्वरूपाची ओळख (त्यांनीं) करून देतांक्षणींच; **उपायांचे धांवे**–साधनांच्या खटपटी;

पुरति–पुऱ्या होतात; प्रवृत्तिगंगा–बाह्यवृत्तिरूपगंगा, ओघ; जिये सागरीं–ज्या परमात्म सद्गुरुकृपासागरांत; स्थिरावे–शान्त होतात, समरस होतात.

भावार्थ—श्रीगुरूंची भेट म्हणजेच तो परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार होतांच सर्व साधनरहित स्थिति होते. " तैसी क्रिया कीर न साहे । तऱ्ही अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें, नव्हे । बोला ऐसें ॥ ज्ञाने. १८–५५ ११५१ ॥ तैसें रूप होऊनि माझें । मातें क्रियावीण तो भजे । घनाकार कां सहजें । सोनयातें जेवीं ॥ ज्ञाने. १८–५५–११४९ ॥ " " साधुबोध झाला । नुरोनियां ठेला । ठायींच मुराला । स्वानुभव ॥ "–ज्ञानदेव हरिपाठ ॥ " कापुराची वाती । उजळली ज्योती । ठायींच समाती । झाली जैसी ॥"–ज्ञानदेव हरिपाठ ॥ आतां मनाची प्रवृत्तिरूपगंगा मन अमन होऊन त्या स्वबोधसागरांत एकरूप होऊन जाते. ॥ ८ ॥

आतां सद्गुरूच्या कृपेनें आधीं असलेला जीवभाव तो शिवभाव कसा होतो तेः—

जयाचेनि अनवसरें । द्रष्टा ले दृश्याचें मोहिरें ।
जो भेटतखेंव सरें । बहुरूपचि हे ॥ ९ ॥

पदांचा अर्थ—जयाचेनि अनवसरें–ज्यांच्या अदर्शनानें; द्रष्टा–जीव; दृश्याचें–अनंत जगताचें; मोहिरें–स्वरूप, व्यवहार; ले–पाहात असतो; जो भेटतखेंव–जे सद्गुरु भेटतांक्षणींच; हे बहुरूपचि–हें अनेकत्वाचें जगत्स्वरूप, दृश्यभाव; सरें–संपतें.

भावार्थ—सद्गुरूंचें दर्शन होईपर्यंत जीव या विश्वांतले अनंत व्यवहार पाहात असतो; हें त्याचें द्वैत पाहणें सद्गुरुदर्शन होतांक्षणींच हें विश्वाचें बहुरूपद्वैतभान संपतेंच. चांगदेव अक्राळविक्राळ वाघावर बसलेले, हातांत भयंकर नागाचा चाबूक घेतलेले, सद्गुरुप्राप्तीसाठीं सकाळचें ऊन खात भिंतीवर बसलेल्या श्रीज्ञानेश्वरमाउलींच्या भेटीस आले असतां एकमेकांची नजरानजर होतांक्षणींच माउलीच्या त्या दृष्टिक्षेपकृपाकटाक्षानें झालेल्या स्वस्वरूपप्राप्तीच्या त्या परमानंदभरांत चांगदेव " मावळवीत विश्वाभास । नवल उदयला चंडांश " असें विश्वभानरहित देहस्मृतिविवर्जित आपण स्वतः, तसेंच तो वाघ, तो नाग, त्यांचेंहि भाग्य उदित झाल्यामुळें सर्वांचा अनेकत्वाचा दृश्य जगद्भास नाहींसा होऊन ते एकरूप होऊन गेले. श्रीनामदेवराय श्रीहरीच्या आज्ञेनुरूप पंढरीहून अवंढ्या नागनाथमंदिरांत गेले तेव्हां ते देहभानरहित व द्वैतभावविरहित अशा परमानंदांत जिरून गेलेल्या विसोबा खेचरांचा चरणस्पर्श होतांक्षणींच विसोबारायांच्या

त्या सर्वमय परमानंदसुखभरांत द्वैतभानरहित देहभावविस्मरणानें एकरूप होऊन गेलें, हें सर्वश्रुत आहेच. " आकार जेथ सरे । जीवत्व जेथें विरे । द्वैत जेथ नुरे । अद्वय जें ॥ ज्ञाने. १३–३४–११४३ ॥ तें परमतत्त्व पार्था । होती ते सर्वथा । जे आत्मानात्मव्यवस्था । राजहंस ॥ १३–१४–११४४ ॥ ऐसा जो आघवा । श्रीकृष्णें तया पांडवा । उगाणा (प्रत्यय) दिघला जीवा । जीवाचिया ॥११४५॥ येर कलशीचें येरीं । रिचविले जयापरी । आपण पें श्रीहरी । दिघलें तैसें ॥११४६॥" असें आपलें " किंबहुना दिघलें । सर्वस्व देवें ॥ ११४८ ॥ " सर्वरूपपरायणतेचें वैभव श्रीकृष्ण श्रीगुरुदेवानें केवळ उपदेशाचें निमित्त करून निजशब्दशक्ति-सामर्थ्यानें अर्जुनास देऊन परमानंदमय करून सोडलें. ॥ ९ ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराज भगवत्साक्षात्कारविषयींचा भाव उदित करणाऱ्या निर-निराळ्या भूमिकांनीं " सर्व कांहीं एकमेव परब्रह्मच " असा सिद्धान्त निश्चित करीत असतांना अनेक दृष्टान्तांनीं त्याची मांडणी करतात ती कसकशी तें आतां पाहूं:—

स्वस्वरूपविस्मृतीची काळोखी निद्रा सिद्ध महात्मा अशा सद्गुरूंचें दर्शन होतांच ती स्वस्वरूपप्राप्तिरूप सूर्यप्रकाशमय होऊन जाते:—

अविद्येचें काळवंखें । कीं स्वबोध सुदिनें फांके ।
सीतळें प्रसादार्कें । जयाचेनि ॥ १० ॥

पदांचा अर्थ— **अविद्येचें काळवंखें**– (एकारान्त नपुंसकलिंगी शब्द) स्वस्वरूपविस्मृति हीच अविद्या, हाच अज्ञानमय काळोख; **कीं**–हें आश्चर्य होय; **स्वबोध**–निजस्वरूपाचें ज्ञान, स्वस्वरूपाची पूर्ण ओळख; (असा) **सुदिनें**– (एकारान्त नाम) प्रकाशमय दिवस; **जयाचेनि**–ज्या सिद्ध सद्गुरूंच्या; **सीतळें**– शान्त अशा; **प्रसादार्कें**–(प्रसाद+अर्कें–प्रसाद हाच अर्क त्यानें) कृपारूप सूर्यानें; **फांके**–प्रकाशतो, तो स्वबोध दिवस उगवतो.

सविवरण भावार्थ—स्वस्वरूपविस्मृति हा काळोख, जणूं अंवसेची काळीकुट्ट रात्र, स्वस्वरूपाचा पूर्ण ज्ञानमय असा प्रकाशमय दिवस होऊन ज्या सिद्ध महात्मा पुरुषांची पूर्ण कृपा हा जणूं बालसूर्यच त्याच्या शान्त, थंड तेजानें तो फांकतो, त्याचप्रमाणें अज्ञाननिवृत्ति झाल्यानें तें जसें सकाळच्या स्वच्छ, निरभ्र अशा बालसूर्याच्या नुकत्याच उगवण्यानें काळोखी रात्र नाहींशी होऊन ती प्रकाशमय दिवस होते, तद्वतच सद्गुरुकृपेच्या उदयानें पूर्ण ज्ञानमय होऊन तो ज्ञानप्रकाश आतां सर्वत्र पसरतो. ॥ १० ॥

सद्गुरुकृपेनें जीवास प्राप्त होणारें पावित्र्य केवढें मोठें असतें तें सांगतातः—

जयाचेनि कृपासलिलें । जीउ हा ठाववरी पाखाळें ।
जें शिवपणहि वोंविळें । अंगीं न लवी ॥ ११ ॥

पदांचा अर्थ—जयाचेनि कृपासलिलें—ज्या सद्गुरूंच्या कृपारूप; सलिलें—शुद्ध उदकानें; जीउ—जीवाचा जीवपणा, देहबुद्धीनें होणारा अपवित्रपणा, अल्पज्ञानाचा संकुचितपणा; हा ठाववरी—इतका कांहीं (सर्वव्यापक); पाखाळें—शुद्ध होतो, पवित्र होतो कीं; जें शिवपणहि—परमात्मस्वरूपावर मायेच्यामुळें होणारें उपाधिरूप शिवपण, ईश्वरपण तेंदेखील; वोंविळें—मायेचा स्पर्श हाच विटाळ, हें ओवळेपण; अंगीं—या शुद्ध जीवाच्या निजबोधाच्या ठिकाणीं; न लवी—स्पर्श करूं शकत नाहीं, लागूं शकत नाहीं, पोहोंचत नाहीं.

सविवरण भावार्थ—ज्या अशा सिद्ध परमात्मस्वरूप सद्गुरूंच्या कृपारूप जलानें जीव, तो असा हा आतां जीवन्मुक्त झालेला जीव इतका कांहीं पवित्र होऊन जातो कीं, ईश्वरास मायेमुळें आलेलें शिवपण "मायाबिंबं वशीकृत्य ती स्यात् सर्वज्ञ ईश्वरः" असें पंचदशीकारांनीं म्हटलेलें, तसेंच "स्वमायेचें आडवस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र । बाहेरी नटी छायाचित्र । चौऱ्याऐंसी लक्ष ॥ ज्ञाने. १८–६१–१३०३ ॥" तें शिवपण, स्वमायेचा पडदा उभारून हा एकटाच ईश्वर चौऱ्याऐंशी लक्ष जीवयोनींचा सिनेमा जें छायाचित्र त्यांत जीवांना एकसारखें सोंगें देऊन नटवीत असतो, त्याचें असलें हें अनेकत्वाचें द्वैतपणाचें शिवपण हेंच ओवळेपण या जीवन्मुक्त जीवाच्या निजपरमात्मस्वरूपाच्या अंगीं, ठिकाणीं न लवी, लागत नाहीं, स्पर्श करूं शकत नाहीं, पोहोंचूं शकत नाहीं. शिवभावरहित निर्विकार परब्रह्मस्वरूपाच्या प्राप्तीच्या ठिकाणीं अनंतकोटि ब्रह्माण्डमय जगत्, अशा जगताचा कर्ता ईश्वर व त्याची माया हा असला ओवळेपणाचा स्पर्श सद्गुरुकृपेंतल्यांना कधींच होत नसतो. ॥ ११ ॥

जीवाला जीवन्मुक्तावस्था प्राप्त झाल्यानें येणारा सद्गुरुपणा हा भावहि त्यांच्या ठिकाणीं मुळींच कसा नसतो हें श्रीज्ञानेश्वरमहाराज येथें स्पष्ट करून दाखवीत आहेत तें असेंः—

राखों जातां शिष्यातें । गुरुपणहि धाडिलें थितें ।
तऱ्ही गुरुगौरव जयातें । सांडीचिना ॥ १२ ॥

पदांचा अर्थ—शिष्यातें राखों जातां—शिष्याचें रक्षण केल्याचें, त्याचें अज्ञान निवृत्त केल्याचें, त्याचा उद्धार केल्याचें; थितें—नसतेंच आलेलें; गुरुपणहि—

असलें हें सापेक्ष मोठेपण, तसलें तें श्रेष्ठपण; **धाडिलें (होय)**–उरतच नसतें, घालवून दिलेलें होतें; **तन्ही**–तरी पण; **जयातें गुरुगौरव**–ज्यांचें तें परमात्मस्वरूप स्वयंसिद्ध गुरुपणाचें असलेलें सर्वमय श्रेष्ठपण; **सांडीचिना**–सुटतच नसतें, कमी होतच नाहीं, दूर होतच नाहीं.

भावार्थ—असल्या अधिकारी जीवन्मुक्त शिष्याचा उद्धार केल्यानंतरचें प्राप्त होणारें नसतेंच आलेलें गुरुपण त्याची त्या महापुरुषाच्या ठिकाणीं जाणीव देखील उरत नाहीं. तरी पण त्याचें तें मूळचें परमात्मस्वरूप स्वयंसिद्ध गुरुपणाचें असलेलें सर्वमय, सर्वव्यापक श्रेष्ठपण कधींच सुटत नाहीं. तें अभेदरूप निर्विकारपण नित्य असतें, तसेंच केव्हांहि असतें. ॥ १२ ॥

एकमेव अद्वितीय अशा एकमय स्थितींत स्वानंदाचा भोग द्वैतानेंच होतो. तो कसा होतो, हें पाहावें म्हणून सद्गुरु तो सुखसोहळा आपल्याच ठिकाणीं निज द्वितीयत्वानें, गुरुशिष्यपणाचा विलास करून आतां पाहतातः—

एकपण नव्हे सुसास । म्हणोन गुरुशिष्यांचें करोनि मिस ।
पाहणेंचि आपली वास । पाहतसे ॥ १३ ॥

पदांचा अर्थ—**एकपण**–ऐक्यभाव, एकमेव अद्वितीयपणा, केवलत्व; **सुसास**–सुखाचा, स्वानंदरस भोगण्याचा; **नव्हे**–विलास द्वैतावांचून होत नाहीं; **म्हणोन**–यासाठीं, एवढ्याचकरितां; **गुरुशिष्याचें**–गुरु आणि शिष्य या दोन रूपांचें; **मिस करोनि**–निमित्त करून; **पाहणेंचि**–पाहावें म्हणूनच; **आपली वास**–आपलें द्वैतमय स्वरूप; **पाहतसे**–होऊन पाहतात.

भावार्थ—एकमेव अद्वितीय हा जो ऐक्यभाव, सदैव एकपणानेंच असणें हें सुखास कारण होणार नाहीं; कारण स्वस्वरूपाच्या आनंदाचा भोग द्वैतावांचून नाहीं, म्हणून विलासासाठीं गुरुशिष्य होण्याचें निमित्त करून पाहावें म्हणून आपलें द्वैतमय स्वरूप आपल्याच ठिकाणीं होऊन पाहतात. "माझ्या विठोबाचा कैसा भाव । आपणचि देव, गुरु होय ॥" (श्रीतुकोबाराय अभंग).

सुबोधविवरण—परमात्मा श्रीगुरूस एकपणांत सुख नाहीं म्हणून आपण "एकोऽहं बहु स्याम्" एकच मी अनंतरूपें व्हावें "आणि आकाराचेंनि जालेपणें । जन्मधर्मातें नेणें । आकारलोपीं निमणें । नाहीं कहीं ॥" (ज्ञाने. ८–३–१८). अनंतकोटिब्रह्माण्डरूप दृश्य जगताच्या उत्पत्ति व नाशामुळें होणारे जन्मनाशादिक धर्म जेथल्या एकपणांत कधींच नसतात. "ऐसिया आपलियाचि सहजस्थिती । जया ब्रह्माची नित्यता असती ॥ (ज्ञाने. ८–३–१९)" अशा

आपल्याच द्वैतरहित निर्विकार सहज स्वरूपानें त्या परब्रह्मस्वरूपाचें नित्यपण असतें. "तेंच मी बहुत व्हावें असा संकल्प उठतो." "मग गगनीं जेविं निर्मळें । नेणों कैंचीं एकवेळे । उठती घनपटळें । नानावर्णें ॥ (ज्ञाने. ८–३–२०)." "तैसे अमूर्ती तियें विशुद्धें । महदादि भूतभेदें । ब्रह्मांडाचे बांधे (रचना) । होंचि लागती ॥ (ज्ञाने० ८–३–२१)." परमात्म्यास जेव्हां आपण बहुत व्हावें अशी इच्छा उत्पन्न झाली तेव्हां महत् जी प्रकृति व तिची अनंत ब्रह्माण्डांची रचना सहज होऊन आपणच त्यांत प्रवेश केला. परमात्मा निर्गुण निर्विकल्प असतां त्यास इच्छा उत्पन्न कां व्हावी, अशी शंका आल्यास तिचें निरसन असें कीं, जीवाच्या बुद्धींत नसत्या जगताची कल्पना दृढ झालेली असते, हा त्याचा अज्ञानजन्य भ्रम म्हणजेच स्वतांच्या परमानंद एकमय निर्विकार देह-भावरहित स्थितीचा विसर. हा भ्रम निरसन करण्यासाठीं आधीं परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं माया उत्पन्न होऊन तिच्या योगानें सर्व ब्रह्माण्डरचना होते, असें श्रुतीला प्रतिपादन करावें लागलें. माया ही परमात्मानित्यपरमानंदस्वरूपावर कल्पित असते. कल्पित पदार्थ हा नित्य अधिष्ठानरूपच असतो. म्हणून ईश्वर, माया, जगत् भ्रमकालींसुद्धां हीं सर्व परमात्मस्वरूपच असतात. परमात्म्याव्यतिरिक्त यत्किंचित् पदार्थ नाहीं, असें सांगून श्रुति त्याचा भ्रम नाहींसा करते कीं, सर्व काहीं एकच एक सद्गुरु परमात्मस्वरूपच आहे. ॥ १३ ॥

आतां सद्गुरुकृपेच्या यत्किंचित् कृपांशाचा केवढा प्रभाव असतो तें सांगतातः—

जयाचेनि कृपातुसारें । परतले अविद्येचें मोहिरें ।
परिणमे अपारें । बोधामृतें ॥ १४ ॥

पदांचा अर्थ— **जयाचेनि**–ज्या सद्गुरूंच्या; **कृपातुसारें**–कृपालेशानें, कृपादृष्टिपातानें; **अविद्येचें**–अज्ञानरूप स्वरूपविस्मृतीचें; **मोहिरें**–धांव, चाल, हल्ला; **अपारें**–पूर्ण; **बोधामृतें**–स्वस्वरूपाचा बोध हेंच अमृत त्यांत, स्वरूपज्ञानांत; **परिणमे**–एकरूप होतें.

भावार्थ—ह्या सद्गुरुकृपादृष्टीनें अविद्येची गति कुंठित होते व ती अपार बोधामृतमय होऊन जाते. स्वस्वरूपाचें अज्ञान तत्काळ निरसन होऊन सद्गुरु-माउलीचें अशा तऱ्हेचें दर्शन होतांक्षणींच "आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळ वेळ तयालागीं ॥" ह्या श्रीतुकोबारायांच्या उक्तीप्रमाणें शरणागत शिष्य अविद्या दूर झाल्यानें पूर्ण बोधरूप होतो. ॥ १४ ॥

सद्गुरुचरणाची अशी भेट होतांच त्याची स्थिति कशी होते तें श्रीज्ञानराज वर्णितातः—

वेद्या देतां मिठी । वेदकु सुये पोटीं ॥
तन्ही नव्हेचि उसिटी । दिठी जयाची ॥ १५ ॥

पदांचा अर्थ— वेद्या—ज्ञानमूर्तिदृश्यरूप दर्शनीयरूपास, ज्ञेयपदार्थास, दर्शनास योग्य अशा वस्तूस—सद्गुरूस; वेदकु—द्रष्टा, ज्ञानमय होऊन जाणणारा, ज्ञान प्राप्त करून घेणारा शिष्य; मिठी देतां—ऐक्य होतांच, भेट होतांच; पोटीं—पोटांत, सद्गुरुस्वरूपांत; सुये—ज्ञानरूप होतो, लय पावतो, तद्रूप होतो; तन्ही—तरीसुद्धां; जयाची दिठी—ज्या सद्गुरूंची दृष्टि; उसिटी—शिष्यज्ञानस्वरूप होण्यानें द्वैतभावरूप दूषित, खरकटी, अशुद्ध; नव्हेचि—होतच नाहीं.

सविवरण भावार्थ—ब्रह्मस्वरूपसद्गुरु (वेद्या)शीं ब्रह्मरूप होऊन जाण्याची इच्छा करणाऱ्या शिष्या (वेदक)स ऐक्यदृष्टीची नेत्रीं (मिठी) ओळख होतांच ब्रह्मसाक्षात्कारानें सद्गुरुस्वरूपांत (पोटीं) शिष्य—वेदक (सुयें) जीवाभावानें नाहींसा होतो—गट्ट होतो, एकरूप होतो. (तन्ही) एवढें झालें असूनसुद्धां ज्या सद्गुरूंची दृष्टि (दिठी) शिष्य कृतार्थ झाल्याची ही वृत्ति—हा द्वैतभाव (उसिटी नव्हेचि) त्यांच्या ठिकाणीं उरतच नाहीं. सिद्धपरमात्मसद्गुरुस्वरूप जे एकच एक अशा त्या स्वरूपांत हा गुरु, हा शिष्य हा द्वैतभावच नाहीं. जगत्—भानरहित देहभावविवर्जित परब्रह्मसद्गुरु निर्विकार निरुपाधिक ते—सूर्याला जसा दिवस आणि रात्र हीं दोन्ही माहीत नसतात तसे नित्य सिद्धस्वरूप असतात. शिष्य-बुद्धींत असणारें अज्ञान नाहींसें करून त्याला कृतार्थ करण्यापुरताच सापेक्ष सद्गुरु-भाव त्यांच्या ठिकाणीं स्फुरतो खरा, पण तोहि जाणीव तिथें उरत नसतेच. निज-स्वानंदाचें परमप्रेममय भक्तिसुखाचें भोग्य आपणच गुरु आपणच शिष्य होऊन सद्गुरु असा हा द्वैताच्या विलासाचा सोहळा 'सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा' नारद-भक्तिसुखांतला भोगतात. ॥ १५ ॥

मागीलप्रमाणेंच सद्गुरुकृपादृष्टीचें वैभव सांगतातः—

जयाचेनि सावायें । जीव ब्रह्म उपर लाहे ।
ब्रह्म तृणातळीं जाये । उदासें जेणें ॥ १६ ॥

पदांचा अर्थ—जयाचेनि सावायें—ज्यांच्या साहाय्यानें; जीव—शिष्याचें जीवपण, अज्ञान; ब्रह्म उपर—अहंब्रह्मस्थितीपलीकडील; लाहे—(प्राप्त) होतें;

जेणें उदासें–ज्यांच्या उदासपणानें, अवकृपेनें; ब्रह्म–प्राप्त झालेला तो ब्रह्मभाव, ती ब्रह्मस्थिति; तृणातळीं–तृणापेक्षांदेखील खालच्या योग्यतेस, ब्रह्मनिष्ठयोग्यता-हीन व कस्पटासमानच्या तुच्छतेस; जाये–प्राप्त होतो, जीवभावाची असलेली अज्ञान अवस्था आणखी दृढ होते.

भावार्थ—ज्या सद्गुरूंच्या कृपेच्या साहाय्यानें जीवाचें–शिष्याचें जीव-भावपण नाहींसें होऊन तो ब्रह्मनिष्ठाभावातीत असा संपन्न होतो, पूर्णब्रह्म होतो; पण ज्यांच्या उदासीनपणानें, अवकृपेनें तोच ब्रह्मनिष्ठ शिष्य जीवभावाच्या खालच्या तृणापलीकडच्या, अगदीं तृण, काष्ठ, पाषाण, वृक्ष, पशु, पक्षी ह्या असल्या अज्ञान दशेंतल्याहि खालच्या अवस्थेस पोहोंचतो, व ही अज्ञानस्थिति दृढ होते. "सद्गुरुवांचूनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं आधीं ॥" "लोहपरिसाची न साहे उपमा । सद्गुरुमहिमा अगाधचि ॥" "आपणासारिखें करिती तात्काळ । नाहीं काळ वेळ तयालागीं ॥" (श्रीतुकोबाराय). "स्वीयं साम्यं विधत्ते श्रितचरणयुगे सद्गुरुः स्वीयशिष्ये" (आचार्यकृत शतश्लोकी)—"दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः । स्पर्शश्चेत् तत्र कल्प्यः स नयति यदहो स्वर्णतामश्मसारं ॥" "तरी तनुमन जीवें । चरणासी लागावें । अगर्वता करावें । दास्य सकळ ॥ (ज्ञाने. ४–३४–१६७). ते बेळीं आपणपेंयासहितें । इयें अशेषेंहि भूतें । माझ्या स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ॥ (ज्ञाने.४–३४–१७०). ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल । तैं मोहांधकार जाईल । जैं श्रीगुरुकृपा होईल । पार्था गा ॥" (ज्ञाने. ४–३४–१७१). ॥ १६ ॥

श्रीज्ञानेश्वरींतील वरीलप्रमाणें सच्छिष्यास हें सेवेचें फल कसें मिळतें तें:—

उपास्तिवरि राबतिया । उपाय फळीं येती मोडोनियां ।
वरिपडले जयाचिया । अनुज्ञा कां ॥ १७ ॥

पदांचा अर्थ—राबतिया–अनन्य; अतिशय श्रमपूर्वक; उपास्तिवरि–उपासनेच्या योगानें; जयाचिया अनुज्ञा कां–ज्यांच्या आज्ञेप्रमाणेंच; वरिपडले–अनुसरलेले; उपाय–साधनें, उपासना; फळीं मोडोनिया येती–(झाडांप्रमाणें) फळांनीं पूर्ण भरून येतात, पूर्ण फलद्रूप होतात.

सविवरण भावार्थ—सद्गुरूंची अनन्यसेवा केल्याच्या योगानें त्यांच्या अगदीं आज्ञेनुसार अनुसरलेली उपासना फळांनीं झाड जसें भरून जातें तशी पूर्ण फलद्रूप होते. "तनुमनजीवें । चरणासी लागावें । अगर्वता करावें । दास्य सकळ ॥" (ज्ञाने. ४–३४–१६७). ॥ १७ ॥

स्वानंदसुखप्राप्ति सद्गुरुप्रसादानेंच होते ती कशी तेंः—

जयाचा दिठिवा वसंतु । जंव न रिघे निगमवना आंतु ।
तव आपुलिये फळीं हातु । नघेपतिही ॥ १८ ॥

पदांचा अर्थ—**जयाचा दिठिवा वसंतु**–ज्यांच्या (दिठिषा–दृष्टीचा) कृपादृष्टीचा वसंत ऋतु; **जंव**–जोंपर्यंत; **निगमवनाआंतु**–अध्यात्मशास्त्ररूप वनांत; **न रिघे**–प्रवेश करीत नाहीं, प्रविष्ट होत नाहीं; **तंव**–तोंपर्यंत; **फळीं**–फळांना; **आपुलिये हातु**–आपलेच हात; **नघेपतिही**–पोचूं शकणार नाहींत.

भावार्थ—ज्यांचा कृपादृष्टिरूप वसंतऋतु जोंपर्यंत शास्त्ररूप वनांत प्रविष्ट झाला नाहीं, तोंवर आत्मप्राप्तिरूप फळाला आपला हात पोहोंचूंच शकणार नाहीं.

सुबोधविवरण—जोंपर्यंत सद्गुरूंचा कृपेचा वसंतऋतु वेदान्तशास्त्रांत असलेल्या गहन विषयांच्या वनांत प्रवेश करणार नाहीं, तोंपर्यंत आम्ही होऊन कितीहि अनंत प्रयत्न फलप्राप्तीकरितां केले तरी ते कांहीं फलद्रूप होणार नाहींत; त्यास सद्गुरुकृपादृष्टीच पाहिजे. नारदमुनींना वेदान्तांतील गहन विषयांचें आकलन स्वबुद्धीनें होईना म्हणून सनकादिकांना शरण जाऊन त्यांची प्राप्ति करून घ्यावी लागली. ॥ १८ ॥

सद्गुरुकृपादृष्टीच्या वैभवाचें आणखी वर्णन निराळ्या तऱ्हेनें करीत आहेतः—

पुढें दृष्टीचेनि आलगें । खोंचि कीं निवटी मागें ।
येव्हड्या जैता नेघे । आपणपें जो ॥ १९ ॥

पदांचा अर्थ—**पुढें**–पण; **दृष्टीचेनि आलगें**–कृपादृष्टीचें एवढेंसें अग्र; **खोंचि कीं**–खोंचलें जर (तर तें अग्र); **मागें**–आंतील भागापर्यंत; **निवटी**–नाहींसें करतें, निरास करतें; **येव्हड्या**–एवढ्या मोठ्या; **जैता**–जेतेपणाला; **जो**–जे; **आपणपें**–आपल्या ठिकाणीं; **नेघे**–स्पर्श करूं देत नाहींत.

भावार्थ—सद्गुरुदृष्टीचा प्रभाव एवढा मोठा कीं, त्यांच्या दृष्टीचें एवढेंसें अग्रहि त्यांनीं शिष्याच्या स्थूल शरीरास खोंचलें म्हणजे बोंचलें – शिवलें तरी त्यानें मागें **निवटी**–आंतील कारणदेहापर्यंतचें त्याचें अज्ञान नष्ट होऊन जातें, नाहींसें होतें; तरी एवढ्या थोरल्या जेतेपणाचा त्यांच्या ठिकाणीं स्पर्शहि होत नसतो. या विजयाच्या कृतार्थतेचें एवढेंदेखील स्मरण त्यांना नसतें.॥ १९ ॥

सद्गुरूंचें स्वतःसिद्ध असलेलें गुरुत्वाचें वर्णन करतातः—

लघुत्वाचेनि मुदलें । बैसला गुरुत्वाचें सेलें ।
नासूनि नाथिलें । सदैव जो ॥ २० ॥

पदांचा अर्थ—लघुत्वाचेनि–कनिष्ठपणाच्या, अज्ञानपणाच्या; मुदलें–मूळानें, मूळ भांडवलामुळें; गुरुत्वाचें सेलें–जे गुरुपणाच्या श्रेष्ठ पदावर, उच्च पदावर; बैसला–जरी बसले, आरूढ झाले; नाथिलें–तरी तें नसतेंच लटकें, मिथ्या; (गुरुपण) नासूनि–नाहींसें करून; जो सदैव असे–जे आपले सदोदितच्या श्रेष्ठपणानेंच असतात.

भावार्थ—शिष्याच्या अज्ञानपणाच्या या लघुपणाच्या भांडवलामुळें आलेलें गुरुपणाचें श्रेष्ठपद प्राप्त झालें, तिथें हे बसले तरी तें सापेक्ष लटकें शिष्यलघुत्वामुळें गुरुत्व प्राप्त झालेलें नाहींसें करून सद्गुरु स्वभाग्याच्या स्वयंभू गुरुपणानें नित्य एकरूपच असतात. ॥ २० ॥

सद्गुरु शिष्याला मायेच्या पार करतात तें किती नवलाचें सांगतातः—

नाहीं ते जळीं बुडिजे । तैं घनवटें जेणें तारिजे ।
जेणें तरलियाहि नुरिजे । कवणिये ठायीं ॥ २१ ॥

पदांचा अर्थ—नाहीं ते जळीं–(जे नाहींच) असल्या नसत्या जळांत, मायाजळांत; बुडिजे–शिष्यानें बुडावयाचें; तैं–तेव्हां, मग; जेणें घनवटें–ज्या भरीव गुरुसाहाय्यानें; तारिजे–तरावयाचें, तरून जावयाचें, मुक्त व्हावयाचें; जेणें–ज्यांनीं; तरलियाहि–तारल्यानंतर, मुक्त केल्यानंतर; कवणिये ठायीं–कुठेंच, कोणत्याहि ठिकाणीं; नुरिजे–शिल्लक राहावयाचें नाहीं.

भावार्थ—आधीं माया म्हणून अस्तित्वांतला पदार्थच नाहीं; असल्यानसल्या मायाजळांत आधीं जीवानें बुडावयाचें, आणि सद्गुरूंच्या ज्ञानाच्या भरीव साहाय्यानें तरून जावयाचें, व ज्यांनीं तारलें असतांना त्यानें कोठेंहि देहभावानें उरावयाचें नाहीं – हें नवल नव्हे काय ?

सुबोधविवरण—आधीं जीव हा मुळींच नसलेल्या पाण्यांत बुडतो काय ? पाण्यांत तरण्याचें साधन म्हणजे वास्तविक भोपळा. तो तर आधींच हलका. त्यानें न तरतां उलट भरीव ज्ञानघन जड वजनाचे सद्गुरु या साधनानें तो तरतो; असें झालें तरी तरल्यानंतर तरी तो एखाद्या तीराला पोहोंचतो, लागतो म्हणावें तर तेंहि नाहीं. तो कुठें तरी अमुक देशांत, कालांत, वस्तूच्या ठिकाणीं असतो म्हणावें तर तो

तरणारा जीव जीवन्मुक्तावस्थेमुळें देशकाल वस्तुनिर्देशरहित प्राप्त जीवभाव तो शुद्ध होऊन अवस्थातीत झाल्यामुळें अवस्थातीत परमात्मसद्गुरुस्वरूप होऊन जातो; काय हें नवल म्हणावयाचें ! ॥ २१ ॥

सद्गुरूंचें निरुपम स्वरूप कसें तें सांगतातः—

आकाश हें सावेव । न बंधे आकाशाचि हांव ।
ऐसें कोण्ही येक भरींव । आकाश जो ॥ २२ ॥

पदांचा अर्थ—हें सावेव आकाश—हें सावयव—जड आकाश, पोकळी; त्या आकाशाची हांव—सद्गुरुचिदाकाशाची, ज्ञानमय आकाशाची; हांव—बरोबरी, उपमा; बंधे न—बंधन करूं शकत नाहीं, बंधनाची मर्यादा घालूं शकत नाहीं; ऐसें कोण्ही येक—अशा तऱ्हेचें एकच एक; जो भरींव आकाश—जे सद्गुरु पूर्ण ज्ञानघन चिदाकाश होत.

भावार्थ—सद्गुरूंना या पोकळ, सावयव, ज्यापासून शब्द उत्पन्न होतो म्हणून विकारी, अभावरूप मिथ्या, जड,— असल्या पंचमहाभूत आकाशाची उपमा शोभणार नाहीं. तें या निरवय, भरीव चिदाकाशाची बरोबरी करूं शकत नाहीं. अशा प्रकारचें पूर्ण चिद्घन आकाश सद्गुरु होत. ॥ २२ ॥

उपमा एखादी द्यावी तर ती वस्तुच सद्गुरुपरमात्म्यामुळेंच शोभिवंत असतेः—

चंद्रादि सुसीतळें । घडलीं जयाचेनि मेळें ।
सूर्य जयाचेनि उजाळें । कडवसेनि ॥ २३ ॥

पदांचा अर्थ— चंद्रादि—चंद्र, नक्षत्रें, हीं सर्व; जयाचेनि मेळें—ज्या सद्गुरुसान्निध्यानें, सुसीतळें—अगदीं थंडगार, अतिशीतळ, शान्त अशीं; घडलीं—निर्मिलीं आहेत; जयाचेनि कडवसेनि—ज्याच्या कवडशाच्या प्रकाशानें; सूर्य उजाळें—सूर्य तेजोमय प्रकाशतो.

भावार्थ—ज्या परमात्मसद्गुरूंच्या योगानें चंद्रादि सर्व शीतळ पदार्थ मूळचेच अगदीं थंड निर्माण झाले आहेत, व ज्यांचा एक कवडसा मिळाल्यानेंच सूर्य इतका तेजःपुंज झाला आहे ॥ २३ ॥

सद्गुरूंचा महिमा ईश्वरापेक्षांहि कसा अधिकः—

जीवपणाचेनि त्रासें । यावया आपुलिये दशे ।
शिवही मुहूर्त पुसे । जया जोसियातें ॥ २४ ॥

पदांचा अर्थ—**जीवपणाचेनि**–मायेच्या उपाधीनें प्राप्त जो शिवपणा–विराटदेहांतला तोहि जीवपणाच,–जीवभावच, या त्रासामुळें; **आपुलिये दशे**–निजस्वरूपस्थितीला; **यावया**–प्राप्त होण्यासाठीं; **शिवही**–विराटदेही ईश्वरदेखील; **जया जोसियातें**–ज्या सद्गुरु जोशास; **मुहूर्त पुसे**–शुभयोग केव्हां हें विचारतो.

भावार्थ—जीवपणाच्या उपाधीला कंटाळून व सृष्टि निर्माण करण्याच्या विराटदेहांतल्या उपाधीला त्रासून शिवईश्वरदेखील जसे रामकृष्णादि अवतारी वसिष्ठ सांदीपनादि गुरूंस शरण जातात, तसेंच वैतागून आपल्या स्वस्वरूपस्थिति-प्राप्तीसाठीं या सद्गुरु ज्योतिष्यांना शुभसमय विचारीत असतो.

सुबोधविवरण—जीवाची जशी अविद्या उपाधि, तशीच ईश्वराची उपाधि माया. जीवाला अविद्या या उपाधीपासून मुक्त होण्यास तसेंच शिव-ईश्वराला मायेच्या उपाधींतून मुक्त होण्यास व परमात्मरूपस्वरूपाच्या गांवाला जावयास श्रीगुरुरूप जोशास मुहूर्त पुसावा लागतो. ईश्वराचा ईश्वरभावहि परब्रह्म-मय होण्यास त्याला सद्गुरूस शरण जावेंच लागतें. ॥ २४ ॥

श्रीगुरूंच्या ठिकाणीं दिसणारा गुरुशिष्यभाव हा केवळ आभासच:—

चांदिणें स्वप्रकाशाचें । लेइला द्वैतदुणीचें ।
तन्ही उघडेंपण नवचे । चांदाचें जया ॥ २५ ॥

पदांचा अर्थ—**स्वप्रकाशाचें**-आपल्या चांदण्याचें; **चांदणें**–प्रकाश, जो सद्गुरु चंद्र; **द्वैतदुणीचें**– (द्वैत + दुणी) दोनपणाच्यामुळें दुपटीचें; **लेइला**–पांघरला, प्रकाशलेला दिसला; **तन्ही**–तथापि; **जया चांदाचें**–ज्या सद्गुरु चंद्राचें; **उघडेंपण**–एकपण; **नवचे**–सुटत नाहीं, दूर होत नाहीं, नाहींसें होत नाहीं.

भावार्थ—जो सद्गुरु चंद्र आपल्या स्वस्वरूप चांदण्याचा प्रकाश पांघरला, दोनपणाच्या द्वैताचा प्रकाशलेला दिसला, तथापि त्यानें त्याचें एकपण नाहींसें त्यामुळें होत नाहीं.

सुबोधविवरण—चंद्रानें आपल्या प्रकाशाचें पांघरूण पांघरलें त्यामुळें चंद्र व चांदणें असें द्वैत, दोन असल्यासारखें दिसलें, तथापि चंद्राचें तें मूळचें एकपण, चंद्र व चंद्राच्या प्रकाशाचें स्वाभाविक असलेलें ऐक्य कांहींहि कमी होत नाहीं. चंद्राचें बिंब, त्याचें चांदणें हीं एकमेक निराळीं असतीं, तर चंद्र आपल्या चांदण्याच्या पांघरुणानें झांकून गेला असता. तें वस्त्राचें पांघरूण असतें, तर मात्र त्यानें तो झांकून गेला असता. पण हें पांघरूण स्वबिंबांतूनच निघणारा

प्रकाश आहे. तो बिंबापेक्षांहि अधिक फांकलेला प्रकाश दिसतो. त्यामुळें चंद्र व चांदणें दोन असल्याचें कदाचित् भासलें, तरी तीं दोन नसून एकच एक. तसेंच श्रीगुरु व शिष्य हे दोन असे दिसण्यांत निरनिराळे देहरूपानें दिसले, तरी त्यांचें परमात्मस्वरूप एकच एक अभेदरूपच. ॥ २५ ॥

श्रीगुरूंचें व्यापकपण केवढें तें सांगतातः—

जो उघड कीं न दिसे । प्रकाश कीं न प्रकाशे ।
असतेपणेंचि नसे । कव्हणीकडे ॥ २६ ॥

पदांचा अर्थ—**जो**–जे परमात्म सद्गुरु, **उघड कीं** (असून)–सत्-स्वरूपानें प्रकट, स्पष्ट, (असूनहि); **न दिसे**–पदार्थाप्रमाणें दृश्य होत नाहींत, अदृश्य असतात, गोचर होत नाहींत (या चर्मचक्षूला); **प्रकाश कीं**–रूप (असूनहि); **न प्रकाशे**-(दिव्याप्रमाणें) भासत नाहीं; **असतेपणेंचि**–व्यापकपणानें (असूनसुद्धां), ओतप्रोत सर्वत्र असतांनाहि; **कव्हणीकडे**–कुठेंहि; **नसे**–नसल्यासारखे आहेत.

सविवरण भावार्थ—जें सद्गुरुस्वरूप सर्वत्र 'आहेपणा'नें 'अस्तिभावा'नें असून प्रत्यक्ष दिसत नाहीं, प्रकाशरूप – ज्ञानमय असून भासत नाहीं, आणि सर्व-व्यापक असूनहि कुठें नसलेलें झालें आहे. जगांतील प्रत्येक पदार्थ 'आहे' असा स्पष्ट दिसतो. हें त्याचें दिसणें, तो त्याचा असणेपणा, अस्तित्वभाव श्रीगुरुपरमात्म-रूपाचा होय. आकार बदलला तरी तें अस्तित्व आहेपणानें, सद्रूपानें नित्य असतें, हें श्रीगुरूंचें परमात्मस्वरूप जाणलें जात नाहीं. नुसता अमुक पदार्थ आहे म्हणतांच त्याचें हें सामान्यज्ञान अस्तिपणाचें होत असतें; तो अमुक आहे, त्याची लांबी रुंदी, आकार, रंग, हें जें त्याचें विशेष ज्ञान तो त्याचा भातिपणा, भासकता होय. त्या पदार्थाविषयींचें प्रियत्व, हवासा वाटणें हें त्याचें आनंदरूप. अस्तिभाति प्रियरूप सद्गुरुपरमात्माच सर्वत्र ओतप्रोत भरलेला असून त्याचें हें अतिसूक्ष्मज्ञान कसें प्रतीत होत नाहीं हें अति आश्चर्याचें होय ! ॥ २६ ॥

सद्गुरुपरमात्मा हे प्रमाणातीत कसे आहेत तें आतां सांगतातः—

आतां जो तो इहीं शब्दीं । कें मेळऊं अनुमानाची मांदी ।
हा प्रमाणाहि वो नेदी । कोण्हाहि मा ॥ २७ ॥

पदांचा अर्थ—**आतां**–वरील वर्णनाप्रमाणें असें सच्चिदानंदस्वरूप सद्गुरूंचें; **जो**–हेंच; **तो**–तें त्यांचें ज्ञानमय शब्दातीत अखंड स्वरूप असेंच वर्णन

इहीं शब्दीं–ह्या मीं वर्णिलेल्या शब्दांच्या; अनुमानाची मांदी–कल्पनेच्या पंक्तीच्या समुदायानें, अनेक कल्पनांनीं; कें–कसें; मेळऊं–मांडतां येईल, वर्णितां येईल; हा–हे परमात्मा सद्गुरु; मा–कारण; कोण्हाहि प्रमाणा–कोणत्याहि श्रुतींच्या सिद्धान्तांना; वो नेदी–हांक देत नाहींत, जवळ येऊं देत नाहींत, ज्या परमात्म्याच्या सत्तेनें वेद बोलतात तें वेदप्रमाण त्या प्रमेयाला प्रकाशित कसें करूं शकेल ?

भावार्थ—वरील मागच्या ओवींत वर्णिल्याप्रमाणें त्या वर्णनांतील सच्चिदानंदमय सद्गुरुस्वरूपाचें मीं केलेल्या आतांपर्यंतच्या शब्दांनीं "हेंच तें" अशा अनेक अनुमानप्रमाणांनीं वर्णन कसें होऊं शकेल ? कारण सर्व कोणतींहि प्रमाणें आभासात्मक अविद्याकार्य अशा आकाशाचा शब्द हा गुण. "त्रैगुण्यविषया वेदाः" या भगवद्वचनानुरूप त्रिगुणात्मक हे वेद 'नेति नेति','हें दृश्य जगत् तें ','तें नाहीं' असें म्हणून थांबतात. सर्व प्रमाणें परमात्म्यानें प्रकाशित होतात, तीं त्या परमात्म्याचें स्वरूप वर्णन कसें करूं शकणार ? तीं जड आहेत; आभासरूप आहेत. ॥ २७ ॥

यावर शंका अशी कीं, अशा शब्दातीत परमात्मसद्गुरुस्वरूपाचा बोध उपदेशानें "तत्त्वमसि" वाक्यानें होणारा तो व्यवहार मग कसा घडणार ? या शंकेचें उत्तरः—

जेथें शब्दांची लिही पुसे । तेणेंसि चावळों बैसे ।
दुजयाचा रागीं रुसे । येकपणा जो ॥ २८ ॥

पदांचा अर्थ—जेथें–ज्या शब्दातीतांत; शब्दांची लिही–शब्दांचे लेख, वर्णन; पुसे–(लेख) पुसले जातात, वर्णन संपतें; तेणेंसि–त्या स्वरूपाविषयीं; चावळों बैसे–सद्गुरु शिष्यांशीं बोलूं बसले तरी; जो एकपणा, तो दुजयाचा रागीं–असा दुसऱ्याच्या सापेक्ष द्वैतभावानें येणारा; रुसे–तोहि खपत नाहीं; द्वैताद्वैतातीत असे एकमेव एकच एक ते मौनानें असतात.

सविवरण भावार्थ—जें शब्दातीत सद्गुरुपरमात्मस्वरूप जेथपर्यंत शब्दप्रमाणवेद, सर्व प्रमाणांमध्यें श्रेष्ठप्रमाण असणारे ते "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह" असें परमात्मस्वरूपाचें वर्णन करीत करीत अखेरीस ते वेद जेथून ज्या परमात्मस्वरूपापासून कल्पना करणाऱ्या मनासह परततात असें जें वाणीच्या वर्णनाच्या व मनाच्या कल्पनेच्या पलीकडे सूक्ष्म गहन असणारें, सद्गुरुस्वरूप "जेथें शब्दाची लिही पुसे" ज्या असल्या ठिकाणीं शब्दाची भाषा पुसली जाते, जेथें शब्द, जे वेद अविद्याकार्य असलेले त्यांनीं केलेलें वर्णन

अपुरें पडून संपतें व जे (सद्गुरु) असे शब्दातीत असणारे "दुजयाचा रागीं असणाऱ्या त्या एकपणाला रुसे"—दुसऱ्याच्या सापेक्षतेनें येणारा जो एकपणा तोहि जिथें खपत नाहीं, जेथें असा एकपणाहि खपत नाहीं त्याविषयीं "चावळों बैसे"—शिष्यांशीं बोलत असले तरी तें अबोलच होतें. याचा अर्थ असा कीं, सद्गुरुपरमात्मनित्यनिर्विकार अशा मौन स्वरूपांत हे द्वैताद्वैताचे विकार होऊनहि होतच नसतात. तें सदैव एकरूप असतें. ॥ २८ ॥

वरील सिद्धान्त अन्य तऱ्हेनें अधिक स्पष्ट करताहेतः—

प्रमाणाची परि सरे । तैं प्रमेयचि आविष्करे ।
नवल मेचुं ये धुरे । नाहींपणाची ॥ २९ ॥

पदांचा अर्थ—प्रमाणाची—निश्चयाचें; परि—प्रकार; सरे—संपतात; तैं—तेव्हां; प्रमेयचि—मूळ स्वरूपच; आविष्करे—प्रकट होतें; नाहींपणाची—(त्यामुळें त्या प्रमाणांची) नाहींपणाची, अभावाची; मेचुं—आवड; धुरे ये—पुढें येते; नवल—हें आश्चर्य होय.

भावार्थ—प्रमाणांचे परमात्मतत्त्वाचा निश्चय करण्याचे सर्व प्रकार संपल्यानंतर शेवटीं मूळ ज्ञानस्वरूप प्रमेय प्रकट होतें. त्या वेळीं त्या सर्व प्रमाणांचा नाहींसेपणाचा निष्कर्ष आपण होऊनच पुढें येतो, हें आश्चर्य होय! थोडक्यांत हें कीं, सद्गुरूंच्या स्वरूपज्ञानाचा उदय होतांच सर्व प्रमाणें नाहींशीं होतात; उरतच नाहींत. सर्व प्रमाणें मूळचीं अभावरूप म्हणून खोटीं ठरतात; पुढें येतच नाहींत. ॥ २९ ॥

मग श्रीगुरुपरमात्मस्वरूपाच्या प्रमेयाची सिद्धि प्रमाणांनीं नाहीं तर ती कशी व्हावी या शंकेचें समाधान करतातः—

कांहींबाहीं अळुमाळु । देखिजे येखादे वेळु ।
तरी देखे तेहि विटाळु । जया गांवीं ॥ ३० ॥

पदांचा अर्थ—कांहींबाहीं—कदाचित्; येखादे वेळु—एखादे वेळेस; अळुमाळु—थोडेसें; देखिजे—पाहतो (असें म्हणेल); तरी—तर; देखे—हें देखणें, हें पाहणें, हें ज्ञान; तेहि—तेंच; विटाळु—दोषच, अशुद्ध स्पर्शच; जया गांवीं—ज्या परमात्मस्वरूपीं; होय—होईल.

भावार्थ—कदाचित् एखादे वेळेस 'मी द्रष्टा होऊन सद्गुरुस्वरूप पाहतों' असें कोणी म्हणेल, तर (त्या त्रिपुटीरहित स्वरूपास) "मी ज्ञानानें जाणतों, (हें

देखे–देखणें–पाहणें, हें ज्ञान होणें.) " हें असें म्हणणेंसुद्धां तेथें त्या निर्विकार स्वरूपीं हा द्वैताचा विटाळ आहे. " क्रिया कीर न साहे । तऱ्ही अद्वैतीं भक्ति आहे । हे बोला ऐसें नोहे । अनुभवायाची जोगें " (ज्ञाने. अ. १८–११५१). " जेथ शब्दजात माघौता फिरे." परमात्मसद्गुरु स्वरूपाची भेट, दर्शनप्राप्ति नित्य अंतर्यामांत असल्यामुळें " त्यांची भेट झाली, हें द्वैताचें पाहणें, हें द्वैतज्ञान " त्या अभेदरूपांत हा भेदाचा व्यवहार कधींच होत नसतो. ॥ ३० ॥

अशा त्या परमात्म सद्गुरुस्वरूपाच्या ठिकाणीं प्रवेश करणें व्यर्थ हें सांगतातः—

तेथें नमनें का बोलें । केऊतीं सुयें पाउलें ।
आंगीं लाउनि नाडिलें । नावेंचि येणें ॥ ३१ ॥

पदांचा अर्थ—तेथें **आंगीं**–त्या नामरूपरहित सद्गुरुपरमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं; **नमनें का बोलें**–नमन किंवा स्तुति (एकारान्त नपुंसकलिंगी नामें)–होत; **केऊतीं**–कशीं; **पाउलें**–पावलांचा प्रवेश; **पाउलें सुयें**–पावलें प्रवेशतील–पोहोंचतील; **येणें**–या सद्गुरूंनीं; **नावेंचि लाउनि**–अनंत नामें, अनंतरूपें स्वीकारूनहि; **नाडिलें**–नाहींशीं केलीं, व्यर्थ ठरलीं; **आंगीं**–स्वतांचें (नामरहित, आकाररहित) स्वरूपीं; **नाडिलें**–तीं नामरूपें व्यर्थ होत. **येणें आंगीं नावेंचि लाउनि**–यानें ' निवृत्ति ' हें नांव स्वतःच्या ठिकाणीं लावून घेऊनहि; **नाडिलें केलें**–तें नाहींच ठरविलें, नाहीं असें केलें; तें नामरूपरहित अशा आपल्या स्वरूपीं नाहींच असें केलें. आपलें नामरूप स्वीकारूनहि पुन्हा नाहींसें केलें.

भावार्थ—त्या सद्गुरुपरमात्मस्वरूपीं नमन, स्तवन,–नमस्कार करणें, प्रदक्षिणा घालणें, गुणानुवाद गाणें, इत्यादि सेवेचें हें पाऊल तेथपर्यंत कसें पोहोंचावें, त्यांना तेथपर्यंतची गति मिळावी कशी ? कारण **येणें नावेंचि**–यांचें ' निवृत्ति ' नांवच जें वृत्तिरहित **आंगीं लाउनि**–स्वस्वरूपीं सदा ' निवृत्त असणें ' असें असल्यामुळें, **नाडिलें**–सर्वच नडलें, वरील सर्व नमनादि सेवा ती अशी आपोआपच अंतरते, व्यर्थ होते. " पूजा, कांहीं न करणें । स्तुति, कांहीं न बोलणें । सन्निधि कांहीं न होणें । तुझ्या ठायीं ॥ "

" तैसी क्रिया कीर न साहे । तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवयाचि जोगें, नव्हे । बोला ऐसें ॥ " (ज्ञाने. १८–५५–११५१). सर्व

प्रकारची अक्रियता हेंच सद्गुरूचें सदैव निवृत्त स्वरूप होय. अशा आकाररहित व नामरहित परमात्म्याच्या ठिकाणीं नमनस्तुतिरूप क्रिया पोंचणार कशा ? त्या अक्रियरूपच होत. ॥ ३१ ॥

पूर्वी या प्रकरणांतील ओवी तीनमध्यें " निवृत्ति वंदूं " असें आहे तें हें वंदनक्रियेचें द्वैत मग कसें ?—

नव्हे आत्मया आत्मप्रवृत्ति । वाढवितां कें निवृत्ति ।
तरी या नामाचि वायबुंथि । सांडीचिना ? ॥ ३२ ॥

पदांचा अर्थ—आत्मया–आत्म्याच्या ठिकाणीं; आत्मप्रवृत्ति–आत्म्याहून निराळेपणानें; प्रवृत्ति–द्वैतरूप जगताचा संसार; नव्हे–कधींच झालेला नसतो; (तो आत्मरूपच असतो) म्हणून आत्मया आत्मप्रवृत्ति नव्हे–आत्म्याच्या ठिकाणीं आत्म्याहून निराळें दुसरें कांहींएक प्रवृत्तिरूप द्वैत नसतेंच; सर्व कांहीं आत्मरूपच. निवृत्ति– " निवृत्ति " हें नांव स्वतःचें सद्गुरूंचें कसें देतां ? के वाढवितां–हें नांव सांगून कसें द्वैत; वाढवितां–निर्माण करतां ? तरी या नामाची–कारण या ' निवृत्ति ' नांवाचें (वायबुंथि) वाय–व्यर्थ, आभासिक, खोटें; बुंथि–पांघरूण, स्वरूप; प्रवृत्ति सापेक्ष हें निवृत्ति नांव सांडीचिना ?–कां टाकीत नाहीं ?

भावार्थ—मग शंका अशी येते कीं, आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं म्हणजे स्वतां आत्म्याच्या ठिकाणीं कसलीच द्वैतप्रवृत्ति नाहीं, द्वैताचें भान कसलेंच नाहीं, परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं दुसरा परमात्मा जर नाहीं, सर्व कांहीं तोच एकच एक जर आहे, तर ' निवृत्ति के वाढवितां ? ' निवृत्ति हें नांव तरी कशाला ? हें नांवाचें आभासिक, खोटें स्वरूप सोडून द्या ना ! ॥ ३२ ॥

तीच शंका पुढें चालः—

निवर्त्य तंव नाहीं । मा निवर्तवी हा काई ।
तरी कैसा बैसे ठाईं । निवृत्ति नामाच्या ॥ ३३ ॥

पदांचा अर्थ—निवर्त्य–निवारण करण्याला; तंव नाहीं–तर कांहीं नाहीं; मा–मग; हा–हे सद्गुरु काई–कशाचें; निवर्तवी–निवारण करतो, करणार; तरी–तर मग; निवृत्तिनामाच्या ठायीं–निवृत्तिनांवाच्या जागीं; कैसा बैसे–कसें बसतां येईल ? तर निवृत्ति हें नांव तरी कसें धारण करतां येईल ?

भवार्थ—निवारण करण्याला जर दुसरें कांहीं नाहीं, तर हे सद्गुरु निवारण कशाचें करणार ? आणि मग यांना निवृत्ति हें नांव तरी कसें देतां येणार ? ॥३३॥

आतां दृष्टान्तानें वरील शंकेचें निरसन करतातः—

सूर्यासि अंधकारु । कैं झाला होता गोचरु ।
तऱ्ही तमारि हा डगरू । आलाचि कीं ॥ ३४ ॥

पदांचा अर्थ—सूर्यासि अंधकारु–सूर्याला अंधःकार काळोख; कैं–केव्हां, कधीं तरी; गोचरु–दृश्य; झाला होता–झाला होता काय; तऱ्ही–तरीसुद्धां; तमारि–काळोखाचा वैरी; डगरू–डांगोरा, प्रख्याति, आरोप, आळ; आलाचि कीं–आलाच ना ? झालें तर.

भावार्थ—वरील शंकेचें निवारण असें कीं, सूर्याला अंधःकार कधीं दिसला होता का ? तरी त्यास तमारि, काळोख नाहींसा करणारा, त्याचा शत्रूसारखा नाश करणारा हा आरोप त्याच्यावर आलाच ना ? झालें तर. त्याचप्रमाणें प्रवृत्ति जो संसाररूपी अज्ञानमय काळोख त्याची आणि निर्विकाररूप परब्रह्मस्वरूप श्रीगुरूंची गांठच नाहीं,– असें असूनसुद्धां त्यांच्यावर 'निवृत्ति' म्हणजे अज्ञान निवारण करणारे, हें नांव आलें ना ? वास्तविक तें नांवच 'निवृत्ति' निर्विकार निवृत्त स्वरूपाचें आहे. ॥ ३४ ॥

वरीलप्रमाणें मिथ्या असलेल्या निवृत्ति नांवाच्या सत्यत्वाची प्रतीति येते ती कां ?—

लाटिकें येणें रूढे । जड येणें उजिवडे ।
न घडे तेंहि घडे । याचिया मावा ॥ ३५ ॥

पदांचा अर्थ—येणें–याच्या सत्तेनें; लाटिकें–आभासरूप अनेक नामरूपाचा जगतांतील व्यवहार; रूढे–भासतो, व्यवहारयोग्य होतो; येणें–यांच्या सत्तेनें; जड–अचेतन; उजिवडे–चेतन होतें; याचिया मावा–यांच्याच मायेनें अघटित घटनामयी अचिंत्य शक्ति,– तिच्या योगानें; न घडे–अघटित, न होणारें, तेंहि घडे–तेंसुद्धां होतें.

भावार्थ—या परमात्म सद्गुरूंच्या आधारानें नाहीं तो अनंत विश्वरचना-विलास प्रकट होतो, सर्व जड भासणारें तें ज्ञानमय होतें, आणि यांच्या माया-शक्तीच्या प्रभावानें अघटित, न घडून येणारें, तेंहि घडून येत असतें.

सुबोधविवरण—एका पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो, त्याचा अमुक आकार, अमुक नांव, अमुक उपयोग हीं सर्व मूळचीं पदार्थरूपच असतात. सूर्यबिंब, त्याचें तें मोठें थोरलें वर्तुळ, त्याचा आकार, त्याच्यांतील तेज, तेजाचा फांकणारा प्रकाश, प्रकाशाचे पसरणारे अनंत किरण, त्या सर्वांत ओतप्रोत असणारें एकच एक तेजच तेज सर्वमय दिसतें. चेतन पदार्थ स्वतांला जाणतो व दुसऱ्यालाहि जाणतो. अचेतन, जड, मायिक पदार्थ स्वतांला जाणत नाहीं व दुसऱ्याला जाणत नाहीं. ॥ ३५ ॥

श्रीज्ञानराज वरील सिद्धान्त पुढीलप्रमाणें अधिक स्पष्ट करतातः—

हां गा मायावशें दाविसी । तें मायिक म्हणोन वाळिसी ।
अमायिक तंव नव्हसी । कवणाहि विषो ॥ ३६ ॥

पदांचा अर्थ—हां गा–अहो महाराज; मायावशें–निजाङ्गभूत शक्तीच्या साहाय्यानें; जें दाविसी–जें दाखवितां; तें मायिक–तें मिथ्या, आभासात्मक, अभावरूप, अस्तित्व नसणारें; म्हणोन वाळिसी–यामुळें टाकावयास लावतां, निरास करतां, त्याज्य म्हणतां; अमायिक–आपण तर मायातीत स्वरूप; तंव–म्हणून; कवणाहि–कोणालाहि; विषो–विषय, प्रत्यक्ष; नव्हसी–(न होसी)–होत नाहीं, प्रकट होत नाहीं.

भावार्थ—अहो सद्गुरुराज, मायेच्या योगानें जें आपण द्वैताचें दृश्य दाखवितां, तें मिथ्या म्हणून टाकून द्यावयास लावतां; त्याचा निषेध करतां; आणि आपलें मायातीत स्वरूप तर कोणालाहि दृश्य होत नाहीं. तें तर प्रत्यक्ष दिसणारें नाहीं. ॥ ३६ ॥

शिवशिवा सद्गुरू । तुजला गूढा काय करूं ।
येकाहि निर्धारा धरूं । देतोसि का ? ॥ ३७ ॥

पदांचा अर्थ—शिवशिवा–आश्चर्यमया; सद्गुरू–सद्गुरुराया; तुजला गूढा–गूढरूपानें, अतिगहन, अति सूक्ष्म स्वरूपानें असणाऱ्या तुम्हांला; काय करूं–काय करावें; येकाहि निर्धारा–एक निश्चयदेखील; धरूं देतोसि का ?–दृढ करूं देतां का, टिकूं देतां का ? नाहींच.

भावार्थ—शिवशिव, काय हें आश्चर्य ! सद्गुरुराया, तुमच्या अतिसूक्ष्म, गहन, व्यापक स्वरूपाविषयींचा एक तरी निश्चय दृढ टिकूं देतां का ? तिथें एकहि निश्चय होत नाहीं.

सुबोधविवरण—महाराज, आपलीं रामकृष्णादिक अवतारांचीं व्यक्त रूपें,–त्यांचें शास्त्रें वर्णन करतात त्याप्रमाणें उपासकांना त्यांच्या उत्कट भावनांमुळें दर्शन होतें. असे सगुण दर्शनाचे अनेक उपाय, निरनिराळीं साधनें आहेत, हें ठीक आहे. परंतु आपलें अव्यक्त, गुणातीत, मनोबुद्धीच्या कक्षेच्या निर्धारातीत, स्वसंवित्, अतिगूढ, सूक्ष्माहूनहि अति सूक्ष्म स्वरूपाची निश्चयानें प्राप्ति होण्याचे उपाय किंवा शास्त्रें "हा साधना नोहे आपु" असें ज्ञानेश्वरींतल्या सिद्धान्ताप्रमाणें व्यर्थ ठरतात. देहाभाव–स्थूलसूक्ष्मकारणदेहभावविवर्जित, प्राणस्पंदनस्थित, संकल्पशून्य मनाच्या व निश्चयरहित बुद्धीच्या पलीकडच्या त्या सूक्ष्म, अतिसूक्ष्म, केवल अवस्थेंत, जीवभावातीत त्या स्वयमेव निश्चलपणांतल्या स्वसंविद्रूपांत आपल्याशीं समरस होतां येतें. इतके आपण गूढ, अतिसूक्ष्म आहांत. महाराज, याला काय करावें ? ॥ ३७ ॥

नामेंरूपें बहुवसें । उभारूनि पाडिलीं ओसें ।
सत्तेचेनि आवेशें । तोषलासि ना ॥ ३८ ॥

पदांचा अर्थ—**बहुवसें**–भिन्नभिन्न, नाना प्रकारचीं, अनेक, अनंत; **नामेंरूपें उभारूनि**–नामांची–रूपांची उभारणी करून, रचना करून, नामरूपात्मक अनेक विश्वरचना करून; **ओसें**–ओस, शून्य, मिथ्या; **पाडिलीं**–होऊन पडतात; **ओसें पाडिलीं**–शून्य, अभावरूप, आभासात्मक केलीं जातात, होतात, ठरतात; **सत्तेचेनि आवेशें**–स्वस्वरूपांतल्या स्वानंद-सोहळ्याच्या स्फूर्तीच्या भरानेंच; **तोषलासि ना**–संतुष्ट आहांत ना ?

भावार्थ—श्रीगुरुराया, आपण अनंत नामरूपांची उभारणी करून पुन्हा ती सर्व मिथ्या म्हणून सिद्धान्त केला. हा जो मिथ्या नामरूपांच्या उभारणीचा विलास आपल्या सत्तेवर चालला आहे, त्या सोहळ्यानें आपण संतुष्ट आहां ना ? आपल्या सत्तेवर अनंतकोटि-जगतें उत्पन्न व्हावींत, तीं नाहींतशीं व्हावींत, पण स्वतांस त्यांची दादहि नसावी ! आपण आपल्या स्वरूपानंदभरामध्यें नित्य निमग्न असावें ! कारण "कीं बीजचि झालें तरु । कां भांगारची अळंकारु । तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥ (ज्ञाने. ९–४–६५)" असें आपल्या सोहळ्याचें अद्वितीय स्वरूप आहे. ॥ ३८ ॥

सद्गुरु शरणागत शिष्याला परब्रह्मरूप करून टाकून तो सापेक्ष गुरुपणाहि उरूं देत नाहींत, तें कसें तें सांगतातः—

जिउ घेतलिया उणें । चालों नेदिसी साजणें ।
भृत्यु उरे स्वामीपणें । तेंहि नव्हे ॥ ३९ ॥

पदांचा अर्थ— **जिउ**–जीवभाव, जीवपण; **घेतलिया उणें**–नाहींसा केल्यावांचून; **साजणें**–मोठेंपण, शोभा, अस्तित्व; **चालों नेदिसी**–राहूं देत नाहीं; **भृत्यु**–भृत्य, सेवक, शिष्य; **स्वामीपणें उरे**–गुरुरूप होऊन राहिलेला; **तेंहि नव्हे**–तेंसुद्धां नाहींच.

भावार्थ—" जीवो ब्रह्मैव नापरः " या श्रुतिवचनानुरूप सद्गुरुराज, आपण शरणागत शिष्याचा जीवभाव बाधित करून, शिष्याचा कल्पित जीवपणा दूर करून त्याला प्राप्त होणारा सापेक्ष, हा जो एकदेशीय शिवपणा तोहि आपण उरूं देत नाहीं. " अहं ब्रह्मास्मि " हें वृत्तिज्ञानसुद्धां नाहींसें करतां; व स्वामीपणाच्या श्रीगुरूंच्या स्वस्वरूपाच्या अधिकारास प्राप्त झाल्याचा हा भावहि, हें वासनेचें, द्वैताचें बीजहि त्याच्या ठिकाणीं शिल्लक राहूं देत नाहीं. त्याला " आपणांसारिखें करिती तात्काळ " असें श्रीतुकोबांच्या अभंगाप्रमाणें व्यापक अनुभूतिरूप पूर्ण ब्रह्ममय करून टाकतां. ॥ ३९ ॥

वरीलप्रमाणें शिष्याला सद्गुरुकृपा झाल्यानंतरच्या पूर्णावस्थेचें आणखी वर्णन करतात, तें असें:—

विशेषाचेनि नांवें । आत्मत्वही न साहवे ।
किंबहुना न व्हावें । कोण्हीच या ॥ ४० ॥

पदांचा अर्थ—**विशेषाचेनि नांवें**–सामान्य, विशेषभावानें, जीवशिवभावाच्या सापेक्षपणानें; **आत्मत्व**–प्राप्त झालेला आत्मभाव, सर्वव्यापकपणा–तोहि; **साहवे न**–सहन होत नाहीं; उरूंच देत नाहींत; **किंबहुना**–फार काय सांगावें ? **या कोण्हीच न व्हावें**–या सद्गुरूंकडून आतां कांहींहि व्हावयाचें राहिलेलें नाहीं, असें ते शिष्याला करतात.

भावार्थ—शिष्याला सामान्य व विशेष असा जो जीवशिवभावपणाच्या सापेक्षपणानें प्राप्त झालेला आत्मस्थितीचा सर्वव्यापकपणा, तोहि ते उरूं देत नाहींत. फार काय सांगावें, कीं या सद्गुरूंच्याकडून त्याला आतां कांहींहि प्राप्त व्हावयाचें राहिलेलें नाहीं, अशी त्याची पूर्णावस्था ते करतात. ॥ ४० ॥

आतां शिष्याची असली अवस्था झालेली दृष्टान्तानें अधिक स्पष्ट करतात:—

राति नुरेचि सूर्या । नातरी लवण पाणिया ।
नुरेचि जेविं चेइलिया । नीद जैसी ॥ ४१ ॥

पदांचा अर्थ—राति–रात्र; नुरेचि–शिल्लक रहात नाहींच; जैसी–जशी; नीद–झोंप, निद्रा; चेइलिया–चेव येतांच, जागें होतांच.

भावार्थ—सूर्यापुढें रात्रीचा काळोख अगदीं शिल्लक रहात नाहीं, तो पूर्ण नाहींसा होऊन जातो; अथवा पाण्यांत मीठ ज्याप्रमाणें अगदीं विरघळून जातें किंवा जशी झोंप जागें होतांच नसते;— ॥ ४१ ॥

कापुराचे थळीव । नुरेचि आगीची बरव ।
नुरेचि रूप नांव । तैसें यया ॥ ४२ ॥

पदांचा अर्थ—कापुराचे थळीव–कापराचे केलेले सुरेख अलंकार; आगीची–आगींतील; बरव–शोभा, तेज, बरवेंपण; तैसें–तसेंच; यया–या शिष्याचें; रूपनांव–नामरूपात्मक, देहभावाचें अस्तित्व; नुरेचि–उरतच नाहीं.

भावार्थ—कापराचे सुरेख केलेले अलंकार अग्नितेजाजवळ नेले तर त्याचें नामरूप उरत नाहीं; त्याप्रमाणें सद्गुरूंच्या सान्निध्यांत अखंडानंद–परब्रह्मस्वरूप होऊन गेलेल्या शिष्याचे देहभावविवर्जितपणामुळें स्वतांचें नामरूपाचें भानच शिल्लक राहिलेलें नसतें. ॥ ४२ ॥

अशा अद्वय स्थितींतहि सद्गुरुउपासनेचें भक्तिसुख मिळावें म्हणून प्रार्थना करूं गेलें तर काय होतें तें सांगतातः—

याच्या हातांपायां पडे । तरी वंद्यत्वें पुढें न मंडे ।
न पडेचि हा भिडे । भेदाचिये ॥ ४३ ॥

पदांचा अर्थ—याच्या–या सद्गुरूंच्या; हातांपायां–हातांनीं पायांस, हात जोडून चरणांपाशीं; पडे–साष्टांग घातले; तरी–तरीदेखील; वंद्यत्वें–वंदनभाव; पुढें–निराळें, दुसरें, द्वैतरूपानें, दीनपणानें, हा गुरु हा शिष्य या भेदानें; न मंडे–घडतच नाहीं, उरतच नाहीं; हा–हे असले सद्गुरुराय; भेदाचिये–दोन होण्याच्या, द्वैतपणाच्या; भिडे–भरीस, नादास; न पडेचि–पडूंच शकत नाहींत.

साविवरण भावार्थ—भावाभावातीत होऊन असणाऱ्या शिष्यानें सेवेचें भक्तिसुख मिळावें म्हणून श्रीसद्गुरूंची दोन्ही कर जोडून, पाय धरून जरी विनवणी केली, तरी एकरूपतेच्या त्या समरसस्थितींत वंदनभावच निराळेपणानें

" हा गुरु हा शिष्य " हे दोन भाव दृश्यरूपानें मांडतां येऊंच शकत नाहींत, व्यक्त होतच नाहींत; म्हणून हे सद्गुरुराज असल्या भेदभावाच्या देहभानावर येण्याच्या भरीस पडतच नाहींत. अशा अफाट, निर्विकल्प, असंप्रज्ञातसमाधि-स्थितीचें व्युत्थान केव्हांहि होत नसतें. नामदेवराय पंढरीहून श्रीहरीच्या आज्ञेनुरूप आवंढ्यानागनाथमंदिरांत विदेहस्थितींतल्या एकमय अवस्थेंत शिवस्वरूप होऊन गेलेल्या श्रीविसोबा खेचरमहाराजांच्या दर्शनास गेले असतां त्यांच्या त्या केवळ पादस्पर्शानेंच नामदेवरायहि समरूप होऊन गेले. ते तेथें वंदनाला निराळे उरलेच नाहींत.—

" स्तुति, कांहीं न बोलणें । पूजा, कांहीं न करणें । सन्निधि, कांहीं न होणें । तुझ्या ठायीं ॥ (ज्ञानें. अ. १८ ओ. २५) "

हें असें समरसतेंतलें भक्तिप्रेमसुख काय असतें, तो महाराजांचा स्वानुभवच असा हा ज्ञानेश्वरींत आलेला आहे. ॥ ४३ ॥

असा हा अभेदभाव दृष्टान्तानें अधिक दृढ करीत आहेतः—

आपणाप्रति रवी । उदो न करी जेवीं ।
हा वंद्य नव्हे तेवीं । वंदनासी ॥ ४४ ॥

पदांचा अर्थ—रवी–सूर्य; आपणाप्रति–स्वतांस; जेवीं–ज्याप्रमाणें; उदो–उदय; न करी–करीत नाहीं; तेवीं–त्याप्रमाणें; हा–हे सद्गुरु; वंदनासी–नमनास; वंद्य–वंदनाची देवता; नव्हे–होत नाहीं.

भावार्थ—सूर्य स्वतांचा प्रकाश जसा करीत नाहीं, तसेच हे सद्गुरु वंदनाची जी नमनाला योग्य अशी नमनदेवता म्हणून निराळें स्वरूप होतच नाहींत. उदय, अस्त या दोन्ही घटनांरहित सूर्य जसा असतो, तसेच दृश्य-अदृश्य-भावविरहित वंद्य, वंदनविवर्जित सद्गुरु असतात. ॥ ४४ ॥

कां समोरपण आपलें । न लाहिजे कांहीं केलें ।
तैसें वंदत्व घातलें । हारऊनि येणें ॥ ४५ ॥

पदांचा अर्थ—कां–अथवा; आपलें समोरपण–आपलें स्वतांचें सन्मुखपण; कांहीं केलें–कांहींहि केलें तरी, कोणताहि उपाय केला तरी; न लाहिजे–प्राप्त होत नाहीं; तैसें–तसेंच; वंदत्व–नमन हा द्वैतभाव, नमन करण्याचें दुर्जेपण; येणें–या सद्गुरूंनीं; हारऊनि घातलें–हरून घेतलें, नाहींसें करून टाकलें.

भावार्थ—कांहींहि प्रयत्न केला तरी आपण आपल्यासमोर उभे राहूं शकत नाहीं; आपलाच सन्मुखपणा कधींच आपल्याला प्राप्त होत नसतो. तसेंच कितीहि उपाय केले तरी स्वतांच्या सर्वव्यापकतेमुळें सद्गुरु द्वैतभावानें वंदन करणाराचें एकदेशीयपणाचें नमन नाहींसें करून टाकतात. वंदन करणारा शिष्य सद्गुरूंच्या सर्वव्यापक स्वरूपांत समरस होऊन गेल्यामुळें वंदन हा निराळा भाव त्याच्या ठिकाणीं उरतच नाहीं. म्हणून शिष्याच्या वंदनास तेहि प्रकट होत नाहींत. ॥ ४५ ॥

तेंच दुसऱ्या दृष्टान्तानें आणखी स्पष्ट करतातः—

आकाशाचा अरिसा । नुठे प्रतिबिंबाचा ठसा ॥
हा वंद्य नव्हे तैसा । नमस्कारासी ॥ ४६ ॥

पदांचा अर्थ—**आकाशाचा अरिसा**—निरवयव-वस्तुरूप आरशांत; **प्रतिबिंबाचा**—दुजेपणाचा; **ठसा**—छाप; **नुठे**—उमटत नाहीं; **हा**—हे परमात्मस्वरूप सद्गुरु; **तैसा**—तसे; **नमस्कारासी**—नमनास, वंदनास; **वंद्य नव्हे**—वंदनरूप होत नाहींत.

भावार्थ—निरवयव अशा आकाशाच्या आरशांत ज्याप्रमाणें प्रतिबिंब पडत नाहीं-उमटत नाहीं, त्याप्रमाणें निर्गुण, निराकार, सर्वव्यापकस्वरूप सद्गुरु नमनदेवता होत नाहींत. ॥ ४६ ॥

आपण वंदन करून घेणारी देवता होत नाहींत. तसेंच शिष्याला वंदन करणारा राहूं देत नाहींत. कसें तें सांगतातः—

परी नव्हे तरी नव्हो । हे वेखासें कां घेवों ।
परी वंदितयाहि ठावो । उरों नेदी ॥ ४७ ॥

पदांचा अर्थ—**परी**—बरें बोवा; **नव्हे तरी**—(वंद्य) होत नाहींत तर; **नव्हो**—न होवो; **हे वेखासें**—(मी) **कां घेवों**—हें वांकडें, हा दोष, हा हट्ट मी कशाला घेऊं? **परी**—पण पहा! **वंदितयाहि**—वंदन करणाराचा, वंदकाचादेखील; **ठावो**—अस्तित्व, जीवभाव; **उरों नेदी**—उरूं देत नाहींत.

भावार्थ—बरें बोवा, हे सद्गुरु वंद्य, नमन करून घेण्यापुरते व्यक्त, न होतील तर न होवोत. मी तरी त्याचा हट्ट कशाला घेऊं? पण चमत्कार असा कीं, हे वंदन करणारालाच, शिष्यालाच अस्तित्वानें राहूं देत नाहींत. त्याला जीवभावानें उरूंच देत नाहींत. कारण स्थूलसूक्ष्मकारणमहाकारणदेहभाव-

विवर्जित, निवृत्त अशी त्याची अमनस्थिति होत असते, ती या सद्गुरूंच्या कृपेमुळें; म्हणून— ॥ ४७ ॥

हेंच श्रीज्ञानराज आणखी दृष्टान्तांनीं दृढ करतातः—

आंगौनि येकुणा झोळू । फेडितांचि तरी तो बाहिरिळू ।
कडु फिटे आंतुलु । न फेडितांचि ॥ ४८ ॥

पदांचा अर्थ—**आंगौनि**–अंगापासून; **तो येकुणा बाहिरिळू झोळू**–तो एका बाजूचा बाहेरीलकडील पदर; **फेडितांचि**–फिटतांच, सुटतांच; **आंतुलु कडु**–आंतील बाजूकडील; **न फेडितांचि फिटे**–न फेडितांच फिटतो, सुटतो, मोकळा होतो.

भावार्थ—नेसलेल्या धोतराचा एक डावीकडील कच्छ, पदर सोडिला म्हणजे बाकीचे कच्छ सहजच फिटतात. ॥ ४८ ॥

नाना बिंबपणासरिसें । घेऊनि प्रतिबिंब नासे ।
नेलें वंद्यत्व येणें तैसें । वंदितेंनसीं ॥ ४९ ॥

पदांचा अर्थ—**नाना**–अथवा; **बिंबपणासरिसें**–(आरसा हा) मुखासारखें; **प्रतिबिंब**–मुखाचें हुबेहूब स्वरूप, मुखाचा उलट ठसा; **घेऊनि**– (यांस) दाखवून; **नासे**–(त्यांस) नाहींसे करतो, उरूं देत नाहीं; **तैसें**–तद्वतच; **येणें**–या सद्गुरूंनीं; **वंद्यत्व**–(आपलें) वंदनीय स्वरूप, सगुणस्वरूपाचा भाव; **वंदितेंनसीं**–या वंदन करणाऱ्या (शिष्या)सह; **नेलें**–नाहींसा केला, उरूं दिला नाहीं, दूर केला.

भावार्थ—तसेंच आरसा हा त्याच्यांत मुख व मुखासारिखें हुबेहूब दिसणारें दुसरें स्वरूप यांस दाखवून त्यांना तो दूर करतो, त्यांस त्याच्या स्वरूपानें उरूं देत नाहीं; तद्वतच या माझ्या सद्गुरूंनीं त्यांच्या ठिकाणचा वंदनीय असा आपला सगुण दृश्यस्वरूपाचा भाव त्यांना वंदन करणाऱ्या या शिष्याच्या शिष्यत्वभावासह, त्याच्या देहभावासहित जीवभावासह नाहींसा केला. दोघांतलें द्वैत उरूं दिलें नाहीं. ॥ ४९ ॥

श्रीगुरूंचें ज्ञान डोळ्यांना प्रत्यक्ष कां होत नाहीं, अशी शंका आल्यास तिचें समाधान पुढील ओवींच्या पाहिल्या अर्धांत सांगून दुसऱ्या अर्धापासून पुढें चोपन्नाव्या ओवीपर्यंत महाराज स्वानुभव वर्णितात, तो असाः—

नाहीं रूपाचि जेथें सोये । तेथें दृष्टीचें कांहींचि नव्हे ।
आम्हां फळले हे पाये । ऐसिया दशा ॥ ५० ॥

पदांचा अर्थ—जेथें-ज्या सद्गुरुपरमात्मस्वरूपीं; **रूपाची**-या दृश्य आकाराची; **सोये नाहीं**-सोय नाही, जाणीव नाहीं; **तेथें**-त्या स्वरूपीं; **दृष्टीचें**-या चर्मचक्षु डोळ्यांचा; **कांहींचि नव्हे**-मुळींच उपयोग नाहीं; **ऐसिया दशा**-असली ही अलौकिक दृष्टीची स्थिति; **आम्हां**-मला मात्र; **हे पाये**-या (श्रीगुरूंच्या) पायाच्या कृपेनें; **फळले**-फलद्रूप झाली, प्राप्त झाली.

भावार्थ—केवळ परमज्ञानमय सद्गुरुस्वरूपाच्या ठिकाणीं स्वतांला या दृश्य जडदेहाची जिथें जाणीव नसते, तें स्वरूप अवलोकन करण्यास तिथें या चर्मचक्षु-जड डोळ्यांचा कांहींच उपयोग नाहीं. असली ही अलौकिक दिव्यज्ञान दृष्टीची स्थिति मला मात्र या श्रीगुरूंच्या पायाच्या कृपेनें प्राप्त झाली. श्रीनिवृत्तिनाथांनीं मला प्रथम सच्चिदानंद आत्मस्वरूपाची ओळख करून देऊन मग आपल्या कृपादृष्टीनें त्या स्वरूपाचा प्रत्यक्ष प्राप्तिरूप असा साक्षात्काराचा अनुभव करविला. ॥ ५० ॥

गुणा तेलाचिया सोयरिका । निर्वाहिली दीपकळिका ।
ते का होईल पुलिका । कापुराचिया ॥ ५१ ॥

पदांचा अर्थ—**गुणा**-वातीची; **तेलाचिया सोयरिका**-तेलाच्या संयोगानें; **निर्वाहिली**-तयार झालेली; **दीपकळिका**-दिव्याची ज्योत; **ते**-ती; **कापुराचिया पुलिका**-कापराची ज्योत; **होईल का**-होऊं शकेल काय ?

भावार्थ—वातीचा तेलाशीं संयोग होऊन झालेली ती त्रिपुटीची ज्योत-तेज, कापराच्या ज्योतीच्या तेजासारखी त्रिपुटिरहित पूर्ण अग्निरूप होईल काय ? तर नाहीच. ॥ ५१ ॥

तया दोहों परस्परें । होय ना जंव मेळहैरें ।
तंव दोहींचेंही सरे । सरिसेंचि ॥ ५२ ॥

पदांचा अर्थ—**तयां दोहों**-कापूर व अग्नि या दोहोंचा; **परस्परें**-एकमेकांशीं; **जंव**-ज्या क्षणीं, जेव्हां; **मेळहैरें**-संयोग; **होय ना**-होतो न होतो; **तंव**-तोंच, त्याच क्षणीं; **दोहींचेंही**-दोघांचेंहि अस्तित्व; **सरिसेंचि**-एकदमच; **सरे**-संपतें.

भावार्थ—कापूर व अग्नि या दोहोंचा एकमेकांशीं संयोग होतो न होतो तोंच ते दोघेहि संपतात, त्यांचा अवशेष कांहीं उरतच नाहीं. तसें गुरुशिष्य हा त्या तेलवातीसारखा दिसणारा दोनपणाचा द्वैतसंबंध—तो सद्गुरुज्ञानस्वरूपाशीं

शिष्याचें (त्यांच्या ज्ञानस्वरूपाशीं) तादात्म्य होणें हीच त्या पायांची कृपा होतांच कापराचा ज्योतीशीं होणाऱ्या संयोगाच्या एकरूपाप्रमाणें अभेदरूप होतो. त्या परब्रह्मस्वरूपाच्या व्यापकज्ञानांत एकमेकांचा भेद मुळीं उरतच नाहीं. याविषयीं हरिपाठांत श्रीज्ञानराज म्हणतात— "साधुबोध झाला नुरोनियां ठेला। ठायींच मुराला अनुभव॥ कापराची वाती उजळली ज्योती। ठायींच समाधी झाली जैसी." ॥ ५२ ॥

तेविं देखेना मी ययातें। तव गेलें वंद्य वंदितें।
चेइलिया कान्तें। स्वप्नींचें जेवीं॥ ५३॥

पदांचा अर्थ— जेवीं—ज्याप्रमाणें; **स्वप्नींचें**—स्वप्नांतलें; **कान्तें**—कान्त व कान्ता, नवरा-बायको; (**कान्तें**—नपुं. लिंगीं अनेकवचन कान्त याचें); **तेविं**—त्याप्रमाणें; **मी**—ज्ञानेश्वर; **ययातें**—या श्रीगुरूचें ज्ञानस्वरूप; **देखेना**—पाहतों तोंच, ओळखून तद्रूप होतों तोंच; **वंद्य**—नमस्काराचें सद्गुरुदैवत; व **वंदितें**—हा वंदन करणारा शिष्य हा भेद; **गेलें**—हें द्वैत नाहींसें झालें.

भावार्थ—ज्याप्रमाणें स्वप्नांतील कान्त-नवरा व कान्ता-बायको हीं दोन्ही रूपें एखादा माणूस जागा होतांच त्याला तीं दोन्हीहि दिसेनाशीं होतात, तसेंच मी हा ज्ञानेश्वर त्या मला श्रीगुरूंच्या परब्रह्म-परमात्मस्वरूपाचें दर्शन होतांच पूर्वीचा जो हा मी वंदन करणारा व वंद्य श्रीगुरुदैवत हे दोन्ही स्वप्नासारखे द्वैतभाव नाहींसे होऊन मूळचें परब्रह्मनिर्विकारस्वरूप होतें, तें तसेंच सर्व व्यापकतेनें सर्वत्र ओतप्रोत चिदाकाशरूपानें असलेलें माझ्या अनुभवास आलें. ॥ ५३ ॥

किंबहुना इया भाखा। द्वैताचा जेथें उपखा।
फेडोनियां स्वसखा। श्रीगुरु वंदिला॥ ५४॥

पदांचा अर्थ—**किंबहुना**—फार काय सांगावें; **जेथें**—ज्या परमात्म-स्वरूपाच्या ठिकाणीं; **इया**—ह्या; **द्वैताचा भाखा**—आभासित स्वप्नवत् भाषेचा; **उपखा**—शीण, त्रास, व्यवहार; **फेडोनियां**—दूर सारून, बाजूला ठेवून; **स्वसखा**—(**स्व**—आत्मा) आत्मस्वरूपरूप; **सखा**—जिवलग; **श्रीगुरु वंदिला**—श्रीसद्गुरूंना मीं वंदन केलें.

भावार्थ—आतां फार काय सांगावें? ज्या आत्मस्वरूपांत द्वैताचें वर्णन खपत नाहीं, तो तिथें केवळ शीण होतो, त्या वर्णनव्यवहारास बाजूला ठेवून माझा आत्मसखा अशा श्रीगुरूस मीं वंदन केलें.

सुबोधविवरण—श्रीगुरूंच्या सर्वमय अशा व्यापक परब्रह्मस्वरूपांत शिष्याची वंदनक्रिया होत नाहीं म्हणून ते वंद्य अशा द्वैतस्वरूपानें उरत नाहींत. यास्तव श्रीगुरु हे वंद्य नाहींत व आपण वंदन करणारा तोहि नाहीं, असें मागील ओवीपर्यंत दृष्टान्तांनीं महाराजांनीं सयुक्तिक स्पष्ट केलें. असा हा गुरुशिष्य या उभयस्वरूपाचा अभाव व्यक्त केला असूनहि पुन्हा या ओवींत "मी श्रीगुरुचरणांस वंदन केले" असें जें म्हटलें त्याचा अभिप्राय हा कीं, गुरुशिष्य हा दोन व्यक्तिरूप द्वैतभास खरोखरीचा वास्तविक असा दिसणारा असतो. त्याचा विवेकद्वारां निरास करून बाध करणें आणि केवळ परमात्मस्थितीनेंच आपलें जें असणें यालाच इथें महाराजांनीं "वंदन केलें" असें म्हटलें आहे. शास्त्रांत यास "मिथ्यात्वदृढनिश्चय" म्हणतात. मृगजळ दिसतें, तें खोटें पाणी आहे. हें त्याचें मिथ्यात्व, खोटेपण, तो आभास – यास खोटें ठरवून त्या खोट्याचा पक्का निश्चय करणें म्हणजेच 'मिथ्यात्वदृढनिश्चय' होय. मृगजळांतलें पाणी खोटें म्हणून त्याचा जरी 'बाध' केला, तें खोटें ठरलें तरी त्या भासाची प्रतीति होत असते तिचा मात्र नाश होत नाहीं. स्वप्नांतल्या पदार्थाप्रमाणें मृगजळ हें मुळांत खोटें असूनहि त्याचें तें एकसारखें दिसत राहणें हें जसें नाहींसें होत नाहीं, त्याप्रमाणें गुरुशिष्य हे दोन देहभाव विवेकदृष्टीनें जरी बाधित केले, मिथ्या आहेत असें जरी ठरविलें तरी गुरुशिष्य या दृश्य स्वरूपाची प्रतीति नाहींशी होणार नाहीं. याच अभिप्रायानें महाराजांनीं "मीं वंदन केलें" असें पुन्हा म्हटलें.॥५४॥

असा आपला सखा जे श्रीगुरु त्यांच्या स्वरूपाचा नवलाव यापुढील दहा ओव्यांनीं सांगतातः—

याच्या सख्याची नवाई । आंगीं एकपणा रूप नाहीं ।
आणि गुरु–शिष्य दुवालहि । पवाडु केला ॥ ५५ ॥

पदांचा अर्थ—**सख्याची नवाई**–प्रेमाचें कौतुक; **आंगीं**–स्वतांच्या ठिकाणीं, निजस्वरूपीं; **एकपणा रूप**–एकपणालाहि अवकाश; (नाहीं, तिथें) **दुवालहि**–दुजेपणाचा सोहळा; **पवाडु**–वाढविला.

भावार्थ—या श्रीगुरूंच्या प्रेमाचें कौतुक किती म्हणून सांगावें? अहो यांच्या मूळस्वरूपीं जिथें एकपणालाहि प्रवेश नाहीं, "एकमेवाद्वितीयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन" असें श्रुति ज्यांच्या स्वरूपाचें वर्णन करते, कीं तें परब्रह्म परमात्मस्वरूप एकच एक, तिथें त्यावांचून दुसरें हें दृश्यजगत् व देहभाव हे नाहींतच.

आणि तिथें हा गुरुशिष्य दुजेपणाचा तर सोहळा वाढविला आहे. "एकोऽहं बहु स्याम्"–"मी एक खरा पण मी बहुत व्हावें" असें मी माझ्या एकपणांतल्या परमानंदसुखाचा सोहळा दुजेपणानें भोगावा म्हणून स्फुरण उठलें, तेंच हें गुरु–शिष्यांच्या निमित्तानें निजभक्तिप्रेमसुखाचें भाग्य आपण अनुभवावें म्हणूनच होय. ॥ ५५ ॥

कैसा आपणया आपण । दोंविण सोईरेपण ।
हा याहूनि विलक्षण । नाहींना नोहे ॥ ५६ ॥

पदांचा अर्थ—**दोंविण**–दुसऱ्यावांचून; **आपणया आपण**–आपला आपणच; **सोईरेपण**–गुरुशिष्यभाव; **कैसा**–कसा झाला; कारण **हा नाहीं, ना**–हें श्रीगुरुस्वरूप "नाहीं असें नाहीं" – तर आहे; व **नोहे**–नाहीं, – "आहे–नाहीं"; **याहूनि**–या दोन्हींहून; **विलक्षण**–अगदीं निराळेंच होय.

भावार्थ—दुसऱ्याशिवाय आपलें आपणच द्वैतावांचून हे श्रीगुरु या गुरु–शिष्यरूपानें कसे प्रकटले हें सांगतां येणें कठीण आहे. कारण श्रीगुरूंचें परमात्म-स्वरूप तर "आहे–नाहीं" या दोन्ही भावांहून विलक्षण असें अगदीं निराळें – नित्य अस्तित्वरूप तें आहे. ॥ ५६ ॥

जग आघवें पोटीं माये । गगनायेव्हडें होऊनि ठाये ।
तेचि निशीं साहे । नाहींपणाची ॥ ५७ ॥

पदांचा अर्थ—**आघवें जग**–ज्या गगनाचें; **पोटीं माये**–सामावतें; त्या **गगनायेव्हडें**–(श्रीगुरुरूप); **होऊनि ठाये**–होऊन दिसत असतें; **तेचि**–तेंच गगन; **नाहींपणाची**–अभावाची; **निशी साहे**–सीमा होतें.

भावार्थ—अवघें जग गगनाच्या पोटीं सामावलेलें असतें. तेवढ्याच गगनाएवढ्या आकाराचें श्रीगुरुरूप (परब्रह्म) असल्याचें दिसतें,– झालेलें भासतें, तोंच तें विचारानें नाहींपणाची मर्यादा ठरतें.

सुबोधविवरण—एवढें मोठें जग ज्याच्या पोटांत मावतें त्या गगना-एवढा मोठा पदार्थ दुसरा कोणताच नाहीं. पण तेंहि गगन परब्रह्म श्रीगुरूंच्या पोटांत सामावून असतें. म्हणजे शिंपीवर तिच्याच आकाराएवढा रुपया भासतो, तो त्या शिंपीचें खरें स्वरूप समजेपर्यंतच त्याचें अस्तित्व खरें वाटतें. पण शिंपीचें मूळ स्वरूप समजतांच त्या रुपयाच्या अस्तित्वाची मर्यादाहि लगेच संपते. त्याच-प्रमाणें परब्रह्मपरमात्मस्वरूप श्रीगुरूंच्या आकाराएवढा आकाशादि जगताचा

भास भासतो, तें त्याचें अस्तित्व श्रीगुरूंच्या परमात्मस्वरूपाचें विवेकानें सत्यज्ञान होतांच तो नाहींसा होतो, त्याची मर्यादा संपते. ॥ ५७ ॥

कां पूर्णते तरी आधारु । सिंधु जैसा दुर्भरु ।
तैसा विरुद्धेयां पाहुणेरु । याच्या घरीं ॥ ५८ ॥

पदांचा अर्थ—**कां**–कारण; **सिंधु जैसा**–समुद्र जसा; **पूर्णते**–पूर्णपणाला; **दुर्भरु तरी**–दुर्भर्तेलाहि, अपूर्णपणालाहि; **आधारु**–आधार, आश्रय; **तैसा**–तसाच; **याच्या घरीं**–या श्रीगुरूंच्या स्वरूपीं; **विरुद्धेयां**–दोन विरुद्ध धर्मांना, असणेंपण व नसणेंपणांना, भाव–अभावांना; **पाहुणेरु**–पाहुणचार, आदरातिथ्य, सन्मान.

भावार्थ—कारण समुद्र ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत नद्या आटल्यानें कमी होत नाहीं व पावसाळ्यांत नद्यांनीं वाढत नाहीं, अशा या पूर्णतेला व अपूर्णतेलाहि तो जसा सारखाच आधार होऊनहि आपण आपल्या ठिकाणीं पूर्णच्या पूर्णच असतो, त्याचप्रमाणें या परब्रह्मपरमात्मश्रीगुरूंच्या स्वरूपीं आकाशादिक जगताच्या उत्पत्तीचें असणें व त्याच्या प्रलयांत त्याचें तें नसणें – या एकमेकांविरुद्ध दोन्ही धर्मांना सारखाच पाहुणचाराचा आदर होय. परमात्मस्वरूप निर्विकार, नित्य पूर्णच्या पूर्णच असतें तसेंच असतें. जगताचें असणें व नसणें हे कल्पित भाव श्रीगुरुस्वरूपीं केव्हांहि नाहींतच. ॥ ५८ ॥

हेंच आणखी पुढील दृष्टान्तांनीं स्पष्ट करतातः—

तेजा तमातें कांहीं । परस्परें निकें नाहीं ।
परि सूर्याच्या ठायीं । सूर्यची असे ॥ ५९ ॥

पदांचा अर्थ—**तेजा**–तेजाचें, प्रकाशाचें; **तमातें**–काळोखाचें; **परस्परें**–एकमेकांचें; **कांहीं**–एवढेंसुद्धां, यत्किंचितहि; **निकें**–सरळपणा, सख्य, चांगुलपणा; **परि**–पण.

भावार्थ—प्रकाशाचें व काळोखाचें एकमेकांचें यत्किंचितहि सख्य नसतें. हे दोन्ही धर्म सूर्यावर भासले तरी कोणत्याहि इतर प्रकाशानें तो अधिक प्रकाशित होत नाहीं, किंवा तो काळोख्यानें मंद होऊन झाकला जात नाहीं. तो सूर्य आपल्या ठिकाणीं आपल्या सूर्यपणाच्या तेजानें तसाच असतो. ॥ ५९ ॥

येक म्हणतां भेदें । तें कीं नानात्वें नांदे ।
विरुद्धें आपणया विरुद्धें । होतील काइ ॥ ६० ॥

पदांचा अर्थ—(जें) **येक म्हणतां भेदें**–जें परब्रह्म एकच एक आहे असें म्हटलें तरीसुद्धां भेद निर्माण होतो; **तें कीं नानात्वें नांदे**–तें अनेकपणानें रहाटेल काय? **विरुद्धें**–विरुद्ध धर्माचें जें; **आपणया**–तें आपल्या स्वतांच्या ठिकाणीं; **विरुद्धें होतील काय**–आपल्याउलट वागेल काय?

भावार्थ—"एकमेवाद्वितीयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन" या श्रुतिवचनानुरूप जें परब्रह्मश्रीगुरुस्वरूप "एकच एक आहे, तिथें या जगतांचें नानात्व नाहीं" अशा त्या स्वरूपीं जिथें एक म्हणणें हेंहि दोनपणाचा भेद दर्शवितें तें आपण या जगताच्या अनेकपणाचें झालेलें आहें हें कसें दर्शवील? तें अनेकपणानें वागेल कसें? विरोध हा आपणच आपल्या स्वतांला विरोध करील काय? अग्नि स्वतांला जाळील काय? नाहींच. जिथें स्वतांच्या एकपणाचीसुद्धां जाणीव नाहीं तिथें जगताचा हा अनेकपणाचा विकार कसा संभवेल? ॥ ६० ॥

म्हणौनि शिष्य आणि गुरुनाथु। या दोहों शब्दांचा अर्थु।
श्रीगुरुचि परी होतु । दोहों ठायीं ॥ ६१ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून शिष्य आणि गुरुनाथ, गुरुदेव असे हे निराळे शब्द मात्र दोन खरे, पण या दोन्ही शब्दांचा भावार्थ श्रीगुरुच. ते परमात्मा श्रीगुरु आपणच दोन्ही ठिकाणीं शिष्यरूप व गुरुरूप विलास करतात. ॥ ६१ ॥

तो एकपणाचा विलास पुढीलप्रमाणें—

कां सुवर्ण आणि लेणें। वसतें येकें सुवर्णें।
वसतें चंद्र चांदणें। चंद्रेंचि जेविं ॥ ६२ ॥

पदयुक्त भावार्थ—जसें सोन्याचें सतेज पिवळें धमकपण, व त्याचे बनलेले अलंकार, हे दोन्ही भाव–हीं त्याचीं दोन्ही रूपें मूळच्या एका सुवर्णावरच राहतात. मूळच्या एका चंद्रबिंबावरच त्याचा बिंबांतला प्रकाश व चांदणें–हा प्रकाश अनेकपणाचा भासूनाहि तो जसा सर्वत्र एकच एक असतो. ॥ ६२ ॥

नाना कापुरु आणि परिमळु। कापुरचि केवळु।
गोडी आणि गुळु। गुळुचि जेविं ॥ ६३ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा कापूर आणि त्याचा सुगंध मिळून एक जसा कापूरच; गोडी व गूळ मिळून जसा एक गूळच. ॥ ६३ ॥

तैसा गुरुशिष्यमिसें । हाचि येकु उल्हासे ।
जन्ही कांहीं दिसे । दोन्हीपणें ॥ ६४ ॥

पदयुक्त भावार्थ—तसेंच व्यवहारामध्यें जरी गुरुशिष्य असा कांहीं दोनपणाचा व्यक्तिभेद दिसला तरी त्या गुरुशिष्यमिषानें परब्रह्मपरमात्मरूप श्रीगुरुच एकटे असूनाहि हा अनेक गुरुशिष्यपणाचा विलास करतात. " मी मुळांत एकच एक, त्यानेंच अनंतकोटि ब्रह्माण्डरचनेचें जगत् व्हावें, त्या एकानेंच ईश्वरमाया, देवदेवी, गुरुशिष्य असें अनेक प्रकारचें शक्तिरूप होऊन अनेकपणाचा विलास करावा, हा माझा आमच्या परमानंदमुखांतला अनादि पण अखंड एकसारखा चाललेला भक्तिप्रेमाचा खेळ होय असें श्रुति म्हणते. ॥ ६४ ॥

यासच आणखी दृष्टान्त देतात :—

आरिसां आणि मुखीं । मी दिसे हे उखी ।
आपुलिये ओळखी । जाणे मुख ॥ ६५ ॥

पदयुक्त भावार्थ—आरशांतलें प्रतिबिंब आणि मुखांतलें बिंब हें मीच दिसतों, " हे उखी " हें जान आपल्या ओळखीनें मुख पाहणारा जाणतो, मीच हा दोन्हीकडे असें पाहणारा आपणांस ओळखतो. ॥ ६५ ॥

पहातां निरंजनीं निदेला । तो निर्विवाद येकला ।
परि चेता चेवविता जाहला । दोन्ही तोचि ॥ ६६ ॥

पदांचा अर्थ—**निरंजनीं**–निर्जन वनात, अरण्यांत; **निदेला**–निजलेला; **निर्विवाद**–खरोखरच; **चेता**–जागा होणारा; **चेवविता**–जागा करणारा; **जाहला**–झाला; **दोन्ही तोचि**–दोन्ही आपणच.

भावार्थ—वास्तविक पाहतां अरण्यांत गाढ निजलेला तो खरोखरच तिथें एकटाच, त्यामुळें जागा होणारा व जागा करणारा हे दोन्ही भाव तो स्वतांच झालेला असतो. ॥ ६६ ॥

जे तोचि चेता तोचि चेववी । तेवीं हाचि बुझे हाचि बुझावी ।
गुरुशिष्य नांदवी । ऐसेन हा ॥ ६७ ॥

पदयुक्त भावार्थ—कारण तो स्वतांच जागा होणारा व स्वतांस जागा करणारा – दोन्ही जसा आपण स्वतः एकटाच, तसेंच हा श्रीगुरुरायच आपण स्वतांचें स्वरूप ओळखणारा गुरु, व आपणच आपणांस समजाविणारा शिष्य,–अशा तऱ्हेनें

हें गुरु व शिष्यपणाचें नातें आपणच दोन्ही होऊन दाखवितो, (नांदवी) रहाटवितो. ॥ ६७ ॥

अशा श्रीगुरूंची ही सर्वमय होऊन असण्याची अतिसूक्ष्म व्यापकता, ही लीला कोणास कळते तें सांगतातः—

दर्पणेवीण डोळा । आपुले भेटीचा सोहळा ।
भोगिता तरि लीळा । सांगतों हें ॥ ६८ ॥

पदयुक्त भावार्थ—आरशावांचून डोळ्यानें आपल्यास पाहण्याचें सुख भोगणारा कोणी असेल तर त्यास ही गुरुशिष्याची लीला आम्ही सांगतों ती समजेल; आम्ही आतांपर्यंत सांगितलेली व पुढें सांगणार आहों जी श्रीगुरूंची लीला—तिचें आकलन त्यासच होईल.

सुबोधविवरण—यांतील रहस्य असें कीं, आधीं आरशामध्यें जें प्रतिबिंब पडतें त्यास पाहणारा डोळा हा त्याचें तें आरशासह बिंब–प्रतिबिंब पाहून होतांच मग तो तो आरसा, तें बिंब–प्रतिबिंब हें सर्व विसरून जाऊन स्वतांसच पाहात राहणारा उरतो. इतकी सूक्ष्मता, इतका हा लय त्याचा आपल्या ठिकाणीं होत असतो कीं, त्या वेळची त्याची ती एकरूपतेची अवस्था सहज कळणारी नसते. तसेंच आत्मा हा स्थूल–सूक्ष्म–कारणदेहरूपी आरशांत वावरणारें आपलें जीवपणाचें प्रतिबिंब मन–बुद्धीच्या डोळ्यांनीं पाहात असतांना विवेकद्वारा "इन्द्रियाणि पराण्याहुः इन्द्रियेभ्यः परं मनः। मनसस्तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः (आत्मा)" –इंद्रियें स्थूल शरीराहून सूक्ष्म, इंद्रियांहून सूक्ष्म मन, मनाच्याहून सूक्ष्म बुद्धि, हीं जीं एकमेकांच्या आंत एकाहून एक सूक्ष्म–सूक्ष्म,–या सर्वांच्या आंत अन्तर्यामांत असणारा हा जीवात्मा" अशा या भगवद्वचनाचा बोध होतांच जीवात्मा स्थूल–सूक्ष्म–कारण–महाकारण शरीरांतील आरशांत दिसणाऱ्या इंद्रियें, प्राण, मन, बुद्धि या सर्वांस ज्ञानचक्षूनें पाहात असल्यानें त्या सर्वांस विसरून जाऊन केवळ निजआत्मज्ञानस्वरूपच होऊन असतो. त्या वेळीं हें मी, तें मी हें सर्व सुटून जाऊन तो एकमयाच्या तद्रूपतेनें स्वतांच उरतो. अशा या सूक्ष्मस्वरूपाची जाणीव ज्यास होईल, त्यासच श्रीगुरुलीला समजेल. मृगजळ खरें नसूनहि दिसत असतेंच, तद्वत् स्थूल शरीरांतलें अनेकत्व खरें नसून अभावरूप असें दिसत असूनहि तें विसरून जाऊन केवळ सूर्यप्रकाशवत् निखळ ज्ञानमय असें स्वस्वरूप एकपणानें पाहणें हेंच श्रीगुरूंच्या लीलेचें स्वरूप, तसेंच परब्रह्मपरमात्मस्वरूपीं अनंतकोटिब्रह्माण्डरूपरचनेचा अनेकपणा होत असलेला तो मृगजळवत् खरा नसूनहि दिसत असला, आणि परमात्मज्ञान-

मय सूर्यचक्षूला जगत् हें मृगजळ दिसत राहिलें, तरी तियेंसुद्धां व्यवहारकाळीं स्वप्रकाशरूप स्वस्वरूप दिसत असतें. "तेजौनि निघाला। तेजाचाचि झाला। तया रश्मी ऐसा भला। बोध व्हावा।" असें ज्ञानेश्वरींतल्या या ओवीस अनुसरून वरील डोळ्याच्या दृष्टान्तानें श्रीगुरूंच्या लीलेचें रहस्य महाराजांनीं दर्शविलें आहे. ॥ ६८ ॥

एवं द्वैतास उमसों। नेदि ऐक्यास विसकुसों।
सोईरिकीचा अतिसो। पोखीतसे ॥ ६९ ॥

पदयुक्त भावार्थ—एवं–याप्रमाणें **द्वैतास उमसों नेदी**–द्वैत उत्पन्न न होऊं देतां; **ऐक्यास विसकुसों नेदि**–एकपणांत बिघाड होऊं न देतां; **सोईरिकेचा**–गुरुशिष्य या नात्याचा; **अतिसो**–अतिशयपणाचा विलास; **पोखितसें**–श्रीगुरु वाढवीत असतात. आपणच गुरु व आपणच शिष्य या नात्यामुळेंच द्वैत उत्पन्न न होतां दोन्ही आपणच होऊन हा विलास एकसारखा वाढतच असतो. ॥ ६९ ॥

निवृत्ति जया नांव। निवृत्ति जया बरव।
जया निवृत्तीची राणीव। निवृत्तिचि ॥ ७० ॥

पदयुक्त भावार्थ—**निवृत्ति** ज्यांचें नांव, **निवृत्ति** ज्यांचें (बरव) स्वरूप, ज्या निवृत्तींचें–या श्रीगुरु निवृत्तिनाथांचें (राणीव) ऐश्वर्य **निवृत्तिच.** जें परमात्मस्वरूप स्वभावतांच सर्व धर्मांनीं निवृत्त–असें ज्यांचें मूळस्वरूप, म्हणून त्यांचें नांवहि **निवृत्ति.** या निवृत्तिस्वरूप श्रीगुरूंचें ऐश्वर्यहि पण **निवृत्तिच.** ॥ ७० ॥

याचाच स्पष्ट खुलासा पुढील ओवीनें महाराज करतातः—

वांचोनि प्रवृत्ति विरोधें। कां निवृत्तीचेनि बोधें।
आणिजे तैसा वादें। निवृत्ति नव्हे ॥ ७१ ॥

पदांचा अर्थ—**वांचोनि**–कारण; **प्रवृत्ति**–मूळ अज्ञान; **प्रवृत्तिविरोधें**–त्या मूळच्या अज्ञानास नाहींसें करण्यानें; **कां**–अथवा; **निवृत्तिचेनि बोधें**–मूळच्या स्वस्वरूपाच्या बोधानें, साक्षात्कारानें; व **वादें**–वेदान्तशास्त्राच्या विवेकाच्या साहाय्यानें; **आणिजे**–(निवृत्तिस्वरूप) उत्पन्न व्हावें; **तैसा निवृत्ति** हा नव्हे.

भावार्थ—कारण मूळच्या स्वरूपअज्ञानास नाहींसें करून स्वस्वरूपाचा बोध वेदान्ताच्या साहाय्यानें प्राप्त करून निवृत्तिस्वरूप मूळचें स्वरूपज्ञान उत्पन्न

व्हावें तसलें हें प्राप्त होणारें निवृत्तिस्वरूप श्रीगुरु नसून ते स्वयंसिद्ध "**निवृत्त**" आहेत. ॥ ७१ ॥

हेंच पुढील सात ओव्यांच्या दृष्टान्तांनीं सिद्ध करतातः—

आपणा देऊनि राती । दिवसा आणी उन्नति ।
प्रवृत्ति वारी निवृत्ति । नव्हे तैसा ॥ ७२ ॥

पदयुक्त भावार्थ—आपल्या ठिकाणीं (आपणा राती देऊनि)—रात्रीला नाहींशी करून दिवसाला (उन्नति आणी) उदयास आणणाऱ्या (तैसा) तशा सूर्यासारखा (प्रवृत्ति वारी) मूळ अज्ञान नाहींसें करून, निरसन करून, दूर करून (निवृत्ति) मूळच्या स्वयंज्ञानरूपाचा उदय करणारे हे निवृत्तिनाथ तसे नव्हत. हे निर्विकार स्वतः सिद्ध आहेत. ॥ ७२ ॥

वोपसरयाचें बळ । घेऊनि मिरवे कीळ ।
तैसें रत्न नव्हे निखळ । चक्रवर्ती हा ॥ ७३ ॥

पदयुक्त भावार्थ—हिरा रत्न हें (वोपसरयाचें बळ) कोंदणाचें साहाय्य घेऊन (कीळ मिरव) आपलें तेज पाडतें; तसलें (दुसऱ्याच्या साहाय्यानें मिरवणारें) रत्न हें नसून (निखळ चक्रवर्ती) परिपूर्ण सार्वभौम स्वतंत्र महाराजा हे निवृत्तिनाथ आहेत. ॥ ७३ ॥

गगनही सूनि पोटीं । जैं चंद्राची पघळे पुष्टी ।
तैं चांदिणें तेणेंसि उठी । आंग जयाचें ॥ ७४ ॥

पदयुक्त भावार्थ—(जैं चंद्राची पुष्टि) जेव्हां चंद्राचा पूर्ण प्रकाश गगनालाहि (पोटीं सूनि) आपल्या प्रकाशांत सांठवून (सर्व गगनभर आपला प्रकाश पसरवून) (पघळे) पसरतो, विस्तार पावतो, तेव्हांच (जयाचें आंग) ज्याचें स्वरूप (तेणेंसी चादिणें) त्याच चांदण्यानें (उठी) उठावदार दिसतें, अधिक प्रकाशमय दिसतें. ॥ ७४ ॥

तैसें निवृत्तिपणासि कारण । हाचि आपणया आपण ।
घेयावया फुलचि झालें घ्राण । आपली दृती ॥ ७५ ॥

पदयुक्त भावार्थ—तसेंच (निवृत्तिपणासि कारण) मूळच्या अज्ञानरूप प्रवृत्तीचा निरास करून प्राप्त होणाऱ्या स्वरूपज्ञानाच्या निवृत्तपणास (कारण) अधिष्ठानरूप आधार (हाचि) हेच निवृत्तिनाथ (आपणया आपण) आपल्या

स्वयंप्रकाशानें आपले आपणच असतात. (आपली दृती घेयावया) आपला सुगंध उपभोगण्यास (फुलचि घ्राण झालें) फुलानेंच नाक व्हावें, तद्वतच आपलें स्वयंसिद्ध निवृत्तिपणाचें सुख आपणच आपलेपणानें घेत असावें. ॥ ७५ ॥

दिठी मुखाचिये बरवे । पाठीकडोनि जैं पावे ।
तैं आरिसे धांडोळावे । लागती काई ॥ ७६ ॥

पदयुक्त भावार्थ—(दिठी)–दृष्टि [मुखाचिये बरवे (बरव–सौंदर्य)] मुखाचें सौंदर्य (जैं) जर (पाठीकडोनि पावे)–आंत स्वतांच्या ठिकाणीं मुरडून, उलट होऊन पाहील (तैं) तर आरसे धुंडाळावयास पाहिजेत काय ? ॥ ७६ ॥

कीं राती हन गेलिया । दिवस हन पातलिया ।
काय सूर्यपण सूर्या । होआवें लागे ॥ ७७ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा (राती हन गेलिया) रात्र अगदीं संपल्यावर दिवस खराच उजाडतांच मग सूर्याला आपल्या ठिकाणीं सूर्यपण आणावें लागतें काय ? रात्रीच्या जाण्यावर व दिवसाच्या उगवण्यावर सूर्याचा सूर्यपणा नसून तो स्वयंप्रकाश स्वतांच्या ठिकाणीं स्वयंसिद्ध आहे. त्याप्रमाणें प्रवृत्तीच्या निरोधावर किंवा निवृत्तीच्या बोधावर श्रीगुरूंचा निवृत्तिपणा नसून तो स्वयंसिद्ध निवृत्तिपणाच आहे. अज्ञान नाशानें प्राप्त होणारा बोध तो हा निवृत्तिपणा नाहीं. ॥ ७७ ॥

म्हणोनि बोध्य बोधोनि । घेणें प्रमाणें साधोनि ।
ऐसा नव्हे भरंवसेनि । गोसावी हा ॥ ७८ ॥

पदयुक्त भावार्थ—(म्हणोनि भरंवसेनि) यावरून खरोखरीच (बोध्य बोधोनि घेणें) श्रीगुरुपरमात्मा वेदान्तशब्दज्ञानानें जाणून घ्यावा, किंवा (प्रमाणें) इंद्रियें, मन, बुद्धि या प्रमाणांच्या साहाय्यानें (साधोनि घ्यावा) प्राप्त करून घ्यावा, असा (हा गोसावी–इंद्रियें, मन, बुद्धि यांचा प्रकाशक) हा माझा स्वामी श्रीगुरु निवृत्ति नव्हे. वेदान्तशास्त्र या शब्दज्ञानानें अथवा इंद्रियें, मन–बुद्धि या जड, अचेतनांच्या साहाय्यानें स्वयंसिद्ध आत्मस्वरूप प्राप्त होणारें नाहीं, तें स्वयंज्ञानमय आहे. ॥ ७८ ॥

असें परमात्मासिद्धस्वरूपश्रीगुरूंचें वर्णन करून श्रीगुरुस्तवनाचा आतां उपसंहार करतातः—

ऐसें करणियावीण । स्वयंभचि जें निवृत्तिपण ।
तयाचे श्रीचरण । वंदिले ऐसे ॥ ७९ ॥

पदयुक्त भावार्थ—(ऐसें)–असें आतांपर्यंत वर्णन केलेलें (करणियावीण) कोणत्याहि कृतीवांचून असें अक्रिय असणारें अकृत्रिम (स्वयंभचि)–केवळ स्वयंभू, ज्ञानघन निवृत्तिपण ज्या श्रीगुरूंचें, त्यांच्या चरणांस अशा भेदरहित एकपणानें मीं – ज्ञानेश्वरानें वंदन केलें. ॥ ७९ ॥

आतां श्रीगुरुचरणवंदनानें प्राप्त होणारें फळ सांगून पुढील प्रकरणाचें अवतरण देतातः—

आतां ज्ञानदेवो म्हणे । श्रीगुरुप्रणामें येणें ।
फेडिलीं वाचाऋणें । चौही वाचांचीं ॥ ८० ॥

पदयुक्त भावार्थ—यावर ज्ञानेश्वर म्हणतात, मीं (येणें श्रीगुरुप्रणामें) या श्रीगुरूंशीं समरसतेच्या वंदनानें (चौही वाचांचीं) परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चारीहि वाणींच्या (ऋणें) बंधनांतून मुक्त झालों. ॥ ८० ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे श्रीगुरुस्तवनं नाम द्वितीयं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवाद–परब्रह्मपरमात्म्याचें ओतप्रोत वर्णन असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें श्रीगुरुस्तवननामक दुसरें प्रकरण समाप्त.

प्रकरण तिसरें

वाचाऋणपरिहार

(वाचाबंधनमुक्तता)

मागील दुसऱ्या प्रकरणांत श्रीगुरुपरमात्म्यास वंदन केलें व त्या वंदनाची फलप्राप्ति समरसता ही चारी वाणींचीं ऋणें फिटल्यानें त्यांच्या मूळच्या बंधनांतून मुक्त झाल्यानेंच कशी प्राप्त होते तें स्पष्ट करण्याकरितांच या प्रकरणाची सुरुवात आहे. त्यांतच अविद्येचा अभावहि दर्शविला आहेः—

ययांचेनि बोभाटें । आत्मयाची झोंप लोटे ।
पूर्ण तऱ्ही ऋण न फिटे । जें चेणेंचि नीद कीं ॥ १ ॥

पदांचा अर्थ—**ययांचेनि**-यांच्या योगानें; **ययांचेनि बोभाटें**-या चारी परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी वाणींच्या गर्जनेनें; **आत्मयाची**-जीवात्म्याचें; **झोंप**-स्वरूपाविषयींचें अज्ञान; **लोटे**-दूर होतें; **तऱ्ही**-तरी, तथापि; **पूर्ण**-अगदीं पूर्णत्वानें; **ऋण**-शेषरहित, लेशरहित होऊन; **न फिटे**-नाहींसें होत नाहीं; **जें चेणेंचि**-जें आत्मज्ञान प्राप्त होऊन जागें होणें तेंच; **नीद कीं**-झोंपेसमान अज्ञानच तें. ॥ १ ॥

सुबोधविवरण—शरीरांत चार वाणी आहेत. जागेपणीं जिभेंतून उच्चार स्थूल देहांत जिच्या योगानें होतो ती वैखरी वाणी. स्वप्नांत कंठाच्या आंत असणारी मध्यमा,- जी स्वप्नांत सूक्ष्म शरीरांत बरळते ती. झोंपेंतल्या गाढ निद्रेंत हृदयस्थानीं कारणदेहांतल्या अज्ञानरूपानें उच्चाररहित असणारी ती पश्यन्ती. नाभिस्थानीं महाकारणदेहांत आत्मज्ञानानें स्फुरणारी ती परा वाणी. जाग्रत अवस्थेंत वैखरी वाणीच्या साहाय्यानें नामजप, स्तोत्रस्तवन, भजन, कीर्तन, रुद्रावर्तन या साधनांच्या तपाच्या योगानें वैखरी वाणीचें जडत्व कमी होतें. तोच नामजप तोंड मिटून कंठांतून सगुणमूर्तीच्या ध्यानासह केल्यानें मनाचें चांचल्य नाहींसें होऊन स्वप्नरहित अवस्था सगुणाच्या कृपेनें प्राप्त झाली असतां मध्यमा वाणी उरत नाहीं. त्यामुळें निद्रारहित अवस्था होऊन तीच अज्ञानरूप पश्यन्ती परावाणी-

रूप ज्ञानमय होते. सगुण ध्यानाच्या कृपाप्रसादानें नाभीच्या आंतील चित्तांत आत्मस्वरूपाचें ज्ञान प्राप्त व्हावें अशी प्रबल इच्छा उठते. त्यांतच इंद्रियदमन, कामक्रोधरहित मनाचा निग्रह हा उपशम; शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि या जड अनात्म्याविषयीं दृढ मिथ्यात्वभाव, व मी आत्माच सत्य असें सवैराग्य आत्मज्ञान, वेदान्तशास्त्रांतील जीवाचें ब्रह्माशीं ऐक्य आहे, तें प्राप्त व्हावें अशी उठणारी अचलश्रद्धा आपोआपच अन्तरांत उत्पन्न होऊन वेदान्तशास्त्रांत निष्णात व स्वरूप साक्षात्कारी महापुरुषाची गांठ पडून त्या भेटींत त्यांच्या द्वारें "**तत्त्वमसि**" (त्वम् तत् असि) "तूं (जीवा)–आपलें शुद्ध स्वरूप विसरला आहेस; तें ब्रह्म, तें शुद्ध स्वरूप तूं आहेस" असा उपदेश प्राप्त होणें, हेंच आत्मस्वरूपाचें श्रवण. या श्रवण केलेल्या उपदेशवाक्याचें स्थूलशरीर, सूक्ष्मशरीर, कारण–महाकारण हीं सर्व त्यांतील रचनेसह अनात्म, जड, अचेतन– (जें स्वतांला जाणत नाहीं व दुसऱ्याला जाणत नाहीं) अशीं अज्ञानस्वरूप आहेत असें एकसारखें अहर्निश मनन करणें, या सर्वांस जाणणारा चेतनस्वरूप मी अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय–या सर्वांच्या अन्तर्यामांत असणारे नित्य आनंदमय आकाशाहूनहि अतिसूक्ष्म चिदाकाश ब्रह्म आहे असें अभ्यासपूर्वक मनन करीत राहिल्यानें तें आत्मदर्शन एकसारखें होत राहणें हेंच निदिध्यासन. "सदभ्यासें निरंतर । चित्तासि परम पुरुषाची मोहर (आवड) । लावी मग शरीर । जावो अथवा राहो ॥ –या चित्ताला परमपुरुष परमात्मा परब्रह्मस्वरूपाच्या अभ्यासाची आवड निरंतर लाव. म्हणजे तें देहभानरहित झाल्यानें शरीरभाव आहे का नाहीं या दोन्ही भावाविरहित होशील—(ज्ञानेश्वरी अ. ८–८–८२)" अशा महाकारण-देहांतल्या परावाणीच्या ज्ञानमय स्थितींत आत्म्याची अज्ञानरूप झोंप नाहींशी होऊन आत्मसाक्षात्काराचा लाभ झाला तरी तीहि जाणीव शेषरूपानें शिल्लक राहणें हेंच तें ऋण होय. आत्मसाक्षात्कार झाल्याची वृत्ति शेष उरणें, हें तें पूर्ण ज्ञानघन न होणें होय. ॥ १ ॥

मागील ओवीवरून असें वाटण्याचा संभव आहे कीं, या परादिक वाणींचा मग कांहींएक उपयोग नाहीं. तर त्याचें निराकरण महाराज करतात तें असें:—

येरव्हीं पऱ्हादिक चौघी । जीवमोक्षाच्या उपेगीं ।
अविद्येसवें आंगीं । वेंचती कीर ॥ २ ॥

पदयुक्त भावार्थ--(येऱ्हवीं) तसें पाहतां (परादिक चौथी) या परादिक चारी वाणी (जीवमोक्षाच्या) जीवाला स्वरूपप्राप्ति करून देण्याच्या कार्यीं (उपेगीं) उपयोगी अशा साहाय्यक होतात. (अविद्येसवें) अविद्येचा निरास, नाश होतांच तिच्याबरोबर या चारी वाणी (आंगीं) आपण स्वतःहि (कीर वेंचती) खरोखरीच लय पावतात, संपतात. ॥ २ ॥

हेंच दृष्टान्तांनीं अधिक स्पष्ट करतातः--

देहासवें हातपायें । जाती मनासवें इंद्रियें ।
कां सूर्यासवें जाये । किरणजाळ ॥ ३ ॥

पदयुक्त भावार्थ--(या नाश करून घेतात तो कसा तर) (हातपायें) हातपाय हे (देहासवें) देह मृत होऊन पडतांच त्याच्याबरोबर जसे जातात, किंवा स्वप्नांत मनाचा लय होतांच इंद्रियें लय पावतात, अथवा सूर्याबरोबर किरणसमूह निघून जातो. ॥ ३ ॥

ना तरी निद्रेचिया अवधी । स्वप्नें मरती आधीं ।
तेवीं अविद्येचे संबंधी । आटती इया ॥ ४ ॥

पदयुक्त भावार्थ--(ना तरी) किंवा (निद्रेच्या अवधी आधीं) झोंपेचा शेवट होण्याच्या अगोदरच जशीं (स्वप्नें मरती) स्वप्नें नाश पावतात, त्याप्रमाणें (अविद्येचे संबंधी) अविद्येचे संबंधीजन (इया) या चारी वाणी (आटती) अविद्येबरोबरच नाश पावतात. ॥ ४ ॥

अशा रीतीनें या चारी वाणींचा अविद्येसह विवेकद्वारां-" हा आत्मा चेतन स्वरूप स्वयं नित्य ज्ञानघन आहे व या वाणी अविद्येचें कार्य असून ती अविद्या खरोखरीचा अस्तित्वांत असणारा असा पदार्थ नसून ती नित्य अभावरूप आहे " असें ज्ञान त्यांच्याविषयीं झाल्यावर त्या वाणींच्यासह अविद्येचें स्थूलस्वरूप जरी नाहींसें झालेलें दिसलें तरी त्यांचा संस्कार सूक्ष्मरूपानें बीजस्वरूपांत कसा असतो तें दर्शवितातः--

मृतें लोहें होती । ते रसरूपें जिती ।
जळोनि इंधनें येती । वन्हिदशे ॥ ५ ॥

पदयुक्त भावार्थ--(लोहें- एकारान्त नपुं. एकवचन.) लोखंड स्थूल स्वरूपानें (मृतें होती) आटून भस्मस्वरूपांत नष्ट होतें तरी तें (रसरूपें)

लोहभस्म या रसाच्या रूपानें रसायन जिवंत असतेंच. (इंधनें) सरपण (जळोनि) जळून गेलें तरी (वन्हिदशे) निखारा या स्वरूपांत असतेंच. ॥ ५ ॥

लवण आंगें विरे। परी स्वादें जळीं उरे।
नीद मरोनि जागरें। जिइजे निदें ॥ ६ ॥

पदयुक्त भावार्थ—मीठ (आंगें) आपल्या स्थूलस्वरूपानें पाण्यांत विरघळतें, तरी (स्वादें) चवीनें (उरे) सूक्ष्मरूप होऊन उरतेंच. (नीद मरोनि) झोंप नाहींशी होऊन (निदें) ती निद्रा (जागरें) जागेपणानें (जिइजे) जिवंत राहतेच. मनुष्य एकदम जागा न होतां डोळे चोळीत चोळीत मग पूर्ण जागा होतो, तेव्हां ही त्याची जाग सूक्ष्म निद्रारूपानें शिल्लक असतेच. ॥ ६ ॥

तेवीं अविद्येसवें। चौघी वेंचती जीवें।
तत्त्वज्ञानाचेनि नांवें। उठतीचि या ॥ ७ ॥

पदयुक्त अर्थ—त्याप्रमाणें (चौघी) या चार वाणी (जीवें) स्थूलरूपानें (अविद्येसवें) अविद्येबरोबर (वेंचती) नष्ट होतात खऱ्या. पण (या) याच अविद्यारूप अज्ञानरूपानें नाहींशा झाल्या तरी (तत्त्वज्ञानाचेनि नांवें) आत्मज्ञानाच्या रूपानें उत्पन्न होत असतातच.

भावार्थ—जीव हा वास्तविक नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्तस्वरूप असा मूळचा. पण त्याला या नित्यमुक्त शुद्धज्ञानमय स्वरूपाचा विसर पडला. हें जें त्याचें आपल्या अशा स्वरूपाचें विसरणें, हेंच त्याच्या स्वरूपाविषयींचें त्याचें मूळ अज्ञान यासच अविद्या, अभाव, द्वैत, कारणदेह, जडभाव अशीं नांवें आहेत. आपल्या अचल, निर्विकार, आकाशाहूनहि व्यापक व अतिसूक्ष्म, अमृतस्वरूपास विसरून जाऊन तो या अविद्यारूप कारणदेहासच हेंच माझें स्वरूप समजून त्याच्याशीं एकरूप इतका झाला कीं याच्या अंगची मूळची ज्ञानशक्ति तीच या कारणदेहांतली आवरणशक्ति होऊन तिचा हा अभिमानी बनून तिच्यांत गुरफटून गेल्यानें त्या अविद्याजडशक्तीचे सर्व धर्म याच्यांत आल्यानें हाहि निद्रारूप बनून त्यांतच त्याला स्वप्न पडलें. तीच विक्षेपशक्ति होऊन हा स्वप्नांतलें अनेकपणाचें आपल्याच कल्पनेनें उत्पन्न केलेलें दृश्य पाहूं लागला. असा हा कारणशरीरांतल्या अज्ञानस्थितींतून सूक्ष्म शरीरांतलें स्वप्न पहात असतांनाच स्थूलशरीरांत जागा झाला व पाहूं लागला तेव्हां तेंच स्वप्नांत पाहिलेलें जग त्याला मोठ्या विस्तारानें दिसूं लागलें. मूळचा

सर्वज्ञ, सर्वव्यापक, सर्वशक्तिमान्, असा ब्रह्मस्वरूप असतांना या आपल्या स्वरूपाचा विसर कल्पारंभापासूनच त्याच्या ठिकाणीं असल्यामुळें या जीवांतला असा हा कारण-देहांतला त्याचा प्रवेश कोणत्या कल्पांत, केव्हां, कधीं, कसा झाला हें समजणारें नाहीं. म्हणून श्रुतीनें यास अनादि (ज्याचा आरंभ सांगतां येणार नाहीं) म्हटलें आहे. त्यामुळें ज्या अविद्येंतल्या कारणदेहांत हा असतो, त्या कारणदेहाच्या त्या अविद्येसहि अनादि म्हटलें आहे. तिलाच "अनिर्वचनीय" हि म्हणतात. कारणदेहाच्या अज्ञानस्वरूपानें ती भासते म्हणून तिला आहे असें म्हणावें तर आत्मज्ञानाच्या विवेकानें ती नाहींशी होते, असें जिचें "आहे–नाहीं" स्वरूप असल्यामुळें तिला अनादि अनिर्वचनीय शास्त्रांत वर्णिलें आहे–अशी ही अनादि अविद्या स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण देहांतल्या वैखरी, मध्यमा, पश्यन्ती व परा या चारी वाणींच्यासह आत्मानात्मविवेकानें म्हणजे ही अविद्या व तिच्या या वाणी–त्यांचीं शरीरें हीं सर्व अनात्म, अभावरूप, अनित्य, जड आहेत; व मी हा जीवात्मा नित्य, शुद्ध, बुद्ध, आत्मा चेतनमय आहे, असें त्याला आत्मज्ञान झालें तरी तेंहि सत्त्वगुणाचें कार्य असल्यामुळें "सत्त्वात् संजायते ज्ञानम्" या गीतावचनानुरूप तें तत्त्वज्ञान अविद्येचें सूक्ष्म स्वरूपच होय. इतकेंच कीं, हा जीवात्मा "मी जीव" "मी सुखी–दुःखी–पापी–पुण्यवान्" असें अज्ञानदशेंत अविद्येच्या आवरणामुळें म्हणत होता, तोच आतां आत्मज्ञानी झाल्यानें "मी सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आहे" हें महाकारणदेहांतलें परावाणींत स्फुरणारें असें तत्त्वज्ञान जरी उदित झालें तरी तें अविद्येचेंच सूक्ष्म असें भावस्वरूप होय. ॥ ७ ॥

हा तत्त्वज्ञानदिवा । मरोनि इहीं लावावा ।
तरी हाही शिणलेवा । बोधरूपेंची ॥ ८ ॥

पदयुक्त अर्थ—**इहीं**–या चारी वाणींनीं; **मरोनि**–नाहींसें होऊन, अविद्येसह नष्ट होऊन; **तत्त्वज्ञानदिवा**–(तत्त्व + ज्ञान + दिवा) आत्म्याला स्वरूपज्ञानाचा प्रकाश; **लावावा**–करावा; (आत्म्याला स्वस्वरूपाचा विसर पडला होता, तो आत्मानात्मविचारानें नाहींसा होऊन त्याला स्वस्वरूपाचा बोध व्हावा) **हाही तरी**–हादेखील; **बोधरूपेंची**–स्वरूपज्ञानाच्या रूपानें; **शिणलेवा**–बंधशेष, अज्ञानबीजच होय.

स्पष्ट भावार्थ—जीवाची अज्ञाननिवृत्ति झाली तरी "मला सच्चिदानंद-बोध झाला असल्यानें मी आतां मुक्त, 'जीवन्मुक्त' झालों आहें," हा बीजरूपानें

राहिलेला मूळचा सूक्ष्म अहंकार स्वरूपज्ञानानें तरी उरतोच. "तो सदभ्यासें निरंतर। चित्तासि परमपुरुषाची मोहर। लावीं मग शरीर। जावो अथवा राहो॥" (ज्ञाने. ८–८२). "ऐसेनि हें सकळ ज्ञानीं समर्पे। मग ज्ञान तें ज्ञेयीं (स्वरूपीं) हारपें। पाठीं ज्ञेयाचि स्वरूपें। निखिल उरे॥" (ज्ञाने. ८–५२). "तूं मनबुद्धि साचेंसी। जरी माझिया स्वरूपीं अर्पिसी। तरी मातेंचि गा पावसी। हे माझी भाक॥" (ज्ञाने. ८–७९). "डोळां जें देखावें। कां कानीं हन ऐकावें। मनीं जें भावावें। बोलावें वाचे॥" (ज्ञाने. ८–७६). "तें आंतबाहेरि आघवें। मीचि करूनि घालावें। मग सर्वीं काळीं स्वभावें। मीचि आहें॥" (ज्ञाने. ८–७७). "आतां दुजें हन होतें। कीं एकचि हें आइतें। ऐशिये विवंचनेपुरतें। उरेचिना॥" (ज्ञाने. ६–३०९). "गगनीं गगन लया जाये। ऐसें जें कांहीं आहे। तें अनुभवें जो होय। तो होऊनि ठाके॥" (ज्ञाने. ६–३१०). "म्हणोनि तेथिंचि मात। न चढेचि बोलाचा हात। जेणें संवादाचिया गांवां आंत। पैठी कीजे॥" (ज्ञाने. ६–३११) "ऐसें शब्दजात माघौतें सरे। तेथ संकल्पाचें आयुष्य पुरें। वाराही जेथ न शिरे। विचाराचा॥" (ज्ञाने. ६–३१९). "जें उन्मनियेचें लावण्य। जें तुर्येचें तारुण्य। अनादि जें अगण्य। परमतत्त्व॥ (ज्ञाने. ६–३२०)॥ याची प्राप्ति व्हावी म्हणून "म्हणोनि आसनाचिया गाढिका। जो आम्हीं अभ्यास सांगितला निका। तेणें होईल तरी हो कां। निरोध यया (या मनाचा)॥" (ज्ञाने. ६–३६४). "येन्हवीं तरी येणें योगें। जैं इंद्रियां विंदाण (निग्रह) लागे। तैं चित्त भेटों रिगे। आपणपेयां॥" (६–३६५). "परतोनि पाठिमोरें ठाके। आणि आपणियातें आपण देखें। देखतखेंवो वोळखे। म्हणे तत्त्व हें मी॥ (६–३६६)॥ तिये वोळखीचि सरिसें। सुखाचिया साम्राज्यीं बैसें। मग आपणपां समरसें। विरोनि जाय॥ (६–३६७)॥ जयापरतें आणिक नाहीं। जयातें इंद्रियें नेणती कहीं। तें आपणचि आपुल्या ठायीं। होऊनि ठाके॥ (६–३६८)॥ मग मेरूपासूनि थोरें। देह दुःखाचेनि डोंगरें। दाटिजो पां परी भारें। चित्त न दाटे॥ (६–३६९)॥ कां शस्त्रें वरी तोडिलिया। देह अग्निमाजि पडलिया। चित्त महासुखें पहुडलिया। चेवों नये (जागें होत नाहीं)॥ (६–३७०)॥ जें योगाची बरव (शोभा)। संतोषाची राणिव (राज्य)। ज्ञानाची जाणिव। जयालागीं॥ (६–३७३)॥ तें अभ्यासिलेनि योगें। सावयव (मूर्तिमंत, प्रत्यक्ष) देखावें लागे। देखिलें तरी आंगें। होईजेल गा॥ (६–३७४)॥". ॥ ८ ॥

हेंच दृष्टान्तानें स्पष्ट करतातः—

येऊनि स्वप्न मेळवी । गेलिया आपणपां दावी ।
दोन्ही दिठी नांदवी । नीद जैशी ॥ ९ ॥

पदयुक्त अर्थ—निद्रा (नीद) जैशी—ज्याप्रमाणें; येऊनि—आली असतां; स्वप्न मेळवी—स्वप्न प्राप्त करून देते; गेलिया—गेल्यावर; आपणपां—आपल्या स्वरूपास म्हणजे जागृतीस; दावी—दाखविते; दोन्ही दिठी—या दोन्ही, बाजू—स्वप्न व जागृति; नांदवी—वागविते. झोंपच स्वप्न किंवा जागृति या दोहींस दाखवते. ॥ ९ ॥

हाच दृष्टान्त अविद्येशीं योजून दाखवितातः—

जिती अविद्या ऐसी । अन्यथा बोधातें गिंवसी ।
तेचि यथार्थबोधेसीं । निमाली उठी ॥ १० ॥

पदयुक्त अर्थ—ऐशी अविद्या जिती—अशीच ही अविद्या जिवंत असतां; अन्यथा—असत्य; बोधातें—अशा आवरणानें; गिंवसी—आच्छादित करते; तेचि—तीच; यथार्थबोधेसीं—सत्यज्ञानाच्या योगानें; निमाली—आवरण नाहींसें झाल्यानें; उठी—बोधरूपानें प्रकट होते.

भावार्थ—जीवाच्या मूळ स्वरूपास विसर पाडणारी तिला अविद्या म्हणतात. ती 'जिती' आपल्या अस्तित्वानें असेपर्यंत 'अन्यथा बोधातें' आपल्या आवरणशक्तीनें 'गिंवसी' जीवाच्या मूळच्या स्वयंबोधरूपास झांकून टाकते. 'तेचि' तीच 'यथार्थबोधेसीं' जीवाला आपल्या स्वरूपाचें ("तत्त्वमसि" या महावाक्याचा गुरुद्वारां बोध झाला असतां) सत्यज्ञान होतांच निमाली—आपल्या आवरणशक्तीनें नाहींशी होऊन अन्वयव्यतिरेकाच्या ज्ञानशक्तीनें 'उठी' प्रकट होते. अज्ञानी जीव ज्ञानी होतो. नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्तस्वरूप आत्म्याला आपल्या या शुद्ध स्वरूपाचा जो विसर तीच अविद्या; हाच अन्यथाबोध. या अविद्येनें आत्म्याला जीवभाव प्राप्त होतो. जीवाला आत्मस्वरूपाचा जो आठव तोच हा यथार्थबोध. तीच अविद्या आपण अन्यथाबोधानें नाहींशी होऊन तिच्या विद्यारूप यथार्थबोधानें ती प्रकट होते. स्थूलशरीर, सूक्ष्मशरीर, कारणशरीर हीं तिन्ही शरीरें व या तिन्ही शरीरांतल्या वैखरी, मध्यमा, पश्यन्ती या तिन्ही वाणी अनात्म, अचेतन, जड आहेत; व मी आत्मा चेतन, ज्ञानस्वरूप आहे असा महा-

कारणशरीरांतल्या परा या बोधवाणीनें आत्मस्वरूपाचा बोध होणें हेंहि अविद्येचें पूर्ण निरसन न होणें म्हणजेच झोंपेंतलीच ती जागृति. ॥ १० ॥

हेंच पुढील ओवीनें अधिक स्पष्ट करतातः—

परी जीत ना मेली । अविद्या हे जाकळी ।
बंध मोक्षीं घाली । बांधोनिया ॥ ११ ॥

पदयुक्त भावार्थ—**परी**–एकूण; **जीत**–अज्ञानानें जिवंत असो; **ना**–अथवा; **मेली**–ज्ञानानें नाहींशी झालेली असो; **अविद्या हे**–ही अविद्या; **बंध**–अज्ञानानें बंधांत, किंवा **मोक्षीं**–ज्ञानानें मोक्षांत; **बांधोनिया**–या दोहोंपैकीं एका बंधनामध्यें; **जाकळी घाली**–जखडून टाकते. एकूण अविद्या अज्ञानरूपानें जिवंत असो किंवा अज्ञानरूपानें नाहींशी होऊन ज्ञानरूपानें प्रकट होवो; ती अज्ञानानें बंधांत वा आत्मज्ञानानें मोक्षांत यांपैकीं कोणत्या तरी बंधनांत जीवात्म्याला जखडून टाकतेच. ॥ ११ ॥

मोक्ष हाहि बंधच होईल, तर मग मोक्ष शब्दाचा अर्थ तरी काय ! या शंकेचें समाधान करतात.—

मोक्षुचि बंधु होये । तरी मोक्ष शब्द कां साहे ।
अज्ञाना घरीं त्राये । वाउगीचि ॥ १२ ॥

पदयुक्त अर्थ—**मोक्षुचि**–मोक्षच; **बंधु**–(बंध)–अविद्येचें बंधन; **होये**–होईल; **तरी**–तर मग; **' मोक्ष '** हा शब्द **कां साहे**–काय अर्थाचा असावा ? (असें जर म्हणशील) तर अज्ञानाच्या घरीं **वाउगीचि**–याची खोटीच; **त्राये**–प्रतिष्ठा (होय).

भावार्थ—मोक्षच हा जर बंध–अविद्यारूप अज्ञानकार्य–होईल तर मग मोक्ष शब्दाचा अर्थ काय ? (असें तूं विचारशील, तर बाबा !) या अविद्यारूप अज्ञानाच्या घरीं याची खोटीच प्रतिष्ठा होत असते. ॥ १२ ॥

ती कशी तें दृष्टान्तपूर्वक सांगतातः—

बागुलाचेनि मरणें । तोषावें कीं बाळपणें ।
येरा तो नाहीं मा कोणें । मृत्यु मानावा ॥ १३ ॥

पदयुक्त अर्थ—**बागुलाचेनि मरणें**–बागुलबुवाच्या मरणानें; **बाळपणें कीं**–बालकानेंच; **तोषावें**–संतोष मानावा; **येरा**–इतरांस; **तो नाहींच**, त्याचें

अस्तित्वच जर नाहीं; मा–मग; **मृत्यु**–त्याचा मृत्यु; **कोणें**–कोणी; **मानावा**–खरा समजावा.

भावार्थ—कल्पित बागुलबुवाच्या मरणानें अज्ञान बालकानेंच संतोष मानावा. इतरांना तो अस्तित्वांतच नसल्यानें त्याचा मृत्यु मग कोण मानील ? लहान बालकाला आई जेवूं घालीत असतांना तें रडतें, हट्ट करतें, जेवीत नसतें. म्हणून आई एका खोट्या बागुलबोवाची कल्पना करून म्हणते, " आला बघ बागुलबुवा त्या दाराच्या पाठीमागें, जेवतोस कीं नाहीं ? " अशा त्या खोट्या बागुलबुवाच्या येण्यापासूनचें दुःख बागुलबुवाच्या खऱ्या स्वरूपाच्या अज्ञानानेंच जसें त्या बालकाला होतें, तसेंच " आई, मी जेवतों अं, गेला का तो बागुलबुवा ?" " तो पहा आतां गेला बागुलबुवा, जेव नीट." बागुलबुवा गेल्यानें, असा तो कल्पना केलेला बागुलबुवा नाहींसा झाल्यानें होणारी दुःखापासूनची मुक्ति हेंहि कल्पनेतलें अज्ञानच. असें बागुलबुवाचें सत्य येणें व सत्य जाणें हे दोन्ही व्यवहार त्या बालकाच्या ठिकाणीं होतात; मोठ्या माणसास तो बागुलबुवा म्हणून कोणी अस्तित्वांत नाहींच, असा पूर्ण निश्चय असल्यानें तो मेला याचाहि संतोष ते मानीत नाहींत. नित्यमुक्त आत्म्यास बंधच नाहीं, म्हणून मोक्षाहि नाहीं. ॥१३॥

घटाचें नाहींपण । फुटलियाची नागवण ।
मानीत असे ते जाण । म्हणों ये कीं ॥ १४ ॥

पदयुक्त अर्थ—**घटाचें**–गाडग्याचें, भांड्याचें; **नाहींपण**–नसणेंपण, अभावरूप, उत्पन्न होण्याच्या पूर्वीचें रूप; **फुटलियाची**–फुटल्याबद्दलची; **नागवण**–नुकसानी; **मानीत असे**–मानणारे असतील; **ते म्हणों ये**–ते म्हणोत; **कीं जाण**–कीं खरोखरच बंधमोक्ष खरे आहेत.

भावार्थ—एखादें भांडें अस्तित्वांत नसतांनाच तें फुटल्याची नुकसानी मानणारे असे कोणी असतील, त्यांनीं खुशाल म्हणावें–'बंध व मोक्ष' हे खरे आहेत. ॥ १४ ॥

हाच दृष्टान्त दार्ष्टान्ताशीं लावून दाखवितातः––

म्हणोनि बंधुचि तंव वावो । मा मोक्षा कें प्रसवो ।
मरोनि केला ठावो । अविद्या तया ॥ १५ ॥

पदयुक्त अर्थ—**म्हणोनि बंधुचि**–म्हणून बंधच; **तंव**–जर; **वावो**–मिथ्या, **मा**–तर मग; **मोक्षा कें प्रसवो**–मोक्षाची कशी उत्पत्ति व्हावी ? (तर)

अविद्या–अविद्येनें; **मरोनि**–नाहींसें होऊन; **तया**–त्याला (मोक्षाला); **ठावो केला**–जागा दिली.

भावार्थ—म्हणून बंध जें अज्ञान तेंच जर मिथ्या, अगदीं खोटें तर मोक्ष जें ज्ञान त्याची उत्पत्ति तरी मग कशी? तर त्याला अविद्या जी आवरणशक्ति तिनें भासविलेलें अज्ञान तें नाहींसें होऊन जागा दिली म्हणून त्याचें अस्तित्व, त्याची उत्पत्ति. ॥ १५ ॥

आतां अविद्याकल्पित अज्ञान तें दूर होऊन गुणसापेक्ष ज्ञान उत्पन्न झालें तरी तें सत्त्वगुणकार्य म्हणून बंधच, तें ज्ञान हा एक पाशच, व तो कसा हें प्रमाण देऊन दोन ओव्यांनीं सांगतातः—

आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसें ।
म्हणितलें असे । सदाशिवें ॥ १६ ॥

पदांचा अर्थ—**आणि**–तसेंच; **ज्ञान**–सत्त्वगुणयुक्त ज्ञान, बुद्धिप्रकाश; **बंधु**–बंधच, पाश; **ऐसें**–अशा तऱ्हेचें; **शिवसूत्राचेनि**–शिवसूत्रांच्या; **मिसें**–(मिषें)–मिषानें, निमित्तानें; **सदाशिवें**–श्रीशंकरांनीं; **म्हणितलें असे**–म्हटलेलें आहे.

भावार्थ—आणि भगवान् श्रीशंकरांनींहि शिवसूत्रामध्यें 'ज्ञान हाहि बंधच आहे,' 'ज्ञानं हि बन्धः' असें म्हटलेंच आहे. ॥ १६ ॥

आणि वैकुंठींचेहि सुजाणें । ज्ञानपाशीं सत्त्वगुणें ।
बांधिजे हें बोलणें । बहु केलें ॥ १७ ॥

पदांचा अर्थ—**आणि**–तसेंच; **वैकुंठींचेहि**–वैकुंठांतल्यादेखील; **सुजाणें**–सुज्ञानेंहि, भगवान् महाविष्णूंनींहि; **सत्त्वगुणें**–सत्त्वगुणाच्या योगानें; **ज्ञानपाशीं**–ज्ञानाच्या पाशांत; **बांधिजे**–जीव गोंवला जातो; **हें बोलणें**–असें भाषण, असा उपदेश; **बहु केलें**–विस्तारानें केलें आहे.

भावार्थ—आणि तसेंच वैकुंठांतल्या भगवान् श्रीमहाविष्णूंनींहि श्रीगीतेंत सत्त्वगुणांच्या योगानें 'सत्त्वात् संजायते ज्ञानम्' 'जीव ज्ञानाच्या पाशांत गोंवला जातो' असें विस्तारानें प्रतिपादिलें आहे. म्हणून ज्ञान हें गुणात्मक आहे असें सिद्ध झालें, व म्हणून तें बंधन आहे. "सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चाऽनघ ॥" (गीता–१४–६). ॥ १७ ॥

आतां श्रीज्ञानराज स्वानुभव सांगतातः—

परि शिवें कां श्रीवल्लभें । बोलिलें येणेंचि लोभें ।
मानूं तें, हें लाभे । न बोलतांचि ॥ १८ ॥

पदांचा अर्थ—**परि**–परंतु; **शिवें**–श्रीशंकरांनीं; **कां**–अथवा; **श्रीवल्लभें**–श्रीविष्णूंनीं; **बोलिलें**–म्हटलें म्हणून; **येणेंचि लोभें**–एवढ्याच आधारामुळें, असल्या प्रमाणामुळें; **तें मानूं न**–तें मानावें असें नसून; (**ते**) **न बोलतांचि**–त्यांनीं प्रतिपादिलें नसतें तरी; **हें लाभे**–हें सिद्धच आहे, हें कळून येणारें आहे.

भावार्थ—परंतु श्रीशंकरांनीं किंवा श्रीविष्णूंनीं हें सांगितलें म्हणून या आधारामुळें आम्ही तें मानावें असें नसून, त्यांनीं तें प्रतिपादिलें नसतें तरी हें सिद्धच आहे, असा आमचाहि अनुभव हाच. म्हणजे त्यांच्या प्रमाण-बोलण्यावरून आम्ही हा सिद्धान्त केला असें नाहीं. ॥ १८ ॥

केवळ ज्ञानस्वरूप, नित्य, निर्विकार, स्वयंसिद्ध, स्वानुभवगम्य, आत्म्याला सत्त्वगुणापासून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाची मुळींच आवश्यकता नाहीं; आणि तसें म्हणणेंसुद्धां कसें हास्यास्पद आहे हें पुढील पाच ओव्यांनीं सांगतातः—

जें आत्मज्ञान निखळ । तेंहि घे ज्ञानाचें बळ ।
तैं सूर्य चिंती सबळ । तैसे नोव्हे ?॥ १९ ॥

पदांचा अर्थ—**जें आत्मज्ञान**–जें आत्मस्वरूप; **निखळ**–अतिशुद्धः **तेंहि**–तें जर; **ज्ञानाचें बळ**–सत्त्वगुण ज्ञानाचें साहाय्य; **घे**–घेईल, इच्छील; **तैं**–तर; (**सूर्य**) **सबळ**–पहाट; **चिंती**–चिंता करीत बसतो; सकाळ होण्याची चिंता करीत बसतो; **तैसे नोव्हे**–तशांतलें नव्हे का **हें** ?

भावार्थ—जें आत्मस्वरूप अतिशुद्ध आहे, तें जर इतर अविद्याजन्य सत्त्वगुणाची इच्छा करील किंवा साहाय्य घेईल, तर मग सूर्य सकाळ होण्याची चिंता करतो, तशांतलें नव्हें का तें ? स्वयंप्रकाश सूर्यानें अजून काळोख आहे, तो गेल्यावर पहाटेनंतरच आपण उगवूं, असें म्हटल्यासारखें होईल. स्वप्रकाशमान सूर्याला अंधार ही काय चीज आहे हें माहीत नसतें. तद्वत् स्वयंभू आत्मस्वरूपानें 'मी आतां शास्त्रज्ञानानें मोक्ष पावलों' असें म्हणणें कसें सिद्ध होईल ? ॥ १९ ॥

आत्मा नित्य, स्वयंसिद्ध, स्वसंवित्, ज्ञानमय आहे. हेंच कसें तें सांगतातः--

ज्ञानें श्लाघ्यतु आहे । तैं ज्ञानपण धाडिलें वांये ।
दीपवांचून दिवा लाहे । तैं आंग भुललाचि कीं ॥ २० ॥

पदांचा अर्थ--**ज्ञानें**-गुणात्मक शास्त्रज्ञानानें; **श्लाघ्यतु**-श्लाघ्यता, मोठेपण, थोरवी; **आहे**-येईल, प्राप्त होईल; **तैं**-तर; **ज्ञानपण**-स्वरूपज्ञान; **वांये**-वांया, व्यर्थ; **धाडिलें**-झालेलें होईल; **दिवा दीपवांचून (न) लाहे**-दिव्याला दुसऱ्या दिव्यावांचून कांहीं सांपडेनासें झालें, किंवा **दीपावांचून दिवा लाहे**-दिवा जर स्वतांशिवाय इतर दिवा इच्छील; **तैं**-तर; **आंग**-अंगाला, स्वतांला, स्वस्वरूपाला; **भुललाचि कीं**-(तो) विसरलाच खरोखर.

भावार्थ--जर या गुणात्मक ज्ञानानें पूर्णतेचा मोठेपणा येईल, तर स्वरूपज्ञान व्यर्थ होईल. दिवा स्वतांशिवाय इतर दिव्याची इच्छा करील तर तो आपल्या स्वतांला विसरलाच खरोखर, असें होईल. श्रवण-मननादि अन्तरंगसाधनांनीं ज्ञान मिळाल्यानें मी आतां मुक्त झालों, असा जर मोठेपणा कोणी मिरवील तर त्यानें आपलें स्वतःसिद्ध ज्ञान असलेलें विसरल्याचें होईल. जसें एखाद्या दिव्यानें म्हणावें कीं, दुसरा दिवा आणा, मला दिसत नाहीं, तर तो स्वतां प्रकाशरूप असूनहि स्वतांच्या प्रकाशाला विसरल्याच्या भ्रमामुळें तसें तो म्हणतो; तेव्हां त्याचें आपल्या मूळस्वरूपाचें भान नष्ट होतें. ॥ २० ॥

आपणचि आपणापाशीं । नेणतां देशोदेशीं ।
आपणपें गिंवशी । हें कीरु होय ॥ २१ ॥

पदांचा अर्थ--**आपणचि आपणापाशीं**-आपणच आपल्याजवळ आहों; (हें) **नेणतां**-हें विसरून; **देशोदेशीं**-देशादेशांत; **आपणपें**-आपल्याला; **गिंवशी**-शोधील; **हें कीरु होय**?- हें खरोखर होईल का? नाहींच.

भावार्थ--आपण आपल्याजवळ एकसारखें आहों हें विसरून जर एखादा भ्रमानें देशोदेशीं आपला शोध करीत राहील, तर असें खरोखर होईल का? नाहींच. ॥ २१ ॥

पण कदाचित्--

परि बहुतां कां दिया । आपणापें आठवलिया ।
म्हणे मी यया । कसा रिझों ॥ २२ ॥

पदांचा अर्थ—**परि**–पण; **बहुतां कां दिया**–बहुत दिवसांनीं; **आपणापें**–स्वतांची; **आठवलिया**–आठवण झाल्यावर, आठवण होतांच; **म्हणे**–म्हणावें कीं; **यया**–ह्यानें, या आठवणीनें; **मी कसा रिझों**–" मी इतका कसा रमलों चुका " असें म्हणण्यानें माझी रिझवणूक होईल का ?

भावार्थ—पण बहुत दिवसांनीं स्वतांची आठवण झाल्यावर, त्या आठवणीनें मी जर म्हणालों कीं, " मी हरवलों होतों, आतां सांपडलों " तर यानें माझी रिझवणूक कशी होईल ? नाहींच होणार. ॥ २२ ॥

तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपली प्रमा ।
करितसे सोहं, मा । ऐसा बंधु ॥ २३ ॥

पदांचा अर्थ—**तैसा**–तसेंच; **ज्ञानरूप आत्मा**–आत्मा स्वयं ज्ञानस्वरूप, मूळचा; **(तो) ज्ञानेंचि**–सत्त्वगुणजन्य ज्ञानानें; **आपली प्रमा**–आपली स्वतांची मोजणी, सिद्धि; **सोहं**–" तो परमात्मा मी आहें " यानें; **करितसे**–करील; **मा**–तर; **ऐसा बंधु**–असा तो बंधच होय.

भावार्थ—तसेंच आत्मा स्वयंज्ञानस्वरूप असतांना सत्त्वगुणजन्य ज्ञानानें " मी तो ज्ञानस्वरूप परमात्मा आहे " असें म्हणेल तर तें ज्ञानच जड, भ्रमरूप असल्यानें तोहि असा बंधच होय. ॥ २३ ॥

आतां असा भ्रम कां होतो, याचें कारण महाराज सांगतातः—

जें ज्ञान स्वयें बुडे । म्हणोनि भारी नावडे ।
ज्ञानें मोक्षु घडे । तें निमालेनि ॥ २४ ॥

पदांचा अर्थ—**जें स्वयें ज्ञान**–जें स्वयंप्रकाश, स्वरूपभूत, शुद्धज्ञान; **तें बुडे**–तें नाहींसें झालें; **म्हणोनि**–यामुळें; **भारी**–त्याचा भारीपणा, (त्या स्वयंसिद्ध स्वरूपाचा) व्यापकपणा, मोठेपणा; **नावडे**–(न आवडे)–आवडत नाहीं, न आकळे, आकलन होत नाहीं; **तें निमालेनि**–तें मूळचें स्वरूपज्ञान नाहींसें झाल्यामुळें, विसर पडल्यानें, विसरून गेल्यामुळें; (आतां मला) **ज्ञानें**–या शास्त्रज्ञानाच्या योगानें; **मोक्षु**–मोक्ष (स्वरूपज्ञान); **घडे**–प्राप्त झाला– (असें वाटतें. पण हें वृत्तिज्ञानसुद्धां तोहि भ्रमच. कारण आतांसुद्धां स्वस्वरूपप्राप्ति झाली नसतेच.)

भावार्थ—जें स्वयंप्रकाश, स्वतांचें स्वरूपज्ञान तें विसरतें, तें विसरून गेलेलें असतें, म्हणून त्याचा व्यापकपणा मुमुक्षूला आकलन होत नाहीं; म्हणून तो आहे हें वाटत नाहीं. तें मूळचें स्वरूपज्ञान विसरून गेलेलें असल्याच्या योगानें

" आतां मला या शास्त्रज्ञानानें मोक्ष, मूळचें स्वरूपज्ञान प्राप्त झालें " असें त्याला वाटतें. पण हें मुद्धां बोधरूपाचें त्रिपुटिज्ञान, असलें हें वृत्तिज्ञान हा बंधच होय.) " बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ॥ गुणस्य माया मूलत्वान्न मे मोक्षो न बन्धनम् ॥ " असें श्रीमद्भागवतांताहि म्हटलें आहे, तेंच आतां स्पष्ट करीत आहेत. ॥ २४ ॥

पण त्याच्या आधीं पूर्वी ओवी चौथीमध्यें जो सिद्धान्त केला– " **नातरी निद्रेचिया अवधी । स्वप्नें मरती आधीं । तेवीं अविद्येचे संबंधी । आटती इया ॥ ४ ॥** " त्याप्रमाणें अविद्येच्या संबंधी–नातलग या चारी वाणी अविद्येचरोबरच नाहींशा होतात. या सिद्धान्ताच्या स्पष्टीकरणार्थ ओवी पांच ते ओवी चोवीसपर्यंत दृष्टान्तांनीं तोच सिद्धान्त दृढ करून त्याचें दिग्दर्शन आतां करतातः—

म्हणोनि परादिका वाचा । तो शृंगार चौ अंगांचा ।
एवं अविद्या जीवाचा । जीवत्व त्यागी ॥ २५ ॥

पदांचा अर्थ—म्हणोनि–म्हणून; एवं अविद्या–अशा प्रकारें मुख्य अविद्या; अंगांचा–तिच्या अंगांचा, स्वरूपाचा; तो चौ शृंगार–तें चतुरंग, चार प्रकारचें भूषण; परादिका वाचा–परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चार वाणी; जीवाचा जीवत्व त्यागी–जीवाच्या जीवपणाच्या अस्तित्वाच्या त्यागानें, आत्म्याच्या ठिकाणचा जीवभाव नाहींसा होतांच त्या चारीजणी अविद्येसह नष्ट होतात.

भावार्थ—म्हणून अशा प्रकारें मूळची अविद्या, तिच्या अंगाचें तें चतुरंग भूषण–त्या अविद्येच्या शक्ति परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी या वाणी जीवात्म्याचा जीवपणा, मूळचा अज्ञानभाव, स्वस्वरूपाचा विसर, तो नाहींसा होतांच त्याहि अविद्येसह नष्ट होतात. (असें वास्तविक असून मुमुक्षूस ही स्थिति प्राप्त होण्याच्या आधींच वाटत असतें कीं, " ही जीवन्मुक्तस्थिति प्राप्त होऊन आपण आतां मुक्त आहोंत; " व हाच वाचेचा ऋणशेष शिल्लक लेश राहतो, असें सुचविलें आहे.) तेंच आणखी सहा ओव्यांनीं सिद्ध करतात. ॥ २५ ॥

अति गूढ मुख्य सिद्धान्ताचा अभिप्राय मुमुक्षूंच्या मनावर पूर्ण बिंबावा म्हणून पुन्हा पुन्हा दृष्टान्तांनीं तेंच प्रमेय महाराज दृढ करीत आहेतः—

अंगाचेनि इन्धनें उदासु । उठोनि ज्ञानाग्निप्रवेशु ।
करि तेथें भस्मलेशु । बोधाचा उरे ॥ २६ ॥

पदांचा अर्थ—**अंगाचेनि**–शरीररूपी; **इन्धनें**–सरपण; **उदासु उठोनि**–स्वतांला कंटाळून, त्रासून, त्यानें; **ज्ञानाग्निप्रवेशु**–ज्ञानरूप अग्नींत प्रवेश; **करि**–केला; **तेथें**–त्या ठिकाणीं; **बोधाचा**–स्वरूपज्ञानाचा; **भस्मलेशु**–अज्ञान जळून गेल्यानंतरच्या बोधरूप राखेचा शेष; **उरे**–उरतोच.

सविवरण भावार्थ—हें शरीरभावरूपी सरपण स्वतांला त्रासून तें बोधरूप अग्नींत घुसलें, शिरलें. पण तेथेंसुद्धां "ही ती ज्ञानस्थिति" असा तो बोधरूप राखेचा अंश शिल्लक राहतोच. (सारांश, देहतादात्म्यामुळें असलेल्या देहभावाचें, देहाच्या अस्तित्वाचें निरसन "नित्य काय, अनित्य काय" ह्या विवेकानें "नित्य आत्मा आहे, व अनित्य अशी शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि हीं सर्व अभावरूप आहेत"—"इन्द्रियाणि पराण्याहुः इन्द्रियेभ्यः परं मनः ॥ मनसस्तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतः तु सः ॥"– या भगवद्वचनानुरूप अशा व्यतिरेक ज्ञानरूप अग्नींत जीवानें प्रवेश करून "तत्त्वमसि" या महावाक्याच्या विवेकद्वारां उत्पन्न होणाऱ्या त्या श्रवणमननिदिध्यासनाच्या तीव्रतेनें नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, स्वस्थ, केवल आत्मा मी आहें या अन्वयज्ञानानें झालेल्या आत्मसाक्षात्कारामुळें बोधमयस्थिति प्राप्त झाली, व देहभानरहित, श्वासस्पंदनविवर्जित मनाचें तें संकल्पविकल्पांचें स्फुरण पूर्ण शान्त होऊन आलेली सहजावस्था हीहि एकसारख्या स्वस्वरूपाच्या अनुसंधानानें दृढ व्हावी लागते, ती तितकी निरुपाधिक होत नाहीं; पुनः पुनः वृत्तीचें स्फुरण उठत असतें. म्हणून भगवान् श्रीज्ञानेश्वर महाराज इशारा देत आहेत कीं, एकसारखें या नित्यानंदाचें अहोरात्र स्मरण जाग्रत ठेवलें म्हणजे त्याची परिपक्वता होऊन पूर्ण बोधस्थिति कायम राहील—"सदभ्यासें निरंतर। चित्तासी परम पुरुषाची मोहर। लावी, मग शरीर। जावो अथवा राहो ॥ ज्ञाने. ८–८–८२ ॥" तसेंच "ब्रह्मानंदीं लागली टाळी। मग देहातें कोण सांभाळी" असें श्रीतुकोबारायांनीं सांगून— "देह ही पंढरी, आत्मा पांडुरंग। नित्य करी संग अहर्निश ॥" हें अधिकारी जनांस त्यांनीं सुचवून ठेवलें आहे. कारण अत्यंत बोधमय विरक्तीची निजात्मस्थितीची ही अवस्था या प्रेमरसांतल्या परम भक्तींत अखंड तन्मय होऊन जाऊन पूर्णपणें भोगावयास येतां यावी. पण या अद्वैत एकरूपतेंत बोधलेश म्हणून जी द्वैतभावाची वृत्ति, जी देहभावाची स्मृति सूक्ष्मरूपानें शिल्लक राहून उरते, हेंच तें मोठें विघ्न होय. ॥ २६ ॥

हें विश्व अत्यंत बीजरूपानें कसें शेष राहात असतें याचें दिग्दर्शन मोठ्या मार्मिक दृष्टान्तांनीं महाराज करतातः—

जळीं जळावेगळु । कापूर न दिसे अवडळु ।
परि होऊनि परिमळु । उरे जेवीं ॥ २७ ॥

पदांचा अर्थ—**जळीं**–पाण्यात टाकलेला; **कापूर जळावेगळु**–तो कापूर जळाहून निराळा; **अवडळु**–स्थूलरूपानें; **न दिसे**–दिसत नसतो; **परि**–पण; **परिमळु होऊनि**–सुगंध बनून; **जेवीं**–जसा; **उरे**–शेष राहतो, तद्वत्.

भावार्थ—पाण्यांत टाकलेला कापूर विरघळल्यावर त्या पाण्याहून आपल्या स्थूल आकारानें वेगळा असलेला दिसत नसतो खरा, पण तो सुगंधरूपानें त्यांत शेष उरतोच. तसेंच बोधाचेंहि साक्षित्व उरतेंच. ॥ २७ ॥

अंगीं लाविलिया विभूती । तैं परमाणुही झडती ।
परि पांडुरत्वें कांती । राहे जैसी ॥ २८ ॥

पदांचा अर्थ— **अंगीं**–अंगास; **विभूती**–भस्म, राख; **लाविलिया**–लावली असतांना; **तैं**–तेव्हां, मग; **परमाणुही**–बारीक कणदेखील; **झडती**–झडतात, गळून पडतात; **परी**–तरी पण; **पांडुरत्वें**–फिकट पांढरेपणानें, पांढुरकें; **जैसी**–जशी; **कांती**–अंगाचें स्वरूप; **राहे**–उरतेच.

भावार्थ—आंगाला भस्म चर्चिलें असतां त्यानंतर त्याचे परमाणूएवढे सूक्ष्म कण असतात ते त्या लावलेल्या विभूतींतून गळून पडून दिसेनासे होतात हें खरें. तरी पण पांढुरकेंपण राहिलेलें दिसतेंच. तो फिकट पांढरेपणा उरलेला राहतोच. ॥ २८ ॥

ना वोहळा आंगीं जैसें । पाणी पाणीपणें नसे ।
वोलहासाचेनि मिसें । आथीच तें ॥ २९ ॥

पदांचा अर्थ—**ना**–अथवा; **वोहळा**–ओहोळ, नाला, लहानसा ओढा; **आंगीं**–(त्याच्या) ठिकाणीं; **जैसें**–जसें; **पाणीपणें**–पाणीरूपानें; **पाणी नसे**–पाणी जरी नसतें; **तें**–(तरी) तेंच (मूळचें) पाणी; **वोलहासाचेनि**–ओलांशाच्या; **मिसें**–मिषानें, रूपानें; **आथीच**–तें असतेंच.

भावार्थ—अथवा जसें एखाद्या नाल्याच्या ठिकाणीं प्रत्यक्ष वाहणारें पाणी दिसत नसतें खरें, तरीपण तें ओलाव्याच्या रूपानें असतेंच. त्या ओघळाचा तो ओलावा राहतोच. ॥ २९ ॥

नातरि माध्याह्नकाळीं । छाया न दिसे वेगळी ।
असे पायातळीं । रिगोनिया ॥ ३० ॥

पदांचा अर्थ—नातरि–अथवा; **माध्याह्नकाळीं**–भर दुपारीं, बारा वाजतां; **छाया**–आपली सावली; **वेगळी न दिसे**–ती निराळी दिसत नसते; **पायातळीं**–तळपायाच्या खालीं; **रिगोनिया असे**–जमून राहिलेली असते, एकरूप होऊन गेलेली असते.

भावार्थ—तसेंच भर दोन प्रहरीं आपली सावली निराळी दिसत नसते खरी. तथापि ती आपल्या तळपायाखालीं एकरूप होऊन शिल्लक राहिलेली असतेच. ॥ ३० ॥

तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें ।
आपुलेपण उरे । बोधु जो कां ॥ ३१ ॥

पदांचा अर्थ—तैसें–तसेंच; **दुसरें ग्रासूनि**–द्वैतभाव नष्ट होऊन; **स्वरूपीं**–निजस्वरूपाच्या ठिकाणीं; **स्वरूपाकारें**–आत्माकाररूप होऊन; **आपुलेपणें**–जाणीवरूपानें; **जो कां**–जो काय; **बोधु उरे**–बोधलेश शेषरूपानें शिल्लक उरतो तो.

भावार्थ—तसेंच महाकारणशरीरांतल्या अतिसूक्ष्मरूप तुर्यावस्थेतलें जीवपणाचें दुर्जेपण नष्ट होऊन आत्मस्थितींत जीवपणाची जाणीव नाहींशी झाली तरी आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं आत्माकाररूप होऊन जाणीवरूपानें जो काय बोधलेश शेष उरतो तोच तो. ॥ ३१ ॥

" जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाचिया ठाया । ती जाणावी एक तुर्या । सर्वसाक्षिणी ॥ " " स्वरूपाचें अनुसंधान । तोचि देह महाकारण । तिथें तुर्या अवस्था जाण । सर्वसाक्षिणी ॥ तुर्येची परिपक्वता । तेचि उन्मनीअवस्था । निंबोळियास मधुरता । जैसी पक्वदशे ॥ हेचि अवस्था उन्मनी । मन ब्रह्मचि जालें म्हणोनी । हेचि शुद्ध तुर्या सज्जनी । लेखिली अवस्था ॥ " " एकविध नारायण । तेथें विषमाचा शीण । पालटोचि भिन्न । नये अणुमात्र ॥ १ ॥ आवघें सारावें गाबाळ । चुकवूनियां कोल्हाळ । आनंदाचें स्थळ । एकाएकीं एकान्त ॥ २ ॥ **काया वाचा मन । स्वरूपींच अनुसंधान । लक्ष भेदी बाण । येणें पाडे लवलाहो ॥ ३ ॥ तुका म्हणे आळस निद्रा । येथें देऊनियां चिरा । देऊनियां धीरा । मिठी जाणा जागृती ॥ ४ ॥** तुकाः गाथा अभंग ४९५१. "ब्रह्मैवास्मीति

सद्वृत्त्या निरालम्बतया स्थितिः । ध्यानशब्देन विख्याता परमानन्ददायिनी ॥१२३॥ निर्विकारतया वृत्त्या ब्रह्माकारतया पुनः । वृत्तिविस्मरणं सम्यक् समाधिर्ज्ञानसंज्ञकः ॥ १२४ ॥"—(आचार्यकृता अपरोक्षानुभूतिः). (सद्वृत्तीच्या मनानें महाकारण शरीरापासून तों सर्व विश्वाचा आकार टाकून निर्विकार बनून ब्रह्माकार होऊन जाणें व कल्पनारहित पूर्ण बनणें ही ज्ञानीजनांची ज्ञानसंज्ञक सहजसमाधि होय.) "इमं चावृत्तिमानन्दे तावत्साधु समभ्यसेत् । वश्यो यावत्क्षणात् पुंसः प्रयुक्तः सन् भवेत्स्वयम् ॥ १२५ ॥" (या समाधिसुखाच्या आनंदांत जितके क्षण चित्ताची वृत्ति राहील तितके क्षण आपण तो अभ्यास एकसारखा पुन्हा पुन्हा करीत राहून समाधिसुखांत पूर्ण निमग्न रहावें ॥) "ततः साधननिर्मुक्तः सिद्धो भवति योगिराट् । तत्स्वरूपं न चैतस्य विषयो मनसो गिराम् ॥ १२६ ॥" (मग साधनरहित असा हा सिद्ध योगिराज मनोवाणीला अगम्य अशा त्या स्वरूपीं राहतो.) "समाधौ क्रियमाणे तु विघ्नान्यायान्ति वै बलात् । अनुसंधान-राहित्यमालस्यं भोगलालसाम् ॥ १२७ ॥" (समाधी साधितां विघ्नें बळें येतात साधकां । अनुसंधान तुटणें, भोगेच्छा आणि आळस) "भयं तमश्च विक्षेपस्तेजः स्पन्दश्च शून्यता । एवं यद्विघ्नबाहुल्यं त्याज्यं ब्रह्मविदा शनैः ॥१२८॥" (भय, निद्रा, कल्पनाही, तेज, चांचल्य, शून्यता । ब्रह्मज्ञें विघ्नबाहुल्य त्यजावें हें हळुहळु ॥) "ये हि वृत्तिं जहत्येनां ब्रह्माख्यां पावनीं पराम् । ते तु वृथैव जीवन्ति पशुभिश्च समा नराः ॥ १३० ॥" (असा हा परम शुद्ध मनाच्या समरसतेचा ब्रह्मस्वरूप होऊन राहण्याचा अभ्यास सोडतात, ते पशुसमानच होत.) "ये हि वृत्तिं विजानन्ति ज्ञात्वापि वर्धयन्ति ये । ते वै सत्पुरुषा धन्या वन्द्यास्ते भुवनत्रये ॥ १३१ ॥" (जाणती ब्रह्मवृत्तीनें वाढवीती कळोनिही । ते सत्पुरुष ते धन्य ते वन्द्य भुवनत्रयीं). "येषां वृत्तिः समावृद्धा परिपक्का च सा पुनः । ते वै सद्ब्रह्मतां प्राता नेतरे शब्दवादिनः ॥ १३२ ॥" (ब्रह्मात्मस्फूर्ति अभ्यास वाढला, पाक पावला । ज्याचा ते पावले ब्रह्म शब्दज्ञानी नच तथा.) "तैसे बोलवरी वाचाबळें । वायांचि झकविजती प्रतीतीचे डोळे । मग साचोकारें बोधावेळे । आथि ना होईजे ॥ (ज्ञानें. ९-१३९)." (शब्दज्ञानाच्या अवडंबराच्या प्रवचनाच्या पाल्हाळाच्या भरानें ब्रह्माच्या अनुभवाच्या ज्ञानाचें प्रदर्शन करून व्यर्थच फसवणूक करीत असतात. पण त्यांना स्वरूपप्राप्तीची प्रत्यक्षता मात्र कांहींच झालेली नसते.) "निमेषार्धं न तिष्ठन्ति वृत्तिं ब्रह्ममयीं विना । यथा तिष्ठन्ति ब्रह्माद्याः सनकाद्याः शुकादयः ॥१३४॥" (ब्रह्मसाक्षात्काराची ही ब्रह्ममयवृत्तीची स्थिति तिच्यावांचून क्षणभर न

राहतां जसे ब्रह्मदेव, सनकसनंदन, शुकाचार्यादिक राहतात, तसे पारिपक्व होऊन ते धन्यपुरुष राहतात.)

" तैसे माझिये साक्षात्कारीं । सरे अहंकाराची वारी । अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाय । (ज्ञाने. ११–९४). मग मी तों हें आघवें । एक मीचि आथि स्वभावें । किंबहुना सामावें समरसें तो ॥ (ज्ञाने. ११–९५)." या वाणींच्या ऋणशेषांतून " मी आतां परमात्मस्वरूप आहें, " असा बोधलेश असतो, त्यांतून श्रीज्ञानेश्वरमहाराज कसे मुक्त झाले याविषयींचा स्वानुभव सांगतातः––

तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां ।
तें पायां पडोनि मियां । सोडावला ॥ ३२ ॥

पदांचा अर्थ––**तें ऋणशेष**–तो स्वरूपज्ञानबोधाचा लेश; **इया वाचा**–या चारी वाचा; **मरोनियां**–विवेकानें नाहींशा झाल्यावरहि; **न फेडवेचि**–फिटत नसतेंच, फेडवत नाहीं; **तें**–तें ऋण, तो ज्ञानबोधलेश; **मियां**–म्यां, मी; **पायां पडोनि**–श्रीगुरुचरणीं वंदन करून, श्रीगुरुपरमात्मस्वरूपीं समरस होऊन; **सोडावला** (तें ऋण) फेडलें, बोधलेशांतून मुक्त झालों.

भावार्थ––नित्यबोधरूप आत्म्यानें आपलेंच स्वरूप ' तें मी ' म्हणून म्हणावें, हा जो ज्ञानबोधाचा लेश द्वैतशेष तोच इथें ' ऋणशेष ' म्हटलेला आहे. आत्मानात्मविवेकामुळें ज्ञान उत्पन्न होऊन त्यानें अज्ञानाचा ग्रास होऊनहि म्हणजे स्थूल–सूक्ष्म–कारण–महाकारण या शरीरभावाचें, त्यांच्या चार वाचा यांच्यासुद्धां आत्मज्ञानानें निरसन होऊनहि स्वस्वरूपाच्या ठिकाणी स्वरूपाच्या आकारानेंच जो ज्ञान झाल्याचा भाव उरतो, तें या चारी वाणींचें ऋण होय. तो स्वरूपज्ञानबोधाचा लेशशेष कीं, " मी आतां परमात्मरूप आहें " हा भाव स्फुरत असणें हें या चारी वाचांचें ऋणशेष होय. तो ज्ञानबोध, ब्रह्मज्ञानाने प्राप्त होणारा तो आत्मास्थितिभाव या चारी वाचांपैकीं वैखरी, मध्यमा व पश्यन्ती या तीन वाचा, जाग्रत, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांमध्यें भासणाऱ्या स्थूल, सूक्ष्म व कारणदेहांत असणाऱ्या या जीवाला आपल्या स्वरूपाचा विसर पडल्यानें प्राप्त झालेल्या अज्ञानाचें आत्मस्वरूपाच्या बोधज्ञानानें निरसन होऊन त्या अभावरूप आहेत असें त्यांचें ज्ञान झालें. तेव्हां महाकारण हा चौथा तुर्या अवस्थेतला देह परा या ज्ञानवाणीनें समजला. जीवाचें मूळ स्वरूप नित्यमुक्त शुद्ध हा आत्मा केव्हांहि बद्ध नव्हताच, असा आत्मस्वरूपाचा स्पष्ट बोध झाल्यानें या आत्मसाक्षात्काराच्या प्रभावाच्या सामर्थ्यानें स्थूल, सूक्ष्म व

कारण या देहांच्या हालचालीसुद्धां चारी वाणींचा, मनाचा, बुद्धीचा महाकारणांतल्या तुर्या-अवस्थेचाहि अगदीं विसर पडून जाऊन निजात्मरूपानें उरलेली उन्मनीतली अखंड सहजावस्था ती मला प्राप्त झाल्यानें या चारी वाणींचें स्फुरत राहणारें जें भान तुर्या-अवस्थेतल्या बोधज्ञानानेंहि पूर्ण नष्ट होत नाहीं, तें माझ्या ठिकाणचें मी श्रीगुरूंच्या चरणीं शरण होऊन समरस झाल्यानें नाहींसें होऊन मी या ज्ञानबोधाच्या ऋणशेषांतून मुटलों, मुक्त झालों. ॥ ३२ ॥

म्हणोनि परा पश्यन्ती । मध्यमा हन भारती ।
या निस्तरलिया लागती । ज्ञानीं अज्ञानींचि ॥ ३३ ॥

पदांचा अर्थ—**म्हणोनि**–यास्तव, यासाठीं; **ज्ञानीं**–अपरोक्षज्ञान्यांनीं; **अज्ञानींचि**–तसेंच मुमुक्षुसाधकांनींहि या **परा, पश्यन्ती,** मध्यमा व **भारती** जी वैखरी यांच्यांतून; **निस्तरलिया लागती**–निस्तरून जावयास पाहिजे. ॥ ३३ ॥

भावार्थ—स्वस्वरूपसाक्षात्कारीजनांनीं परमानंदरूप स्वस्वरूपबोधाची अखंडस्मृति राखावयास हवी. अज्ञानी जनांनीं आत्मा व अनात्मा यांच्या सतत विवेकानें उत्पन्न होणारा स्वस्वरूपबोध प्राप्त करून घेऊन स्वात्मजागृतींत त्यांनीं सदैव असणें हेंच या चारी वाणींच्या ऋणशेषांतून सुटका करून घेणें होय, असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं मोठ्या कळकळीनें सुचविलें आहे,— " तेथें अहं हा धूप जाळूं । नाह तेजें बोवाळूं । सामरस्यें (ऐक्यभावानें) पोटाळूं (आलिंगूं) । निरंतर ।. (ज्ञाने. १५–७) इया श्रीगुरुचरणसेवा । हो पात्र तया दैवा । जें सकळार्थ मेळावा । पाट (पट्टाभिषेक करूं) बांधे ॥ (ज्ञाने.१५–९). " ॥३३॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे वाचाऋणपरिहारं नाम तृतीयं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवादरूप परब्रह्म परमात्मस्वरूपाचें ओतप्रोत वर्णन असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें वाचाऋणपरिहारनामक तिसरें प्रकरण समाप्त.

प्रकरण चौथें

ज्ञान–अज्ञान---भेदकथन

भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं तृतीय प्रकरणांत सद्गुरूंना वंदन करून वाचाऋणांतून मुक्त कसें व्हावें हें सांगून आपणहि स्वतः तसे झालों हा स्वानुभव स्पष्ट केला आहे. त्या प्रकरणांतील सिद्धान्त असा कीं, मूळ अविद्या हा कालत्रयींहि विद्यमान म्हणजे अस्तित्वांत नसणारा पदार्थ म्हणून अभावरूप. त्या अशा अभावरूप अविद्येचें कार्य असणाऱ्या चारी वाणींच्यापैकीं पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या अज्ञानमयी वाणींचा निरास परा या ज्ञानवाणीनें होऊन शेवटीं ती परा ज्ञानरूपानें शेष राहते. हें जें सत्त्वगुणजन्य ज्ञान, हेंच तें शेष वाचाऋण, हा जो अविद्यालेश तो केवळ आभास होय. परब्रह्मपरमात्मस्वरूप या अविद्येचें व अविद्यालेशाचें अधिष्ठान असणारें तें या अनंतकोटिब्रह्माण्डमय सर्व जगतामध्यें अभेदानें नांदत आहे. म्हणून सर्व जगत् परब्रह्मस्वरूप होय, असा हा परमबोध सद्गुरुकृपेनें उदित होतो तेव्हां "मी" हा जो "जीवभाव", जें जीवपणाचें अस्तित्व, तसेंच ही अविद्या–तिचें कार्य जे हे चारी देह– स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण; त्याचप्रमाणें वैखरी, मध्यमा, पश्यन्ती, परा या चारी वाणी; तें सत्त्वगुणकार्य, अज्ञाननाशक ज्ञान हे सर्व भाव लयाला जाऊन सहजच वाचाऋणपरिहार जो अविद्यालेशनाश हा पूर्ण होतो खरा. तथापि जो जो पदार्थ उत्पन्न होतो तो त्याच्या उत्पत्तीपूर्वी नसतोच; तो अभावरूपच असतो. आणि हा अभाव केव्हां उत्पन्न झाला हें सांगतां येत नाहीं. म्हणून तो अनादि–"नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः। उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः॥ (श्रीगीता २–१६)" "या उपाधीमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत। तें तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती॥ (ज्ञाने. २–१६–१२६)" या गीता–ज्ञानेश्वरींच्या सिद्धान्ताप्रमाणें अशी ही अविद्या, हें अविद्याकार्य हीं सर्व अनादि व अभावरूप; आणि हें चैतन्यमय निज आत्मस्वरूप मात्र नित्य, शुद्ध ज्ञानघन स्वसंविद्रूप; आत्मा कोण व अनात्मा काय हें या विवेकानें ज्ञान उत्पन्न होऊन परमसिद्ध अशा श्रीगुरूंच्या कृपाकटाक्षानें स्वस्वरूपप्राप्तीचा स्वानुभव लाभून तोहि त्या व्यापक परमानंदाच्या अनुभूतींत समरसून जातो;–असा मार्गील

प्रकरणाचा उपसंहार करून श्रीज्ञानराज चालू प्रकरणाचा उपक्रम करतात कीं, सर्व व्यवहार हे या परमानंदघन श्रीहरीची लीला होत. त्यांत भेदाचा म्हणून लेश नाहीं, असें हें चौथें प्रकरण आहे. तें कसें, तें आतां पाहूं:—

आतां अज्ञानाचेनि मारें । ज्ञान अभेदें वावरें ।
नीद साधोनि जागरें । नांदिजे जेवीं ॥ १ ॥

पदांचा अर्थ—आतां–कीं; अज्ञानाचेनि–अविद्येच्या; मारें–मरणानें, नाशानें; ज्ञान–स्वबोध; अभेदें–एकटेंच; वावरें–नांदतें, वावरत असतें, मिरवतें; नीद–निजेला, झोंपेला; साधोनि–नाहींसें करून, घालवून; जागरें–जागृतीनें, जागेपणानें; जेवीं–ज्याप्रमाणें; नांदिजे–नांदावें, व्यवहार करावा, उरावें.

भावार्थ—कीं ज्याप्रमाणें झोंपेला पूर्ण नाहींशी करून जागृतीनें व्यवहार करावा, त्याप्रमाणें अज्ञानाच्या अगदीं नाहींसें होण्यानें, त्याच्या पूर्ण नाशामुळें त्याचा अभाव झाल्यानें आतां स्वयंप्रकाश ज्ञान एकटें एकच सर्वत्र व्यापून राहिलें आहे. ॥ १ ॥

श्रीज्ञानराज याला दृष्टान्त देऊन अधिक स्पष्ट करतातः—

कां दर्पणाचा निघाला । ऐक्यबोधु पहिला ।
मुख भोगी आपुला । आपणचि ॥ २ ॥

पदांचा अर्थ—कां–अथवा; दर्पणाचा–आरशांत; निघाला–उमटलेल्या प्रतिबिंबाच्या योगानें; मुख–चेहरा; आपुला पहिला–आपला स्वतःचा, मूळचा; ऐक्यबोधु–एकच असल्याचा प्रत्यय; आपणचि–स्वतःच; भोगी–अनुभवतें.

भावार्थ––अथवा जसें आरशांत पडलेल्या आपल्या प्रतिबिंबावरून आपला मूळचा चेहरा व हें प्रतिबिंब दोन्ही आपण एकरूपच, असा आपला स्वतःचा मूळचा एकच असल्याचा प्रत्यय आपण अनुभवतों. मूळच्या मुखाची ओळख आरशांतल्या प्रतिबिंबामुळें होतांच बिंब, प्रतिबिंब हे दोन्ही सापेक्ष भाव लय पाऊन मूळचें मुखच अनुभवास येत असतें. ॥ २ ॥

पण जगतांतला तर व्यवहार ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय अशा भेदत्रिपुटीनें होत असल्यामुळें परमात्मस्वरूपज्ञान एकच एक अभेदरूप आहे असें म्हणतां तें कसें–अशी पूर्वपक्षाची शंका घेऊन सिद्धान्तानें तिचें समाधान करतातः—

ज्ञान जिया तिया परी । जगीं आत्मैक्य करी ।
तैं सुरीया खोचे सुरी । तैसें जालें ॥ ३ ॥

पदांचा अर्थ—**ज्ञान**–परमात्मस्वरूपज्ञान; **जिया तिया परी**–ज्या त्या प्रकारानें, सर्व प्रकारानें; **जगीं**–जगाशीं; **आत्मैक्य करी**–परमात्म्याचें ऐक्य असल्याचें दाखवितें; **तैं**–तर मग (असें होईल); **सुरीया**–सुरीला; **सुरी खोचे**–सुरीनें खोचावें, भोसकावें; **तैसें जालें**–तशांतलें, तसें झाल्याचें होईल.

सविवरण भावार्थ—केवळ, एकच एक परमात्मस्वरूपज्ञान त्या त्या प्रकारानें जगाशीं परमात्म्याचें ऐक्य दाखवितें. (असें म्हटल्यास) मग सुरीला म्हणजे स्वतांलाच सुरीनें भोसकावें तसें झाल्यासारखें तें होईल. तात्पर्य हें कीं, अनेकमय जगांतील व्यावहारिक भेद आभासिक, स्वप्नांतल्यासारखा सत्य नसून अनित्य, खोटा असतो; आणि अशा अनेकत्वाच्या भेदकालींहि परमात्ममय सत्यस्वरूपज्ञान अभेदानें एकच एक असतें. एका पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो, तो त्या पहिल्या पदार्थरूपच असतो. अधिष्ठान परमात्मज्ञानस्वरूपावर अनंत-कोटिब्रह्माण्डमय जगत् हा पदार्थ मूळ अधिष्ठान ज्ञानस्वरूप परब्रह्ममयच असतो असा सिद्धान्त. "विष्टभ्याहमिदं कृत्स्नं एकांशेन स्थितो जगत् । (श्रीगीता १०–४२)" "आणि सामान्य विशेष । हें जाणणें एथ महादोष । कां जे मीचि एक अशेष । विश्व आहें म्हणोनि ॥ (ज्ञाने. १०–४२–३१२)" "आतां पैं माझेनि एकें अंशें । हें जग व्यापिलें असे । यालागीं भेद सांडूनि सरिसें । साम्यें भज ॥ (ज्ञाने. १०–४२–३१७)" सूर्यबिंबांत जो प्रकाश, अनंत सूर्यकिरणांत तोच प्रकाश, सूर्यकिरणांत भासणाऱ्या मृगजळांतहि तोच प्रकाश—असा एकच एक प्रकाश. या अधिष्ठानप्रकाशांत असणारे ते अनंत किरण, तें मृगजळ, हे सर्व अनेकपणानें भासत असले तरी ते सर्व अभेदरूप एकच प्रकाशमय होत, हा सिद्धान्त. "तेजाचा तेजौनि निघाला । परि तेजींचि असे लागला । तया रश्मी ऐसा भला । बोध होआवा ॥ (ज्ञाने. १४–२६–३८५)" अशा व्यापक अनुभूतीच्या सर्वमय सिद्धान्तानें श्रीज्ञानराज परब्रह्मस्वरूपज्ञानाचें हें प्रमेय मांडीत आहेत, व त्याचें मुमुक्षूला आकलन न झाल्यानें तो "अहं ब्रह्मास्मि" या वृत्तिज्ञानानें तेंच परमज्ञान स्वतांस अनुभवगम्य झालें असल्याचें समजत आहे; व हे दोन्ही भाव लक्षांत आणून मग पुढील ओव्यांची संगति सहज लागणारी आहे, तें पाहूं. निजस्वरूपाची ओळख झाल्याच्या ज्ञानानें स्वदेहभावासुद्धां जगद्भ्रमरूप अज्ञानाचा अभाव होऊन जाऊन ती ओळख, तें ज्ञान आतां स्वरूपप्राप्तिरूप होतें. ॥३॥

याप्रमाणें सद्गुरुकृपेंतल्या "तत्त्वमसि" या महावाक्याच्या शब्दशक्ति-

सामर्थ्यानें उदित झालेल्या बोधानें जगद्भ्रमरूप अज्ञानाचा निरास झाल्यानंतर परब्रह्मस्वरूपज्ञानच कसें नित्य रहात असतें तें दृष्टान्तानें सांगतातः—

लावी आंत ठावूनि कोपटा । तो साधी आपणयासकटा ।
कां बांधे आपणया चोरटा । मोटेमाजीं ॥ ४ ॥

पदांचा अर्थ—तो–कोशकिडा; **कोपटा आंत**–घरांत; **ठावूनि**–शिरून; **लावी**–लावून घेतो, (दार) बंद करून घेतो; (आणि) **आपणयासकटा**–स्वतांचाच; **साधी**–घात साधतो; **कां**–अथवा; **चोरटा**–चोर; **मोटेमाजीं**–(चोरलेल्या वस्तूंच्या) मोटळ्यांत, गांठोड्यांत, गठ्ठ्यांत; **आपणया बांधे**– स्वतांसच बांधून घेतो.

भावार्थ—कोशकिडा आपल्या घरांत शिरून दार बंद करून घेतो आणि आपलाच घात साधतो; अथवा चोर चोरलेल्या पदार्थांच्या मोटकळ्यांत स्वतांस कोंडून घेतो आणि सांपडतो. ॥ ४ ॥

तेंच दुसऱ्या दृष्टान्तानें अधिक स्पष्ट करतातः—

आगी पोतासाचेनि मिसें । आपणपें जाळिलें जैसें ।
ज्ञाना अज्ञाननाशें । तैसें जालें ॥ ५ ॥

पदांचा अर्थ—**आगी**–अग्नि; **पोतासाचेनि मिसें**–कापरास जाळण्याच्या मिषानें, निमित्तानें; **जैसें**–जसें; **आपणपें**–स्वतांसच; **जाळिलें**–जाळून घेतो; **तैसें**–तसें; **अज्ञाननाशें**–अज्ञान नाहींसें केल्यानें; **ज्ञाना जालें**–ज्ञानाचें होतें, ज्ञानाची अवस्था होते.

भावार्थ—अग्नि कापरास जाळण्याच्या निमित्तानें आपलाच नाश करून घेतो; तसेंच देहबुद्धि, जगद्भ्रम या द्वैतरूप अज्ञानाचा नाश करण्याच्या मिषानें आत्मज्ञान हें स्वतांचाहि नाश करून घेतें. म्हणजे निजस्वरूपप्राप्तीमुळें ज्ञानाज्ञानातीत केवळ परमज्ञानच असतें. ॥ ५ ॥

अज्ञानाचा टेंका । नसतांहि ज्ञानाधिका
फांके तंव उफखा । आपुला पडे ॥ ६ ॥

पदांचा अर्थ—**अज्ञानाचा टेंका**–अज्ञानाचा आधार, टेकण; **नसतांहि**–नाहींसा झाल्यावरहि; **ज्ञानाधिका**–(ज्ञान+आधिका) ज्ञानाचा विकास; **फांके**–फांकतो, फार होतो, वाढतो; **तंव**–त्या योगानें; **आपुला उफखा**–स्वतांचा नाशच; **पडे**–पडतो.

भावार्थ—अज्ञानाचा आधार नाहींसा झाल्यावर जें ज्ञान विकास पावतें तें त्या योगानें आपला नाशच साधतें. संकल्पविकल्परहित देहभानविवर्जित अशी अमनस्थिति प्राप्त होतांच अज्ञान नष्ट झाल्यानें त्यांचा तो टेंका उरला नाहीं म्हणून मी शुद्ध, बुद्ध, नित्यमुक्त, सच्चिदानंदब्रह्मस्वरूप आहे, हें ज्ञानहि राहणार नाहीं. अज्ञानाचा नाश केल्यानंतर तें जें ज्ञान कांहीं काळ अज्ञानाच्या टेंक्यावांचून असतें, तें आपला नाश करून घेण्याकरितांच राहतें. ॥ ६ ॥

हीच गोष्ट आणखी चार ओव्यांनीं अधिक स्पष्ट करतात:—

दशाहि ते निमालिया । येणें जें उवाया ।
तें केवळ नाशावया । दीपाचे परी ॥ ७ ॥

पदांचा अर्थ—ते दशाहि—ती वात; निमालिया—(अगदीं) संपण्याच्या वेळीं; जें दीपाचें—जें दिव्याचें; उवाया येणें—उत्कर्षास येणे, मोठें होणें; तें केवळ नाशावया परी—तें तर नाश होण्याकरितांच (असतें.)

भावार्थ—ती वात अगदीं संपण्याच्या वेळी जें दिव्याचें मोठें होणें, तें केवळ आपला नाश होण्याकरितांच असतें. (दिव्याचें तें मोठें होणें हाच त्याचा नाश होय.) ॥ ७ ॥

उठणें कीं पडणें । कुचभारांचें कोण जाणे ।
फांकणें कां सुकणें । जाईचें जैसें ॥ ८ ॥

पदांचा अर्थ—कुचभारांचें—कचभारांचें—स्तनांचें किंवा वनगाईच्या केसांच्या चवरीचें; उठणें कीं पडणें—स्फुरलेपण, उभारलेंपण, किंवा पडणें—मलूलपण, मंदपण; आणखी जैसें—जसें; जाईचें—चमेली फुलाचें; फांकणें कां सुकणें—विकास पावणें, उमलणें किंवा कोमजणें; कोण जाणे—हें कोणाला जाणतां येईल ?

भावार्थ—वनगाईच्या केसांपासून केलेल्या चवरीचें उभारलेंपण तेंच तिचें लगेच मलूलपण; तसेंच जाईच्या फुलाचें उमलणें तेंच जसें सुकणें हें कोणाला जाणतां येईल काय ? ॥ ८ ॥

तरंगाचें रूपा येणें । तयाचि नांव निमणें ।
कां विजेचें उदैजणें । तोचि अस्तु ॥ ९ ॥

पदांचा अर्थ—तरंगाचें—लाटांचें; रूपा येणें—उसळणें; तयाचि नांव—तोंच, लगेच; निमणें—लीन होणें; कां—किंवा; विजेचें उदैजणें—विद्युत्चें लखलखणें, चमकणें; तोचि—तेंच; अस्तु—लोपणें.

भावार्थ—लाटेचें उसळणें तेंच तिचें बसणें, अथवा विजेचें चमकणें तेंच तिचें लगेच लोपणें. ॥ ९ ॥

तैसें पिऊन अज्ञान । तंववरी वाढे ज्ञान
जंव आपुलें निधन । निःशेष साधे ॥ १० ॥

पदांचा अर्थ—तैसें—तसेंच; अज्ञान पिऊन तंववरी—अज्ञान गिळून होईतोंपर्यंत, नाहींसें होऊन जाईपर्यंतच; ज्ञान वाढे—ज्ञान विस्तार पावतें; जंव—नाहीं तोंच; आपुलें निधन—आपला नाश; निःशेष साधे—संपूर्ण साधतें.

भावार्थ—तसेंच अज्ञान गिळून टाकून म्हणजे त्या अज्ञानाला नाहींसें करून टाकीपर्यंतच ज्ञानहि तेवढेंच आपल्या स्वरूपानें विस्तार पावतें. आणि लगेच तें आपलाहि संपूर्ण नाश करून टाकून नाहींसें होतें. ॥ १ ॥

अशा रीतीनें परस्पर सापेक्ष असणारीं ज्ञान व अज्ञान हीं दोन्ही राहात नाहींतच. त्या दोघांचेंहि अधिष्ठान परमात्मस्वरूपज्ञान तेंच सर्वत्र असतें. तें कसें तें सांगतातः—

जैसें कल्पान्तीचें भरितें । स्थळाजळा दोहींतें ।
बुडविलिया आरौतें । राहोंचि नेणे ॥ ११ ॥

पदांचा अर्थ—जैसें—ज्याप्रमाणें; कल्पान्तीचें—प्रळयकाळचें; भरितें—उसळणें, वाढणें, चढणें, जळप्रळय; स्थळाजळा—पृथ्वी आणि समुद्र; दोहितें—या दोहोंना; बुडविलिया आरौतें—जलमय करून टाकल्यावर; राहोंचि नेणे—मग राहूंच शकत नाहीं.

भावार्थ—जसें प्रळयकाळचें वाढलेलें पाणी पृथ्वी आणि समुद्र या दोघांना बुडवून टाकल्यावर मग राहूंच शकत नाहीं, तर सर्वत्र जळच असतें. ॥ ११ ॥

कीं विश्वाहि वेगळ । वाढे जैं सूर्यमंडळ ।
तैं तेजतम निखळ । तेंचि होय ॥ १२ ॥

पदांचा अर्थ—कीं—किंवा; विश्वाहि वेगळ—विश्वापेक्षां अधिक; जैं—जेव्हां; सूर्यमंडळ—सूर्यतेज; वाढे—फांकतें, विकास पावतें; तैं—तेव्हां; तेजतम—प्रकाश व अंधार हीं दोन्ही; तेंचि—सूर्यतेजच; निखळ होय—संपूर्ण होऊन जातात.

भावार्थ—प्रळयकाळचें सूर्यतेज विश्वापेक्षांहि जेव्हां विकास पावतें, खूप फांकतें, तेव्हां अंधकार व प्रकाश हे दोन्ही तें सूर्यतेजच अगदीं पूर्ण होऊन जातात. ॥ १२ ॥

नाना नीद मारोनि । आपणपें हिरौनि ।
जागणें ठाके होवोनि । जागणेंचि ॥ १३ ॥

पदांचा अर्थ—नाना—अथवा; नीद मारोनि—झोंपेचा नाश करून; आपणपें हिरौनि—आपण जें जागेपण तें संपून; जागणें—असें जें जागेपण; जागणेंचि होवोनि ठाके—तें अखंड जागणेंच होऊन राहतें.

भावार्थ—झोंपेचा नाश करून आपलेपणानें जें जागेपण असतें तेंहि नाहींसें होऊन केवळ दीर्घ जागृतिच ती राहते. ॥ १३ ॥

तैसें अज्ञान आटोनियां । ज्ञान येतें उवाया ।
ज्ञानाज्ञान गिळूनियां । ज्ञानचि होय ॥ १४ ॥

पदांचा अर्थ—तैसें—तसेंच; अज्ञान आटोनियां—अज्ञानाची आटणी करून, अज्ञानाला शिल्लक न उरवून; ज्ञान उवाया येतें—ज्ञान आपण उदयास येतें, उत्पन्न होतें; ज्ञानाज्ञान गिळूनियां—ज्ञान व अज्ञान हीं दोन्ही गट्ट होऊन जाऊन, नाहींशीं होऊन जाऊन; ज्ञानचि होय—केवळ स्वरूपज्ञानच शिल्लक असतें.

भावार्थ—तसेंच सत्त्वगुणज्ञान हें आवरणरूप अज्ञानाची आटणी करून, त्याला शिल्लक न उरवून आपण उदयास येतें. पण हीं दोन्ही ज्ञान—अज्ञानें गट्ट केलीं जाऊन त्यांना उरूं न देतां केवळ स्वरूपज्ञानच तें असतें. ॥ १४ ॥

ते वेळीं पुनिवां भरे । ना अवसां सरे ।
ते चंद्रींचि उरे । सतरावी जैशी ॥ १५ ॥

पदांचा अर्थ—ते वेळीं—त्या वेळीं; पुनिवां—पौर्णिमेस; ना भरे—पूर्ण होत नाहीं; अवसां—अंवसेला; ना सरे—कमी होत नाहीं; ते सतरावी—अशी ती सतरावी पूर्णकला; चंद्रींचि—चंद्रामध्येंच; जैशी उरे—जशी पूर्णपणानें उरलेली असते.

भावार्थ—त्या वेळीं चंद्राचें मूलस्वरूप पौर्णिमेला पूर्ण होत नाहीं व अमावास्येस कमी होत नाहीं (असें जें स्वरूप तिला सतरावी कला म्हणतात). कलारहित चंद्राचें जें स्वरूप ती सतरावी कला स्वरूपानें चंद्राच्या ठिकाणींच असतें. ॥ १५ ॥

कां तेजांतरें नाटोपे । कोण्हें तमें न सिंपे ।
तें उपमेचें जाउपें । सूर्यचि होय ॥ १६ ॥

पदांचा अर्थ—**कां**—अथवा; **तेजांतरें**—इतर, दुसऱ्या तेजानें; **नाटोपे**—आवरला जात नाहीं; **कोण्हें**—कोणत्याहि; **तमें**—काळोखानें; **न सिंपे**—झांकला जात नाहीं; **तें उपमेचें**—त्या दृष्टान्ताचा, दाखल्याचा, तुलनेचा; **जाउपें**—जोडीचा पदार्थ; **सूर्यचि होय**—सूर्यच होतो.

भावार्थ—अथवा इतर कोणत्याहि तेजानें आवरला जात नाहीं, कोणत्याहि काळोखानें झांकला जात नाहीं;—त्या तुलनेचा दुसरा पदार्थ म्हणजे तो सूर्यच होय. ॥ १६ ॥

म्हणोनि ज्ञानें उजळे । कां अज्ञानें रुळे ।
तैसें नव्हे निर्वाळे । ज्ञानमात्र जें ॥ १७ ॥

पदांचा अर्थ—**म्हणोनि**—म्हणून; **ज्ञानें उजळे**—इतर अन्वयव्यतिरेक या ज्ञानानें प्रकाशलें जाणारें; **कां**—किंवा; **अज्ञानें रुळे**—आवरण विक्षेपरूप अज्ञानानें झांकणारें; **तैसें नव्हे**—तशांतलें नाहीं, तर; **जें निर्वाळे ज्ञानमात्र**—जें अगदीं चोख, केवळ, स्वरूपज्ञानरूप अधिष्ठान होय.

भावार्थ—म्हणून सत्त्वगुणप्रधान ज्ञानानें प्रकाशलें जाणारें किंवा आवरण विक्षेपरूप अज्ञानानें झांकलें जाणारें तशांतलें जें नव्हे, तर अगदीं शुद्ध केवळ असें ज्ञानाज्ञानविरहित अधिष्ठानच तें. ॥ १७ ॥

अशा तऱ्हेनें वरील ओवी तीनपासून ओवी सतरापर्यंत ज्ञान, जें अविद्या-सत्त्वगुणकार्य असणारें व आवरण विक्षेपरूप असणारें अज्ञान ह्या दोन्ही ज्ञान व अज्ञानाहून अगदीं निराळें, त्यांचें अधिष्ठान असणारें परमात्मस्वरूपआत्मज्ञानच तें शेष असतें, असें सिद्ध केलें. पण यावरहि अशी शंका उरते कीं, हें जें केवळ शुद्ध ज्ञानस्वरूपच उरतें, त्याला जाणणाऱ्या अविद्याकार्य असलेल्या इतर ज्ञानाचा अभाव होत असल्यानें त्याचें त्यालाच, स्वतःचें स्वतःलाच ज्ञान होतें, असें मानावें लागेल. असा हा ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय-भेद तरी शिल्लक उरतोच ना?

अशी शंका खालील ओवीच्या पूर्वार्धांत घेऊन तिचें समाधान ओवीच्या उत्तरार्धानें करतातः—

परी ज्ञानमात्रें निखळें । तेंचि कीं तया कळे ।
काई देखिजे बुबुळें । बुबुळा जेवीं ॥ १८ ॥

पदांचा अर्थ—**परी**—परंतु; **निखळें**—निवळ; **ज्ञानमात्रें**—चिन्मात्र (परमात्मा); (तरी) **तेंचि तया**—तेंच चिन्मात्र स्वतांला; **कळे कीं**—जाणतेंच ना?

(यावर) जेवीं—जसें; **बुबुळें बुबुळा**—बुबुळानें बुबुळाला, स्वतांला; **देखिजे काई**—पाहतें का? (नाहींच).

भावार्थ—तें निवळ चिन्मात्रस्वरूपच असतें. (परी) तथापि तेंच स्वतांला जाणतेंच ना? (त्यावर) अहो, बुबुळ हें स्वतांला, आपल्या बुबुळाला पाहूं शकतें काय?—असा सिद्धान्त मांडतात.

सुबोधविवरण—मागील ओवी तीन ते ओवी सतरापर्यंत सिद्ध केलें कीं, चिन्मात्रस्वरूप हें निवळ परम ज्ञान, त्याला जाणणारें दुसरें कोणतेंहि ज्ञान नाहीं. असें जरी असलें, तरी तें निखळ शुद्ध केवलज्ञानस्वरूप आपलें आपल्या स्वतांला तर जाणतेंच ना? अशी वर ओवी अठराच्या पहिल्या अर्धांत शंका उपस्थित केली कीं, तसें झालें म्हणजे एकच एक अशा ज्ञानस्वरूप परमात्म्याच्या ठिकाणीं जाणणारें व जाणणें असा ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय-भेद हा शेष राहतोच कीं? या शंकेचें समाधान ओवी अठराच्या दुसऱ्या अर्धानें प्रश्नपूर्वक करतात. बुबुळ हें स्वतां आपल्यास पाहूं शकेल काय? तर केव्हांहि नाहीं. कारण बुबुळाच्या ठिकाणीं जें पाहणें आहे, तें, पाहणें आणि न पाहणें या दोहोंहून निराळें असें **केवळ पाहणेपणानेंच आहे.** असें पहा कीं, बुबुळ हें सर्व पदार्थांना पाहतें. पण डोळे मिटल्यानंतर बुबुळ आपलें आपल्याला पाहतें कां, तर तें स्वतांला पहात नाहीं. यावरून तें आपल्या स्वतांच्या ठिकाणीं स्वस्वरूपाच्या एकपणानेंच असतें. तसेंच परमात्मा नित्यज्ञानस्वरूप निजज्ञानानें आपला आपल्या ठिकाणीं परिपूर्ण अखंड एकरूपच असतो. अनंतकोटि-ब्रह्माण्डरूप द्वैत जरी भासलें तरी तो त्याचा परमानंदविलास होय. तो त्याच्याहून निराळा नसून तो त्या एकरूपांतलाच होय. ॥ १८ ॥

तो कसा तें सांगतातः—

आकाश आपणया रिगे? । काये आगि आपणया लागे ।
आपला माथा वोळघे । आपण कोण्ही? ॥ १९ ॥

पदांचा अर्थ—आकाश—सर्वव्यापी गगन; **आपणया रिगे काये**—आपल्यामध्यें शिरेल काय? **आगि**—आग; **आपणया लागे काये**—आपल्याला भाजूं शकेल काय? **कोण्ही आपण आपला**—कोणी आपण स्वतांचें; **माथा वोळघे काय**—डोक्यावर चढेल काय?

भावार्थ—सर्वव्यापी गगन आपल्या स्वतांमध्यें शिरूं शकेल काय? अग्नि स्वतांला पोळेल काय! कोणी आपण आपल्याच डोक्यावर चढेल काय! ॥ १९ ॥

दिठी आपणया देखे ?। स्वादु आपणया चाखे ?।
नादु आपलें आइके ?। नादपण ॥ २० ॥

पदांचा अर्थ—दिठी—दृष्टि; आपणया देखे (काय)– आपल्याला पाहूं शकेल काय ? स्वादु–रुचि; आपणया चाखे–आपल्याला चाखील काय ? नादु–नाद; आपलें नादपण आइके–आपला ध्वनि ऐकेल काय ?

भावार्थ—दृष्टि, नजर ही आपल्या स्वतांला पाहील काय ? रुचि आपली चव घेईल काय ? नाद आपला ध्वनि ऐकूं शकेल काय ? (नाहींच नाहीं). ॥ २० ॥

सूर्य सूर्यासि विवळे ?। कां फळ आपणया फळे ?।
परिमळु परिमळें । घेपतु असे ?॥ २१ ॥

पदांचा अर्थ—सूर्य सूर्यासि–सूर्य स्वतालाच; विवळे–प्रकाशित करील काय ? कां–अथवा; फळ आपणया–फळ स्वतांलाच; फळे काय ?–फळेल का ? परिमळें परिमळु–सुवास आपलाच सुगंध; घेपतु असे–घेऊं शकेल काय ?

भावार्थ—सूर्य स्वतांलाच प्रकाशित करतो काय ? किंवा फळ स्वतांलाच लागेल काय ? सुगंध आपलाच सुवास घेतें काय ? (नाहींच). ॥ २१ ॥

तैसें आपणयां आपण । जाणतें नव्हे जाण ।
म्हणौनि ज्ञानपणेंवीण । ज्ञानमात्र जें ॥ २२ ॥

पदांचा अर्थ—तैसें–तसेंच; जें आपणयां आपण–जें परमात्मज्ञान आपलें स्वतां आपल्यास; जाणतें नव्हे जाण–जाणणारें नाहीं असें समज; म्हणौनि–म्हणून, कारण; तें ज्ञानपणेंवीण–तें जाणपणावांचून; ज्ञानमात्र–केवळ ज्ञानघनच.

भावार्थ—(जसें वरील सर्व प्रश्नांचें उत्तर 'नाहींच' असें आहे,) तसेंच हा आत्मा देखील आपल्या स्वतांस आपण जाणता होत नाहीं असें समज. कारण तें बुद्धीच्या जाणणेंपणावांचून तें केवळ स्वतांच्या जाणपणानेंच ज्ञानपूर्ण असें आहे. (इतका गहन अर्थ या ओवीचा आहे. तथापि सूक्ष्म विचारानें त्यांतील रहस्याचें आकलन होणारें आहे, असो.) ॥ २२ ॥

आतां जर अधिष्ठानरूप हें ज्ञान आपलें आपल्यासच जाणील तर त्यास अज्ञान म्हणावें लागेल हें दाखवितातः—

आणि ज्ञान ऐसी सोये । ज्ञानपणेंचि जरी साहे ।
तरी अज्ञान हें नोहे ?। ज्ञानपणेंचि ॥ २३ ॥

पदांचा अर्थ—आणि **जरी**–आणि जर; **ज्ञानपणेंचि**–परमात्मज्ञान, ज्ञानस्वरूपच जें तें; **ऐसी ज्ञान सोये**–" मी ज्ञानस्वरूप आहे " असा ज्ञानसंबंध; **साहे**–साहील, ठेवील; **तरी**–तर; **हें ज्ञानपणेंचि**–हें परमात्मस्वरूपज्ञानच; **अज्ञान नोहे** ?–अज्ञान होणार नाहीं का ?

भावार्थ—आणि जर परमात्मज्ञान जें ज्ञानस्वरूपानेंच असणारें तें " मी ज्ञानस्वरूप आहें " असा ज्ञानसंबंध ठेवील तर असें हें परमात्मज्ञानपणच अज्ञान नाहीं का होणार ? एखाद्या शुद्ध ब्राह्मणानें " मी शुद्ध ब्राह्मण नाहीं का " असें म्हटल्यास तें जसें शंकेला कारण होऊन त्याच्या शुद्धपणाच्या तें अज्ञानास कारण नाहीं का होणार ? – तद्वतच. ॥ २३ ॥

यास दृष्टान्तानें श्रीज्ञानराजच अगदीं स्पष्ट करीत आहेत, तें असें:—

जैसें तेज जें आहे । तें अंधारें कीर नोहे ।
मा तेज तऱ्ही होय । तेजासी काई ॥ २४ ॥

पदांचा अर्थ—**जैसें**–जसें; **तेज जें आहे**–जें सूर्यतेज आहे; **तें अंधारें**–तें तेज अंधार, काळोख; **कीर नोहे**–खरोखर नाहींच; **तऱ्ही मा**–तर मग; **तें तेज होय**–" मी तें तेज आहें "; **तेजासी काई**–(असें त्या) तेजानें म्हणावें काय ?

भावार्थ—जसें सूर्यासारखें जें तेज आहे, तें तर अंधार खरोखर नसतेंच. तर मग " मी तें तेज आहे " असें त्या तेजानें स्वतांस म्हणावें काय ? ॥ २४ ॥

यालाच खालील ओवीच्या पहिल्या अर्धानें वरील दृष्टान्ताशीं जुळवून दुसऱ्या अर्धानें शून्यवादमताचें दिग्दर्शन श्रीज्ञानराज करीत आहेत, तें असें:—

तैसें असणें आणि नसणें । हें नाहीं जया होणें ।
आतां मिथ्या ऐसें येणें । बोलें गमे ॥ २५ ॥

पदांचा अर्थ—**तैसें**–तसें; **असणें आणि नसणें**–ज्ञानपणानें असणें व नसणें हे दोन्ही धर्म; **जया होणें**–ज्याच्या ठिकाणीं होत नाहींत; **आतां**–म्हणून; **येणें बोलें**–या बोलण्यावरून; **मिथ्या**–तें शून्य आहे; **ऐसें गमे**–असें वाटतें; हें सिद्ध होतें.

भावार्थ—त्याप्रमाणें ज्ञानरूपानें असणें किंवा ज्ञानरूपानें नसणें, हे दोन्ही धर्म ज्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं होत नाहींत, (कारण तो केवळ ज्ञानस्वरूप

असा आत्मा ह्या दोन्ही भावांविरहित आहे) तर मग या तुमच्या बोलण्यावरून तो मिथ्या म्हणजे शून्य आहे हेंच आतां सिद्ध होतें. ॥ २५ ॥

वरीलप्रमाणें बौद्धांचा " शून्यवाद " उपस्थित झाल्यास त्याचें निराकरण दोन ओव्यांनीं करतातः—

तरी कांहीं नाहीं सर्वथा । ऐसी जरी व्यवस्था ।
तरी नाहीं हे प्रथा । कवणासि पां ॥ २६ ॥

पदांचा अर्थ—**तरी**–मग; **सर्वथा**–अगदीं; **कांहीं नाहीं**–शून्य आहे; **जरी**–जर; **ऐसी व्यवस्था**–अशी स्थिति; **तरी**–तर; **'नाहीं'**–(कांहीं नाहीं) सर्व शून्य; **हे प्रथा**–ही प्रतीति, हा अनुभव; **कवणासि पां**–कोणास (होतो) बरें ?

भावार्थ—मग अगदीं 'कांहीं नाहीं', –'सर्व शून्य' अशी जर स्थिति, तर 'नाहीं' 'कांहीं नाहीं' ही अशी प्रतीति कोणास होते बरें ? ॥२६॥

शून्यसिद्धान्तबोधु । कोणे सत्ता होये सिद्धु ।
नसता हा अपवादु । वस्तूसि जो ॥ २७ ॥

पदांचा अर्थ—**शून्यसिद्धान्तबोधु**–शून्य–कांहीं नाहीं, असा सिद्धान्त करणाऱ्यांचें; **बोधु**–ज्ञान; **कोणे सत्ता**–कोणाच्या अस्तित्वानें, ज्ञानानें, आधारानें; **सिद्ध होये** ?–निश्चित होतें ? **हा जो नसता**–हा असला खोटा, नसताच; **अपवादु**–आरोप, कल्पना; **वस्तूसि**–आत्म्यावर.

भावार्थ—' सर्वथा कांहीं नाहीं ', ' अत्यंत अभाव ' असा हा बौद्धांचा, शून्यवाद्यांचा सिद्धान्त, जें ठाम मत, याचें ज्ञान म्हणजे हा "शून्य सिद्धान्तबोध" कोणाच्या आधारानें निश्चित ठरतो ? कारण 'शून्यत्व' हा असला नसताच आरोप आत्म्यावर होतो. अशी आत्म्याच्या अस्तित्वाविषयीं खोटीच कल्पना केलेली ही होय.

यांतील मर्म असें कीं, 'कांहीं नाहीं', 'सर्व शून्य' हें ज्ञान कोणास होतें ? तें कोणाच्या आधारानें होतें ? याचें उत्तर ' कोणाच्याच आधारानें नाहीं. ' कारण ' सर्व शून्यच आहे. ' यावर ' सर्व शून्य आहे ' हें जाणणारा जर शून्याहून निराळा आहे, हें सिद्ध होत असल्यानें शून्यवाद मग उरतच नाहीं. आणि म्हणून परमात्म्याच्या ठिकाणीं शून्यत्व नसतांना, आत्मा हा " शून्यरूप " आहे असा हा खोटाच आरोप केला जातो. ॥ २७ ॥

हेंच आणखी चार ओव्यांनीं दृष्टान्तपूर्वक सिद्ध करतातः—

माल्हवितां दिवे । माल्हवितें जरी माल्हवें ।
तरी दीपु नाहीं हें फावे । कोणासि पां ॥ २८ ॥

पदांचा अर्थ—दिवे माल्हवितां–दिवा मालविला असतां; **जरी**–जर; **माल्हवितें**–मालविणारा; **माल्हवें**–दिसला नाहीं; **तरी**–तथापि; **दीपु नाहीं**–दिवा मालविला आहे; **कोणासि हें फावे पां**–हें कोणास मग कळेल बरें ?

भावार्थ—दिवा घालविला, मालविला असतां मालविणारा जर नाहींसा होईल तर ' दिवा नाहीं ', ' प्रकाश नाहीं ' हें मग कोणास कळेल ? ॥ २८ ॥

कीं निदेचेनि आलेंपणें । निदेलें तें जाय प्राणें ।
तरी नीद भली हें कोणें । जाणिजेल पां ॥ २९ ॥

पदांचा अर्थ—**कीं**–किंवा; **निदेचेनि आलेंपणें**–झोंप आल्यानें; **निदेलें**–निजलेलें माणूस; **तें प्राणें जाय**–तें प्राणास मुकलें; **तरी**–तर; **नीद भली**–झोंप नीट लागली; **हें कोणें**–हें कोण; **जाणिजेल पां**–जाणेल मग ?

भावार्थ—किंवा झोंप आल्यानें निजलेलें माणूस हें प्राणास मुकलें मानल्यास त्यानेंच जर म्हटलें, कीं मला झोंप चांगली लागली होती, हें मग कोणास समजलें ? ॥ २९ ॥

घटु घटपणें भासे । तद्भंगें भंगु आभासे ।
सर्वथा नाहीं तैं नसे । कोणें म्हणावें ॥ ३० ॥

पदांचा अर्थ—**घटु**–मातीची घागर, घट; **घटपणें**–घटाच्या आकारानें; **भासे**–दिसतो, ज्ञान होतें; **तद्भंगें**–(तद् + भंगें) त्याच्या भंगण्यानें, फुटण्यानें; **भंगु आभासे**–भंग, नाश कळतो; **सर्वथा नाहीं**–तो घट मुळींच नसतो; **तैं**–तेव्हां तर; **नसे**–तो " नाहीं "; **तें कोणें म्हणावें**–हें कोण म्हणतें ?

भावार्थ—मातीची घागर घागरीच्या आकारानें दिसते. ती फुटल्यामुळें तिचा नाश तोहि कळतो. पण मुळींच घागर नसेल तर " ती नाहीं " असें कोण म्हणते ? तर " ती घागर नाहीं " असें म्हणणारा कोणी तरी असतोच ना ? ॥ ३० ॥

म्हणोनि कांहीं नाहींपण । देखता नाहीं आपण ।
नोहूनि असणेंनवीण । असणें जें ॥ ३१ ॥

पदांचा अर्थ—**म्हणोनि**–त्याप्रमाणें; **आपण**–ज्ञानरूप आत्मा; **नाहींपण**–(आपला) नाहींपणा, अभाव, शून्यपणा; **असणेंनवीण**–असणेंपणा,

अस्तित्व, भाव; **देखता नाहीं**—पाहणारा नाहीं; **कांहीं नोहूनि**—हें (नसणेंपण व असणेंपण) **कांहीं नोहूनि**—कांहींहि न होऊन; जें असणें—जें नित्य असणेंपण, तें (तो होय).

भावार्थ—त्याप्रमाणें ज्ञानरूप आत्मा आपण आपलें नाहींपण व आहेपण हें तो जाणत नाहीं. हे दोन्ही कांहीं न जाणतां त्याचें जें नित्य असणेंपण त्यानेंच तो असतो. यावरून तो आहेपणानेंच आहे. त्याचा अभाव सिद्ध होत नाहीं. ॥३१॥

तर मग असें असतां "सर्वच शून्य आहे" असें कां वाटावें, असा पूर्वपक्षाचा अभिप्राय महाराज उत्पन्न करतातः—

परी आणिका कां आपणया । न पुरे विषो होआवया ।
म्हणौनि न असावया । कारण कीं ॥ ३२ ॥

पदांचा अर्थ—**परी**—परंतु; **आणिका**—इतराला, दुसऱ्याला; **कां**—अथवा; **आपणया**—आपला आपल्याला, स्वतांला; **पुरे विषो होआवया न**—पूर्ण गम्य होणारा नाहीं, पूर्ण आकलन होत नाहीं; **म्हणौनि**—म्हणून; **कीं न असावया**—मुळींच तो नसावा; **कारण**—हें कारण घडतें.

भावार्थ—कारण इतरांना किंवा आपलें आपल्याला त्याचें पूर्ण आकलन होत नाहीं म्हणून तो (आत्मा) मुळींच नसावा, असें वाटण्याला तें कारण होतें. ॥ ३२ ॥

ह्या शंकेचें खालील दोन ओव्यांनीं समाधान करतात, कीं:—

जो निरंजनीं निदैला । तो आणिकीं नाहीं देखिला ।
आपलाहि निमाला । आठउ तया ॥ ३३ ॥

पदांचा अर्थ—**जो**—कोणीएक; **निरंजनीं**—निर्जन स्थळीं, अरण्यांत, एकान्तांत; **तो**—त्याला; **आणिकीं**—दुसऱ्यांनीं; **देखिला नाहीं**—पाहिलें नाहीं; **तया आपुलाहि**—त्याची स्वतांचीहि; **आठउ निमाला**—आठवण नाहींशी झाली.

भावार्थ—कोणी एक अरण्यांत एकान्तांत निजला आहे; त्याला दुसऱ्यानें पाहिलें नाहीं व त्याची स्वतांचीहि आठवण नाहींशी झाली आहे. ॥ ३३ ॥

परी जिवें नाहीं नोहे । तैसें शुद्ध असणें आहे ।
हें बोलणें न साहे । असेनाहींचें ॥ ३४ ॥

पदांचा अर्थ—**परी**—परंतु; **जिवें नाहीं नोहे**—तो जिवंत नाहीं असें नव्हे; **तैसें**—त्याप्रमाणें; (आत्म्याचें) **शुद्ध असणें आहे**—केवळ नित्य असणेंपण

आहे; हें असे नाहींचें बोलणें न साहे–हें आहे–नाहींपणाचें बोलणें जेथें सहन होत नाहीं, जेथें चालत नाहीं (तसलें तें शुद्ध असणेंपण आहे).

भावार्थ––परंतु तो जिवंत नाहीं, असें होत नाहीं, हें जसें, त्याप्रमाणें हें आहे–नाहींपणाचें बोलणें जेथें सहन होत नाहीं, जेथें असें–नसेचा कांहीं संबंध नाहीं, असें परमात्म्याचें केवळ असणेंपण आहे. ॥ ३४ ॥

हेंच आणखी दृष्टान्तांनीं पुढीलप्रमाणें सिद्ध करीत आहेत तें असेंः—

दिठी आपणया मुरडे । तैं दिठीपणहि मोडे ।
परी नाहीं, नोहे, फुडे । ते जाणेचि ते ॥ ३५ ॥

पदांचा अर्थ—दिठी–दृष्टि, नजर; आपणया–आपल्या ठिकाणीं, आपल्या स्वतांकडे; मुरडे–मुरडते, मागें आंत वळून पाहते; तैं–तेव्हां; दिठीपणहि–दृष्टीपणा, पाहण्याचा धर्म; मोडे–थांबतो, संपतो; परी–पण तेवढ्यानें; "नाहीं" (असें) नोहे–(ती) अजीबात नाहींच, नष्ट झाली असें नाहीं; ते–ती दृष्टि; फुडे–खरोखर; जाणेचि ते–जाणणेंरूपच, जाणीवरूपानेंच असते.

भावार्थ—दृष्टि स्वतांमध्यें मागें परतून पाहते, त्या वेळीं तिचें पाहणेंपणहि संपतें; तरी ती "नाहीं" असें न होतां, ती नष्ट न होतां, आपल्या जाणीवरूपानें असते. ॥ ३५ ॥

कां काळा राहे काळवखां । तो आपणया ना आणिकां ।
न चोजवे तव्ही आसिका । हा मी बाणे ॥ ३६ ॥

पदांचा अर्थ—कां–किंवा; काळा–खूप काळा माणूस, काळा कुळकुळीत; काळवखां–काळोखांत; राहे–उभा किंवा बसलेला असतां; तो आपणया–तो आपल्याकडून, आपल्या स्वतांस; ना–अथवा; आणिका–दुसऱ्याकडून; न चोजवे–ओळखला जात नाहीं; तव्ही–तरीसुद्धां, तेव्हांहि; मी हा–"मी हा आहें, असें; त्याचें ठिकाणीं; आसिका–संपूर्ण; बाणे–बिंबलेलें असतें.

भावार्थ–तसेंच खूप काळा कुळकुळीत माणूस अगदीं काळोखांत बसलेला असतां तो आपल्या स्वतांकडून किंवा दुसऱ्याकडून ओळखला जात नाहीं; स्वतांला किंवा दुसऱ्याला तो बिलकुल दिसत नाहीं; तरीसुद्धां "मी हा आहें" अशी अगदीं पूर्ण खात्री त्याला असते; त्याला आपलें स्वतांचें पूर्ण ज्ञान असतें. ॥ ३६ ॥

तैसें असणें कां नसणें । हें कांहींच मानुसवाणें ।
नसोनि असणें । ठायें ठावो ॥ ३७ ॥

पदांचा अर्थ—**तैसें**—तसेंच; **असणें कां नसणें**—जेथें असणें किंवा नसणें हे भाव; **हें कांहींच**—एवढेंसेंदेखील, यत्किंचितहि; **मानुसवाणें नसोनि**—मानण्यासारखें, कल्पना करण्यासारखें नसून; **असणें**—(तो हा आत्मा) असणेंरूपानें; **ठायें ठावो**—स्वतांच्या ठिकाणच्या ठिकाणीं, स्वस्वरूपाच्या निर्विकार ठिकाणीं (असतो).

भावार्थ—तसेंच असणेंपण किंवा नसणेंपण हे दोन्ही भाव या आत्मस्वरूपाविषयीं कांहींच मानण्यासारखें नसून तो असणेंरूपानें आपल्या स्वरूपाच्या ठिकाणीं असतो तसाच असतो. ॥ ३७ ॥

निर्मळपणीं आपुला । आकाशाचा संचु विराला ।
तो स्वयें असे पुढिला । कांहीं ना कीं ॥ ३८ ॥

पदांचा अर्थ—**आपुला निर्मळपणीं**—आपल्या मूळच्या शुद्ध स्वरूपांत, आपल्या निर्लेपपणामध्यें, विमल आकाशांत; **संचु**—अनेक भरून असणाऱ्या, सांचून असणाऱ्या पदार्थांमुळें; **विराला**—त्याचा व्यापकपणा बिघडलेला दिसला, संकोचलेला—कमी झालेला दिसला, अडलेला दिसला, तरी; **तो स्वयें असे**—तो निर्मळपणा स्वतांच्या व्यापकपणानें (तो शुद्धपणा स्वतांच्या व्यापकपणानें) असतो तसाच असतो; **पुढिला**—इतरांस, दुसऱ्यांस, पाहणाऱ्यांस; **कांहीं ना कीं**—(कांहीं कीं ना) तसें कांहींच दिसत नसतें.

भावार्थ—आकाशाच्या आपल्या निर्मळ व्यापक स्वरूपांत अनेक भरून-सांठून असणाऱ्या पदार्थांच्या योगानें त्याचा मूळचा व्यापकपणाचा बिघाड झालेला, व्यापकपणा संकुचित झालेला दिसला, तरी त्याचा स्वतांचा व्यापकपणा असतो तसाच तो असतो. पाहणारास तसा तो दिसत नाहीं. (पाहणारास तो अडल्यासारखा—संकोचल्यासारखा दिसतो.) ॥ ३८ ॥

कां आंगीं कीं निर्मळपणीं । हारपलिया पोखरणी ।
हें आणिकावांचूनि पाणी । सगळेंचि आहे ॥ ३९ ॥

पदांचा अर्थ—**कां**—अथवा; **आंगीं कीं**—आंगच्या; **निर्मळपणीं**—स्वच्छपणानें असणारी; **पोखरणी**—कमलपुष्पांनीं भरलेली हौदाची पुष्करणी; **हारपलिया**—पुष्पांनीं झांकून गेल्यामुळें; **आणिकावांचूनि**—वर वर पाहणाराखेरीज पाहिलें तर; **हें सगळेंचि**—तें इथून तिथें सर्वच; **पाणी आहे**—पाणीच पाणी आहे.

भावार्थ—किंवा अंगच्या स्वच्छ पाण्याची असणारी पुष्करणी (हौद) कमलपुष्पांनीं आच्छादून गेल्यामुळें वरवर पाहणारासारखें तें न पाहिलें तर तिच्यांत

इथून तिथून सर्व पाणीच पाणी आहे. पाहणारास तें पाणी दिसत नाहीं, तरी तें पाणी पाणीपणानेंच असतें. किंवा वाळूमुळें अंगच्या निर्मळ पाण्यांत झांकून राहिलेलें झऱ्याचें पाणी हें दुसऱ्यास न दिसलें तरी तें सर्व पाणीच असतें. ॥३९॥

आपणा भागु तैसें । असणेंचि जें असे ।
आहे नाहीं ऐसें । सांडोनियां ॥ ४० ॥

पदांचा अर्थ—**आपणा भागु**—आपल्या भागानें, आपल्या स्वरूपानें; **"ऐसें आहे नाहीं"**—असलें असणें—नसणेंपण; **सांडोनियां**—रहित होऊन, सांडून; **तैसें जें असणेंचि**—तसें जें असणेंपण; **(तें तो) असे**—तें तो (आत्मा) असतो.

भावार्थ—त्याप्रमाणें आत्मा आपल्या केवलज्ञानस्वरूपानें सर्व देहभावाच्या अशा "आहे—नाहीं" पणानें रहित असून स्वसंविद्रूप निजात्मपूर्णबोधाच्या असणेंपणानेंच तो असतो. ॥ ४० ॥

निदेचें नाहींपण । निमालियाहि जागेंपण ।
असिजे कां नेण । कोण्ही होऊनि जैसें ॥ ४१ ॥

पदांचा अर्थ—**निदेचें नाहींपण**—झोपेचें संपणें; **निमालियाहि**—नाहींसें झाल्यावरहि; **जागेंपण असिजे**—कांहींशी जागृति उरते, किंचित् जागृति असते; **कां तें नेणपण**—तें भानहि विसरल्यानंतर; **जैसें कोण्ही**—जसें कांहीं एक **जागेंपण; होऊनि असिजे**—एकसारखें असतें, अखंड राहतें, तें निद्राजागृतीहून अगदींच निराळें असतें.

भावार्थ—झोंप अगदीं संपल्यावरदेखील थोड्याशा जागृतीचें भान असतें. पण तेंहि भान गेल्यानंतर कांहीं एक जें जागेंपण उरतें तें नंतर अखंड राहतें. तें निद्रा—जागृतीहून निराळें असून भानरहित असतें. ॥ ४१ ॥

कां भूमि कुंभ ठेविजे । तैं सकुंभता आपजे ।
तो नेलयां म्हणिजे । तेणेंवीण ॥ ४२ ॥

पदांचा अर्थ—**कां**-किंवा; **भूमि**—जमिनीवर; **कुंभ ठेविजे**—घट, भांडें ठेवावें; **तैं**—तेव्हां; **सकुंभता**—घटासहितपणा; **आपजे**—(तिला) प्राप्त होतो; **तो नेलयां**—तो घट तेथून नेल्यावर; **तेणेंवीण**—(ती) त्या घटाविरहित; **म्हणिजे**—म्हणावी.

भावार्थ—किंवा जमिनीवर कुंभ, भांडें ठेवलें असतां तिला 'सकुंभता' प्राप्त होते, व तें काढून नेलें तर तिला 'अकुंभता' प्राप्त होते असें म्हणावें. (हे दोन्ही धर्म कुंभामुळें भूमीवर येतात. तथापि त्यामुळें तिचें मूळ स्वरूप मुळींच बदलत नाहींच). ॥ ४२ ॥

परी दोन्ही हे भाग । न सिवति भूमीचें आंग ।
तेव्हेळीं भूमि तैसें चांग । चोख जें असणें ॥ ४३ ॥

पदांचा अर्थ—**परी**–परंतु; **हे दोन्ही भाग**–सकुंभ–निकुंभ हे दोन्ही भाव, घटासहित व घटाविरहित हे दोन पदार्थ; **भूमीचें आंग**–भूमीच्या मूळच्या स्वरूपाला; **न सिवति**–स्पर्श करीत नसतात, विकार उत्पन्न करीत नाहींत; **तेव्हेळीं**–त्या वेळीं; **भूमि चांग**–भूमि जशी मूळच्या शुद्ध स्वरूपानें असते; **तैसें**–तसेंच; **जें चोख असणें**–आत्म्याचें शुद्ध असणें होय. (ज्ञान–अज्ञान-भेदरहित तें शुद्ध ज्ञानस्वरूप असणें होय.)

भावार्थ—पण सकुंभ–निकुंभ हे दोन्ही भाव भूमीच्या भागास टेकलेले नसतात, त्या वेळची भूमि जशी केवळ शुद्धस्वरूप असते, तसें (ज्ञान–अज्ञान हे मायिक भेद त्यांरहित वर्णनातीत असें) जें चोख, केवळ शुद्ध स्वरूप असतें, तें आत्मस्वरूप होय. ॥ ४३ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे ज्ञान–अज्ञान–भेदकथनं नाम चतुर्थं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवादरूप परब्रह्मपरमात्म्याचें ओतप्रोत वर्णन असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें ज्ञान–अज्ञान–भेदकथन नामक चौथें प्रकरण समाप्त.

या प्रकरणांत अविद्याकार्य असणारें असें हें ' ज्ञान–अज्ञान ', यांनीं रहित केवळ ज्ञानघन परमात्मा अभेदानें कसा ओतप्रोत अतिसूक्ष्मरूपानें सर्वत्र भरून राहिला आहे हें सांगितलें. कारण गुणकार्य जें ' ज्ञान–अज्ञान ', हे धर्म अगदीं आभासरूप असून हे दोन्ही धर्म आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं कालत्रयीं केव्हांहि नसतात हें सिद्ध केलें.

गेल्या तिसऱ्या प्रकरणांत व या चौथ्या प्रकरणांत परमात्मस्वरूप '**अनाख्येयं**' असें जें मंगलाचरणांतील पहिल्या श्लोकांतलें दुसरें पद त्याचेंच विवरण श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं मोठ्या युक्तीनें या दोन्ही प्रकरणांनीं विशद केलें आहे. त्याच श्लोकांतील पहिल्या "**यदक्षरं**" या पदाचें स्पष्टीकरण पहिल्या व दुसऱ्या प्रकरणानें केलें. आतां पुढील या पांचव्या प्रकरणांत "**यत् आनंदं**" या पहिल्या श्लोकांतील तिसऱ्या पदाचें विवरण आलेलें आहे. मूळच्या दहा उपनिषदांचें सार या ग्रंथाच्या पहिल्या पांच संस्कृत श्लोकांत आलेलें जें, त्याचाच विस्तार पुढील दहा प्रकरणांनीं महाराजांनीं केलेला आहे.

प्रकरण पांचवें

सच्चिदानंदपदत्रयविवरण

परमात्मा नित्य निर्विकार, सकलधर्मरहित असा असतांना, श्रुतींनीं त्याचें सच्चिदानंदरूपानें – कुठें तो सद्रूप म्हणजे नित्य अस्तित्वरूपानें असणारा, तर कुठें तो चिद्रूप म्हणजे पूर्ण ज्ञानमय असणारा, तर कुठें तो आनंदरूप असा असतो असें त्याचें वर्णन केलेलें आहे. 'सदेव सोम्य इदमग्र आसीत्' 'सत्यं ज्ञानमनन्तम्' 'प्रज्ञानमानन्दघनम्' अशी श्रुति आहे. यावरून सद्धर्म, चिद्धर्म, आनंदधर्म असे अनेक निरनिराळे धर्म परमात्म्याच्या ठिकाणीं असावेत अशी शंका आली असतां तिचें या प्रकरणांत पूर्ण निरसन केलें आहे, तें कसें तें आपण आतां पाहूं.

प्रथम श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रुतीचा सिद्धान्त काय आहे त्याचें स्वरूप सांगतातः—

सत्ता प्रकाश सुख । या तिहीं उणे लेख ।
जैसें विखपणेंचि विख । विखा नाहीं ॥ १ ॥

पदांचा अर्थ—**सत्ता**–अस्तित्व, असणेंपण; **प्रकाश**–ज्ञान, तेज, चैतन्य; **सुख**–आनंद यांना; (असत्, जड, दुःखरूप जें अज्ञानकार्य) **या तिहीं**–या तिन्हींचे; **उणे**–विरोधी, विरुद्धधर्माचे; **लेख**–असें समज, समजावें; **जैसे**–जसें; **विख**–विष; **विखपणेंचि**–मारकपणानें; **विखा नाहीं**–स्वतां, विषाला नसतें.

भावार्थ—(निर्विकार अशा परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं) सद्रूप, चिद्रूप, आनंदरूप हे तिन्हीहि धर्म व्यर्थ होत. हे धर्म असत्, जड, दुःखरूप अशा या तिहींचे विरोधी आहेत असें समजावें. जसें विष हें स्वतः विषाला मारकपणानें नसतें.

सुबोधविवरण—परमात्मा वर्णनातीत आहे, असें अनेकदां श्रुतींनीं म्हटलें आहे. म्हणून सच्चिदानंद या शब्दाचा प्रयोग तिथें उणा, व्यर्थ आहे. असें जर आहे तर या शब्दांचा मग उपयोग तरी काय, असें म्हटल्यास त्याचें समाधान असें, कीं सत्–चित्–आनंद हे शब्द असत्, जड, दुःखरूप या तिन्ही शब्दांचे

ते उणे,–विरोधी आहेत,–त्यांचे नाशक आहेत असें ठरविण्याकरितां श्रुतींनीं सच्चिदानंद पदांचा प्रयोग केला आहे. कारण शब्दातीत परमात्म्याच्या स्वरूपाच्या ठिकाणीं हीं तिन्ही सच्चिदानंदपदें उणीं ठरतात. जसें विषाला विष हें मारक होत नाहीं, तद्वतच तीं होत. ॥ १ ॥

सद्रूप, चिद्रूप, आनंदरूप असे अनेक धर्म श्रुतिवचनाप्रमाणें परमात्म्याच्या ठिकाणीं असावेत; तर या शंकेचें निरसन करतात कीं, तो तसा अनेक धर्मवान् नसून एकरूपच आहे. त्याचें तें स्वरूप असें:—

कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक येक ।
द्राव गोडी पीयूख । पीयूखचि जेवीं ॥ २ ॥

पदांचा अर्थ—**कांति**–तेज; **काठिण्य**–कठिणपणा; **कनक**–पिवळेपणा; **तिन्ही मिळोनि**–हे तिन्ही मिळून; **कनक येक**–सुवर्ण जसें एक; **द्राव**–पातळपणा; **गोडी**–मधुरता, गोडपणा; **पीयूख**–पांढरेपणा; हें मिळून; **जेवीं**–जसें; **पीयूखचि**–अमृत.

भावार्थ—तेज, कठिणपणा व पिवळेपणा हे तिन्ही मिळून सुवर्ण जसें एक; किंवा पातळपणा, गोडी व पांढरेपणा हे तिन्ही मिळून अमृत जसें एक. ॥ २ ॥

उजाळ दृति मार्दव । या तिहीं तिहीं उणीव ।
हें देखिजे सावेव । कापुरीं एकी ॥ ३ ॥

पदांचा अर्थ—उजाळ–पांढरेपणा; दृति–सुगंध; **मार्दव**–मऊपणा; **या तिहीं**–हे तिन्ही; **तिहीं उणीव**–त्या तिहींनीं (मलिनपणा, दुर्गंध व कठिणपणांनीं) रहित असे; **हें एकीं कापुरीं**–हे एका कापरांत; **सावेव**–मूर्तिमंत, प्रत्यक्ष; **देखिजे**–दिसतात.

भावार्थ—पांढरेपणा, सुगंध, मऊपणा हे तिन्ही मलिनपणा, दुर्गंध, कठिणपणा या तिहींनीं रहित अशा एका कापरांतच मूर्तिमंत दृष्टीस पडतात, दिसून येतात. ॥ ३ ॥

आंगें कीर उजाळ । कीं उजाळ तोचि मवाळ ।
कीं दोन्ही ना परिमळ– । मात्र जें ॥ ४ ॥

पदांचा अर्थ—**आंगें**–आंगचा, मूळचाच, मूळांतलाच; **कीर उजाळ**–अगदीं स्वच्छपणा; **कीं**–आणखी; **उजाळ तोचि मवाळ**–स्वच्छपणा तितकाच

मऊपणा; **कीं दोन्ही ना**–आणि दोन्ही मिळून; **परिमळमात्र जें**–एक सुगंधच केवळ, तें कापूरस्वरूप.

भावार्थ—आंगचा अगदीं जो स्वच्छपणा तोच मऊपणा आणि हे दोन्ही मिळून केवळ एक सुगंधच जसा कापूर. ॥ ४ ॥

ऐसें एके कापूरपणीं । तिन्ही यियें तिन्ही उणीं ।
इयापरी आटणी । सत्तादिकांची ॥ ५ ॥

पदांचा अर्थ—**ऐसें**–अशा रीतीनें; **एके कापूरपणीं**–एका कापरांत, कापूरपणांत, एका कापराच्या स्वरूपांत; **यियें तिन्ही**–हे तीन धर्म; **तिन्ही उणीं**–त्यांच्या विरोधी तिन्ही धर्मरहित जसे एकरूप; **इयापरी**–याप्रमाणें; **सत्तादिकांची आटणी**–सत्तादिकांचें ऐक्य होय.

भावार्थ—याप्रमाणें आपल्या विरुद्ध असणाऱ्या त्या तिन्ही धर्मांनीं रहित असणारे हे तीन धर्म स्वच्छपणा, मऊपणा व सुगंध हे सर्व एका कापूरपणांतल्या सुगंधांत जसे एकवटलेले असतात, तशी सत्तादिकांची म्हणजे सत् तेंच चित् तोच आनंद यांची अशी आटणी, एकरूपता आनंदघन परब्रह्मांत होते. ॥ ५ ॥

वरील ओवींत सत्–चित्–आनंद अशीं निरनिराळीं पदें, असे निराळ्या अर्थाचे शब्द दिसतात खरे, पण त्यांची आटणी त्याचें ऐक्य परमानंदरूपच असतें. त्या ऐक्याच्या पूर्वी तीं पदें भिन्न असल्याचीं दिसतात, तीं कसकशीं हें दाखवून शेवटीं तीं एकरूपच असतात, हें सिद्ध करतातः—

येन्हवीं सच्चिदानंदभेदें । चालिलीं तिन्ही पदें ।
परि तिन्ही उणीं आनंदें । केलीं येणें ॥ ६ ॥

पदांचा अर्थ—**येन्हवीं**–पाहूं गेलें तर, एरवीं; **सच्चिदानंदभेदें**–सत्, चित्, आनंद या भेदानें; **तिन्ही पदें**–हे तीन शब्द; **चालिलीं**–असलेलीं वाटतात; **परि**–परंतु; **येणें आनंदें**–या शब्दातीत परमानंदानें; **तिन्ही**–त्या तिहींना; **उणीं केलीं**–भेदरहित केलें.

भावार्थ—एरवीं पाहिलें तर सत्, चित्, आनंद अशा भेदानें हे तीन शब्द निरनिराळे असलेले दिसतात; परंतु शब्दातीत अशा परमानंदस्वरूपांत ते तिन्हीहि भेदरहित होऊन जातात; भिन्नपणानें नसतातच. ॥ ६ ॥

सत्ताचि कीं सुख प्रकाशु । प्रकाशुचि सत्ता उल्हासु ।
हे न निवडे मिठांशु । अमृतीं जेवीं ॥ ७ ॥

पदांचा अर्थ—**सत्ताचि**–(परमात्मस्वरूपाचा)नित्य असणेंपणा, **कीं**–तोच; **सुख प्रकाशु**–आनंद व ज्ञान; **प्रकाशुचि**–एकज्ञानच; **सत्ता उल्हासु**–असणेंपणा व आनंद; **जेवीं**–जसें; **अमृतीं**–अति गोड पदार्थांतला; **मिठांशु**–(मिठा + अंशु) गोड बिंदु, मधुरपणा; **तेवीं हें न निवडे**–तसेंच हीं निराळीं काढतां येत नाहींत.

भावार्थ—परमात्म्याचा नित्य असणेंपणा हाच आनंद व ज्ञान. त्याचें जें ज्ञानस्वरूप हेंच सत्ता व आनंद. ज्याप्रमाणें अमृतांतली गोडी निराळी काढतां येत नाहीं त्याप्रमाणें सत्ता, प्रकाश आणि उल्हास मिळून सत्-चित्-आनंद हीं एकमेक एकमेकांपासून निरनिराळीं करतांच येत नाहींत. (तीं सर्व नित्य सच्चिदानंद परब्रह्मच होत, निरनिराळीं नाहींत.) ॥ ७ ॥

शुक्लपक्षींच्या सोळा । दिवसा वाढती कळा ।
परि चंद्र मात्र सगळा । चंद्रीं जेवीं ॥ ८ ॥

पदांचा अर्थ–**शुक्लपक्षींच्या**–महिन्यांतल्या पहिल्या पंधरवड्यामध्यें; **सोळा दिवसा**–सोळा दिवसांच्या; **कळा**–सोळा कला; **जरी वाढती**–जरी वाढल्या; **परी जेवीं चंद्र चंद्रीं**–तरीपण चंद्र स्वतांच्या ठिकाणीं; **मात्र सगळा**–अगदीं परिपूर्ण असतो.

भावार्थ—शुद्धपक्षाच्या पहिल्या पंधरवड्यामध्यें सोळा दिवसांत अंवसेची एक व पंधरा दिवसांच्या पंधरा मिळून सोळा कला जरी वाढल्या तरीसुद्धां चंद्र आपल्या स्वतांच्या स्वरूपानें आपल्या ठिकाणीं अगदीं परिपूर्ण असतो, तसाच असतो. ॥ ८ ॥

थेंबीं पडतां उदक । थेंबा धरूं ये लेख ।
परी पडिला ठायीं उदक– । वांचूनि आहे ? ॥ ९ ॥

पदांचा अर्थ—**थेंबीं पडतां उदक**–थेंबाथेंबांनीं पावसाचें पाणी पडतें; **थेंबा लेख**–त्या थेंबांची गणती; **धरूं ये**–करतां आली; **परि**–तरी; **पडिला ठायीं**–ते थेंब पडलेल्या ठिकाणीं; **उदकवांचूनि आहे ?**–पाण्यावांचून दुसरें कांहीं आहे ?

भावार्थ—थेंबाथेंबांनीं पावसाचें पाणी पडतें, त्या थेंबांची गणती करतां आली तरी ते थेंब पडल्याठिकाणीं तिथें पाण्यावांचून दुसरें कांहीं असतें का ? थेंब अनंत असले तरी त्यांच्यांतलें पाणी मात्र एकच. ॥ ९ ॥

तैसें असताचिया व्यावृत्ती । सत् म्हणों आलें श्रुती ।
जडाचिया समाप्ती । चिद्रूप ऐसें ॥ १० ॥

पदांचा अर्थ—**तैसें** तसेंच; **असताचिया**—असत्, अभावरूप, अज्ञान त्याच्या; **व्यावृत्ती**—निरसनासाठीं, नाशासाठीं; **श्रुती सत् म्हणों आलें**—वेदांनीं सत्‌ची योजना केली, सत् असें म्हटलें; **जडाचिया समाप्ती**—चेतन नसलेल्याचा अंत, शेवट; **ऐसें चिद्रूप**—चेतन अशानें.

भावार्थ—तसेंच असत्, अभावरूप पदार्थांचें निरसन करण्यासाठीं, ते खोटे आहेत असें ठरविण्यासाठीं वेदांनीं सत् शब्दाची योजना केली; जड, अचेतनांचा निकाल, अगदीं शेवट चिद्रूप अशा चेतन शब्दानें केला. ॥ १० ॥

दुःखाचेनि सर्वनाशें । उरलें तें सुख ऐसें ।
निगदिलें निश्वासें । प्रभूचेनि ॥ ११ ॥

पदांचा अर्थ—**दुःखाचेनि सर्वनाशें**—दुःखाचा सर्वनाश झाला असतां; **जें उरलें तें सुख**—जें उरतें, तें सुख; **ऐसें प्रभूचेनि निश्वासें**—ईश्वरप्रभूच्या निःश्वासानें, वेदानें; **निगादिलें**—वर्णन केलें आहे.

भावार्थ—दुःखाचा सर्वनाश झाला असतां उरतें तें सुख, असें प्रभूच्या निःश्वासापासून झालेल्या वेदानें वर्णन केलें आहे, म्हटलें आहे—"यस्य निःश्वसितं वेदः" या श्रुतिवचनानुरूप "ज्या ईश्वरप्रभूच्या श्वासासारखें परेतलें जें स्फूर्तिरूप, ते वेद होत." ॥ ११ ॥

ऐसीं सदादि प्रतियोगियें । असदादि तिन्ही इयें ।
लोटितां जालीं त्रायें । सत्तादिकां ॥ १२ ॥

पदांचा अर्थ—**ऐसीं सदादि**—अशीं हीं सत् इत्यादिकांचीं; **इयें प्रतियोगियें**—हीं विरुद्ध धर्माचीं असणारीं; **तिन्ही असदादि**—तिन्ही असत् इत्यादींना; **लोटितां**—नाहींसें करण्यापुरतें; **या सत्तादिकां**—या सत्—चित्—आनंदांना; **त्रायें जालीं**—त्राण, अस्तित्व उरलेलें.

भावार्थ—अशीं हीं सत्—चित्—आनंद यांच्या विरुद्ध धर्माचीं जीं हीं तीन असत्, जड, दुःखरूप या तिन्हींना नाहींसें करण्यापुरतेंच या सत्तादिकांना त्राण म्हणजे अस्तित्व उरतें. अशीं सदादिकांचीं विरुद्ध स्वरूपाचीं असदादि हीं यांचा अभाव करण्यापुरतेंच या सदादिकांना अस्तित्व असतें. त्यांचा अभाव होतांच हींहि उरत नाहींत. ॥ १२ ॥

एवं सच्चिदानन्दु । आत्मा हा ऐसा शब्दु ।
अनन्यावृत्तिसिद्धु । वाचक नव्हे ॥ १३ ॥

पदांचा अर्थ—एवं–अशा प्रकारानें; **आत्मा सच्चिदानन्दु**–परमात्मा सत्, चित् व आनंदमय आहे; **हा ऐसा शब्दु**–हें असें वेदवचन; **अनन्य + आवृत्ति + सिद्धु = अनन्य**–अभावरूप पदार्थांचें; **व्यावृत्ति**–निराकरण; **सिद्धु**–सिद्ध करण्यांतच, ठरविण्यांतच (होय); **वाचक नव्हे**–ब्रह्मवस्तुवाचक नव्हे, वस्तुवाचक नव्हे, परमात्मस्वरूपाचें वर्णन करणारें नव्हे; किंवा **अनन्य + आवृत्ति + सिद्धु = अनन्य**–ऐक्याचें; **आवृत्ति**–स्वरूप; **सिद्धु**–सिद्ध करणारा; **नव्हे**–सच्चिदानंदपदाच्या ऐक्याचें स्वरूप सिद्ध करणारा नव्हे.

भावार्थ—याप्रमाणें परमात्मा सच्चिदानंदरूप आहे असें श्रुतिवचन, तें अभावरूप अशा अज्ञानरूप पदार्थांचें निरसन सिद्ध करण्यासाठीं आहे.– वस्तु जो परमात्मा त्याचें "वाचक" वर्णन करणारें म्हणून नव्हे. ॥ १३ ॥

सूर्याचेनि प्रकाशें । जें कांहीं जड आभासे ।
तया तो गिंवसे । सूर्य कायी ॥ १४ ॥

पदांचा अर्थ—सूर्याचेनि प्रकाशें–सूर्याच्या प्रकाशानें; **जें कांहीं जड**–जे कोणतेहि काळोखे पदार्थ; **आभासे**–प्रकाशित होतात; **तो सूर्य**–सर्व प्रकाशक तो सूर्य; **तया**–त्या जडांकडून; **गिवंसे कायी**–शोधून काढला जाईल, धुंडला–प्रकाशला जाईल काय?

भावार्थ—सूर्याच्या प्रकाशानें सर्व कांहीं काळोखांत असणारे पदार्थ प्रकाशले जातात. पण तो सर्वप्रकाशक सूर्य त्या काळोख्यांच्याकडून धुंडाळला, शोधून काढला जाईल काय? ॥ १४ ॥

तेवीं जेणें तेजें । वाचेसि वाच्य सुजे ।
तें वाच्या प्रकाशिजे । हें कें आहे ॥ १५ ॥

पदांचा अर्थ—**तेवीं**–तसेंच; **जेणें तेजें**–ज्याच्या बळानें; **वाचेसि**–वाणीला; **वाच्य**–शब्द; **सुजे**–सुचतात; **ते**–ती वाणी; **वाच्या**–ज्या उच्चार करविणाराला, परमात्म्याला; **प्रकाशिजे**–प्रकट करील, त्याचें ज्ञान करून देईल; **हें कें आहे**–असें कोठें आहे?

भावार्थ—तसेंच ज्या परमात्म्याच्या बळानें वाणीला शब्द बोलतां येतात, ती त्या शब्द बोलविणाराचें वर्णन करील, हें कधीं तरी शक्य आहे का? ॥१५॥

ती वाणी परमात्म्याचें वर्णन करूं कां शकणार नाहीं, हें सिद्ध करतात—

विषो नाहीं कोण्हाही । जया प्रमेयत्वाचि नाहीं ।
तया स्वप्रकाशा काई । प्रमाण होय ॥ १६ ॥

पदांचा अर्थ—**कोण्हाही** (जो)—जो परमात्मा कोणालादेखील; **विषो नाहीं**—गम्य नाहीं, समजणारा नाहीं; **जया प्रमेयत्वाचि नाहीं**—ज्याला ठरीव असें स्वरूपच नाहीं; **तया स्वप्रकाशा**—त्या अशा स्वयंज्ञानरूपाला; **काई प्रमाण होय**—जाणण्याचें निश्चित साधन कांहीं होईल का ?

भावार्थ—परमात्मा हा कोणालाहि समजणारा नाहीं; कारण ज्याचें निश्चित असें स्वरूपच ठरवितां येत नाहीं, त्या अशा स्वतांच ज्ञानस्वरूपाला दुसरें जाणणारें असें साधन कांहीं होईल का ? ॥ १६ ॥

शास्त्रानें जरी एखाद्या पदार्थाचें निश्चित स्वरूप असें जें प्रमेय—तें ठरविण्याकरितां कांहीं साधनें, **प्रमाणें**—ज्यांचें **इन्द्रियद्वारां ज्ञान होतें** अशीं ठरविलीं असतात. **तीं प्रमाणें** सहा आहेत. प्रत्यक्ष, अनुमानं, शब्द, उपमान, अर्थापत्ति, अनुपलब्धि. त्यांत शेवटच्या तिन्ही प्रमाणांचा अन्तर्भाव पहिल्या तिहींत होतो. धूम—धूर, डोळ्यांनीं पाहणें, हें **प्रत्यक्ष** प्रमाण; त्या धुरावरून अग्नीची कल्पना करणें, हें **अनुमान**—(यत्र धूमस्तत्र वन्हिः); **शब्दप्रमाण**—"अहो तुम्हांला पुत्र झाला," अशा दुसऱ्या ठिकाणच्या बातमीविषयींचा निश्चय; इथें प्रत्यक्ष व अनुमान हींहि नसतात. गाईसारखीच वनगाय असते—(गोसदृशं गवयं) हें **उपमान**; दिवसा भोजन न करितांहि दिसणारी एखाद्याची पुष्टता, तीवरून तो रात्रीं जेवतो, ही **अर्थापत्ति**—(दिवा न भुंक्ते यदि अयं पीनः रात्रौ स भुंक्ते स्यात्). अशीं प्रमाणें असलीं तरी तीं सर्व इन्द्रियगोचर अनात्म, जड आहेत. आत्मा इन्द्रियातीत चेतन, ज्ञानस्वरूप आहे.॥१६॥

तेंच श्रीज्ञानराज सांगतात कीं परमात्मस्वरूप कोणत्याहि प्रमाणांनीं सिद्ध होत नाहीं. कसें तें पहाः—

प्रमेयपरिच्छेदें । प्रमाणत्व नांदे ।
तें कायि स्वतःसिद्धें । वस्तूचा ठाईं ?॥ १७ ॥

पदांचा अर्थ—**प्रमेयपरिच्छेदें**—(प्रमेय + परिच्छेदें) प्रमेयाला, सिद्धान्ताला मर्यादा घालण्यांत; **प्रमाणत्व नांदे**—प्रमाणपणा राहतो, सार्थ होतो

स्वतःसिद्ध वस्तूच्या ठायीं–स्वयंसिद्ध आत्म्याच्या ठिकाणीं; तें कायि–तें चालेल का, टिकेल काय ?

भावार्थ—सिद्धान्तरूपानें असणाऱ्या अशा प्रमेयाला मर्यादित करण्यांत, त्याला निश्चित करण्यांत प्रमाण राहूं शकेल, टिकेलहि. पण स्वयंसिद्ध आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं हें कितपत राहूं शकेल, तें तेथें टिकेल काय ? ॥ १७ ॥

एवं वस्तूसि जाणों जातां । जाणणेंचि वस्तु तत्त्वतां ।
मग जाणणें आणि जाणतां । कैंचा उरे ॥ १८ ॥

पदांचा अर्थ—एवं–अशा प्रकारें; वस्तूसि–परमात्म्यास; जाणों जातां–जाणावयास गेलें असतां; जाणणेंचि–ज्ञानस्वरूपच; वस्तु तत्त्वतां–आत्मा मूळचा; मग–तर; जाणता आणि जाणणें–ज्ञाता आणि ज्ञान; कैंचा उरे–कसे निराळे उरतील, असतील बरें ?

भावार्थ—अशा प्रकारें परमात्मस्वरूपास निराळेपणानें जाणावयास गेलें, तर मुळांत आत्मा बोधस्वरूपच जर, मग तेथें ज्ञाता, ज्ञान हीं दोन द्वैतरूपें कशीं राहूं शकतील ? तीं तेथें उरतील तरी का ? ॥ १८ ॥

म्हणोनि सच्चित्सुख । हे बोल वस्तुवाचक ।
नव्हती हे शेष । विचाराचे ॥ १९ ॥

पदांचा अर्थ—म्हणोनि–म्हणून; सच्चित्सुख बोल–सच्चित्सुख हे शब्द, हा शब्दसमुदाय; वस्तुवाचक–परमात्मस्वरूपाचें यथार्थ वर्णन करणारे; नव्हती–नाहींत; हे विचाराचे शेष–हाच निर्णयाचा शेवट होय.

भावार्थ—म्हणून सच्चित्सुख हे तीन शब्द वस्तुवाचक परमात्म्याचें वर्णन करणारे नाहींत, हीच विचाराची अखेर होय. हाच विवेकाचा निर्णय ठरतो, विवेक तेथें संपतो. ॥ १९ ॥

याच सच्चिदानंदपदाचा आणखी स्पष्ट खुलासा करतात तो असाः—

ऐसेनि इयें प्रसिद्धें । चालिलीं सच्चिदानंदपदें ।
मग द्रष्टया स्वसंवाद्यें । भेटती जेव्हां ॥ २० ॥

पदांचा अर्थ—ऐसेनि–अशा तऱ्हेनें; इयें प्रसिद्धें चालिलीं–हीं वेदांतील वर्णन केलेलीं; सच्चिदानंदपदें–हे सत् चित् आनंद शब्द; जेव्हां मग–ज्या वेळीं; द्रष्टया–(स्वरूपाची ओळख करून घेणाऱ्या) ज्ञान्याला; स्वसंवाद्यें–स्वसंवेद्याशीं;

भेटती–भेटवितात; (जीवाला स्वसंवेद्य परमात्मस्वरूपाशीं तादात्म्य, ऐक्य करून देतात जेव्हां).

भावार्थ—अशीं हीं श्रुतीनें वर्णिलेलीं सच्चिदानंदपदें, हे शब्द मग ज्या वेळीं ज्ञानी मुमुक्षूला स्वसंवेद्य परमात्मस्वरूपाशीं तादात्म्य, ऐक्य करवितात तेव्हां— ॥ २० ॥

ते वेळीं वरिसोनि मेघु । समुद्र होऊनि वोघु ।
सरे, दाऊनि मागु । राहे जैसा ॥ २१ ॥

पदांचा अर्थ—**ते वेळीं**–त्या वेळेस; **मेघु वरिसोनि**–मेघ वर्षाव करून नदीचा ओघ बनून समुद्रास मिळून; **सरे**–संपतो; **जैसा**–जसा; **मागु**–शोध; **दाऊनि**–हरवलेली वस्तु दाखवून; **राहे**–थांबतो.

भावार्थ—त्या वेळेस मेघ वर्षाव करून ओघ बनून समुद्रास मिळून संपतो; माग हरवलेल्या पदार्थाचें ठिकाण दाखवून थांबतो, संपतो. ॥ २१ ॥

फळ विऊनि फुळ सुकें । फळनाशें रसपाकें ।
तोही रस उपखे । तृप्तिदानीं ॥ २२ ॥

पदांचा अर्थ—**फूल फळ विऊनि**–फूल फळाला उदयास आणून, उत्पन्न करून; **सुकें**–सुकतें; **फळनाशें**–फळाच्या रूपांतरानें; **रसपाकें**–रस पूर्ण होतो; **तोही रस**–तो पक्का रस; **तृप्तिदानीं**–जीवाला तृप्त करून, तृप्ति देऊन; **उपखे**–नष्ट होतो.

भावार्थ—फूल फळाला उत्पन्न करून कोमेजून जातें; फळांचें रूपांतर रस पूर्ण होण्यांत होतें. तो रसहि जीवाला तृप्त करून नाहींसा होतो, तृप्ति देऊन जिरतो. ॥ २२ ॥

कां आहुति अग्नी आंतु । घालूनि वोसरे हातु ।
सुख चेवऊनि गीतु । उगा राहे ॥ २३ ॥

पदांचा अर्थ—**कां**–किंवा; **अग्निआंतु**–अग्नीमध्यें; **आहुति घालूनि**–भाताच्या गोळ्या टाकून; **हातु ओसरे**–हात थांबतो; **गीतु**–गाणें, गीत; **सुख चेवऊनि उगा राहे**–आनंद उत्पन्न करून संपतें.

भावार्थ—किंवा अग्नींत आहुति देऊन हात थांबतो; गाणें सुख उत्पन्न करून संपतें, थांबतें. ॥ २३ ॥

नाना मुखा मुख दाउनी । आरिसा जाय निगोनी ।
कां निदैलें चेववुनी । चेवावितें जैसें ॥ २४ ॥

पदांचा अर्थ—नाना–अथवा; मुखा मुख दाउनी–चेहऱ्याला चेहरा दाखवून; आरिसा निगोनी जाय–आरसा हा दूर होतो; कां–अथवा; चेवावितें–जागे करणारें; निदैलें–निजलेल्यास; चेववुनी–जागे करून जसें जातें.

भावार्थ—चेहऱ्याला चेहरा दाखवून आरसा दूर होतो; किंवा निजलेल्यास उठवून जागें करणारें निघून जातें. ॥ २४ ॥

तैसा सच्चिदानंदा चोखटा । दाऊनि द्रष्टया द्रष्टा ।
तिन्ही पदें लागती वाटा । मौनाचिया ॥ २५ ॥

पदांचा अर्थ—तैसा–तसेंच; सच्चिदानंदा तिन्ही चोखटापदें–सच्चिदानंद हे तीन उत्तम शब्द; द्रष्टया–द्रष्टयाला, मुमुक्षु ज्ञान्याला; द्रष्टा दाऊनि–यथार्थ परमात्मस्वरूपाचें दर्शन घडवून; मौनाचिया–शब्दरहित; वाटा लागती–स्थितीला प्राप्त होतात.

भावार्थ—तसेंच सत् चित् आनंद हे तीन उत्तम शब्द मुमुक्षु ज्ञान्याला परमात्मस्वरूपाचें यथार्थ दर्शन घडवून आपण शब्दरहित स्थितीला प्राप्त होतात, निवृत्त होतात; परमात्मस्वरूप दाखवून देऊन, परमात्मस्वरूपाची ओळख करून देऊन त्या स्वरूपाचें ज्ञान करून देऊन मौनानें ते परततात. ॥ २५ ॥

हें सच्चिदानंदशब्दातीत परमात्मस्वरूप कसें आहे व तेथपर्यंत हे जड, अचेतन शब्द कसे पोहोंचूं शकत नाहींत, तें आणखी दृष्टान्तानें स्पष्ट करतात—

जें जें बोलिजे तें, तें नव्हे । होय तें तव न बोलवे ।
साउलीवरी न मववे । मवितें जैसें ॥ २६ ॥

पदांचा अर्थ—जें जें बोलिजे– जें जें बोलून दाखविण्यांत येतें; तें तें नव्हे–तें बोलणें तें आत्मस्वरूप नव्हे; जें होय–जें आत्मस्वरूप आहे; तें तंव न बोलवे होय–तें तर बोलवलें जात नाहीं, तें शब्दानें वर्णन करवत नाहीं; जैसें–जसें; साउलीवरी–सावलीवरून; मवितें–स्वतांची मोजणी, माप; न मववे–मोजतां येत नाहीं, मापतां येत नाहीं.

सविवरण भावार्थ—जें जें शब्दानें वर्णन केलें जातें, तें वर्णन त्याचें त्या आत्मस्वरूपाचें होत नाहीं; तें आत्मस्वरूप तर बोललें जात नाहीं, तें बोलवलें जात नाहीं; जसें सावलीवरून आपलें अंग मोजतां येत नाहीं. शब्दातीत

असणाऱ्या शुद्धचेतन आत्मस्वरूपाचें वर्णन तंतोतंत वेदांतल्या या सच्चिदानंद-पदानें होऊं शकत नाहीं. शाखेच्या डहाळीच्या टोंकाला असणाऱ्या एका पानाच्या सुईसारख्या अग्रानें प्रतिपदेच्या चंद्राचें दर्शन दुरून होतें; तद्वत् उपनिषदांतील वाक्यांनीं, सच्चिदानंद असल्या अचेतन पदांनीं चेतनआत्म-स्वरूपाचें सूक्ष्म दिग्दर्शन केलें जातें. ॥ २६ ॥

मग आपलिया कडे । मवितया से पडे ।
तैं लाजहिला जो, आंखुडे । मविती जैसी ॥ २७ ॥

पदांचा अर्थ—मग–नंतर, जेव्हां; **मवितया**–मोजणाराला; **आपलिया-कडे**–आपल्या स्वतांकडची; **से पडे**–आठवण होते, लक्ष जातें; **तैं**–तेव्हां; **जो लाजहिला**–जो लाजल्यामुळें; **जैसी**–जशी; **मविती**–मोजणी; **आंखुडे**–बंद पडते, आंखडते, थांबते.

भावार्थ—नंतर मोजणाराला आपल्या शरीराची आठवण होते, तेव्हां तो इतका लाजलेला, इतका खजील होतो कीं, ती मोजणी जशी आपोआप बंद पडते. ॥ २७ ॥

त्याप्रमाणें परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं '**सच्चिदानंद**' हे शब्द अभाव-रूप कसे तें सांगतातः—

तैसी सत्ताचि स्वभावें । असत्ता तव नव्हे ।
मा सत्तात्व संभवे । सत्तेसि काय ॥ २८ ॥

पदांचा अर्थ—**तैसी**–तशीच; **स्वभावें**–मूळचेंच; **सत्ताचि**–जें सत्स्वरूप तें; **असत्ता**–असत्, अनात्मपदार्थ, अभावरूप; **तंव नव्हे**–तर मुळींच नाहीं; **मा**–मग; **सत्तात्व**–सत्ता हें नांव; **सत्तेसि**–सत्स्वरूपाला; **संभवे काय**–संभवेल काय; शक्य होईल काय ?

भावार्थ—तसें मूळचेंच सद्रूप असणारें, तें अभावरूप तर मुळींच नाहीं; मग अशा सद्रूप स्वरूपाला तें सद्रूपपणानें असतें असें म्हणणें, सत्तेला '**सत्ता**' म्हणणें संभवेल काय ? ॥ २८ ॥

आणि अचिदाचेनि नाशें । आलें जें चिन्मात्रदशे ।
आतां चिन्मात्राचि मा कैसें । चिन्मात्रीं इये ? ॥ २९ ॥

पदांचा अर्थ—**आणि**–आणखी; **अचिदाचेनि नाशें**–जडाचें निरसन करण्यानें; **जें चिन्मात्रदशे आलें**–'चित्' या नांवास जें पात्र झालें; **आतां**–

मग; इये चिन्मात्रीं–या मूळच्या ज्ञानघनास तें; चिन्मात्रचि–ज्ञानघन आहे; मा कैसें–हें म्हणणें कसें शक्य होईल, कसें संभवेल ?

भावार्थ—जें अचेतनाचें निरसन करण्यासाठीं चिद्घन या नांवाला आलें मग अशा या मूळच्या ज्ञानमयास तें ज्ञानघन आहे, असें म्हणणें कसें संभवेल ? ॥ २९ ॥

नीद प्रबोधाचा ठायीं । नसे तैसें जागणेंही ।
तेवीं चिन्मात्रचि मा काई । चिन्मात्रीं इये ॥ ३० ॥

पदांचा अर्थ—प्रबोधाचा ठायीं–पूर्ण जाग्रतींत; नीद तैसें जागणेंही–झोंप तसें जागणेंहि; नसे–नसतें; तेवीं–तसेंच; इये चिन्मात्रीं–केवळ ज्ञानघन-स्वरूपाच्या ठिकाणीं; हे 'चिन्मात्रचि' मा काई–हें ज्ञानघन आहे, असें म्हणणें मग संभवेल काय ?

भावार्थ—पूर्ण जागेपणांत जसें झोंपेचें तसेंच जागें असल्याचें भान नसतें. तसेंच केवल ज्ञानघन एकच एक अशा पूर्ण चिन्मात्रस्वरूपाला हें तें 'चिन्मात्र' असें म्हणणें मग कसें संभवेल ? ॥ ३० ॥

ऐसें यया सुखपणें । नाहीं दुःख कीर होणें ।
मा सुख हें गणणें । सुखासि काई ॥ ३१ ॥

पदांचा अर्थ—ऐसें यया सुखपणें–असें ज्याचें ठिकाणीं केवळ सुखच; दुःख–दुःखाचा संबंध; कीर होणें नाहीं–जेथें अगदींच नाहीं; मा सुखासि–मग अशा सुखास 'हें सुख', हें सुख आहे; गणणें काई–असें म्हणावें का ? असें म्हणतां येईल काय ?

भावार्थ—ज्या परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं केवळ असें जें सुखच सुख, दुःखसंबंध जेथें मुळींच नाहीं, अशा पूर्ण सुखमयस्वरूपास हें सुख आहे असें समजणें, संबोधणें तेथें चालेल काय, खपेल काय ? ॥ ३१ ॥

म्हणोनि सदसदत्वें गेलें । चिदचिदत्वें मावळलें ।
सुखासुख जालें । कांहीं ना कीं ॥ ३२ ॥

पदांचा अर्थ—म्हणोनि–म्हणून; सदसदत्वें = (सद् + असदत्वें) = असदत्वें–जें असत्पणानें त्याबरोबर, अभावाबरोबर; सद्–सत्; गेलें–संपलें; चिदचिदत्वें–(चिद् + अचिदत्वें) = अचिदत्वें–जें अचित्, जड, त्याबरोबर; चिद्–चित्, हें मावळलें–अस्त पावलें, लयास गेलें; सुखासुख–(सुख+असुख)–

असुख–दुःखाला सुखानें नाहींसें केलें; कांहीं ना कीं–कीं कांहींना, कांहींच उरलें नाहीं.

साविवरण भावार्थ—म्हणून सत् हें पद, हा शब्द असत् या पदास घेऊन नाहींसा झाला; चित् हें अचित् यासह लय पावलें; सुख म्हणजे आनंद हें पद दुःखाला नाहींसें करून स्वतांहि उरलें नाहीं. अशा रीतीनें सापेक्ष असें एकमेकांच्या अस्तित्वानें असणारें असें कांहींच शिल्लक राहात नाहीं.

केवळ स्वतःसिद्ध स्वयंज्ञानमय असा शब्दातीत परमात्माच अवशेष राहतो.

तात्पर्य कीं मुमुक्षुजनांस शब्दातीत जें वेदांना अगम्य असें त्या परमात्मस्वरूपाचें ज्ञान नाहीं म्हणून तें ज्ञान करून देण्यासाठीं हीं वेदांतील योजिलेलीं सच्चिदानंदपदें त्यांच्या विरोधी असणारे जगत् व जगतांतील उत्पन्न झालेले सर्व पदार्थ हे असत् (अभावरूप) जड व दुःखरूप आहेत असें सिद्ध करण्यापुरतींच तीं असून जीव हा परम आनंदमय आहे असें त्यास ज्ञान करून देऊन हीं पदें मग उरत नाहींत. फक्त अज्ञानाची निवृत्ति करण्यापुरतींच तीं पदें आहेत. पण सर्वत्र परब्रह्म परमात्माच आहे हें ज्ञान तीं प्रत्यक्ष करून देत नाहींत. ॥ ३२ ॥

हेंच परमात्मस्वरूप द्वैतरहित एकपणानें कसें सर्वत्र ओतप्रोत आहे, तें सांगतातः—

आतां द्वंद्वाचें लवंचक । सांडूनि दुणीचें कंचुक ।
सुखमात्राचि एक । स्वयें आथी ॥ ३३ ॥

पदांचा अर्थ—आतां–यानंतर; द्वंद्वाचें–द्वैताचें, भेदाचें, जोडीनें असणारे एकमेकांचें विरोधी असे; दुणीचें–दुहेरी; लवंचक–लवचिक, पोकळ; कंचुक–आच्छादन, वस्त्र, काचोळी, आवरण; स्वयें–स्वरूपानें; एकसुखमात्राचि–एकच एक केवळ सुखमयच; आथी–आहे.

भावार्थ—यानंतर आतां हें द्वैताचें दुहेरी पोकळ आच्छादन नाहींसें होऊन तें स्वरूप केवळ सुखमयच एकच एक असतें. असत्, जड, दुःख यांची निवारक सत्, चित्, आनंद ही द्वैताची पोकळ, आभासात्मक जोडी, तिचें आवरण नाहींसें होऊन आतां निजस्वरूपानें केवळ एकच एक सुखच सुख उरतें. ॥ ३३ ॥

आतां हें एकपण कसें असतें तें श्रीज्ञानेश्वरमहाराज स्पष्ट करीत आहेतः—

वरी एकपणें गणिजे । तें गणितेंनसीं दुजें ।
म्हणोनि हें न गणिजे । ऐसें एक ॥ ३४ ॥

पदांचा अर्थ—वरी–आणखी; एकपणें–हें 'एक' असें; **गणिजे**–गणलें असतां, म्हटलें तर; **तें**–एक; **गणितेंनसीं**–मोजणारासकट, गणणारासकट; **दुजें**–दोन, दुसरें, (होतें); **म्हणोनि**–म्हणून, यांमुळें; **हें**–परमात्मस्वरूप; **न गणिजे**–न गणतां येण्यासारखें; **ऐसें एक**–असें 'एक' आहे.

भावार्थ—आणखी हें परमात्मस्वरूपच 'एक' असें गणलें असतां तें गणणारासकट दोन होतें, द्वैतरूप होतें. एवढ्याकरितां हें न गणतांयेण्यासारखें असें एक आहे. ॥ ३४ ॥

तैसें सुखाआंतोनि निघणें। तें सुखियें सुखी तेणें।
हें सुखमात्रचि, मा कोणे। अनुभवावें ॥ ३५ ॥

पदांचा अर्थ—**तैसें**–तसें; **सुखाआंतोनि**–सुखाच्या अनुभवांतून; **निघणें**–अनुभवून निघणारें; **तें**–असें कोणी; **तेणें सुखिये**–त्या सुखानें; **सुखी**–सुखी होईल; **हें**–आत्मस्वरूप; **सुखमात्रचि**–केवळ सुखमयच तें; **मा**–मग; **कोणे अनुभवावें**–तें कोणास अनुभवतां येईल.

भावार्थ—तसें द्वैतांतल्या सुखाच्या अनुभवांतला अनुभव घेऊन निघणारा असा कोणी तो त्या सुखानें सुखी होईल. पण हें सर्वव्यापी एकमय परमात्मस्वरूप केवळ सुखघनच असल्यानें मग (त्या स्वरूपाहून निराळेंपणानें राहून) याचा अनुभव कोणास घेतां येईल काय? ॥ ३५ ॥

जैं प्रकृति डंकु अनुकरे। तैं प्रकृति डंकें अवतरे।
मा डंकुचि तैं भरे। कोण कोणा ॥ ३६ ॥

पदांचा अर्थ—**जैं**–जेव्हां; **प्रकृति**–एखाद्या व्यक्तीस; **डंकु**–एखादा दंश, चावा; **अनुकरे**–घडतो, चढतो, होतो; **तैं**–त्या वेळीं; **प्रकृति**–ती व्यक्ति; **डंकें**–दंशानें; **अवतरे**–व्याकूळ होते, घुमते; **मा**–मग पण; (**जैं**)–जर; **डंकुचि**–(एकला) दंशच, (असेल); **तैं**–तेव्हां, तर; **कोण कोणा भरे**–कोणी कोणास चावावें?

भावार्थ—जेव्हां एखाद्या व्यक्तीस एखादा दंश घडतो, तेव्हां ती व्यक्ति त्या दंशानें व्याकुळ होते. पण जर दंशच एकला असेल, तर मग कोण कोणास दंश करील, डसेल? ॥ ३६ ॥

तैंसे आपुलेनि सुखपणें। नाहीं जया सुखावणें।
आणि नाहीं हेंही जेणें। नेणिजे सुखे ॥ ३७ ॥

पदांचा अर्थ—**तैसें**–तसेंच; **आपुलेनि सुखपणें**–स्वतांच सुखस्वरूप असल्यामुळें; **जया सुखावणें नाहीं**–ज्याला सुखी होणें नाहीं; **आणि तें नाहीं**–आणि (तें) नाही; **हेंही**–हें सुद्धां; **जेणें सुखें**–ज्या मूळच्या सुखमयतेमुळें; **नेणिजे**–कळत नसतें, ज्ञान नसतें, जाणीव नसते, भान नसतें.

भावार्थ—तसेंच आपल्या स्वतांच्या ठिकाणच्या सुखमयतेमुळें ज्याला इतर अन्य सुखानें सुखी व्हायचें नसतें, आणि सुख नाहीं ही देखील ज्या सुखांत आठवण नसते, त्याचें ज्ञानहि पण तेथें नसतें. ॥ ३७ ॥

आरिसा न पाहतां मुख । स्वयें सन्मुख ना विन्मुख ।
तेवीं नसोनि सुखासुख । सुखचि जें ॥ ३८ ॥

पदांचा अर्थ—**आरिसा**–आरशांत; **न पाहतां**–पाहिलें नाहीं तर; **स्वयें मुख**–स्वतां मुख हें; **सन्मुख ना विन्मुख**–समोर नसतें व पाठीमोरें नसतें; **तेवीं**–तसेंच; **जें सुखासुख नसोनि**–(सुख + असुख)–जें सुख किंवा दुःख हें नसून; सुखदुःखरहित; **सुखचि**–तें केवळ सुखघनच.

भावार्थ—आरशांत न पाहतां मुख हें स्वतांसमोर किंवा पाठीमोरें नसतें; तसें जें सुखदुःखरहित केवळ सुखघनच अर्थे आत्मस्वरूप होय. ॥ ३८ ॥

सर्व सिद्धान्ताचिया उजरिया । सांडोनियां निदसुरिया ।
आपुलिया हात चोरिया । आपणचि जो ॥ ३९ ॥

पदांचा अर्थ—**सर्वसिद्धान्ताचिया**–सर्व शास्त्रांच्या सिद्धान्तांतील. शास्त्रांतल्या निर्णयांतील; **निदसुरिया**–अज्ञाननाशक; **उजरिया**–चातुर्यास; **सांडोनिया**–सोडून, न आकळून; **आपुलिया**–आपल्या ठिकाणी; **हातचोरिया**–स्वतांस उरवून, स्वतांचा हात राखून, स्वस्वरूपानें उरून (जो स्वतांच्या हाताला सांपडत नाहीं असा); **आपणाचि जो**–जो आपण एकलाच असतो.

सविवरण भावार्थ—सर्व शास्त्रांतील निर्णयांतल्या अज्ञाननाशक चातुर्यास-ज्ञानास न आकळून, आकलन न होतां जो परमात्मा आपल्या ठिकाणीं स्वतांचा हात राखून म्हणजे स्वरूपानें उरून आपण आपलाच एकपणानें असतो.

परमात्मस्वरूपाचा वेदान्तशास्त्रानें विचार केला असला तरी त्यांतला शेवटचा निर्णय कीं परमात्मस्वरूपाचें ज्ञान कोणत्याहि शब्दशास्त्रानें होत नाहीं. "त्रैगुण्यविषया वेदाः"–वेद त्रिगुणांचेंच वर्णन करणारे आहेत. म्हणून "निस्त्रैगुण्यो भवार्जुन." "अर्जुना, तूं मात्र गुणातीत स्वरूप हो," असें भगवद्वचन आहे.

वेद व वेदान्तशास्त्रें अनात्मपदार्थांचाच विचार करणारीं, अज्ञान निरसणारीं आहेत म्हणून शास्त्रकार, श्रुति, हीं सर्व इतकी खटपट करीत असतां तितक्यांनाहि हात चोरून, आकलन न होऊन जो परमात्मा आपण आपलेपणानेंच असतो.॥ ३९॥

परमात्मा आपला आपणच एकरूप कसा असतो तें आतां दृष्टान्तांनीं अगदीं स्पष्ट करतातः—

न लवितां ऊंसू । तैं जैसेनि असे रसु ।
तेथिंचा मीठांशु । तोचि जाणे ॥ ४० ॥

पदांचा अर्थ—**ऊंसु**–ऊंस; **न लवितां**–न लावतां; **तैं**–तेव्हां; **जैसेनि रसु असे**–ज्या रीतीनें रस असतो; **तेथिंचा**–तेथला; **मीठांशु**–गोडी, गोडपणा; **तोचि जाणे**–त्याचा तोच जाणतो.

भावार्थ—ऊंस लावला नसतांना तो उत्पन्न होण्यापूर्वी त्या वेळचा रस जो असतो, त्यांतला तो गोडपणा तोच जसा जाणतो. ॥ ४० ॥

कां न सज्जितां विणा । तो नादु जो अबोलणा ।
तया तेणेंचि जाणा । होआवें लागे ॥ ४१ ॥

पदांचा अर्थ—**कां**–किंवा; **विणा न सज्जितां**–वीणा तयार करण्याचेपूर्वी; **तो जो अबोलणा नादु**–तो जो न उठणारा, न उमटणारा नाद; **तया तेणेंचि**–त्याला त्यानेंच; **जाणा**–जाणणारें; **होआवें लागे**–व्हावें लागतें.

भावार्थ—किंवा विणा लावण्याचें पूर्वी त्याचा तो जो न उमटलेला नाद, त्याला त्यानेंच (त्या नादाला त्या नादानेंच) जाणणारें व्हावें लागतें; त्यानेंच स्वतांला जाणावयाचें असतें. ॥ ४१ ॥

नाना पुष्पाचिया उदरा । न येतां पुष्पसारा ।
आपणचि भंवरा । होआवें पडे ॥ ४२ ॥

पदांचा अर्थ—**नाना**–अथवा; **पुष्पाचिया उदरा**–फुलांच्या गर्भांत, पोटांत; **पुष्पसारा**–सुगंध, मकरंद, पराग; **न येतां**–येण्यापूर्वी; **आपणाचि भंवरा**–स्वतःच भ्रमर, भुंगा; **होआवें पडे**–बनावें लागतें.

भावार्थ—फुलांच्या पोटांतला मकरंद उत्पन्न होण्यापूर्वी आपला सुगंध घेण्यास त्याला स्वतांच भ्रमर बनावें लागतें जसें. ॥ ४२ ॥

नाना न रांधितां रससोये । ते गोडी पां कैसी आहे ।
हें पाहणें तें नोहे । आणिकाजोगें ॥ ४३ ॥

पदांचा अर्थ—**नाना**–अथवा; **रससोये**–पक्कान्न; **न रांधितां**–तयार होण्यापूर्वी, शिजण्यापूर्वी; **पां**–जर; **ते गोडी कैसी आहे**–तेथची गोडी कशी असते; **हें पाहणें**–हें जें अनुभवणें; **तें आणिकाजोगें नोहे**–तें इतरांस कळण्याजोगें नाहीं.

भावार्थ—पक्कान्न तयार करण्यापूर्वी त्यांतली गोडी कशी आहे, हें जर पाहावयाचें असेल तर ती स्वतां त्या गोडीवांचून इतरांस कळण्यासारखी नाहीं. ॥ ४३ ॥

तैसें सुखपणा येवो । लाजे आपलें सुख पावों ।
ते आणिकां चाखों सुवों । येईल काई ॥ ४४ ॥

पदांचा अर्थ—**तैसें**–तसेंच; **आपुलें सुख**–मूळ स्वतांचें सुख; **सुखपणा येवो**–सुखपणाला येऊन; **पावों लाजे**–उपभोग घेण्यास लाजतें; **तें**–तें मूळ सुख; **आणिका**–(त्या खेरीज) इतरांस; **चाखों सुवों**–उपभोगतां, उपभोग घेतां येण्यासारखें; **येईल काई**–होईल काय ?

सविवरण भावार्थः—तसेंच मूळ सुख जें स्वसुख, जें आत्मसुख तें सुखपणाला येऊन तें स्वानंदरूप होऊन निजस्वानंदाचा उपभोग घेण्यास जर संकोचतें, स्फुरण पावत नाहीं, तर मग तें स्वसुख इतरांस भोगण्यास कसें योग्य होईल ! परमात्मवस्तु व्यक्त दशेला येण्यापूर्वी त्या स्वरूपाचें ज्ञान किंवा ती स्थिति त्या स्वरूपाच्या ठिकाणीं एकपणानें "एकमेवाद्वितीयं" अशा स्वरूपानें असतें. असें हें ज्ञानाज्ञानविवर्जित, सर्व अवस्थातीत, भावाभावरहित, वेदश्रुति-शास्त्रें या शब्दब्रह्माच्या वर्णनापलीकडचें शब्दप्रमाणातीत, हाच सिद्धान्त मागील ३९ व्या ओवींत केलेलाच आहे कीं, सर्वज्ञ, सर्वगत, सर्वव्यापक असा परमात्मा सर्व शास्त्रांना हात चोरून असणारा तो कोणासहि गम्य नाहीं. तो सर्व चराचर अनंतकोटिब्रह्मांडरूपांत व्यक्ताव्यक्तांत अतिसूक्ष्मपणें नित्य सर्वत्र ओतप्रोत एकसारखा भरलेला आहे. ॥ ४४ ॥

दिहाचिये दुपारीं । चांदु जैसा अंबरीं ।
तें चांदणें चांदाचिवरी । जाणावें कीं ? ॥ ४५ ॥

पदांचा अर्थ—**दिहाचिये**–दिवसाचे; **दुपारीं**–दोन प्रहरीं; **जैसा अंबरीं**–जसा आकाशांत; **चांदु**–चंद्र; **चांदाचिवरी तें चांदणें**–चंद्रावरचा तो स्वतांचा प्रकाश; **जाणावें कीं**–तो स्वतांच जाणून असतोच ना ?

भावार्थ—दिवसाचें भर दोन प्रहरीं आकाशांत चंद्र जसा स्वतांचा प्रकाश तो स्वतांच जाणून असतो, नाहीं का ? ॥ ४५ ॥

श्रीज्ञानराज आतां हेंच आणखी दृष्टान्तांनीं अधिकाधिक स्पष्ट करीत आहेत कीं, परमात्मवस्तूला व्यक्त दशा येण्यापूर्वी तिची स्थिति तिच्या ठिकाणींच अव्यक्त रूप असतें:—

रूप नाहीं तैं लावण्य । अंग नुठी तैं तारुण्य ।
क्रिया न फुटे तैं पुण्य । कैसें असे ॥ ४६ ॥

पदांचा अर्थ—**रूप नाहीं**—आकार (उत्पन्न झाला) नाहीं; **तैं लावण्य**—तेव्हांचें सौंदर्य; **अंग नुठी**—शरीर उपजलें नाहीं; **तैं तारुण्य**—तेव्हांचा तरुणपणा; **क्रिया न फुटे**—सत्कर्म उद्भवलें, उदयलें नाहीं; **तैं**—तोंच; **पुण्य**—त्याचें पुण्यफळ; **कैसें असें**—कसें असूं शकेल ?

भावार्थ—देहाचा आकार उत्पन्न झाला नाहीं, तेव्हांचें तें सौंदर्य; शरीर उपजलें नाहीं, तेव्हांचें त्याचें तारुण्य; सत्कर्म घडलें नाहीं, त्याच्याआधींच त्याचें पुण्यफल कसें असूं शकेल ? ॥ ४६ ॥

जैं मनाचा अंकुर नुपजे । तेथिलेनि मकरध्वजें ।
तोचि हन माजे । तरीचि घडे ॥ ४७ ॥

पदांचा अर्थ—**जैं**—जोंपर्यंत; **मनाचा अंकुर**—मनाचा उदय; **नुपजे**—उत्पन्न झाला नाहीं; **तैं तेथिलेनि**—तोंवर, तेथला, त्यांतील, त्या वेळचा, त्या स्थितींत असलेला; **मकरध्वजें नुपजे**—कामविकार उद्भवणार नाहीं; **तोचि हन घडे**—तोच (मनाचा अंकुरच) जर उत्पन्न होईल; **तरीचि (तो) माजे**—तरच तो विकारहि माजेल, उद्भवेल, प्रकट होईल.

भावार्थ—जोंवर मनाचा उद्भव, मनाचें स्वरूप उदयास आलें नाहीं तोंवर त्यांतील कामविकार उत्पन्न होणार नाहीं. तो अंकुरच जर उत्पन्न होईल, तरच तो विकार प्रकट होईल. ॥ ४७ ॥

कां वाद्यविशेषाची सृष्टी । जैं जन्म नेघे दृष्टी ।
तैं नादु ऐशी गोष्टी । नादाचिजोगी ॥ ४८ ॥

पदांचा अर्थ—**कां**— किंवा; **वाद्यविशेषाची**—विशेष वाद्यांची, निरनिराळ्या वाद्यांची; **सृष्टी**—उत्पत्ति; **जैं जन्म दृष्टी नेघे**—जोंवर जन्मलेली दृष्टीला

घडत नाहीं, दृष्टीस येत नाहीं, दृष्टि तिला घेऊं शकत नाहीं; **तैं**–तोंपर्यंत; **नादु ऐसी गोष्टी**–नाद अशी भाषा; **नादाचिजोगी**–नादालाच ठाऊक.

भावार्थ—किंवा निरनिराळ्या वाद्यांची उत्पत्ति जोंपर्यंत जन्मलेली दृष्टीस पडत नाहीं, तोंपर्यंत नाद ही गोष्ट नादालाच ठाऊक. ॥ ४८ ॥

नाना काष्ठाचिया विटाळा । वोसरलियाहि अनळा ।
लागणें तैं केवळा । अंगासींचि ॥ ४९ ॥

पदांचा अर्थ—**नाना**–किंवा; **काष्ठाचिया विटाळा**–लाकडाचा संबंध; **वोसरलियाहि**–संपल्यावर देखील; **जैं**–जर; **अनळा लागणें**–अग्नीला आपला संबंध ठेवणें असेल; **तैं**–तर; **केवळा अंगासींचि**–केवळ आपल्या अंगाशींच तो राहील.

भावार्थ—किंवा लाकडाचा संबंध संपल्याबरोबर जेव्हां अग्नीला आपल्याशीं संबंध ठेवणें लागतें, तेव्हां तो तर केवळ त्याला आपल्या अंगाशींच ठेवावा लागतो; तो त्याचा आपल्या निजस्वरूपाशींच असतो. ॥ ४९ ॥

दर्पणाचेनि नियमें– । वीणाचि मुख प्रमें ।
आणिती तेचि वर्में । वर्मती येणें ॥ ५० ॥

पदांचा अर्थ—**दर्पणाचेनि**–आरशाच्या; **नियमें वीणचि**–आधारावांचूनच; **मुख**–निज चेहरा, स्वस्वरूप, **प्रमें आणिती**–प्रतीतीलाच आणतील, अनुभवांतील; **तेचि**–तेच, **येणें वर्में**–हें रहस्य, हे मर्म; **वर्मती**–जाणतील, ओळखतील.

भावार्थ—आरशाच्या आधारावांचून जर कोणी आपलें रूप अनुभवतील, तर तेच हें रहस्य ओळखतील. (त्यांसच परमात्मस्वरूप स्वसंवेद्य आहे, हें कळेल.) ॥ ५० ॥

न पेरितां पीक जोडे । तें मुडाचि आहे रोकडें ।
ऐसिया सोई उघडे । बोलणें हें ॥ ५१ ॥

पदांचा अर्थ—**पीक न पेरितां**–धान्य न पेरतांच; **जोडे**–हवें असेल तर; **तें रोकडें**–तें प्रत्यक्ष; **मुडाचि आहे**–बियाणांतच असतें; **ऐसिया सोई**–अशा सोयीनें, अशासारखें; **हें बोलणें**–हें वर्णन; **उघडे (आहे)**–उघड उघड, अगदीं स्पष्ट आहे.

भावार्थ—धान्य न पेरतांच तें हवें असेल तर त्या विषाणांच्या राशात तें तिथें जसें प्रत्यक्षच उघड उघड असतें, अशासारखेंच आमचें हें उघड वर्णन आहे. ॥ ५१ ॥

एवं विशेष सामान्य । दोन्ही नातळे चैतन्य ।
तें भोगिजे अनन्य । तेणेंसि सदा ॥ ५२ ॥

पदांचा अर्थ—एवं—याप्रमाणें; सामान्य—अव्यक्त, व्यापक, निरुपाधिक; विशेष—व्यक्त, सोपाधिक; दोहीं—दोहोंसहि; चैतन्य—स्वयंज्ञानघनपरमात्मस्वरूप; नातळें—आकळलें जात नाहीं, सांपडून अडकत नाहीं; तें सदा तेणेंसि—तें सदैव स्वतांशींच; अनन्य—एकरूप असें; भोगिजे—सुख घेतें.

भावार्थ—सारांश, सामान्य निरुपाधिक व विशेष सोपाधिक या भावांमध्यें चैतन्य स्वयंज्ञानघनपरमात्मस्वरूप हें आकळलेंच जात नाहीं. तें सदैव स्वतांशींच एकरूपतेचें सुख भोगून असतें. ॥ ५२ ॥

आतां यापेक्षा अधिक वर्णन करणें शक्य नाहीं, हें स्पष्ट करतातः—

आतां यांवरी जें बोलणें । तें येणेंचि बोलें शहाणें ।
जें मौनाचेंही निपटणें । पिऊनि गेलें ॥ ५३ ॥

पदांचा अर्थ—आतां यावरी—म्हणून, यानंतर; जें बोलणें—जें बोलावयाचें; तें येणेंचि बोलें—तें एवढ्या, इतक्या वर्णनानें; शहाणें—समजावें कीं; जें मौनाचेंही—जें शब्दातीतपणाचें देखील; निपटणें—शेषपण; पिऊनि गेलें—जिरून गेलें, निःशेष झालें.

भावार्थ—म्हणून यानंतर जें बोलावयाचें तें एवढ्या वर्णनावरून समजावें कीं, येथें मौनरूप शब्दातीतपणाचा शेषपणादेखील जिरून गेला, अगदीं निःशेष झाला, तो मुळींच उरला नाहीं. ॥ ५३ ॥

एवं प्रमाणीं अप्रमाण- । पण केलें प्रमाण ।
दृष्टान्तीं वाइली आण । दिसावयाची ॥ ५४ ॥

पदांचा अर्थ—एवं—याप्रमाणें; प्रमाणीं—शब्दब्रह्म जें त्या वेदांनीं; अप्रमाणपण—आपुलें अपुरेपण; प्रमाण केलें—सिद्ध केलें, खरें केलें; दृष्टान्तीं—दृष्टान्तानीं; आण वाइली—शपथ घेतली, शपथ वाहिली; दिसावयाची—पुढें येण्याची.

भावार्थ—याप्रमाणें जें शब्दप्रमाण अशा वेदांनीं आपलें अपूर्णपण "नेति नेति" असें म्हणून खरें केलें. दृष्टान्तांनीं पुढें येण्याची तर शपथच घेतली. ॥ ५४ ॥

अंगाचिया अनुपपत्ति। आटलिया उपपत्ति।
येथें उठिलिया पांति। लक्षणांची ॥ ५५ ॥

पदांचा अर्थ—उपपत्ति—न्यायशास्त्राच्या युक्त्या; अंगाचिया—अंगच्या, स्वतांच्या; अनुपपत्ति—अयोग्यतेमुळें; आटालिया—जिरून गेल्या, जिरल्या; येथें—येथें तर; लक्षणांची पांती—जहदादिक लक्षणांची; पांती—पंक्ती, पंगत, समुदाय; उठिलिया—उठून गेल्या, उठल्या, निघून गेल्या, चालत्या झाल्या.

भावार्थ—न्यायशास्त्राच्या युक्त्या स्वतांच्या अयोग्यतेमुळें जिरून गेल्या; आणि येथें पहावें तर 'जहत्' 'अजहत्' या लक्षणांची पंगतची पंगतच उठून गेली. ॥ ५५ ॥

उपाय मागील पाय। घेऊन झाले वांय।
प्रतीति सांडिली सोय। प्रत्ययाची ॥ ५६ ॥

पदांचा अर्थ—उपाय—साधनें (योग, याग, विधि, जप, तप); पाय मागील घेऊन—पाय मागारीं, उलट वळवून; वांय झाले—व्यर्थ ठरले; प्रतीति—अनुभव, प्रत्यय; प्रत्ययाची—अनुभवाची, सोय सांडिली—स्थान, ठिकाण सोडलें; टाकून दिलें.

भावार्थ—साधनें "योगयागविधि। येणें नोहे सिद्धि। वायाची उपाधी। दंभ धर्म ॥ ५–१ ॥"—

या श्रीज्ञानदेवांच्या हरिपाठाप्रमाणें यांनीं मागें पाऊल घेऊन तीं व्यर्थ झालीं. सिद्धपरमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं या साधनांचा उपयोग नाहीं. कारण तीं पुढें अशीं व्यर्थ ठरतात. प्रतीति म्हणजे निदिध्यासन, आत्मानुसंधान, जें आत्मध्यान यानें आपला लाग सोडून दिला, नाद सोडला. ॥ ५६ ॥

येथें निर्धारेसी विचारु। निमोनि झाला साचारु।
स्वामीच्या संकटीं शूरु। सुभटु जैसा ॥ ५७ ॥

पदांचा अर्थ—या परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं; विचारु—विचार, विवेक; निर्धारेसी—निश्चयासकट; निमोनि—जीव देऊन, नाहींसा होऊन; साचारु

झाला–सार्थक पावला; **जैसा**–जसा; **शूरू**–शूर; **सुभटु**–सुभट, योद्धा; **स्वामीच्या संकटीं**–धन्याच्या संकटकाळीं; प्राणावरच्या प्रसंगानें.

भावार्थ—जसा शूर योद्धा धन्याच्या संकटसमयीं आपला जीव देऊन मालकाचें संकट दूर करून आपलें सार्थक करतो; तसें "येथें" परमात्मस्वरूपीं विवेकानें निश्चयासकट नाहींसें होऊन जाऊन आपलें सार्थक केलें. (यांतील रहस्य असें, कीं विवेक परमात्मस्वरूपाची प्राप्ति करून देतो, तेव्हां आपण आधीं नाहींसा होऊन जातो, स्वतां तो आपण मग उरत नसतो.

"विवेक सांडूनि आपुलें काम। मग पाविजे तें धाम" असें श्रीज्ञानेश्वरींताहि म्हटलें आहे. ॥ ५७ ॥

नाना नाशु साधूनि आपुला। बोधु बोधें लाजिला
नुसुधेपणें थोटावला। अनुभउ जेथ ॥ ५८ ॥

पदांचा अर्थ—**नाना**–तसेंच; **बोधु**–जाणिवेनें; **आपुला नाशु साधूनि**–आपल्या स्वतांस नाहींसें करून टाकून; **बोधें लाजिला**–बोध म्हणवून घेण्याची त्यास लाज वाटली; **जेथ**–ज्या ठिकाणीं; **अनुभउ नुसुधेपणें**–अनुभव हा एकटेपणामुळें, एकटा राहिल्यानें; **थोटावला**–पांगुळला, जिरून गेला, उरला नाहीं.

भावार्थ—तसेंच बोध जी जाणीव तिनें आपण न उरतां नाहींसें होऊन स्वतांस लज्जास्पद करून घेतलें बोधाला बोधरूपानें राहण्याची लाज वाटली. कारण जिथें अनुभव हा एकलेपणामुळें अनुभवावयास कांहीं नसल्यानें त्या एकपणांत स्तब्ध झाला, पांगुळला; कारण परमात्माच स्वयं अनुभवस्वरूप आहे. "साधु-बोध झाला। नुरोनिया ठेला। ठायींच मुराला। अनुभव ॥ ६–१ ॥ "कापराची वाती, उजळली ज्योति। ठायींच समाती झाली जैसी" (अभंग ज्ञानदेव—हरिपाठ ॥ ६–२ ॥) ॥ ५८ ॥

भिंगाचिया चडळा। पदरांचा पुंज वेगळा।
करितां जैसा निफाळा। आंगाचा होय ॥ ५९ ॥

पदांचा अर्थ—**भिंगाचिया**–अभ्रकाच्या; **चडळा**–तुकड्यावरील, तुकड्यांतील; **पदरांचा**–थरांची; **पुंज**–रास; **वेगळा करितां**–निराळी केली असतां; **जैसा**–जसा; **आंगाचा**–स्वतांचा; **निफाळा होय**–नाश होतो.

भावार्थ—अभ्रकाच्या पापुद्र्यांच्यांतल्या थरांचीं वेष्टणें निरनिराळीं केलीं असतां जसा त्याच्या स्वतांचाच नाश होतो. ॥ ५९ ॥

कां गजबजिला उबा । पांघुरणें केळीचा गाभा ।
सांडी तेव्हेळीं उभा । कैंचा कीजे ॥ ६० ॥

पदांचा अर्थ—**कां**–अथवा; **उबा**–उबेनें, उकाड्यामुळें; **गजबजिला**–गुदमरलेला, गांजलेला; **केळीचा गाभा**–केळीचा खुंट; **पांघुरणें**–पांघरूण, पांघरलेलें, सोपटें, लपटलेलें; **साडी**–टाकून देऊं लागला तर; **तेव्हेळीं**–त्या वेळीं; **कैंचा उभा कीजे**–कसा उभा करावा ?

भावार्थ—किंवा केळीचा खुंट उकाड्यानें गुदमरून आपलीं सोपटें काढून टाकून देऊं लागला तर त्या वेळीं त्याला उभा कसा करावा ? ॥ ६० ॥

तैसें अनुभाव्य अनुभविक । इहीं दोहीं अनुभूतिक ।
तें गेलिया कैंचें एक । एकासीचि ॥ ६१ ॥

पदांचा अर्थ—**तैसें**–तसें; **अनुभाव्य**–अनुभवाची वस्तु, भोग्य, अनुभवाचा पदार्थ; **अनुभविक**–भोक्ता, उपभोग घेणारा, अनुभव घेणारा; **इहीं दोहीं गेलिया**–हीं दोन्हीं नसतील तर; **तें अनुभूतिक**–अनुभवलेलें, अनुभव, उपभोग, भोग; **एक एकासीचि**–स्वतां एकाचाच, एकाला, स्वतां स्वताच्याच ठिकाणीं स्वतांला, स्वताचा; **तें कैंचें**–तो कसा असेल ? तो कसा घडेल ?

भावार्थ—तसेंच उपभोगाचा पदार्थ व उपभोग घेणारा हीं दोघें नसतील तर तो भोग, तो अनुभव स्वतांचा स्वतांला, एकट्या एकट्यालाच कसा घडेल ? कसा घेतां येईल ? ॥ ६१ ॥

अनुभवो हा ठाववरी । आपुलीचि अवसरी ।
तेथें अक्षरांची हारी । वाईल कायी ॥ ६२ ॥

पदांचा अर्थ—**अनुभवो**–भोग हा; **हा ठाववरी**–या ठिकाणापर्यंत, या ठिकाणीं; **आपुलीचि**–स्वताचीच; **अवसरी**–अखेरी, शेवट (करून घेतो); **तेथें**–त्या ठिकाणीं; **अक्षरांची हारी**–वर्णांचा क्रम, शब्दांची मालिका, रांग, ओळ, अस्तित्व; **वाईल कायी**–वांचेल काय, उरेल काय ?

भावार्थ—अनुभव हा असा या परमात्म्याच्या ठिकाणीं स्वतांचाच शेवट करून घेतो, त्या ठिकाणीं शब्दांची मालिका वांचेल काय ? या वेद, वेदान्त, उपनिषदें या शब्दाचें अस्तित्व राहील काय ? हे शब्द वर्णन करण्यास उरतील का ! ॥ ६२ ॥

कां परेसी पडे मिठी । तेथें नादा सळु नुठी ।
मा वावरिजैल ओठीं । हें कें आहे ॥ ६३ ॥

पदांचा अर्थ—**कां**—किंवा; **परेसी**—परावाणी, सूक्ष्मज्ञानवाणी (नाभिस्थानाची); **मिठी पडे**—लय पावते, नाश पावते; **तेथें**—त्या ठिकाणीं; **नादा**—ध्वनि; **सळु**—स्फुरण; **नुठी**—उठणार नाहीं, पावणार नाहीं; **मा**—मग; **ओठीं**—ओठांनीं; **वावरिजैल**—उच्चारला जाईल; **हें कें आहे**—हें कसें होईल ?

भावार्थ—किंवा नाभिस्थानची सूक्ष्मज्ञानवाणी परा, तीच जेथें नाश पावते, त्यामुळें तेथें मग शब्दध्वनि हा जर स्फुरणच पावणार नाहीं, मग तो ओठांनीं उच्चारला जाईल, हें कसें घडेल ? ॥ ६३ ॥

चेइलियाही पाठीं । चेवणयाच्या गोठी ।
कीं धाला बैसे पाठीं । रंधनाच्या ? ॥ ६४ ॥

पदांचा अर्थ—**चेइलियाही**—जागें झाल्यावरहि; **पाठीं**—नंतर; **चेवणयाच्या गोठी**—जागें करण्याच्या गोष्टी (कशाला ?); **कीं**—किंवा; **धाला**—पोट भरलेला; **रंधनाच्या**—स्वैंपाकाच्या; **पाठीं**—खटपटींत; **बैसे**—पडेल काय ?

भावार्थ—जागें झाल्यानंतरहि जागें करण्याच्या गोष्टी कशासाठीं ? किंवा पोट भरलेला स्वैंपाकाच्या खटपटींत पडेल काय ? ॥ ६४ ॥

उदैजलया दिवसपती । तैं कीं दिवे सेजे येती ।
वांचूनि पिकला सेतीं । सुइजताती नांगर काई ॥ ६५ ॥

पदांचा अर्थ—**दिवसपती**—दिवसाचा स्वामी, नाथ, सूर्य; **उदैजलया**—उगवल्यावर; **तैं**—तेव्हां; **दिवे सेजे येती कीं**—दिवे झोंपेला जातातना, मालवले जातात ना, म्लान—मंद होतात ना; **वांचूनि**—एरवीं; **पिकला सेतीं**—पिकलेल्या शेतांत; **नांगर सुइजताती काई**—नांगर घालतात काय ?

भावार्थ—सूर्य उगवतांक्षणींच दिवे मंद होतातच ना ? होतातच कीं. तसेंच पिकलेल्या शेतांत एरवीं नांगर कोणी घालतात काय ? ॥ ६५ ॥

हेंच सिद्धान्ताशीं मिळवून दाखवितात—

म्हणोनि बंधमोक्षाचें व्याज । नाहीं निमालें काज ।
आतां निरूपणाचें भोज । वोळगे जन्ही ॥ ६६ ॥

पदांचा अर्थ—**म्हणोनि**—म्हणून; **आतां बंधमोक्षाचें व्याज**—बंध व मोक्ष, अज्ञान—ज्ञान यांचें निमित्त, कारण; **नाहीं**—उरलें नाहीं; **काज निमालें**—

त्यांचें कार्य संपलें; **आतां जन्ही**–यावरहि; **निरूपणाचें भोज**–व्याख्यानाचें कौतुक, आवड; **वोळगे**–प्राप्त झालें आहे, शिल्लक आहे.

सविवरण भावार्थ—म्हणून बंध व मोक्ष जें अज्ञान–ज्ञान यांचें आतां निमित्त उरलें नाहीं. त्यांचें कार्य संपलें आहे. " **आतां जन्ही** "– यावरहि ज्या व्याख्यानाचें कौतुक आतां उरलें असेल तर तें—

यामध्यें ओंवीच्या पूर्वार्धाचें तात्पर्य असें कीं, परमात्मनित्यासिद्धस्वरूपाच्या ठिकाणीं प्रमाणें, लक्षणें, अनुभव, बंध, मोक्ष, अज्ञान–ज्ञान, साक्षात्कार, हीं सर्व आभासात्मक अभावरूप होत. नित्यसिद्धपरमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं वेद–श्रुति–उपनिषदादिकांनीं केलेलें वर्णन अपूर्ण ठरतें, असें जर आहे, तर मग श्रीज्ञानेश्वर-महाराजांनीं तरी हें व्याख्यान कां केलें? अशी शंका आल्यास त्या शंकेचें समाधान वरील ओंवीच्या उत्तरार्धानें केलें आहे, कीं हें आमचें निरूपण कौतुकाच्या भरांत सहज लीलेनें प्राप्त झालें आहे. ॥ ६६ ॥

याप्रमाणें हें प्रकरण संपवून पुढील प्रकरणाचा आरंभ महाराजांनीं सुचविला आहे तो असा —

आणि पुढिला कां आपणापें । वस्तु विसराचेनि हातें हारपे ।
मग शब्दींचि घेपे । आठवूनियां ॥ ६७ ॥

पदांचा अर्थ—**आणि**–असें पहा; **पुढिला**–दुसऱ्याला; **कां**–किंवा; **आपणापें**–स्वतां आपल्याला; **वस्तु**–आत्मस्वरूप; **विसराचेनि**–विसरामुळें, स्वरूपविस्मृतीमुळें; **हातें हारपें**–हातचें दूर झालें असलें; **मग**–तर; **शब्दींचि**–तें शब्दब्रह्म अशा वेदांतील वेदान्तज्ञानानेंच; **आठवूनियां घेपें**–आठवितां यावें, आठवून घेतां यावें.

भावार्थ—असें आहे कीं, दुसऱ्याला किंवा आपल्याला आत्मस्वरूप ही वस्तु विस्मृतीनें हातची वेगळी, हातची दूर झाली असेल तर शब्दब्रह्म अशा उपनिषदांतील वेदान्तशास्त्रानें ती वस्तु आठवून घेतां यावी— (आणि म्हणून एवढ्याचकरितां हें आमचें निरूपण झालेलें आहे.) ॥ ६७ ॥

असा ह्या वेदशास्त्ररूप शब्दाचा आपल्याला स्वरूपाचें स्मरण करून देण्यापुरतां तेवढाच याचा उपयोग खरा, पण तोहीः—

एतुलियाही परौतें । चांगावें नाहीं शब्दातें ।
जन्ही स्मारकपणें कीर्तितें । मिरवी हा जगीं ॥ ६८ ॥

पदांचा अर्थ— एतुलियाही–एवढ्याचपुरतें; **परौतें**–यापेक्षां अधिक; **शब्दातें**–या शब्दज्ञानाला; **चांगावें नाहीं**–चांगुलपण, महत्त्व नाहीं; **जन्ही**–जरी; **जगीं**–जगांत, सर्वत्र; **हा**–हें शब्दज्ञान; **स्मारकपणें**–स्मरण करून देणारें अशा; **कीर्तितें**–कीर्तीनें; **मिरवी**–मिरवीत असला तरी.

भावार्थ—जगांत सर्वत्र अध्यात्मशास्त्रांतलें शब्दज्ञान हें आत्मवस्तूचें स्मरण करून देणारें असतें अशा कीर्तीनें जरी तें मिरवीत असलें तरी याहून अधिक महत्त्व या शब्दाला, वेदांतल्या उपनिषदांना नाहीं.

सारांश—वरील ६७ व ६८ या दोन ओव्यांनीं दर्शविण्यांत आलें आहे कीं, वेदवाक्य हें अविद्येच्या आवरणशक्तीच्या प्रभावानें जीवाला आत्मस्वरूपाचें विस्मरण झालें असतांना त्या आवरणशक्तीचा पूर्ण निरास करून त्याला आत्मस्वरूपाचें स्मरण घडवून देण्याचें उपनिषद्रूप या शब्दशास्त्रांतलें सर्व वेदांचें सारभूत असें जें महावाक्य "तत्त्वमसि" या सद्गुरूंच्या उपदेशांतल्या शब्दशक्तिद्वारां करूं शकतें. यापेक्षां वेदांतल्या महावाक्याला अधिक महत्त्व नाहीं, असें हें पुढील प्रकरणांत "**शब्दखंडन**" करावयाचें आहे, त्याचें वरील दोन ओव्या हें अवतरण आहे. ॥ ६८ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे सच्चिदानंदपदत्रयविवरणं नाम पंचमं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवाद असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें सच्चिदानंदपदत्रयविवरण नांवाचें पांचवें प्रकरण समाप्त.

प्रकरण सहावें

शब्दखंडन

आतां या प्रकरणांत परमात्मस्वरूपाच्या प्राप्तीविषयीं शब्दशास्त्र जे वेद, वेदान्त, उपनिषदें, आणि ब्रह्मसूत्र (१।१।३)— "शास्त्रयोनित्वात्", "शास्त्र" म्हणजे वेद, त्या वेदांमध्यें 'योनित्वात्' मूळ कारणत्वामुळें म्हणजे परब्रह्मपरमात्मा सर्वांचें मूळ अधिष्ठान आहे, या सर्वांच्या अशा वर्णनामुळें व "एष योनिः सर्वस्य" (माण्डुक्योपनिषद्), तसेंच "सत्यं ज्ञानमनंतम्" (तै. उ. २।१) या वेदवचनानुरूप वेदशब्दाचा उपयोग केवढा आहे, हें या प्रकरणांतल्या बाराव्या ओवीच्या पहिल्या अर्धापर्यंत वर्णन आलें आहे. नंतर शब्दशास्त्र जे हे वेद ते त्या शब्दातीत अशा नित्यसिद्ध परमात्मस्वरूपाचें पूर्णपणें आकलन करूं शकत नाहींत असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं सिद्ध करूनच हें "शब्दखंडन" प्रकरणसमाप्तीपर्यंत केलें आहे, तें असें:—

बाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु ।
अमूर्ताचा विशदु । आरिसा नव्हे ? ॥ १ ॥

पदांचा अर्थ—**बाप**–अहाहा, केवढी; **उपेगी**–उपयोगी, आवश्यक; **शब्दु**–हें वेदशास्त्र; **वस्तु**–ही वस्तु,हा पदार्थ; **स्मरणदानीं**–स्मरण देण्यांत;**प्रसिद्ध**–प्रसिद्ध, विश्रुत, माहितीची; **अमूर्ताचा**–अमूर्त, अव्यक्त अशा परमात्म्याचा; **विशदु**–स्पष्ट दाखवणारा; **आरसा**–दर्शन करविणारें साधन; **नव्हे**–नव्हें काय ?

भावार्थ—अहाहा, खरोखरच ! वेद नांवाचे शब्द ही केवढी उपयोगाची वस्तु आहे ! हा वेदशब्द (जीवाला स्वस्वरूपाचें) स्मरण करून देण्यांत सर्वत्र विश्रुत आहे. अव्यक्त परमात्म्याला स्पष्ट दाखवून देण्याचें साधन असा हा जणूं आरसाच नव्हे काय ? ॥ १ ॥

आतां श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात कीं, सामान्य आरशासारखा हा नसून यांत आंधळें देखील पाहतें:—

पाहतें आरिसा पाहे । तेथें कांहींचि नवल नव्हे ! ।
परि दर्पणें येणें होये । न पाहतें पाहतें ॥ २ ॥

पदांचा अर्थ—**पाहतें**– पाहणारें, डोळे असणारें, डोळस; **आरिसा**–आरशांत; **पाहे**–पाहतो; **तेथें**–त्यांत; **कांहींच**–यत्किंचित्; **नवल**–आश्चर्य; **नव्हे**–नाहीं; **परि**–परन्तु; **येणें दर्पणें**–या वेदरूप आरशानें; **न पाहतें**–न पाहणारें, आंधळें; **पाहतें होये**–डोळस होतें.

सविवरण भावार्थ—डोळस आरशांत पाहतो यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण या वेदांतल्या वेदान्तशब्दशास्त्राच्या ज्ञानरूप आरशाच्या योगानें आंधळेंहि डोळस होतें; अज्ञानीहि ज्ञानी होतो, असें या वेदरूप शब्दाच्या अंगीं वाटेल त्यास आत्मस्वरूपाचें ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य आहे. ॥ २ ॥

या वेदान्तशब्दशास्त्राचें किती महत्त्व आहे, हें श्रीज्ञानराज सांगतातः—

वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्यत्कारु सूर्य जैसा ।
येणें येके गुणें आकाशा । अंबरत्व ॥ ३ ॥

पदांचा अर्थ—**वडिला**–सर्वांच्या आधींचा, मूळ; **अव्यक्ताचिया**–सगुण-ब्रह्माच्या, मायेच्या; **वंशा**–पसाऱ्याला, घराण्याला; **उद्यत्कारु**–दीप, प्रकाशक, कुलदीपक असा; **जैसा सूर्य**–जसा जणुं प्रकाशक सूर्यच; (**तैसा**–तसेंच); **येणें येके गुणें**–याच्या एकाच्या गुणानें, साहाय्यानें; **आकाशा**–आकाशाला, गगनाला; **अंबरत्व**–अंबर, आकाशपणा हें नांव.

भावार्थ—मूळ अव्यक्त मायेच्या वंशांत, या जगांत कुलदीपक जसा सूर्य; तसेंच याच्या एकाच्या साहाय्यानें अव्यक्त आकाशाला आकाशपणा अंबर, (अंबं रातीति नाम शब्दं करोतीति, अंबरं) हें नांव आलें. "शब्दगुण आकाशः" आकाशाचा गुण शब्द, हें न्यायशास्त्रांतील सूत्र आहे. जगांतील सर्व पदार्थांना प्रकाशित करणारा जसा सूर्य, तसें सर्व पदार्थांचें ज्ञान करून देणारा हा वेदशब्द जणुं सूर्यच होय. ॥ ३ ॥

आपण तंव खपुष्प । परि फळ दे जगद्रूप ।
शब्द मवितें उमप । कोण आहे ? ॥ ४ ॥

पदांचा अर्थ—**आपण तंव**–आपण स्वतांतर; **खपुष्प**–आकाशाचें फूल, मिथ्यापदार्थ; **परि**–तरीपण, तरीसुद्धां, पाहिलें तर; **जगद्रूपफळ**–जगांतील व्यवहाराचें ज्ञान; **दे**–(वेदशब्द) करून देतो; **मवितें**–जें मोजतां येणारें, तें; **शब्द उमप**–शब्द उमाप; शब्दाला मोठें, अगाध, कठीण, असें या शब्दाला न

मोजतां येणारें; कोण आहे–कोणतें असेल ? शब्दानें न उच्चारतां येणारा कोणता पदार्थ आहे ?

भावार्थ—हा शब्द आपण स्वतां तर आकाशाचें जणुं फूलच म्हणजे मिथ्या, अभावरूप, असा असूनसुद्धां जगांतील व्यवहाराचें ज्ञान शब्दच आपण करून देतो म्हणजे जगांतला सर्व व्यवहार शब्दानेंच होतो. म्हणून या शब्दाला मोजतां, गणतां येण्यास कोणतें कठीण आहे ? ॥ ४ ॥

विधिनिषेधांचिया वाटा । दाविता हाचि दिवटा ।
बंधमोक्ष कळिकटा । शिष्टु हाचि ॥ ५ ॥

पदांचा अर्थ—विधिनिषेधांचिया–(विधि + निषेध + यांचिया) कर्तव्य, अकर्तव्य यांच्या; वाटा–मार्ग; दाविता–दाखविणारा; हाचि दिवटा–हा शब्दच मशाल, प्रकाश; बंधमोक्ष–अज्ञान व ज्ञान यांचे; काळिकटा–कळ लावणारा, भांडण–वाद उत्पन्न करणारा; शिष्टु–सभ्य, संभावित; हाचि–हाच !

भावार्थ—वेदविहित कर्म, वेदांत सांगितलेलें कर्म हा विधि; वेदांत न सांगितलेलें कर्म, हा निषेध; असे विधिनिषेधाचे, कर्तव्याकर्तव्यतेचे मार्ग दाखवून देणारें शब्दशास्त्र, हा वेदशब्दच जणुं मशाल, प्रकाश होय. तसेंच " बंधमोक्ष " म्हणजे कोणाला बंध तर कोणाला मोक्ष असें सांगून (उभयतांमध्यें नारदासारखा) कळ लावणारा सभ्य, संभावित, शिष्ट हाच होय. ॥ ५ ॥

हा अविद्येचा आंगीं पडे । तैं नाथिलें ऐसें विरूढे ।
न लाहिजे तीन कवडे । साचा वस्तु ॥ ६ ॥

पदांचा अर्थ—हा–हा शब्द; अविद्येचा–अज्ञान, अविद्या, आवरण-शक्ति, मोहन, भ्रमशक्ति यांच्या; आंगीं पडे–बाजूला वळला, पक्षाचा स्वीकार केला; तैं–तर; नाथिलें–असत्य असलेलें, मुळींच नसलेलें; ऐसें–असें असलेलें, असलें सत्य; विरूढे–भासवितो, भासतें; साचा वस्तु–सत्य वस्तु, जो परमात्मा त्याला; तीन कवडे–तीन कवड्यांचीसुद्धां किंमत, मुळींच महत्त्व; न लाहिजे–मिळत नाहीं, रहात नाहीं.

भावार्थ—ह्या शब्दानें अविद्येचा पक्ष स्वीकारला, हा अविद्येच्या बाजूला वळला, तर हां नसतें, असत्य जगत् तें सत्य, खरें असल्याचें भासवितो. मग सत्य अशा परमात्म्याला तीन कवड्यांचीसुद्धां किंमत उरत नाहीं, परमात्मा नाहींच असा नास्तिकवाद उत्पन्न करतो. ॥ ६ ॥

शुद्ध शिवाच्या शरीरीं । कुमारुचि हा जिऊ भरी ।
जेविं आंगें पंचाक्षरी । तेविं हा बोलु ॥ ७ ॥

पदांचा अर्थ—**जेविं**–ज्याप्रमाणें; **पंचाक्षरी**–पांचांचे मंत्र जाणणारा, (जारण, मारण, मोहन, स्तंभन, वशीकरण हें जाणणारा), देवरूपी; **आंगें**–आंगांतलें पिशाच्च; **बोलु**–बोलावतो; **तेविं**–त्याप्रमाणें; **शुद्ध शिवाच्या शरीरीं**–शुद्ध परमात्माशिवस्वरूपावर; **हा कुमारुचि**–हा एवढासा पोर; **जिऊं**–जीवभाव; **भरी**–संचरवितो, भ्रम उत्पन्न करतो, (व) **हा बोलु**–हा शब्द बोलावितो, **आंगांतलें** बोलायला लावतो.

भावार्थ—पंचाक्षरी हा जारण, मरण, मोहन, स्तंभन, वशीकरणादि, पांच प्रकारचे मंत्र जाणणारा जसें आंगांतलें पिशाच्च बोलावतो त्याप्रमाणें हा एवढासा अविद्येचा पोर, हा "शब्द" शुद्ध परमात्मस्वरूपावर ब्रह्मा, विष्णु, शिव असा जीवभ्रमाचा संचार करवितो व त्या जीवाला मी मनुष्य, देव, पितर, ज्ञानी, योगी, असें भ्रमांतलें बोलावयास लावतो. ॥ ७ ॥

जिउ देहें बांधिला । तो बोलें एके सुटला ।
आत्मा बोलें भेटला । आपणया ॥ ८ ॥

पदांचा अर्थ—**जिउ**–जीव हा; **देहें**–देहभावानें;, 'मी' देह अशा भ्रमानें; **बांधला**–बंधन पावलेला, बद्ध झालेला; **तो**–जीव; **एके बोलें**–एका श्रुतिशब्दानें, एका 'तत्त्वमसि' महावाक्यानें; (देहबंधनांतून) **सुटला**–सुटतो, मुक्त होतो; **आत्मा**–शुद्धआत्मस्वरूपाचा साक्षात्कार; **आपणया**–आपला, आपल्याला; **बोलें**–शब्दशक्तीनेंच; **भेटला**–भेटतो, प्राप्त होतो.

भावार्थ—(मूळचा परमात्मस्वरूप असलेला) जीव हा 'मी देह' या देहबंधनानें, देहभ्रमानें बद्ध झालेला तो एका महावाक्याच्या शब्दबोधानेंच (देह 'मी' या जीवपणाच्या भ्रमांतून) मुक्त होतो; आणि असें शुद्ध आत्मस्वरूप, आपलें आपल्याला या शब्दानेंच प्राप्त होतें; (एवढें शब्दांत सामर्थ्य आहे.) ॥ ८ ॥

या वेदशब्दाला सूर्याची उपमाहि कशी देतां येत नाहीं, हें श्रीज्ञानेश्वर-महाराज आतां सांगतात कीं:—

दिवसातें उगों गेला । तंव रात्रीचा द्रोहो आला ।
म्हणोनि सूर्यो या बोला । उपमा नव्हे ॥ ९ ॥

पदांचा अर्थ—(तो सूर्य) दिवसातें–दिवसाला; उगों गेला–उगवायला जातो; तंव–तेव्हां; रात्रीचा द्रोहो आला–रात्रीचा द्वेष, नाश होतो; म्हणोनि–म्हणून; या बोला–या शब्दाला; सूर्यो उपमा नव्हे–सूर्य ही उपमा होत नाहीं, सूर्याची उपमा शब्दाला लागूं पडत नाहीं.

भावार्थ—सूर्य हा दिवसाला उगवायला गेला असतां तेथें रात्रीचाच नाश होतो म्हणून तो या वेदशब्दाला उपमा होत नाहीं. ॥ ९ ॥

जे प्रवृत्ति आणि निवृत्ति । विरुद्धा इया हातु धरिती ।
मग शब्दें॑चि चालती । एकलेनी ॥ १० ॥

पदांचा अर्थ—जे–जी; प्रवृत्ति–प्रवृत्तिशास्त्र, धर्मशास्त्र; आणि–तसेंच; निवृत्ति–निवृत्तिशास्त्र, मोक्षशास्त्र; इया विरुद्धा–ह्या एकमेकींच्या विरुद्ध असणाऱ्या त्यासुद्धां; हातु धरिती–हातांत हात घालून चालतात; मग–हें तर; एकलेनी शब्दें॑चि–या एका शब्दाच्यानेंच; चालती–या अशा एकीनें चालतात.

भावार्थ—जी प्रवृत्ति म्हणजे जें धर्मशास्त्र, जी पूर्वमीमांसा व जी निवृत्ति म्हणजे जें मोक्षशास्त्र, जी उत्तरमीमांसा, या दोन्ही ज्या एकमेकींविरुद्ध असणाऱ्या पण त्याहीसुद्धां एकमेकींचा हात धरून ह्या एका शब्दामुळेंच एकीनें चालतात, एकमेकींला पोषक होतात. ॥ १० ॥

सहाय आत्मविद्येचें । करावया आपण वेंचे ।
गोमटें काय शब्दाचें । येकैक वानूं ? ॥ ११ ॥

पदांचा अर्थ—आत्मविद्येचें–आत्मज्ञानाचें; सहाय करावया–प्राप्ति करून देण्यांत; आपण वेंचे–आपण नाश पावतो, नाहींसा होतो; शब्दाचें येकैक गोमटें–या शब्दाचें एकेक चांगुलपण; काय वानूं–किती म्हणून वर्णन करावें ?

भावार्थ—आत्मज्ञानाची प्राप्ति करून देण्यांत आपण शब्द स्वतः नाश पावतो, नाहींसा होतो, असें या शब्दाचें चांगुलपण किती म्हणून वर्णावें ? शब्दातीत परमात्मस्वरूपाचा निर्देश करून आपण मग शब्दरूपानें उरत नाहीं. शाखेच्या डहाळीच्या शेवटच्या टोकाला असलेल्या एका पानाच्या शेंड्याच्या ठिकाणीं चित्ताचें एकाग्र होतांच चन्द्र दिसतो, तोंच तो पानाचा शेंडा जसा नाहींसा होतो, तद्वत् शब्द पूर्ण नाहींसा होतो. ॥ ११ ॥

किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु ।
परी ययाही संबंधु । नाहीं येथें ॥ १२ ॥

पदांचा अर्थ—**किंबहुना**–फार काय सांगावें ? **शब्दु**–महावाक्य; **स्मरण-दानीं**–स्मरण करून देण्यांत; **प्रसिद्धु आहे**–प्रसिद्ध, विश्रुत, माहीत असलेला आहे; **परी**–पण; **येथें**–आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं; **ययाही**–या स्मरणाचाहि; **संबंधु नाहीं**–संबंध, उपयोग नाहीं, सहाय होत नाहीं.

भावार्थ—फार काय सांगावें ? शब्द, उपनिषदांतलें "तत्त्वमसि" महावाक्य हें आत्मस्वरूपाचें स्मरण करून देण्याविषयीं प्रसिद्ध आहे खरें. पण या आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं या स्मरणाचा कांहींहिं उपयोग होत नाहीं. ॥ १२ ॥

परमात्मस्वरूपाशीं शब्दाचा कोणताच संबंध कसा नाहीं, हें बाराव्या ओंवीच्या दुसऱ्या अर्धापासून तें या प्रकरणाच्या अखेरपर्यंत सांगून आतां या पुढील १८ व्या ओंवीपर्यंत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं तेंच अनेक दृष्टान्तांनीं अधिक स्पष्ट करून दाखविलें आहे, तें असें:—

आत्मया बोलाचें । कांहींचि उपेगा न वचे ।
स्वसंवेद्या कोण्हाचें । वोझें आथी ॥ १३ ॥

पदांचा अर्थ—**आत्मया**–आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं; **बोलाचें**-शब्दाचा; **कांहींचि**–कांहींसुद्धां, यत्किंचितहि; **उपेगा**–उपयोग; **न वचे**–उरत नाहीं, होत नाहीं; **स्वसंवेद्या**–(**स्व**–स्वतःला; **सम्**–पूर्णपणानें; **वेद्या**–जाणणारा,) स्वतांस स्वतां पूर्ण ओळखणारा, चेतनस्वरूप अशाला; **कोण्हाचें वोझें**–कोणाचा भार, उपकार; **आथी**–आहे ?

भावार्थ—आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं शब्दाचा कांहींच उपयोग होत नाहीं. स्वतांच स्वतांला पूर्ण ओळखणाऱ्या अशा स्वसंवेद्य आत्म्याला आपलें स्वरूप जाणण्यास साहाय्यक म्हणून त्याचेवर इतर कोणाचा उपकार होणारा आहे ? ॥ १३ ॥

शब्द हा जड, अचेतन पदार्थाचें ज्ञान करून देतो. पण तो चेतन अशा स्वयंप्रकाश आत्म्याचें ज्ञान कसें करून देईल ?

आठवे कां विसरे । विखो होऊनि अवतरे ।
तरी वस्तूसी वस्तु दुसरें । असेना कीं ॥ १४ ॥

पदांचा अर्थ—आठवे कां विसरे–स्मरण होवो किंवा विस्मरण होवो; विखो होऊनि–विषय होऊन, माहिती होऊन; अवतरे–प्रकट होवो; तरी–तरीपण, तरीदेखील; वस्तूसी वस्तु–सर्वत्र आत्माच आत्मा, एकच आत्मा; दुसरें असेना कीं–त्यावांचून दुसरें कांहींहि नाहीं.

भावार्थ—शब्द हा स्मरण करणारा होवो किंवा विस्मरण पाडणारा होवो; अथवा तो दृश्य विषय किंवा ज्ञानरूप होऊन प्रकट होवो; तरी तेव्हां-देखील एकच एक, वस्तुच वस्तु अशी ही आत्मवस्तुच सर्वत्र असते. तिच्यावांचून दुसरें कांहींहि नसतेंच.

स्मरण किंवा विस्मरण हें आपल्याहून भिन्न पदार्थांविषयीं होतें. आणि परमात्मा हा स्वस्वरूपाचें स्मरण–विस्मरण या दोहोंहूनहि रहित अगदीं निराळा असा शब्दातीत केवळ नित्यस्वस्मरणरूप आहे. अशा स्वसंवेद्य आत्मवस्तूच्या वर्णनाविषयीं तर या शब्दाचा कांहींच उपयोग नाहीं. ॥ १४ ॥

आपण आपणातें। आठवी विसरे केउतें ।
काय जीभ जिभेतें । चाखे न चाखे ॥ १५ ॥

पदांचा अर्थ—आपण आपणातें–आपलें आपल्यास; आठवी विसरे–आठवील किंवा विसरेल; केउतें–हें कसें (संभवेल, घडेल); जीभ जिभेतें–जीभ स्वतांच जिभेला; चाखे, न चाखे–चाखतें किंवा चाखत नाहीं; काय ?–असें होईल काय, हें संभवेल काय ?

भावार्थ—एखादें आपलें आपल्यास आठवील किंवा विसरेल, असें संभवेल कसें ? जीभ ही स्वतः जिभेला, आपल्या स्वतःला चाखते किंवा चाखत नाहीं, असें हें संभवतें काय ? जिभेच्या स्वतांच्या ठिकाणीं जिभेहून इतर पदार्थ नसल्यामुळें ती स्वतःला चाखते हें म्हणतां येत नाहीं खरें. तरी पण ती इतर पदार्थांची ज्या अर्थी चव जाणते, त्या अर्थी तिच्या ठिकाणीं चवीचें जें ज्ञान आहे, तें तिच्या स्वतःच्या ठिकाणीं चाखणें, न चाखणें या दोहींविरहित असें नित्य निर्विकार स्वरूपानेंच आहे. ॥ १५ ॥

जागतेया नीद नाहीं । मा जागणें घडे काई ।
स्मरणास्मरण दोन्हीही । स्वरूपीं तैसीं ॥ १६ ॥

पदांचा अर्थ—जागतेया–जागत असलेल्याला; नीद नाहीं–झोंप नाहीं, नसते; मा–मग; जागणें घडे काई–" त्याचें तें जागणें, जागत बसणें आहे "

असें म्हणणें संभवेल काय?; स्मरणास्मरण–स्मरण–विस्मरण, आठव–नाठव; दोन्हीहि–हीं दोन्हीं; तैसीं स्वरूपीं–त्याप्रमाणें आत्मस्वरूपीं (नाहींत).

भावार्थ—जागा असलेल्याच्या ठिकाणीं झोंप नाहीं, मग तो जागा आहे, हें म्हणणें तरी संभवेल काय? तसें स्मरण–विस्मरण, आठव–नाठव हे दोन्ही भाव स्वस्वरूपाच्या ठिकाणीं कसे संभवतील? संभवतच नाहींत. ॥ १६ ॥

सूर्यो रात्री पां नेणे । मा दिवो काय जाणे ।
तेवीं स्मरणास्मरणें । आपण वस्तु ॥ १७ ॥

पदांचा अर्थ—सूर्यो–सूर्य; रात्री–रात्रीला; पां–जर; नेणें–जाणत नाहीं, माहीत नाहीं; मा–मग; तो दिवो–दिवस; काय जाणे–कसा कळणार; तेवीं–त्याप्रमाणें; स्मरणास्मरणें–(स्मरण + अस्मरणें); आठव–नाठव हीं दोन्हीहि, आपण वस्तु–परमात्मा स्वतां; नेणें–जाणत नाहीं.

भावार्थ—सूर्याला जशी रात्र, काळोख माहीत नसतो, मग त्याला दिवस काय माहीत असणार? तसेंच आत्मवस्तूला स्मरण–विस्मरण किंवा आठव–नाठव काय माहीत असणार? ॥ १७ ॥

एवं स्मरणास्मरण नाहीं । तरि स्मारकें काज काई ।
म्हणोनि इये ठायीं । बोलु न सरे ॥ १८ ॥

पदांचा अर्थ—एवं–याप्रमाणें; स्मरणास्मरण–स्मरण–विस्मरण हीं दोन्ही; नाहीं–(जेथें) नाहींत, (तेथें) स्मारकें–स्मरण करून देणारें, त्यांचें; तरि–तर मग; काज काई–कारण काय? म्हणोनि–म्हणून; इये ठायीं–या ठिकाणीं; बोलु–शब्द; न सरे–उरणार नाहीं, गति चालणार नाहीं.

भावार्थ—याप्रमाणें जेथें स्मरण–विस्मरण हीं दोन्ही नाहींत, मग तेथें स्मरण करविणाराचें काम काय? म्हणून या परमात्म्याच्या ठिकाणीं शब्द उपयोगी नाहीं, तो चालणार नाहीं, पुढें सरकणार नाहीं. ॥ १८ ॥

आणिक येक शब्दें । काज कीर भलें सिद्धें ।
परि धिवसा न बंधे । विचारु येथें ॥ १९ ॥

पदांचा अर्थ—आणिक–आणखी; शब्दें–या शब्दानें; येक काज–एक काम; भलें–चांगलें; कीर–खरोखर; सिद्धें–सिद्ध व्हावें खरें; परि–पण; येथें–या ठिकाणीं; विचारु–हा विचार; धिवसा–धीर; न बंधे–धरीत नाहीं, तो टिकणार नाहीं.

भावार्थ—या शब्दानें आणखी एक काम खरोखर चांगलें सिद्ध व्हावें खरें, पण या (परमात्म्याच्या) ठिकाणीं हाहि विचार धीर धरूं शकणार नाहीं. ॥ १९ ॥

कां जे बोलें अविद्या नाशे । मग आत्मेनि आत्मा भासे ।
हें म्हणतखेवीं पिसें । आलेंचि कीं ॥ २० ॥

पदांचा अर्थ—**कां** जे—कारण कीं; **बोलें**—शब्दानें; **अविद्या नाशे**—अविद्या नाश पावते; **मग**—नंतर; **आत्मेनि**—आत्म्याला; **आत्मा भासे**—आत्मा प्रकाशित होतो, भासतो; **हें म्हणतखेवीं**—हें म्हणतांक्षणींच; **पिसें**—वेडेपणा; **आलेंचि कीं**—येतोच ना ?

भावार्थ—कारण कीं, " शब्दानें अविद्या नाश पावते, नंतर आत्म्याला आत्मा भेटतो, " हें म्हणतांक्षणींच वेडेपणा येतोच कीं !

अविद्या म्हणजे विद्यमान नसणारा, अस्तित्व मुळींच नसणारा असा अभावरूप पदार्थ; आणि आत्मा म्हणजे ज्याला आपलें नित्य भान आहे असा. अशा नित्य ज्ञानमय आत्म्याच्या ठिकाणी या शब्दानें अविद्येचा नाश करून म्हणे आत्म्याला आपलें ज्ञान करून दिलें असें हें म्हणणें वेडगळपणाचें नाहीं का होणार ? ॥ २० ॥

हेंच श्रीज्ञानराज दृष्टान्तांनीं अधिक स्पष्ट करीत आहेत--

सूर्य रात्रीतें मारील । मा आपणातें उदो करील ।
हे कुडे न सरती बोल । साचाचे गांवीं ॥ २१ ॥

पदांचा अर्थ—सूर्य **रात्रीतें मारील**—सूर्य हा रात्रीला नाहींसें करील; **मा**—मग, नंतर; **आपणातें**—स्वतांचा; **उदो करील**—उदय करील; **साचाचे गांवीं**—खऱ्या विचाराला; **हे कुडे बोल**—हे खोटे शब्द; **न सरती**—पटणारे नाहींत, खपणार नाहींत.

भावार्थ—सूर्य आधीं रात्र नाहींशी करील आणि नंतर आपला उदय करील, हे असत्य, विचारास न पटणारे शब्द सत्याच्या ठिकाणीं चालणार नाहींत, खपणार नाहींत. ॥ २१ ॥

चेइलें निदे रुसे । ऐसी कें नींद असे ।
किं चेइलें चेवों बैसे । ऐसें चेणें आहे ? ॥ २२ ॥

पदांचा अर्थ—**चेइलें**–पूर्ण जागें असलेलें; **निदे रुसे**–झोंपेवर रागावले, झोंपेचें तोंड पाहणार नाहीं; **ऐसी कें नीद असे**–अशी एखादी झोंप कुठें असेल का? **किं**–किंवा; **चेइलें**–पूर्ण जागें असलेलें; (**तें**) **चेवों वैसे**–तें आणखी जागत बसेल; **ऐसें चेणें आहे**?–असलें एखादें जागणें असतें का?

भावार्थ—पूर्ण जागें असलेलें एखादें तें झोंपेवर रागावलें अशी एखादी झोंप कुठें असेल का? किंवा पूर्ण जागें असलेलें तें आणखी जागत बसेल असें एखादें जागणें कुठें असतें का?॥ २२ ॥

म्हणोनि नाशापुरती। अविद्या नाहीं निरुती।
नाहीं आत्मा आत्मस्थिती। रिगे ऐसा ॥ २३ ॥

पदांचा अर्थ—**म्हणोनि**–म्हणून (शब्दानें); **नाशापुरती**–नाश करण्याइतकी; **अविद्या निरुती नाहीं**–अविद्या वास्तविक नाहीं; **आत्मास्थितीं**–आपल्या स्वरूपांत; **रिगे**–शब्दानें प्रवेश करील; **ऐसा आत्मा नाहीं**–असा आत्मा नाहीं.

भावार्थ—म्हणून (ह्या वरील दृष्टान्तांतल्या गोष्टी घडणें जशा शक्य नाहींत, तसेंच) (शब्दानें अविद्येचा) नाश करण्यापुरती अविद्या वास्तविक नाहीं, खरी नाहीं, आणि (शब्दसाहाय्यानें) आपल्या स्वरूपांत प्रवेश करील असा आत्माहि नाहीं. ॥ २३ ॥

आतां या अविद्येचें अभावरूप कसें असतें हें श्रीज्ञानराज २९ व्या ओंवीपर्यंत दृष्टान्तांनीं सांगतात:—

अविद्या तंव स्वरूपें। वांझेचें कीर जाउपें।
मा तर्काचें खुरपें। खांडी कोणा ॥ २४ ॥

पदांचा अर्थ–**अविद्या तंव**–ही अविद्या तर; **स्वरूपें**–मूळरूपानें, मूळची तर, मुळांतली; **वांझेचें**–वंध्येचें; **कीर**–खरोखर; **जाउपें**–पोर; **मा**–मग; **तर्काचें**–शब्दरूपी; **खुरपें**–गवत कापणारें धारेचें हत्यार; **कोणा खांडी**–कोणाचा नाश करील?

भावार्थ—अविद्या मूळची तर खरोखर वंध्येचें पोर आहे. मग हें शब्दरूपी खुरपें कोणाचें खंडन करील, कोणाचा नाश करील?॥ २४ ॥

इन्द्रधनुषा सितें। कवणें धनवई न घालिजेतें।
तें दिसे तैसें होतें। साच जरी ॥ २५ ॥

पदांचा अर्थ—इन्द्रधनुषा–पावसांत सूर्यकिरणांनीं दिसणाऱ्या सातरंगी धनुष्याकाराला; **सिंतें**–दोरी; **तें दिसे तैसें**–तें दिसतें तसें; **जरी साच होतें**–जर खरें असतें; **कवणें धनवई**–कोणीं धनुर्धाऱ्यानें; **न घालिजेतें**–लावली नसती काय ?

भावार्थ—इन्द्रधनुष्य तें दिसतें तसें जर खरें असतें, तर कोणी तरी धनुर्धाऱ्यानें त्याला दोरी लावली नसती काय ? ॥ २५ ॥

अगस्तीचिया कौतुका । पुरती जरी मृगत्रुष्णिका ।
तरी मार देतो तर्का । अविद्येसी ॥ २६ ॥

पदांचा अर्थ—**अगस्तीचिया**–अगस्ति मुनीच्या; **कौतुका**–समाधानाला; **मृगत्रुष्णिका**–मृगजळ; **तरी**–तर; **तर्का**–शब्द हा; **अविद्येसी मार देतो**–अविद्येस मार देता, ठार करता; अविद्येचा नाश करणारा होता, झाला असता.

भावार्थ—अगस्तीच्या सहज घोंटाला जर मृगजळ पुरलें असतें, तर शब्द हा अविद्येस ठार करता; शब्द अविद्येचा नाश करणारा झाला असता. ॥ २६ ॥

साहे बोलाची वळघी । ऐसी अविद्या असे जगीं ।
तरी जाळुं ना कां आगी । गंधर्वनगरें ॥ २७ ॥

पदांचा अर्थ—**बोलाची**–शब्दाची; **वळघी**–चढाई, घात, आघात; **साहे**–सहन करील; **ऐसी अविद्या**–असली अविद्या; **जगीं**–जगांत; **असे**–असूं शकेल; **तरी**–तर; **आगी**–अग्नीनें, आगीनें; **गंधर्वनगरें**–आकाशांत उन्हाळ्यांत दिसणारे पांढऱ्या ढगांचे काल्पनिक आकार; **जाळुं ना कां**–कां जाळूं नयेत, जाळूं कां शकणार नाहीं, कां जाळतां येणार नाहींत, कां जाळणार नाहीं ?

भावार्थ—शब्दाचा आघात सहन करील एवढी जरी जगांत अविद्या खरी असेल, तर अग्नीला गंधर्वनगरें कां जाळतां येणार नाहींत ? ॥ २७ ॥

नातरी दीपाचिये सोये । आंधारु कीर न साहे ।
तेथें कांहीं आहे । जावयाजोगें ॥ २८ ॥

पदांचा अर्थ—**नातरी**–अथवा; **दीपाचिये सोये**–दिव्याचा आश्रय, प्रकाश; **आंधारु**–आंधार; **कीर**–खरोखर; **न साहे**–सहन होत नाहीं, सहन करीत नाहीं; **तेथें**–त्या ठिकाणीं; **जावयाजोगें**–नाहींसें होण्यासारखें; **कांहीं आहे ?**–कांहीं आहे काय ?

भावार्थ—किंवा दिव्याचें अस्तित्व, दिव्याचा प्रकाश अंधार खरोखर सहन करीत नाहीं, खरोखर अंधाराला दिव्याचा प्रकाश सहन होत नाहीं; मग त्या ठिकाणीं दिव्यानें नाहींसें होण्याजोगें कांहीं आहे काय ? ॥ २८ ॥

नातरी पहावया दिवसु । वातीचा कीजे सोसु ।
तेव्हडाहि उद्वसु । उद्यमु पडे ॥ २९ ॥

पदांचा अर्थ—नातरी–अथवा; दिवसु–दिवस, सूर्य; पहावया–पाहण्यासाठीं; वातीचा सोसु कीजे–वाती लावण्याची खटपट केली तर; तेव्हडाहि–तेवढा देखील; उद्वसु–व्यर्थ; उद्यमु–उद्योग, प्रयत्न; उद्वसु पडे–व्यर्थ होईल, व्यर्थ होतो.

भावार्थ—अथवा सूर्य पाहण्यासाठीं वाती लावण्याची खटपट केली, तर तेवढा मोठा तो जसा उद्योग व्यर्थ होतो, त्याप्रमाणेंच शब्दानें अविद्येचा नाश होतो, हें म्हणणेंहि अज्ञाणपणाचें ठरतें. ॥ २९ ॥

ह्या दृष्टान्तांनीं अविद्या अभावरूप असल्यानें ती केव्हांहि दिसणारी नाहीं असें सांगितलें. अर्थात् जगत् व जगतांतील सर्व प्रपंच व त्यांतला हा सर्व व्यवहार अभावरूप असत्य असा आहे. अविद्या, अभाव, अज्ञान, माया, प्रपंच, जगत्, हे सर्व एकाच अर्थाचे शब्द आहेत. म्हणून अज्ञान नांवाचा कांहीं एक पदार्थ आहे, आणि त्याचें हें कार्य दृश्य जगत् सत्य आहे असें प्रतिपादन करण्याचा शास्त्राचा हेतु नसून उलट मृगजळाप्रमाणें प्रत्यक्ष दिसत असतांना देखील हा जगद्रूप प्रपंच खोटाच आहे हें शास्त्र सांगत असतें व हाच अभिप्राय आणखी दृष्टान्तपूर्वक श्रीज्ञानेश्वरमहाराज स्पष्ट करीत आहेत तो असाः—

जेथें साउली न पडे । तेथें नाहीं जेणें पाडें ।
मा पडे तेथें तेव्हडे । नाहींच कीं ॥ ३० ॥

पदांचा अर्थ—जेथें–ज्या ठिकाणीं; साउली–छाया; न पडे–पडत नाहीं; तेथें–त्या ठिकाणीं; जेणें पाडे–जितक्या मानानें, ज्या प्रमाणांत; नाहीं–ती नसतें; मा–मग; पडें–जेथें पडतें; तेथें कीं–त्या ठिकाणींहि; तेव्हडे–तेवढी, तितकी; नाहींच–ती नसतेच, आजिबात–अगदींच नसतें.

स्पष्ट भावार्थ—ज्या ठिकाणीं छाया पडत नाहीं, तेथें ज्या मानानें ती नसते, तशीच मग जेथें ती पडते, तेथेंहि ती इतकी (दिसत असली) तरी ती

तेव्हांहि नसतेच, खरी ती नसतेच. ती जर खरी असती, तर पुरुष एक आणि त्याची सावली दुसरी असा खरोखर भेद दिसला असता, तो दिसत नाहीं. ॥३०॥

दिसतचि स्वप्न लटिकें । हें जागरीं होय ठाउकें ।
तेविं अविद्याकाळीं सतुकें । अविद्या नाहीं ॥ ३१ ॥

पदांचा अर्थ—**स्वप्न दिसतचि**–स्वप्न दिसत असूनहि; (तें) **लटिकें**–तें खोटें (आहे); **हें जागरीं**–असें जागें झाल्यावर; **ठाउकें होय**–माहीत होतें, समजतें; **तेविं**–तसेंच; **अविद्याकाळीं**–प्रपंचकाळीं, जगतांतल्या व्यवहारकाळीं; **अविद्या सतुकें नाहीं**–ती मुळींच नाहीं.

भावार्थ—स्वप्न दिसत असूनहि तें खोटें आहे, असें जागें झाल्यावर समजतें; तसेंच (आत्मजागृति झाली असतां म्हणजे परमात्मस्वरूपाची जागृति म्हणजे साक्षात्कार झाल्यावर) त्या अविद्यारूप प्रपंचकाळांतहि अविद्या म्हणजे हें स्वरूपविस्मरणाचें अज्ञान मग मुळींच नसतें.

मुबोध विवरण—शब्दाचा उपयोग नाश करण्यांत अशी कोणी कल्पना करील, तर ती बरोबर नाहीं, असें एकोणिसाव्या ओंवींत सांगितलें व तेंच पुढें तेविसाव्या ओंवीपर्यंत दृष्टान्तांनीं चार ओंव्यांनीं दृढ केलें. कारण अविद्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं मुळींच नाहीं, असें हें या अविद्येचें स्वरूप चोविसाव्या ओंवीपासून चौऱ्याहत्तराव्या ओंवीपर्यंत श्रीज्ञानराजांनीं वर्णिलें आहे. त्यांतील मुख्य अभिप्राय असा आहेः—वेदान्तशास्त्रांत मानलेल्या पदार्थांच्या तीन सत्ता—पारमार्थिक, व्यावहारिक व प्रातिभासिक अशा आहेत. ब्रह्म हें नित्य असून तें कधींहि मिथ्या ठरत नाहीं, म्हणून त्याची पारमार्थिक सत्ता. ब्रह्मज्ञानानें जें मिथ्या ठरतें, त्याची व्यावहारिक सत्ता; आणि ब्रह्मज्ञानावांचूनहि जें मिथ्या ठरतें त्याची प्रातिभासिक सत्ता. मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत भासणारा प्रपंच त्याचें ब्रह्मज्ञानानें निरसन होऊन तो मिथ्या ठरतो म्हणून त्याची व्यावहारिक सत्ता; आणि दोरीवर भासणारा सर्प ब्रह्मज्ञानावांचूनहि नुसत्या दोरीच्या ज्ञानानेंच मिथ्या ठरतो म्हणून त्याची प्रातिभासिक सत्ता. या तीन सत्तेंतल्या पदार्थांचा एकमेकांस कांहीं उपयोग होत नसतोच. एवढेंच नव्हे तर ते एकमेकांस मिथ्याहि ठरवूं शकत नाहींत. परंतु समानसत्तेंतील पदार्थ मात्र एकमेकांस साधक-बाधक होतात. एखाद्याला स्वप्नांत साप चावला तर त्याला जागृतींल्या मांत्रिकाचा, डॉक्टर–वैद्याचा किंवा इस्पितळांतल्या उपचारांचा कांहीं एक

उपयोग नाहीं. स्वप्नांतल्या त्या काल्पनिक शरीरास, सापास, त्या सर्पदंशास इलाज करावयाचे ते सर्व त्या स्वप्नांतलेच केले पाहिजेत. एका सत्तेंतील पदार्थांचा उपयोग दुसऱ्या सत्तेंत होत नाहीं. याचें कारण दोन्ही सत्ता एकमेकींपासून अगदीं भिन्नस्वरूपाच्या असतात, हें होय. शिवाय दोरीवर भासणारा सर्प दोरीच्या ज्ञानानें मिथ्या ठरतो म्हणून तो दोरीच्या ठिकाणीं केव्हांहि सत्य नसून नित्य अभावरूपच असतो. तसेंच ब्रह्मज्ञानानें असत्य ठरणारे व्यावहारिक व प्रातिभासिक पदार्थ हे ब्रह्माच्या ठिकाणीं सत्य नसून अत्यंत अभावरूपच होत. ते भासण्यास कारण जी अविद्या तीहि व्यावहारिक सत्तेंतील असल्यामुळें ती ब्रह्माच्या ठिकाणीं अत्यन्त अभावरूपच आहे. असें असूनसुद्धां व्यावहारिक व प्रातिभासिक सत्तेंतले पदार्थ प्रत्यक्ष दिसतात, म्हणून त्यांची वाट, त्यांची व्यवस्था लावण्याकरितां शास्त्रानें ह्या तीन सत्तांची कल्पना केली आहे. म्हणून श्रीज्ञानराजांनीं ह्या भिन्न सत्तेंतील दोन पदार्थ घेऊन दृष्टान्त दिले आहेत. ॥ ३१ ॥

पंचविसाव्या ओंवीपासून चौऱ्याहत्तराव्या ओंवीपर्यंत दोन्ही सत्तेंतील पदार्थ कसकसे योजले आहेत, हें सूक्ष्म अवलोकनानें सहज लक्ष्यांत येणारें आहे, तें आतां आपण पाहूं या :—

वोडंबरीचिया लेणिया । घरभरी आतुडलिया ।
नागवें नागविलिया । विशेष काई ॥ ३२ ॥

पदांचा अर्थ—**वोडंबरीचिया**—गारोड्याच्या खेळांतील; **लेणिया**—लेणीं, अलंकार, दागिने; **घरभरी**—सर्व घरभर; **आतुडलिया**—भरून ठेवले; **नागवें**—नागव्यास; **नागविलिया**—लुटल्यास; **विशेष काई**—विशेष काय होईल, फरक काय पडेल ?

सविवरण भावार्थ—गारुड्याच्या खेळांतील दागिने घरांत भरून ठेवले, किंवा एखाद्या नागव्यास लुटलें, तर त्यांत विशेष काय होईल ? याचें कारण कीं, गारुड्यानें दाखविलेले दागिने खरोखरीचे बहुमोल दिसत असतात खरे; पण तेव्हां सुद्धां खऱ्या व्यवहारांत त्यांना कांहींएक किंमत नसते. कारण मंत्राच्या योगानें केलेल्या डागिन्यांची सत्ता प्रातिभासिक असते आणि व्यवहाराची व्यावहारिक सत्ता असते. म्हणून व्यवहारामध्यें जरी बहुमोल असे ते दिसले तरी ते खरे मूल्यवान् नाहींत. किंवा एखाद्या नागव्यास लुटलें तर त्यापासून लुटारूस काय मिळावयाचें ? कारण त्याच्याजवळ लुटावयासच कांहीं नाहीं, तर लुटणार तरी काय ? ॥ ३२ ॥

मनोरथाचें परियेळ । आरोगिजतु कां लक्षवेळ ।
परि उपवासावेगळ अनु आथी ? ॥ ३३ ॥

पदांचा अर्थ—**मनोरथाचें**–मनांत कल्पना केलेली; **परियेळ**–पक्कान्नें; **आरोगिजतु**–आरोगिलीं, खाल्लीं; **लक्षवेळ**–लाखों वेळां; **परि**–तर; **उपवासा-वेगळ**–उपवासापेक्षां; **अनु आथी**–दुसरें कांहीं आहे का ?

भावार्थ—मनांत कल्पिलेलीं पक्कान्नें लाखों वेळां खाल्लीं, तरी त्यांत उपासापेक्षां दुसरें कांहीं आहे का ? ॥ ३३ ॥

मृगजळ जेथें नुमंडे । तेथें असो पां कोरडे ।
मा मंडे तेथें जोडे । वोल्हांशु कायी ॥ ३४ ॥

पदांचा अर्थ—**मृगजळ**– (मृग+जळ) मृगांनीं–हरणांनीं कल्पिलेलें पाणी; **जेथें**–ज्या ठिकाणीं; **नुमंडे**–होत नाहीं; **तेथें**–त्या जागीं; **कोरडे असो पां**–कोरडे असणारच; **मा**–मग, पण; **जेथें तें मंडे**–ज्या जागीं तें भासतें; **तेथें**–त्या जागीं; **वोल्हांशु**–ओलांश, ओलावा; **जोडे काय**–जोडेल का ?, मिळेल का ?

भावार्थ—मृगजळ ज्या जागीं उत्पन्न होतच नाहीं, मुळीं जेथें तें दिसतच नाहीं, तेथलें ठिकाण तर कोरडेंच असतें हें खरें; पण तें जेथें दिसतें, भासतें, तेथें तरी ओलावा प्राप्त होतो का ? ॥ ३४ ॥

हें दिसे तैसें असे । तरी चित्रींचेनि पाउसें ।
वोल्हावतु कां माणुसें । आगरां तळीं ॥ ३५ ॥

पदांचा अर्थ—**हें**–जें जगत् ; **दिसे**–दिसतें; **तैसें असें**–तसें असतें; **तरी**–तर मग; **चित्रींचेनि**–चित्रांतल्या; **पाउसें**–पावसानें; **माणुसें**–माणसें; **आगरां**–आगरें, भाताची शेतें; **तळीं**–तलाव; **वोल्हावतु कां**–भरून व भिजून गेलीं असतीं खचित.

भावार्थ—हें (प्रत्यक्ष दिसणारें जगत्) जसें दिसतें तसें खरें असतें, तर मग चित्रांतल्या पावसानें माणसें, भाताचीं शेतें भिजून जाऊन तळीं हीं खास भरून गेलीं असतीं. ॥ ३५ ॥

कालऊनि अंधारें । लिहों येती अक्षरें ।
तरी मसीचिये वोरबारें । कां शिणावें ॥ ३६ ॥

पदांचा अर्थ—**अंधारें**—काळोख हा काळा पदार्थ; **कालऊनि**—पाण्यांत कालवून; **अक्षरें**—शब्द; **लिहों येती**—लिहितां येतील; तरी—तर; **मसीचिये**—शाईच्या; **वोरबारें**—खटपटीनें; **कां शिणावे**—त्रास कां करावा, शीण कां करावा !

भावार्थ—(हें जें जगत् अविद्येचें कार्य अभावरूप तर खरें, पण तें प्रत्यक्ष दिसणारें असूनहि जसें दिसतें, तसें तें नाहीं; हें जसें वरच्या ओवींत सांगितलें, तसेंच या ओवींत अंधार काळाकुळकुळीत दिसतो तसाच जर तो खरोखरी काळा पदार्थ असतां, तर तो) अंधार (पाण्यांत) कालवून अक्षरें लिहितां आलीं असतीं. मग शाईकरितां (लागणाऱ्या काजळाची) खटपट करण्याचा शीण कोणी कां घ्यावा ? मग उगीच ती काजळाची खटपट कोणी कां करावी ? ॥ ३६ ॥

जसा पदार्थ दिसतो तसा तो नसतो असा एकदां जर सिद्धान्त मानला, तर मग तो तसा पदार्थहि दिसूं नये अशी शंका आली असतां दोन्ही पक्षांना जुळणारा असा आतां दृष्टान्त देतात :—

आकाश काय निळें । न देखती हे डोळे ।
तेविं अविद्येचि टवाळें । जाणोनि घेई ॥ ३७ ॥

पदांचा अर्थ—**आकाश**—हा निरवयव अवकाश, पोकळी; **हे डोळे निळे न देखती काय** ?—डोळे हे तें निळें आहे, हें पाहात नाहींत काय ? **तेविं**—त्याप्रमाणें; **अविद्येचि**—अविद्येचें कार्य हें जगत्; **टवाळे**—अनिर्वचनीय, न बोलतां येणारे; **जाणोनि घेई**—असें निश्चित समजावें.

सविवरण भावार्थ—हें आकाश डोळ्यांना निळें दिसत नाहीं काय ? त्याप्रमाणें अविद्येचें कार्य (हें जगत् नसूनहि दिसतें, म्हणून तें) अनिर्वचनीय आहे असें समजावें. जें ' आहे ' असें ' सत् ' म्हणूनहि म्हणतां येत नाहीं व जें ' नाहीं ' असें ' असत् ' हि म्हणतां येत नाहीं, असें जें " सत्–असत् " " आहे, नाहीं " ह्या दोहींहून जें विलक्षण, अगदीं निराळें त्यास अनिर्वचनीय म्हणतात.

एका पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो तो मूळपदार्थरूपच असतो. दोरीवर सर्प भासतो, तो मूळपदार्थ जो जी दोरी, त्या तद्रूपच असतो. मूळ जें अधिष्ठान परब्रह्म त्यावर भासणारें हें अनंतरूप जगत् तें तद्रूपच असतें. जगत् हें नित्य ब्रह्ममय आहे. तें प्रत्यक्ष दिसतें म्हणून आहे म्हणजे ' सत् ' म्हणावें, तर आत्मज्ञानानें तें नाहीं म्हणजे 'असत्', अभावरूप ठरतें. आणि एकाच वस्तूच्या ठिकाणीं हे दोन्ही भाव

'सत् व असत्' एकाच वेळीं असूं शकत नाहींत. म्हणून जें आहे 'सत्', व नाहीं 'असत्' असें दोन्हींहून विलक्षण, जें निराळें असतें त्यास 'टवाळ' अनिर्वचनीय म्हणतात. म्हणून श्रीज्ञानराजांनीं त्यासच वरील ओंवींत 'टवाळ' असें म्हटलें आहे.

आतां अविद्या म्हणजेच अभाव असा अविद्या शब्दाचा अर्थ स्पष्ट करतात, तो असाः—

अविद्या येणें नांवें। मी विद्यमानचि नव्हे।
ऐसी तेचि स्वभावें। सांगतसे॥ ३८॥

पदांचा अर्थ—अविद्या—'या न विद्यते'—जी नसते ती; **येणें नांवें**—या नांवावरूनच; **मी**—स्वतां; **विद्यमानचि नव्हे**—भावरूप नाहीं, अस्तित्वांत असणारी नाहीं; **ऐसी तेचि**—अशी तीच; **स्वभावें**—सहजच, स्वतांचें अस्तित्व, असणेंपण; **सांगतसे**—सांगत आहे.

भावार्थ—अविद्या या नांवावरूनच मी स्वतः अस्तित्वानें, असणेंपणानें नाहींच असें सहजच ती स्वतांचें नसणेंपण सांगत आहे. ॥ ३८ ॥

आणि इयें अनिर्वाच्यपण। तें दुजेंही देवांगण।
आपुल्या अभावीं आपण। साधीतसे॥ ३९॥

पदांचा अर्थ—आणि इयें—आणखी इनें, या अविद्येनें; **अनिर्वाच्यपण**—सत्—असत् याहून विलक्षण, निराळेंपण; **तें दुजेही देवांगण**—अशी ती आणखी दुसरी शपथ; **आपुल्या**—स्वतांच्या; **अभावीं**—अभावाबद्दल; **आपण**—स्वतांच; **साधीतसे**—सिद्ध करते.

भावार्थ—आणि इनें आहे 'सत्', व नाहीं 'असत्' असें आहे—नाहींपणाहून सत् असत्हून जें विलक्षण, अगदीं निराळें, असें न बोलून दाखवितां येणारें आपलें अनिर्वाच्यपण आहे, अशी दुसरी शपथ घेऊन आपलें नाहींपण सिद्ध केलें. ॥ ३९ ॥

अविद्या म्हणून कांहीं एक पदार्थ आहेच असा पूर्वपक्ष खालील ओंवींतील पाहिल्या चरणानें घेऊन त्याचें खंडण पुढील चरणांनीं दृष्टान्त देऊन करीत आहेत, तें असेंः—

कां हीच जरी आहे। तरी निर्द्धार कां न साहे।
वरी घटाभावें भोये। अंकित दिसे?॥ ४०॥

पदांचा अर्थ—**कां**–कारण; **हींच**–ही अविद्याच; **जरी आहे**–जर अस्तित्वानें आहे; **तरी**–तर मग; **निर्द्धार**–निर्धार, विवेक, विचार; **कां**–कां बरें; **न साहे**–सहन करीत नाहीं; **वरी**–हें पहा, अहो; **घटाभावें**–घटाच्या अभावानें, घट नसतांना; **भोये**–एखादी भुई, जमीन; (घट) **अंकित दिसे**–घटानें शोभणारी दिसेल काय, घटयुक्त दिसेल काय ?

भावार्थ—कारण हींच अविद्या जर आहे (अविद्या म्हणून कांहीं एक पदार्थ आहेच असें मत मानलें) तर मग ती विचारापुढें कां टिकत नाहीं ? हें पहा, घटाच्या अभावानें जमीन, भुई घटयुक्त दिसेल काय ? (मागील २० व्या ओवीमध्यें ह्या अविद्येच्या प्रकरणाचा आरंभ असा आहे, कीं "आत्म्याच्या ठिकाणीं अविद्या आहे, तिचा नाश शब्द करतो मग आत्म्यास आत्मा भेटतो." यावरून आत्म्याशीं संयुक्त अविद्या आहे, असा पूर्वपक्ष ओवीच्या पाहिल्या अर्धानें उपस्थित करून त्याच ओवीच्या दुसऱ्या अर्धापासून "अविद्या आत्म्याच्या ठिकाणीं नाहींच" असें त्रेचाळिसाव्या ओवीपर्यंत खंडण केलें आहे) ॥ ४० ॥

अविद्यानासीं आत्मा । ऐशी नव्हे प्रमा ।
सूर्या आंगीं तमा । जयापरी ॥ ४१ ॥

पदांचा अर्थ—**अविद्यानासीं**–अविद्येच्या नाशानंतर; **आत्मा**–मग आत्मा, मग आत्मप्राप्ति; **ऐसी प्रमा**–असा विचार, अशी प्रत्यक्षता, प्रत्यय, अनुभव; **नव्हे**–बरोबर नाहीं; **सूर्या आंगीं**–सूर्याच्या संबंधांत, ठिकाणीं, सूर्याच्या स्वरूपामध्यें; **जयापरी तमा**–जसा अंधकाराचा नाश.

भावार्थ—अविद्यानाशानंतरच आत्मप्राप्ति असा अनुभव नाहीं. सूर्याच्या संबंधांत जसा आधीं तमाचा नाश होतो, व मगच सूर्याची प्राप्ति होते; मगच सूर्य उदयास येतो, असा जसा अनुभव नाहीं; तसा 'तत्त्वमसि' शब्द हा आधीं अविद्येचा नाश करतो, मग अविद्यानाशानंतर आत्मस्वरूप प्राप्त होतें, असा अनुभव कोठेंहि नाहीं. ॥ ४१ ॥

यावर पूर्वपक्षानें पुनः शंका उपस्थित केली तिचें निरसन करतातः—

हे अविद्या तरि मायावी । परि मायावीपणाचि लपवी ।
साची आली अभावीं । आपुला हे ॥ ४२ ॥

पदांचा अर्थ—**हे अविद्या**– ही अविद्या; **तरि**–तर; **मायावी**–खोटी असून खरी भासणारी; **परि**–परंतु; **मायावीपणाचि**–असत्यपणाहि, अघटित-

पणाहि; **लपवी**–लपवून खरा भासविते; हे **आपुला अभावीं**–ही आपुल्या अभावाविषयीं; **साची आली**–खरी ठरते.

भावार्थ––ही अविद्या तर मायावी, खोटी खरी. तरीपण आपलें खोटेंपण देखील झांकून ठेवून ती खरी असल्याचें भासविते, हें तिचा या अशा भासविण्यानेंच ती आपल्या अभावाविषयीं खरी ठरते.

" ही अविद्या मायावी असून ती आपलें खोटें स्वरूप लपवून ठेवून खरी असल्याचें भासविते, असा सिद्धान्ती हे मायेचा जो अत्यंत अभाव म्हणतात, तें बरोबर नाहीं." असें जें पूर्वपक्ष म्हणतो त्यावर सिद्धान्ती सांगतात, कीं " अविद्या मायावी आहे " या म्हणण्यानेंच तिचा अभाव सिद्ध होतो व मायावी पदार्थ हा अत्यंत अभावरूप असा 'आहे–नाहीं' या दोन्हींहूनहि निराळा तो असतो. ॥४२॥

याप्रमाणें विसाव्या ओंवीच्या उत्तरार्धापासून " अविद्या आत्म्याच्या ठिकाणीं नाहीं. " असा हा उपक्रम म्हणजे जो आरंभ केलेला तो पूर्वपक्षाचें जें म्हणणें आहे कीं, " आत्म्याच्या ठिकाणीं अविद्या आहे, तिचा नाश शब्द करतो व मग आत्म्यास आत्मा भेटतो, म्हणजे आत्म्याशीं अविद्या ही संयुक्त आहे."– या त्याच्या शंकेचें समाधान करण्यासाठीं असून त्याचाच हा उपसंहार म्हणजे शेवट आतां या पुढील ओवींतल्या सिद्धान्तानें करतात, तो असाः—

बहुतापरी ऐसी । अविद्या नाहीं आपैसी ।
आतां बोलु हात वसी । कवणावरी ॥ ४३ ॥

पदांचा अर्थ—**बहुतापरी**–अनेक प्रकारांनीं पाहतां; **ऐसी अविद्या**–अशी ही मायावी अविद्या; **आपैसी नाहीं**–मुळांतच नाहीं; **आतां**–तर मग; **बोलु**–शब्द; **कवणावरी**–कोणावर; **हात वसी**–हात उगारील ?

भावार्थ—अनेक प्रकारांनीं पाहतां अशी ही मायावी अविद्या मुळांतच नाहीं, तर मग शब्द हा कुणावर हात उगारील ? (कारण नाश करण्यापुरतांदेखील हा अविद्या म्हणून जर पदार्थच नाहीं.) ॥ ४३ ॥

हेंच पुढील तीन ओव्यांतील दृष्टान्तांनीं श्रीज्ञानराज हा सिद्धान्त अधिक स्पष्ट करतातः—

साउलियेतें साबळें । हालयां भोय आदळे ।
कीं हालेनि अंतराळें । थोंटावे हातु ॥ ४४ ॥

पदांचा अर्थ—साउलियेतें-सावलीला; साबळें-पहारीनें; हालयां-हाणल्यानें; भोय-भुई, जमीन; आदळे-हादरेल; कीं-किंवा; अंतराळें-अंतराळास; आकाशाच्या पोकळीस; हालेनि-हाणल्यानें; हातु थोंटावे-हातच हासडेल, हातच हिसकेल.

भावार्थ—साउलीला पहारीनें हाणल्यानें भुई मात्र हादरेल; किंवा आकाशाच्या पोकळीला हाणल्यानें आपला हात मात्र हासडेल, झटका बसेल. (ज्याप्रमाणें सावली व आकाश हे पदार्थ मारण्याला योग्य नाहींत हें अनुभवसिद्ध आहे, तसेंच 'शब्दानें' अविद्येचा नाश करावा अशी 'अविद्या' नाहीं.) ॥ ४४ ॥

कां मृगजळाचा पानीं । गगनाचा आलिंगनीं ।
नातरी चुंबनीं । प्रतिबिंबाचा ॥ ४५ ॥

उठावला वोथरे तवंका । तो सुनाथ पडे असिका ।
अविद्यानासिं तर्का । तैसें होय ॥ ४६ ॥

पदांचा अर्थ—कां-अथवा; मृगजळाच्या पानीं-मृगजळांतील पाणी पिण्याविषयीं; गगनाच्या आलिंगनीं-आकाशांतील पोकळीच्या कवटाळण्याविषयीं; प्रतिबिंबाच्या चुंबनीं-आरशांतल्या मुखाच्या चुंबनाविषयीं; उठावला-उठलेली; तवंका-तीव्र इच्छा, अनावर मनोरथ; वोथरे-जागच्या जागींच जिरते, जिरतो; असिका-पूर्ण, अगदीं; तो-तवंका, मनोरथ; सुनाथ-शून्यांतला शून्य, व्यर्थ; पडे-होतो, ठरतो; तैसें-तसें; अविद्यानासिं-अविद्येच्या नाशाविषयीं; तर्का-शब्दाचें; होय-होतें.

भावार्थ—अथवा मृगजळांतील पाणी पिण्याविषयीं, आकाशाच्या पोकळीला कवटाळण्याविषयीं अथवा आरशांतल्या मुखाच्या चुंबनाविषयीं उठलेली तीव्र इच्छा जागच्या जागींच जिरते व ती अगदीं, पूर्ण व्यर्थ ठरते. तसें अविद्या नाशाविषयीं या शब्दाचें होत आहे. ॥ ४५-४६ ॥

अशा तऱ्हेच्या अविद्येचा नाश करावा असें इच्छिणाऱ्याचा उपहास करून त्याचें या पुढील नऊ ओव्यांनीं खंडन करतात तें असें—

ऐसी अविद्या नासावी । वाहेल जो जीवीं ।
तेणें साली काढावी । आकाशाची ॥ ४७ ॥

पदांचा अर्थ—ऐसी अविद्या—असली ही अविद्या; **नासावी**—नाहीशी करावी; **जो**—असा कोणी एक; **जीवीं**—मनांत; **वाहेल**—वागवील, आणील; **तेणें**—त्यानें; **आकाशाची**—पोकळीची; **साली**—साल, पापुद्रा, वरचा पदर; **काढावी**—सोलावी, दूर करावी.

भावार्थ—असली ही अविद्या, मुळांतच नसलेली, अभावरूप जी तिला नाहींशी करावी असें एखादा कोणी मनांत वागवील, तर त्याने आकाशाच्या पोकळीची साल, तिचा बाहेरचा पापुद्रा सोलून काढावा अशासारखेंच त्याचें तें होईल. ॥ ४७ ॥

तेणें सेळीगळां दुहावी । गुडघां वास पाहावी ।
वाळवोनि काचरी करावी । सांजवेळेची ॥ ४८ ॥

पदांचा अर्थ—**तेणें**—त्याने; **सेळीगळां**—शेळीच्या गळ्यांतल्या स्तनांची; **दुहावी**—धार काढावी; **गुडघां**—गुडघ्यांच्या डोळ्यांनीं; **वास**—वाट, मार्ग; **पाहावी**—न्याहाळावी; **सांजवेळेची**—संध्याकाळची; तिन्हीसांजेची; **वाळवोनि**—तापवून, ऊन देऊन; **काचरी**—बारीक काप; **करावी**—तयार करावी.

भावार्थ—त्यानें तर शेळीच्या गळ्यांतल्या स्तनाची खुशाल धार काढावी; गुडघ्यांच्या डोळ्यांनीं वाट पाहावी, साजवेळेला उन्हांत तापवून तिचे बारीक काप करावे. ॥ ४८ ॥

जांभै वांटूनि रसु । तेणें काढावा बहुवसु ।
कालवूनि आळसु । मोदळा पाजावा ॥ ४९ ॥

पदांचा अर्थ—**जांभै**—जांभया; **वांटून**—बारीक करून; **तेणें**—त्यानें; **बहुवसु**—पुष्कळसे; **रसु**—पातळ पाणी; **काढावें**—काढावें; **आळसु**—आळसाला; **कालवूनि**—पाण्यासारखें पातळ करून; **मोदळा**—मुख नसलेल्या मातीच्या चित्राला; **पाजावा**—तोंडांत ओतावा, घालावा.

भावार्थ—त्यानें जांभया बारीक वांटून त्यांचा पुष्कळसा रस काढावा; आळस पाण्यांत कालवून तो मुख नसलेल्या मातीच्या मोदळ्याला पाजावा. ॥४९॥

तो पाटा पाणी परतु । पडली साउली उलथु ।
वारयाचे तांथु । वळूं सुखें ॥ ५० ॥

पदांचा अर्थ—**तो**—असला कोणी; **पाटा**—पाटांतलें, बांधांतलें; **पाणी**—वाहणारें पाणी; **परतु**—मागें वळवून लावो, उलटे वाहविण्यास लावो; **पडली**—

पसरलेली; साउली–पडछाया; उलथु–उलट करो; वारयाचे–वाऱ्याचे पण; तांथु–तंतु; सुखें–सहज; वळूं–पीळ घालो.

भावार्थ—असा कोणी त्यानें पाटांतलें पाणी उलट वाहावयास लावावें, तें परतवावें; पसरलेली पडछाया उलथवावी; व वाऱ्याचे तंतु पण सहज वळावे. ॥ ५० ॥

तो बागुलातें मारू। प्रतिबिंब खोळे भरू।
तळहातींचे विंचरू। केस सुखें ॥ ५१ ॥

पदांचा अर्थ—तो–असला पुरुष; बागुलातें–बागुलबुवाला (रडणाऱ्या मुलांना गप्प करण्यास काल्पनिक भीति दाखविण्याचें आईनें योजिलेलें साधन); मारू–ठार करो; प्रतिबिंब–हुबेहूब चेहरा, पडछाया; खोळे–पदरांत, धोतराच्या घोळांत: भरू–सांठवो; तळहातींचे केस–तळव्यावरचे केस; सुखें–सहज; विंचरू–विंचरूं शकेल.

भावार्थ—असला पुरुष बागुलबुवाला ठार मारूं शकेल; प्रतिबिंब घोळांत भरील; तळहातावरचे केसहि सहज विंचरील तर. ॥ ५१ ॥

घटाचें नाहींपण फोडू। गगनाचिं फुलें तोडू।
ससयाचें मोडू। सिंग सुखें ॥ ५२ ॥

पदांचा अर्थ—घटाचें–मातीच्या घागरीचे; नाहींपण–अभाव; खोटेंपण; फोडू–तुकडे करो; गगनाचिं फुलें–खपुष्पें, आकाशफुलें; तोडू–खुडो; ससयाचें–सशाचें; सिंग–शिंग; सुखें–सहज, अनायासें; मोडू–चुरा करो.

भावार्थ—त्याने खुशाल मातीच्या घागरीचा नसलेला खोटा आकार फोडून टाकावा; आकाशाचीं फुलें पण तोडावीं व सशाचे शिंग तर सहज मोडून टाकावें. ॥ ५२ ॥

तो कापुराची मसी करू। रत्नदीपीं काजळ धरू।
वांजेचें लेंकरूं। परणू सुखें ॥ ५३ ॥

पदांचा अर्थ—तो–असला कोणी एक; कापुराची मसी करू–कापराची शाई तयार करो; रत्नदीपीं–रत्नाच्या तेजावर; काजळ धरू–काजळी धरो; वांजेचें लेंकरूं–वांझेचें मुलीशीं; सुखें–आनंदानें; परणू–लग्न लावो.

भावार्थ—असल्या कोणी एकानें कापराचीहि शाई तयार करावी. रत्नाच्या तेजावर काजळ धरावें; वांझस्त्रीच्या मुलीशीं आनंदानें लग्न करावें. ॥ ५३ ॥

तो अवसेचेनि सुधाकरें । पोसू पाताळींचीं चकोरें
मृगजळींचीं जळचरें । गाळू सुखें ॥ ५४ ॥

पदांचा अर्थ—**तो**–असल्या इसमानें; **अंवसेचेनि**–अंवसेच्या; **सुधाकरें**–चंद्रामृतानें; **पाताळींचीं चकोरें**–पाताळांतील चकोरपक्षी; **पोसू**–पोसावे; **मृगजळींचीं**–मृगजळांतल्या; **जळचरें**–माशांना; **सुखें**–सहजच; **गाळू**–गळानें बाहेर काढावें.

भावार्थ—त्यानें अंवसेच्या चंद्राच्या अमृतानें पातळांतील चकोर पक्षी पोसावे; मृगजळांतील माशांना खुशाल गळानें बाहेर काढावें !

अहो हें किती बोलावें । अविद्या रचिली अभावें ।
आतां काई नासावें । शब्दें येणें ॥ ५५ ॥

पदांचा अर्थ—**अहो हें किती बोलावें**–अहो, हें किती म्हणून वर्णन करावें ? **अविद्या अभावें रचिली**–अविद्या ही नाहींपणानेंच भरलेली, कल्पिलेली **आहे; आतां**–यामुळें; **येणें शब्दें**–या शब्दानें; **काई**–कसा; **नासावें**–नाश करावयाचा ?

भावार्थ—अहो, हें किती सांगावें बरें ? अविद्या ही नाहींपणानेंच अशी असलेली, कल्पिलेली आहे. यामुळें या शब्दानें अशा अविद्येचा नाश कसा करावयाचा ? ॥ ५५ ॥

नाहीं तयाचे नाशें । शब्द न ये प्रमाणदशे ।
आंधारीं आंधारें जैसें । नव्हे रूप ॥ ५६ ॥

पदांचा अर्थ—**नाहीं**–मुळींच नसलेलें; **तयाचे नाशें**–त्याच्या नाशानें; **शब्द**–वेद; **प्रमाणदशे**–सत्यपणाला; **न ये**–येत नाहीं; **जैसें**–जसें; **आंधारीं**–काळोखांत; **आंधारें**–अंधाराला; **रूप नव्हे**–आकृति नाहीं, स्वरूप नाहीं.

भावार्थ—मुळींच नसलेल्या काळोखासारख्या त्या अविद्येचा नाश करण्यांत काळोखांतल्यासारख्या या शब्दाला सत्यपणा येणार नाहीं; कारण अंधारांत जशी अंधाराला आकृति प्राप्त होत नाहीं, तद्वतच तें या शब्दाचें होय. ॥ ५६ ॥

अविद्येची नाहीं जाती । तेथें नाहीं म्हणतया उक्ती ।
जेवीं दुपारीं कां वाती । आंगणींचिया ॥ ५७ ॥

पदांचा अर्थ—अविद्येची जाती नाहीं–अविद्येची उत्पत्तिच जर नाहीं: तेथें उक्ती म्हणतया नाहीं–त्या ठिकाणीं उक्ती जो शब्द तो उच्चारण्यापुरतांहि नाहीं; जेविं–ज्याप्रमाणें; दुपारीं–दोन प्रहरीं; आंगणींचिया–अंगणांतला वातीचा दिवा असतो.

भावार्थ––ज्याप्रमाणें दोन प्रहरीं अंगणांत लावलेल्या वातीचा दिवा काय उपयोगाचा? त्याप्रमाणें अविद्येलाच अस्तित्व नाहीं, त्या ठिकाणीं या शब्दाची उक्ति किंवा युक्ति नाहीं म्हणण्यासारखीच ती. ॥ ५७ ॥

न पेरितां शेतीं । जे कीं संवगणिया जाती ।
तयां लाजेपरौति । जोडी आहे ? ॥ ५८ ॥

पदांचा अर्थ—शेतीं–शेतांत; न पेरितां–पेरणी न करतां; जे कीं–जे नुसतेंच; संवगणिया जाती–काढणीला जातील; तयां–त्यांना; लाजेपरौति–लाजेपेक्षां; जोडी आहे–प्राप्ति आहे काय ?

भावार्थ—शेतांत पेरणी न करतांच जे कोणी काढणीला जातील, त्यांना लाजेपेक्षां दुसरी प्राप्ति आहे काय ? (कारण त्यांना काढणीला कांहींच नाहीं म्हणून लाजच वाटेल.) ॥ ५८ ॥

खवणियाच्या आंगा । जेणें केला वळघा ।
तो न करितांच उगा । घरीं होता ॥ ५९ ॥

पदांचा अर्थ—खवणियाच्या–आकाशाच्या; आंगा–अंगावर, पोकळीच्या भागावर; जेणें–ज्यानें, एखाद्यानें; वळघा केला–चढाव केला तर; उगा–स्वस्थ; तो न करितांचि उगा घरीं होता–तो न केल्यासारखाच होऊन आपण आपलें जागींच जणुं स्वस्थच असतो.

भावार्थ—आकाशांतल्या पोकळींतल्या भागावर एखाद्यानें चढाव केला, तर तो कांहीं न केल्यासारखाच होऊन करणारा स्वस्थ आपल्या घरींचच तो असावा असा तो आपल्या स्वतांच्याच ठिकाणीं होता, हें म्हणण्यास हरकत कोणची ? (कारण शब्दानें अविद्येचा नाश केला असें पूर्वपक्षी म्हणेल, तर अविद्येचा अत्यंत अभाव मनांत आणून या शब्दानें कांहींएक केलें नाहीं, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.) ॥ ५९ ॥

पाणियावरी वरखु । होतां कें असे विशेखु ।
अविद्यानाशें उन्मेखु । फांकावे तैसा ॥ ६० ॥

पदांचा अर्थ—पाणियावरी–समुद्रावर; **वरखु**–वर्षाव; **होतां**–झाला असतां; **विशेखु**–विशेष, फरक, अधिक; **कें असे**–काय होईल ? **अविद्यानाशें**–अविद्या जो अभावरूप पदार्थ त्याच्या नाशाविषयीं; **उन्मेखु**–(उन्मेष)–ज्ञान, प्रयत्न; **फांकावे**–प्रकट व्हावयाचें; **तैसा** (होय) त्यापैकींच होय.

भावार्थ—समुद्रावर वृष्टि झाली म्हणजे काय विशेष होतें ? अविद्येचा नाश करण्यानें जें ज्ञान प्रकट व्हावयाचें तें त्याचपैकीं होय. (समुद्राचें पाणी आणि वृष्टीचें पाणी हीं दोन्ही एकरूपच जशीं, त्याप्रमाणें अविद्या आणि शब्द-ज्ञान हीं दोन्ही एकरूप असल्यामुळें अविद्येचा नाश करण्यांत शब्दज्ञानाचा प्रयत्न व्यर्थ होय.) ॥ ६० ॥

माप मापपणें श्लाघे । जंव आकाश मऊ न रिघे ।
तम पाहतां वाउगें । दीपाचें जन्म ॥ ६१ ॥

पदांचा अर्थ—**माप मापपणें**–मोजण्याचें एखादें साधन, माप, माप-पणानें; **श्लाघे**–(तोंपर्यंत) शोभेल; **जंव**–जोंपर्यंत; (ते) **आकाश**–पोकळी; **मऊ**–मोजण्यास; **न रिघे**–गेले नाहीं: **दीपाचें जन्म**–दिव्याचा उदय; **तम**–काळोखानें; **पाहतां**–पाहिल्यास पाहातांच; **वाउगें**–व्यर्थ काळोख होतो.

भावार्थ—जोंपर्यंत आकाशाच्या पोकळीचें माप घेण्यास एखादें (पायली, अधोली) माप निघालें नाहीं, तोंपर्यंतच तें मापपणानें शोभेल; दिव्याचा उदय अंधारानें पाहिल्यास पाहातांच तो अंधार व्यर्थच होईल. ॥ ६१ ॥

गगनाची रससोये । जीभ जैं आरोगूं जाये ।
मग रसना हें होये । आडनांव कीं ॥ ६२ ॥

पदांचा अर्थ—**गगनाची**–आकाशाची; **रससोये**–पक्वान्न; **जीभ जैं**–जीभ जर; **आरोगूं जाये**–चव घेईल; **मग**–तर; **रसना**–जीभ; **आडनांव**–निरर्थक, व्यर्थ.

भावार्थ—जीभ जर गगनाच्या अन्नाची चव घेईल, तर तिचें 'रसना' हें नांव व्यर्थ, निरर्थक होईल. ॥ ६२ ॥

नव्हतेनि वल्लभें । अहेवपणें कां शोभे ॥
खातां केळीचे गाभे । न खातां गेले ॥ ६३ ॥

पदांचा अर्थ—**नव्हतेनि**–जिवंत नसतांना; **वल्लभें**–पति, नवरा; **अहेव-पण**–सुवासिनीपण; **शोभे कां**–शोभेल काय; **केळीचे गाभे**–केळीच्या पोटांतला

पोकळ भाग; **खातां**–खाऊं लागल्यास; **न खातां गेले**–तें न खातां आल्यानें व्यर्थच होईल.

भावार्थ—पति जिवंत नसतांना तें सुवासिनीपण शोभेल काय? केळीच्या पोटांतली पोकळी कोणी खाऊं लागल्यास तें खाणें न होतां तें व्यर्थच जाईल. ॥ ६३ ॥

स्थूळ सूक्ष्म कवण येकु । पदार्थु न प्रकाशी अर्कु ? ।
परि रात्रीविषईं अप्रयोजकु । जालाचि कीं ॥ ६४ ॥

पदांचा अर्थ—**स्थूळ**–अति मोठा; **सूक्ष्म**–अति लहान; **कवण**–असा कोणता; **येकु पदार्थ**–एक पदार्थ, एखादी वस्तु; **अर्कु**–सूर्य; **न प्रकाशी**–प्रकाशित करीत नाहीं? **परि**–पण; **रात्रीविषयीं**–रात्रीच्या बाबतींत; **अप्रयोजकु**–असमर्थ, निरुपयोगी; **जालाचि कीं**–होतोच ना?

भावार्थ—अति मोठा पदार्थ असो, किंवा अति लहान तो असो, असला कोणताहि पदार्थ सूर्य प्रकाशित करीत नाहीं काय? परंतु रात्रीच्या बाबतींत तो असमर्थ ठरतोच ना? ॥ ६४ ॥

दिठी पाहतां काय न फावे । परि निदेतें तंव न देखवे ।
चेतां ते न संभवे । म्हणोनियां ॥ ६५ ॥

पदांचा अर्थ—**दिठी पाहतां**–दृष्टीनें पहावयास लागलें असतां; **काय न फावे**–काय दिसत नाहीं? **परि**–परंतु; **निदेतें**–झोंपेला; **तंव**–मात्र; **न देखवे**–ती पाहूं शकत नाहीं; **म्हणोनियां**–कारण; **चेतां**–जागा असलेल्याच्या ठिकाणीं; **ते**–ती झोंप; **न संभवे**–संभवत नाहीं, शक्य होत नाहीं.

भावार्थ—दृष्टि ही पहात असतां तिला काय दिसत नाहीं? (सर्व कांहीं दिसतें.) परंतु निद्रेला मात्र ती पाहूं शकत नाहीं. कारण जागा असणाऱ्याच्या ठिकाणीं ती निद्रा शक्य नसते; तिचा संभव नसतो. ॥ ६५ ॥

चकोराचिया उद्यमा । लटिकेपणाची सीमा ।
जरि दिहाचि चंद्रमा । गिंवसूं बैसे ॥ ६६ ॥

पदांचा अर्थ—**जरि**–जर; (चकोरपक्षी); **दिहाचि**–दिवसाच; **चंद्रमा**–चंद्राला; **गिंवसूं बैसे**–शोधूं बसेल, शोधीत राहील; (तर) त्या **चकोराचिया**–त्या चकोराचा; **उद्यमा**–उद्यम, खटपट, खटाटोप, प्रयत्न; **लटिकेपणाची**–व्यर्थपणाची; **सीमा**–हद्द (होईल).

भावार्थ—जर चकोरपक्षी दिवसाच चंद्राला शोधीत राहील, तर त्या चकोराचा तो खटाटोप व्यर्थपणाची हद्दच होईल. ॥ ६६ ॥

नुसुधियेचि साचा । मुका होय वाचकाचा ।
अंतराळीं पायांचा । पेंधा होय ॥ ६७ ॥

पदांचा अर्थ—नुसुधियेचि-नुसताच, कोरा; **साचा**-सांचा, ठसा, कागद; **वाचकाचा**-वाचणारा; **मुका**-उच्चार न करतां येणारा; **होय**-होईल; **अंतराळीं**-अंतराळांत, पोकळींत; **पायांचा**-चालणारा;**पेंधा**-पांगळा;**होय**-होईल.

भावार्थ—नुसता कोराच कागद वाचणारा हा मुका म्हणजे उच्चार न करतां येणाराच होईल. आकाशाच्या पोकळींत चालणारा पांगळाच होईल.

तैसीं अविद्येसन्मुखें । सिद्धचि प्रतिषेधकें ।
उठलींच निरर्थकें । जल्पें होती ॥ ६८ ॥

पदांचा अर्थ—**तैसी**-त्याप्रमाणें; **अविद्येसन्मुखें**-अभावरूप अशा अविद्येच्या; **सन्मुखें**-समोर, पुढें; **प्रतिषेधकें**-निषेध करणारें; **जल्पें**-(अकारान्त नपुंसकलिंगी एकवचनी जल्प शब्द-जसें फूल, मूल तद्वत्)- शब्द, विचार; **सिद्धचि**-सिद्ध होऊन, पूर्ण तयारीनें; **उठलींच**-जिवावर बेतली; (तरी तीं) **निरर्थकें**-व्यर्थ; **होती**-होतील.

भावार्थ—त्याप्रमाणें या अभावरूप अविद्येच्या पुढें येऊन तिचा निषेध करावयाला, तिचा नाश करण्याला अगदीं सिद्ध होऊन पूर्ण तयारीनें जरी हा शब्द तिच्या जिवावर उठला तरी तो प्रयत्न व्यर्थ होईल. (अस्तित्वांत नसलेल्याचा नाश करणें हें व्यर्थ होय.) ॥ ६८ ॥

अंवसे आला सुधाकरू । न करीच काय अंधकारू ।
अविद्यानासीं विचारू । तैसा होय ॥ ६९ ॥

पदांचा अर्थ—**अंवसे**-अंवसेच्या काळोख्या रात्रीं; **सुधाकरू**-चंद्र; **आला**-उदय पावला, उगवला; **अंधकारू**-काळोख; **न करीच काय**-करीत नाहीं काय? **अविद्यानासीं**-अविद्येच्या नाशाविषयीं; **विचारू**-शब्द; **तैसा होय**-तशी स्थिति होते.

भावार्थ—अंवसेच्या रात्रीं जरी चंद्र उदयास आला, तरी तो अंधार करणार नाहीं का? त्याचप्रमाणें अविद्येच्या नाशाविषयीं या विचाराची (शब्दाची) स्थिति होईल. ॥ ६९ ॥

नाना न निफजतेनि अन्नें । जेवणें तेंचि लंघनें ।
निमालेनि नयनें । पाहणाचि अंधु ॥ ७० ॥

पदांचा अर्थ—**नाना**–अथवा; **न निफजतेनि**–तयार न केलेल्या; **अन्नें**–अन्नाचें; **जेवणें**–जेवण, जेवणें; **तेंचि लंघनें**–तेंच उपोषण होय; **निमालेनि**–फुटलेल्या; **नयनें**–डोळ्यांनीं; **पाहणाचि**–पाहणारा; **अंधु**–अंधळा.

भावार्थ—अथवा तयार न केलेल्या अन्नाचें जेवण जेवणें तें जसें उपोषण; तसेंच फुटलेल्या डोळ्यांनीं पाहणारा तो अंधळाच होय. ॥ ७० ॥

कैसीही वस्तु नसे । तेथें जैं शब्दाचा अर्थ हों बैसे ।
तैं निरर्थकपणें नासे । शब्दही थिता ॥ ७१ ॥

पदांचा अर्थ—**कैसीही**–कसलाच, कोणताच; **वस्तु**–पदार्थ; **नसे**–जो नाहींच; **तेथें**–त्या विषयींचा; **जैं**–जर, **शब्दाचा अर्थ**–शब्दाचा प्रयत्न; **हों बैसे**–होत राहील; **तैं**–तर; **निरर्थक**–(तो) निरर्थक; **थिता**–फुकट जाऊन; **शब्दही**–शब्द देखील; **नासे**–नाहींसा होईल.

भावार्थ—कोणताहि पदार्थ जो मुळींच नाहींच, त्याच्या अस्तित्वाविषयीं जर शब्दाचा प्रयत्न होऊं लागला तर तो व्यर्थ जाऊन आपल्या अस्तित्वानें असलेला हा शब्दच निरर्थक नाहींसा होईल. ॥ ७१ ॥

आतां अविद्याचि नाहीं । हें कीर म्हणों काई ।
परि ते नाशितां कांहीं । नुरेचि शब्दाचें ॥ ७२ ॥

पदांचा अर्थ—**आतां**–म्हणून; **अविद्याचि नाहीं**–अविद्याच नाहीं; **हें कीर म्हणों कांहीं**–हें खरोखर काय सांगावयाचें ? **परि**–कारण, मग; **ते नाशितां**–तिचा नाश करण्यांत; **शब्दाचें कांहीं नुरेचि**–शब्दाचें काम कांहींच रहात नाहीं.

भावार्थ—आतां अविद्याच नाहीं, हें खरोखर काय सांगावें ? तर मग तिचा नाश करण्याचें शब्दाला कांहींच काम उरत नाहीं. ॥ ७२ ॥

यालागिं अविद्येचिया मोहरां । उठलियाहि विचारा ।
आंगाचाचि संसारा । होऊनि ठेला ॥ ७३ ॥

पदांचा अर्थ—**यालागिं**–याकरितां; **विचारा**–विचार, शब्द; **अविद्येचिया मोहरां**–अविद्येच्या सन्मुख; **उठलियाहि**–(तोंड देण्यास) उभा राहील तर; **आंगाचाचि**–स्वतांचाच; **संसारा**–नाश; **होऊनि ठेला**–ठरलेलाच होईल.

भावार्थ—याकरितां (अविद्येचा नाश करण्याकरितां) विचार जो शब्द हा अविद्येच्या सन्मुख उभा राहील, तर त्याचा स्वतांचाच नाश ठरलेलाच समजावें. ॥ ७३ ॥

म्हणौनि अविद्येचेनि मरणें । प्रमाणा येईल बोलणें ।
हें अविद्याचि नाहींपणें । नेदी घडों ॥ ७४ ॥

पदांचा अर्थ—म्हणौनि–म्हणून; अविद्येचेनि मरणें–अविद्येच्या नाशानें; बोलणें–शब्द; प्रमाणा–सत्यत्वाला, खरेपणाला; येईल–प्राप्त होईल तर; (अविद्याचि नाहींपणें) तें घडों नेदी–तें होऊं देणार नाहीं.

भावार्थ—म्हणून अविद्येच्या नाशानें शब्दाला आपल्या अस्तित्वाचा खरेपणा येईल, ही गोष्ट अविद्याच आपल्या नाहींपणामुळें, आपल्या अभावामुळेंच घडूं देणार नाहीं. ॥ ७४ ॥

आणि आत्मा हन आत्मया । दाऊनि बोलु महिमेया ।
येईल हे साविया । विरुद्धचि ॥ ७५ ॥

पदांचा अर्थ—हन–खरोखर; महिमेया–मोठेपणास; साविया–सहजच, अगदींच; विरुद्धचि–विरुद्धच, उलटच.

भावार्थ—आणि आत्म्याला आत्मा खरोखरीचा दाखवून हा शब्द जर मोठेपणाला प्राप्त होईल, तर तें अगदींच विरुद्ध होय. ॥ ७५ ॥

शब्दाच्या मोठेपणाची एक बाजू अशी आहे कीं, आत्म्याला स्वतांचें प्रत्यक्ष, अपरोक्ष असें ज्ञान करून देण्यांत शब्दाला प्रमाणत्व येईल. परंतु तें सुद्धां घडत नाहीं हें पुढील दृष्टान्तांनीं सिद्ध करतात, कीं:—

आपणया आपणपेंसीं । लागलें लग्न कवण देसीं ।
कीं सूर्य अंग ग्रासी । ऐसें ग्रहण आहे ? ॥ ७६ ॥

पदांचा अर्थ—आपणया आपणपेंसी–आपलें आपल्याशींच; कीं–किंवा; कवणे देसीं–कोणत्या देशांत; सूर्य अंग ग्रासी–सूर्य आपलें बिंब स्वतांच ग्रासतो.

भावार्थ—कोणत्या देशांत एखाद्याचें आपलें आपल्याशींच लग्न लागलें आहे काय ? किंवा सूर्य आपलें बिंब आपणच ग्रासतो, नाहींसें करतो, असें ग्रहण शक्य आहे काय ? ॥ ७६ ॥

गगन आपणया निघे? । सिंधु आपणया रिघे? ।
तळहात काय वळघे । आपणया? ॥ ७७ ॥

पदांचा अर्थ—**गगन**-आकाश; **आपणयां**-स्वतांमध्यें; **निघे**-निघेल काय, गमन करील काय; **सिंधु**-महासागर; **आपणया**-स्वतांमध्यें; **रिघे**-प्रवेश करील काय; **वळघे**-चढेल, बसेल; **तळहात आपणया**-हाताचा तळवा स्वतांवर.

भावार्थ—आकाश (सर्वव्यापी असल्यामुळें) तें स्वतांमध्यें गमन करील काय? समुद्र आपल्या पोटांत प्रवेश करील काय? तळहात आपल्या तळव्यावर बसेल काय? ॥ ७७ ॥

सूर्यो सूर्यासि विवळे? । फळ आपणया फळे? ।
परिमळ परिमळें । घेपत असे? ॥ ७८ ॥

पदांचा अर्थ—**विवळे**-उदय करतो काय? **फळ फळे**-फळ फळाचा उपभोग घेतें काय? **परिमळें परिमळ**-सुगंधानें स्वतांचा सुगंध; **घेपत असे**-घेतला आहे काय?

भावार्थ—सूर्य सूर्याचाच म्हणजे स्वतांचाच कधीं उदय करतो का? फळ आपल्या स्वतांला लागतें का? किंवा तें स्वतांचा उपभोग घेतें का? तसेंच सुगंधानें आपल्या स्वतांचा सुगंध कधीं घेतला आहे का? ॥ ७८ ॥

चराचरा पाणी पाजणी । करूं येईल येके क्षणीं ।
परि पाणियासि पाणी । पाजवेल काई ॥ ७९ ॥

भावार्थ—जगांतील सर्व चर-अचर, जड-चेतन अशांस एकाच क्षणांत पाणी पाजण्याचें (कदाचित्) करतां येईल. परंतु पाण्याला पाणी पाजतां येईल काय? ॥ ७९ ॥

साठी तिनशा दिवसां । माजीं येखादा होय ऐसा ।
जे सूर्यासीच सूर्य जैसा । डोळां दावी? ॥ ८० ॥

भावार्थ—तीनशेंसाठ दिवसांमध्यें एखादा तरी असा दिवस असतो का, कीं जो सूर्यालाच (दुसरा) सूर्य डोळ्यांना दाखवील? ॥ ८० ॥

कृतान्त जरी कोपेल । तरी त्रैलोक्य हें जाळील ।
वांचूनि आगी लावील । आगीसि काई? ॥ ८१ ॥

भावार्थ--कृतान्त म्हणजे प्रळयकाळचा अग्नि जर कोपला तर फार तर हें त्रैलोक्य जाळून टाकील. पण तो आगीला आग लावील काय ? ॥ ८१ ॥

आपणपें आपणया । दर्पणेंविण धात्रेया ।
समोर व्हावया । ठाकी आहे ? ॥ ८२ ॥

पदांचा अर्थ—दर्पणेंविण–आरशावांचून; धात्रेया–ब्रह्मदेवाला; ठाकी–सोय.

भावार्थ—ब्रह्मदेवाला स्वतां आरशांत पाहिल्यावांचून त्याला आपल्या स्वतांच्या समोर उभें राहतां येण्याची सोय करतां येईल काय ? तो आपल्या स्वतांसमोर उभा राहूं शकेल एवढें सामर्थ्य त्याला आहे काय ? ॥ ८२ ॥

दिठी दिठीतें रिघों पाहे । रुचि रुचीतें चाखों सुये ।
कीं चेतया चेतऊं ये । हें नाहींच कीं ॥ ८३ ॥

भावार्थ--डोळ्यानें डोळ्यांत प्रवेश करावा, चवीनें चवीलाच चाखून पाहावें, किंवा जाग्यालाच जागें करावें, हें होणें कधींहि शक्यच नाहीं. ॥ ८३ ॥

चंदन चंदना लावी ? । रंगु रंगपणा रावी ? ।
मोतींपण मोतीं लेववी । ऐसें कैंचें ? ॥ ८४ ॥

पदांचा अर्थ—रावी–रंगवावें; लेववी ऐसें–अंगावर घालावें; कैंचें–असें कसें होईल ?

भावार्थ--चंदनानेंच स्वतांत चंदन म्हणजे गंध किंवा उटी लावावी, रंगानें रंगालाच रंगवावें, मोत्यानेंच मोतीं अंगावर घ्यावें, असें कसें होईल ? ॥८४॥

सोनेंपण सोनें कसी ? । दीपपण दीप प्रकाशी ? ।
रसपणा बुडी दे रसीं । तें कें जोडे ? ॥ ८५ ॥

भावार्थ—सोनेंच सोन्याचा कस लावील, दिवाच दिव्याला प्रकाशील, पाणी पाण्यांत बुडी देईल, हें कधीं घडेल काय ? ॥ ८५ ॥

आपुलिये मुकुटीं समर्था । चंद्र बैसविला सर्वथा ।
परी चंद्र चंद्राचिये माथां । वाऊं ये काई ॥ ८६ ॥

भावार्थ—समर्थ अशा श्रीशंकरांना आपल्या मस्तकावर चंद्राला सहज बसवितां आलें, तसें चंद्राला आपल्या स्वतांच्या मस्तकावर चढून बसतां येईल काय ? तर हें सर्व अशक्यच. ॥ ८६ ॥

तैसा आत्मराजु तंव । ज्ञानमात्रचि भरीव ।
आतां ज्ञानें ज्ञानासि खेंव । कैसें दीजे ॥ ८७ ॥

भावार्थ—त्याप्रमाणें स्वयंज्ञानमय आत्मा तर सर्वत्र घनदाट, ओतप्रोत भरलेला आहे. मग या शब्दशास्त्ररूप ज्ञानानें त्या स्वरूपज्ञानाला मेट कशी द्यावी? म्हणजे वेदशास्त्रांतल्या या गुणजन्य शब्दज्ञानानें स्वयंभु आत्मज्ञान प्रगट कसें व्हावें? (होणारच नाहीं.) ॥ ८७ ॥

मग शंका अशी कीं शब्दज्ञानानें आत्मा प्रगट होत नसेल तर न होवो. परंतु आत्मा स्वतांच ज्ञानरूप असल्यानें त्यानें आपल्या स्वयंज्ञानानेंच आपणच प्रकट होण्यास काय हरकत? याचें समाधान असें कीं आत्म्याच्या ठिकाणीं सत्त्व-रजतमात्मक असें कोणत्याहि कर्माचें कर्तृत्व नाहीं असा शास्त्रसिद्धान्त असल्यानें त्यानें स्वतांस निराळेपणानें जाणणें हेंहि घडणें कसें शक्य नाहीं, हेंच आतां श्रीज्ञानेश्वरमहाराज दृष्टान्तपूर्वक सिद्ध करून ९३ व्या ओवींत त्याची मिळवणी करतात, ती अशी—

आपुलेनि जाणपणें । आपणयातें जाणों नेणें ।
डोळ्यां आपुलें पाहाणें । दुवाड जैसें ॥ ८८ ॥

पदांचा अर्थ—**जैसें**–जसें; **डोळ्यां**–डोळ्यांना; **आपुलें पाहाणें**–स्वतांला पाहणें; **दुवाड**–(द्वाड) कठीण; (**तैसें**) **आपुलेनि जाणपणें**–स्वतांलाच जाणण्यानें; **आपणयातें**–स्वतांला; **जाणों**–जाणणें; **नेणें**–जाणत नाहीं, निराळें उरत नाहीं, निराळें राहात नाहीं.

भावार्थ—जसें डोळ्यांना आपल्या स्वतांला पाहतां येणें कठीण, तसें (हा आत्मराज केवळ ओतप्रोत भरीव ज्ञानघन आहे, म्हणून) हा आपल्याला पूर्ण जाणत असल्यानें त्याच्या स्वतांचें आपल्याला निराळें जाणणें राहात नाहीं. ॥ ८८ ॥

आरिसा आपुलिये । आंगीं आपण पाहे ।
तरी जाणणें जाणों लाहे । आपणयातें ॥ ८९ ॥

भावार्थ—आरसा आपल्या ठिकाणीं आपल्याला पाहील तर आत्म्याची जाणीव ही स्वतांला जाणूं जाईल. (आत्म्याचें ज्ञान हें स्वतांला निराळेंपणानें ओळखूं शकेल). ॥ ८९ ॥

दिगंतापैलीकडेचे । धांवोनि सुरिया खोंचे ।
मा तिये का तियेचें । आंग फुटे ? ॥ ९० ॥

भावार्थ—दिगंतापलीकडच्या पदार्थांत सुरी जोरानें जाऊन खुपसेल खरी, पण तिला तिचे स्वतांचें अंग फोडतां येईल का ? ॥ ९० ॥

रसवृत्तीसी उगाणें । घेऊनि जिव्हाग्र शाहाणें ।
परी कायी कीजे नेणे । आपणापें चाखों ॥ ९१ ॥

पदांचा अर्थ—**रसवृत्तीसी**–रसांचे चवींचे प्रकारांचा; **उगाणें**–अनुभव (हिशोब); **शाहाणें**–कुशल.

भावार्थ—अनेक प्रकारच्या चवींचा अनुभव घेण्यांत जिव्हाग्र कुशल खरें; परंतु स्वतांला ते चाखूं जाणत नाहीं, याला काय करावें ? ॥ ९१ ॥

तरि जिव्हे काई आपलें । चाखणें हन ठेलें ।
तसें नव्हे संचलें । तेंचि तें कीं ॥ ९२ ॥

भावार्थ—तरी जिभेचें आपलें स्वतांचें जें चाखणेपणाचें काम तें कधीं थांबतें का ?–तें कधींच थांबत नसतें. कारण तें जिव्हाग्र स्वतांमध्यें चाखणेंपणानेंच पूर्ण भरलेलें असतें. ॥ ९२ ॥

तैसा आत्मा सच्चिदानंदु । आपणया आपण सिद्धु ।
आतां काय दे शब्दु । तयाचे तया ॥ ९३ ॥

भावार्थ—तसा आत्मा हा सत्–चित्–आनंद, नित्यज्ञानरूप आनंदघन आपण आपल्या ठिकाणीं ओतप्रोत भरलेला असा सहजसिद्ध आहे. आतां त्या ज्ञानघनाला (शब्दु तयाचें काय दे ?) हा शब्द आत्म्याला स्वतांचें ज्ञान काय करविणार ? (कारण जगात जेवढें ज्ञान म्हणून आहे, तें सर्व परमात्माच आहे.) ॥ ९३ ॥

कोणाही प्रमाणाचेनि हातें । वस्तु घे ना नेघे आपणयातें ।
जें स्वयेंचि आइतें । घेणें ना न घेणें ॥ ९४ ॥

पदांचा अर्थ—**कोणाही**–कोणत्याहि; **प्रमाणाचेनि**–वेद, शास्त्र, श्रुति, स्मृति हीं प्रमाणें, या प्रमाणग्रंथज्ञानाच्या; **हातें**–साहाय्यानें; **वस्तु**–आत्मा; **आपणयातें**–आत्मपणाला; **घे**–घेतो, पावतो; **ना**–अथवा; **नेघे**–पावत नाहीं, (हे दोन्ही भाव नाहींत); **जें**–आत्मस्वरूप; **आइतें**–आइतें, मूळचें; **स्वयेंचि**–

स्वयंसिद्धच; (तेथें) घेणें न घेणें–प्राप्त करून घेणें व न घेणें; ना–हीं दोन्ही नाहींत.

भावार्थ—वेदशास्त्र, श्रुति, स्मृति इत्यादि प्रमाणग्रंथांतल्या ज्ञानाच्या साह्यानें आत्मा हा आत्मपणाला प्राप्त होणें किंवा प्राप्त न होणें या दोन्हीहि भावांविरहित तो मूळचाच स्वयंसिद्ध असाच आहे. तेथें हें प्राप्त होणें किंवा न प्राप्त होणें हे धर्म मुळींच नाहींत. ॥ ९४ ॥

म्हणोनि आत्मा आत्मलाभें । नांदऊनि शब्दु शोभे ।
येईल ऐसा न लभे । उमसु घेवों ॥ ९५ ॥

पदांचा अर्थ— म्हणोनि–म्हणून; शब्द–शास्त्रज्ञान; आत्माआत्मलाभें–आत्म्याला आत्मप्राप्तीचा; नांदऊनि–आनंद देऊन; शोभे येईल–योग्यता पावेल, महत्त्वास येईल; ऐसा–असा; उमसु–विचार, उमज; घेवों न लभे–उत्पन्न होऊं शकत नाहीं.

भावार्थः—म्हणून शब्दशास्त्रज्ञान आत्म्याला आत्मप्राप्तीचा आनंद देण्याच्या योग्यतेस येईल असा विचार उत्पन्न होऊं शकत नाहीं. ॥ ९५ ॥

एवं माध्याह्नींची दिवी । तम धाडी ना दिवो दावी ।
तैसी उभयतां पदवी । शब्दा जाली ॥ ९६ ॥

भावार्थ—जसा भर दुपारच्या सूर्याच्या प्रकाशांत टेविलेला दिवा अंधार घालवीत नाहीं अथवा दिवसहि दाखवीत नाहीं; अशीच दोन्ही प्रकारची स्थिति या शब्दाची झाली आहे. ॥ ९६ ॥

ती दोन्ही प्रकारची शब्दाची स्थिति कशी तें पुढीलप्रमाणें महाराज सांगतातः—

आतां अविद्या नाहींपणें । नाहीं तयेतें नासणें ।
आत्मा सिद्धुचि मा कोणें । काय साधावें ? ॥ ९७ ॥

भावार्थ—आतां अविद्या अभावामुळें जर ती मुळांतच नाहीं अशा त्या मुळींच नसणाऱ्या अविद्येचा नाश करणें हेंहि पण शक्यच नाहीं. आणि आत्मा तर हा स्वयंसिद्धच. मग कोणीं काय साधावें ? ॥ ९७ ॥

ऐसा उभयपक्षीं । बोला न लावोनि नर्खीं ।
हारपला प्रळयोदकीं । वोघ जैसा ॥ ९८ ॥

भावार्थ—याप्रमाणें दोन्ही बाजूंनीं शब्दांचा नखाइतकाहि शिरकाव न होतांच ज्याप्रमाणें प्रलयोदकांत ओघ नाहींसा होतो, त्याप्रमाणें शब्द हा आपणाहि नाहींसाच झालेला होय. ॥ ९८ ॥

आतां बोला भागु कांहीं । असणें जयाच्या ठाईं ।
अर्थता तरि नाहीं । निपटुनियां ॥ ९९ ॥

पदांचा अर्थ—बोला-शब्दाला; भागु-जागा; अर्थता-संबंध; निपटुनियां-मुळींच; जयाच्या ठायीं-त्या आत्म्याच्या ठिकाणीं; असणें नाहीं-शक्य नाहीं.

भावार्थ—आतां असल्या या शब्दाला या आत्मास्वरूपाच्या ठिकाणीं कांहीं अस्तित्वाचा भाग असण्याचा तर मुळी संभवच उरलेला नाहीं. ॥ ९९ ॥

बागुल आला म्हणितें । बोलणें जैसें रितें ।
कां आकाश वोळंबतें । तळहातीं ॥ १०० ॥

भावार्थ—बागुलबुवा आला म्हणणारे बोल जसे व्यर्थ किंवा आकाश तळहातांत धरणें, हें जसें व्यर्थ. ॥ १०० ॥

तैसीं निरर्थकें जल्पें । होऊनियां सपडपें ।
शोभती जैसे लेपें । रंगावरी ॥ १०१ ॥

पदांचा अर्थ—जल्पें-शब्द; सपडपें-परिवारासह; रंगावरी-रंगवलेल्या भिंतीवरील; लेपें-चित्रें.

भावार्थ—त्याप्रमाणें शब्द त्याच्या परिवारासह व्यर्थ होऊन रंगवलेल्या भिंतीवरील चित्राप्रमाणें तो शोभेचा ठरतो. ॥ १०१ ॥

एवं शब्दैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें ।
साचपणें वनें । चित्रींचीं जैसीं ॥ १०२ ॥

भावार्थ—याप्रमाणें केवळ शब्दावरच जगणारीं बिचारीं ज्ञानें व अज्ञानें चित्रांतील अरण्यें जितकीं खरीं दिसतात तितकींच हीं खरीं भासतात. ॥ १०२ ॥

या शब्दाचा निमाला । महाप्रळयो होसरला ।
अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा ॥ १०३ ॥

पदांचा अर्थ—जैसा-जसा; अभ्रासवें-आभाळाबरोबरच; दुर्दिनु-कोंदट हवेचा दिवस; सरला-संपतो तसा; या शब्दाचा निमाला-या वेदशास्त्र-

शब्दाचा (उपयोग, पसारा) नष्ट झाला म्हणून (त्यावर जगणारीं ज्ञान–अज्ञानें यांचा); **महाप्रळयो**–अत्यंत नाश; **होसरला**–पूर्ण होऊन गेला आहे.

भावार्थ—जसा आभाळ गेल्याबरोबरच त्याचा परिणाम कोंदट हवेचा तो दिवस, तोहि पूर्ण नाहींसा होतो; तसेंच आतां या शास्त्रज्ञान शब्दाचाहि जो फार विस्तार तोहि लय पावला गेला असल्यानें त्यावरच आधारून जगणारीं जीं ज्ञान-अज्ञानें त्यांचा पण लोप पूर्णपणें होऊन गेला. ॥१०३॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे शब्दखंडनं नाम षष्ठं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवादरूप परब्रह्मपरमात्म्याचें ओतप्रोत वर्णन असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें शब्दखंडननामक प्रकरण सहावें समाप्त.

प्रकरण सातवें

अज्ञानखंडन

गेल्या सहाव्या प्रकरणाच्या शेवटीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं असा सिद्धान्त केला कीं, "एवं शब्दैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें । साचपणें वनें । चित्रींचीं जैसीं ॥"

अशीं शब्दैक-जीवनें म्हणजे शब्दानें उच्चारण्यापुरतींच जीं ज्ञानें व अज्ञानें तीं दोन्हीं जशीं चित्रामध्यें वनें काढतात तीं सत्य नसून केवळ आभासमात्र असतात, त्याप्रमाणें परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं सत्य नसून केवळ आभासमात्र आहेत. त्यांपैकीं अज्ञान परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं नाहींच, हें अभावरूप अशा व्यतिरेकदृष्टीनें गेल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें अन्वयदृष्टीनेंहि अज्ञानाचा आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं अत्यंत अभावच आहे, हें सांगण्याकरितां या प्रकरणाचा आरंभ आहे.

सहाव्या प्रकरणांत व ह्या प्रकरणांत जरी याचीच पुनरुक्ति दिसली, तथापि मुमुक्षु जिज्ञासूला आत्मस्वरूपाविषयीं दृढनिश्चय व्हावा एवढ्याचकरितां अत्यंत कळकळीनें श्रीज्ञानराजांनीं तीच ती गोष्ट, तोच तो सिद्धान्त वारंवार सांगितला आहे, म्हणून ती पुनरुक्ति होत नाहीं.

आतां ज्ञान व अज्ञान हे धर्म कसे सापेक्ष आहेत, तें महाराज सांगतातः-

येऱ्हवीं तरी अज्ञाना । जैं ज्ञानाची नसे क्षोभणा ।
तैं तऱ्ही काना । खालींच दडे ॥ १ ॥

पदांचा अर्थ—**येऱ्हवीं तरी**—वास्तविक पाहतां; **अज्ञाना**—जडाला; **जैं**—जर; **ज्ञानाची**—चेतनाची; **क्षोभणा**—टेका, आधार, पाठिंबा; **नसे**—नसेल; **तैं**—तर (तें); **तऱ्ही**—मग; **कानाखालींच**—श्रवणापलीकडेच; **दडे**—लपून राहील, दूर राहील, ऐकूं येणार नाहीं.

भावार्थ—वास्तविक पाहतां या जड अज्ञानाला जर जीव या चेतन-ज्ञानाचा आधार नसेल तर, मग तें श्रवणापलीकडे दूरच राहील, ऐकूंच येणार नाहीं. ॥ १ ॥

जीव हा ज्ञानमय चेतनस्वरूप आहे. त्याच्या ज्ञानप्रकाशानें प्रकाशणारीं श्रवणादिक इंद्रियें, प्राण, मन, बुद्धि हीं सर्व जड असून या अज्ञानकार्याला आधार जीव या चैतन्यज्ञानाचा आहे. ॥ १ ॥

अहो, शास्त्रामध्यें अज्ञानाला भावरूप मानून अनादिहि मानलें आहे. असें असतां हीं ज्ञान व अज्ञान दोन्हींहि परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं अभावरूप आहेत, हें जें तुम्ही सांगतां, हें कसें ? या शंकेचें निरसन महाराज पुढील ओवीनें करतातः—

अडसोनि आंधारीं । खद्योत दीप्ति शिरी ।
तैसें लटिकें वरी । अनादि होय ॥ २ ॥

पदांचा अर्थ—खद्योत–काजवा; आंधारीं–अंधाराचा; **अडसोनि**–आश्रय घेऊन; दीप्ति–आपलें तेज; शिरी–मिरवतो; **तैसें**–तसेंच; **लटिकें**–(हें अज्ञान) अभावरूप असूनहि; वरी–आणखी देखील; **अनादि**–हें केव्हां उत्पन्न झालें, तें सांगतां येणारें नसूनहि; (हें) **होय**–हें अस्तित्वानें असणारें भासतेंच.

सविवरण भावार्थ—ज्याप्रमाणें काजवा हा अंधाराचा आश्रय घेऊन आपलें तेज मिरवतो, त्याप्रमाणें अज्ञान हें अभावाचा आश्रय घेऊन अनादिपणें मिरवत आहे. ॥ २ ॥

सर्व जीवांच्या कल्याणाची व्यवस्था लावतेवेळीं शास्त्रकारांना एक भावरूप अज्ञानाची कल्पना करावी लागते, याचें दिग्दर्शन प्रथम प्रकरणांत विस्तारपूर्वक केलेलेंच आहे. तसेंच उत्तम जिज्ञासूला उपदेश करतेवेळीं शास्त्रकारांनीं ग्रंथांमधून अज्ञानाचा अत्यंत अभावच दर्शविला आहे. हा ग्रंथहि उत्तम अधिकाऱ्यांकरितांच असल्यानें ह्यामध्यें कर्म उपासनादिकांचा विचार न करतां केवळ तत्त्वावबोधप्राप्ति त्यांना कशी व्हावी याचाच विचार केला आहे. म्हणून येथें अज्ञानाचा अत्यंत अभावच प्रतिपादणें आहे. काळोखामध्यें काजवा उगीच चमकल्यासारखा दिसतो खरा. पण तो प्रकाश त्याच्या स्वतांपुरतासुद्धां नीट नसतो, मग काळोख घालविणें तर दूरच; आणि मग सूर्योदयानंतर तर त्याचें अस्तित्वच नसतें. तसेंच अज्ञान अत्यंत लटकें असून अनादि आहे. त्याचें अस्तित्व परब्रह्मस्वरूप अशा या ज्ञानघन स्वयंप्रकाशाच्या ठिकाणीं मुळींच नाहीं, तेंच महाराज येथून पुढें दृष्टान्तांनीं स्पष्ट करून विस्तारपूर्वक सांगताहेत—

जैसी स्वप्ना स्वप्नीं महिमा । तमीं मानु असे तमा ।
तेंवि अज्ञाना गरिमा । अज्ञानींचि ॥ ३ ॥

भावार्थ—जसें स्वप्नाचा मोठेंपणा स्वप्नांतच–(जागृतींत नाहीं.) अथवा काळोखाला मान, महत्त्व काळोखांतच–(प्रकाशांत नाहीं), त्याप्रमाणें अज्ञानाची थोरवी अज्ञानांतच. ॥ ३ ॥

कोल्हेरीचे वारु । न येति धारकीं धरूं ।
न ये लेणा शृंगारूं । वोडंबरीचा ॥ ४ ॥

पदांचा अर्थ—**कोल्हेरीचे**–मातीचे, नकली; **वारु**–घोडें; **धारकीं**–युद्धांत, युद्धाला, रणांगणावर; **धरूं न येति**–धरतां, घेतां येत नाहींत; **वोडंबरीचा**–मांत्रिकांचें; **शृंगारूं**–अलंकार; **लेणा**–त्याववयास, धारण करण्यास; **नये**–येत नाहींत; उपयोगी नाहींत.

भावार्थ—कुंभाराचे मातीचे घोडे जसे रणांगणावर धरतां, नेतां येत नाहींत, (ते जसे लटके) मांत्रिकाचे अलंकार जसे अंगावर घालण्याचे उपयोगी पडत नाहींत, (तसें अज्ञान हें लटकें आहे.) ॥ ४ ॥

हें जाणणेयाच्या घरीं । खोंचिलेहि आन न करी ।
काइ चांदिणां उठे लहरी । मृगजळाची ॥ ५ ॥

पदांचा अर्थ—हे जाणणेयाच्या घरीं–हें अज्ञान आत्मज्ञानाच्या ठिकाणीं, परब्रह्मस्वरूपामध्यें; **खोंचिलेंहि**–यास डवचलें, शोधून पाहिलें असतांहि; **आन**–भिन्नपणानें; **न करी**–तें प्रत्ययास येत नाहीं; **चांदिणां**–चांदण्यांत; **लहरी**–लाट; **उठे काइ**–उसळते काय? **मृगजळाची**–खोट्या वाहणाऱ्या पाण्याची.

भावार्थ—परब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं अज्ञानाला डवचून त्याला शोधलें असतांहि तें भिन्नपणानें दिसून येत नसतेंच. चांदण्यामध्यें मृगजळाची लाट उसळेल काय? ती उत्पन्न होईल काय? ॥ ५ ॥

आणि ज्ञान हें जें म्हणिजे । तें अज्ञानचि पा दुजें ।
येक लपऊनि दाविजे । येक नव्हे? ॥ ६ ॥

भावार्थ—आणि ज्ञान असें हें ज्याला म्हणतात, तेंहि पण दुसरें अज्ञानच. जणुं एक लपवावें व एक बाहेर काढून दाखवावें तशांतलें तें नव्हे काय? तीं दोन्हीहि लटकींच. ॥ ६ ॥

असो आतां हा प्रस्तावो । आधीं अज्ञानाचा ढांढोळा घेवों ।
मग तयाच्या साचीं लाहो । ज्ञानहि लटिकें ॥ ७ ॥

पदांचा अर्थ—प्रस्तावो–प्रस्तावना, वर्णन; ढांढोळा–शोध; साचीं–खरेपणांत, सिद्धान्तांत.

भावार्थ—हा जो ज्ञानखंडनाचा प्रस्ताव आहे, तो तूर्त असूं द्या, राहूं द्या. (त्याबद्दलचा "ज्ञानखंडन" म्हणून याच्या पुढच्या आठव्या प्रकरणांत विचार होणार आहे.) आधीं अज्ञानाचा शोध घेऊं या. मग त्याच्या शोधानें ज्ञानहि व्यर्थ ठरेलच. ॥ ७ ॥

या अज्ञान ज्ञानातें । आंगींचि आहे जितें ।
तरी जेथें असे तयातें । नेण कां न करी ॥ ८ ॥

पदांचा अर्थ—आंगींचि–स्वरूपीं, परब्रह्माच्या ठिकाणीं; जितें–अस्तित्व; नेण–लोप.

भावार्थ—ह्या ओंवीच्या पूर्वार्धांत शंका उत्पन्न केली असून तिचें तिच्या उत्तरार्धांत समाधान आहे. शंका अशी कीं हें जें अज्ञान व जें ज्ञान आहे, तीं दोन्हीं तुमचें परमात्मस्वरूप जें ज्ञान आहे, त्याच्या अंगीं म्हणजे त्याच्या ठिकाणीं अंगभूतच आहेत. यावर शंकासमाधान असें कीं, असें जर स्वीकारलें तर ज्या परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं तें अज्ञान आहे, तें त्याला ज्ञानहीन कां करीत नाहीं ? ॥ ८ ॥

अज्ञान जेथ असावें । तेणें सर्वनेण होआवें ।
ऐसी जाती स्वभावें । अज्ञानाची ॥ ९ ॥

पदयुक्त भावार्थ—ओंवीचा पूर्वार्ध शंकेचा आहे कीं, ज्या ठिकाणीं आमचें हें अज्ञान असतें त्यानें त्या ठिकाणाला, तुमच्या आत्म्याला सर्वनेण म्हणजे ज्ञानहीन करावें, असें तुमचें आम्हीं कां मानावें ? याचें उत्तर असें कीं अहो अज्ञानाचा जात्या स्वभावच हा कीं, त्यानें ज्ञानाचा लोपच करावा. कारण अज्ञान असेल तेथें कांहींच जाणतां येऊं नये, हा अज्ञानाचा धर्म साहजिकच आहे. ॥ ९ ॥

पुढील ओंवींत पुन्हा पूर्वपक्षाची शंका अशी कीं आम्हीं आठव्या ओंवींत सांगितलेला सिद्धान्त हा आमच्या पदरचा नसून तो शास्त्रकारांचा पक्ष

"स्वाश्रया स्वविषया" म्हणजे अज्ञान किंवा माया स्व म्हणजे परमात्मा याच्याच ठिकाणीं असून ती त्यासच आच्छादन करते—

तरी शास्त्रमत ऐसें । जें आत्माचि अज्ञान असे ।
तेणेंचि तो गिंवसे । आश्रो जरी ॥ १० ॥

पदांचा अर्थ—तरी—तसेंच; शास्त्रमत—शास्त्रसिद्धान्त व उपनिषदांचा निर्णय; जें—कीं, आत्माचि—आत्मस्वरूपावरच; अज्ञान—माया; असे—आहे, असतें; जरी (तो) आश्रो—तो आत्मा तिचा आश्रय असूनहि; तेणेंचि—त्या मायेच्या अज्ञानानेंच; तो—आत्मा; गिंवसे—गुरफटतो.

भावार्थ—तुमच्या उपनिषदांचाच निर्णय असा कीं, आत्म्यावर मायेचें अज्ञानरूप आवरण असतें व तो आत्मा त्याचा आश्रय असूनहि त्याच अज्ञानानें तो गुरफटला जातो. ॥ १० ॥

शास्त्रमत स्पष्ट करणारे सिद्धान्ती यावर प्रश्नपूर्वक दोन ओव्यांनीं उत्तर देतात.—

तरी नुठितां दुजे । जैं अज्ञान आहे बिजे ।
तैं तेंचि आथी हें बुझे । कोण येथें ? ॥ ११ ॥

पदांचा अर्थ—तरी—तर मग; दुजे—द्वैत, सृष्टि; नुठितां—उत्पन्न न होतांच; जैं—जर; अज्ञान—माया; बिजे आहे—बीजरूपानें असेल; तैं—तर; तेंचि आथी—तें आहे; हें येथें—हें असें; कोण बुझे ?—कोणीं जाणलें ?

भावार्थ—परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं हें द्वैत, ही सृष्टि उत्पन्न होण्याच्या पूर्वीच जर मायेचें स्वरूप जें हें अज्ञान बीजरूपानें असेल, तर सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी तें अज्ञान होतें हें कोणास समजलें, हें जाणलें कोणीं ? कारण ज्या उपनिषदादिक शास्त्रांच्या आधारानें पूर्वपक्षानें शंका उपस्थित केली कीं आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं अज्ञान आहे. पण त्याच शास्त्राचा मुख्य सिद्धान्त तर हा आहे कीं, "एकमेवाद्वितीयं ब्रह्म, नेह नानास्ति किंचन"— सर्वत्र एक परमात्माच आहे. परमात्म्याहून अन्य यत्किंचितहि नाहीं, असा अनेक श्रुतींचा अबाधित सिद्धान्त आहे. मग हें अज्ञान सृष्टीच्या पूर्वी जाणलें कोणीं ? ॥ ११ ॥

अज्ञानानेंच स्वतांला जाणलें असें म्हटलें तर—

अज्ञान तंव आपणयातें । जडपणें नेणें निरुतें ।
आंणि प्रमाण प्रमाणातें । होत आहे ? ॥ १२ ॥

पदांचा अर्थ—तंव–तर; **जडपणें**–अचेतनपणामुळें; **निरुतें**–मुळींच; **नेणें**–जाणत नाहीं; **प्रमाण**–प्रमाणभूत परमात्मा, स्वतःसिद्ध; **प्रमाणातें**–स्वतःच्या सिद्धस्वरूपाला प्रमाण होईल काय ?

भावार्थ—अज्ञान तर जडपणामुळें अचेतन असल्यानें तें स्वतांला मुळींच जाणत नाहीं आणि परमात्मा तर स्वतांला स्वतांच जाणणारा प्रमाणभूत असल्यानें त्याच्या ठिकाणी दुसऱ्या पदार्थाचा अत्यंत अभाव असल्यामुळें तो दुसऱ्या वस्तूच्या अस्तित्वाविषयीं आधारभूत कसा होईल ? ॥ १२ ॥

हेंच पुढील दोन ओव्यांनीं अधिक स्पष्ट करतात, तें असें—

यालागि जरी अज्ञान । करील आपुलें ज्ञान ।
हें म्हणत खेंवो घेववी मौन । विरोधुचि ॥ १३ ॥

पदयुक्त भावार्थ—यावरून जर अज्ञानच आपलें ज्ञान करून देतें, असें म्हटलें तर हें म्हणताक्षणींच 'अज्ञान' आणि 'तें ज्ञान करून देतें' हें विरुद्ध असल्यामुळें (शंका घेणारास) मुकाट्यानेंच बसावें लागेल, मौनच ध्यावें लागेल. ॥ १३ ॥

आणि जाणति वस्तु येक । ते येणें अज्ञानें केली मूर्ख ।
तैं अज्ञान हे लेख । कवण धरी ॥ १४ ॥

भावार्थ—" जाणति वस्तु येक " ज्ञानमय एकमेव हा तुमचा परमात्मा तो या आमच्या अज्ञानानें ज्ञानशून्य करून टाकला. यावर सिद्धान्ती विचारतात कीं, अशावेळीं 'हें अज्ञान आहे' असे हे शब्द कोणी धारण करावे ? अज्ञान तर अज्ञानच आणि ज्ञानरूप आत्माहि अज्ञानानें ज्ञानशून्य करून टाकला असतां हें अज्ञान आहे असें मग कोणी जाणावें ? ॥ १४ ॥

असें वरीलप्रमाणें प्रश्न करून आतां श्रीज्ञानराज अज्ञानवाद्यांचा पुढील प्रमाणें उपहास करतात कीं:—

अहो आपणयाहि पुरता । नेण न करवें जाणता ।
तयातें अज्ञान म्हणतां । लाजिजे कीं ॥ १५ ॥

पदयुक्त भावार्थ—" अहो ! आपणयाहि पुरता " या अज्ञानाला स्वतांपुरतें तरी 'जाणता' जो ज्ञानरूप परमात्मा त्याचा 'नेण न करवें' लोप न करवेल, तर त्याला अज्ञान म्हणावयाची " लाजिजे कीं " लाज वाटूं नये काय ? ॥ १५ ॥

यास दृष्टान्तानें अधिक स्पष्ट करतातः—

आभाळें भानु ग्रासे । तैं आभाळ कोणें प्रकाशे ।
सुषुप्तीं सुषुप्तया रुसे । तैं तेचि कोणा ॥ १६ ॥

पदयुक्त भावार्थ—ढगानें सूर्याला आच्छादित केलें, तर तो ढग आहे हें कोणाच्या प्रकाशानें समजणार ? " सुप्तया " गाढ झोपेंत निजलेल्याला ' सुषुप्तीं रुसे '—झोपेनें झांकून टाकलें तर " तेचि कोणा "—त्या झोपेचा अनुभव कोणास येईल ? ॥ १६ ॥

तैसें अज्ञान असें जेथें । तेंचि जरी अज्ञान आतें ।
तरी अज्ञान अज्ञानातें । नेणतां गेलें ॥ १७ ॥

पदयुक्त भावार्थ—असें ' जेथें ' ज्या ज्ञानाच्या ठिकाणीं ' अज्ञान असें ' अज्ञान आहे, ' तेंचि जरी ' त्याच ज्ञानाला जर ' अज्ञान आतें ' अज्ञानानें ज्ञानहीन केलें, तर अज्ञान अज्ञानाला ' नेणतां गेलें ' न जाणतां नष्ट झालें. (सर्वच अज्ञान झाल्यावर जाणणारा कोणीच नाहीं.) ॥ १७ ॥

नातरी अज्ञान येक घडे । हें जयास्तव निवडे ।
तें अज्ञान नव्हे फुडे । कोणे काळीं ॥ १८ ॥

पदयुक्त भावार्थ—'नातरी' तर मग 'अज्ञान येक घडे'—अज्ञान म्हणून एक अस्तित्वांत आहे " हें जयास्तव निवडे " हें ज्या ज्ञानानें निवडलें जातें, समजतें, " तें कोणे काळीं " तें निवडणारें ज्ञान केव्हांहि ज्ञानरूपच आहे, " अज्ञान फुडे नव्हे " तें निश्चयानें अज्ञान होणारच नाहीं. (हा अज्ञान शब्द पोकळ आहे. अज्ञान अज्ञान म्हणून जें विधान केलेलें आहे, तेंहि ज्ञानच आहे आणि म्हणूनच तें भासतें.) ॥ १८ ॥

हें पुढील दृष्टान्तांनीं सांगतातः—

पडळही आथी डोळां । आणि डोळा नव्हे आंधळा ।
तरी आथी या पोकळा । बोलिया कीं ॥ १९ ॥

पदयुक्त भावार्थ—डोळ्यांवर " पडळही आथी " पडदा आलेला आहे, आणि डोळा आंधळा नाहीं म्हणे, " तरी (पडळ) आथीं " तर मग तें पडळ आहे, " या बोलिया पोकळा कीं " हें बोलणें पोकळच ठरेल कीं ! ॥ १९ ॥

इंधनाच्या आंगीं । खवळलेन आगी ।
तें न जळे तैं वाउगी । शक्तिचि ते ॥ २० ॥

पदयुक्त भावार्थ—"इंधनाच्या आंगीं," लाकडाच्या मध्यें आग भडकली (खवळलेन आगी) असतांहि तें जर जळणार नाहीं, तर (तैं) ती अग्नीची दाहकशक्तिच खोटी ठरेल (वाउगी). ॥ २० ॥

आंधारु कोंडुनी घरीं । घरा पडसाइ न करी ।
तैं आंधार इहीं अक्षरीं । न म्हणावा कीं ॥ २१ ॥

पदयुक्त भावार्थ—अंधार घरांत कोंडून भरला असून घरांत 'पडसाइ' तो अंधार करीत नाहीं, तर 'अंधार' या शब्दानें तो म्हटला जाणार नाहींच कीं, तर अंधार या अक्षरांनीं त्याचा उच्चार न करावा हेंच ना ? ॥ २१ ॥

वो जावों नेदी जागणें । तये निदेतें नीद कोण म्हणे ।
दिवसा नाणी उणें । तैं रात्रिचि कैंची ॥ २२ ॥

पदयुक्त भावार्थ—जें जागणें ओ देणें जाऊं देत नाहीं, तसल्या निद्रेला निद्रा कोण म्हणेल ? दिवसाला कमीपणा येऊं न देतां (त्याला रात्र म्हटलें) तर ती रात्र कसची ? तो तर दिवसच. ॥ २२ ॥

यावरून सिद्धान्त असाः—

तैसें आत्मां अज्ञान असकें । असतां तो न मुके ।
तैं अज्ञान शब्दा लटिकें । आलेंच कीं ॥ २३ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें 'आत्मां' आत्म्याच्या ठिकाणीं 'असकें' संपूर्णत्वानें अज्ञान असतांना जर तो (आपल्या स्वरूपाला) मुकत नाहीं, अंतरत नाहीं, तर अज्ञान शब्दाला लटकेंपणा आलाच ना ? ॥ २३ ॥

आतां अज्ञानाचा अभाव युक्तीनें दाखवितातः—

येऱ्हवीं तरी आत्मया- । मार्जीं अज्ञान असावया ।
कारण म्हणतां न्याया । चुकी येईल कीं ॥ २४ ॥

पदयुक्त भावार्थ—एरवीं देखील आत्म्याच्या ठिकाणीं अज्ञान असावयास कारण आहे असें म्हटल्यास न्यायांत चूक होईल ना ? युक्तीला तें जुळणार नाहीं. ॥ २४ ॥

तें युक्तीलासुद्धां कसें जुळणार नाहीं, याचें कारण महाराज सांगतात, तें असें—

अज्ञान तममेळणी । आत्मा प्रकाशाची खाणी ।
आतां दोहीं मिळणी । येकीं कैसी ॥ २५ ॥

पदयुक्त भावार्थ—अज्ञान हें अंधकारमय; आणि आत्मा तर ज्ञानाची खाणच. मग आतां या दोहोंची मिळणी एकाच ठिकाणीं एकत्र कशी व्हावी ? ॥ २५ ॥

यास दृष्टान्त देतात, तो असाः—

स्वप्न आणि जागरु । आठउ आणि विसरु ।
इयें युग्में येकाहारु । चालती जरी ॥ २६ ॥

पदयुक्त भावार्थ—निद्रा आणि जागृति, स्मरण आणि विस्मरण, ही जोडी जर एका पंक्तीला राहूं शकेल, एका ओळींत चालेल; ॥ २६ ॥

शीता तापा येकवट । वाहे वस्तीची वाट ।
कां तमें बांधिजे मोट । सूर्यरश्मींची ॥ २७ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा थंडी व उष्णता एकाच ठिकाणच्या वस्तीची वाट चालतील, अथवा अंधकार हा सूर्यकिरणांची मोट, गठडी बांधील; ॥२७॥

नाना राती आणि दिवो । येती येके ठाईं राहों ।
तैं आत्मा जिवें जीवो । अज्ञानाचेनि ॥ २८ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा रात्र आणि दिवस एकाच ठिकाणीं राहूं शकतील, तर मग आत्मा अज्ञानाच्या जिवावर जगतो, असें म्हणतां येईल. ॥२८॥

हें असो मृत्यु आणि जिणें । इयें शोभती जरी मेहुणे ।
तरी आत्मेनि असणें । अज्ञानेंसी ॥ २९ ॥

पदयुक्त भावार्थ—हें तर असोच. जिवंतपणा आणि मृत्यु हें जोडपें जर शोभेल, तर मग आत्म्यानें अज्ञानासह असणें शोभेल. ॥ २९ ॥

अहो आत्मेन जें बाधे । तेंचि आत्मेंनसि नांदे ।
ऐसीं काईसीं विरुद्धें । बोलणीं इयें ॥ ३० ॥

पदयुक्त भावार्थ—अहो ! जें अज्ञान आत्मज्ञानानें नष्ट होतें, तेंच अज्ञान आत्म्याच्या ठिकाणीं नांदतें, अशीं हीं कसलीं विरुद्ध बोलणीं ? ॥ ३० ॥

आत्म्याचा संबंध येण्यापूर्वी अज्ञान आपल्या स्वरूपानें शिल्लक असतें म्हणून पूर्वपक्षी हा सांख्यमतानुसार तें आत्म्याहून भिन्न व स्वतंत्र असल्याचें सिद्ध करतो, तेः—

अहो आंधारपणाची पैज । सांडुनी आंधार तेज ।
जाला तैं सहज । सूर्यचि निभ्रान्त ॥ ३१ ॥

पदयुक्त भावार्थ—अहो, अंधार अंधारपणाचा अभिमान टाकून तेज झाला तर सहज तो सूर्यच झाला. ॥ ३१ ॥

दुलांकुडपण सांडलें । आणि आगीपण मांडिलें ।
तैं तेंचि आगी जालें । इंधन कीं ॥ ३२ ॥

पदयुक्त भावार्थ—लाकडानें आपलें वाकडेंतिकडेंपण टाकलें आणि अग्निरूप धारण केलें, तर तेंच लाकूड अग्निरूप झालेंच कीं. ॥ ३२ ॥

कां गंगापावतखेंवो । आनपणाचा ठावो ।
सांडी तैं गंगा हों। लाहे पाणी ॥ ३३ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा (एखाद्या नदीचें) पाणी गंगेला मिळतांक्षणींच आपल्या भिन्नपणाचें स्वरूप टाकतें, कीं लगेंच तें गंगारूप होऊन जातें. ॥३३॥

तैसें अज्ञान हें अज्ञान नोहे । तरी आत्मा असकें असो लाहे ।
येऱ्हवीं अज्ञान होये । लागलाचि ॥ ३४ ॥

पदयुक्त भावार्थ—तसेंच अज्ञान हें अज्ञान न राहतां 'असकें' संपूर्ण आत्मा "असो लाहे" होऊन जातें. पण "येऱ्हवीं" त्यापूर्वी अज्ञान "लागलाचि होये" शिल्लक असतेंच. ॥ ३४ ॥

अशा युक्तीनें पूर्वपक्षानें अज्ञान हें त्याचा आत्म्याशीं संबंध होण्यापूर्वी शिल्लक असतेंच असें सिद्ध केलें असतां त्यावर महाराज सिद्धान्तमत सांगतात—

आत्मेंनसी विरोधी । म्हणोनि नुरेचि इये संबंधीं ।
वेगळी तरी सिद्धी । जायेचिना ॥ ३५ ॥

पदयुक्त भावार्थ—आत्म्याशीं अज्ञानाचा विरोध असल्यामुळें 'इये' या दोघांचा संबंध होऊं शकत नाहीं. आणि त्यावेगळें तर तें सिद्धच होऊं शकत नाहीं. ॥ ३५ ॥

लवणाची मासोळी । जरी जाली जिवाळी ।
तरी जळीं ना जळावेगळी । न जिये जेवीं ॥ ३६ ॥

सविवरण भावार्थ—मिठाचा मासा (बनविला) व तो जरी जिवंत असलेल्यासारखा (एखाद्याच्या योगसामर्थ्यानें) झाला तरी तो जळांत किंवा जळाबाहेर असा जगणारच नाहीं. याचें स्पष्टीकरण असें कीं, कोणी एका कुशल कारागिरानें मिठाचा खडा घेऊन तो कोरून त्याचा एक मासा तयार केला, व त्या माशास कोणी योगसामर्थ्यानें जिवंत केलें. इतकें होऊनहि त्याला जिवंत राहणें कोणत्याहि बाजूनें शक्य होणार नाहीं. कारण एक तर मासा म्हटला कीं तो पाण्यावांचून जिवंत राहणें शक्य नाहीं. बरें तो पाण्यांत सोडावा तर तो मिठाचा असल्यामुळें पाण्यांत तर विरघळणारच. म्हणजे पाण्याशीं संबंध येऊनसुद्धां त्यानें जिवंत राहणें शक्य नाहीं व मासा हा तर पाण्यावांचून राहूं शकत नाहीं. तद्वतच आत्म्याशीं अज्ञानाचा संबंध होतांच अज्ञान हें नष्ट होतें, हें पूर्वींच सांगितलें आहे. व आत्म्याचा संबंध होतांच तें तद्रूप होतें, हेंहि पूर्वपक्षानें कबूल केलेंच आहे. पण त्याचें म्हणणें असें कीं "आत्म्याचा संबंध होण्यापूर्वी अज्ञान हें असतें एवढेंच." पण तेंहि घडत नाहीं. कारण कीं अज्ञान अनिर्वचनीय म्हणजे जें सत्याहि नाहीं व मिथ्याहि नाहीं असें असल्यामुळें तें अधिष्ठानावांचून निराळें राहूं शकत नाहीं. कारण दोरीवर भासलेला मिथ्या सर्प दोरी या अधिष्ठानावांचून निराळा राहूं शकत नाहीं, हें अनुभवसिद्ध आहे. म्हणून आत्म्याच्या ठिकाणीं किंवा आत्म्याहून निराळें असें अज्ञान सिद्ध होत नाहीं. ॥ ३६ ॥

जें अज्ञानें येथें नसे । तरीच आत्मा असे ।
म्हणोनि बोलणें वाइसें । नायकावें कीं ॥ ३७ ॥

पदयुक्त भावार्थ—'जें' म्हणून अज्ञान हें 'येथें'—आत्म्यावर, आत्म्याच्या ठिकाणीं केव्हांहि नाहीं. तर केवळ आत्माच आहे. म्हणून 'वाइसें बोलणें' हें व्यर्थ, पोकळ बोलणें "कीं अज्ञान आत्म्याशीं एकरूप असतें किंवा आत्म्याहून निराळें स्वतंत्र असतें" हें **नायकावें कीं**—ऐकूंच नये, ऐकण्यासारखें तें नाहींच. ॥ ३७ ॥

असत्, अज्ञान, अविद्या, द्वैत, जगत्, आभास, भ्रम, कल्पना, अभाव, हे सर्व शब्द एकाच अर्थाचे आहेत व ते कल्पित आहेत. कल्पित पदार्थ हा ज्यावर भासतो त्या पदार्थाहून तो भिन्न नसतो, एकरूपच असतो. म्हणून अज्ञानरूप जगत् हें परमात्म्याहून भिन्न नाहीं.

हाच सिद्धान्त श्रीज्ञानेश्वरमहाराज दृष्टान्तपूर्वक सिद्ध करतात—

दोरीं सर्पाभास होय । तो तेणें दोरें बांधों ये ? ।
ना दवडणें न साहे । जयापरी ॥ ३८ ॥

पदयुक्त भावार्थ—ज्या दोरीच्या ठिकाणीं सर्पाची कल्पना होते, त्या दोरीनें तो सर्प बांधतां येईल काय ? 'ना' अथवा 'दवडणें' त्याला दूर करणें, तेंहि जयापरी न साहे–ज्याप्रमाणें होऊं शकणार नाहीं. ॥ ३८ ॥

नाना पुनिवेचे आंधारें । दिहा भेणें रात्रीं महुरें ।
कीं येतांचि सुधाकरें । गिळिजे जेवीं ॥ ३९ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा पौर्णिमेच्या दिवशीं अंधार दिवसाच्या भीतीनें 'रात्रीं महुरें'–रात्रीकडे (तोंड केलें) वळला तोंच चन्द्रानें त्याला जसें गिळून टाकावें– ॥ ३९ ॥

तियापरी उभयतां । अज्ञान शब्द गेला वृथा ।
हा तर्क वांचूनि हाता । स्वरूपें नये ॥ ४० ॥

पदयुक्त भावार्थ—त्याप्रमाणें दोन्ही बाजूंनीं अज्ञान हा शब्द वायां (गेलेला) ठरतो. हें अज्ञान केवळ तर्क, हें केवळ कल्पनामात्र, यावांचून स्वरूपें–वस्तुतः खरोखर हाता नये–कांहींहि निर्णयपूर्वक हातीं लागून तें सिद्ध होणारें नाहीं. ॥ ४० ॥

अज्ञान हें कार्यावरून अनुमानानें समजणारें आहे, कां तें प्रत्यक्ष प्रमाणानें समजणारें आहे याचा विचार आतां महाराज करतात, तो असाः—

तरी अज्ञान स्वरूपें कैसें । काय कार्यानुमेय असे ।
कीं प्रत्यक्षचि दिसे । धांडोळूं आतां ॥ ४१ ॥

पदयुक्त भावार्थ—अज्ञान स्वतः आहे तरी कसें ? तें काय कार्यावरून अनुमान म्हणजे तर्क करतां येणारें आहे, कां तें प्रत्यक्ष प्रमाणानें दिसणारें आहे, हें आतां धुंडाळूं या, त्याचा शोध लावूं या. ॥ ४१ ॥

पूर्वपक्षी हा प्रथम अज्ञान हें कार्यानुमेय आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतोः—

अहो प्रत्यक्षादि प्रमाणीं । कीजे जयाची घेणी ।
ते अज्ञानाची करणी । अज्ञान नव्हे ॥ ४२ ॥

पदयुक्त भावार्थ—अहो ! प्रत्यक्षादि प्रमाणांनीं ज्याचा घेणी कीजे—स्वीकार केला जातो. तें अज्ञानाचें करणी—कार्य होय; तें अज्ञान नव्हे. ॥४२॥

हेंच पूर्वपक्षी हा चार ओव्यांनीं दृष्टान्तपूर्वक निश्चित करतोः—

जैसी अंकुरेसीं सरळ । वेली दिसे वेल्हाळ ।
तें बीज नव्हे, केवळ । बीजकार्य होय ॥ ४३ ॥

पदयुक्त भावार्थ—जशी वेली अंकुरानें सरळ असून वेल्हाळ—पसरलेली दिसते, तें केवळ बीजकार्य असतें, तें बीज नव्हे ॥ ४३ ॥

कां शुभाशुभरूपें । स्वप्नदृष्टीं आरोपें ।
तें नीद नव्हे, जाउपें । निदेचें कीं ॥ ४४ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा स्वप्नांतल्या दृष्टीला जें चांगलें वाईट रूपें आरोपें—आकार भासतात, तें सर्व निद्रा नव्हे, निद्रेचें जाउपें—पोर, तें कार्य होय. ॥ ४४ ॥

नाना चांदु येक असे । तो व्योमीं दुणा दिसे ।
तें तिमिरकार्य जैसें । तिमिर नव्हे ॥ ४५ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा चांदोबा एक असून तो आकाशांत दोन झालेला जेव्हां दिसतो, तेव्हां तें तिमिररोगाचें लक्षण होय. तें डोळ्यांत फूल पडल्याचें कार्य, जसें तिमिर स्वतः नव्हे. ॥ ४५ ॥

तैसें प्रमाता प्रमेय । प्रमाण जें त्रय ।
तें अज्ञानाचें कार्य । अज्ञान नव्हे ॥ ४६ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें प्रमाता, प्रमेय, प्रमाण हीं तिन्ही, जीं ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान तीं, तें अज्ञानाचें कार्य आहे, तें अज्ञान हें जें कारण तें नव्हे ॥ ४६ ॥

आतां पूर्वपक्षी आपल्या वरील मताचा उपसंहार करतो, तो असा—

म्हणोनि प्रत्यक्षादिकीं । अज्ञानकार्यविशेखीं ।
नेघे तें, ये विखीं । आनु नाहीं ॥ ४७ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून प्रत्यक्षादि सहा प्रमाणें जीं अज्ञानाचीं विशेष कार्यें आहेत, त्या या अज्ञानकार्यविशेषाच्या ठिकाणीं " तें नेघे " तें अज्ञान घेतां येत नाहीं, याविषयीं दुसरें मतच नाहीं. ॥ ४७ ॥

या पूर्वपक्षाच्या वरील विधानावर सिद्धान्ती उत्तर देतात कीः—

" अज्ञानकार्यपणें । घेइजे तें अज्ञान म्हणे । "
तरी घेतांही करणें । तयाचेची ॥ ४८ ॥

पदयुक्त भावार्थ—" अज्ञानाच्या कार्यावरून तें अज्ञान कारण म्हणून घ्यावें " असें जें म्हणतोस, तरी तसें घेतलें असतांहि ' तयाचेची करणें ' तें अज्ञानाचेंच कार्य अज्ञान होय. (कारण चैतन्याव्यतिरिक्त कोणताहि पदार्थ अज्ञान-कार्यच असणार.) ॥ ४८ ॥

पूर्वपक्षाचें हें वरील विधान खालीलप्रमाणें शोभेल म्हणावयाचें—

स्वप्नीं दिसे तें स्वप्न । मा देखतां काय आन ।
तैसें कार्यचि अज्ञान । केवळ जरी ॥ ४९ ॥

पदयुक्त भावार्थ—स्वप्नांत दिसतें तें सारें जर एकच; मग तें स्वप्न पाहणारा तो काय त्याहून निराळा का असतो ? तसें अज्ञानाचें कार्य अज्ञान केवळ असें म्हणशील; तर— ॥ ४९ ॥

तरी चाखिला गुळ गुळें । माखिलें काजळ काजळें ।
कां घेणें देणें शुळें । हालया सुळ ॥ ५० ॥

पदयुक्त भावार्थ—तर गुळानेंच गूळ खावा, काजळानें स्वतास काजळ फासावें, किंवा सुळानें सुळाला देतां घेतां मारावें, हालहाल करून सुळीं द्यावें, असें होईल. ॥ ५० ॥

तैसें कारण अभिन्नपणें । कार्यही अज्ञान होणें ।
तें अज्ञानचि, मा काय कोणें । घेणें देणें ॥ ५१ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें अज्ञान कारण व कार्य मिळून अभिन्नपणानें म्हणजे दोन्ही एकच होईल तर तें अज्ञानच होय. मग घेणें देणें हा व्यवहार मग कोणी कसा करावयाचा ? कारण कारणाहून कार्य हें वेगळें नसतें. ॥ ५१ ॥

आतां घेतें घेइजेतें ऐसा । विचारु नये मानसा ।
तरी प्रमाण जाला मासा । मृगजळींचा ना ? ॥ ५२ ॥

पदयुक्त भावार्थ—यावरून घेणारें आणि घेण्याचा पदार्थ म्हणजे घेण्या-देण्याचा व्यवहार (निरनिराळा) होतो, हा विचार मनाला पटत नाहीं. तरी—

कारण मृगजळांतला मासा प्रमाण जाला—खरा झाल्यासारखा होईल ना? तसेंच तुझेंहि वरील म्हणणें तशांतलेंच होईल ना?

तवं प्रमाणाचिया मापा। न संपडेचि जे बापा।
तया आणि खपुष्पा। विशेष काई ॥ ५३ ॥

पदयुक्त भावार्थ—तेव्हां बाबा, "जे प्रमाणाचिया मापा न संपडेचि" जें खरेपणाच्या स्वरूपांत, म्हणजे हिशोबांत बसतच नाहीं, त्याच्यांत आणि आकाश-पुष्पांत मग फरक काय? सर्वच जर अभावरूपच. ॥ ५३ ॥

मा हें प्रमाणचि नुरवी। आतां आथी हें कोण प्रस्तावी।
येणें बोलें ही जाणावी। अज्ञान उखी ॥ ५४ ॥

पदयुक्त भावार्थ—मग हें अज्ञान प्रमाणालाच उरवीत नाहीं, तर तें आहे हें कोण सिद्ध करील? 'येणें बोलें,' ह्या तुझ्या बोलण्यावरूनच "ही अज्ञान उखी" हें अज्ञानखंडन झालें असें समजावें. ॥ ५४ ॥

सिद्धान्ती आतां उपसंहार करतात कीं:—

एवं प्रत्यक्ष अनुमान। यया प्रमाणां भाजन।
न होनि जालें अज्ञान। अप्रमाण ॥ ५५ ॥

पदयुक्त भावार्थ—याप्रमाणें प्रत्यक्ष, अनुमान इत्यादि प्रमाणांस भाजन-पात्र न झाल्यानें अज्ञान हें अप्रमाण म्हणजे असत्य, खोटें ठरलें. ॥ ५५ ॥

ना स्वकार्यातें विये। जें कारणपणा न ये।
मी अज्ञान ऐसें बिहे। मानूं साचें? ॥ ५६ ॥

पदयुक्त भावार्थ— "जें स्वकार्यातें विये ना" जें स्वतःचें कार्य उत्पन्न करीत नाहीं, तें कारणपणाला प्राप्त होत नाहीं. मी 'अज्ञान' असें सांगण्यास जें भितें, "तें साचें मानूं?" तें खरें मानावें कसें? ॥ ५६ ॥

आत्मया स्वप्न दाऊं। न शके कीर बहु।
परि ठायें ठाऊ। निदेजऊं नेणें ॥ ५७ ॥

पदयुक्त भावार्थ—आत्म्याला 'कीर' खरोखर 'बहुस्वप्न' अनेक प्रकारचा देखावा, ही जी विश्वाची अनेक रचना म्हणजे विक्षेप 'दाऊं न शके' दाखवूं शकत नाहींच. पण 'ठायें ठाउ' ठिकाणच्या ठिकाणींहि त्याला "निदेजऊं नेणें," झाकूं जाणत नाहीं. आत्म्याला आवरणसुद्धां करूं शकत नाहीं. आवरण

च विक्षेप या ज्या मायेच्या म्हणजे अज्ञानाच्या दोन शक्ति त्या आत्मस्वरूपास विकार करूं शकत नाहींत. कारण आत्मा हा स्वयमेव निर्विकारच आहे म्हणून. ॥ ५७ ॥

आतां यावर पूर्वपक्षी आपला पक्ष, आपली बाजू अन्यतऱ्हेनें मांडतोः—

हें असो, जिये वेळे । आत्मपणेंचि निखळें ।
आत्मा अज्ञान मेळें । असे तेणें ॥ ५८ ॥

पदयुक्त भावार्थ—" हें असो, " वरें हें असूं द्या. " जिये वेळे " ज्या वेळीं " आत्मा आत्मपणेंचि निखळें (असे)" आत्मा आपल्या आत्मस्वरूपानेंच केवळ असतो, त्या वेळीं ' तेणें मेळे असें ' आमचें हें अज्ञान त्याच्याबरोबरच असतें. ॥ ५८ ॥

यास पूर्वपक्षी पुढील दृष्टान्त देतो—

जैसें न करितां मंथन । काष्ठीं अवस्थान ।
जैसें कां हुताशन । सामर्थ्याचें ॥ ५९ ॥

पदयुक्त भावार्थ—जसें ' मंथन ' म्हणजे घर्षण न करितां म्हणजे तें करण्यापूर्वी काष्ठामध्यें जसें ' हुताशन सामर्थ्याचें ' अग्नीच्या स्वरूपाचें ' अवस्थान ' अस्तित्व असतेंच कीं ? त्याप्रमाणें अज्ञान आत्म्यावर असतेंच. ॥ ५९ ॥

यावर सिद्धान्ती उत्तर देतात :—

तैसें आत्मा ऐसें नांव । न साहे आत्मयाची बरव ।
तैं कांहीं अज्ञान हांव । बांधतें कां ॥ ६० ॥

पदयुक्त भावार्थ—" तैसें "– तसें हें (आत्म्याच्या ठिकाणीं आमचें अज्ञान असतें, या पूर्वपक्षावर सिद्धान्ती उत्तर देतात कीं) " आत्मयाची बरव," आत्म्याचें शुद्धस्वरूप " ऐसें " असें आहे कीं, तें " आत्मा नांव " आत्मा असा उच्चार " न साहे " जेथें खपत नाहीं, " तैं " तेथें " अज्ञान कांहीं हांव " हें तुमचें अज्ञान असण्याची मुळीं कल्पना तरी " बांधतें का " – बांधतां, करतां येईल काय ? हें शक्य नाहीं. ॥ ६० ॥

या अशक्यतेबद्दल दृष्टान्त देतातः—

काइ दीप जैं न लाविजे । तैंचि काजळी फेडिजे ।
कां नुगवत्या वाळिजे । रुखाची छाया ॥ ६१ ॥

पदयुक्त भावार्थ—दिवा लावण्याच्या आधींच त्याची काजळी झाडून टाकावयाची कीं ? किंवा न उगवलेल्या झाडाच्या छायेचा त्याग करावयाचा ना ? ॥ ६१ ॥

नाना नुठतां देहदशा । कालऊनि लाविजे चिकसा ।
न घडितां आरिसा । उटिजे काई ॥ ६२ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा " देहदशा " देहाची आकृति " नुठतां " उत्पन्न न होतांच त्याला "चिकसा," उटणें कालवून लावतां येईल काय ? आरशाला काच बसवून तो तयार होण्यापूर्वीच त्याला स्वच्छ करतां येईल काय ? ॥ ६२ ॥

कां वोहाऱ्या दुधीं । सायचि असावी आधीं ।
मग ते फेडूं इये बुद्धी । पवाडु कीजे ॥ ६३ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा " वोहाऱ्या दुधीं " कांसेंतल्या दुधांत आधीं सायच असती तर मग ती " फोडूं ये " काढून घेतां येईल या बुद्धीनें प्रयत्न केला असता. ॥ ६३ ॥

तैसें आत्मयाच्या ठाईं । जैं आत्मपणा ठावो नाहीं ।
तैं अज्ञान कांहीं । सारिखे कैसें ॥ ६४ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें आत्म्याच्या ठिकाणीं जर आत्मपणाचाच "ठावो" ठावठिकाणा, जाणीव नाहीं, तर मग हें तुझें अज्ञान तें " कांहीं " काय, आणि तें " कैसें सारिखें, " कशासारखें असूं शकेल बरें ? ॥ ६४ ॥

म्हणोनि तेव्हांही अज्ञान नसे । हें जालेंचि आहे आपैसें ।
आतां रिकामेंचि काइसें । नाहीं म्हणों ? ॥ ६५ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून " तेव्हांही " त्या मूळच्या स्थितींत अज्ञान नव्हतें, हें " आपैसें, " आपोआप सिद्ध झालेंच आहे. आतां " रिकामेंचि " उगीचच " नाहीं म्हणों " " नाहीं, नाहीं " असें म्हणण्यांत " काइसें, " काय अर्थ आहे ? ॥ ६५ ॥

म्हणून आतां श्रीज्ञानराज पूर्वपक्षीचा उपहास करतातः—

ऐसाहि आत्मा जेव्हां । नातळे भावाभावा ।
अज्ञान असें तेव्हां । तरी तें ऐसें ॥ ६६ ॥

पदयुक्त भावार्थ—' ऐसाहि ' अशाहि स्थितींत म्हणजे आत्मा जेव्हां ' भावाभाव ' (भाव आणि अभाव)—असणें, नसणें या दोहोंविरहित होता;

'नातळे'–(या दोहोंचा त्याला) स्पर्श नव्हता, तेव्हां जर अज्ञान तेथें असेल, तर तें असें— ॥ ६६ ॥

जैसें घटाचें नाहींपण। फुटोनि होय शतचूर्ण।
कीं सर्वांपरी मरण। मारवलें कीं ॥ ६७ ॥

पदयुक्त भावार्थ–जसें एखाद्या भांड्याचा अभाव फुटून त्याचे शेंकडों तुकडे व्हावे किंवा अगदीं पूर्णपणें मरण मरून जावें. ॥ ६७ ॥

नाना निदे नीद आली। कीं मूर्च्छा मूर्च्छें गेली।
कीं आंधारी पडली। अंधकूपीं ॥ ६८ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा निजेला नीज यावी, किंवा मूर्च्छेला मूर्च्छा व्हावी, किंवा अंधार अंधकूपांत पडावा. ॥ ६८ ॥

कीं अभाव अवघडला। कां केळीचा गाभा मोडला।
चोखळा आसुडला। आकाशाचा ॥ ६९ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा 'अभाव'–मुळींच नसणारा पदार्थ तो अडचणींत सांपडावा; अथवा केळीच्या पोटांतली पोकळी मोडून पडावी, तिचे तुकडे व्हावे किंवा आकाशाचा 'चोखळा' स्वच्छपणा 'आसुडला' बिघडावा. ॥ ६९ ॥

कां निवटलिया सुदलें विख। मुकयाचें बांधलें मुख।
नाना नुठितां लेख। पुसिले जैसे ॥ ७० ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा 'निवटलिया' मेलेल्याला विष घालावें; मुक्याचें तोंड बांधावें; 'नाना'–किंवा 'नुठितां' न उठलेले, न उमटलेले लेख जसे पुसावे. ॥ ७० ॥

तैसें अज्ञान आपुली वेळ। भोगी हेचि टवाळ।
आतां तरी केवळ। वस्तु होऊनि असें ॥ ७१ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें अज्ञान 'आपुली वेळ'–आपलें स्वरूप 'भोगी'–अनुभवतें, आत्म्याच्या ठिकाणीं असतें, 'हेचि टवाळ' –हें म्हणणेंच खोटें, 'आतां तरी'–एथें तर, 'केवळ'– एकटा एक, 'वस्तु' –आत्माच 'होऊनि असें'–ओतप्रोत भरलेला आहे. ॥ ७१ ॥

अज्ञान हें आत्म्याशीं एकरूप, तादात्म्यानें असतें म्हणशील तर ऐक:—

देखा वांझ कैसी विये। विरूढती भाजली बियें?।
कीं सूर्यो कोण्हा लाहे। अंधारातें? ॥ ७२ ॥

पदयुक्त भावार्थ—हें पहा, वांझ 'विये'– कधीं प्रसवेल का ? भाजलेलें चीं 'विरूढती'– उगवेल का ! किंवा कोणच्या एखाद्या अंधाराला सूर्य 'लाहे' सांपडेल काय, भेटेल का ? ॥ ७२ ॥

तैसा चिन्मात्रीं चोखडा । भलतैसा अज्ञानाचा झाडा ।
घेतला तरी पवाडा । येईल काई ॥ ७३ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें 'चोखडा'– शुद्ध 'चिन्मात्रीं'– ज्ञानस्वरूप आत्म्याच्या ठिकाणीं अज्ञानाचा वाटेल तेवढा 'झाडा'– शोध घेतला तरी त्याचा 'पवाडा'– तपास लागेल काय ? ॥ ७३ ॥

जें सायेचिये चाडे । डहुळिजे दुधाचें भांडें ।
तें दिसे कीं विघडे । तैसें हें पां ॥ ७४ ॥

पदयुक्त भावार्थ— 'जें'– कीं साईच्या 'चाडे'– इच्छेनें, आवडीनें दुधाचें भांडें 'डहुळिजे'– ढवळलें तर ती वर दिसेल, का 'विघडे'– विसकटेल ? हें (तुझें म्हणणें) पण तसेंच होय. ॥ ७४ ॥

नाना नीद धरावया हातीं । चेउनी उठिला झडती ।
ते लाभे कीं थिती । नासिली होय ॥ ७५ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा 'नीद'–झोप (आली असतां) तिला हातांत धरावयाला 'झडती'–झटकन् 'चेउनी'–जागा होऊन उठला, तर ती मिळेल का ? तर नाहींच. उलट ती तर 'थिती'– असलेलीच 'नासिली होय'– नाहींशी होईल. ॥ ७५ ॥

तेविं पाहावया अज्ञान ऐसें । हें आंगीं पिसें काइसें ।
न पाहतां आपैसें । न पाहणेंचि कीं ॥ ७६ ॥

पदयुक्त भावार्थ—त्याप्रमाणें अज्ञान 'पाहावया'– शोधावयाचें, हें असलें अंगांत वेड कसलें ? 'पाहतां'– अज्ञान शोधावयास गेलें असतां म्हणजे त्याचा विचार केला असतां 'तें न'– अज्ञान नाहींच. 'कीं'– तर 'आपैसें'– हें सहजच समजणारें कीं, 'न पाहणेंचि'–तें सांपडणारें, शोधलें जाणारें नाहींच. ॥ ७६ ॥

एवं कोण्हेही परी । अज्ञान भावाची उजरी ।
न पडेचि नगरीं । विचारिचिये ॥ ७७ ॥

पदयुक्त भावार्थ—याप्रमाणें कोणत्याहि प्रकारानें 'अज्ञानभावाची'– अज्ञानाच्या अस्तित्वाचा 'उजरी'– उदय 'विचाराचिये नगरीं'– विचाराच्या गांवीं, मर्यादेंत पडतच नाहीं, येत नाहीं. कोणत्याहि विचारानें या अज्ञानाचें अस्तित्व सिद्ध होत नाहींच. ॥ ७७ ॥

अहो कोण्हेही वेळे । आत्मां अथवा वेगळें ।
विचाराचे डोळे । देखते का ? ॥ ७८ ॥

पदयुक्त भावार्थ—अहो, कोणत्याहि वेळीं 'आत्मां'– आत्म्याच्या ठिकाणीं अथवा आत्म्याहून निराळें, दुसरीकडे विचाराच्या डोळ्यांना अज्ञान हें दिसतें का ? ॥ ७८ ॥

ना निर्द्धाराचें तोंड न माखे । प्रमाण स्वप्नींही नाइके ।
कीं निरुति हा हन मुके । आनसाईपणा ॥ ७९ ॥

पदयुक्त भावार्थ—'ना'– एवढेंच नव्हें, तर निश्चयाचें तोंड (अज्ञानानें) माखलें जात नाहीच. म्हणजे तें निर्धार करण्यापुरतेंहि नाहींच. प्रमाण तर स्वप्नांतहि याचें ऐकत नाहीं; हें कोणत्याहि प्रमाणानें सिद्ध होत नाहीं. 'कीं'– आणखी 'हा आनसाईपणा'– हें (त्याचें) वेगळेंपण तर 'निरुति हन'– अगदीं खरोखर 'मुके'– मुकतें, उरतच नाहीं. ॥ ७९ ॥

इतुलियाही भागु । अज्ञानाचा तरी तो मागु ।
निगे ऐसा बागु । पडतां कां देवा ! ॥ ८० ॥

पदयुक्त भावार्थ—इतक्याहि 'भागु'– भागांनीं, बाजूंनीं इतक्या उपर 'अज्ञानाचा तरी' तो 'मागु'– माग निघेल, पत्ता लागेल, 'ऐसा बागु'– असा भाग कांहीं 'पडतां' निघेल का, निघणारच नाहीं. 'देवा'– दैव आमचें ! 'कां'– काय करावें ? ॥ ८० ॥

अंवसेचेनि चंद्रबिंबें । निर्वाळिलिये शोभे ।
कां मांडले जैसे खांबे । शशविषाणाचे ॥ ८१ ॥

पदयुक्त भावार्थ—अंवसेच्या 'चंद्रबिंबें' चंद्रानें 'निर्वाळिलियें'–स्वच्छ 'शोभे'– प्रकाश पाडला असता, 'कां जैसें'– अथवा जर "शशविषाणाचें"– सशाच्या शिंगांचे 'खांबे मांडले'– मांडव घातले असते. ॥ ८१ ॥

नाना गगनौलाचिया माळा । वांजेच्या जालया गळा ।
घापती तो सोहळा । पाविजत असे ॥ ८२ ॥

पदयुक्त भावार्थ--' नाना ' अथवा ' गगनौलाचिया ' आकाशपुष्पाच्या माळा वांझेला ' जालया ' – झालेल्या मुलाच्या ' गळा घापती ' गळ्यांत घातल्या जाऊन तो सोहळा जर प्राप्त झाला असता; ॥ ८२ ॥

आणून कांसवीचें तूप । भरू आकाशाचें माप ।
तरी साचा येती संकल्प । ऐसे ऐसे ॥ ८३ ॥

पदयुक्त भावार्थ—(आधीं कांसवीला दूध नसतेंच), त्या कासवीचें तूप आणून आकाशाच्या पोकळीचें माप जर भरतां आलें असतें (जर वरील सर्व दृष्टान्तांप्रमाणें गोष्टी होणाऱ्या असत्या) तर ' ऐसे ऐसे संकल्प– ' असले हे (तुझे अज्ञानाविषयींचे) विचार ' साचा येती '– खरे ठरते. ॥ ८३ ॥

आम्ही येऊनि जाऊनि पुढती । अज्ञान आणावें निरुती ।
तें नाहीं, तरी किती । वतवतूं पा ॥ ८४ ॥

पदयुक्त भावार्थ—आम्ही 'येऊनि जाऊनि' इकडून तिकडून 'पुढती'– वारंवार, ' अज्ञान निरुती आणावें '– खरेंपणाने आणावें (म्हणून पाहिलें, पण) तें जर नाहींच, तर ' वतवतूं ' नुसतें बडबडणें ' किती पां '– काय कामाचें बरें ? ॥ ८४ ॥

म्हणोनि अज्ञान अक्षरें । नुमचूं निदसुरें ।
परी आन येक स्फुरे । इयेविषयीं ॥ ८५ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून आतां " निदसुरें अज्ञान अक्षरें " खोटीं अशीं हीं अज्ञान अक्षरें ' नुमसूं '– उच्चारतां येणारीं नाहींत. (या ओवीच्या उत्तरार्धानें पूर्वपक्ष पुन्हा उत्पन्न करतातः– ' परी ' परंतु ' इयेविषयीं '– या अज्ञानाविषयीं ' आन येक '– आणखी एक ' स्फुरे '– कल्पना स्फुरते. ॥८५॥

आपणया ना आणिकातें । देखोनि होय देखतें ।
वस्तु ऐसियापुरतें । नव्हे आंगें ॥ ८६ ॥

पदयुक्त भावार्थ--' वस्तु आंगें '– आत्मा स्वतः ' आपणया देखतें देखोनि '– आपल्या स्वतःला द्रष्टा होऊन पाहणारा, ' ना '– किंवा ' आणिकातें देखोनि '–दुसऱ्याला दृश्य करून पाहणारा, ' ऐसियापुरतें '– अशासारखा तो ' नव्हे '–नाहीं. ॥ ८६ ॥

तरी ते आपणापुढें । दृश्य पघळे येव्हढें ।
आपण करी फुडें । द्रष्टेपणें ॥ ८७ ॥

पदयुक्त भावार्थ—' तरी '– तर मग ' आपणापुढें '– आपल्यापुढें ' येव्हढें तें दृश्य '–एवढें हें विश्व ' पघळे '–विस्तारतें, त्याला ' आपण द्रष्टेपणें '– द्रष्टेपणानें आपण ' फुडें करी '–प्रत्यक्ष पाहतो हें कसें ? ॥ ८७ ॥

जेथ आत्मत्वाचें सांकडें । तेथ उठे हें येव्हडें ।
उठिलें तरी रोकडें । देखतसों ॥ ८८ ॥

पदयुक्त भावार्थ—' जेथ ' ज्या ठिकाणीं असलें ' आत्मत्वाचें ' आत्मपणानें असणें हें देखील ' सांकडें '– हें संकट, तिथें हें ' येव्हडें उठे ' – एवढें विश्व प्रकट होतें, व ' उठिलें तरी– ' प्रकट झालेलें तर आम्ही ' रोकडें ' प्रत्यक्ष ' देखतसों '–पाहात असूं ॥ ८८ ॥

न दिसे जरी अज्ञान । तरी आहे हें नव्हे आन ।
यया दृश्य अनुमान । प्रमाण जालें ॥ ८९ ॥

सविवरण भावार्थ—जरी अज्ञान दिसत नाहीं, तें आहे, हें ' आन नव्हे '– खोटें नाहींच. ' यया '– याला या जगताच्या दृश्यावरून केलेलें जें अनुमान तें यास प्रमाण होय.

यावरून अनुमान निघतें कीं जरी अज्ञान प्रत्यक्ष दिसत नाहीं, तरी अज्ञान आहे, हें खोटें नाहीं. कारण विश्वाच्या या दृश्यावरून अनुमानानें अज्ञान खरें ठरतें. श्रुति सांगते कीं आत्मा निर्विकार आहे. ज्याच्या ठिकाणीं दृश्यद्रष्टादि म्हणजे विश्व व त्याचा जनक हे भाव उत्पन्न होणें शक्य नाहीं. दृश्यद्रष्टादि जगत् हें ज्याअर्थी उत्पन्न होतें त्यावरून तें कोणाचें तरी कार्य आहे व कार्य हें कारणावांचून नसतें. आत्मा तर निर्विकार आहे म्हणून त्याचें हें कार्य होत नाहीं. म्हणून अज्ञान हें त्याचें कारण होय. या दृश्याचें अनुमानावरूनच आमचें हें ' अज्ञान ' सिद्ध होतें. ॥ ८९ ॥

नातरी चांदु येकु असे । तो व्योमीं दुणावला दिसे ।
तरी डोळां तिमिर ऐसें । मानूं ये कीं ॥ ९० ॥

पदयुक्त भावार्थ—' नातरी ' कारण आकाशांत चंद्र एकच असतो, ते दोन दिसले, तर डोळ्यांत तिमिर रोग आहे असें मानावेंच कीं. ॥ ९० ॥

भूमीवेगळीं झाडें । पाणी घेती कवणीकडे ।
न दिसतीं आणि अपाडें । साजीं असतीं ॥ ९१ ॥

पदयुक्त भावार्थ—झाडें पृथ्वीवांचून दुसरीकडून पाणी घेतांना दिसत नाहींत, आणि 'अपाडें'– फारच 'साजी' टवटवीत दिसतात. ॥ ९१ ॥

तरी भरवसेनि मुळें । पाणी घेती हें न टळे ।
तैसें अज्ञान कळे । दृश्यास्तव ॥ ९२ ॥

पदयुक्त भावार्थ—यावरून खात्रीनें मुळें पाणी घेतात, हें टळत नाहीं; तसें या दृश्य विश्वावरून 'अज्ञान' आहे हें कळून येतें. ॥ ९२ ॥

चेइलिया नींद जाये । निद्रिता तव ठाउवी नोहे ।
तरी स्वप्न दाऊनि साहे । म्हणों ये कीं ? ॥ ९३ ॥

पदयुक्त भावार्थ—'चेइलिया'–जागृताची झोंप गेलेली असते, निजलेल्याला तर ती ठाऊक नसते, ती स्वप्न दाखविते. यावरून तर ती आहेच असें म्हणावें लागतेंच ना ? ॥ ९३ ॥

म्हणोन वस्तुमात्रें चोखें । दृश्य जरी येव्हडें फांके ।
तेव्हां अज्ञान आथी सुखें । म्हणों ये कीं ? ॥ ९४ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून 'चोखें वस्तुमात्रें'– शुद्ध आत्मवस्तूच्या ठिकाणीं जर एवढें विश्व विस्तारलें आहे, त्यावरून तर अज्ञान आहे, असें 'सुखें म्हणों ये कीं'– खुशाल म्हणावें कीं ? ॥ ९४ ॥

अज्ञानवाद्यांच्या या वरील सर्व विधानावर आतां सिद्धान्ती हें उत्तर देतातः—

अगा ऐसिया ज्ञानातें । अज्ञान म्हणणें केउतें ।
काय दिवो करी तयातें । अंधारु म्हणिपें ॥ ९५ ॥

पदयुक्त भावार्थ—अरे, (तूं जें म्हणतोस, तें तर सर्व ज्ञान आहे !)

अशा ज्ञानाला अज्ञान कसें म्हणावें ? 'दिवो करी' दिवस, प्रकाश करतो त्याला 'तयातें अंधारु म्हणिपें काय ?'– काय अंधार म्हणावें ?

हा एथें 'अजातवाद' आहे. हा वेदान्तमतामध्यें मुख्य आहे. यांतील सिद्धान्त असा कीं दोरीवर साप कधींहि झालेला नसतोच. ती तर केवळ दोरीच असते. तसेंच ब्रह्मचैतन्याच्या म्हणजे परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं हा अनंतकोटि-

ब्रह्मांडरचनेचा संसार कधींहि झालेला नाहीं. तर केवळ एक ब्रह्मच आहे–'एकमेवाद्वितीयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन' असें श्रुतिवचन आहे. पण हा अजातवादसिद्धान्त–"मग एकपण ना दुजें, । "असें" "नाहीं", हें नेणिजे । अनुभव निर्बुजे । बुडाला जेणें ॥ (ज्ञाने. १५–१७–५३५)." " ऐसें आथी जें कांहीं । तें तो उत्तम पुरुष पाही । जें परमात्मा इहीं । बोलिजे नामीं ॥ (ज्ञाने. १५–१७५३६)." असा हा 'अजातवाद' उत्तम अधिकाऱ्यांच्या खेरीज इतर मध्यम अधिकाऱ्यांच्या लक्षांत येणार नाहीं म्हणून त्यांच्यासाठीं आभासवाद सांगितला आहे. त्यांतील सिद्धान्त असा कीं " शुक्तौ रजतं" शिंपीच्या ठिकाणीं रुपयाचा भास होतो. त्या प्रमाणें चैतन्यपरमात्मस्वरूपावर जगताचा भास होतो. एका मूळ पदार्थावर दुसरा पदार्थ भासतो, तो भासणारा पदार्थ मूळपदार्थरूप, अधिष्ठानरूपच असतो. मूळचा मातीचा ओला गोळा त्याचें रूपांतर चुली, मडकीं, रांजण, डेरे असें कितीहि झालें, तरी मूळचें मातीचें स्वरूप केव्हांहि बदलत नाहीं. माती हें अधिष्ठान जें मूळस्वरूप त्या मातीवर भासणारा अनेक आकारांचा व अनेक नांवांचा विकार मातीहून निराळा नसून तो सदैव मातीशीं एकरूपच असतो. " मृत्तिका इत्येव सत्यं, वाचा ऋंभणं विकारो नामधेयं–" माती हेंच खरें स्वरूप, विकार वाचेनें उच्चारण्याइतकाच नांवाला मात्र. " सदेव सोम्य, इदमग्र आसीत् सत् एव सोम्य इंद अग्रे आसीत्–" हें जें विश्व, हा विश्वरूप जो आभास तो उत्पन्न होण्यापूर्वी हे सोम्य, तें 'सत्' परमात्मस्वरूपच होतें. असा या आभासवादाचा श्रुतीचा सिद्धान्त आहे. "पैं नेणतयाप्रती । रुपेंपणाची प्रतीती । रुपें न होती शुक्ति । दावी जेवीं ॥ (ज्ञाने. १५–१७–५५१)" " कां नाना अलंकारदशे । सोनें न लपत लपालें असे । विश्व न होनियां तैसें । विश्व जो धरी ॥ (ज्ञाने. १५–१७–५५२) " हें असो जल तरंगा । नाहीं सिनानपण (दुजेपणा) जेवीं गा । तेविं सत्ताप्रकाश जगा । आपणचि जो ॥ (ज्ञाने. १५–१७–५५३)"

आतां यावर एक शंका जी नेहमींचीच असते ती अशी कीं, परमात्मा सर्वत्र ओतप्रोत भरलेला आहे, तर तो जडपदार्थांत प्रतीत कां होत नाहीं ? तसेंच तो आमच्या अनुभवास कां येत नाहीं ? याचें उत्तर असें कीं एकाच मातीपासून गाडगीं, मडकीं तशीच कांच तयार होते. पण मातीच्या तमोगुणाचें कार्य मडकें असून मातीच्या सत्त्वगुणाचें कार्य कांच आहे. मडक्याचे परमाणु अधिक स्थूल व घट्ट असतात म्हणून त्यांमध्यें आमचा चेहरा स्पष्ट दिसणार नाहीं. तेच कांचेचे परमाणु स्वच्छ विरळ असल्यामुळें त्या कांचेंत चेहरा स्पष्ट दिसतो. तसेंच अन्तः-

करण जोंपर्यंत तमोगुणयुक्त मलिनस्वरूपाचें असतें तोंपर्यंत त्यांत परमात्मस्वरूपाचें ज्ञान स्फुरत नाहीं. तेंच जेव्हां सत्त्वगुणयुक्त शुद्धस्वरूपाचें स्वच्छ कांचेप्रमाणें होतें, तेव्हां त्यांत परमात्मस्वरूपज्ञानाचा आविर्भाव स्पष्ट होतो. म्हणून परमात्म्याची व्याप्ति सर्व व्यवहारांत असल्यामुळें त्या व्यवहारास अज्ञान म्हणणें किंवा त्या व्यवहाराचरून सर्व व्यवहारास कारणभूत अशा अज्ञानाची कल्पना करणें म्हणजे प्रकाशाला अंधार म्हणण्याप्रमाणें आहे. म्हणून 'अगा, ऐसिया "ज्ञानातें,"। "अज्ञान" म्हणणें केउतें। काय दिवो करी तयातें। अंधार म्हणिपें?" ह्या ओवीनें सर्व जगत् "ज्ञानरूप" आहे असें श्रीज्ञानराजांनीं सिद्ध करून हाच सिद्धान्त पुढेंहि असाच मांडला आहे. ॥ ९५ ॥

तोच दृष्टान्तांनीं अधिक स्पष्ट करून दाखवीत आहेतः——

अगा चंद्रापासून उजळ। जेणें राविली वस्तु धवळ।
तयातें काजळ। म्हणिजतसे?॥ ९६ ॥

पदयुक्त भावार्थ——अरे, चंद्रापेक्षांहि उजळ ज्या कोणीं एखादी वस्तु 'धवळ'—स्वच्छ 'राविली'—प्रकाशित केली, तर त्याला काजळ म्हणावयाचें काय? ॥ ९६ ॥

आगीचें काज पाणी। निफजा जरी आणी।
अज्ञान इया वाहणी। मानूं तरी तें! ॥ ९७ ॥

पदयुक्त भावार्थ——आगीचें काम पाणी जर 'निफजा आणी'—उत्पन्न करील, निपजवील, तर 'इया वाहणी'—अशा रीतीनें तुझें तें 'अज्ञान' मग मानतां येईल. ॥ ९७ ॥

कळीं पूर्णचंद्रमा। आणून मेळवी अमा।
तरी ज्ञान हें अज्ञान नामा। पात्र होइजे ॥ ९८ ॥

पदयुक्त भावार्थ——'कळीं'—सोळा कळांनीं पूर्ण असा पूर्णिमेचा चंद्र जर आपला प्रकाश, 'अमा'—आंवस, पूर्ण काळोख 'आणून मेळवी'—म्हणून (भेटवील) दाखवील, तर हें शुद्ध ज्ञान, त्या अज्ञान नांवाला पात्र होईल, योग्य ठरेल. ॥ ९८ ॥

वोरसोनि लोभें। विष कां अमृतें दुभे।
ना दुभे तरी लाभे। विपचि म्हणणें ॥ ९९ ॥

पदयुक्त भावार्थ—' लोभें '– मोठ्या प्रेमानें विष हें स्वतः ' वोरसोनि ' पान्हावलें, तरी तें ' अमृतें '– अमृत ' दुभे '– दुभेल, धार सोडील काय ? ' ना '– बरें, कदाचित् ' तें दुभे '– तें दुभलें, त्यानें धार सोडली तरी तें ' विषचि म्हणणें '– विषच म्हणावें लागेल. ॥ ९९ ॥

तैसा जाणणेंयाचा वेव्हारु । जेथें माखला समोरु ।
तेथें आणिजे पूरु । अज्ञानाचा ? ॥ १०० ॥

पदयुक्त भावार्थ—त्याप्रमाणें जेथें ' जाणणेयाचा ' जाणिवेचा, आत्मज्ञानाचा ज्ञानपूर्ण ' वेव्हारु '– व्यवहार ' समोरु '– प्रत्यक्ष ' माखला ' – ओतप्रोत भरलेला असतांना त्या ठिकाणीं ' अज्ञानाचा पूरु '– या अज्ञानाचा मायिक दृश्य पसारा कल्पून कसा आणतां येईल ? ॥ १०० ॥

तया नांव अज्ञान ऐसें । तरी ज्ञान होआवें तें कैसें ।
येव्हवीं कांहींचि असे । आत्मा काई ॥ १०१ ॥

पदयुक्त भावार्थ—' तया '– अशा त्याला, त्या ज्ञानपूर्ण व्यवहाराला ' अज्ञान ' असें नाव जर दिलें, तर ' ज्ञान ' तरी तें मग कसें असावें ? ' येव्हवीं '– म्हणून ' कांहींचि काई असें '– जें कांहीं आहे, ' आत्मा '– तें ज्ञानघन आत्मा आहे. ॥ १०१ ॥

कांहींच जया न होणें । होय तें स्वतां नेणें ।
तरी शून्याचीं देवांगणें । प्रमाणासी ॥ १०२ ॥

पदयुक्त भावार्थ—' जया '–ज्या आत्म्याला ' कांहींच न होणें '–कोणतीहि उत्पत्ति–स्थिति–नाश हा विकार होत नाहीं. त्याला ' होय '–विश्वाच्या विकाराचें व " मी आहे " तेंहि ' स्वतां नेणें '–स्वतांचें भान नाहीं. ' शून्याची तरी '–तो ' शून्य ' म्हणजे नाहींच म्हणावा तर (असा निर्धार होत नाहीं) अशी ' प्रमाणासी देवांगणें '–शास्त्रांचीं प्रमाणें शपथ घेतात. ॥ १०२ ॥

' असें ' म्हणावयाजोगें । नाचरे कीर आंगें ।
परी ' नाहीं ' हें न लागे । जोडावेंचि ॥ १०३ ॥

पदयुक्त भावार्थ—' असें ' आत्मा 'आहे' असें म्हणण्यासारखें 'आंगे'–निजांगानें, स्वरूपानें ' कीर '–खरोखर ' नाचरे ' त्याची हालचाल नाहीं, चलनवलन नाहीं. ' परी '–म्हणून ' नाहीं '–तो नाहीं, हें जोडावेंचि–हें म्हणावयाचें

'न लागे'–कारणच उरत नाहीं. (आत्मा 'आहे–नाहीं' या दोहींविवर्जित असा आहेपणानें तो नित्य असतो.) ॥ १०३ ॥

कोणाचे असणेंनवीण असे । कोणी न देखतांचि दिसे ।
हे आथी, तरी काइसें । हरतलेंपण ? ॥ १०४ ॥

पदयुक्त भावार्थ—आत्मा दुसऱ्या कोणाच्या 'असणेंनवीण'–असण्यावांचून असा तो स्वयंसिद्ध असतो. 'कोणी न देखतांचि' कोणास न दिसतांहि तो 'दिसे'–स्वतांला दिसतो. 'हें आथी'–असें जर आहे, 'तरी' तर मग त्याचें 'हरतलेंपण काइसें' हरवलेंपण, नाहींपण कसें होईल ? ॥ १०४ ॥

मिथ्या वादाची कुटी आली । ते निवांतचि साहिली ।
विशेषाही दिधली । पाठी जेणें ॥ १०५ ॥

पदयुक्त भावार्थ—आत्म्यावर 'मिथ्यावादाची'–नाहींपणाचा 'कुटी'–आरोप, आळ आला, तर तो निवांतच तो 'साहिली'– सहन करतो; 'विशेषाही'– विशेष सच्चिदानंदादि भावासहि, त्याच्याकडेहि तो 'पाठी दिधली' पाठ फिरवतो, लक्ष देत नाहीं. तात्पर्य कीं देहभावाहून आत्मा निराळा ज्ञानस्वरूप, निर्विकार नाहीं असें कोणी मंदबुद्धीचे निश्चय करणारे आहेत. तर कोणी चित्तशुद्धपुरुष आत्म्याचे सच्चिदानंदादि विशेष भाव सिद्ध करून त्याचें अस्तित्व प्रतिपादन करतात. पण हे दोन्ही भाव अविद्यायुक्त असल्यामुळें आणि पारमार्थिक दृष्टीनें पाहतां या दोन्ही भावांहून आत्मा निराळा व निर्विकार आहे म्हणून तो कशांतहि लिप्त होत नाहीं. ॥ १०५ ॥

जो निमालीहि नीद देखे । तो सर्वज्ञ येवढें काय चुके ।
परी दृश्याचिये न टेके । सोई जो ॥ १०६ ॥

पदयुक्त भावार्थ— 'जो'–आत्मा 'नीद निमालीहि' निद्रा लय पावलेली पाहतो, तो सर्वज्ञ एवढें जगत् 'चुके काय'–जाणूं शकणार नाहीं काय ? 'परी' पण 'दृश्याचिये सोई'–अनंत विश्वदृश्याच्या शिवेलाहि जो टेकत नाहीं, जो स्पर्शत नाहीं. परमात्मदृष्टीनें पाहतां दृश्य म्हणून कोठें पदार्थच नाहीं. जसें आत्म्याला कोणी दृश्य नाहीं, तसेंच आत्माहि कोणाला दृश्य नाहीं. कारण सर्वत्र एक परमात्माच ओतप्रोत अतिसूक्ष्मपणानें भरलेला आहे म्हणून. ॥ १०६ ॥

वेदु काय काय न बोले । परि नांवचि नाहीं घेतलें ।
ऐसें कांहीं जोडिलें । नाहीं जेणें ॥ १०७ ॥

पदयुक्त भावार्थ—वेदानें 'काय काय'—कोणतें वर्णन 'न बोले'—केलेलें नाहीं ? पण त्यानें या आत्म्याचें नांवाहि घेतलें नाहीं. 'जेणें'—ज्या वेदानें 'ऐसें' अशा तऱ्हेचा (आत्मा आहे) असें कांहीं 'जोडिलें नाहीं'—सिद्ध केलें नाहीं. सर्वज्ञ वेदानें आत्म्याखेरीज सर्व कांहीं वर्णन केलें आहे. पण त्याच्यानें शब्दातीत अशा आत्म्याचें वर्णन होऊं शकलें नाहीं. ॥ १०७ ॥

सूर्यो कोणा न पाहे । परि आत्मा दाविला आहे ? ।
गगनें व्यापिता ठाये । ऐसी वस्तु ॥ १०८ ॥

पदयुक्त भावार्थ—सूर्य कोणाला 'पाहे न'—प्रकाशित करीत नाहीं. पण त्यानें आत्मा कधीं दाखविला आहे कां ? 'ऐसी वस्तु'—या असल्या आत्मवस्तूला 'गगनें' आकाश 'व्यापिता'—व्यापत असतां, 'ठायें'—तें थांवतें, अपुरें होतें. ॥ १०८ ॥

देह हाडांची मोळी । मी म्हणोनि पोटाळी ।
तो अहंकारु गाळी । पदार्थु हा ॥ १०९ ॥

पदयुक्त भावार्थ—देह या हाडांच्या मोळीला जो 'मी' म्हणून कवटाळतो, तो अहंकार हा पदार्थ, हा जो आत्मा, याला मात्र 'गाळी' वगळतो. ॥ १०९ ॥

बुद्धि बोद्धया सोके । येवढी वस्तु चुके ।
मना संकल्प निके । याहीहुनी ॥ ११० ॥

पदयुक्त भावार्थ—बुद्धि 'बोद्धया'—सर्व विषयांना 'सोके'—जाणते. येवढी आत्मवस्तु तिला ती चुकते, विसरते, जाणत नाहीं. 'याहीहुनी'—या आत्मवस्तूखेरीज मनाला सर्वांची 'संकल्प निके'—चांगली कल्पना करतां येते. ॥ ११० ॥

विषयाची बरडी । अखंड घासती तोंडीं ।
तियें इंद्रियें गोडी । न घेपती हे ॥ १११ ॥

पदयुक्त भावार्थ—विषयांच्या 'बरडी'—माळजमिनीवर 'अखंड'—एकसारखीं सदोदित जीं तोंडें घासतात 'तियें'—तीं इंद्रियें 'हे गोडी'—हा आत्मसुखाचा आनंद 'घेपती न' घेऊं शकत नाहींत. ॥ १११ ॥

परी नाहींपणासगट । खाऊनि भरिलें पोट ।
ते कोणाही सगट । कां फावेल ? ॥ ११२ ॥

पदयुक्त भावार्थ—पण (दृश्य जगताला) 'नाहींपणासगट'—त्याच्या अभावासुद्धां खाऊन टाकून ज्या आत्मवस्तूचें पोट भरलें, 'ते' ती वस्तु, जो 'सगट'—संपूर्ण व्यापक आत्मा तो कोणाला प्राप्त होईल काय ? ॥ ११२ ॥

जो आपणासी नव्हे विखो । तो कोणा लाहे देखों ।
जे वाणी न सके चाखों । आपणापें ॥ ११३ ॥

पदयुक्त सविवरण भावार्थ—जो आत्मा आपल्या स्वतांला 'विखो नव्हे'—विषय होत नाहीं, पाहात नाहीं, तो दुसऱ्या कोणा अनात्मपदार्थाला दिसूं शकेल काय ? 'जे वाणी'— जीभ ही 'आपणापें'—स्वतांला 'चाखों न सके'—चाखूं शकत नाहीं. (जीभ सर्व पदार्थांची चव घेते खरी. तथापि ती स्वतांला जशी चाखूं शकत नाहीं, तसेंच जिभेलाहि पण दुसरे पदार्थ चाखूं शकत नाहींत; कारण जीभ ही स्वतांच्या स्वरूपानें म्हणजे चाखणेंपणानेंच स्वतांच्या ठिकाणीं सदैव चवरूप अशीच असते. तसेंच आत्मा हाहि आपल्या स्वतांला जाणत नाहीं व दुसऱ्यांकडूनहि तो जाणला जात नाहीं. कारण तो स्वयंसिद्ध स्वानुभवगम्य असा ज्ञानस्वरूप आहे. एकदां श्रीरामरायांनीं श्रीगुरु वसिष्ठमुनींना विचारलें कीं 'महाराज, आपलें स्वरूप कसें आहे ?' यावर वसिष्ठमुनि हे कांहींच उद्गारले नाहींत. तेव्हा आपल्याकडून प्रश्न नीट विचारला गेला नसावा असें वाटून श्रीरामरायांनीं मुनि वसिष्ठांना पुन्हा विचारलें कीं 'माझ्या प्रश्नाचें उत्तर आपण कां दिलें नाहीं ?' त्यावर श्रीवसिष्ठ म्हणाले, 'तुझ्या प्रश्नाबरोबरच उत्तर दिलें गेलें होतें. कारण त्या प्रश्नांचें उत्तर न देणें, हेंच त्याचें उत्तर होतें.' मौन हेंच त्याचें उत्तर होय. कारण आत्मा हा अनिर्वचनीय आहे. ॥ ११३ ॥

हें असो नामें रूपें । पुढां सुनि अमूपें ।
जेथें आलीच वासिपे । अविद्या हे ॥ ११४ ॥

पदयुक्त भावार्थ—हें असो. 'अमूपें'— पुष्कळ, नामें, रूपें 'पुढां'— पुढें 'सूनि'— करून 'हे' ही अविद्या 'जेथें'— ज्या आत्म्याच्या स्वरूपापुढें 'आलीच'— येतांक्षणींच 'वासिपे' भयानें नाहींशी होऊन जाते. ॥ ११४ ॥

म्हणोनि आपलेंचि मुख । पहावयाची भूक ।
न वाणे मा आणिक । कें रिगेल ॥ ११५ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून 'आपलेंचि मुख'— आपलें स्वतांचेंच स्वरूप 'पहावयाची'— पाहण्याचा 'भूक'— संकल्प जेथें ज्या आत्म्याच्या ठिकाणीं

'न बाणे'– उठत नाहीं, तेथें 'मा'– मग 'आणिक'– आणखी दुसऱ्याचा 'कें रिगेल'?– कसा प्रवेश होईल? ॥ ११५ ॥

नाडिलें जें वादीकोडें। आंतुनि बाहेर सवडे।
तैसा निर्णो सुनाट पडे। केला जेथें ॥ ११६ ॥

पदयुक्त भावार्थ—'जें'– जी काडी 'नाडिलें' आंत घुसवलेली 'वादी-कोडें' (वादीच्या कोड्यांत)– एका जुगाराच्या खेळांतली 'आंतुनि'– आपो-आप आंतूनच ती बाहेर 'सवडे'– येऊन पडते, 'तैसा'– तसा 'जेथें'– ज्या ठिकाणीं ज्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं कोणताहि 'निर्णो'– निर्णय केलेला 'सुनाट पडे'– व्यर्थ ठरतो. ॥ ११६ ॥

कां मस्तकान्त निर्धारिली। जो छाया उडों पाहे आपुली।
तयाची फांकावली। बुद्धि जैसी ॥ ११७ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा 'मस्तकान्त'– नखशिखान्त–पायापासून डोक्यापर्यंतची 'निर्धारिली'– पडलेल्या आपल्या सावलीवरून जो 'उडों पाहे' उडी मारूं पाहील त्याची जशी बुद्धि 'फांकावली' भ्रमलेली असते. ॥ ११७ ॥

तैसें टणकोनि सर्वथा। हे ते ऐसी व्यवस्था।
करी तो चुके हाता। वस्तूचा जिये ॥ ११८ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें 'सर्वथा टणकोनि'– पुष्कळ श्रम करूनहि 'हे ते'–ही ती अशी अशी आत्मवस्तु आहे, 'ऐसी व्यवस्था'–असा निर्धार, असला विचार जो करील, तो 'जिये वस्तूचा'– त्या आत्मवस्तूच्या 'हाता चुके'– प्राप्तीला अंतरतो. ॥ ११८ ॥

आतां सांगिजे तें केउतें। शब्दाचा संसारा नाहीं जेथें।
दर्शना बीजें तेथें। जाणीव आणी ॥ ११९ ॥

पदयुक्त भावार्थ—'आतां तें केउतें सांगिजे' तर तें किती म्हणून सांगावें कीं 'जेथें'– ज्या (आत्म्याच्या) ठिकाणीं 'शब्दाचा'–वेदादि शास्त्र-वर्णनाचा 'संसारा नाहीं'–आग, संबंध पोंचत नाहीं, 'तेथें'–त्या ठिकाणीं, त्यां आत्मस्वरूपींच 'दर्शनाचींजें'–दर्शनाचीं मूळ कारणें जीं द्रष्टा, दृश्य (द्रष्टा–ईश्वर, दृश्य–ईश्वरनिर्मित जगत्, दर्शन–जगांतील प्रत्येक पदार्थाचें ज्ञान) हीं सर्व 'जाणीव आणी'–प्रतीत झालीं, उत्पन्न झालीं. ॥ ११९ ॥

जयाचेनि बळें । अचक्षुपण आंधळें ।
फिटोनि वस्तु मिळे । देखणी दशा ॥ १२० ॥

पदयुक्त भावार्थ—' जयाचेनि बळें '–ज्याच्या सामर्थ्यानें, ' अचक्षुपण ' कांहीं न दिसणें हें आंधळें '–आंधळेपण ' फिटोनि '–नाहींसें होऊन, ' वस्तु '– आत्मवस्तूला ' देखणी दशा '–द्रष्टेपण, ईश्वरपण, 'मिळे'–प्राप्त झालें. ॥ १२० ॥

आपुलेंचि दृश्यपण । उमसों न लाहे आपण ।
द्रष्टृत्वा कीर आण । पडली असे ॥ १२१ ॥

पदयुक्त भावार्थ—' आपण आपुलेंचि '– स्वतां स्वतांलाच जाणण्याचें ' दृश्यपण '– जाणीवपण जेथें ' उमसो '–स्फुरण पावूं ' न लाहे '–शकत नाहीं, त्या ठिकाणीं ' द्रष्टृत्वा '–द्रष्टेपणा, दुजेपणा ' कीर '–खरोखर ' आण पडली असे '– लोपून जातो; ' आण '–बंधन, द्वैताचें जें बंधन तें लोप पावतें.॥१२१॥

कोणा कोण भेटे । दिठी कैंची फुटे ।
ऐक्यासकट पोटें । आटोनि गेलीं ॥ १२२ ॥

पदयुक्त भावार्थ—त्या वेळीं 'ऐक्यासकट'–एकपणाचें जें ऐक्याचें तेंहि जिथें ' पोटें आटोनि गेलीं ' स्वरूप जिरून गेलें आहे, तिथें त्या ठिकाणीं 'कोणा कोण भेटे ' कोणाला कोणी भेटावयाचें ? ' दिठी कैंची फुटे '– (तिथें तें स्वरूप पाहण्याची) दृष्टि तरी कशी उत्पन्न व्हावी ? ती होईल काय ?॥ १२२ ॥

येवढेंही सांकडें । जेणें सारोनि येकीकडे ।
उघडिलीं कवाडें । प्रकाशाचीं ॥ १२३ ॥

पदयुक्त भावार्थ—' जेणें येवढेंही सांकडें '–पण ज्यानें एवढेंहि संकट ' सारोनि '–नाहींसें करून (ज्या परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं द्रष्टा व दृश्याचा कसलाहि संबंध पोहोंचत नाहीं, अशी याची अनिर्वचनीय एकमेव स्थिति) 'येकीकडे सारोनि' ती पलीकडे दूर सारून स्वतांच्या स्वानंदभोगाच्या विलासाकरितां ' एकोऽहं बहु स्याम् ' मी एक, यानें अनेकरूप व्हावें, या श्रुतीनुरूप ' प्रकाशाचीं कवाडें '–प्रकाशाचीं द्वारें उघडलीं म्हणजे सर्व द्रष्टा, दृश्य, दर्शन ही त्रिपुटि– ईश्वर, जगत् व त्यांतले सर्व व्यवहार हा परमात्मा आपण बनला. ॥ १२३ ॥

दृश्याचिया सृष्टी । दिठीवरी दिठी ।
उठलिया तळवटीं । चिन्मात्राचि ॥ १२४ ॥

पदयुक्त भावार्थ--(आणि लगेंच निज स्वरूपविकासाचीं तीं द्वारें उघडतांच) अनेक 'दृश्याचिया'–ब्रह्मांडांची सृष्टि उत्पन्न झाली, 'दिठीवरी दिठी'– (सृष्टींतील अनंत पदार्थांचीं दर्शनावर दर्शनें, जगताची उत्पत्ति) अनेक वस्तूंचीं ज्ञानें 'उठलिया'–उत्पन्न झालीं तरी 'तळवटीं'–त्यांचे तळवट, त्यांचा आधार, त्यांचें अधिष्ठान 'चिन्मात्रचि'–एक चिन्मात्र, परमात्माच होय. ॥ १२४ ॥

दर्शनऋद्धि बहुवसा । चिच्छेषु मातला ऐसा ।
जे शिळा न पाहे आरिसा । वेद्यरत्नाचा ॥ १२५ ॥

पदयुक्त भावार्थ—' चिच्छेषु'–(चिच्छेषा)–ही परमात्म्याची जी ज्ञान-विलासाची इच्छा कीं 'मी अनेकरूप व्हावें,' हा जो अभिलाष कीं, ' बहुवसा '–हा अनेक युगनिर्मितीच्या प्रकारचा ' दर्शनऋद्धि '– जो दृश्यस्वरूपाचा पसारा आपण होऊन पाहावा, तो 'ऐसा मातला'–इतका वाढला, 'जे'–कीं 'वेद्यरत्नाचा आरिसा'–दृश्यरूप सृष्टिरचनेच्या ' आरिसा ' आरशांत एकवार पाहिलेलें आपलें रूप तें शिळें, जुनें झालेलें समजून 'न पाहे'–तिकडे त्यानें पाहूंच नये. ॥ १२५ ॥

हे सृष्टिरचनेचे आरसे शिळे म्हणजे किती झपाट्यानें बदलत राहात असतात हें श्रीज्ञानराज स्पष्ट करतातः—

क्षणीं क्षणीं नीच नवी । दृश्याची चोख मदवी ।
दिठीकरवी वेढवी । उदार जे ॥ १२६ ॥

पदयुक्त भावार्थ— ' जे ' कीं ' उदार ' तो उदार, थोर मनाचा द्रष्टा ईश्वरपरमात्मा ' क्षणीं क्षणीं '–क्षणोक्षणीं, दरक्षणाला, ' नीच '–नित्य, एकसारखी ' दृश्याची ' दृश्यस्वरूपसृष्टीचीं 'नवी'–नवींनवीं ' चोख '–सुंदर ' मदवी ' तलम वस्त्रें ' दिठी करवी '–आपल्या दृष्टीला 'वेढवी'–नेसवूं लागला; नवी नवी अशी सृष्टीवर सृष्टि, ब्रह्मांडावर ब्रह्मांडें एकसारखीं क्षणाक्षणाला निर्माण होऊं लागलीं. ' स ऐक्षत् ' त्या परमात्म्यानें ' ईक्षण '–केलें, दृष्टि उघडली तोंच सृष्टीवर सृष्टि होऊं लागली अशी श्रुति आहे. ॥ १२६ ॥

मागिलीये क्षणींचे अंगें । पारूसी म्हणोनियां वेगें ।
सांडूनि दृष्टि रिगे । नवेया रूपा ॥ १२७ ॥

पदयुक्त भावार्थ—मागील, गेल्या क्षणांतलें 'अंगें'–अंगडें, दृश्यसृष्टिरूप-वस्त्र 'पारुसी' –पारसें, शिळें म्हणून ' वेगें '–लागलीच, 'सांडुनि –तें टाकून

देऊन, बदलून दृष्टि 'नवेया रूपा' नव्या नव्या रूपांच्याकडे 'रिगे'–वळूं लागली.

सुबोधविवरण—ज्ञानरूप परमात्मा हाच अधिष्ठान असून त्याच्या ठिकाणीं क्षणोक्षणीं अनंत विश्वांतील अनंत पदार्थांच्या घडामोडी कशा होतात याचा असा हा आरंभ मागील १२४ व्या ओवीमध्यें करून आतां या ओवीमध्यें सिद्धान्त करतात कीं एका पदार्थाचें ज्ञान होऊन दुसऱ्या पदार्थाकडे वृत्ति गेली कीं तो पदार्थ म्हणजे तें प्रमेय. त्याला जाणणारा तो प्रमाता व त्या पदार्थाचें जें ज्ञान म्हणजे तो असा असा आहे हें जें त्याचें जाणणें, तें प्रमाण. हीं सर्व निरनिराळीं अशीं नवीन नवीन उत्पन्न होत जातात. आणि त्या सर्वांचा प्रकाशक जो परमात्मा तोच या सर्व त्रिपुट्या आपण होऊन त्यांचा उपभोग आपणच घेतो अशी कल्पना करून तेंच रूपक केलें कीं हीं मागलीं सर्व रूपें पारोशीं होतात म्हणून हा परमात्मा प्रतिक्षणीं नवीं रूपें घेतो. ॥ १२७ ॥

आतां या सर्व त्रिपुट्यांचा प्रकाशक हा जो अधिष्ठानरूप परमात्मा तोच सर्व विषयांना जाणणारा कसा हें रूपकानें वर्णन करून दाखवितात, तें असें:—

तैसींच प्रतिक्षणीं । जाणिवेचीं लेणीं ।
लेऊनि आणी । जाणतेपणा ॥ १२८ ॥

पदयुक्त भावार्थ—त्याचप्रमाणें क्षणोक्षणीं 'जाणिवेचीं लेणीं' ज्ञानाचे अलंकार 'लेऊनि'–अंगावर घालून असा स्वतांस जाणतेपणा आणून आपण सर्वमय ज्ञाता झाला. ॥१२८॥

अशा प्रकारचा असा हा अनेकपणाचा विलास परमात्म्यानें कां आरंभिला तर:—

तया परमात्मपदींचें शेप । ना कांहीं तया सुसास ।
आणि होय येव्हडी कास । घातली जेणें ॥ १२९ ॥

पदयुक्त भावार्थ—'तया'– त्या 'परमात्मपदींचें'– मूळस्वरूपाचा 'शेप'– एकटेपणा 'तया'– त्या परमात्म्याला 'कांहीं सुसास'–मुळींच सुखाचा 'ना' वाटेना 'आणि'–म्हणून 'होय'– 'बहु स्याम्'– 'मी बहु व्हावें' 'येव्हडी'– यासाठीं एवढी मोठी 'जेणें कास घातली' ज्यानें कंबर कसली. वास्तविक पाहातां या परमात्म्याच्या निर्लेप, निर्मळ, अतिसूक्ष्म, सर्व-व्यापक, आकाशाहूनहि विरळ अशा स्वरूपीं ही अनंतकोटि ब्रह्मांडांची रचना

होत असलेली दिसत असली तरी ती कधींहि होतच नाहीं, असा शास्त्र-सिद्धान्त आहे. मग हें अनेकपण जें दिसतें याची वाट काय, हेंच सांगण्याकरितां श्रुतींनीं अनेक युक्त्या योजल्या आहेत. त्यांपैकीं एक अशी कीं परमात्म्याला एकटेपणाचा कंटाळा आला, म्हणून त्यानें आपण अनेकरूप व्हावें म्हणून आपल्या विलासाकरितां एवढें विश्व उत्पन्न करण्याची कंबर बांधली. तथापि ज्ञानस्वरूप परमात्म्याचा विलास तो तर निर्विकार असा भेदरहित ज्ञानमयच असणार. त्यामुळें सर्व पदार्थ हेहि पण परमात्म्याचेच 'शेष' अंश म्हणजे स्वरूप होत. ॥ १२९ ॥

परमात्म्याच्या या विलासामध्यें अनेक भेदज्ञानाचे प्रकार दिसले, तरी मूळ परमात्मस्वरूप हें अभेदरूपानें एकच एक नित्य निर्विकार असेंच कसें असतें, तें महाराज सांगतातः—

सर्वज्ञतेची परी । चिन्मात्राचे तोंडवरी ।
परी तें आन घरीं । जाणिजेना ॥ १३० ॥

पदयुक्त भावार्थ—'सर्वज्ञतेची परी'—सर्व (ब्रह्मांडांतील पदार्थांचे) भेदज्ञानाचे प्रकार, (हा अनेक प्रकारच्या पदार्थांच्या व्यवहारज्ञानाचा विलास अनेकपणानें दिसत असला तरी) मूळ 'चिन्मात्राचे'—त्या परमज्ञानमयाच्या 'तोंडवरी'—केवळ स्वरूपावरच तो होत असणार. 'परी' कारण 'तें'—चिन्मात्र-स्वरूप 'आन घरीं'—निरनिराळ्या प्रकारांनीं अनेक प्रकारच्या भेदांनीं 'जाणिजेना' प्रतीत होत नाहीं. तें मूळचें परमज्ञानमयस्वरूप अति सूक्ष्म असें आकाशवत् अभेदानें असतें तसेंच नित्य असतें.

मूळच्या अफाट अति विस्तीर्ण व अतिशय खोल अशा पाण्याचें नांव समुद्र. तेंच पाणी अनेक प्रकारचें झालेलें दिसूं लागलें कीं त्याच्या मोठ्या लाटा, मध्यम लाटा, लहानशा लाटा, तुषार, बिंदु असे त्याचे अनेक प्रकार दिसत असले तरी त्यांच्यांतलें मूळचें त्या पाण्याचें स्वरूप तें निर्विकार असतें, तसेंच असतें. तें अभेदरूपानें त्या समुद्रांत, त्याच्या लाटांत, बिंदूंत एकरूपानेंच असतें. 'मी बहु व्हावें' असा संकल्प उठून ईश्वर व ईश्वरनिर्मित अनेक जीवसृष्टि, त्या सृष्टींतले अनेक पदार्थ व त्यांचीं अनेक ज्ञानें, हे अनेक प्रकारचे भेद दिसले तरी मूळचें अधिष्ठानरूप अशा परमात्म्याचें चित्स्वरूप तें अभेदरूपानें नित्य एकरूपच असतें. ॥ १३० ॥

असा जो सर्व विलास तो ज्ञानस्वरूपच असतो, असें जें म्हटलें त्याचा समारोप करतातः—

एवं ज्ञानाज्ञानमिठी । तेंही फांकतसे दिठी ।
दृश्यपणें ये भेटी । आपणपयां ॥ १३१ ॥

पदयुक्त भावार्थ—' एवं ' अशाप्रकारच्या ' ज्ञानाज्ञानमिठी '—ज्ञानाचा व अज्ञानाचा व्यवहार ' दिठी '— दृष्टीला ' फांकतसे ' — विस्तारलेला दिसतो 'तेंही' – तो सर्व कांहीं ' दृश्यपणें '– (आपण परमात्माच) दृश्यरूप होऊन ' आपणपयां ' आपण आपल्याच 'भेटी ये'–भेटीला येतो. अशा अनंतरूपांनीं आपण स्वतां आपणच प्रकट होतो. ॥ १३१ ॥

पुन्हा त्या परमज्ञानस्वरूपाच्या विलासाचें स्वरूप अधिक स्पष्ट करून सांगतातः—

तें दृश्य मोटकें देखे । आपण स्वयें द्रष्टृत्वें तोखे ।
तेंचि दिठीचेनि मुखें– । माजीं दडे ॥ १३२ ॥

पदयुक्त भावार्थ—' तें मोटकें दृश्य '– तें असें सुंदर ठरीव सृष्टीचें स्वरूप ' देखे '—पाहून आपण स्वतां ' द्रष्टृत्वें ' द्रष्टा होऊन ' तोखे ' संतोष पावतो, आणि ' तेंचि '–तेंच सृष्टीचें दृश्य 'दिठीचेनि'–परमात्म्याच्या ज्ञानरूप-दृष्टीच्या 'मुखेंमाजीं'–मूळ स्वरूपांत म्हणजे परमात्मस्वरूपांत 'दडे'–लय पावतें, एकरूप होतें. ॥ १३२ ॥

तेव्हां घेणें देणें घटे । परी ऐक्याचें सूत न तुटे ।
जेवीं मुखीं मुख वाटे । दर्पणें केलें ॥ १३३ ॥

पदयुक्त भावार्थ—तेव्हां–त्या (विलासा) मध्यें घेणें देणें ' घटे '–जरी घडत असलें, तरी 'परी'–पण मूळचा ऐक्याचा धागा तुटत नाहीं. जसें 'दर्पणें'–आरशांत ' केलें ' उमटलेलें ' मुख '– दुसरें मुख ' मुखीं वाटे ' – मूळच्या मुखांतलेंसें वाटतें, तसलेंच दिसतें–(आरशाच्या योगानें दुसरें मुख दिसत असूनाहि मूळच्या मुखाचें ऐक्य मोडत नाहीं, तसें विश्वांतल्या अनेक घडामोडींनीं परमात्म्याचें अभेदरूप ऐक्य बिघडत नाहीं.) ॥ १३३ ॥

श्रीज्ञानराज हे वर जो सिद्धान्त केला 'कीं एकपण न मोडतां व्यवहार कसा घडतो ' यास दृष्टान्त देतात, तो असा—

अंगें अंगावरी पहुडे । चेइला वेगळा न पडे ।
तया वारुवाचेनि पाडें । घेणें देणें ॥ १३४ ॥

पदयुक्त भावार्थ—'अंगें अंगावरी'—जो जागच्या जागींच आपल्या ठाणावरच उभ्या उभ्या 'पहुडे'—झोंप घेतो व 'चेइला'—जो तसाच जागा होतो, 'वेगळा'—तरी हें वेगवेगळें 'न पडे'—असें असलेलें दिसून येत नाहीं (ज्याच्या ठिकाणीं) 'तया वारुवाचेनि पाडें' अशा त्या घोड्याच्या झोपण्या जागण्या-प्रमाणें 'घेणें देणें'—हा 'घेणें देणें'चा परमात्म्याच्या ठिकाणचा व्यवहार, ही विश्वांतील हालचाल होते. (ज्याप्रमाणें उत्तम घोडा उभ्या उभ्या झोंप केव्हां घेतो व जागा केव्हां होतो हें कळत नाहीं, त्याप्रमाणें परमात्मस्वरूपांतल्या एकपणांत जगताची उत्पत्ति जी विश्वरचना, विश्वाच्या स्थितिकालची हालचाल व विश्वाचा प्रलय हीं सर्व केव्हां व कसकशीं वेगवेगळीं घडत असतात हें कांहींच कळून येणारें नाहीं. ॥ १३४ ॥

पाणी कल्लोळाचेनि मिसें । आपणपें वेल्हावें जैसें ।
वस्तु वस्तुत्वें खेळों ये तैसें । सुखें लाहे ॥ १३५ ॥

पदयुक्त भावार्थ—'जैसें पाणी'— जसें पाणी हें 'कल्लोळाचेनि'—लाटांच्या 'मिसें'—मिषानें, निमित्तानें, 'आपणपें'—आपणच आपला 'वेल्हावें'—विलास करतें, 'तैसें'—त्याप्रमाणें 'वस्तु वस्तुत्वें'—परमात्मवस्तु ही आपल्या ठिकाणीं आपल्या परमात्मस्वरूपांतल्या 'सुखें'—सहजानंदांतला 'खेळों ये'—खेळ खेळतेशी 'लाहे'—दिसून येते. ॥ १३५ ॥

गुंफिवा ज्वाळांचिया माळा । लेइलियाही अनळा ।
भेदाचिया आहाळां । काय पडणें आहे ? ॥ १३६ ॥

पदयुक्त भावार्थ—'अनळाच्या'—अग्नीनें, 'ज्वाळाचिया गुंफिवा माळा'—ज्वाळांच्या गुंफलेल्या माळा 'लेइलियाही'—अंगावर घातल्या म्हणून त्याला 'भेदाचिया आहाळां'—अग्निवेगळा व त्याच्या ज्वाळा वेगळ्या असल्या भेदाच्या चरांत, खळीमध्यें पडावें लागतें काय ? (कधींच नाहीं. कारण अग्नि व त्याच्या त्या ज्वाळा यांचें स्वरूप हें एकच. म्हणून त्यांच्यांत भेद नसतो.) ॥ १३६ ॥

कीं रश्मीचेनि परिवारें । वेढूनि घेतला थोरें ।
तरी सूर्यासि दुसरें । बोलों येईल ? ॥ १३७ ॥

पदयुक्त भावार्थ--' कीं '– किंवा ' रश्मीचेनि '–किरणांच्या ' थोरें '– मोठ्या थोरल्या ' परिवारें '– समुदायाकडून सूर्य हा ' वेढूनि घेतला '– जरी वेढला गेला, घेरला गेला, तरी 'सूर्यासि'–सूर्याहून 'दुसरें'–निराळा (तो परिवार) म्हणतां येईल काय ? ॥ १३७ ॥

चांदणियाचा गिंवसु । चांदावरी पडिलिया बहुवसु ॥
काय केवळपणीं त्रासु । देखिजेतु ? ॥ १३८ ॥

पदयुक्त भावार्थ—चांदण्याचा ' गिंवसु ' विस्तार चंद्रावर जरी ' बहुवसु '– पुष्कळ पडला तरी ' केवळपणीं '–त्याला आपल्या एकपणांत 'त्रासु'– बिघाड ' देखिजेतु '– दिसेल काय ? ॥ १३८ ॥

दळाचिया सहस्रवरी । फांको आपुलिया परी ।
परी नाहीं दुसरी । भास कमळीं ॥ १३९ ॥

पदयुक्त भावार्थ—कमळ हें ' आपुलिया परी ' – आपल्या परीनें, स्वतांच्या शक्तीप्रमाणें ' दळाचिया सहस्रवरी '–सहस्र दळांनीं, पाकळ्यांनीं ' फांके ' – जरी फुललें, विकास पावलें, ' परी '– तथापि ' कमळीं ' –एका कमळांवाचून तिथें ' दुसरी भास '– दुसरी भासाच्च नसणार. ॥ १३९ ॥

सहस्रवरी बाहिया । आहाती सहस्रार्जुना राया ।
तरी तो काय तिया । येकोत्तरावा ? ॥ १४० ॥

पदयुक्त भावार्थ—सहस्रार्जुन कार्तवीर्य राजाला 'सहस्रवरी'–एक हजार 'बाहिया'–बाहू 'आहाती'–(आहेत)होते. 'तरी' म्हणून तो 'तिया' त्यांनीं, त्या-योगानें, ' येकोत्तरावा काय ' ? एक हजार एकांचा होता काय ? तो त्या सहस्रावर एक हातांचा होता काय ? (म्हणून ते सहस्र हात निराळे आणि तो अर्जुन एक निराळा असा तो एक हजार एक हातांचा का होता ?)

सौकटाचिया वोजा । पसरो कां बहु पुंजा ।
परि ताथुवीं दुजा । भाव आहे ? ॥ १४१ ॥

पदयुक्त भावार्थ—' सौकटाचिया '–मागावर 'वोजा'–रांगेनें, व्यवस्थेनें ' बहु '–अनेक ' पुंजा '–धाग्याचे समुदाय ' पसरो कां '–पसरलेले असेनात ! ' परि '– पण तिथें 'ताथुवीं'–(त्या धाग्यांच्या समुदायांत) तंतूवांचून ' दुजा भाव आहे ?' – दुसरेपणा आहे का ? ॥ १४१ ॥

कोडीवरी शब्दांचा । मेळावा घरीं वाचेचा ।
मीनला तरी वाचा- । मात्र कीं ते ? ॥ १४२ ॥

पदयुक्त भावार्थ—' कोडीवरी '–कोट्यावधि शब्दांचा ' मेळावा '–समुदाय ' वाचेचा घरीं ' –वाणीच्या ठिकाणीं ' मीनला '–जरी एकत्र जमला तरी ' ते ' तो शब्दांचा समुदाय केवळ ' वाचामात्र कीं ? '–वाणीरूपच ना ? ॥१४२॥

तैसे दृश्याचे डाखळे । नाना दृष्टी जे उमाळे ।
उठती लेखावेगळे । द्रष्टृत्वेंचि ॥ १४३ ॥

पदयुक्त भावार्थ—' तैसे '–त्याप्रमाणें ' नाना दृश्याचे '–अनंत दृश्य पदार्थांचे ' डाखळे '–(दाखले) देखावे, ' नाना दृष्टी '–त्यांचीं तीं अनंत दर्शनें त्या अनेक पदार्थांचीं तीं ज्ञानें, तसेंच ' द्रष्टृत्वेंचि ' जें '–त्यांचे ते अनंत द्रष्टे ' उमाळे ' –उसळून ' लेखावेगळे '–गणण्यापलीकडचे, अगणित, असंख्य असे 'उठती'–प्रकट होतात. (हे सर्व द्रष्टे, तीं दृश्यें व तीं दर्शनें अशा परमात्म्यावर या अनंत त्रिपुट्या होत असल्या तरी त्या ' द्रष्टृत्वेंचि '–मूळ द्रष्टा जो परमात्मा त्यारूपच होत.) तीं सर्व अनंतरूपें परब्रह्ममय अशीं एकरूपच होत. ॥ १४३ ॥

गुळाचा बांधा । फुटलिया मोडीचा धांदा ।
जाला तरी नुसधा । गूळचि कीं तो ॥ १४४ ॥

पदयुक्त भावार्थ—' गुळाचा बांधा ' गुळाची ढेप 'फुटलिया '–फुटल्यामुळें 'मोडीचा'–तिला मोडण्याच्या, तुकडे होण्याच्या 'धांदा' (धंदा)–व्यवहाराचें स्वरूप ' जाला ' जरी प्राप्त झालें तरी, (ते सर्व खडे) ' नुसधा '–केवळ, 'गूळचि कीं तो '–एक गूळच ना तो, एक गोडीच ना ती ? ॥ १४४ ॥

तैसें हें दृश्य देखो । कीं बहु होऊनि फांको ।
परी भेदाचा नव्हे विखो । तेचि म्हणोनि ॥ १४५ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें (परमात्मा आपण द्रष्टा होऊन) अनंत विश्वाचें हें दृश्य तो ' देखो '–पाहो, ' कीं ' किंवा (आपणच) ' बहु होऊनि '–अनंतरूपांनीं प्रकट होऊन ' फांको '–विस्तार पावो, ' परी '–पण (तितक्या रूपांनीं तो स्वतांच नटला असल्यामुळें) ' तेचि म्हणोनि '–आपणच तें सर्व म्हणून तो भेदाचा ' विखो नव्हे '–विषय होत नाहीं. ॥ १४५ ॥

तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ।
जन्ही विश्वा अशेखा । भरला आहे ॥ १४६ ॥

पदयुक्त भावार्थ— ' जन्ही '—जरी ' विश्वा अशेखा ' —अखिल विश्व (परमात्मस्वरूप असें) 'भरला आहे'—द्वैतरूपानें भरलेलें असलें तरी ' तया '—त्या 'आत्मयाच्या भाखा'—त्या परमात्मस्वरूपाविषयींच्या भाषेंत, वर्णनांत तर ' दुसरी रेखा '—द्वैताची रेखा, रेष 'न पडेचि'—उमटतच नाहीं. म्हणून परमात्म्याच्या ठिकाणीं द्वैत हें केव्हांहि नाहींच. ॥ १४६ ॥

दुबंधा क्षीरोदकीं । वाणें परी अनेकीं ।
दिसती तरी तितुकीं । सुतें आथी ? ॥ १४७ ॥

पदयुक्त भावार्थ—' दुबंधा '—गंगाजमनी दुहेरी कांटाच्या 'क्षीरोदकीं'—दुधासारख्या पांढऱ्या स्वच्छ वस्त्रांत ' अनेकीं परी '—अनेक प्रकारच्या ' वाणें '—रंगांच्या तऱ्हा दिसल्या तरी 'सुतें'—तंतु 'तितुकीं'—तितक्या प्रकारचे ' आथी ' ?—असतात काय ? ॥ १४७ ॥

पातयाची मिठी । नुकलितां दिठी ।
अवघियाची सृष्टी । पाविजे जरी ॥ १४८ ॥

पदयुक्त भावार्थ—' पातयाची '—पापण्यांचा ' मिठी '— मिटलेलापणा ' नुकलिता '—न उघडतांच ' दिठी '—दृष्टि सर्व सृष्टि ' पाविजे जरी ' जर पाहूं शकेल तरच—॥ १४८ ॥

न फुटतां बीजकणिका । मार्जी विस्तारे वटु असिका ।
तरी अद्वैतफांका । उपमा आथी ॥ १४९ ॥

पदयुक्त भावार्थ—'बीजकणिका'—बीजा अंकुर, मोड न फुटतांच 'मार्जी'—तिच्यामध्यें ' असिका '—संपूर्ण 'वटु' वटवृक्ष, वडाचें झाड ' विस्तारे '—विस्तार पावेल, तर 'अद्वैतफांका'—ह्या अद्वैतस्वरूप अशा परमाम्याच्या ' फांका '—विस्तारास उपमा 'आथी'—होईल. ॥ १४९ ॥

मागील ओवी १२९ पासून तें या १४९ ओवीपर्यंत "एकोऽहं बहु स्याम्" " स एकाकी न रमते । पतिश्च पत्निश्चोभावभवत् " परमात्म्यास एकटेपणांत चैन पडेना म्हणून त्यानें अनेकसृष्टिरचनेचा द्वैतरूप विलास आरंभिला. पण परमात्म्याला हाविलास जेव्हां नकोसा वाटतो तेव्हां त्याची कशी स्थिति असते हें १५४ ओवीपर्यंत श्रीज्ञानराज दृष्टान्तपूर्वक वर्णन करतात, ते असें:—

मग मातें म्यां न देखावें । ऐसेही भरे हावें ।
तरी अंगाचिये विसवे । सेजेवरी ॥ १५० ॥

पदयुक्त भावार्थ—("न बहु स्याम्" – आतां मी बहुत नसावें.) 'मग'–आतां 'म्यां मातें'–मी मला 'न देखावें'–मी अनेकपणानें न दिसावें, 'ऐसेंही हावें' – अशी इच्छेची 'भरे' – स्फूर्ति उठते, 'तरी' – तेव्हां 'अंगाचिये'– आपल्याच अंगाच्या, 'सेजेवरी' –शय्येवर 'विसवे' – विश्रांति घेतों, एकरूप होतों. ॥ १५० ॥

पातयाचि मिठी । पडलिया कीजे दिठी ।
आपुलेचि पोटीं । रिगोनि असणें ॥ १५१ ॥

पदयुक्त भावार्थ—'पातयाचि'– पापण्यांचें 'मिठी पडलिया'–मिटणें झाल्यावर, पापण्या मिटल्यावर 'दिठी'– दृष्टि 'आपुलेचि पोटीं' –आपल्याच ठिकाणीं 'रिगोनि' – सामावून 'असणें कीजे'– जशी असते, तसा माझा अनेकपणानें होण्याचा विलास थांबतो. ॥ १५१ ॥

कां नुदेलिया सुधाकरु । आपणपें भरे सागरु ।
ना कूर्मी गिळी विस्तारु । आपेंआप ॥ १५२ ॥

पदयुक्त भावार्थ— किंवा 'सुधाकरु' – चंद्र 'नुदेलिया' – उगवला नसतांना 'सागरु'– समुद्र 'आपणपें' – आपल्या ठिकाणीं 'भरे' – भरलेला, परिपूर्ण असतो. 'ना' – अथवा 'कूर्मी' –कासवी 'विस्तारु' – आपल्या अंगाचा विस्तार, पसारा 'आपेंआप' – आपोआप, सहज 'गिळी' – मिटून घेते. ॥ १५२ ॥

आंवसेचिये दिवसीं । सतराविये अंशीं ।
स्वयें जैसें शशी । रिगणें होय ॥ १५३ ॥

पदयुक्त भावार्थ—अंवसेच्या दिवशीं 'सतराविये अंशीं' – सतराव्या कलेंत, कलारहित स्थितींत 'स्वयें'–स्वतांच्या ठिकाणीं, निजरूपांत 'जैसें' – जसा 'शशी' —चंद्र 'रिगणें होय'–प्रवेशून असतो. ॥ १५३ ॥

तैसें दृश्य जिणतां द्रष्टे । पडले जैताचिये कुटे ।
तया नांव वावटे । आपणपयां ॥ १५४ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें 'दृश्य'– विश्वरचना जी दिसणारी 'जिणतां' - ती जिंकल्यामुळें, नाहींशी केल्यामुळें 'द्रष्टे' – द्रष्ट्यावर, परमात्म्यावर 'जैताचिये' – जिंकलेपणाचा 'कुटे पडले' – आळ पडतो, आळ येतो, 'तया' – त्या आळाला 'आपणपयां' –आपल्या ठिकाणीं 'वावटे' – ओहोटणें 'नांव'–

असें नांव येतें, पडतें. यालाच परमात्म्याचें मूळच्या स्वरूपीं, आपल्या मूळच्या स्थितींत असणें होतें असें म्हणतात. ॥ १५४ ॥

आतां हा वर सांगितलेला प्रकार परमार्थस्वरूपी मुळीं घडतच नाहीं, असें सिद्ध करतात—

साहजें आघवेंचि आहे । तरी कोण कोणा पाहे ।
तें देखणेंचि आहे । स्वरूपनिद्रा ॥ १५५ ॥

पदयुक्त भावार्थ—' आघवेंचि ' – अवघें हें (दृश्य जगत्) ' साहजें '– सहजरूप, ब्रह्मरूप आहे. 'तरी' –तर मग ' कोण '– द्रष्टा कोण, ' कोणा पाहे '– (व तो) कोणतें दृश्य पाहील ? कारण सर्वच 'देखणेंचि'–ज्ञानस्वरूप, मूळ अधिष्ठानच तें आहे–(द्रष्टा, दृश्य, दर्शन असें तें होय. द्रष्टा – ईश्वर, दृश्य – जगत्, दर्शन – सृष्टींतल्या पदार्थांचें ज्ञान) हें सर्व तें (अधिष्ठान परब्रह्मच) होय. यासच ' स्वरूपनिद्रा ' – परमात्म्याची ती अचल सहजस्वरूपास्थिति जिला ' योगनिद्रा ' असें म्हणतात.

(हें सर्व जगत् मूळचेंच परब्रह्मरूप आहे. मग इथें कोणी कोणास दुजेपणानें पाहावयाचें असणार ? तें पाहाणेंच ती परब्रह्माची स्वरूपनिद्रा जें स्वयंज्ञानघन परमस्वरूपावस्थान तें तें होय.)॥ १५५ ॥

असें जर आहे, तर जेव्हां ' मी बहुत व्हावें ' वगैरे प्रकार यापूर्वी सांगितले तेव्हां ते दृश्य सृष्टीचे विषय कोठून येतात, अशी शंका आल्यास, तिचें समाधान असें:—

नाना न देखणें नको । म्हणे मीचि मातें देखो ।
तरी आपेंआप विखों । अपैसें असे ॥ १५६ ॥

पदयुक्त भावार्थ—' नाना '– किंवा ' न देखणें नको ' – ' न देखणें ' अशी जी स्वरूपनिद्रा ' नको ' – ती नको; ' मीचि मातें देखो ' – मी (अनेकपणानें) आपल्यामध्यच पाहावें ' म्हणे ' – असें वाटलें ' तरी ' – तर मग ' आपेंआप ' – आपोआप ' अपैसें '– सहजच ' विखो ' – दृश्य विषय जो सृष्टीचा पसारा ' असे ' – तो उत्पन्न होत असतो. ॥ १५६ ॥

याचें कारण सांगतात कीं—

जें अनादिच दृश्यपणें । अनादिच देखणें ।
हें आतां कार्यी कोणें । रचूं जावें ॥ १५७ ॥

पदयुक्त भावार्थ—हें 'जें दृश्यपणें'–ही जगताची जी रचना ती 'अनादिच' व 'देखणें'– द्रष्टेपण तेंहि अनादि. 'आतां'– तर मग 'हें कोणें कायी' – हें कोणी व काय 'रचूं जावें'? – बनवावयाचें असणार? ॥ १५७ ॥

हेंच दृष्टान्तांनीं सिद्ध करून दाखवितात कीं :—

अवकाशेशीं गगना । गतीसीं पवना ।
कीं दीप्तीसीं तपना । संबंधु कीजे ? ॥ १५८ ॥

पदयुक्त भावार्थ—अवकाशाशीं गगनाचें, गतीशीं पवनवायूचें किंवा 'दीप्तीसीं तपना' – तेजाशीं अग्नीचें 'संबंधु कीजे?' – ऐक्य करावें लागतें का? ॥ १५८ ॥

विश्वपणें उजिवडे । तरी विश्व देखे फुडें ।
ना तें नाहीं तरी तेव्हडें । नाहींची देखे ॥ १५९ ॥

पदयुक्त भावार्थ— 'विश्वपणें उजिवडे' – विश्वाचा आकार उदय पावला 'तरी'– तर तो तें विश्व 'फुडें देखे'–स्पष्ट पाहतो. 'ना' अथवा 'तें नाहीं' – तें नसलें 'तरी' – तर 'तेव्हडें नाहींची' – तेवढा नाहींपणाहि 'देखे' – तो परमात्मा पाहतो. ॥ १५९ ॥

विश्वाचें 'असें–नाहीं' । विपायें बुडालेंयाही ।
तऱ्ही दशा 'आइसिही' । देखतचि असे ॥ १६० ॥

पदयुक्त भावार्थ— 'विपायें'– कदाचित् विश्वाचें असणें व नसणें 'बुडालेंयाही'–लोप पावलेंच 'तऱ्ही'–तर 'आइसिही दशा'–असलीहि स्थिति 'देखतचि असे'–पाहणारा तोच होय. ॥ १६० ॥

यास दृष्टान्त असा:—

कापुराहि आथी चांदिणें । कीं तोचि न माखे तेणें ।
तैसें केवळ देखणें । ठायें ठावो ॥ १६१ ॥

पदयुक्त भावार्थ—कापरालाहि 'चांदिणें आथी'–चांदण्यासारखा पांढरेपणा असतो, 'कीं'–तरीपण 'तोचि'–तो तर 'तेणें'–त्या पांढरेपणानें 'न माखे'–मळत नाहीं, मलीन होत नाहीं; 'तैसें'–तसेंच 'ठायें'–स्वतांच्या ठिकाणीं 'केवळ देखणें'–निखळ ज्ञानस्वरूपानें 'ठावो'–परमात्मा स्थित असतो. ॥ १६१ ॥

किंबहुना ऐसें । वस्तु भलतिये दशे ।
देखतचि असे । आपणपयातें ॥ १६२ ॥

पदयुक्त भावार्थ—'किंबहुना'–फार काय सांगावें ? 'ऐसें वस्तु'–अशी ही परमात्मवस्तु 'भलतिये दशे'– कोणत्याहि अवस्थेंत 'आपणपयातें'–आपल्या स्वतांस 'देखतचि असें'–पाहातच असते, जाणत असते. ॥ १६२ ॥

मनोरथांचीं देशांतरें । मनीं प्रकाशून नरें ।
मग तेथें आदरें । हिंडे जैसा ॥ १६३ ॥

पदयुक्त भावार्थ—' मनोरथांची '–कल्पिलेलीं 'देशांतरें'– अनेक देशांचीं स्थळें 'नरें'– माणसानें 'मनीं प्रकाशून' मनांत रचून मग तिथें जसा आदरें प्रेमपूर्वक हिंडतो. ॥ १६३ ॥

कां दाटला डोळा डोळयां । डोळा चितारा होऊनियां ।
स्फुरे चोख म्हणौनियां । विस्मो नाहीं ॥ १६४ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा 'डोळा डोळया' डोळयांत दाटला–दाबला असतां तो डोळा 'चितारा होऊनियां'– चित्रविचित्र होऊन 'स्फुरे'–नटतो, स्फुरतो; तसा परमात्मा 'चोख म्हणौनियां'– शुद्ध असल्यामुळें 'स्फुरे'–(सर्व तोच) नटतो, 'विस्मो नाहीं' यांत आश्चर्य नाहीं. ॥ १६४ ॥

यावरून सिद्धान्त निघतो तो असाः—

यालागीं एकें चिद्रूपें । देखिजे कां आरोपें ।
आपणयां आपणपें । काय काज ॥ १६५ ॥

पदयुक्त भावार्थ—' यालागीं '–म्हणून 'एकें चिद्रूपें'–एकाच आपल्या ज्ञानरूपाच्या ठिकाणीं 'आपणपें आपणयां'–आपणच आपल्यास परमात्म्यानें 'देखिजे'–पाहिलें, 'का' असा 'आरोपें'–आरोप करण्याचें 'काज काय'– मग कारण काय ? ॥ १६५ ॥

किळेचें पांघुरण । आपजवी रत्ना कोण ।
कीं सोनें ले सोनेंपण । जोड जोडूं ॥ १६६ ॥

पदयुक्त भावार्थ—' रत्ना '– हिऱ्याच्या ठिकाणीं 'किळेचें'–तेजाचें 'पांघुरण'–पांघरूण, आच्छादन 'कोण आपजवी ?'–कोणी घातलें असतें काय ? किंवा सोनें स्वतांस सोनेंपण 'जोडूं'– प्राप्त करून 'जोड ले' ? – आपल्या अंगावर घालतें काय ? ॥ १६६ ॥

चंदन सौरभ वेढी । कीं सुधा आपणया वाढी ।
कीं गूळ चाखे गोडी । ऐसें आथी हें ? ॥ १६७ ॥

पदयुक्त भावार्थ—चंदन 'सौरभ'–सुगंध 'वेढी'–पांघरतो काय ? किंवा 'सुधा'– अमृत 'आपणया'– आपल्या स्वतांला अमृत वाढतें काय ? किंवा गूळ आपली गोडी चाखतो काय ? 'ऐसें हें आथी ?'–असें हें असतें काय ?॥१६७॥

कीं उजाळाचे किळे । कापुरा पुटीं दिधलें ।
कीं ताऊन ऊन केलें । आगीतें काई ॥ १६८ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा 'उजाळाचे'–स्वच्छ पांढरेपणाच्या 'किळे'–प्रकाशानें कापराला 'पुटीं दिधलें'– पुटें देऊन चोपडलें असतें काय ? किंवा आगीला 'ताऊन'– तापवून कधीं ऊन केलें असतें काय ? ॥ १६८ ॥

नाना ते लता । आपुले वेली गुंडाळितां ।
घर करी न करितां । जयापरी ॥ १६९ ॥

पदयुक्त भावार्थ—'नाना'–अथवा 'लता'– वेली 'ते आपुले वेली गुंडाळितां'– ती आपल्या वेलाला पसरत असतां 'जयापरी'– ज्याप्रमाणें 'न करितां'– सहजच, आपोआप 'घर करी'– घर करते, आपला आपल्या ठिकाणीं विस्तार करते. ॥ १६९ ॥

कां प्रभेचा उभला । दीपप्रकाश संचला ।
तैसा चैतन्यें गिंवसिला । चिद्रूप स्फुरे ॥ १७० ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा 'दीपप्रकाश'– दिव्याचा उजेड 'प्रभेचा उभला'–आपल्या प्रकाशाच्या भरानें 'संचला'–(आपल्या ठिकाणीं) भरलेलाच असतो, तो पूर्णपणानें प्रकाशलेला असतो; तसेंच 'चिद्रूप'–ज्ञानघन असलें हें परमात्मस्वरूप 'चैतन्यें'–ज्ञानमय असें 'गिंवासिला'– स्वतांमध्यें ओतप्रोत भरून 'स्फुरे'– स्फुरत असतें. तें सर्वत्र व्यापकपणानें संचलेलें असतें. ॥ १७०॥

ऐसें आपणयां आपण । आपुलें निरीक्षण ।
करावें येणेंवीण । करितुचि असे ॥ १७१ ॥

पदयुक्त भावार्थ—'ऐसें'–असें हें 'आपणयां आपण'–आपण आपल्या स्वतांच्या ठिकाणीं 'आपुलें निरीक्षण'–आपलें अवलोकन करावें 'येणेंवीण'–या हेतूवांचून 'करितुचि असे'–तो करीत असतो. ॥ १७१ ॥

ऐसें हें देखणें न देखणें। हें आंधारें, चांदिणें।
मा चंद्रासि उणें। स्फुरतें का ॥ १७२ ॥

पदयुक्त भावार्थ—असें हें पाहणें, न पाहणें यांविरहित परमात्मा असतो. ' हा अंधार, ' ' हें चांदणें ' ' चंद्रासि '–चंद्राच्या ठिकाणीं 'उणें'– हा उणेपणा हा समविषमभाव ' मा '–कधींतरी 'स्फुरतें का '–स्फुरतो का ? ॥ १७२ ॥

म्हणोनि हें न व्हावें। ऐसेंही करूं पावे।
तरी तैसाचि स्वभावें। आयिता असे ॥ १७३ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून ' हें ' दृश्य आपण ' न व्हावें, ' ' ऐसेंही करूं पावे'– असेंहि करण्याविषयीं स्फूर्ति झाली, तर ' स्वभावें '–स्वभावतांच तो ' तैसाचि '–तसाच ' आयिता '–मूळचा सिद्धच आहे. ॥ १७३ ॥

द्रष्टा दृश्य ऐसें। अळुमाळु दोनी दिसे।
तेंही परस्परानुप्रवेशे। कांहीं ना कीं ? ॥ १७४ ॥

पदयुक्त भावार्थ—' द्रष्टा '–हा अवलोकन करणारा व 'दृश्य'–हें जगत् स्वरूप ' अळुमाळु '–कांहींसें ' दोनी ऐसें दिसे '–असे दोन भाव दिसतात खरें. तथापि 'परस्परानुप्रवेशें'–ते परस्परांत प्रवेश होतांच ' तेंहि '–मुळींच तसलें 'कांहीं ना '–कांहीं एक नाहीं असें ' कीं ' ?– होतें ना ? ॥१७४॥

तेथें दृश्य द्रष्टां भेर। द्रष्टेपण दृश्यीं सरे।
मा दोन्ही न होनि उरे। दोहींचें साच ॥ १७५ ॥

पदयुक्त भावार्थ—'तेथें'–त्या ठिकाणीं ' दृश्य '–जगत् हें ' द्रष्टां '– द्रष्ट्या या परमात्मस्वरूपांत ' भरे '–भरून जातें; द्रष्टेंपण हें दृश्यामध्यें संपतें, नाहींसें होतें. ' मा '–मग 'दोन्ही न होनि'–दोन्हीहि न राहून दोहोंचें 'साच'– सत्यस्वरूप 'उरे'–शिल्लक राहतें, तें केवळ अधिष्ठान परब्रह्म हेंच असतें. ॥१७५॥

मग भलतेथ भलतेव्हां। माझारींले दृश्य–द्रष्टा–भावा।
आटणी करीत खेंवा। येती दोन्ही ॥ १७६ ॥

पदयुक्त भावार्थ—मग ' भलतेथ '–वाटेल तेथें ' भलतेव्हां '–वाटेल त्या काळीं म्हणजे सर्वदेशीं सर्वकाळीं असलेले ' दोन्ही '–दृश्य आणि द्रष्टा हे दोन्ही भाव आपली आटणी करून आपण शिल्लक न राहून ' माझारींले '–ते आपल्या मूळच्या स्वरूपांत ' खेंवा येती '– ऐक्य पावतात. ॥ १७६ ॥

कापुरीं अग्निप्रवेशु । कीं अग्नि घातला पोतासु ।
ऐसें नव्हे संवसरिसु । वेंचु झाला ॥ १७७ ॥

पदयुक्त भावार्थ—कापरांत अग्नीचा प्रवेश झाला किंवा 'अग्नि'—अग्नींत 'पोतासु' – कापूर घातला असें नसून 'संवसरिसु' – सारखाच, एकदमच 'वेंचु जाला' – (दोहींचा) नाश होतो. कापूर व अग्नि हे दोन्ही मूळचे अग्नीरूप होतात. ॥ १७७ ॥

येका येकु वेंचला । शून्यबिंदु शून्यें पुसिला ।
द्रष्टा दृश्याचा निमाला । तैसें होय ॥ १७८ ॥

पदयुक्त भावार्थ—'येका'– एकांतून 'येकु'– एक 'वेंचला'–वजा केला तर 'शून्यबिंदु' – शून्य राहतें. 'शून्यें' – तें शून्य 'पुसिला होय'– जसें आपला अभाव दाखवून पुसलेलें होतें, 'तैसें' – तसेंच द्रष्टा व दृश्य यांचा 'निमाला होय'– लोप होतांच तीं शून्य होतात. ॥ १७८ ॥

किंबहुना आपुलिया । प्रतिबिंबा झोंबिनलिया ।
झोंबीसकट आटोनियां । जाईजे जेवीं ॥ १७९ ॥

पदयुक्त भावार्थ—'किंबहुना'–फार काय सांगावें ? 'जेवीं'–ज्याप्रमाणें एखादा आपल्या 'प्रतिबिंबा'–पाण्यांतल्या पडछायेला 'झोंबिनलिया'– आलिंगन देऊं गेल्यास त्या आलिंगनासकट ते बिंबप्रतिबिंबभाव आटून जातात, शिल्लक राहात नाहींत. ॥ १७९ ॥

तैसें रुसतां दृष्टी । द्रष्टा दृश्य भेटी ।
येती तेथें मिठी । दोहींची पडे ॥ १८० ॥

पदयुक्त भावार्थ—तसें 'दृष्टी रुसतां'–दर्शनभाव जो जगत्ज्ञानाचा भाव तो दूर होतांच 'द्रष्टा'–जगत् निर्माण करणारा व 'दृश्य'–जगतांतील पदार्थ दोहींचें 'मिठी'–ऐक्य तेथें 'पडे'–होतें. 'जगत्' हा भाव नाहींसा होतांच त्याबरोबरच जगत् निर्माण करणारा ईश्वरभाव व जगतांतील पदार्थ हेहि भाव 'तेथें दोहींची मिठी पडे'–ते दोन्ही परमात्मस्वरूपीं लय पावतात. ॥ १८० ॥

सिंधु पूर्वापार । न मिळती तंवचि सागर ।
मग येकवट नीर । जैसें होय ॥ १८१ ॥

पदयुक्त भावार्थ—'पूर्वापर'– (पूर्व + अपर) पूर्व व पाश्चिम 'सिंधु'-समुद्र मिळत नाहींत 'तंवचि'– तोंपर्यंत 'सागर' हें नांव त्यांना असतें; मग

ते 'येकवट'– एकत्र झाले म्हणजे 'जैसें'– ज्याप्रमाणें 'नीर होय'– सर्व पाणीच पाणी होतें. ॥ १८१ ॥

बहुये हें त्रिपुटी । साहजें होतया राहटी ।
प्रतिक्षणा काय ठी । करीतसे ॥ १८२ ॥

पदयुक्त भावार्थ— 'हें बहुये त्रिपुटी राहटी'– या बहुत, अनंत त्रिपुट्यांचा व्यवहार 'साहजें'– सहज 'होतया'– होत असतांना प्रतिक्षणाला काय 'ठी करीतसे'– त्यांचा निश्चय कां करावा लागतो ? ॥ १८२ ॥

दोनी विशेषें गिळी । ना निर्विशिष्टातें उगळी ।
उघडीझांपी येकेंच डोळीं । वस्तुचि हे ॥ १८३ ॥

पदयुक्त भावार्थ—हा परमात्मा दोन्ही (दृश्य – द्रष्टा) हे विशेष भाव गिळून टाकतो व 'निर्विशिष्टातें'– विशेष अशा भावरहित शुद्ध स्वरूपालाहि 'उगळी ना'– प्रकट होऊं देत नाहीं. अशी ही उघडझांप येकाच डोळ्यानें 'हे वस्तुचि' या परमात्मवस्तूची चालते. ॥ १८३ ॥

पातया पातें मिळे । कीं द्रष्टृत्वें सैंघ पघळे ।
तिये उन्मळितां मावळे । नवलावो हा ! ॥ १८४ ॥

पदयुक्त भावार्थ—पात्याला पातें मिळतांच कीं 'द्रष्टृत्वें'– दृश्यसृष्टि 'सैंघ'–चोहोंकडे 'पघळे'– विस्तार पावते. 'तिये'– तींच पार्ती 'उन्मळितां'– उघडतांच तो दृश्यविस्तार मावळतो, हें नवल होय ! ॥ १८४ ॥

द्रष्टा दृश्याचा ग्रासी । मध्यें लेखु विकासी ।
योगभूमिका ऐसी । अंगीं वाजे ॥ १८५ ॥

पदयुक्त भावार्थ—असा हा द्रष्टा व दृश्य यांचा 'ग्रासी'– लोप होतांच 'मध्यें'– मध्यंतरीं 'लेखु विकासी'– जी स्थिति उत्पन्न होते, विकास पावते, ती 'अंगीं'–(परमात्म) स्वरूपांतली 'ऐसी योगभूमिका वाजे'–हीं सहज स्फूर्तिरहित स्थिति होय. ॥ १८५ ॥

हीच पुढील दृष्टान्तांनीं श्रीज्ञानराज अधिक स्पष्ट करतातः—

उठिला तरंगु जैसे । पुढें आनुही नुमसे ।
ऐसा ठायीं जैसें । पाणी होये ॥ १८६ ॥

पदयुक्त भावार्थ— ' उठिला तरंगु ' – उठलेली लाट बसली, पुढें ' आनुही ' – अन्य, दुसरीहि ' नुमसे ' – उठली नाहीं, अशा वेळीं, असल्या अवस्थेंत पाणी स्वरूपानें जसें असतें, तशी ती होय. ॥ १८६ ॥

कां नीद सरोनि गेली । जागृति नाहीं चेयिली ।
तेव्हां होय आपुली । जैसी स्थिति ॥ १८७ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा झोप पूर्ण संपली, पुरी झाली व ' जागृति ' – पुरी जाग ' चेयिली नाहीं ' – आली नाहीं, ' तेव्हां ' – अशा संधींत आपली स्थिति जशी असते. ॥ १८७ ॥

नाना येका ठाऊनि उठी । अन्यत्र नव्हे पैठी ।
हें गमे तैसिया दृष्टी । दिठी सुतां ॥ १८८ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा दृष्टि एका ' ठाऊनि उठी ' – वस्तूवरून उठली व ' अन्यत्र ' – दुसऱ्या वस्तूवर ' पैठी नव्ही ' – पोहोंचली नाहीं, 'तैसिया दिठी' – तसल्या (मध्यसंधींतल्या) दृष्टीनें ' सुतां ' – पाहिलें असतां, ' हें गमे ' – हें कळेल. ॥ १८८ ॥

कां मावळों सरला दिवो । रात्रीचा न करी प्रसवो ।
तेणें गगनें हा भावो । वाखाणिला ॥ १८९ ॥

पदयुक्त भावार्थ—अथवा ' दिवो ' – दिवस मावळून गेला, रात्रीचा 'प्रसवो' – आरंभ, उदय झाला नाहीं, रात्रीनें उदय केला नाहीं, अशा त्या गगनाप्रमाणें ' हा भावो ' – ही स्थिति, ही योगभूमिका, ही स्वरूपस्थिति असते ' वाखाणिला ' असें वाखाणून वर्णन करतां येईल. ॥ १८९ ॥

घेतला स्वासु बुडाला । घापतां नाहीं उठिला ।
तैसा दोहींसि सिवतला । नव्हे जो अर्थु ॥ १९० ॥

पदयुक्त भावार्थ—घेतलेला श्वास 'बुडाला' – आंत जिरला व ' घापतां ' – बाहेर पडावयाचा ' उठिला नाहीं ' – तो उठला नाहीं, 'तैसा जो' – तसा जो (प्राणवायु) 'दोहींसी' – दोहींनीं (श्वास, उच्छ्वास यांनीं) ' सिवतला नव्हे ' – शिवलेला नसतो, ' जो अर्थु ' – असा जो भाव, अशी जी प्राणाची स्थिति, ती योगभूमिका होय. ॥ १९० ॥

कीं अवघांचि करणीं । विषयांची घेणी ।
करितांचि येके क्षणीं । जें कीं आहे ॥ १९१ ॥

पदयुक्त भावार्थ—' कीं '– किंवा ' अवघांचि '– अवघींच, सर्वेहि ' करणीं '–इंद्रियांकडून विषयांचा 'घेणीं करितांचि'–घेण्याचा, सेवनाचा व्यापार होत असतांनाच 'येके क्षणीं'–त्या एका क्षणाला ' जें कीं आहे '–जी स्थिति होत असते, ती योगभूमिका होय. ॥ १९१ ॥

तयासारिखा ठावो । हा निकराचा आत्मभावो ।
येणें कां पाहों । न पाहों लाभे ॥ १९२ ॥

पदयुक्त भावार्थ—' तयासारिखा '– (वरील दृष्टान्तांतून वर्णिल्याप्रमाणें) त्या स्थितीप्रमाणें ' हा निकराचा ठावो '–ही अंतिम अवस्था ' आत्मभावो होय'–आत्म्याचें स्वरूप (योगभूमिका) होय. ' येणें '–या स्थितीमुळें त्या ठिकाणीं ' पाहो, न पाहों '–पाहणें, न पाहणें ' कां लाभे '–हें कसें प्राप्त होईल ? तिथें जाणीव नेणीव असते का ? ॥ १९२ ॥

काय आपुलिये भूमिके । आरिसा आपुलें निकें ।
पाहों, न पाहों शके । हें के आहे ? ॥ १९३ ॥

पदयुक्त भावार्थ—आरसा ' आपुलिये भूमिके '–आपल्या स्वतांच्या ठिकाणीं 'आपुलें निकें'–आपुलें सुरेखपण, स्वतांचें स्वच्छपण पाहूं शकतो, किंवा पाहूं शकत नाहीं, हें म्हणणें कसें असूं शकेल ? ॥ १९३ ॥

कां समोर पाठिमोरिया । मुखें होऊं ये आरिसिया ।
वांचूनि तयाप्रति तया । होआवें कां ॥ १९४ ॥

पदयुक्त भावार्थ— ' मुखें ' –चेहऱ्याच्या ठिकाणीं ' आरसिया ' – आरशाच्या योगानें ' समोर '– समोरपणा ' कां '– किंवा ' पाठिमोरिया '– पाठमोरपणा ' होऊं ये ' होऊं शकेल. पण ' वांचूनि '– आरशावांचून ' तया '- त्या मुखाला त्याच्या ठिकाणीं ' तयाप्रति '– त्याप्रमाणें (समोरपणानें किंवा पाठमोरपणानें) ' होआवें कां '–होतां येईल काय ? ॥ १९४ ॥

सर्वांगें देखणा रवी । परी ऐसें घडे केवीं ।
जे उदोअस्तूंची चवी । स्वयें घेपे ॥ १९५ ॥

पदयुक्त भावार्थ— ' रवी '– सूर्य सर्वांगानें ' देखणा '– शोभायमान, प्रकाशमान खरा. पण ' स्वयें '– स्वतां आपली उदयअस्तांची ' जे चवी '– जी गोडी, जें सुख ' घेपे '– तें आपलें आपणच घेतो, असें ' केवीं घडे '– कसें घडेल ? यावरून सूर्य अचल आहे, हेंहि सिद्ध होतें. ॥ १९५ ॥

कीं रसु आपणिया पिये ? । कीं तोंड लपऊनि ठाये ? ।
हें रसपणें नव्हे । तया जैसें ॥ १९६ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा 'रसु'– रस, पाणी ('रसोऽहमप्सु कौंतेय' श्रीगीता) आपल्या स्वतांलाच 'पिये ?'– पितें का ? 'कीं'– किंवा तसें न करतां तोंड लपवून तें 'ठाये'–एकीकडे जाऊन बसतें काय ! जसें 'रसपणें'–तें पाणीपणानें स्वतां असल्यामुळें 'तया'–त्याच्या ठिकाणीं 'हें'– (स्वतांला पिणें किंवा स्वतांला त्यापासून लपविणें (दूर ठेवणें) 'नव्हे'– हे विकार कांहींच होत नाहींत. ॥ १९६ ॥

तैसें पाहणें न पाहणें । पाहणेंपणेंचि हा नेणें ।
आणि दोन्ही हें येणें । स्वयेंचि असिजे ॥ १९७ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें हा परमात्मा, आत्मा 'पाहणेंपणेंचि'– पाहणेंपणानेंच, पाहणेंस्वरूपच, केवळ स्वयंज्ञप्तिस्वरूपच असल्यामुळें 'पाहणें'– दृश्यपण, 'न पाहणें'– अदृश्यपण, लोप (हे विश्वरचनेच्या उत्पत्तिस्थितीचे जे उदय अस्तरूपभाव) 'नेणें'– तो जाणत नाहीं, हें (त्याला) माहीतच नसतें. 'आणि'– असें असूनहि 'दोन्ही'– हे दोन्ही भाव 'येणें'– याच्या योगानें 'स्वयेंचि'– याच्या स्वतांवरच 'हें असिजे'– असे सहज प्रयत्नावांचूनच घडत असतात. ॥ १९७ ॥

जें पाहणेंचि म्हणौनियां । पाहणें नव्हे आपणयां ।
तैं न पाहणें आपसया । हाचि आहे ॥ १९८ ॥

पदयुक्त भावार्थ—'जें'– जी आत्मवस्तु 'पाहणेंचि'– स्वतां पाहणेंरूपच आहे. 'म्हणौनियां'– म्हणून 'आपणयां पाहणें नव्हे'– ती आपणास निराळेंपणानें पाहात नाहीं, (पाहणेंपणा जी विश्वरचनास्फूर्ति ती तेथें एकपणामुळें संभवत नाहीं.) 'तैं'– त्यावरून 'हाचि न पाहणें आहे'–ही आत्मवस्तु स्वतां न पाहणेंस्वरूपच आहे, हें 'आपसया'– आपोआपच, सहजच (सिद्ध) होतें. ॥ १९८ ॥

यामुळें परमात्म्यावरचा सृष्टिरचनेचा आळ नाहींसा होतो, हें दाखवितातः—

आणि न पाहणें मा कैसें । आपणपें पाहों बैसें ।
तरी पाहणें हें ऐसें । हाचि पुढती ॥ ॥ १९९ ॥

पदयुक्त भावार्थ—आणि ' न पाहणें '–स्वरूप तर निर्विकार निराकार. ' मा '–तर मग ' आपणपें '–आपल्याला ' कैसें पाहों जैसे '–हा कसें पाहूं शकेल, हा कसा साकार होईल ? (अशी शंका आल्यास) ' तरी '–तर ' हाचि पुढती '–हा स्वतांच ' हें ऐसें '–असें आतां वर सांगितल्याप्रमाणें ' पाहणें '– पाहणें स्वरूपच आहे. ॥ १९९ ॥

हीं दोन्ही परस्परें । नांदती येका हारें ।
बांधोनि येरयेरें । नाहीं केलें ॥ २०० ॥

पदयुक्त भावार्थ—' हीं दोन्ही '–(पाहणें, अनेक होणें, न पाहणें, एकपणानें असणें) हे दोन्ही भाव ' परस्परें '–एकमेक ' येका हारें '–एका पंक्तीला ओळीला एके ठिकाणीं नांदतात. ' येरयेरें '–एकमेकांस ' बांधोनि '–बांधून घेऊन, सापेक्ष राहून 'नाहीं केलें'–नाहींसें होऊन जातात. हे दोन्ही मूळपरमात्मस्वरूपमय होतात. ॥ २०० ॥

पाहणया पाहणें आहे । तरी न पाहणें हेंचि नोहे ।
म्हणौनि याची सोये । नेणती दोन्ही ॥ २०१ ॥

पदयुक्त भावार्थ—' पाहणया '–पाहणारा, द्रष्टा हा ' पाहणें आहे '–पाहणेंस्वरूपच आहे. तर ' न पाहणें '–न पाहणें ' हेंचि नोहे '–हेंच तेथें होत नाहीं; म्हणून दोन्ही हे 'याची सोये'–या परमात्म्याचें स्वरूप ' नेणती '–जाणत नाहींत. ॥ २०१ ॥

म्हणून परमात्मस्वरूप हे दोन्ही भावांविरहित कसें आहे हें सांगतातः—

एवं पाहणें न पाहणें । चोरूनियां असणें ।
ना ' पाहे ' तरी कोणें । काय पाहिलें ॥ २०२ ॥

पदयुक्त भावार्थ—'एवं'–याप्रमाणें 'पाहणें'–साकार होणें, 'न पाहणें'–निराकार होणें या भावांनीं ' चोरूनियां असणें '–तें स्वरूप अलिप्त असतें. 'ना'–अथवा ' पाहे '–पाहिलें (" स ऐक्षत "–परमात्म्यानें ईक्षण केलें, "बहु स्याम्" मी बहु व्हावें) असें म्हटलें, तरी कोणीं काय पाहिलें ? निर्माण केलें ? ॥२०२॥

दिसत्यानें दृश्य भासे । म्हणावें ना देखिलें ऐसें ? ।
तरी दृश्यास्तव दिसे । ऐसें नाहीं ॥ २०३ ॥

पदयुक्त भावार्थ—' दिसत्यानें '–दिसता, द्रष्टा, त्याच्यायोगानें ' दृश्य '–जगत् ' भासे '–दिसलें, तर त्यानें 'ना देखिले'–तें पाहिलें नाहीं 'ऐसें म्हणावें'–

असें म्हणावें काय ? ' तरी दृश्यास्तव '–दृश्य सापेक्ष, दृश्यामुळें ' दिसें '–हें त्याचें पाहणें दिसतें, म्हणून तो जगताचा द्रष्टा होतो, ' ऐसें नाहीं '–असें नाहीं. (दृश्य हें द्रष्ट्याहून निराळें नाहीं. द्रष्टाच दृश्यरूप होतो.) कार्य हें नित्य कारणरूप असतें. कारण हें कार्यांत ओतप्रोत भरून राहात असतें. अलंकार नित्य सुवर्णमय असतात. सुवर्ण हें अलंकारांना व्यापून असतें. तद्वतच जगत् हें नित्य परमात्ममय असून त्यांत परमात्माच सर्वत्र ओतप्रोत असतो. ॥ २०३ ॥

दृश्य कीर दृष्टीसी दिसे । परी साच कीं द्रष्टा असे ।
आतां नाहीं तें कैसें । देखिलें होय ॥ २०४ ॥

पदयुक्त भावार्थ—दृश्य, जगत् खरोखरीच दृष्टीला दिसत असतें. पण तें 'साच'–वास्तविक 'द्रष्टा कीं'–द्रष्टारूपच, परमात्मारूपच 'असे'–आहे. आतां ' नाहीं '–तें नाहीं जर (तें दृश्य जगत् परमात्म्याहून जर निराळें नाहीं तर) 'तें देखिलें '–तें (परमात्म्यानें) पाहिलें, हें कसें होईल ? ॥ २०४ ॥

मुख दिसो कां दर्पणीं । परी असणें कीं तया मुखपणीं ।
तरी जाली ते वायाणी । प्रतीति कीं ॥ २०५ ॥

पदयुक्त भावार्थ—मुख ' दर्पणीं '–आरशांत ' दिसो कां '–दिसलें जरी ' परी '–तरी तें 'तया मुखपणीं असणें कीं'–त्या आपल्या मुखपणानेंच (आपल्या ठिकाणीं) असतें. 'तरी'–तर मग 'ते प्रतीति'–तो आरशांतला अनुभव 'वायाणी'–खोटा 'जाली कीं'–ठरलाच ना ! ॥ २०५ ॥

देखतांचि आपणयातें । आलिये निदेचेनि हातें ।
तया स्वप्नाऐसें येथें । निहाळितां ॥ २०६ ॥

पदयुक्त भावार्थ—'आलिये निदेचेनि हातें'–आलेल्या झोपेच्या योगानें 'तया स्वप्नाऐसें'–त्या स्वप्नांतल्याप्रमाणें ' आपणयातें देखतांचि '–आपल्या स्वतांला पाहिल्यासारखें 'येथें'–येथील 'निहाळितां'–न्याहाळणें, पाहणें आहे. ॥ २०६ ॥

निद्रिस्तु सुखासनीं । वाहिजे आनु वाहणीं ।
तो साच काय तेसणी । दशा पावे ॥ २०७ ॥

पदयुक्त भावार्थ— ' सुखासनीं '–सुखरूप शय्येवर 'निद्रिस्तु'–निजलेला जरी स्वप्नांत ' आनु '–अन्य ठिकाणीं ' वाहणीं '–वाहनांत ' वाहिजे '–वाहून नेला असला तरी तो ' साच '–खरोखर ' तेसणी दशा '–तसल्या स्थितीला प्राप्त होतो काय ? ॥ २०७ ॥

कीं सिसेंवीण येक येकें । दाविलीं राज्य करिती रंकें ।
तैसींच तियें सतुकें । आथी काई ॥ २०८ ॥

पदयुक्त भावार्थ—' कीं '– किंवा ' सिसेंवीण '– शिरावांचून, मस्तकें नसलेलें ' रंकें येक येकें '– भिकाऱ्यांचें एकमेक जोडपें ' तियें '– तें त्या स्वप्नांत राज्य करीत असलेलें दिसलें तर ' तैसींच '– तीं दोघें ' सतुकें '– खरोखरचीं ' आथी काई '– जागेपणीं होतीं काय ? ॥ २०८ ॥

ते निद्रा जेव्हां नाहीं । तेव्हां जो जैसा जिये ठाईं ।
तैसाचि स्वप्नीं कांहीं । न दविजेचि कीं ॥ २०९ ॥

पदयुक्त भावार्थ—ती निद्रा जेव्हां नाहींशी होते, तेव्हां जो जसा ज्या ठिकाणीं असतो, ' तैसाचि '– तसाच तो असतो. ' स्वप्नीं दविजेचि '– स्वप्नांतल्या त्या देखाव्यासारिखें 'कांहीं न कीं'– त्यांचें कांहीं एक होत नसून तो पूर्वीचाच असतो. ॥ २०९ ॥

तान्हेलेया मृगतृष्णा । न भेटलेया शिणु जेसणा ।
मा भेटलेया कोणा । काय भेटलें ॥ २१० ॥

पदयुक्त भावार्थ—तान्हेल्याला मृगजळ न दिसल्यानें ' जेसणा '–जेवढा ' शिणु '– शीण, ' मा '– मग ' भेटलेया '– तें दिसल्यावर तरी कोणाला काय मिळालें ? ॥ २१० ॥

कीं साउलीचेनि व्याजें । मेळविलें जेणें दुजें ।
तयाचें करणें वांझें । जालें जैसें ॥ २११ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा सावलीच्या निमित्तानें ज्यानें ' दुजें '–दुसरा सोबती म्हणून ' मेळविलें '– तिला घेतलें, तर त्याचें तें ' करणें ' जसें ' वांझें जालें '– व्यर्थ होतें. ॥ २११ ॥

तैसें दृश्य करूनियां । द्रष्ट्यातें द्रष्ट्या ।
दाऊनि धाडिलें वायां । दाविलेंपणही ॥ २१२ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें ' द्रष्ट्यातें '– द्रष्टा जो परमात्मा त्याला ' दृश्य करूनियां '– दृश्य-जगत्‌रूप व्हावयास लावून तेंच ' द्रष्ट्या दाऊनि '– त्याला दाखवून, त्याला पाहावयास लावून ' दाखविलेंपणही '– तो देखावाहि ' वायां धाडिलें '– व्यर्थ झाला, ठरला. ॥ २१२ ॥

जें दृश्य द्रष्टाचि आहे । मा दावणें का साहे ।
न दाविजे तरी नोहे । तया तो काई ॥ २१३ ॥

पदयुक्त भावार्थ—जें दृश्य, जगत् तें द्रष्टा–परमात्माच आहे. 'मा'–मग 'दावणें'–हा दर्शनभाव, दृश्यजगताचें ज्ञान (हें निराळेपणानें) 'साहे का?'– शक्य होईल काय? 'न दाविजे'– (दर्शनभाव) न दिसला म्हणून 'तया तो'– त्याचा तो 'नोहे काई'– नाहीं कीं काय? (जगत् व जगांतले पदार्थ असोत वा नसोत, परमात्मस्वरूपाहून तें भिन्न नसून परमात्मरूप असतें तसेंच तें नित्यच असतें. ॥ २१३ ॥

आरिसा पां न पाहे । तरी मुखचि वायां जाये ? ।
तेणेंवीण आहे । आपणपें कीं ॥ २१४ ॥

पदयुक्त भावार्थ—'आरिसा पां'=आरशांत जर 'न पाहे'–न पाहिलें तर काय चेहराच 'वायां जाये?'–वायां गेला, (असें होईल काय?) 'तेणें वीण'–आरशावांचून देखील 'आपणपें'–तो आपल्या ठिकाणीं 'आहे कीं'–आहेच ना? ॥ २१४ ॥

तैसें आत्मयातें आत्मया । न दाविजे पैं माया ।
तरी आत्मा वावो कीं वायां । तेचि कीं ना ? ॥ २१५ ॥

पदयुक्त भावार्थ—तसेंच माया 'आत्मयातें'–आत्म्याला 'आत्मया न दाविजे'–आत्मा दाखवूं शकत नाहींच; 'तरी आत्मा वावो'–म्हणून आत्मा व्यर्थ, खोटा. 'कीं'–का, किंवा 'तेचि'– ती मायाच खोटी. 'तेचि वायां कीं ना?'– तीच खोटी नव्हे का? ॥ २१५ ॥

म्हणौनि आपणापें द्रष्टा । न करितां असे पैठा ।
आतां जालाचि दिठा । कां करावा ? ॥ २१६ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून 'आपणापें'–आपल्याला द्रष्टा न करितां 'पैठा असे'–स्वतःसिद्ध आपण आहे. आतां 'जालाचि'–स्वयंसिद्धच जो, (त्याला) 'दिठा'–(मायेनें आपला) द्रष्टा कां करावा? ॥ २१६ ॥

नाना मागुतें दाविलें । तरी पुनरुक्त जालें ।
येणेंहि बोलें गेलें । दावणें वृथा ॥ २१७ ॥

पदयुक्त भावार्थ—'नाना'–अथवा 'मागुतें'–मागलेंच 'दाविलें'–पुनः सिद्ध करून दाखविलें, 'तरी'–तर 'पुनरुक्त जालें'–पुनरुक्ति झाल्यासारखें तें होईल. म्हणून 'येणेंहि बोलें'–हें येणें प्रकारचें, अशा प्रकारचें बोलणें जें 'दावणें'–(आत्म्यावर द्रष्टेपण) दाखविणें 'वृथा गेलें'–तें व्यर्थ गेलें होय. ॥ २१७ ॥

दोरासर्पाभासा । साचपणें दोरु कां जैसा ।
द्रष्टा दृश्या तैसा । द्रष्टा साचु ॥ २१८ ॥

पदयुक्त भावार्थ—'दोरासर्पाभासा'–(दोरा+सर्पा+आभासा) दोरीवर सर्पाच्या शंकेच्या 'सांचपणें'–खरेपणास 'दोरु'–दोरी 'कां'–कारण जशी 'तैसा'–तसा 'द्रष्टा'–द्रष्ट्यावर, परमात्मस्वरूपावर 'दृश्या'–विश्वासाच्याआभासाच्या 'साचु'–खरेपणास 'द्रष्टा'–परमात्मा कारण होय. ॥ २१८ ॥

दर्पणें आणि मुखें । मुख दिसें हें न चुके ।
परी मुखीं मुख सतुकें । दर्पणीं नाहीं ॥ २१९ ॥

पदयुक्त भावार्थ—'आणि'–असें कीं 'दर्पणें'–आरशांत 'मुखें'–प्रतिबिंबांतल्या मुखामुळें 'मुख दिसे'–मूळचें बिंबांतलें मुख दिसतें, 'हें न चुकें'–हें तर खरेंच. 'परी'–पण 'मुखीं'–मूळच्या मुखाच्या ठिकाणींच 'सतुकें मुख'–खरें मुख होय. 'दर्पणीं नाहीं'–दर्पणांतलें खरें नाहीं. ॥२१९॥

तैसें द्रष्टा दृश्या दोहों । साच कीं देखतां ठावो ।
म्हणौनि दृश्यते वावो । देखिलें जरी ॥ २२० ॥

पदयुक्त भावार्थ—'तैसें'–त्याप्रमाणें 'द्रष्टा'–विश्वस्वरूप दाखविणारास व 'दृश्या'–विश्वस्वरूपास या दोहोंस 'कीं'–कारण 'देखतां'–मूळचा द्रष्टा 'साच ठावो'–खरा आधार, खरें अधिष्ठान होय. 'म्हणौनि'–म्हणून जरी 'दृश्यते देखिलें'–दृश्यता जें विश्वस्वरूप दिसलें, तरी 'वावो'–तें मिथ्या होय. ॥ २२० ॥

यावर पूर्वपक्षाची शंका अशी कीं :—

वावो कीर होये । तरी दिसत तंव आहे ।
येणें बोलें होये । आथी ऐसें ॥ २२१ ॥

पदयुक्त भावार्थ—'वावो'–(हें विश्वस्वरूपाचें दृश्य) मिथ्या 'कीर'–खरोखर 'होये'–आहे. 'तरी'–पण 'तें दिसत तंव आहे'–तें दिसत जर

आहे, ' येणें बोलें '– तर या बोलण्यावरूनच ' आथी '– तें आहे ' ऐसें होय '– असें सिद्ध होतें. ॥ २२१ ॥

या शंकेचें सिद्धान्ती समाधान करतात कीं:—

तरी आन आनातें । देखोन होय देखतें ।
तरी मानूं ये तें । देखिलें ऐसें ॥ २२२ ॥

पदयुक्त भावार्थ—' तरी '– कारण कीं, ' आन आनातें '– अन्यानें अन्याला, एकानें दुसऱ्याला ' देखोन '– पाहून ' देखतें होय '–(एक दुसऱ्याला) पाहणारा होतो ' तरी '– म्हणून ' तें देखिलें '– तें (त्यानें त्यास) पाहिलें, ' मानूं ये '– असें मानतां येतें. ॥ २२२ ॥

येथें देखोनि कां न देखोनि । ऐक्य कां नाना होऊनि ।
परी हा येणेंवांचूनि । देखणें असे ? ॥ २२३ ॥

पदयुक्त भावार्थ—' येथें '– एथेंतर ' ऐक्य देखोनि कां न देखोनि '– एकपणाचें दृश्य दिसो, किंवा तें न दिसो; ' कां '–किंवा 'नाना'–अनेक प्रकारचें विश्वपण ' होऊनि '– झालेलें दिसो. ' परि '– पण ' हा '– तें सर्व हा परमात्मा एकच एक "एकमेवाद्वितीयं, नेह नानास्ति किंचन." 'येणेंवांचूनि'–ह्या परमात्म्यावांचून 'देखणें'–दृश्य, विश्वस्वरूप 'काय असे ? '– निराळें काय आहे? ॥२२३॥

आरिशानें हो कां दाविलें । तरी मुखचि मुखें देखिलें ।
तो न दावी तरी संचलें । मुखचि मुखीं ॥ २२४ ॥

पदयुक्त भावार्थ—'आरिशानें कां दाविलें हो'–आरशानें जरी दाखविलें असलें, तरी 'मुखें'–मुखानें ' मुखचि देखिलें '–मुखच पाहिलें, ' तो न दावी '– त्या आरशानें मुख दाखाविलें नाहीं, तरी सुद्धां 'मुखीं मुखचि'–मूळच्या मुखाच्या ठिकाणीं मुख हें ' संचलें '–एकवटलेलेंच असतें. ॥ २२४ ॥

तैसें दावितें नाहीं । तरी हाचि ययाचा ठाईं ।
ना दाविला तरीही । हाचि यया ॥ २२५ ॥

पदयुक्त भावार्थ—' तैसें '–त्याप्रमाणें ' दावितें नाहीं '–दृश्य दाखविणारें हें जगत् जेव्हां नसतें, तेव्हां तरी ' ययाच्या ठायीं हाचि'–हा (परमात्माच) याच्या ठिकाणीं, स्वतांच्या स्वरूपीं असतो. 'ना'–अथवा 'दाविला' तो(दृश्यानें) दाखविला ' तरीहि '–तेव्हां सुद्धां ' यया हाचि '–याचा हाच असतो. ॥ २२५ ॥

जागृती दाविला । कां निदा हारविला ।
परी जैसा येकला । पुरुष पुरुषीं ॥ २२६ ॥

पदयुक्त भावार्थ— ' जागृती '—जागृतीनें ' दाविला '—जागा दिसला किंवा ' निदा '—झोपेनें ' हारविला '—झोपलेला दिसला, ' परी '—तथापि ' पुरुष पुरुषीं '—पुरुष पुरुषाच्या ठिकाणीं ' येकला '—एकटाच आपल्या ठिकाणीं असतो. ॥ २२६ ॥

कां रायातें तूं रावो । ऐसा दाविजे प्रत्ययो ।
तऱ्ही ठायें ठावो । राजाचि असे ॥ २२७ ॥

पदयुक्त भावार्थ—किंवा 'रायातें तूं रावो'—राजाला 'तूं राजा आहेस'—' ऐसा '—अशा शब्दांनीं ' प्रत्ययो '—त्याच्या प्रत्ययास, नजरेस आणलें, 'तऱ्ही'—तरीहि तो 'ठायें ठावो'—आपल्याच ठिकाणीं 'राजाचि'—राजा म्हणूनच 'असे'—असतो, तसाच असतो. त्यामुळें त्याच्या मूळच्या राजेपणांत कमी अधिक कांहींच होत नाहीं. ॥ २२७ ॥

ना तरी रायपण राया । नाणिजे कीं प्रत्यया ।
तऱ्ही कांहीं उणें तया । माजीं असे ? ॥ २२८ ॥

पदयुक्त भावार्थ—' ना तरी '— नाहींतर, अथवा ' राया प्रत्यया '— राजाच्या प्रत्ययाला ' रायपण '— त्याचें राजेपण ' तूं राजा आहेस, आपण राजे आहां ' अशा अशा शब्दांनीं ' नाणिजे कीं '— नाहीं आणलें म्हणून ' तऱ्ही '— त्यामुळें ' तयामाजी '— त्याच्या राजेपणांत ' कांहीं उणें असे ? '— कमी पडेल का ? ॥ २२८ ॥

तैसें दावितां न दावितां । हा ययापरौता ।
चढे ना तुटे आइता । असतचि असे ॥ २२९ ॥

पदयुक्त भावार्थ—त्याप्रमाणें ' हा दावितां '— हा परमात्मा (ज्ञानानें) दाखविला, दिसला किंवा ' न दावितां '—(अज्ञानानें) न दाखविला, न दिसला तरी ' हा ययापरौता '— हा या दोन्हीपलीकडे असल्यामुळें ' ना चढे ना तुटे '— (याचें मूळचें परमात्मस्वरूप) तें अधिक किंवा कमी होत नाहीं, ' आइता '— हा स्वयंसिद्ध, निर्विकार परमात्मा ' असतचि असे '— असतो तसाच असतो. ॥ २२९ ॥

तरी कां निमित्य पिसें । हा यया दाऊ बैसे ।
देखतें नाहीं तैं आरिसे । देखावे कोणें ॥ २३० ॥

पदयुक्त भावार्थ—' तरी '– तर मग "हा यया दाऊ बैसे"– (' यया '– यानें, ' हा '– आपणास ' दाऊ बैसे '–दाखवावें) यानें आपण दृश्य व्हावें, ' पिसें '– असलें वेड ' कां निमित्य '– कोणत्या निमित्तानें कसें उत्पन्न होतें ? (तर निमित्त नसतेंच. म्हणून या जगत्‌रूप आभासमय दृश्यपणाचा अनेकपणा होतच नसतो. तो नित्य एकपणाच असतो. तो कसा तर ' देखतें नाहीं '– पाहणाराच नाहीं, तर ' आरिसे '– आरशांत ' कोणें देखावें '–कोणी पाहावें ? ॥ २३० ॥

दीपु दावी तयातें रची । कीं तेणेंचि सिद्धि दीपाची ? ।
तैसी सत्ता निमित्ताची । येणें साच ॥ २३१ ॥

पदयुक्त भावार्थ—' दीपु '– दिवा ' दावी तयातें '– लावतो त्याला ' रची '– निर्माण करतो, प्रकट करतो; ' कीं '– का ' तेणेंचि '– त्याच्यामुळेंच (त्या लावणाऱ्यामुळें) ' दीपाची सिद्धि '–दिव्याची सिद्धता, अस्तित्व निर्माण होतें ? ' तैसी '–त्याप्रमाणें 'निमित्ताची'–सर्व दृश्याच्या कारणास 'सत्ता', अस्तित्व, आधार ' साच येणें '–खरोखर याच्यानें होय. ॥ २३१ ॥

दिव्याच्या वरील दृष्टान्तांतील द्वैत काढून टाकण्याकरितां एकत्वाचा दृष्टान्त देतातः—

वन्हीतें वन्हिशिखा । प्रकाशी कीर देखा ।
परी वन्हि न होनि लेखा । येईल काई ॥ २३२ ॥

पदयुक्त भावार्थ—' वन्हिशिखा '– अग्नीची ज्वाळा ' वन्हीतें '– अग्नीला ' प्रकाशित करते, ' कीर '– हें खरोखरीच ' देखा '– दिसतें. ' परी '– पण ती ज्वाळा ' वन्हि न होनि '– अग्निरूप न होतां, न राहतां त्याहून भिन्न आहे, ' लेखा येईल काई '– असा उल्लेख करतां येईल काय ? ॥ २३२ ॥

आणि निमित्य जें बोलावें । तें येणें दिसोनि दावावें ।
देखिलें तरी स्वभावें । दृश्यही हा ॥ २३३ ॥

पदयुक्त भावार्थ—' दिसोनि '–हा दृश्य होऊन ' येणें दावावें '– यानें आपणास दाखवावें, हा आपणास दाखवितो म्हणजे हा द्रष्टा होतो (अनंत

ब्रह्मांडरूप दृश्य जगत् हा होऊन त्याचा द्रष्टाहि आपण होऊन दाखवितो) ' आणि '—म्हणून ' निमित्त्य '— हा यास कारण, ' जें बोलावें तें '— असें जें बोलणें येतें तें ' तरी '—तरी ' देखिलें '— यानें दृश्य पाहिलें यावरून. तो द्रष्टा झाला म्हणून तर ' स्वभावें '—सहजच दृश्याहि हाच. ॥ २३३ ॥

म्हणौनि स्वयंप्रकाशा इया । आपणापें देखावया ।
निमित्त हा वांचूनियां । नाहींच मा ॥ २३४ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून स्वयंप्रकाश या परमात्म्याला ' आपणापें '—स्वतांस ' देखावया '—पहावयास 'हा वांचूनियां'—याच्या वांचून 'निमित्त '—दुसरें कारण ' नाहींच मा '—नाहींच कीं. ॥ २३४ ॥

भलतेन विन्यासें । दिसत तेणेंचि दिसे ।
हा वांचून नसे । येथें कांहीं ॥ २३५ ॥

पदयुक्त भावार्थ—' भलतेन '—कोणताहि 'विन्यासें'—विस्तार 'दिसत'—दिसतो तो ' तेणेंचि '—त्याच्याचमुळें ' दिसे '—दिसत असतो. 'हा वांचून'—याच्या वांचून ' येथें '—या सर्व ठिकाणीं, या अनंत ब्रह्मांडांत 'कांहीं नसे'—दुसरें कांहींहि नाहीं. ॥ २३५ ॥

लेणें आणि भांगारें । भांगाराचि येक स्फुरे ।
कां जे येथें दुसरें । नाहींचि म्हणोनि ॥ २३६ ॥

पदयुक्त भावार्थ—' लेणें आणि भांगारें '—अलंकार आणि सोनें यांमध्यें ' येक भांगाराचि स्फुरे '—एक सोनेंच स्पष्ट दिसतें. ' कां '—कारण ' जे '—कीं येथें दुसरें ' नाहींचि म्हणोनि '—कांहीं नसतेंच कीं. ॥ २३६ ॥

जळ तरंगीं दोहीं । जळावांचूनि नाहीं ।
म्हणौनि आन कांहीं । नाहीं ना नोहे ॥ २३७ ॥

पदयुक्त भावार्थ—'जळ तरंगीं'—पाणी आणि लाटा ' दोहीं '—या दोहोंत पाण्यावांचून कांहीं नाहीं. ' म्हणौनि '—म्हणून ' आन '—दुसरें कांहीं नाहीं, ' ना नोहे '—व तें होणारहि नाहीं. ॥ २३७ ॥

हो कां घ्राणानुमेयो । येवो कां हातीं येवों ।
लाभो कां दिठी पाहो । भलतैसा ॥ २३८ ॥

परी कापुराच्या ठाईं । कापुरावांचूनि नाहीं ।
तैशा रीति भलतयाही । हाच कीं ॥ २३९ ॥

पदयुक्त भावार्थ—'घ्राणानुमेयो '– (घ्राण+अनुमेयो) नाकानें अनुमान, कल्पना ' हो कां '–होवो म्हणजेच नाकानें वास कळो किंवा ' हातीं '– हातांना ' घेवों येवो कां '–मृदु स्पर्श लागो किंवा ' दिठी '–डोळ्यांना ' लाभो कां '–तो स्वच्छ दिसो. 'भलतैसा पाहो'–कोणत्याहि प्रकारचें त्याचें ज्ञान होवो ! परी–पण कापराच्या ठिकाणीं कापरावांचून दुसरें कांहीं नाहीं. ' तैशा रीति '– त्याचप्रमाणें ' भलतयाहि '–कोणत्याहि प्रकारें (दृश्यरूप, द्रष्टारूप तो कसाहि दिसला) तरी हाच तो परमात्मा सर्वत्र होय. ॥ २३८–२३९ ॥

आतां दृश्यपणें दिसो । कीं द्रष्टा होऊनि असो ।
परी हा वांचूनि अतिसो । नाहीं येथें ॥ २४० ॥

पदयुक्त भावार्थ—आतां ' दृश्यपणें '– जगत् अनेक दृश्यरूपांनीं असें मायेचें कार्य म्हणून दिसो किंवा द्रष्टा जो ईश्वर ह्या रूपानें असो, तें ' परी '–पण ' येथें '– या ठिकाणीं 'अतिसो'– जो कमी अधिकपणा दिसेल तो 'हावांचूनि'– ह्या निर्विकार स्वरूपावांचून दुसरें कांहींहि नाहीं. ॥ २४० ॥

गंगा गंगापणें वाहो । कीं सिंधु होऊनि राहो ।
परी पाणीपणा नवलावो । हें न देखों कीं ॥ २४१ ॥

पदयुक्त भावार्थ—गंगानदी ' गंगापणें '– गंगा ह्या नावानें वाहात असो किंवा ती समुद्ररूप होऊन जावो, परंतु ' पाणीपणा '– पाण्याच्या रूपांत 'नवलावो'–फरक 'हें न देखो कीं'–हा कांहीं दिसत नसतोच. ॥ २४१ ॥

थिजावें कीं विघरावें । हें अप्रयोजक आघवें ।
घृतपण नव्हे । अनारिसें ॥ २४२ ॥

पदयुक्त भावार्थ— ' थिजावें '– थिजलेलें, घट्ट झालेलें ' कीं '– किंवा ' विघरावें '– पातळ झालेलें तूप ' हें आघवें '– हें सर्व म्हणणें ' अप्रयोजक '– निरर्थक होय. त्या दोन्ही स्थितींमध्यें ' घृतपण '– जे घृतपणाचे धर्म (त्याचा स्वाद, खमंगपणा) हे ' अनारिसें नव्हें '– निराळे नसतात. ॥ २४२ ॥

ज्वाळा आणि वन्ही । न लेखिजती दोन्ही ।
वन्हिमात्र म्हणौनि । आन नव्हेचि कीं ॥ २४३ ॥

पदयुक्त भावार्थ— ज्वाळा आणि 'वन्ही'– अग्नि 'दोन्ही'– दोन निराळीं 'न लेखिजती'– मानलीं जात नाहींत. कारण 'वन्हिमात्र'– अग्निरूपच तीं होत. म्हणून 'आन'– निराळीं तीं नसतातच. ॥ २४३ ॥

तैसें दृश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा ।
पाहतां येकी काष्ठा । स्फूर्तिमात्र तो ॥ २४४ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें दृश्य किंवा द्रष्टा या दोन्ही 'दशा'– अवस्था 'वांझटा'– खोट्या होत. 'पाहतां'– कारण विवेकदृष्टीनें पाहिलें असतां 'तो'–तें परमात्मस्वरूप 'येकी काष्ठा'–एक शेवटची अक्रियस्थिति 'स्फूर्तिमात्र'– जी केवळ ज्ञानमय, ज्ञप्तिरूप होय. ॥ २४४ ॥

इये स्फूर्तिकडुनी । नाहीं स्फूर्तीमात्रवांचुनी ।
तरी काय देखोनी । देखतु असे ? ॥ २४५ ॥

पदयुक्त भावार्थ—'इये स्फूर्तिकडुनी'– या ज्ञानघन परमात्मस्वरूपाच्या बाजूनें पाहतां 'स्फूर्तिमात्रवांचुनी'– तें या ज्ञानमयपरमात्म्यावांचून 'नाहीं'– तिथें अन्य कांहीं नाहीं. 'तरी'– तर मग 'काय देखोनि'– काय पाहून '(हा) देखतु असे'– हा कशाचा द्रष्टा होतो ? ॥ २४५ ॥

पुढें फरके ना दिसतें । ना मागें डोकावी देखतें ।
पाहतां येणें ययातें । स्फुरद्रुपेंचि ॥ २४६ ॥

पदयुक्त भावार्थ—'दिसतें'– दृश्य जग 'पुढें'– समोर 'फरके ना'– फडकत असलेलें दिसत नाहीं; 'देखतें'– पाहणारा, द्रष्टा 'मागें'–पाठीमागें 'ना डोकावी'– वळून पाहात नाहीं. 'येणें ययातें'– यानें या आपल्या स्वतांस 'पाहतां'– पाहूं जातां 'स्फुरद्रूपेंचि'– तें चिद्रूपच, केवळ एकच एक स्वसंवित् निजबोधमयच होय. ॥ २४६ ॥

हेंच दृष्टान्तांनीं श्रीज्ञानराज अधिक स्पष्ट करितात तें असें :—

कल्लोळें जळीं घातलें । सोनेनि सोनें पांगुरलें ।
दिठीचे पाय गुंतले । दिठीसीचि ॥ २४७ ॥

पदयुक्त भावार्थ— 'कल्लोळें'– तरंगांनीं पाण्यांत 'घातलें'– उडी घेतली; 'सोनेनि'– सोन्यानें सोनें पांघरलें; 'दिठीचे पाय'–दृष्टीचीं पाउलें 'दिठीसीचि'–दृष्टींतच गुंतलीं, दृष्टीनें दृष्टीला न्याहाळलें; ॥ २४७ ॥

श्रुतीसि मेळविली श्रुती । दृतीसि मेळविली दृती ।
कां जे तृप्तीसीचि तृप्ती । वोगरिली ॥ २४८ ॥

पदयुक्त भावार्थ—'श्रुतीसि'–श्रवणाला 'श्रुती'–श्रवण 'मेळविली'–ऐकाविलें, घडाविलें; शब्दानें शब्द ऐकला; किंवा 'दृतीसि'–सुगंधाला 'दृती'–सुगंध 'मेळविली'– दिला; किंवा तृतीलाच तृप्ति 'वोगरिली'– जेवायला वाढली; ॥ २४८ ॥

गुळें गुळ परवडिला । मेरु सुवर्णें मढिला ।
कां ज्वाळा गुंडाळिला । अनळु जैसा ॥ २४९ ॥

पदयुक्त भावार्थ—गुळानें गुळास 'परवडिला'–माखलें, चोपडलें; मेरु-पर्वत सुवर्णानें मढविला, आच्छादला; किंवा ज्वाळांनीं 'अनळु'–('अनळ') अग्नीला 'गुंडाळिला'– झाकून टाकलें 'जैसा'–जसें; ॥ २४९ ॥

हें बहु काय बोलिजे । कीं नभ नभाचिये रिगे सेजे ।
मग कोणें निदिजे । मग जागें तें कोणें ॥ २५० ॥

पदयुक्त भावार्थ—हें फार काय बोलावें ? 'कीं'– कारण जर 'नभ'-आकाश 'नभाचिये'– आकाशाच्या 'सेजे'– शेजेवर, शय्येवर 'रिगे'– निजावयास गेलें, तर 'निदिजे कोणें'– निजावयाचें कोणी, व 'मग जागें' व्हायचें तें कोणी ? ॥ २५० ॥

हा येणें पाहिला आइसा । कांहीं न पाहिला जैसा ।
आणि न पाहतां अपैसा । पाहणेंचि हा ॥ २५१ ॥

पदयुक्त भावार्थ— 'जैसा'– जसें 'कांहीं न पाहिला'– कांहीं न पाहिल्यासारखें 'आइसा'– असें 'येणें'– यानें 'हा पाहिला'– याला स्वतांला पाहिलें; 'आणि'– आणखी 'न पाहतां'– (कांहीं) न पाहतांहि 'अपैसा'– आपोआपच, सहजच 'पाहणेंचि हा'– हा पाहणेंस्वरूपच असा केवळ निज-ज्ञानघनरूपच होय. ॥ २५१ ॥

येथें बोलणें न साहे । जाणणें न समाये ।
अनुभऊ न लाहे । आंग मिरौ ॥ २५२ ॥

पदयुक्त भावार्थ—'येथें'–या परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं 'बोलणें'–वेदानें केलेलें वर्णन 'न साहे'– पुरें होऊं शकत नाहीं, म्हणून हा शब्दातीत,

वेदशास्त्र-वर्णनातीत हा; 'जाणणें'– ज्ञान, वेदान्तशास्त्रज्ञान 'न समाये'– शिरकाव पावत नाहीं; 'अनुभऊ'– स्वरूपस्वानुभव 'आंग'– स्वतां आपलेपणानें 'मिरौ न लाहे'– निराळा मिरवूं शकत नाहीं. ॥ २५२ ॥

म्हणौन ययातें येणें । ये परीचें पाहणें ।
पाहतां कांहीं कोणें । पाहिलें नाहीं ॥ २५३ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून 'ये परीचें'– या प्रकारचें 'येणें ययातें'– यानें याला स्वतांला 'पाहणें'– जाणणें हें 'पाहतां'– वास्तविक पाहिलें तर, 'कोणें कांही'– कोणी कांहीं 'पाहिलें नाहीं'– न जाणलेंच होय. (हाच स्वतां स्वतास जाणणारा आहे म्हणून.) ॥ २५३ ॥

किंबहुना ऐसें । आत्मेनि आत्मा प्रकाशे ।
न चेतुचि चेऊं बैसे । जयासि तो ॥ २५४ ॥

पदयुक्त भावार्थ— 'किंबहुना'– फार काय सांगावें ? 'ऐसें'– अशा प्रकारानें 'आत्मा आत्मेनि'– आत्मा आपण आपल्या स्वरूपानें 'प्रकाशे'– प्रकट होऊन विलास करतो तेव्हां 'तो'– स्वतां 'न चेतुचि'– न जागा होतांच, न प्रकट होतांच 'जयासि'– जो स्वतांस 'चेऊं बैसे'– जागऊं बसतो, प्रकट करतो, प्रगट झाल्यासारखा होतो. (या नित्य निर्विकारपणांतला असा तो विलास होय). ॥ २५४ ॥

स्वयें दर्शनाचिया सवां । अवघियाची जात फावां ।
परी निजात्मभावा । न मोडितांही ॥ २५५ ॥

पदयुक्त भावार्थ— 'स्वयें'– स्वतां 'दर्शनाचिया'– आपलें स्वरूप पाहण्याच्या 'सवां'– आवडीच्या स्फूर्तीमुळें 'अवघियाचि'– सर्वच (द्रष्टा, दृश्य, दर्शन) 'फावां जात'– उदयास येतें, स्फुरण पावतें; 'परी'–तरी पण 'निजात्मभावा'– मूळच्या स्वस्वरूपांत 'न मोडितांही'– बिघाड न होतांच तें होतें,–(स्वयमेव असें जें एकपण तें न विकार पावतांहि हा बहुत होण्याचा विलास सहज होत असतो.–'एकोऽहं बहु स्याम्') ॥ २५५ ॥

न पाहतां आरिसा असो पाहे । तरी तेंचि पाहणें होये ।
आणि पाहणें न तरी जाये । न पाहणें, पाहणें ॥ २५६ ॥

पदयुक्त भावार्थ—(मुख) 'आरिसा'–आरशांत 'न पाहतां'– न पाहिलें तरी 'असो पाहे'–तें (आपल्या मूळच्या ठिकाणीं) असलेलें दिसतें. 'तरी'–

म्हणून तर ' तेंचि '–तेंच पाहणें (त्याचें) मुख्य स्वरूप, मूळस्वरूप ' होये '–होय. आणि ' पाहणें '–मुखानें आरशांत ' पाहणें '–केलें, पाहिलें तरी ' न जाये '–(मूळचें मुख) जात नाहीं, नाहींसें होत नाहीं, विकार पावत नाहीं. म्हणून ' पाहणें '–(आरशांत) पाहणें किंवा ' न पाहणें '–(आरशांत) न पाहणें हें ' जाये '–व्यर्थ होतें. (मूळच्या मुखामध्यें आरशांत पाहण्यानें अधिक कांहीं बदल होत नाहीं किंवा न पाहण्यानें कांहीं कमीहि होत नाहीं. मुख हें स्वतांच्या ठिकाणीं स्वतां मुखपणानें नेहमीं असतें तसेंच असतें, तसेंच परमात्मस्वरूपहीं असतें.) ॥ २५६ ॥

भलतैसा फांके । परी येकपणा न मुके ।
नाना संकोचे तरी असके । हाचि आथी ॥ २५७ ॥

पदयुक्त भावार्थ— ' भलतैसा '–वाटेल तेवढा ' फांके '–हा परमात्मा विस्तारला (अनंतकोटिब्रह्मांडरचनारूपानें विस्तार पावलेला दिसला) ' परी '–तरी पण परमात्म्याचा 'येकपणा'–मूळचा सूक्ष्म व्यापकनिर्विकारपणा 'न मुके'–नाहींसा होत नाहीं. ' नाना '–किंवा ' संकोचे '– (अनंतब्रह्मांडरूपाविस्तार) संकोच पावला, लय पावला तरी ' हाचि '–हाच (एकपणानें) ' असके '–पूर्णच पूर्ण ' आथी ' असतो. ॥ २५७ ॥

सूर्याचिया हाता । अंधकारु न ये सर्वथा ।
मा प्रकाशाची कथा । आईकता कां ॥ २५८ ॥

पदयुक्त भावार्थ—सूर्याच्या हाताला अंधकार 'सर्वथा'–मुळींच 'न ये'–येत नाहीं, सांपडत नाहीं; 'मा'–मग प्रकाशाची 'कथा'–वार्ता 'आईकता कां'–(तो) ऐकेल का? ती त्याच्या कानापर्यंत पोचेल का? दोन्हींची जाणीव त्याला मुळींच नसते. ॥ २५८ ॥

अंधारु का उजिवडु । हा येकला येकवडु ।
जैसा कां मार्तंडु । भलतेथें ॥ २५९ ॥

पदयुक्त भावार्थ—अंधार किंवा उजेड कांहींहि असो. ' मार्तंडु '–(मार्तंड) सूर्य हा ' जैसा कां '– जसा का ' भलतेथें '–वाटेल तिथें, केव्हांहि ' येकला '– एकटा ' येकवडु '– एकच. ॥ २५९ ॥

तैसा आवडतिये भूमिके । आरूढलियाही कौतुकें ।
परी ययातें हा न चुके । हाचि ऐसा ॥ २६० ॥

पदयुक्त भावार्थ— ' तैसा ' – तसेंच ' आवडातिये ' – कोणत्याहि ' भूमिके ' –रूपास ' कौतुकें ' – सहज ' आरूढलियाही ' – प्राप्त झाला असतांहि ' परी ' –तथापि ' यया तें ' –याच्या स्वतांस ' हा हाचि ऐसा ' –हेंच 'मी' अशा या मूळच्या स्वरूपास ' न चुके ' – हा परमात्मा विसरत नाहीं. ॥ २६० ॥

सिंधूची सींव न मोडे । पाणीपणा सळु न पडे ।
जरी मोडूत गाडे । तरंगांचे ॥ २६१ ॥

पदयुक्त भावार्थ—जरी ' तरंगांचे ' – लाटांचे ' गाडे ' – समुदाय ' मोडूत ' – उसळून वसोत, तरी ' सिंधूची ' – समुद्राची ' सींव ' – मर्यादा ' न मोडे ' –उल्लंघन होत नाहीं. ' पाणीपणा ' – व पाण्याचा मुळांतला गंभीरपणा व शांतपणा ' सळु ' – भंग ' न पडे ' – पावत नाहीं. ॥ २६१ ॥

आत्म्याला कोणतीच उपमा साजत नाहीं हें श्रीज्ञानराज दृष्टान्तांनीं स्पष्ट करतात :—

रश्मि सूर्यींच आथी । परी बिंबाबाहेरी जाती ।
म्हणोनि बोधसंपत्ति । उपमा नोहे ॥ २६२ ॥

पदयुक्त भावार्थ—' रश्मि ' – किरण ' सूर्यीच आथी ' – सूर्यामध्येंच असतात खरे. ' परी ' – तरी ते सूर्यबिंबापासून बाहेर ' जाती ' – गेलेले दिसतात. (म्हणजे सूर्य व किरण निरनिराळे दिसतात) म्हणून ' बोधसंपत्ति ' – (बोध + संपत्ति) बोधरूप हेंच ज्याचें वैभव अशा आत्म्याला ही उपमा ' नोहे ' – शोभणार नाहीं. ॥ २६२ ॥

आणि पळहेचा दोडा । न पडतां तडा ।
जग तंव कापडा । न भरेचि कीं ॥ २६३ ॥

पदयुक्त भावार्थ—आणि ' पळहेचा ' – कापसाच्या ' दोडा ' – बोंडाला ' तडा ' – भेग, चीर ' न पडतां ' – जर पडली नाहीं, ' तंव ' – तर मग जग हें कापडानें ' न भरेचि कीं ' –आच्छादलें जाणार नाहींच. (म्हणून बोंडांतल्या कापसाची उपमा आत्म्याला देतां येत नाहीं.) ॥ २६३ ॥

सोनयाचा रवा । रवेपणाचा ठेवा ।
अवघेयाचि अवयवा । लेणें नोहे ॥२६४ ॥

पदयुक्त भावार्थ— ' सोनयाचा रवा ' – सोन्याची चीप, लगड, कांब तिची ' रवेपणाचा ठेवा ' – लगडपणाची स्थिति (न मोडतां) मोडल्यावांचून

' अवघेयाचि अवयवा '– सर्व अंगाला ' लेणें '– दागिने ' नोहे '– होणार नाहींत. ॥ २६४ ॥

न फेडितां अडवावो । दिगंतौनि दिगंता जावों ।
न ये मा पावों । उपमा काई ॥ २६५ ॥

पदयुक्त भावार्थ— ' अडवावो '– मधलें अंतर ' न फेडितां '– दूर केल्याशिवाय ' दिगंतौनि दिगंता '– या दिशेहून त्या दिशेला ' जावों नये '– जातां येणार नाहीं. ' मा '– तर मग (आत्मस्वरूपाला दिशेची) 'उपमा पावों काई '– उपमा देतां येईल काय ? ॥ २६५ ॥

म्हणौनि इये आत्मलीळे । नाहीं आन कांटाळें ।
आतां ययाचिये तुळें । हाचि यया ॥ २६६ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून ' इये आत्मलीळे '–या आत्म्याच्या लीलेला, विलासाला वजन करण्याला, तुलना करण्याला ' आन कांटाळें '– दुसरा कांटा नाहीं; ' आतां ययाचिये तुळें '– म्हणून याच्या तुलनेला ' यया हाचि '– याचा हाच. ॥ २६६ ॥

स्वप्रकाशाचा घासीं । जेवितां बहु वेगेंसी ।
वेचेना परी कुसीं । वाखही न पढे ॥ २६७ ॥

पदयुक्त भावार्थ— ' स्वप्रकाशाचा घासीं '– स्वानंदसुखाच्या घासांनीं ' बहु वेगेंसी '– लवकर लवकर ' जेवितां '– जेवत असूनहि ' वेचेना '–तें अन्न मात्र संपत नाहीं. ' परी '– तरीपण ' कुसीं '– कुशीला ' वाखहि '– सुरकुतीहि ' न पडे ' पडलेली दिसत नाहीं. (असें याचें पोट सदाचेंच भरलेलें असतें म्हणून हा नित्यतृप्त होय.) ॥ २६७ ॥

ऐसा निरुपमापरी । आपुलिये विलासवरी ।
आत्मा राणीव करी । आपुला ठाईं ॥ २६८ ॥

पदयुक्त भावार्थ—' ऐसा निरुपमापरी '– अशा उपमारहित प्रकारानें ' आपुलिये '– आपल्याच ' विलासवरी '– विलासानें, लीलेनें 'आपल्या ठायीं'– आपल्या स्वरूपाच्या ठिकाणीं ' आत्मा '– हा परमात्मा ' राणीव '– स्वानंद-राज्य ' करी '– उपभोगतो. ॥ २६८ ॥

यामुळें अज्ञानवाद्याचा उपहास महाराज करतात कीं:—

तयातें म्हणिपें अज्ञान । तरी न्याया भरलें रान ।
आतां म्हणे तयाचें वचन । उपसावों आम्ही ॥ २६९ ॥

पदयुक्त भावार्थ—'तयातें'– त्या एवढ्या आत्मविलासाला 'अज्ञान म्हणिपें'–अज्ञान म्हणावयाचें 'तरी' तर मात्र 'न्याया रान भरलें'–न्याय रानांत गेला, न्याय रस्ता चुकला असें म्हटलें पाहिजे. 'आतां'–इतक्यावरहि 'म्हणे तयाचें'–अज्ञान असें म्हणणाऱ्याचें 'वचन'–बोलणें 'आम्ही उपसावों'–सहन करावें, स्वस्थ ऐकून घ्यावें हेंच ! ॥ २६९ ॥

आतां या अज्ञानवाद्याची युक्तिपूर्वक श्रीज्ञानराज समजूत घालतात:—

प्रकाशितें अज्ञान । ऐसें म्हणणें हन ।
तरी निधि दावितें अंजन । न म्हणिजे काई ॥ २७० ॥

पदयुक्त भावार्थ—(अरे अज्ञानवादी !) 'प्रकाशितें'–जें ज्ञानाचा प्रकाश, उदय करतें त्याला 'अज्ञान' 'ऐसें म्हणणें हन'–असें खरोखर जर म्हणशील 'तरी'–तर 'निधि'–द्रव्याचा ठेवा 'दावितें'–दाखविणाऱ्या, दिव्यदृष्टि देणाऱ्या 'अंजन'–अंजनाला 'काजळ' 'न म्हणिजे काई'–म्हणत नाहींत का? ॥ २७० ॥

सुवर्णगौर अंबिका । न म्हणिजे काय काळिका ।
तैसा आत्मप्रकाशका । अज्ञानवादु ॥ २७१ ॥

पदयुक्त भावार्थ—'सुवर्णगौर'–सोन्याच्या लखलखणाऱ्या 'अंबिका'–देवीला 'काळिका'–काळी देवी 'न म्हणिजे काय'–म्हणत नाहींत काय ? 'तैसा'–त्याप्रमाणें 'आत्मप्रकाशका'–स्वयंप्रकाश ज्ञानघन आत्म्याला 'अज्ञानवादु'–(अज्ञान+वाद) अज्ञान नांवाचा शब्द हा नांवाला नव्हे का? ॥ २७१ ॥

वरीलप्रमाणें सिद्धान्त निश्चित करण्यासाठीं आणखी अधिक तो स्पष्ट करतात:—

येन्हवीं शिवोनि पृथ्वीवरी । तत्त्वांच्या वाणेपरी ।
जयाचा रश्मिकरीं । उजाळा येती ॥ २७२ ॥

पदयुक्त भावार्थ—'येन्हवीं'–वास्तविक, खरोखर 'शिवोनि'–ईश्वरापासून तें 'पृथ्वीवरी'–पृथ्वीपर्यंत अणुरेणुपर्यंतचा अनंत तत्त्वांच्या 'वाणेपरी'–पदार्थांचा विस्तार 'जयाचा रश्मिकरीं'– तो ज्या ज्ञानसूर्याच्या प्रकाशानें 'उजाळा येती'–प्रकाशला जातो, प्रकट होतो. ॥ २७२ ॥

जेणें ज्ञान सज्ञान होये । दृग्मात्र दृष्टीतें विये ।
प्रकाशाचा दिवो पाहे । प्रकाशासी ॥ २७३ ॥

पदयुक्त भावार्थ—' जेणें '– ज्याच्या योगानें जगांतील पदार्थमात्रांचें ' ज्ञान '–व्यावहारिक ज्ञान ' सज्ञान '–स्पष्ट ज्ञान करून देणारें ' होये '–होत असतें. ' दृग्मात्र '–दृष्टिगोचर पदार्थ ' दृष्टीतें '–ज्ञानस्वरूपदृष्टि ' विये '–उत्पन्न होऊन दिसतात, ' प्रकाशासी '– (चंद्र, सूर्य, तारे) या सर्व प्रकाशमयांना (ज्याच्या योगानें) ' प्रकाशाचा '–या स्वयंप्रकाश तेजाचें ' दिवो '–तेज ' पाहे '– प्रकाशित करतें. ॥ २७३ ॥

तें कोणें निकृष्टें । दाविलें अज्ञानाचेनि बोटें ।
ना तमें सूर्य मोटे । बांधतां निकें ॥ २७४ ॥

पदयुक्त भावार्थ—' तें '– (आतांपर्यंत वर्णन केलेलें) परमात्मज्ञान ' कोणें '– कोणा एखाद्या ' निकृष्टें '– पामरानें ' अज्ञानाचेनि '–अज्ञान म्हणून ' बोटें '– बोट करून उल्लेख करून, ' दाविलें '– दाखविलें, वर्णन केलें ' ना '– तर मग ' तमें '– अंधारानें सूर्याला ' मोटे '– पदराच्या झोळांत ' निकें '– घट्ट ' बांधतां होय '– गुंडाळल्यासारखें (त्या पामर अज्ञान्याचें तें बोलणें तसें वायफळ) होईल. ॥ २७४ ॥

अ पूर्वीं ज्ञानाक्षरीं । वसतां ज्ञानाची थोरी ।
शब्दार्थाची उजरी । अपूर्व नव्हे कीं ॥ २७५ ॥

पदयुक्त भावार्थ—' ज्ञानाची थोरी '–(अशी या) परमात्मज्ञानाची थोरवी (असतांना) ' ज्ञानाक्षरीं पूर्वी '–या (ज्ञान + अक्षरीं) ज्ञान अक्षरापूर्वी ' अ ' हें अक्षर ' वसतां '– बसवून ठेवून, लावून ' अज्ञान '–नांव ठेवण्यांत (तुझें) ' शब्दार्थाची '–शब्दाचा अर्थ करण्याचें ' उजरी '–चातुर्य ' अपूर्व '– अजब ' नव्हे कीं '– नव्हे काय ? ॥ २७५ ॥

हे अज्ञानवादी, तुझें हें शब्दचातुर्य किती अगाध आहे, हें श्रीज्ञानराज दृष्टान्तपूर्वक दाखवितात :—

लाखेचे मांदुसे । आगीचें ठेवणें कायिसें ।
आंतुबाहेरी सरिसें । करून घाली ॥ २७६ ॥

पदयुक्त भावार्थ—' लाखेचे मांदुसे '–लाखेच्या पेटींत ' आगीचें ठेवणें '–विस्तव घालून बंद करून ठेवणें ' कायिसें '–काय कामाचें ? कारण

आग्नि आंतबाहेर तो 'सरिसें'—एकसारखें अग्निमय 'करून घाली'—करून टाकील. ॥ २७६ ॥

म्हणौनि जग ज्ञानें स्फितें । बोलतां अज्ञानवादातें ।
विखुरली होती आंतें । वाचेचिये ॥ २७७ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून जग हें 'ज्ञानें'—परमात्मस्वरूपज्ञानानें 'स्फितें'—भरलेलें त्यास 'अज्ञानवादातें'—अज्ञान शब्द लावून 'बोलतां'—उच्चार करणें म्हणजे 'वाचेचिये आंते' (आंत्रें—आंतडीं, कातडीं) तुझ्या जिभेची कातडी 'विखुरली होती'—लांबलेली, विस्तारलेली दिसते; तुझी जीभ फारच लांब झालेली दिसते. ॥ २७७ ॥

आखरीं तंव गोवधु । पुढारां अनृतवादु ।
मा कैसा अज्ञानवादु । कीजे ज्ञानीं ॥ २७८ ॥

पदयुक्त भावार्थ—'गोवधु'—'गोवध' 'आखरीं'—अक्षरांनीं हीं अक्षरें उच्चारणें 'तंव'—तर (एक दोष), 'पुढारां'—व दुसरा दोष (गोवध न करतां) तर 'अनृतवादु'—खोटें बोलण्याचा येणारा, (असे दोन दोष नुसते 'गोवध'—या अक्षरउच्चारानें येतात) 'मा'—मग 'ज्ञानीं'—ज्ञानमय परमात्म्याविषयीं 'अज्ञानवादु'—तो अज्ञानरूप, अभावरूप, अस्तित्वरहित 'वादु'—असें म्हणणें 'कैसा'—कसें 'कीजे'—करतां येईल ? म्हणतां येईल ? (तो केवढा दोष उत्पन्न होईल ?) ॥ २७८ ॥

आणि अज्ञान म्हणणें । स्फुरतसें अर्थपणें ।
आतां हेंचि ज्ञान कोणें । मानिजे ना ॥ २७९ ॥

पदयुक्त भावार्थ—आणि 'अज्ञान म्हणणें'—'अज्ञान' असा उच्चार करणें तो त्याचा 'अर्थपणें'—अर्थानें, अर्थ ध्यानीं घेऊनच 'स्फुरतसे'—तुम्हांकडून उच्चार होतो ना ? (म्हणजे अज्ञान म्हणून जें म्हणणें हें सुद्धां कांहीं अर्थानेंच तुम्ही म्हणतां ना ? यावरून तो अभावरूप पदार्थ नसून अस्तित्वानें असणारा भावरूप, ज्ञानरूपच होय ना ?) 'आतां'—मग 'हेंचि ज्ञान'—हेंच ज्ञानस्वरूप परमात्मा आहे असें 'कोणें मानिजे ना !' कोणी कां मानूं नये, तें तुम्हांस कसें मानतां येणार नाहीं ? तें तुम्हांस कबूल करणें भाग नाहीं का ? ॥२७९॥

असो हे आत्मराजे । आपणापें जेणें तेजें ।
आपणचि देखिजे । बहुये परी ॥ २८० ॥

पदयुक्त भावार्थ—' हें असो '– हें असो. ' जेणें आपणापें तेजें '– ज्या आपल्याच ज्ञानानें ' आत्मराजें '– परमात्मा ' आपणचि '– आपल्या स्वतांलाच ' बहुये परी '– बहुत प्रकारांनीं, बहुरूपांनीं ' देखिजे '–पाहात असतो, पाहण्याचा विलास करीत असतो–(एकोऽहं बहु स्याम्). ॥ २८० ॥

निर्वचितां जे झावळे । तेंचि कीं लाहे डोळे ।
डोळ्यांपुढें मिळे । तेंचि तया ॥ २८१ ॥

पदयुक्त भावार्थ—' निर्वचितां '– निर्धारितां, विचार करून पाहतां ' जें '– जें अज्ञान ' झावळे '– शून्य ठरतें, ' तेंचि '– तेंच ' डोळे लाहे कीं ? '– डोळ्यांना लाभेल, दिसेल का ? ' तया '– विचाराला (जें सत्य वाटतें) 'तेंचि'– तेंच, तेवढेंच ' डोळ्यांपुढें मिळे '– डोळ्यांना प्रत्यक्ष दिसतें. ॥ २८१ ॥

यावर अज्ञानवादी जो पूर्वपक्षी तो शंका घेतोः—

ऐसें जग ज्ञान जें आहे । तें अज्ञान म्हणे मी वियें ।
येणें अनुमानें हों पाहे । आथी ऐसें ॥ २८२ ॥

पदयुक्त भावार्थ—' अज्ञान म्हणे ' – (आमचें) हें अज्ञान म्हणतें ' जग ऐसें '–जग असें ' जें ज्ञान आहे, तें मी विये '–जें ज्ञान आहे, (जो व्यवहार अनेक प्रकारांनीं होत आहे) ' तें मी वियें '–तें मजपासून उत्पन्न होतें (' असदेव इदमग्र आसीत् ' – ' इदम् ' – हें सर्व ' असत् एव ' – असद्रूप शून्य, अज्ञानमय ' अग्रे ' – सृष्टीपूर्वी ' आसीत् '–होतें, असें श्रुतिवचन आहे, त्या अनुरूप) ' येणें अनुमानें ' – या प्रमाणानुरूप ' आथी ' – तें (अज्ञान) आहे, ' ऐसें ' – असें ' हों पाहे ' – सिद्ध होऊं पाहतें. ॥ २८२ ॥

यावर सिद्धान्ती जे ज्ञानवादी ते वरील शंकेचें निराकरण करतातः—

तंव अज्ञान त्रिशुद्धि नाहीं । हें जगेंचि ठेविलें ठाईं ।
जें धर्मुधर्मित्वें कंहीं । ज्ञाना अज्ञाना असे ? ॥ २८३ ॥

पदयुक्त भावार्थ—' अज्ञान '– ज्याला अस्तित्व नसलेलें म्हणून अभावरूप ' तंव ' – हें तर ' त्रिशुद्धि नाहीं ' – मुळींच नसतेंच. ' जगेंचि ' – जगांत तर ' हें ' – ज्ञान म्हणजे ज्याला अस्तित्व असलेलें म्हणून तें भावरूप असें ' ठाईं ' – ठिकठिकाणीं, सर्वत्र ' ठेविलें ' – भरलेलें आहे – (' सदेव सोम्य, इदमग्र आसीत् ' — ' सोम्य ' – हे सोम्य, ' इदम् ' – हें सर्व दृश्य ' अग्रे ' – उत्पत्तिपूर्वी ' सदेव ' – (सत् एव) सद्रूप, ' सत् ' सत्यस्वरूप असें ब्रह्ममय ' आसीत् ' – होतें, असें श्रुतिवचन आहे.) ' जें '– म्हणून ' ज्ञाना अज्ञाना '–

ज्ञान व अज्ञान यांमध्यें (एक भावरूप, नित्य, अस्तित्वरूप असलेलें व दुसरें अभावरूप, कधींहि अस्तित्वांत नसलेलें या दोहोंमध्यें) धर्मुधर्मित्वें (धर्मु + धर्मित्वें) = ' धर्म '–कार्य, ' धर्मित्वें '– कारणपणाचा संबंध ' कंहीं असे ? '– कसा येऊं शकेल ? (' नासतो विद्यते भावः = असतः भावः न विद्यते–असताला (अज्ञानाला) अस्तित्व नसतें; ' नाभावो विद्यते सतः ' = सतः अभावः न विद्यते–सताला (ज्ञानाला) अभाव नसतो, असें श्रीगीतावचन आहे.)॥ २८३ ॥

कां जळा मोतीं विये ? । राखोंडिया दीपु जिये ? ।
तरी ज्ञानधर्मु होये । अज्ञानाचा ॥ २८४ ॥

पदयुक्त भावार्थ—' जळा कां ' – जळाला कां मोतीं ' विये ' – उत्पन्न करतें ? ' राखोंडिया ' – राखुंडीपासून ' दीपु ' – दिवा ' जिये ' – जिवंत होतो का ? लागतो का ? ' तरी ' – तरच मग ' अज्ञानाचा ' – अज्ञान या कारणाचें ' ज्ञानधर्मु ' – ज्ञान हें कार्य होईल. ॥ २८४ ॥

चंद्रमां निगती ज्वाळा ? । आकाश आते शिळा ? ।
तरी अज्ञान उजळा । ज्ञानातें वमी ॥ २८५ ॥

पदयुक्त भावार्थ—' चंद्रमां '– चंद्रापासून ' ज्वाळा निगती ? '– ज्वाळा निघतात काय ? ' आकाश शिळा '– आकाशांत दगड ' आते ? '–असतात काय ? ' तरी '– तरच (असें होईल तरच) हें अज्ञान ' उजळा ज्ञानातें '– उजळ अशा शुद्ध ज्ञानाला ' वमी '– निर्मील, उत्पन्न करील. ॥ २८५ ॥

क्षीराब्धी काळकूट । हे एकी परीचे विकट ।
परी काळकूटीं चोखट । सुधा कैंची ॥ २८६ ॥

पदयुक्त भावार्थ— ' क्षीराब्धी '– क्षीरसागरांतून ' काळकूट '– अति जालीम विष (निघावें) ' हे एकी परीचे '– हें एका प्रकारचें ' विकट '–विपरीत, चमत्कारिक खरें. ' परी '– तथापि ' काळकूटीं '– त्या काळकूट विषांतून ' चोखट '– शुद्ध ' सुधा '– अमृत ' कैंची ' कधीं निघेल का ? ॥ २८६ ॥

ना ज्ञानीं अज्ञान जालें । तें होतांचि अज्ञान गेलें ।
पुढती ज्ञान एकलें । अज्ञान नाहीं ॥ २८७ ॥

पदयुक्त भावार्थ—' ना '– तसेंच ना ' ज्ञानीं '– ज्ञानस्वरूपावर 'अज्ञान जालें '– अज्ञान झालेलें दिसलें, तें अज्ञान ' होतांचि गेलें '– उत्पन्न होतांच

नाहींसें झालें. ' पुढती '– पुढें मग तें 'अज्ञान' (राहिलें) नाहींच. 'एकलें ज्ञान'– केवळ एकटें ज्ञानच राहिलें. ॥ २८७ ॥

म्हणौनि सूर्य सूर्याचि येवढा । चंद्र चंद्राचि सांगडा ।
ना दीपाचिया पडिपाडा । ऐसा दीपु ॥ २८८ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून सूर्य सूर्याचि ' येवढा '–सारखा; चंद्र चंद्राचि ' सांगडा ' – सारखा; ' ना '– अथवा दिव्याच्या ' पडिपाडा ' – योग्यतेचा ' ऐसा दीपु '– असा दीपच. ॥ २८८ ॥

प्रकाश तो प्रकाश कीं । यासि न वचे घेई चुकी ।
म्हणौनि जग असकी । वस्तुप्रभा ॥ २८९ ॥

पदयुक्त भावार्थ—तसेंच परमात्मज्ञान हा जो 'प्रकाश' तोच परमात्मज्ञान-स्वरूप प्रकाश. ' यासि '– यांत ' चुकी '– कांहीं एक चूक, बदल ' न वचे '– होणार नाहीं; यांत कांहींहि अंतर होणार नाहीं, ' घेई '– असें समज. ' म्हणौनि '– म्हणूनच ' असकी जग '– संपूर्ण जग ' वस्तुप्रभा '– वस्तुप्रभाच, परमात्मस्वरूपच होय. ॥ २८९ ॥

संपूर्ण जग हें परब्रह्ममयच आहे; अज्ञान या अभावरूपाशीं त्याचा कांहींहि संबंध नाहीं, हें कसें, तें पाहाः—

विभाति यस्य भासा । सर्वमिदं हा ऐसा ।
श्रुति काय वायसा । ढेंकरु देती ॥ २९० ॥

पदयुक्त भावार्थ— ' यस्य '–ज्या परमात्म्याच्या ' भासा '–आत्म-प्रकाशानें सर्वामिदं (इदं सर्वं) हें सर्व विश्व ' विभाति '–प्रकाशतें, ओतप्रोत भरलेलें असतें, ' ऐसा हा '–असले हे ' वायसा '–पोकळ, निरर्थक ' ढेंकरु '– उद्गार ' श्रुति देती काय '–वेद (देतील) काढतील काय (असले हे वेदपुरुषाच्या विराट स्वरूपांतील ते स्वानुभवाचे उद्गार वायफळ होतील काय ?) ॥ २९० ॥

यालागीं वस्तुप्रभा । वस्तुचि पावे शोभा ।
जात असे लाभा । वस्तुचिया ॥ २९१ ॥

पदयुक्त भावार्थ—यालागीं म्हणूनच ' वस्तुप्रभा '– (वस्तु–आत्मा, प्रभा–प्रकाशानें)= आत्मप्रकाशानें, निजज्ञानानें ' वस्तुचि '–परमात्मा स्वतां आपणच ' शोभा पावे '– (द्रष्टा–द्रश्य–दर्शनरूप अनंतकोटि ब्रह्मांडमय ऐश्वर्यानें) विकास पावतो व ' वस्तुचिया लाभा '–आत्मसुखाच्या अशा आनंदास

'जात असे'– प्राप्त होतो. (सारांश, विश्व हें परमात्मस्वरूप जें निर्विकार, पूर्ण ज्ञानघन त्याचेंच तें ज्ञानरूपवैभव होय.) ॥ २९१ ॥

असा वास्तविक सिद्धान्त असतांना नित्य अभावरूप असणारें अज्ञान हें विश्वाचें कारण आहे, हें म्हणणें कसें निरर्थक, तें श्रीज्ञानराज आतां अगदीं स्पष्ट करीत आहेतः—

वांचून वस्तु यया । आपणपें प्रकाशावया ।
अज्ञान हेतु वायां । अवघेंचि ॥ २९२ ॥

पदयुक्त भावार्थः—'वांचून'–वगळून, (हा सिद्धान्त) सोडून देऊन 'वस्तु'–परमात्मवस्तु 'यया'–इनें 'आपणपें'–आपण स्वतां 'प्रकाशावया'–प्रकट होण्यास, विश्वरूपानें प्रकाशित व्हावयास 'अज्ञानहेतु'–(आमचें) हें अज्ञान कारण 'अवघेंचि'–हें सर्व म्हणणेंच 'वायां (होय)'–खोटें, व्यर्थ आहे. (दुसऱ्या तऱ्हेनें अर्थ तो असा)–'वस्तु आपणपें प्रकाशावया हेतु'–विश्वरूपानें प्रकट होण्याचा हेतुहि परमात्मा, 'एकोऽहं बहु स्याम्'– मी बहुत व्हावें ही परमात्म्याची इच्छाच जर कारण तर त्यासाठीं 'यया वांचून'–या स्वयमेव परमात्म्याखेरीज 'अज्ञान हेतु'–आणखी अज्ञान हा हेतु, हें कारण हवें कशाला ? त्याचें प्रयोजनच नाहीं. म्हणून अज्ञानवाद्याच्या वर दिलेल्या अनेक युक्त्या व प्रमाणें हीं 'अवघेंचि वायां'–सर्वच व्यर्थ होत. ॥२९२॥

म्हणोनि अज्ञान सद्भावो । कोण्हे परी न लाहों ।
अज्ञान कीर वावो । पाहों ठेलियाही ॥ २९३ ॥

पदयुक्त भावार्थ—'म्हणोनि'–एकंदरींत 'अज्ञान सद्भावो'–अज्ञानाची सिद्धि, अस्तित्व 'कोण्हेपरी'– कोणत्याहि प्रकारानें 'न लाहों'– सिद्ध होत नाहीं. 'अज्ञान पाहों ठेलियाही'– या अज्ञानाला निश्चयपूर्वक पाहूं गेलें असतांहि, त्याचा पूर्ण शोध घेतल्यावरहि 'कीर वावो'– खरोखरच तें खोटें ठरलें; तें केव्हांहि अस्तित्वांत नसणारें ठरलें. ॥ २९३ ॥

परी तमाचा विसुरा । न जोडेचि दिनकरा ।
रात्रीचिया घरा । गेलेयाही ॥ २९४ ॥

पदयुक्त भावार्थ—'परी'– पण असें कीं, 'दिनकरा'– सूर्याला 'रात्रीचिया घरा'– काळोखमय अशा रात्रीच्या घरीं 'गेलेयाही'– गेले

असतांहि ' तमाचा ' – काळोखाचा ' विसुरा ' – मागमूसहि ' न जोडेचि ' – लागणार नाहींच. ॥ २९४ ॥

आतां पुढील प्रकरणाचें अवतरण जें आरंभसूचन तें श्रीज्ञानराज करतात, तें असें:—

कां नीद खोळे भरिता । जागणेंही न ये हाता ।
येकलिया टळटाळिता । ठाकिजे जेवीं ॥ २९५ ॥

पदयुक्त भावार्थ—' कां ' – कारण कीं, ' नीद ' – झोपेला ' खोळे '– पदरांत ' भरिता ' – भरावयास गेलें असतां म्हणजे झोपेला पाहूं लागलें असतां तिच्या सापेक्ष असणारें जागणेंहि 'हाता न ये'–हातास येत नाहीं. तर 'येकलिया'– एकटा ' टळटळिता '–झोप व जागेपणा यांच्या विरहित पूर्ण असा जागृतपणाच ' जेवीं ठाकिजे ' – जसा शिल्लक राहात असतो, तसें अज्ञाननिवर्तक जें ज्ञान यांच्यारहित असें केवळ जें पूर्ण ज्ञानघनस्वरूप तेंच सदैव असतें. ॥ २९५ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे 'अज्ञानखंडनं' नाम सप्तमं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवादरूप परब्रह्मपरमात्म्याचें ओतप्रोत वर्णन असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें ' अज्ञानखंडन ' नामक सातवें प्रकरण समाप्त.

प्रकरण आठवें

ज्ञानखंडन

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं गेल्या प्रकरणांत अज्ञानाचें खंडन अनेक युक्ति-प्रयुक्तींनीं केलें, तसेंच त्याच रीतीनें याहि प्रकरणांत सत्त्वगुणजन्य ज्ञानाचें खंडन केलें, म्हणून या प्रकरणाचा महाराजांनीं फारसा विस्तार केला नाहीं. पुनः पुनः तेच तेच दृष्टान्त आलेले आहेत ते केवळ मुमुक्षूला सिद्धान्तविषयांचें आकलन नीट व्हावें म्हणून अत्यंत कळकळीनें योजले आहेत. यांत पुनरुक्ति हा दोष उद्भवत नाहीं. अज्ञानाचा निरास करण्याकरितां सापेक्ष ज्ञानाची योजना करावी लागते म्हणून हें प्रकरण स्वतंत्रपणें देऊन स्वस्वरूपाच्या स्वानुभवपूर्ण दिग्दर्शनानें या ज्ञानखंडनप्रकरणाचा आरंभ केला आहे.

स्वस्वरूपाचा दिग्दर्शनपूर्वक श्रीज्ञानराज तो स्वानुभव आतां सांगतातः—

तैसें आमुचेनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे ।
आम्हांलागीं गुरुदेवें । आम्हींच केलों ॥ १ ॥

पदयुक्त भावार्थ—'तैसें'—त्याप्रमाणें 'आमुचेनि नांवें'—आमच्या स्वतांच्या नांवावरून ज्ञानदेव, ज्ञानेश्वर या नांवावरून पाहतां व तसेंच आमच्या स्वतांच्या अनुभवदृष्टीनेंहि पाहतां 'अज्ञानाचें ज्ञानहि'—अज्ञानाच्या सापेक्ष असणारें, अज्ञानाच्या विरोधी असणारें ज्ञानहि उरूं नये, 'आम्हांलागीं'—असें आम्हांला आपल्या स्वतांच्या स्वस्वरूपाच्या ठिकाणीं 'गुरुदेवें'—श्रीनिवृत्तिनाथमहाराज गुरुरायांनीं कृपेच्या दृष्टिक्षेपानें 'आम्हींच केलों'—निजस्वरूपमय केलें. ॥ १ ॥

तें स्वात्मास्थितीचें अनिर्वचनीयपण श्रीज्ञानेश्वरमहाराज वर्णन करतातः—

परी आम्हां आम्ही आहों । तैं कैसें पाहों जावों ।
तंव काय कीजे ठावो । लाजिजे ऐसा ॥ २ ॥

पदयुक्त भावार्थ—'परी'—पण 'आम्हां आम्ही'—आमचे आम्ही आहों, तें कसें हें 'पाहों जावों तंव'—पाहावयास गेलें असतां 'लाजिजे'—लाजच उत्पन्न व्हावी, 'ऐसा ठावो'—असें तें ठिकाण आहे, 'काय कीजे'—याला काय करावें ? (असें तें स्वरूप अनिर्वचनीय आहे. "साधुबोध झाला । नुरोनियां ठेला । ठायींच

मुराला । स्वानुभव ॥—श्रीज्ञानदेवहरिपाठ", अशी स्वानुभवगम्य शब्दातीत ती स्थिति होय.) ॥ २ ॥

हा ठावोवरी गुरुरायें । नांदविलों उवायें ।
जे आम्ही न समाये । आम्हांमाजीं ॥ ३ ॥

पदयुक्त भावार्थ—' जे '—कीं, ' आम्ही आम्हांमाजीं '—आम्ही आमच्या स्वतांमध्यें ' न समाये '—सामावत नाहीं, ' हा ठावोवरी '—इतक्या व्यापक स्थिती-पर्यंत ' गुरुरायें ' – (आम्हांस) श्रीगुरुनिवृत्तिनाथांनीं ' उवाये '–आनंदानें ' नांदविलों '–नांदविलें, ब्रह्मानंदमय केलें—("आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभव उदिते खल्विदं ब्रह्म पश्चात् । " अशी ही ती व्यापक अनुभूति होय असें श्रीमदाद्य-शंकराचार्य म्हणतात.) ॥ ३ ॥

अहो आत्मेपणीं न संटो । स्वसंवित्ति न घसवटो ।
आंगीं लागलिया न फुटो । कैवल्यही ॥ ४ ॥

पदयुक्त भावार्थ—' अहो '–श्रीनेवासेक्षेत्रस्थ श्रोतेहो, काय सांगावें ! ज्या ठिकाणीं 'आत्मेपणीं'–ही ती आत्मस्थिति असें म्हणणें, 'न संटो'–सहन होत नाहीं, ' स्वसंवित्ति '–निजज्ञाति ही 'न घसवटो '–जेथें स्पर्शसंबंध करूं शकत नाहीं, ' कैवल्यही '– कैवल्यस्थिति, जी केवल निजस्वरूपमयताही ' अंगीं लागलिया'–अंगीं वाणली असतांहि ' न फुटो '– ती दूर होत नाहीं. आमच्या या अभेद-मय स्थितींत फरक होत नाहीं. ॥ ४ ॥

आमुची करवे गोठी । ते जालीचि नाहीं वाक्सृष्टी ।
आमुतें देखे दिठी । ते दिठीचि नव्हे ॥ ५ ॥

पदयुक्त भावार्थ— ' आमुची '– आमच्या स्वरूपस्थितीचें ' गोठी '– वर्णन ' करवे '– करवेल ' ते वाक्सृष्टी '– अशी वाणीची शब्दरचना जी शब्द-सृष्टि (वेद व उपनिषत्शास्त्रें ' न इति, न इति '–नेति नेति असें म्हणून जिथें थांबतात) ती ' जालीचि नाहीं '– झालीच नाहीं. ' आमुतें '– आमचें स्वरूप ' दिठी '– जी दृष्टि ' देखें '– पाहूं शकेल ' ते दिठीचि '– ती दृष्टीच ' नव्हे '– उत्पन्न झालेली नाहीं; (कीं ती आम्हांला तिच्या समोर पाहील.) ॥५॥

आमुतें करूनि विखो । भोगूं शके पारखो ।
तैं आमुतें न देखों । आम्हीपण ॥ ६ ॥

पदयुक्त भावार्थ—' आमुतें '– आमच्या स्वरूपाला ' विखो (विषय) करूनि '–विषय म्हणजे जाणण्याचा पदार्थ समजून ' पारखो '– त्याला परकेपणानें, निराळेपणानें (किंवा ' पारखो '– पारखून) पाहून ' भोगूं शके '– तो आम्ही कसा अनुभवूं शकूं ? ' तैं '– कारण कीं ' आम्हीपण '– आमचें स्वतांचें स्वरूपपण ' आमुतें '– आमचें आम्हांलाच ' देखों न '– दिसूं शकत नाहीं. ॥ ६ ॥

प्रगटो लपो न लाहो । येथें नाहीं नवलावो ।
परी कैसेनही विपावो । असणयाचा ॥ ७ ॥

पदयुक्त भावार्थ—' प्रगटो '– जेथें ज्ञानानें आत्मस्वरूप उदय पावणें ' लपो '– किंवा अज्ञानानें झाकून जाऊन तें लय पावणें ' न लाहो '– हे दोन्ही भाव प्राप्त होत नाहींत, संभवत नाहींत, ' येथें '– यांत ' नवलावो नाहीं '– कांहींच आश्चर्य नाहीं. ' परी '– कारण कीं, ' असणयाचा '– हा आमचा स्वरूप-स्थितीचा असणेंपणाचा ' विपावो '– प्रकार, ही स्थिति ' कैसेनही '– शब्दानें कशी सांगतां येईल ! ॥ ७ ॥

किंबहुना श्रीनिवृत्तीं । ठेविलों असों जिया स्थितीं ।
तें काय देऊं हातीं । वाचेचिया ॥ ८ ॥

पदयुक्त भावार्थ—' किंबहुना '–फार काय सांगावें ? ' श्रीनिवृत्ती '– श्रीनिवृत्तिरायांनीं ' जिया स्थितीं '–ज्या स्वरूपस्थितींत ' ठेविलों असों '– आम्हांस ठेविलें आहे, ' ते '–त्या स्थितचिें वर्णन ' वाचेचिया हातीं '–वाणीच्या-कडून ' काय देऊं '–कसें होऊं देतां येईल ? कसें होऊं शकेल ? ॥ ८ ॥

तेथ समोर होआवया । अज्ञानाचा पाडु कासया ।
केउतें मेळिया माया । होऊं पाहिजे ॥ ९ ॥

पदयुक्त भावार्थ—' तेथ '–तसल्या अवस्थेंत ' समोर होआवया '–पुढें येण्याला ' अज्ञानाचा पाडु '–अज्ञानाचा (पाड) टिकाव ' कासया '– कसा लागेल ? ' मेलिया माया '–मेलेली, नाहींशी झालेली जी मूळची अविद्या ती ' केउतें '–आतां कशी ' होऊं पाहिजे '–जिवंत होऊं शकेल ? ॥ ९ ॥

अज्ञानाचा प्रवर्तु । नाहीं जया गांवाआंतु ।
तेथें ज्ञानाची तरी मातु । कोण जाणे ॥ १० ॥

पदयुक्त भावार्थ—' जया गांवाआंतु '–ज्या आत्मास्थितीच्या गांवांत ' अज्ञानाचा प्रवर्तु '–अज्ञानाची प्रवृत्ति, प्रवेश, गति नाहीं; 'तेथें'–त्या ठिकाणीं

'ज्ञानाची तरी'–या सत्त्वगुणजन्य अज्ञाननिर्वतक ज्ञानाची तर 'मातु'–वार्ता, 'कोण जाणे?' ती मग कोणास कळणार? ॥ १० ॥

रात्री म्हणौनि दिवे । पडती कीं लावावे ।
वांचून सूर्यासवें । सिणणें होये ॥ ११ ॥

पदयुक्त भावार्थ—'रात्री म्हणौनि'–रात्र आहे म्हणून दिवे लावावे 'पडती कीं'–लागतातच. 'वांचून'–एरवीं 'सूर्यासवें'–सूर्योदयाबरोबर तसें करणें तो शीण होय. ॥ ११ ॥

म्हणोन अज्ञान नाहीं । तेथेंचि गेले ज्ञानही ।
आतां निमिषोन्मेषां दोहीं । ठेली वाट ॥ १२ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून अज्ञानच नाहीं, जिथें निजस्वरूपाचा विसरच नाहीं, 'तेथेंचि'–तिथें मग 'ज्ञानहि गेलें'–स्वस्वरूपाचा आठवहि पण नाहीं, तोहि गेलाच. आतां 'निमिषोन्मेष'–(निमिष + उन्मेष) 'निमिष'–अज्ञान, अभावपणा 'उन्मेष'–ज्ञान, भावपणा असे भावाभाव 'दोहीं'–असणें–नसणें, ज्ञान-अज्ञान या दोहींस, या दोहींचीहि 'वाट ठेली'–वाट थांबली, बंद झाली. ॥ १२ ॥

येऱ्हवीं तऱ्ही ज्ञान अज्ञानें । दोहींचि अभिधानें ।
अर्थाचेनि आनानें । विप्लाविलीं ॥ १३ ॥

पदयुक्त भावार्थ—'येऱ्हवीं तऱ्ही'–एरवींसुद्धां व्यवहारदृष्टीनें पाहतां ज्ञान व अज्ञान 'दोहींचि'–या दोहींचीं 'अभिधानें'–नांवें 'अर्थाचेनि'–अर्थाच्या 'आनानें'–भेदानेंच 'विप्लाविलीं' प्रकट होत असतात. ॥ १३ ॥

जैसीं दंपत्यें परस्परें । तोडूनि पालटिलीं शिरें ।
तेथें पालटु ना पण सरे । दोहींचें जिणें ॥ १४ ॥

पदयुक्त भावार्थ—'जैसी'–ज्याप्रमाणें 'दंपत्यें'–नवराबायकोच्या जोडप्यानें 'परस्परें'–एकमेकांचीं 'शिरें तोडूनि'–मस्तकें कापून 'पालटिलीं'–बदलली तर तेथें 'पालटु ना'–पालट तर होत नाहींच, पण दोहींचें 'जिणें'–दोघांचे जीव मात्र 'सरे'–जातात, (तसेंच अज्ञान या अस्तित्वांत नसणाऱ्या पदार्थाचा नाश करण्याकरितां सत्त्वगुणजन्य ज्ञान गेल्यानें त्याचेंहि अस्तित्व राहात नसतें अशी ह्या दोघांची वरीलप्रमाणेंच स्थिति होते.) ॥ १४ ॥

कां पाठी लाविला होये । तो दीपुचि वायां जाये ।
दिठी अंधारें पाहे । तैं तेचि वृथा ॥ १५ ॥

पदयुक्त भावार्थ—' पाठी लाविला ' – आपल्या पाठीमागें लावलेला ' तो दीपुचि ' – दिवा आपल्याला ' वायां होये जाये ' – निरुपयोगी होऊन फुकट जाणारा होतो. ' दिठी ' – तसेंच प्रकाश जर ' अंधारें पाहे ' – अंधाराला पाहील ' तैं ' – तर ' तेचि ' – तोच प्रकाश ' वृथा ' – व्यर्थ होईल. ॥ १५ ॥

तैसें निपटूनि जें नेणिजे । तें अज्ञान शब्दें बोलिजे ।
आतां सर्वही जेणें सुजे । तें अज्ञान कैसें ॥ १६ ॥

पदयुक्त भावार्थ—' तैसें ' – तसेंच ' निपटून ' – अगदीं पूर्णपणें ' जें नेणिजे ' – जें नेणणें, जें न जाणणें तें ' अज्ञान ' हा ' शब्दें ' – शब्द योजून ' बोलिजे '–बोलण्यांत येतें. ' आतां '–पण ' जेणें '–ज्याच्या योगानें ' सर्वही ' – सर्व कांहीं ' सुजे ' – जाणलें जातें तें अज्ञान कसें होईल ? ॥ १६ ॥

ऐसें ज्ञान अज्ञाना आलें । अज्ञान ज्ञानें गेलें ।
ये दोन्ही वांझौलें । दोन्ही जालीं ॥ १७ ॥

पदयुक्त भावार्थ—' ऐसें ' – याप्रमाणें (अज्ञान हें अविद्येच्या तमोगुणाचें कार्य व ज्ञान हें अविद्येच्या सत्त्वगुणाचें कार्य मिळून दोन्ही अविद्येचींच कार्यें असल्यामुळें मुळांत अविद्याच जर अभावरूप तर मग तिचीं कार्यें असणारीं ज्ञान–अज्ञान हींहि अभावरूपच होत. हें लक्षांत घेऊन या ओवीचा अर्थ लावला असतां त्यांतील मर्म समजणारें आहे.) ' अज्ञाना ' – या अज्ञानास ज्ञानस्वरूप ' आलें ' – प्राप्त झालें असतां तें अज्ञान ' ज्ञानें ' – ज्ञानरूप होऊन ' गेलें '– नाहींसें झालें (ज्ञान अज्ञानाची निवृत्ति करून आपणहि उरलें नाहीं. जसा काष्ठांतला अग्नि काष्ठाला जाळून टाकून आपणहि शिल्लक राहात नाहीं. दोन्ही–काष्ठ व अग्नि हीं परस्पर नाहींशीं होतात, त्याप्रमाणें) ' ये दोन्ही '– हीं ज्ञान अज्ञानें दोन्हीहि परस्पर अशा एकमेकांच्या सापेक्षतेनें असलेलीं 'दोन्ही वांझौलें'– दोन्ही पण वांझ, खोटीं ' जालीं '– निरर्थक, शून्य ठरलीं ॥ १७ ॥

आणि जाणे तोचि नेणे । नेणे तोचि जाणे ।
आतां कें असे जिणें । ज्ञानाज्ञाना ॥ १८ ॥

पदयुक्त भावार्थ—' आणि जाणे '– खरोखर जो जें कांहीं जाणतो तें इंद्रियें, मन, बुद्धि व अहंकार यांच्याद्वारें अविद्येलाच जाणतो म्हणून ' तोचि

नेणें '–तोच तर कांहीं (आपलें सत्यस्वरूप जो आत्मा याला) जाणत नाहीं. कारण याचें आत्मस्वरूप हा स्वतांच असल्यानें तो स्वतांहून निराळेंपणानें स्वतांस जाणणारा नसतो, म्हणून. व ' नेणें '–तें जो निराळेंपणानें जाणत नाहीं ' नोचि जाणे '–तोच तें स्वतां एकरूप होऊन जाणतो. (या अभावरूप अशा अविद्येच्या सत्त्वाचें कार्य असणाऱ्या ज्ञानानें जो ज्ञानी झालेला तो अभावरूप अज्ञानाला जाणतो म्हणजे जें जाणण्यालाच मुळीं कांहीं एक जें नसतें तें जो जाणणारा तो कांहींच जाणत नाहीं आणि नित्य, शुद्ध, बुद्ध अशा आत्मस्वरूपाला जाणणारा तो त्या आपल्या स्वरूपाहून निराळेंपणानें नसल्यामुळें तो कांहीं न जाणणारा असा जाणता असतो.) ' आतां '–असें असतां मग ' ज्ञानाज्ञाना '–या ज्ञान–अज्ञान जोडीचें ' कें '–आतां कुठें व कसें ' जिणें असे '–जिवंत राहणें असूं शकणार ? (कारण त्यांचें मुळांतच अस्तित्व नसल्यानें तीं दोन्हीहि अभावरूपच होत. म्हणून सिद्धान्त असा कीं–सर्व कांहीं जें दृश्य–अदृश्य, व्यक्त–अव्यक्त जगत् हें सर्व एक परमात्माच होय.) ॥ १८ ॥

एवं ज्ञानाज्ञान दोन्ही । पोटीं सूनी अह-नी ।
उदैला चिद्गगनीं । चिदादित्यु हा ॥ १९ ॥

पदयुक्त भावार्थ— ' एवं '– याप्रमाणें दोन्ही या ज्ञानाज्ञान (ज्ञान + अज्ञान) ज्ञान–प्रकाश व अज्ञान–काळोख अशा ' अह '–' नी '= अहः (दिवस) व नी–(निशा) दिवसाला व रात्रीला ' पोटीं '–पोटांत ' सूनी '–घालून ' चिद्गगनीं '– (चित् + गगनीं) स्वयंसिद्ध ज्ञानमय अशा गगनांत हा ' चिदादित्यु '– (चित् + आदित्यु) हा ज्ञानस्वरूप सूर्य ' उदैला '– उगवला आहे; (असें ज्ञान–अज्ञान जी जाणीव व नेणीव यांविरहित ज्ञानाज्ञानातीत केवळ, शुद्ध, परमज्ञानमय द्रष्टा–दृश्य–दर्शनभावरहित परमात्मस्वरूपच सर्वत्र आकाशाप्रमाणें ओतप्रोत घनदाट भरलेलें आहे.) ॥ १९ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे ज्ञानखंडनं नाम अष्टमं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवाद असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें ज्ञानखंडन नांवाचें आठवें प्रकरण समाप्त.

प्रकरण नववें

जीवन्मुक्तदशाकथन

(जिवंतपणींच प्राप्त झालेल्या मुक्तावस्थेचें वर्णन)

श्रीमंत सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं मागील दोन प्रकरणांत सच्चिदानंद आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं अविद्याकार्य अशा अज्ञानाचा आणि त्याच्याचबरोबर अविद्येच्या सत्त्वगुणाचें कार्य असणाऱ्या ज्ञानाचाहि अत्यंत अभाव आहे, हें सिद्ध करून दाखविलें. आतां ह्या प्रकरणांत सिद्धज्ञानस्वरूप, स्थितप्रज्ञ अशा जीवन्मुक्त महापुरुषाची स्थिति वर्णन करतात. परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं ज्ञान आणि अज्ञान यांचा अभाव जसा गेल्या दोन्ही प्रकरणांमध्यें सिद्ध केला, तसाच त्यांचें कारण असणारी अशी मूळ अविद्या ती व तिचें कार्य भोक्ता–भोग्य, द्रष्टा–दृश्य–दर्शन अशा अनेक द्वैतांच्या त्रिपुट्यांनीं युक्त जी अनंतकोटिब्रह्मांडांची रचना यांचाहि पण अभाव सिद्धच होतो हें लक्षांत येण्याकरितां तसेंच या जीवन्मुक्ताचे सर्व व्यवहार परब्रह्मरूप अशा सर्व व्यापक स्थितींतले अभेदरूपानें ते कसे असतात याचें स्पष्टीकरण होण्याकरितां महाराज या प्रकरणाचा आरंभ पहिल्या सहा ओव्यांनीं दृष्टान्तपूर्वक करीत आहेत, तो असाः—

आतां आमोद सुनास जालें । श्रुतीसि श्रवण रिघाले ।
आरिसे उठले । लोचनेसी ॥ १ ॥

पदयुक्त भावार्थ—(गेल्या आठव्या प्रकरणाच्या १९ व्या ओवीमध्यें सांगितल्याप्रमाणें कीं परमात्मस्वरूप चित्सूर्यानें व्यावहारिक ज्ञानाज्ञानाला पोटांत घातल्यामुळें म्हणजे त्या चित्सूर्याच्या प्रकाशांत तीं ' ज्ञान–अज्ञानें ' लोपून गेलीं म्हणून तिथें भोक्ता–भोग्य अशी भेदांतली देहभावाची स्मृतिहि पण शिल्लक राहात नसते. असला हा भोक्ता व त्याचें भोग्य जे इंद्रियांचे विषय यांविरहित तो देहभावविवर्जित जीवन्मुक्त सिद्धांचा व्यवहार होत असतो तो कसा तर) ' आतां '–या अवस्थेंत ' आमोद '–सुगंध हा गंध विषयच (नाकाचा जो सुगंध व दुर्गंध विषय तोच) ' सुनास '–(सु + नासा) सु म्हणजे पूर्णपणें नासा म्हणजे नाक झाला (दोन्हीहि नाक व त्याचा विषय असे हे एकरूप झाले.) 'श्रुतीसि'–

शब्दालाच ' श्रवण '– कान ' रिघाले '–उत्पन्न झाले. असे जेवढे म्हणून शब्द व त्याला ग्रहण करणारे कान हे सर्व अभेदरूप एकच होऊन गेले. ' आरिसे '– आरसे हे (त्यांना पाहणाऱ्या) ' लोचनेसी '– डोळ्यांशी ' उठले '– एकवटून गेले, एकरूप झाले. या अवस्थेंत तीं तीं इंद्रियें व त्यांचे त्यांचे विषय एकरूप होत असतात. कारण चित्त अगदीं निर्विषय होत असतें म्हणून. ॥ १ ॥

आपुलेनि समीरपणें । वेल्हावती विंजणें ।
कीं माथेंचि चांफेपणें । बहकताती ॥ २ ॥

पदयुक्त भावार्थ—' आपुलेनि समीरपणें '– वायु आपल्या वायुगतीनें ' विंजणें '– पंखा होऊन ' वेल्हावती '– आपणच डोलणारा, आपला आपणच वारा घेणारा झाला. ' कीं '– तसेंच ' माथेंचि '–मस्तकेंच आपण ' चांफेपणें '– चांफ्याचीं फुलें होऊन ' बहकताती '– दरवळणारी झालीं. ॥ २ ॥

जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकाशे ।
चकोरचि जैसे । चंद्रमा झाले ॥ ३ ॥

पदयुक्त भावार्थ—'जिव्हा'–जीभ 'रसें'–रसमय, अन्नरूप खाद्यपदार्थांचा रस ' लोधली '–होऊन गेली. कमळ आपणच ' सूर्यपणें '–सूर्य होऊन 'विकाशे'– प्रकाशलें, तद्वत् चकोरहि ' जैसे '–जणूं ' चंद्रमा '–चंद्ररूप झाला. ॥ ३ ॥

फुलेंचि जालीं भ्रमर । तरुणीचि झाली नर ।
जालें आपुलें शेजार । निद्राळुचि ॥ ४ ॥

पदयुक्त भावार्थ—फुलेंच भ्रमररूप बनलीं. तरुणीच नर पुरुषरूप झाली व 'निद्राळुचि'–झोपाळूच, झोपणाराच आपलें 'शेजार'–शेजवर, झोपेचें ठिकाण झाला. ॥ ४ ॥

दिठीवियाचा रवा । नागरु इया ठेवा ।
घडिला कां कोरिवा । परी जैसा ॥ ५ ॥

पदयुक्त भावार्थ—' दिठीवियाचा '–दिसण्यांत ' नागरु '–सुंदर अशी ' रवा '–सोन्याची वीट ' जैसा परी '–जशी, जणुं 'इया'–ही, आपणच 'कोरिवा ठेवा '–घडीव कोरलेले अलंकार ' घडीला '–अशी घडलेली बनली. ॥ ५ ॥

चूतांकुर झाले कोकीळ । आंगच झालें मलयानीळ ।
रस झाले सकळ । रसनावंत ॥ ६ ॥

पदयुक्त भावार्थ—'चूतांकुर'–(चूत+अंकुर) आंब्याची पालवी आपण कोकीळ झाली. अंगच आपण मलयागर नांवाचें चंदन झालें. 'सकळरस'–सहाहि रस, षड्रस हे आपणच 'रसनावंत'–भोक्ते झाले. ॥ ६ ॥

वरील सर्व दृष्टान्त ब्रह्मरूप झालेल्या ब्रह्मवेत्त्याच्या ठिकाणीं जुळवून दाखवितातः—

तैसें भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ।
हें सरलें अद्वैता । अफुटामाजीं ॥ ७ ॥

पदयुक्त भावार्थ—तसें 'भोग्य'–विषय आणि 'भोक्ता'–विषयग्रहण करणारा विषयी, जो जीवभाव तसेंच हें अविद्याकार्य 'दिसे'–दृश्य, जगत् आणि 'देखता'–द्रष्टा, जगद्व्यवहार करणारा 'हें'–हा सर्व द्वैतभाव, हें द्वैतभान 'अफुटामाजीं'–(अफूट म्हणजे अखंड असें परब्रह्म) त्या अखंडब्रह्मामध्यें 'अद्वैता'–एकत्वाला 'सरलें'–पावलें. (ब्रह्मरूप झालेल्या ब्रह्मवेत्त्याच्या ठिकाणीं भोक्ता, भोग्य; कर्ता, कर्म; द्रष्टा, दर्शन; ज्ञाता, ज्ञान हा त्याचा सर्वव्यवहार ब्रह्मरूप असतो.) ॥ ७ ॥

ब्रह्मवेत्त्या पुरुषाच्या ठिकाणीं द्वैतभान नसतें. असें जर आहे, तर तो खातो, पितो, निजतो, बसतो, हंसतो, बोलतो अशी त्याची इतर लोकांप्रमाणें व्यवहार केल्याची प्रतीति येते तिची वाट काय, या शंकेचें पुढील ओव्यांनीं श्रीज्ञानेश्वर-महाराज समाधान करतातः—

सेवंतेपणाबाहेरी । न निगताचि परी ।
पाती सहस्रवरी । उपलविजे ते ॥ ८ ॥

पदयुक्त भावार्थ—'सहस्रवरी'–(शेवंती फुलाच्या) हजारों 'पाती'–पाकळ्या 'उपलविजे'–उमलतात खऱ्या; 'परी'–पण 'ते'–त्या 'सेवंतेपणा-बाहेरी'–शेवंतीपणाला सोडून 'न निगताचि'–निघतच नाहींत, नसतातच; शेवंतीपणाशीं त्या एकरूपच असतात. ॥ ८ ॥

तैसें नवा नवा अनुभवीं । वाजतां वाधावी ।
अक्रियेच्या गांवीं । नेणिजे तें ॥ ९ ॥

पदयुक्त भावार्थ—'तैसें नवा नवा'–तशी नव्या नव्या, नाना तऱ्हेच्या 'अनुभवीं'–व्यवहारांतील अनुभवांची 'वाधावी'–वृद्धि 'वाजतां'–होत असतां

'अक्रियेच्या गांवीं'– निष्क्रिय अशा आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं 'तें नेणिजे'–त्याचें भान नसतें, त्याची जाणीव उरत नाहीं. ॥ ९ ॥

म्हणोनि विषयांचेनि नांवें । सूनि इंद्रियांचे थवे ।
सैंघ घेती धावे । समोरही ॥ १० ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून 'इंद्रियांचे थवे'–इंद्रियांचे समुदाय 'विषयांचेनि नांवें'–विषयांच्या निमित्तानें 'सूनि'–प्रवेश करून 'समोरही'–आपल्यापुढें येणाऱ्या नेमक्या विषयावर 'सैंघ'–एकाएकी, एकसारखी 'धावे घेती'–धाव घेतात. ॥ १० ॥

परि आरिसा शिवे शिवे । तंव दिठीसी दिठी फावे ।
तैसे झाले धावे । वृत्तीचे या ॥ ११ ॥

पदयुक्त भावार्थ—'परि'–परंतु 'दिठी'–दृष्टि 'आरिसा'–आरशांत 'शिवे शिवे'–प्रवेश करते (शिरते) पाहते, तें तिचें पाहणें 'तंव'–तर 'दिठीसी'–आपल्या दृष्टीलाच, आपल्या स्वरूपालाच 'फावे' ती अनुभवत असते, आपल्या स्वतांला ती पाहात असते, 'तैसें'–तसें 'वृत्तीचे'–त्याच्या मनाच्या 'या धावे'–या ओढीचें 'झालें'–होतें. ("विषय तो त्यांचा झाला नारायण" या श्रीतुकोबारायांच्या अनुभूतीप्रमाणें) या ब्रह्मनिष्ठ महात्म्यांचें मन विषयाच्या निमित्तानें निजरूपच पाहतें, अनुभवीत असतें. ॥ ११ ॥

हाच सिद्धान्त पुढील दृष्टान्तांनीं आणखी दृढ करतातः—

नाग मुदी कंकण । त्रिलिंगीं भेदली खूण ।
घेतां तरी सुवर्ण । घेईजे कीं ॥ १२ ॥

पदयुक्त भावार्थ—'नाग'–सोन्याचा डोक्यांत घालण्याचा स्त्रियांचा नागासारखा दिसणारा अलंकार हा पुल्लिंगी, वेणीतली 'मुदी'–मूद किंवा अंगठी ही स्त्रीलिंगी, 'कंकण'–सोन्याचें कडें हें नपुंसकलिंगी अशा 'त्रिलिंगीं'–तीन लिंगांनीं 'खूण'–त्यांचें चिन्ह, रूप किंवा आकार 'भेदली'–भिन्न भिन्न दिसला 'तरी'–तथापि 'घेतां'–विकत घ्यावयास गेलें असतां 'सुवर्ण घेईजे कीं'–त्यांना सोनें म्हणूनच घेतलें जातें. ॥ १२ ॥

वेंचूनि आणूं कल्लोळ । म्हणोन घापे करतळ ।
तेथें तरी निखळ । पाणीच फावे ॥ १३ ॥

पदयुक्त भावार्थ—' कल्लोळ '–लाटा ' वेंचूनि आणूं '–गोळा करून आणण्याकरितां म्हणून जरी ' करतळ घापे '–हात घातला तरी तेथें हातास ' निखळ '–निवळ पाणीच ' फावे '–येतें. ॥ १३ ॥

हातापाशीं स्पर्शु । डोळ्यापाशीं रूपसु ।
जिव्हेपाशीं मिठांशु । कोण्ही एकू ॥ १४ ॥

पदयुक्त भावार्थ—हाताला स्पर्श, डोळ्यांना रूप, जिभेला 'कोण्ही एकू'–कांहींसा ' मिठांशु '–मधुरपणा; ॥ १४ ॥

तऱ्ही परिमळापरौतें । मिरवणें नाहीं कापुरातें ।
तेविं बहुतांपरी स्फुरतें । तेंचि स्फुरें ॥ १५ ॥

पदयुक्त भावार्थ— ' तऱ्ही '–तथापि ' कापुरातें '–कापराच्या ठिकाणी ' परिमळापरौतें '–एका सुगंधापलीकडे ' मिरवणें नाहीं '–खुलणें नाही.; 'तेविं'–त्याप्रमाणें ' बहुतांपरी '–सर्व प्रकारांनीं ' स्फुरतें '–होणारें जगद्रूप स्फुरण म्हणजे भान ' तेंचि '–तें परमात्मस्वरूपच 'स्फुरें'–स्फुरणरूपानें स्फुरत असतें, ओतप्रोत आपणच तें दिसत असतें. ॥ १५ ॥

म्हणोनि शब्दादि पदार्थ । श्रोत्रादिकांचे हात ।
घ्यावया जेथ । उजू होती ॥ १६ ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून 'शब्दादि'–शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध इत्यादि ' पदार्थ '–विषयांचा ' श्रोत्रादिकांचे '–श्रोत्र, त्वचा, नेत्र, रसना, घ्राण इत्यादि इंद्रियांकडून ' हात '–स्वीकार, ग्रहण ' घ्यावया '–करण्यास ' जेथ '–जेव्हां 'उजू होती '–तयार होतात— ॥ १६ ॥

तेथ संबंधु होये न होये । तव इंद्रियांचे तें नोहे ।
मग असतेंचि आहे । संबंधु ना ॥ १७ ॥

पदयुक्त भावार्थ—' तेथ '–तेव्हां ' संबंधु होये न होये '–परस्परांचा संबंध होतो न होतो ' तंव '–तोंच, इतक्यांत ' इंद्रियांचें तें '–इंद्रियांचें तें घेणें, विषयांचें ग्रहण करणें 'नोहे'–नाहींसें होतें, 'संबंधु ना'–त्यांचा संबंध राहात नाहीं; (मग इतक्या या व्यवहारांत तिथें तें कोण असतें ?) 'मग'–तर 'असतेंचि'–सर्वत्र नित्य ओतप्रोत असणारें तें परमात्मस्वरूपच 'आहे'–असतें म्हणजे इंद्रियें, त्यांचे विषय वगैरे सर्व कांहीं द्वैत तेंच बनलेलें असतें. ॥ १७ ॥

हेंच दृष्टान्तांनीं आणखी दोन ओव्यांनीं अधिक स्पष्ट करतात.—

जिये पेरीं दिसती उर्शीं । तिये लाभती कीं रसीं ।
कांति जेवीं शशीं । पुनवेचिया ॥ १८ ॥

पदयुक्त भावार्थ—' जिये पेरी उर्शी दिसती '—जेवढीं पेरीं उसांत दिसतात ' तिये '—तीं सर्व ' कीं '—तर ' रसीं '—रसरूपानें, रसांत ' लाभती '—एकवटून प्राप्त होतात; ' कांति '—सोळा कलांचा प्रकाश ' पुनिवेचिया शशीं '—पौर्णिमेच्या चंद्रांत ' जेवीं '—जसा ' लाभती '—एकवटतो. ॥ १८ ॥

पडिलें चांदावरी चांदिणें । समुद्रीं झालें वरिषणें ।
विषयां करणें । भेटतीं तैशीं ॥ १९ ॥

पदयुक्त भावार्थ—' चांदावरी '—चंद्रावर चांदणें पडलें किंवा समुद्रावर ' वरिषणें '—वृष्टि, वर्षाव झाला, तरी द्वैत निर्माण होत नाहीं. (कारण चंद्र व चांदणें दोन्हीं जशीं एकरूपच, तशींच समुद्र व वृष्टि हीं दोन्हीहि एकरूपच असतात.) ' तैशीं '—त्याचप्रमाणें ' करणें '—इंद्रियें ' विषया '—त्यांच्या विषयांना ' भेटतीं '—भेटतात, त्यांच्याशीं एकरूप होतात म्हणजे इंद्रियें विषय सेवन करतात, हें जरी व्यावहारिक दृष्ट्या दिसत असलें तरी पारमार्थिक दृष्टीनें मुळींच तो कांहीं निराळा असा व्यवहार होतच नसतो; तर तिथें निर्विकार, नित्य, व्यापक असें परमात्मस्वरूपच अभेदरूपानें अतिसूक्ष्मत्वानें सर्व कांहीं आपणच त्यांत व्यापून राहिलें आहे असें अनुभवास येतें. ॥ १९ ॥

स्थितप्रज्ञ अशा सिद्धपुरुषांचें विषयसेवन कसें असतें तर त्यांचें चित्त हें निर्विषय झालेलें असतें. म्हणून त्यांचे देहाचे व्यापार म्हणजे इंद्रियें व विषय यांचे असे होणारे सर्व व्यवहार ते कसे तादात्म्यानें परमात्मस्वरूपाशीं एकरूप होऊन होत असतात हें एथवर वर्णन झालें. आतां त्यांची ज्ञानाज्ञानातीत पराभक्ति जी सहजसमाधि ती कशी असते याचें स्पष्टीकरण श्रीज्ञानराज दृष्टान्त-पूर्वक करतात, तें असें:—

म्हणोन तोंडाआड पडे । तेंहि वाचा वावडे ।
परी समाधी न मोडे । मौनमुद्रेची ॥ २० ॥

पदयुक्त भावार्थ—म्हणून ' तोंडाआड पडे '—सहज तोंडाला येईल, ' तेंहि वाचा '—तेंच वाणी ' वावडे '—जरी बोलली ' परी '—तरी त्या ज्ञानी

महात्म्याची ' मौनमुद्रेची '–मौनावस्थेतली 'समाधि'–ती स्फुरणरहित एकतानता ' न मोडे '–बिघडत नाहीं, त्याचें तें बोलणें अबोलणेंच होत असतें. ॥ २० ॥

व्यापाराचे गाडे । मोडतांहि अपाडे ।
अक्रियेचें न मोडे । पाऊल केंही ॥ २१ ॥

पदयुक्त भावार्थ—ब्रह्मनिष्ठ महात्म्याचे ' व्यापाराचे ' – व्यवहाराचे ' अपाडे '–अनेक असंख्य ' गाडे '–प्रकारांचे ढीगचे ढीग ' मोडतांहि '–चालूं असले तरी ' केंही '–केव्हांहि ' अक्रियेचें '–त्याच्या अकर्तेपणाची ' पाऊल '–स्थिति ' न मोडे '–भंग पावत नाहीं, ती चलित होत नाहीं. ॥ २१ ॥

पसरूनि वृत्तीची वावे । दिठी रूपातें दे खेंवे ।
परी साचाचेनि नांवें । कांहींचि न लभे ॥ २२ ॥

पदयुक्त भावार्थ—'दिठी'–दृष्टि ही ' वृत्तीची वावे '–मनाच्या स्फुरणानुरूप ' रूपातें '–पदार्थाला 'खेंवे दे'–आलिंगन देण्यास गेली, एखाद्या पदार्थापर्यंत पोंचली ' परी '–तरी ' साचाचेनि नांवें '–खरोखरीच प्रत्यक्षाच्या नांवानें पाहतां ' कांहींच न लभे '–त्यांत कांहींच घडत नाहीं.

सारांश—असेच सर्व इंद्रियांचे, मनाचे, बुद्धीचे व्यापार होत असतांनाहि या महात्म्याच्या परमबोधावस्थेंत पालट होत नाहीं. सर्वत्र आंत बाहेर त्यास परब्रह्ममय होऊन गेलें असल्यामुळें मागील अकराव्या ओवींतील वर्णनाप्रमाणें परमात्मस्वरूप हेंच इंद्रियें, विषय इत्यादि हीं सर्व आपणच नटलें असल्यानें वर वर्णन केलेल्या जीवन्मुक्ताच्या सहजस्थितीतहि त्याच्या सर्व व्यवहारांत परमात्मस्वरूपच सर्वत्र ओतप्रोत व्यापून असलेलें त्यास अनुभवास येतें. ॥ २२ ॥

दृष्टान्तपूर्वक पुन्हा श्रीज्ञानराज सांगतातः—

तमातें घ्यावया । उचलूनि सहस्र बाहिया ।
शेवटीं रवि इया । हाचि जैसा ॥ २३ ॥

पदयुक्त भावार्थ—' सहस्र बाहिया '–हजारों बाहु, किरणें ' उचलूनि '–उभारून, पसरून ' रवि '–सूर्य ' तमातें घ्यावया '–अंधारास घ्यावयास गेला, तर ' इया '–यांत शेवटीं 'हाचि जैसा'–त्याचा तोच जसा प्रकाशमय उरतो. ॥२३॥

स्वप्नींचिया विलासा । भेटईन इया आशा ।
उठिला तंव जैसा । तोचि मा तो ॥ २४ ॥

पदयुक्त भावार्थ—' स्वप्नींचिया '—स्वप्नांतल्या 'विलासा'—स्त्रीविलासाची ' भेटईन '—मला भेट होईल, प्राप्ति होईल 'इया आशा'—या आशेनें 'उठिला'—उठून जागा होऊन पाहूं लागला ' तंव '—तेव्हां 'मा'—मग 'जैसा'—जसा ' तोचि तो '—त्याचा तोच असतो. ॥ २४ ॥

तैसा उदैलया निर्विषयें । ज्ञानी विषयी हों लाहे ? ।
तंव दोन्ही न होनी होये । काय नेणों ॥ २५ ॥

पदयुक्त भावार्थ—' तैसा '– त्याप्रमाणें ' निर्विषयें '– निर्विषयपरमात्मस्वरूप ' उदैलया '–प्रगट होऊं लागलें असतां, तें अनुभवरूपानें दिसूं लागलें असतां ' ज्ञानी '– ज्याला परमात्मस्वरूपाची प्रत्यक्ष प्राप्ति झालेली असा ज्ञानी पुरुष ' विषयी '– द्वैतरूपानें विषय पाहणारा ' हो लाहे ? '– होऊं शकेल काय ! ' तंव '– (तो) तर ' दोन्ही '– विषय, जें जगत् व ' विषयी '– त्या जगतास दृश्यत्वानें पाहणारा हें ' न होनी '– हे दोन्ही भाव न होऊन ' होये '– या दोन्ही भावांच्या अतीत होतो; ' काय '– म्हणून ती अवस्था काय असते, ' नेणों '– हें समजणारें नाहीं. कारण तें अनिर्वचनीय स्वरूप होय. ॥ २५ ॥

असा हा ब्रह्मनिष्ठपुरुष व्यवहार करीत असतांना त्याची स्वस्वरूपाची एकतानता कशी असते व त्या स्थितीची योग्यता केवढी असते, हें अधिक स्पष्ट करतात:—

चंद्र वेंचूं गेला चांदिणें । तंव वेंचिलें काय कोणें ।
विऊनि वांझे स्मरणें । होती जैसीं ॥ २६ ॥

पदयुक्त भावार्थ— चंद्र (स्वतांचें) चांदिणें ' वेंचूं गेला '– गोळा करण्यास गेला तर (चंद्र व चांदणें हीं दोन्ही एक असल्यामुळें) तेथें निराळेपणानें तें चांदणें ' कोणें काय वेंचिलें '– तें मग (कोणास) (त्या चंद्रास) कसें उपभोगतां येईल ? ' स्मरणें '– मनोरथ, मनांतल्या कल्पना ' विऊनि '– उत्पन्न होऊन ' जैसीं वांझें होतीं '–त्या जशा निष्फळ होतात. ॥ २६ ॥

सुबोधविवरण—चंद्र व चांदणें हीं दोन्ही एकच असल्यामुळें तिथें चंद्रानें आपलें चांदणें वेंचून तें तो निराळेपणानें उपभोगूं लागला तर त्यांत कोणीं काय उपभोगलें म्हटलें तर कांहींच नाहीं. पोकळ मनोरथ हे जसे उत्पन्न होऊन व्यर्थ ठरतात. जरी त्या मनोरथांतल्या स्थितींत पुष्कळ गोष्टींचा व्यवहार होत असतो, हें जरी खरें असलें तथापि त्यांतले विषय, जे पदार्थ त्यांचा भोक्ता

व त्यांचा उपभोग म्हणजे प्रत्यक्ष त्यांतला अनुभव हें कांहींच निराळें घडत नसतें; त्याप्रमाणें ब्रह्मनिष्ठ ज्ञानी सर्व विषय आपणासह ब्रह्मरूप पाहात असतो. ज्याप्रमाणें चंद्र व त्याचें चांदणें हे जरी भोक्ता व भोग्य असे दोन व्यवहार दिसण्यांत निराळे दिसले तरी खरोखरीच त्याच्या ठिकाणीं या भोक्ता–भोग्यांच्या व्यवहाराचें भानच नसतें; तसेंच लौकिकांत त्याचे भोक्ता–भोग्याविषयींचे व्यवहार जरी चालूं असलेले दिसत असले तरी खरोखर विचारदृष्ट्या अशा व्यवहाराचें त्यास भानहि नसतें अशी ही लोकविलक्षण जीवन्मुक्त स्थितप्रज्ञ अशा ब्रह्मनिष्ठाची स्थिति असते. या सर्वमय स्थितीमुळें त्याला आतां कांहीं एक प्राप्त करावयाचें उरलेलें नसतें.

अशी ही स्थिति किती श्रेष्ठ असते, याचें वर्णन महाराज ३१ व्या ओवीपर्यंत करीत आहेत, तें असें:—

प्रत्याहारादि अंगीं । योगें आंग टेकिलें योगीं ।
तो जाला इये मार्गीं । दिहाचा चांदु ॥ २७ ॥

पदयुक्त भावार्थ—चित्तवृत्तीच्या निरोधरूप 'योगी' – योगांतल्या 'प्रत्याहारादि'–यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि अशा 'अंगीं'–अंगांनीं युक्त असलेल्या 'योगें'–योगानें 'आंग टेकिलें'–इयें हात टेकिलेले असतात. कारण 'तो'–तो योग 'इये मार्गीं'–या साध्य–साधनातीत केवळ सहजावस्थेच्या बोधस्वरूपांतल्या या स्वानंदमय मार्गांत तो हठयोगांतला समाधियोग हा 'दिहाचा चांदु'–दिवसाच्या चंद्राप्रमाणें 'जाला'–निस्तेज होतो. कारण ब्रह्मनिष्ठाच्या सहजास्थितीपुढें त्या हठयोगाची प्रतिष्ठा नाहीं. "हकारेण बहिर्याति ठकारेण विशेत् पुनः ॥ हठयोश्च समत्वेन हठयोगो निगद्यते ॥" असें हठयोगप्रदीपिकेंत श्रीमच्छेंद्रनाथांनीं म्हटलें आहे कीं नाकांतून बाहेर जातो तो हकार वायु व आंत जातो तो ठकार अशा या अपान-प्राणांच्या संयोगांतल्या निश्चलत्वास 'हठयोग' म्हणतात. 'प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ' असें श्रीगीतेंतल्या अ. ५।२७ मध्यें आहे. त्याप्रमाणें इयें या विदेह अमनस्क अवस्थेंत हठयोगास कांहींच महत्त्व उरलेलें नसतें. ॥ २७ ॥

येथ प्रवृत्ति बहुडे जिणें । अप्रवृत्तीसी वाधावणें ।
आतां प्रत्यङ्मुखपणें । प्रचारु दिसे ॥ २८ ॥

पदयुक्त भावार्थ—या सहजावस्थेंत 'प्रवृत्ति'–मनाची जी धाव तिचें 'जिणें'–(जिवंतपणा) अस्तित्व 'बहुडे'–लय पावतें; 'अप्रवृत्तीसी'–निवृत्ति

अमनपण तें 'वाधावणें'–वृद्धि पावतें, वाढतें; 'आतां'–अशावेळीं 'प्रचारु'–त्याचें सर्व आचरण 'प्रत्यङ्मुखपणें'–अन्तर्निष्ठतेचें दिसून येत असतें. म्हणजे ब्रह्मनिष्ठाचा सर्व व्यवहार अन्तर्मुख झालेला असतो. ॥ २८ ॥

आतां अन्तर्निष्ठा कशी असते ? तर :—

द्वैत दशेचें आंगण । अद्वैत ओळगे आपण ।
भेद तंव तंव दुण । अभेदासी ॥ २९ ॥

पदयुक्त भावार्थ—'द्वैत दशेचें आंगण'–दुजेपणाचें जें बाह्यस्वरूप तें तर 'अद्वैत'–जें ऐक्यपणानें आपण स्वतांच 'ओळगे'–बनत असतें. म्हणजे या महापुरुषाची शारीरिक हालचाल, मनाचें स्फुरण, बुद्धीची जाणीव हीं सर्व स्वरूपीं स्थिर होऊन जातात म्हणून त्याची हालचालरहित स्थिति होते. त्यामुळें जों जों 'भेद'–द्वैत 'तंव तंव'–तों तों 'अभेदासी दुण'–अभेदाचीच वाढ होत असते. याचा भावार्थ असा कीं खाणें, पिणें, उठणें, बसणें हे सर्व त्याचें व्यवहार द्वैत भावाचे होत असलेले बाहेरून जरी दिसत असले तरी त्या पुरुषाचें अंतरंग, अन्तर्बाह्यस्थिति जी ब्रह्ममय सर्वरूपपरायणता ती अशी अभेद-रूपाचीच होत असते. ॥ २९ ॥

कैवल्याही चढावा । करीत विषयसेवा ।
झाला भृत्यु भज्य कालोवा । भक्तीच्या घरीं ॥ ३० ॥

पदयुक्त भावार्थ—'विषयसेवा'–त्याचें विषयांचें सेवन 'कैवल्याही'–मोक्षावरहि 'चढावा'–ताण करीत असतें. 'भृत्यु'–भक्त व 'भज्य' देव हे दोन्ही भाव 'भक्तीच्या घरीं'–या अभेदभक्तीच्या घरांत 'कालोवा झाला'–एकरूप होतात. देहभानविवर्जित, प्राणस्पंदनरहित मनःसंकल्पातीत नेणिवेंतल्या अशा या उन्मनी स्थितींत देवभक्तांच्या एकरूपतेंतली परमप्रेमरूप ही भक्ति असते. ॥ ३० ॥

घरामाजीं पायें । चालतां मार्गुही तोचि होये ।
ना बैसे तरी आहे । पावणेंचि ॥ ३१ ॥

पदयुक्त भावार्थ—घरामध्यें त्याचीं पावलें पडत असतां तीं पावलें व तो मार्गहि तो आपणच; 'ना'–अथवा 'बैसे तरी'–बसला तरी 'पावणेंचि आहे'–पोहोंचण्याचोंहि ठिकाण तें आपणच. ॥ ३१ ॥

या ब्रह्मनिष्ठ पुरुषाच्या सहजावस्थेंतल्या बैठकीचें श्रीज्ञानेश्वरमहाराज आतां वर्णन करतातः—

तैसें भलतें करितां । येथें पाविजे कांहीं आतां ।
ऐसें नाहीं, न करितां । ठाकिजे, ना ॥ ३२ ॥

पदयुक्त भावार्थ—' तैसें '—त्याप्रमाणें 'भलतें करितां'—तो पुरुष वाटेल तें जरी करीत असला तरी ' येथें '—यांत ' आतां '—या (निर्विकार ब्रह्मरूप अभेद स्थितींत) वेळीं 'कांहीं पाविजे'—त्याला कांहीं एक साधनानें प्राप्त करून घ्यावयाचें ' ऐसें नाहीं '—असेंहि नाहीं, 'न करितां'—त्यानें कांहीं न केलें तरी त्याला कांहीं प्राप्त करावयाचें ' ठाकिजे '—राहिलें, ' ना '—असेंहि नाहीं. ॥ ३२ ॥

आठवु आणि विसरु । तयातेही घेऊं नेदी पसरु ।
दशेचा वेव्हारु । असाधारणु ॥ ३३ ॥

पदयुक्त भावार्थ—'आठव आणि विस्मरण'—यानांहि 'पसरु घेऊं नेदी'—अवसर होऊं देत नाहीं, अवसर मिळत नाहीं, ' असा दशेचा '—अशी या अवस्थेंतली ' असाधारणु '—ही विलक्षण अलौकिक ' वेव्हारु '—वर्तणूक होय. ॥३३॥

जाली स्वेच्छाचि विधि । खैर झाला समाधि ।
दशे ये मोक्षसिद्धि । बैसों घापे ॥ ३४ ॥

पदयुक्त भावार्थ—'स्वेच्छाचि'—स्वतांच्या ठिकाणीं उठणारी स्फूर्ति, प्रेरणा ' विधि ' तें—त्याचें शास्त्रयुक्त आचरणच 'जाली'—होत असतें. 'स्वैर'—सहज जी हालचाल ती तर ' समाधि '—केवल निश्चलपणाचीच स्थिति ' झाला '—होते. ' ये दशे '—ह्या दशेचे, या समाधिस्थितीचें, या सहजावस्थेचें ' मोक्षसिद्धि '—जें जीवन्मुक्तीचें ऐश्वर्य तें ' बैसों घापे '—ती बैठक बसवीत असतें. ॥ ३४ ॥

सुबोधविवरण—ब्रह्मनिष्ठ पुरुषाचें सर्व कांहीं स्वदेहासुद्धां अन्तर्बाह्य सर्व परब्रह्मरूपच होऊन जात असल्यामुळें त्याचें तें वर्तनहि सहजस्थितीचें देहभानविवर्जित जाणीवनेणीवरहित होत असतें, असा श्रुतिशास्त्रसिद्धान्त आहे. या अभिप्रायानेंच भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं या प्रकरणाच्या आरंभीं ब्रह्मनिष्ठाच्या या ' अफूट '— अद्वैत अशा ब्रह्मरूपस्थितींत भोक्ता आणि भोग्यविषय एक होऊन गेलेले असतात, असा उपक्रम केला आहे. सर्वच परब्रह्मरूप असा अनुभव उदित होतो म्हणून ब्रह्मनिष्ठ ज्ञानीजनाच्या हातून कर्म होतें, तें निष्काम होत असतें. कारण देहभानरहित अशा ज्ञानवानाचें नेणिवेंतून होणारें तें कर्म

अभावरूप असतें असें ब्रह्मसूत्रकार भगवान् व्यासमुनि व सूत्रभाष्यकार भगवान् श्रीमत् आद्यशंकराचार्य यांनीं अनेक प्रकारांनीं प्रतिपादन केलें आहे. शिवाय कर्म व ज्ञान यांच्या फलांतहि विरोध आहे. कर्माचें फल ब्रह्मलोकप्राप्तीपर्यंतचें व अनित्य अशा संसारभोगाचें, तर आत्मज्ञानानें झालेल्या स्वस्वरूपप्राप्तीचें फल नित्यमोक्षाचें, परमानंदसुखभोगाचें आहे. वर्ण, आश्रम, वय, अवस्था हे देहधर्म आत्म्यावर आरोपित केल्यानें म्हणजे त्यावर ते लादल्यानें व आत्म्याचें अमरत्व, नित्यसुखरूपता हे धर्म देहावर लादले गेल्यामुळें हा अध्यास, हा अन्योन्याश्रय, ही भ्रांति ज्यास असेल, त्यासच शास्त्र कर्माचें विधान करतें, व तोच आपणास कर्ता, भोक्ता असें समजतो. ही अध्यासभ्रांति ब्रह्मनिष्ठास नसते. अविद्येमुळें म्हणजे स्वस्वरूपविसराच्या योगानें शरीरादिकांच्या ठिकाणीं ज्याची आत्मबुद्धि आहे, त्यानें तोंपर्यंत कर्म करणें आवश्यक आहे. सर्व विश्व ब्रह्मरूप दिसत नाहीं, तोंपर्यंत त्यानें दृढ उपासना करणें. पण अपरोक्ष ब्रह्मसाक्षात्कारानंतर तिच्या दृढीकरणासाठीं आत्मानुसंधान अहर्निश एकसारखें ठेवावें लागतें— " पूर्णवृत्तिर्हि पूर्णत्वं सदा पूर्णत्वमभ्यसेत् यथा शुकाद्याः सनकादयः ॥" असें श्रेष्ठांचें वचन आहे. निद्रा, तंद्रा, आलस्य, नादश्रवण, तेजोदर्शन, भोगलालसा इत्यादि संस्कार आतां तीं विघ्नें म्हणून या अभ्यासांत तीं टाळून झाल्यानंतरची स्थिति कशी, तें श्रीज्ञानराज सांगतात कीं—

" तैसें भलतें करितां । येथें पाविजे कांहीं आतां ।
ऐसें नाहीं, न करितां । ठाकिजे, ना ॥ ३२ ॥ "

यांतील भावार्थ असा कीं अकर्ता, अभोक्ता अशा या ब्रह्मनिष्ठ पुरुषाचा व्यवहार कधीं तो भिक्षादि असा लौकिक व्यवहार होईल, तर कधीं तो जपध्यानादि शास्त्रीय व्यवहाराचा होईल. कधीं तर हिंसादि निषेध व्यवहारहि प्रारब्ध कर्मानुसार होईल किंवा लोकांवर अनुग्रह करण्याची दैवी स्फूर्ति उठल्यास त्याचें तेव्हां शास्त्रीयमार्गाचें असें आचरणहि होईल. म्हणून ब्रह्मनिष्ठाच्या हातून अमुकच रीतीचा व्यवहार होईल याचा नेम नाहीं. तो तर सर्वथा कृतकृत्यच झालेला असतो, अशा अभिप्रायानेंच ही ओंवी लिहिली आहे. तसेंच " आठवु आणि विसरु " असें हा या महात्म्यास आपल्या स्वरूपाचा ' आठव ' म्हणजे ज्ञान असतें असेंहि नाहीं, तसेंच विस्मरणरूप अज्ञान त्यास आहे, असेंहि नाहीं. तर आठव आणि विसर या दोन्ही भावांविरहित अशा सहजस्थितींत तो असतो. दोघां मित्रांपैकीं एकानें दुसऱ्यास विचारलें कीं तुम्ही कोण ? ' मी ब्राह्मण '. तर

मग सकाळपासून 'मी ब्राह्मण आहें' असें तुम्हांस त्याचें स्मरण होतें का? 'नव्हतें'—असें त्यानें उत्तर दिलें. त्यास मित्रानें पुन्हा विचारलें कीं, 'मी ब्राह्मण आहें—याचें तुम्हांस विस्मरण झालें होतें का?' तर नाहीं, असें त्यानें सांगितलें. तर मग 'तुम्हीं मी ब्राह्मण आहें असें कसें सांगितलें?' त्यानें उत्तर दिलें कीं मी जर शुद्ध ब्राह्मणच आहें, तर मला आठवणीची आणि विस्मृतीची जरूर काय? अशा स्मरणविस्मरणरहित तो जसा आपल्या सहज ब्राह्मणपणाच्या स्थितींत असतो, त्याप्रमाणें 'मी देही आहें' ह्या स्वरूपविस्मरणाच्या नाशाकरितां 'मी ब्रह्म आहें' अशा उपाधिकृत घेतलेल्या स्मरणानें त्या विस्मरणाचा नाश करून त्या दोहींचा म्हणजे त्या आठव आणि विसर यांचा पसर न होतां, त्यांना अवसर न मिळतां या ब्राह्मणाच्या प्रमाणें स्वरूपाच्या ठिकाणीं ज्ञानाज्ञानरहित अशा विलक्षण सहजास्थितींत तो असतो, हें 'आठवु आणि विसरु' या ओंवीचें तात्पर्य होय. याचें अधिक स्पष्टीकरण ज्ञानेश्वरींत आलें आहे ते असें:—

"दीपातें दीपें प्रकाशिजे। तें न प्रकाशणेंचि निपजे। तैसें कर्म मियां कीजे। तें करणें कैंचें॥" (ज्ञाने. १८।५५।११७६) "कर्महीं करितचि आहे। जैं करावें हें भाष जाये। तैं न करणेंचि होये। तयाचें केलें॥ (१८।५५।११७७)" "क्रियाजात मी जालेपणें। वडे कांहींचि न करणें। तयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें॥ (१८।५५।११७८)" "म्हणौनि करि तयाहि बोजा। तें न करणें कपिध्वजा। निपजे तया महापूजा। पूजी तो मातें॥ (१८।५५।११७९)" "एवं तो बोले तें स्तवन। तो देखे तें दर्शन। अद्वया मज गमन। तो चाले तेंची॥ (१८।५५ ११८०)" "तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जप माझा। तो निजे तेचि कपिध्वजा। समाधी माझी॥ (१८।५५।११८१)"

आत्मसाक्षात्कारानंतर देहपातापर्यंत अमुक एका रीतीनें त्याचा व्यवहार होईल असा नियम नाहीं, तर प्रारब्धाप्रमाणें वासनादिक उत्पन्न होऊन त्याचें तें मात्र आभासिक कर्म होईल. परमात्मज्ञानसाक्षात्कारामुळें सर्व दृश्यमात्र ब्रह्मरूपच होत असतें म्हणजे दृश्य दिसत असतांहि तें नाहींच, तो मृगजळासारखा आभास होय. चंचलतारूप विक्षेप हा अन्तःकरणाचा धर्म जसा, तशीच निश्चलतारूप समाधीहि अन्तःकरणाचाच तो धर्म होय. म्हणून ब्रह्मनिष्ठास विक्षेप आणि समाधि दोन्ही समानच. कारण तो अन्तःकरणधर्मरहित असा असतो. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर देहपातापर्यंत त्याच्या ठिकाणीं शास्त्रीय कर्माचा असंभव होतो हें शास्त्रांत प्रतिपादन केलेलें असलें तरी त्याच्याकडून स्नान, शौच, भिक्षा इत्यादि

देहाचीं कर्में घडत असतातच, असा श्रेष्ठांचा अनुभव आहे. आतां जो पुरुष ब्रह्मज्ञानाचा विचार करण्यामध्यें गुंतला आहे, त्याला अशुभ वासना प्रतिबंध करीत असतात. म्हणून त्या वासनांच्या निरोधाकरितां कर्म व उपासना हीं त्याला आवश्यक आहेत. त्यांच्या आचरणांनीं अशुभ वासनांचा संस्कार नाहींसा होतोच असा नियम जरी नाहीं, तथापि ब्रह्माचें अपरोक्षज्ञान त्याचें दृढ होईपर्यंत त्याला कर्म–उपासना–विषयींचें आचरण करण्याची शास्त्राची आज्ञा आहे. त्याच्या ठिकाणीं जाति, आश्रम, देह, गेह यांचें भान जोंवर आहे म्हणजे देहभानाविवर्जित अशी अवस्था त्याला जोंवर प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत शास्त्रोक्त कर्म व उपासना हीं त्यास कर्तव्य आहेत. पण जीवन्मुक्तांच्या आचारांत मात्र एकवाक्यता अशी कधींच नसते. कारण मुनि नारदांची कलहप्रियता तर भगवान् श्रीकृष्णाची भोगलालसा; दुर्वासांची क्रोधातिशयता, वसिष्ठमुनींची कर्मप्रवृत्ति, राजा जनकाची राज्यकारभारदक्षता, शुकाचार्यांचें अत्युत्कट वैराग्य याप्रमाणें ब्रह्मनिष्ठांचें प्रारब्ध विचित्र असल्यानें त्यांच्या प्रारब्धकर्माच्या व्यवहाराविषयींचा नियम नसतो. आत्मसाक्षात्कारामुळें त्यांचे संचित व क्रियामाण हीं जरी भोगरूप होत नसलीं तरी त्यांचें प्रारब्ध मात्र भोगरूप असतें. तो शारीरिक व्यवहार त्याचा कसा चालतो तर भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात कीं, त्या वर्तनामध्यें त्याला जी इच्छा उत्पन्न होईल तोच त्याचा विधि; स्वैरवर्तन, तीच त्याची समाधि, अशा त्याच्या त्या सहजस्थितीची योग्यता काय सांगावी? मोक्षाचें ऐश्वर्य म्हणून जें कांहीं म्हणतात तें या सहजस्थितीचें बस्कर होय. यावरून ज्ञानी जीवन्मुक्ताच्या शारीरिक वर्तनाविषयींचा नियम नाहीं. व्यवहारांतल्या अतिशय हानीच्या दुःखप्रसंगींसुद्धां ब्रह्मनिष्ठ पुरुषास आपल्या सच्चिदानंद-स्वरूपाची यत्किंचतहि विस्मृति नसते. नाटकांतल्या वेषधाऱ्याच्या दुःखाचा आलाप कितीतरी आवेशाचा होत असला तरी त्याचा परिणाम त्याच्या मनावर यत्किंचितहि नसतो; इतकेंच नव्हे तर त्या वेषानुरूप दुःखाचा तो आलाप योग्य रीतीनें उठावदार होण्यांतच त्याला अधिक संतोष होतो. तसेंच या जीवन्मुक्तांचें आचरण असतें. अगदीं अलीकडच्या काळांतली प्रत्यक्ष घडलेली गोष्ट, कीं नागपूर येथील एका अतिशय संपन्न पुत्रपौत्रादिकांनींयुक्त अशा जीवन्मुक्त पुरुषाच्या घरीं मध्यरात्रीच्या सुमारास चौघां चोरांनीं चौथ्या मजल्याच्या गच्चीच्या दारांतून जिन्यानें खालील दुसऱ्या मजल्यांत प्रवेश मिळवून तेथल्या तिजोरींतल्या पैशांच्या मोटा बांधून खालच्या मजल्यांतल्या जिन्यानें

खालीं उतरून अंगणांतला दरवाजा उघडून ते तिघेजण बाहेर पडले. तळमजल्यांतल्या ओटीवरील झोपाळ्यावर मुख्य वृद्ध घरमालक ध्यानस्थ बसलेले होते. चौथा जो चोर तो ती रुपयांची मोट यांच्या समोरून घेऊन जात असतांच ती भप्पदिशीं आदळली ती त्यांच्या अगदीं पायाशींच. तरीसुद्धां स्वतांच्या त्या देहविस्मृतींत त्यांनीं त्याची ती मोट त्याला उचलून देण्यांत साहाय्य केलें व तो चोर सरळ निघून गेला. हे आपले होते तसे पुन्हां ध्यानस्थच राहिले. एवढी मोठी निश्चलता त्यांची ती कीं जो तो चोरहि भगवद्रूप. चोरीचा तो पदार्थहि श्रीहरिरूप. अशी त्यांची ती निर्विकार अभेदास्थिति झालेली. सर्वच अवस्थेंत ब्रह्मनिष्ठ हा आपल्या स्वरूपाच्या ठिकाणीं तन्मय झालेला असतो. म्हणूनच महाराजानीं सर्व शास्त्राभिप्राय विचारांत घेऊन स्थितप्रज्ञाच्या शरीरव्यवहाराचें वर्णन केलें आहे.

अशा ब्रह्मनिष्ठाच्या सहजास्थितीचें वर्णन श्रीज्ञानराजांनीं आणखी दृष्टान्तपूर्वक ६४ वें ओवीपर्यंत केलें आहे, तें असें :—

झाला देवोचि भक्तु । ठावोचि झाला पंथु ।
होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हें ॥ ३५ ॥

पदयुक्त भावार्थ— (अशा ऐक्यभावाच्या स्थितींत) 'भक्तु देवोचि झाला'—भक्त देवरूप होतो, हा असा भक्त अभेदस्थितीचा होतो. 'पंथु' (पंथ)—मार्ग 'ठावोचि'—मुक्कामाचें ठिकाण 'झाला'—होतो. अशा स्थितींत 'हें विश्वचि'—हें सर्व ब्रह्मांड 'एकांतु होऊनि ठेला'—त्याला एकमय, परब्रह्मरूप होऊन गेलेलें असतें.

सुबोधविवरण—या सहजावस्थेंतल्या परब्रह्ममय व्यापक स्वरूपांत सर्व दृश्य जगत् मिथ्या स्वप्नवत् म्हणजे दिसत असूनहि तें नाहींच नाहीं, पूर्ण अभावरूप भासत असतें. मग त्यामध्यें ईश्वरोपासना तेवढी सत्य मानून तिच्या विषयींची मात्र पूज्य बुद्धि आणि निषिद्धकर्माविषयीं द्वेषबुद्धि असें या अभेदस्थितींत कांहीं एक उरतच नाहीं. जिथें देहभानच नसतें, तिथें तर 'तैसी क्रिया कीर न साहे । तन्हीं अद्वैतीं (प्रेम) भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें, नव्हे । बोला ऐसें ।' (ज्ञाने. १८ । ५५ । ११५१) लोकराज्यसेवा करीत असतांना त्या राज्यसेवेच्या नियमांचें पालन करणें हें जितकें अवश्य असतें, तितकें त्या राज्यसेवात्यागानंतर तें अवश्य जसें नसतें तद्वतच हें. ॥ ३५ ॥

भलतेउतेनि देवें । भलतेन भक्त होआवें ।
बैसला तेथें राणिवें । अकर्मु हा ॥ ३६ ॥

पदयुक्त भावार्थ—'भलतेउतेनि '– कांहीं कांहीं वेळीं, केव्हां केव्हां या ब्रह्मनिष्ठाची स्थिति तर त्यानें 'देवें '–देवरूपणानें 'होआवें '–होऊन असावें, तर 'भलतेन '– केव्हां केव्हां, कधीं कधीं 'भक्त होआवें '–भक्त होऊन असावें असा 'हा अकर्मु '–हा अक्रिय 'तेथें '–तेथल्या, परमात्मस्वरूपांतल्या 'राणिवें'– ऐश्वर्यांत 'बैसला '– एकरूप झालेला असतो. ॥ ३६ ॥

देवाचिया दाटणीं । देउळा झाली आटणी ।
देशकाळादि वाहाणीं । येईच ना ॥ ३७ ॥

पदयुक्त भावार्थ— 'देवाचिया '– या अद्वितीय परमदेवस्वरूपाच्या 'दाटणीं '– विस्तारांत, व्यापकपणांत 'देउळा '– अनंतकोटिब्रह्मांडमय विश्वरूप देवळाचा मुंगीपासून वैकुंठापर्यंतच्या साकारतेचा 'आटणी '– संकोच 'झाली '– होऊन गेला असल्यानें 'देशकाळादि '– (हा चिन्मात्र, निर्विकार, अभेदरूप परमात्मादेव) 'वस्तुनिर्देश '– हा अमुक वस्तूंत, 'देशनिर्देश '–अमुक देशाच्या ठिकाणीं, 'कालनिर्देश '– अमुक कालांत असतो, असा निर्देश म्हणजे तिकडे बोट करून दाखविण्याच्या 'वाहाणीं '– प्रवाहांत, वर्णनांत 'येईच ना '– तो येतच नाहीं. ('मासाब्दयुगकल्पेषु गतागम्येष्वनेकधा । नोदेति नास्तमेत्येषा संविदेका स्वयंप्रभा ॥ ' असें या परब्रह्मदेवाविषयीं परमहंस विद्यारण्यस्वामी आपल्या पंचदशीग्रंथामध्यें म्हणतात कीं 'मास '– अनंत महिने, 'अब्द '– वर्षे, युगें, कल्प 'गत '– मागें गेलेले, 'आगम्य '– पुढें येणारे 'अनेकधा '– अनेक वेळा यांमध्यें 'न उदेति '– उत्पन्न होत नाहीं, 'न अस्तम् एति '– नाश पावत नाहीं, कोण ? 'एषा संवित् '– ही चित्कला, जी 'एका '– एकमेव, एकच एक 'स्वयंप्रभा '– निजज्ञान प्रकाशरूप.) ॥ ३७ ॥

देवीं देवोचि न माये । मा देवी कें अन्वयो आहे ।
येथ परिवारु बहुये । अघडता कीं ॥ ३८ ॥

पदयुक्त भावार्थ—'देवोचि '– हा असा अनन्त, परमात्मादेव 'देवीं '– आपल्या देवस्वरूपांत 'न माये '– जो आपणच मावत नाहीं, 'मा '– मग तिथें 'देवी '– देवीचा 'अन्वय '– शिरकाव 'कें आहे '– कोठून असणार ! 'येथ '– अशा स्थितींत तर 'बहुये परिवारु '– त्या अनेक देवदेवतांचा समुदाय

'अघडता कीं'– मुळीं घडतच नाहीं. यांतील भावार्थ असा कीं परमात्म-स्वरूपाविषयींचा एकदेशीय भेदभाव निवृत्त होऊन त्या स्वरूपाच्या व्यापक अनुभूतीच्या प्रत्यक्ष प्रातीच्या समरसतेंतल्या अफाट अवस्थेंत माया व माया-कार्याचा तसेंच देहभावाचा संभवच राहात नाहीं अशी ही सिद्धज्ञानास्थिति होय. ॥ ३८ ॥

ऐसेयाहि स्वामीभृत्यसंबंधा– । लागीं उठली श्रद्धा ।
तैं देवोचि नुसधा । काम विजे ॥ ३९ ॥

पदयुक्त भावार्थ—'ऐसेयाहि'–अशाहि स्थितींत 'स्वामीभृत्यसंबंधा'–स्वामी–देव व भृत्य–भक्त 'संबंधालागीं'–या संबंधाची 'श्रद्धा उठली'–आवड, स्फूर्ति उत्पन्न झाली, 'तैं'–तर (देव व भक्त अशा द्वैतांतल्या भक्तिसुखाचा सोहळा भोगावा अशी स्फूर्ति उठली असतां) 'देवोचि'–तो (जो व्यापक परमात्मा) देवच 'नुसधा'– आपण स्वतांच 'काम'– त्या त्या सिद्धांच्या इच्छानुरूप त्यांच्या त्यांच्या श्रद्धानुरूप 'विजे'–बनतो, तसा तसा होतो. ॥३९॥

अवघिया उपचारा । जपध्यान निर्धारा ।
नाहीं आन संसारा । देवोवांचुनी ॥ ४० ॥

पदयुक्त भावार्थ—'अवघिया उपचारा'–मग अवघे, सर्व सोहळे, जप, ध्यान 'निर्धारा'–ही निष्ठा 'संसारा'–हे (सर्व) प्रकार 'देवोवांचुनि'–सर्वत्र एक त्या परमात्मस्वरूपदर्शनाहून 'आन'–निराळेपणानें 'नाहीं'–प्रतीत होत नसतात, सर्व कांहीं अभेदरूप, भिन्न भिन्न भावांविरहित होऊन जात असतें. ॥४०॥

आतां देवातेचि देवें । देववरी भजावें ।
अर्पणाचेनि नांवें । भलतिया ॥ ४१ ॥

पदयुक्त भावार्थ—'आतां'–असल्या या परमसिद्धांच्या एकमय देवरूप अवस्थेंत 'देवें'– स्वतां आपण देवरूप झाल्यानें 'देवातेंचि'– आपल्या देव-रूपालाच 'भलतिया'–सर्वरूप परायणतेच्या सर्वमय भावांतल्या अशा 'अर्पणा-चेनि नांवें'– या सिद्धावस्थेंतल्या आपल्या या देवरूपाला अर्पण करण्याच्या निमित्तानें 'देववरी'– देवाच्या (पूजा) साहित्यानें 'भजावें'– आपलीच देवरूपानें अनेकविध पूजा होत असते. इतक्या अनेक प्रकारांनी या देवमय अवस्थेंतून जरी ती पूजा होत असली तरी या ब्रह्मनिष्ठ सत्पुरुषाच्या अद्वैत-स्थितीचा भंग होत नाहीं. ॥ ४१ ॥

पाहें पां आघवया । रुखा रुखचि यया ।
परी दुसरा नाहीं तया । विस्तारु जेंवि ॥ ४२ ॥

पदयुक्त भावार्थ—' पाहें पां '–हें पहा कीं ' आघवया रुखा '– अवघ्या एका वृक्षांत, एकाच झाडाचें ठिकाणीं ' जेंवि '– जरी ' विस्तारु '– फांद्या, डहाळ्या, पानें, फुलें, फळें इत्यादि विस्तार, पसारा (दिसतो, तरी) ' यया '– या विस्ताररूपानें ' रुखचि '– तो एक वृक्षच (इतक्या सर्व प्रकारांनीं नटतो) ' तया '– त्या ठिकाणीं ' दुसरा परी '– दुसरेपणा ' नाहीं '–नसतो. ॥ ४२ ॥

देव देऊळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरु ।
तैसा भक्तीचा व्यवहारु । कां न व्हावा ? ॥ ४३ ॥

पदयुक्त भावार्थ—' डोंगरु '–एकच डोंगर ' कोरुनि '–त्याच्यांत कोरीव काम करून देव, देऊळ, ' परिवारु '–उपदेवता, देवसभा ' कीजे '–करतात. ' तैसा '–तसा स्थितप्रज्ञाच्या अभेदस्थितीतहि ' भक्तीचा '–या अद्वितीय ज्ञानोत्तर प्रेमरूप भक्तीचा ' व्यवहारु '–विलास कां होऊं नये ? ॥ ४३ ॥

अहो मुगीं मुग जैसे । घेतां न घेतां नवल नसे ।
केलें देवपण तैसें । दोहीं परी ॥ ४४ ॥

पदयुक्त भावार्थ—अहो, ' मुगीं '–मुक्यानें ' मुग घेतां '–मौन धरलें या म्हणण्यांत ' मुग घेतां, न घेतां '– त्याचें तें मौन धरणें, न धरणें ' जैसें नवल नसे '–यांत जसें नवल नाहीं, ' तैसें '–तसें ' दोहींपरी ' –दोन्ही ठिकाणीं, देव, भक्त व परिवार यांमध्यें ' देवपण '– परमात्मरूप ऐक्यच ' केलें '– होऊन गेलेलें असतें, अभेदमय झालेलें असतें. यांत ' पूजा, कांहीं न करणें । सन्निधि, कांहीं न होणें ' असें ज्ञानेश्वरींतल्याप्रमाणें या सिद्धज्ञान्याची देवपूजा असते. ॥ ४४ ॥

अखतांची देवता । अखतींचि असे न पूजितां ।
मा अखतीं काय आतां । पूजों जावी ॥ ४५ ॥

पदयुक्त भावार्थ— ' अखतांची देवता ' – अक्षतांची, तांदळाची देवी, तिची ' न पूजितां '– पूजा न करतांहि ' अखतींचि ' – ती तांदूळरूप, अक्षतारूपच ' असे ' – होते, ' मा ' – मग, आतां ' अखतीं ' – तिला अक्षतांनीं ' पूजों '– पुजून ' काय जावी '– त्यांत अधिक काय होणार ? ॥ ४५ ॥

दीप्तीचीं लुगडीं । दीपकळिके तूं वेढी ।
हें न म्हणतां ते उघडी । ठाके काई ॥ ४६ ॥

पदयुक्त भावार्थ—' दीपकळिके '–हे दिव्याच्या प्रभे, ' तूं दीतीचीं '–तूं प्रकाशाचीं लुगडीं ' वेढी ' – नेस, ' हें न म्हणतां ' – असें तिला म्हटलें नाहीं, तर ' ते ' – ती ' उघडी ठाके काई ' – उघडी राहील काय ? कारण दिव्याची ज्योत व तिचा प्रकाश हीं एकरूपच असतात. ॥ ४६ ॥

कां चंद्रातें चंद्रिका । न म्हणिजे तूं ले कां ।
तऱ्ही तो असिका । तियाचि कीं ना ॥ ४७ ॥

पदयुक्त भावार्थ—' कां '– किंवा ' चंद्रातें '–चंद्राला ' तूं चंद्रिका ले कां '– तूं चांदणें पांघरच ' न म्हणिजे ' – असें म्हटलें नाहीं, ' तऱ्ही ' – तरी सुद्धां तो 'तियाचि'–त्या आपल्या चंद्रिकेनें, त्या आपल्या चांदण्यानें 'असिका'– संपूर्ण ' कीं ना '– असतोच कीं ? असतोच ना ? चंद्र आणि त्याचें चांदणें हीं एकमेकांहून भिन्न नसतात, तीं नित्य अभेदरूपच असतात. ॥ ४७ ॥

आगीपण आगीं । असतचि असे अंगीं ।
मा कासयालागीं । देणें न देणें ॥ ४८ ॥

पदयुक्त भावार्थ—' आगीं '– अग्नीच्या ठिकाणीं ' आगीपण '– उष्णता ' अंगीं '– मूळची ' असतचि असे '– असतेच असते. ' मा '– तर मग ' देणें '– त्याला आंच देणें किंवा न देणें ' कासयालागीं '– हें कशासाठीं, त्याचा उपयोग काय ? ॥ ४८ ॥

म्हणोनि भजतां भजावें । मा न भजतां काय नव्हे ।
ऐसें नाहीं स्वभावें । श्रीशिवुचि असे ॥ ४९ ॥

पदयुक्त भावार्थ— म्हणून ' भजतां ' – या अवस्थेंत भजन करीत असतांनाच काय तें ' भजावें '– भजन होतें; ' मा '– आणि मग ' न भजतां '– भजन न करितां ' काय नव्हे '– मात्र तें होत नाहीं ' ऐसें नाहीं '– असें नाहीं· तर हा ' स्वभावें '– या सहजावस्थेमुळें ' श्रीशिवुचि असे '– श्रीशिवमय असा पूर्णब्रह्मच तो झालेला असतो. ॥ ४९ ॥

आतां भक्ति अभक्ति । ताट झालें एके पांतीं ।
कर्माकर्माचिया वाती । माल्हावूनियां ॥ ५० ॥

पदयुक्त भावार्थ—' आतां '–या पूर्ण अवस्थेंत 'कर्माकर्माचिया वाती'– शास्त्रानें सांगितलेलें तें विहित कर्म व अविहित तें अकर्म हा भेद 'माल्हावूनियां'– नाहींसा होऊन, संपून जातो. तसेंच ' भक्ति, अभक्ति '– भजन करणें, न करणें

हे भाव 'एके पांतीं'– एकाच जागीं, एकाच ओळींत 'ताट झालें'– जेवण घेतात. ते दुजाभावरहित होतात. ॥ ५० ॥

म्हणोनि उपनिषदें । दशे येती निंदे ।
निंदाचि विशदें । स्तोत्रें होती ॥ ५१ ॥

पदयुक्त भावार्थ—'म्हणोनि'–अशी अभेदस्थिति स्वीकारून 'उपनिषदें'–वेदान्तशास्त्र 'निंदे'–निषेध करण्याच्या, हें दृश्य 'न इति न इति'–हें तें नव्हे, हें तें नव्हे अशा 'दशे येती'– स्थितीला पात्र होतें. कारण या दृश्याहून परमात्मा भिन्न नाहीं, हें सर्व दृश्यब्रह्मांड परमात्मस्वरूपच आहे, अशा प्रकारानें दृश्याचा निषेध, ही जी निंदा तीच परमात्म्याची 'विशदें'–व्यापकस्वरूपाचीं 'स्तोत्रें'– स्तुतीच होते. ॥ ५१ ॥

ना तरी निंदास्तुति । दोन्ही मौनासाठीं जाती ।
मौनीं मौन आथी । न बोलतां बोलीं ॥ ५२ ॥

पदयुक्त भावार्थ— 'नातरी'–नाहींतरी खरोखरच, 'निंदास्तुति'– निषेध किंवा स्तुति हीं दोन्ही 'मौनासाठीं'– मौन जें शब्दातीत परब्रह्मस्वरूप 'जाती'–तें तीं होऊन जातात. कारण परब्रह्मस्वरूप 'बोलीं न बोलतां'–शब्दांनीं वर्णन न केलें तरी 'मौनीं'– मूळच्या मौनस्वरूपाच्या ठिकाणीं 'मौन आथी'– तें वर्णनातीत असें मौनस्वरूपच आहे. ती स्वरूपस्थिति सिद्धच आहे. ती परिपूर्णच आहे. ॥ ५२ ॥

घालितां आव्हासव्हा पाय । शिवयात्राचि होत जाय ।
शिवा गेलियाही नोहे । केहि जाणें ॥ ५३ ॥

पदयुक्त भावार्थ—ब्रह्मनिष्ठ पुरुषानें 'आव्हासव्हा'–वाकडे तिकडे 'पाय घालितां'–पाऊल टाकलें तरी ती त्याची शिवयात्राच होत असते. (कोठें कशीहि हालचाल त्याची झाली तरी ती त्याची काशीयात्राच होत असते.)तसेंच 'शिवा गेलियाही'–प्रत्यक्ष शिवदर्शनाला तो गेला असतांहि तें त्याचें 'केहि'– कुठें कांहीं 'जाणें नोहे'–जाणें घडलेंच नाहीं, अशी त्याची अभेदरूप देवभक्तभावविरहित ही सहजावस्था असते. ॥ ५३ ॥

चालणें आणि बैसक । दोन्ही मिळोनि एक ।
नोहे ऐसें कौतुक । इये ठायीं ॥ ५४ ॥

पदयुक्त भावार्थ—चालणें आणि 'बैसक'–बसणें हीं व्यवहारांत दोन्ही मिळून जरी एक 'नोहे'–नसतात, तरी 'इये ठायीं'–या सहजावस्थेंत 'दोन्ही मिळोनि एक'–हीं दोन्ही एकच होत असतात 'ऐसें कौतुक'–असें नवल या स्थितीचें होय. ॥ ५४ ॥

एऱ्हवीं आडोळलिया डोळा । शिवदर्शनाचा सोहळा ।
भोगिजे भलते वेळां । भलतेणें ॥ ५५ ॥

पदयुक्त भावार्थ—'एऱ्हवीं'– एरवीं पाहिलें तर 'भलतेवेळां'–पाहिजे त्या वेळीं, वाटेल तेव्हां 'भलतेणें'–वाटेल त्या निमित्तानें 'डोळा'–दृष्टीला 'आडोळलिया'=(आलोडनानें)–जें जें दिसेल त्यांत 'शिवदर्शनाचा सोहळा'–परमात्मदर्शनाचा आनंद 'भोगिजे'–तो उपभोगत असतो. ॥ ५५ ॥

ना समोर दिसे शिवुही । परी देखिलें कांहीं नाहीं ।
देवभक्ता दोहीं । एकचि पाडू ॥ ५६ ॥

पदयुक्त भावार्थ—'ना'–अथवा 'समोर'–प्रत्यक्ष 'शिवुही दिसे'–त्याचें शिवदर्शनहि चाललें असलें, 'परी'–तरी 'कांहीं देखिलें नाहीं'–त्यांत त्यानें कांहीं एक निराळें पाहिलें होत नाहीं. कारण 'देवभक्ता दोही'–देव व भक्त या दोघांची 'एकचि पाडू'–यांत एकरूपता होत असते. तिथें विभक्तपणा तो नसतोच. ॥ ५६ ॥

आपणचि चेंडू सुटे । मग आपणयां उपटे ।
तेणें उदळतां दाटे । आपणपांचि ॥ ५७ ॥

पदयुक्त भावार्थ—चेंडू हातचा आपोआप आपणच सुटून पडतो, मग 'आपणयां'–तो आपल्या स्वतांच्याच ठिकाणीं, आपल्यामध्यें 'उपटे'–आदळत राहातो. 'तेणें'–आणि त्यामुळें 'उदळतां'–तो उसळून 'आपणपांचि'–आपणांतच 'दाटे'–जरी थांबतो, तरी त्याच्या मूळच्या चेंडूपणांत कांहींच फरक होत नाहीं. ॥ ५७ ॥

ऐसी जरी चेंडुफळी । देखिजे का केव्हेळीं ।
तरी बोलिजे हे सरळी । प्रबुद्धाची ॥ ५८ ॥

पदयुक्त भावार्थ—'ऐसी'– अशा प्रकारची चेंडूफळी जर 'केव्हेळीं'–कधीं 'देखिजे'– कोणीं पाहिली असेल 'तरी'– तर त्यालाच 'प्रबुद्धाची'–

या ब्रह्मनिष्ठाची 'हे सरळी' ही अकर्तेपणाची सहजस्थिति 'बोलिजे'– सांगतां येईल, बोलून दाखवितां येईल. ॥ ५८ ॥

कर्माचा हातु नलगे । ज्ञानाचेंहि कांहीं न रिगे ।
ऐसीचि होतसे आंगें । उपास्ति हे ॥ ५९ ॥

पदयुक्त भावार्थ—ज्या ठिकाणीं कर्माचा 'हातु'– स्पर्श 'न लगे'– होत नाहीं व ज्ञानाचाहि कांहीं मुळींच 'न रिगे'–रिगाव नाहीं 'ऐसीचि'– अशा प्रकारची (ज्ञानी सिद्धाची) 'ही उपास्ति'–ही उपासना 'आंगें'–आपोआपच 'होतसे'– होत असते. ॥ ५९ ॥

निफजे ना निमे । आंगें आंग घुमे ।
सुखा सुख उपमे । देववेल यया ॥ ६० ॥

पदयुक्त भावार्थ—अशी ही उपासना 'निफजे ना'– उत्पन्न होत नाहीं म्हणून 'निमे ना'– नाहींशी होत नाहीं, उत्पत्तिनाशरहित अशी नित्य 'आंगें'– स्वतांच्या ठिकाणीं 'आंग'– स्वतांच 'घुमे'– दंग असते. 'यया सुखा'– अशा ह्या परम सुखाला 'सुख'– इतर सुखाची 'उपमे'– उपमा 'देववेल ?'– देतां येईल काय ? ॥ ६० ॥

कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म ।
योगज्ञानादि विश्राम–। भूमिका हे ॥ ६१ ॥

पदयुक्त भावार्थ— 'कोणी एक'– असें एक 'अकृत्रिम'– सहज, स्वाभाविक 'भक्तीचें'– परमप्रेमस्वरूपाचें 'हें वर्म'– हें लक्षण होय. 'हे'– ही पराभक्ति म्हणजे 'योगज्ञानादि'– योग, ज्ञान, कर्म, उपासना या सर्वांचें 'विश्रामभूमिका'– हें विश्रांतिस्थान, विसाव्याची जागा होय. या परमऐक्यांतल्या एकतेंत कोणतीहि भूमिका, अवस्था नसते. ॥ ६१ ॥

आंगें कीर एक झाले । परी नामरूपाचे मासले ।
होते तेही आटले । हरिहर येथें ॥ ६२ ॥

पदयुक्त भावार्थ— 'येथें'– अशा एकतेमध्यें 'हरिहर'– भगवान् श्रीविष्णु व भगवान् श्रीशिव हे 'आंगें'– स्वरूपानें 'कीर'– खरोखर 'एक झाले'– एकच असलेले खरे; 'परी'– पण उपासनेकरितां 'नामरूपाचे'– त्यांचे ते भिन्न भिन्न नामांचे आणि रूपांचे 'मासले'– प्रकार 'होते'– झालेले 'तेहि'– ते सुद्धां या सहजस्थितींत 'आटले'– एकवटून जातात. ॥ ६२ ॥

अहो अर्धनारीनटेश्वरें । गिळीत गिळीत परस्परें ।
ग्रहण झालें एकसरें । सर्वग्रासें ॥ ६३ ॥

पदयुक्त भावार्थ—अहो, 'अर्धनारीनटेश्वरें' –(अर्ध + नारी + नट + ईश्वरें) अर्धा भाग 'नारी'– स्त्री, अर्धा भाग 'नट'– पुरुष असा ईश्वर, शंकर त्याची शिवशक्तिरूपें हीं 'परस्परें'– एकमेकांस 'गिळीत गिळीत'–दोन रूपांनीं उरूं न देतां तीं दोन्ही 'एकसरें' – एकदांच 'सर्वग्रासें' – एकाच घासांत 'ग्रहण झालें'– नाहींशीं होऊन जावींत अशीं तीं या ब्रह्मनिष्ठास तीं एकरूप होतात. ॥ ६३ ॥

वाच्यजात खाऊनी । वाचकत्वहि पिऊनी ।
ठाकली निदैजोनी । परा येथें ॥ ६४ ॥

पदयुक्त भावार्थ—'वाच्यजात' – शब्दांचे उच्चाराचे प्रकार नाहींसे करून 'वाचकत्वही' – उच्चार करणाऱ्या अशा वाचक ज्या पश्यन्ती, मध्यमा, वैखरी वाचा यांचा वाचकपणाचाहि 'पिऊनि' – घोट घेऊन म्हणजे तिन्ही अवस्थेंतले ते ते शब्द व त्या त्या वाचा यांना नुरवून परा जी नाभिस्थानचि ज्ञानमय स्फुरणरूपवाणी 'येथें' – या स्थितप्रज्ञतेच्या अवस्थेंत 'निदैजोनि ठाकली'–लय पाऊन जात असते. ॥ ६४ ॥

आतां भगवान श्रीसद्गुरु निवृत्तिनाथमहाराजांच्या कृपेनें असली ही सहजस्थिति श्रीज्ञानराजांना लाभली असल्यानें त्यांचे आपल्या श्रीगुरुरायांच्या-बद्दलचे धन्यतेचे उद्गार या आपल्या सहजस्थितींतल्या अत्यानंदाच्या भरांत निघालेले ते असेः—

शिवशिवा समर्था स्वामी । येवढीये आनंदभूमि ।
घेपे दीजे एकें आम्हीं । ऐसें केलें ॥ ६५ ॥

पदयुक्त भावार्थ— 'शिवशिवा' – परमकल्याणस्वरूपा 'समर्था' – धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे सर्व चारी पुरुषार्थ ज्यांच्या ठिकाणीं पूर्णत्वानें असलेल्या 'स्वामी' – परमश्रेष्ठ अशा सद्गुरुराया, आपण 'आम्हीं एकें'– आमच्यासारख्या एकाकडून 'येवढीये' –एवढी 'आनंदभूमि' –परमानंदस्थिति 'घेपे दीजे' –उपभोगली जावी, त्याला ती उपभोगतां यावी 'ऐसें केलें'–असें आपण मला करून ठेवलें आहे. ॥ ६५ ॥

चेतचि मा चेतविलें । निदैलेचि मा निदाविलें ।
आम्हीचि आम्हां आणिलें । नवल जी तुझे ॥ ६६ ॥

पदयुक्त भावार्थ—' चेताचि '–मला मुळांत स्वरूपीं जागा असलेल्यासच आपण ' मा '– आणखी ' चेतविलें '– पूर्ण जागें केलें; ' निदैलेंचि '–अशा निजस्वरूपीं निजलेल्यासच, ' मा '– आणखी ' निदविलें '–सुखमय निद्रेंतलें केलें व असें ' आम्हीचि ' – माझ्या स्वरूपींच ' आम्हां ' – मला ' आणिलें '– आपण आणून सोडलें ' तुझें '– आपलें ' जी ' – महाराज, ' नवल ' – हें नवल होय. ॥ ६६ ॥

आम्ही निखळ मा तुझे । वरी लोभें म्हणसी माझे ।
हें पुनरुक्त साजे । तूंचि म्हणोन ॥ ६७ ॥

पदयुक्त भावार्थ—' आम्ही '–मी ' मा '–तर ' निखळ '–केवळ 'तुझें'-तुमचेंच परमानंदस्वरूप असूनहि ' वरी '–आणखी ' लोभें '–प्रेमानें, प्रेमाच्या आविष्कारांत, स्वानंदभरांत 'माझे'–ज्ञानोबा तूं माझा (आहेस) पुनरुक्त 'म्हणसी'–असें पुन्हा आपण उद्गारतां. ' हें तूंचि म्हणोन '–हें आपल्या वैभवास अनुरूप म्हणून ' साजे '–तें साजेसेंच आहे. ॥ ६७ ॥

कोणाचें कांहीं न घेसी । आपुलेंही तैसेंचि न देसी ।
कोण जाणे भोगिसी । गौरव कैसें ॥ ६८ ॥

पदयुक्त भावार्थ—आपल्या सदैव एकरूपतेंत आपण ' कोणाचें कांहीं न घेसी '–निराळेपणानें उरून दुसऱ्याचें कांहींहि स्वीकारीत नसतां ' तैसेंचि '–तसेंच ' आपुलेंहि न देसी '–आपलीहि ती एकरूपता निराळेपणानें देतां येणारी नाहीं असें असूनहि ' गौरव '–आपल्या ऐश्वर्याचा गुरुशिष्यसोहळा हा तर ' भोगिसी '–आपण उपभोगतां, लीलेनें स्वानंदांतला विलास करतां, ' कैसें '–तर हें कसें होत असतें, ' कोण जाणे ? '–हें कोणास कळणारें आहे ? अशी ही आपली सिद्धस्वरूपांतली अगम्य, अतिमानुष अद्भुतलीला महाराज, कोणास कशी कळेल ? ॥ ६८ ॥

गुरुत्वें जेवढा चांगु । तेवढाचि तारूनि लघु ।
गुरुलघु जाणे जो पांगु । तुझा करी ॥ ६९ ॥

पदयुक्त भावार्थ—'गुरुत्वें'–गुरु या श्रेष्ठपणानें, सद्गुरु म्हणून 'जेवढा'–जितके जसे आपण ' चांगु '–श्रेष्ठ, वजनदार, व्यापक आहांत, 'तेवढाचि'–तसेंच

शिष्याचा अज्ञानदशेंतून 'तारूनि'–उद्धार करण्यांत 'लघु'–सहज लीलेनें तारून नेण्यांत नावेसारखे हलक्या वजनाचे पण आहांत. 'गुरुलघु'–हें आपलें व्यापक व अल्प असें दोन्ही स्वरूपाचें गुरुलघुपण 'जो'–ज्यावर 'तुझा पांगु'–तुमची कृपादृष्टि 'करी'–होईल, 'जाणे'–तोच हें जाणील, त्यालाच हें कळेल. ॥ ६९ ॥

शिष्या देतां वाटे । अद्वैताचा समोह फुटे ।
तरी कांह्या होती भाटें । शास्त्रें तुझी ॥ ७० ॥

पदयुक्त भावार्थ— सद्गुरुमहाराज, आपण 'शिष्या'–शिष्याला 'अद्वैताचा वाटे'–आत्मसाक्षात्काराचा वाटा, आत्मस्वरूपाचें दर्शन करून 'देतां'–देत असतांना 'समोह'–आपलें साम्य, आपली एकरूपता 'फुटे'–भंग पावली असती, ढळली असती, 'तरी'–तर "शास्त्रें"–वेदांनीं 'भाटे'–आपले भाट, स्तुतिपाठक होऊन 'तुझी'–(तुमची) आपली स्तुति 'कांह्या'–का 'होती'–केली असती ? ॥ ७० ॥

किंबहुना ये दातारा । मी तूं याचा संसारा ।
वेंचोनि होसी सोयरा । तेणेंचि तोषें ॥ ७१ ॥

पदयुक्त भावार्थ—'किंबहुना'–फार काय सांगावें ? 'ये दातारा'–जीवन्मुक्तीचें दान देणाऱ्या हे गुरुराया, 'मी तूं याचा'–मी तूं–पणाची 'संसारा'–ही जी अज्ञानदशा हा भेद 'वेंचोनि'–नाहींसा झाल्यानें असा हा मी–तूं पणाचा व्यवहार निरसन झाल्यानें 'तेणेंचि तोषें'–त्या आनंदाच्या योगानें 'सोयरा होसी'–तुम्ही आप्त झाले आहांत, तुमचेशीं आमचें सदोदितचें ऐक्य होऊन गेलें आहे. ॥ ७१ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे जीवन्मुक्तदशाकथनं नाम नवमं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवादरूप परब्रह्म परमात्मस्वरूपाचें ओतप्रोत वर्णन असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें जीवन्मुक्तदशाकथननामक नववें प्रकरण समाप्त.

———

प्रकरण दहावें

ग्रंथपरिहार

(ग्रंथमाहात्म्यासह फलश्रुति)

मागील प्रकरणांत श्रीज्ञानराजांनीं जीवन्मुक्ताची सहजस्थिति कथन केली. हें प्रकरण ग्रंथाचा परिहार म्हणजेच उपसंहारपर म्हणून शेवटचें आहे. यांत ग्रंथाचें माहात्म्य व फलश्रुति वर्णन करून ग्रंथ विश्वात्मक विश्वेश्वराला अर्पण व्हावा या हेतूनें श्रीज्ञानेश्वरमहाराज त्याचा आतां आरंभ करीत आहेत तो असाः—

परी गा श्रीनिवृत्तिराया । हातातळीं सुखविलें तुं या ।
तरी निवांतचि मियां । भोगावें कीं तें ॥ १ ॥

पदयुक्त भावार्थ—'श्रीनिवृत्तिराया गा'–अहो श्रीगुरुनिवृत्तिरायमहाराज, 'तुं'–आपण 'या'–या मला 'हातातळीं'–हाताच्या तळव्यानें, हाताचा तळवा मस्तकावर ठेवून, माझ्या मस्तकावर हात ठेवून, हस्तस्पर्शशक्तीनें 'सुखविलें'–निजसुखमय केलें. 'परी'–(पण) म्हणून 'तें तरी'–तें अनिर्वाच्य आत्मसुख (तो परमानंद) तर 'मियां'–मी स्वतांच 'निवांताचि'–स्वस्थपणें 'भोगावें कीं'–अनुभवावें हें तर खरेंच. ॥ १ ॥

परी महेशें सूर्याहातीं । दिधली तेजाची सुती ।
तया भासा अंतर्वर्ती । जगचि केलें ॥ २ ॥

पदयुक्त भावार्थ—'परी'–पण महाराज, 'महेशें'–(महा+ईश) परमेश्वरानें 'सूर्याहातीं'–सूर्याच्या ठिकाणीं 'तेजाची सुती'–प्रकाशाचा सांठा 'दिधली'–देऊन ठेवला, निर्माण केला; 'तया भासा'–त्या प्रकाशानें 'जगाचि'–सर्व विश्वच 'अंतर्वर्ती'–आंत बाहेर, संपूर्ण 'केलें'–प्रकाशमय झालें यांतील हेतु हा कीं, सूर्यानें स्वतां तर त्या प्रकाशाचें सुख घेत राहून तेंच सर्व विश्वालाहि सतत लाभावें. ॥ २ ॥

चंद्रासि अमृत घातलें । तें तयाचि कायि येतुलें ।
कीं सिंधु मेघा दिधले । मेघाचि भागु ? ॥ ३ ॥

पदयुक्त भावार्थ—'चंद्रासि अमृत घातलें'–चंद्राला अमृतासारखा शांत शीतल प्रकाश दिला आहे, ' तें '–तें प्रकाशामृत 'तयाचि येतुलें काये'– त्याच्या स्वतांच्या पुरतेंच काय? ' कीं '–किंवा ' सिंधु '–समुद्रानें 'मेघा दिधलें'–मेघाला पाणी (वाफेच्या रूपानें) दिलें, ' तें मेघाचि भागु ? '–त्या मेघाच्याच गरजेपुरतें काय? तो स्वतां जलरूप असून तेंच जल दुसऱ्यालाहि तो देतोच ना ? ॥ ३ ॥

दिवा जो उजेडु । तो घराचाचि सुरवाडु ।
गगनीं आथी पवाडु । तो जगाचाचि कीं ॥ ४ ॥

पदयुक्त भावार्थ—'दिवा'– (सप्तमी) दिव्याच्या ठिकाणीं 'जो उजेडु'– जो प्रकाश तो स्वतांपुरतां नसून ती तर ' घराचाचि सुरवाडु '–सर्व घराचीच शोभा होय. दिवा स्वतांपुरतां प्रकाशत नसून सर्व घर प्रकाशित करतो. 'गगनीं'– आकाशाच्या ठिकाणीं ' पवाडु '–जो विस्तार ' आथी '–आहे तो ' जगाचाचि कीं '– तो तर स्वतांपुरतां नसून सर्व जगांत तो भरून असतोच कीं. ॥ ४ ॥

अगाधेंहि उचंबळती । ते चंद्रींचि ना शक्ती ।
वसंतु करी तैं होती । झाडांचें दानीं ॥ ५ ॥

पदयुक्त भावार्थ—' अगाधेंहि '– अफाट समुद्र देखील ' उचंबळती '– उसळत असतात. ' ते चंद्रींचि शक्ती ना '– ती तर चंद्रांतलीच आकर्षणशक्ति होय कीं. चंद्राची ती उचंबळवणारी शक्ति स्वतांपुरती नसून समुद्रांतहि ती दिसतेच कीं. ' वसंतु करी '– वसंत ऋतु उदय करतो ' तैं '– तेव्हां ' झाडांचें दानीं '– तो झाडांच्या विकासानें, पानें, फुलें, फळें या रूपानें प्रकट होतो. तो जो विकास पावतो तें कांहीं केवळ त्याच्या स्वतांपुरतेंच नसतें. ॥ ५ ॥

म्हणोनि हे असंवर्य । हें दैविकीचें औदार्य ।
वांचोनि स्वातंतर्य । माझें नाहीं ॥ ६ ॥

पदयुक्त भावार्थ—' म्हणोनि '– म्हणून महाराज, ' हें असंवर्य '– हें अनावर ' हें दैविकीचें '– तुमचें असें हें दैवीकृपेचें ' औदार्य '–सामर्थ्य आहे. ' वांचोनि '– यावांचून ' माझें '– माझें हें ग्रंथ प्रतिपादन करण्याचें ' स्वातंतर्य नाहीं '–स्वतंत्र असें स्वतांचें सामर्थ्य नाहीं. सद्गुरुराया, आपलें असें हें दैवीकृपेचें एवढें अनिवार सामर्थ्य आहे कीं त्यावांचून माझा हा ग्रंथप्रतिपादन करण्याचा स्वतांचा अधिकारच नाहीं. ॥ ६ ॥

आणि हा येवढा ऐसा । परिहारु देवुं कायसा ।
प्रभुप्रभावविन्यासा । आड ठावुनी ॥ ७ ॥

पदयुक्त भावार्थ—' आणि '– आणखी ' हा येवढा ऐसा '–हा वरील-प्रमाणें ' कीं हें सर्व सद्गुरूंचें ऐश्वर्य आहे, त्यांत माझें हें ग्रंथरचना करण्याचें स्वतांचें तंत्र नाहीं ' असा एवढा ' परिहारु ' – आभार, उतराईपणा तरी ' कायसा देवुं '– मी कशाला दाखवूं, कां व्यक्त करूं ? कारण असें म्हणण्यांतच ' प्रभुप्रभावविन्यासा ' – (प्रभु + प्रभाव + विन्यासा) ' प्रभु '– सर्वश्रेष्ठ या सद्गुरु महाराजांच्या ' प्रभावविन्यासा '– स्वयंसिद्ध अशा सामर्थ्याच्या वैभवास ' आड ठावुनी '– दृष्टिआड करून उणेपणा आणणें होय. ॥ ७ ॥

आम्ही बोलिलों जें कांहीं । तें प्रगटचि असें ठायीं ।
मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावें बोलें ॥ ८ ॥

पदयुक्त भावार्थ— ' आम्ही जें कांहीं बोलिलों '– आम्ही जें काय प्रतिपादन केलें ' तें '– तें परमात्मस्वरूप ' ठायीं '– आपल्या स्वतांच्या ठिकाणीं ' प्रगटचि असे '– स्पष्ट प्रकाशितच आहे. ' मा '– मग ' स्वयंप्रकाशा '–स्वतांच सर्वत्र प्रकट असणाऱ्या अशा शब्दातीत परमात्म्याचें ' बोलें '– शब्दांनीं ' प्रकाशावें काई '– वर्णन करतां येईल काय ? ' यतो वाचो निवर्तन्ते '–ज्या स्वरूपापासून या वेदवाणी परततात असें तें वर्णनातीत स्वरूप वर्णवेल तरी कसें ? ॥ ८ ॥

नाना विपायें आम्ही हन । कीजे तें पां मौन ।
तरी काय जनीं जन । दिसतें ना ? ॥ ९ ॥

पदयुक्त भावार्थ—' नाना '–किंवा ' विपायें '–कदाचित् ' आम्ही '– ग्रंथकर्ता मी ज्ञानेश्वर यानें ' हन '–खरोखरच ' तें पां '–त्या ग्रंथलेखनाविषयीं जरी ' मौन कीजे '–मुक्याचें व्रत धारण करून मी स्वस्थ बसलों असतों, 'तरी'–म्हणून ' जनीं जन '–लोकांनीं लोकांस, लोक एकमेकांस ' दिसते ना ? '–दिसले नसते का ? लोकव्यवहाररूप अनंतकोटिब्रह्मांडांतला तो मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंतचा सद्गुरुपरमात्म्याचा ज्ञानविलास एकमेकांस प्रतीत झालेला दिसला नसता का ? ॥ ९ ॥

जनातें जनीं देखतां । द्रष्टेंचि दृश्य तत्त्वतां ।
कोण्ही न होनि आइता । सिद्धान्त हा ॥ १० ॥

पदयुक्त भावार्थ—' जनातें '—जनाला ' जनीं '—जन ' देखतां '—पाहात असतां यांत वास्तविक ' द्रष्टेंचि '—परमात्माच ' तत्त्वतां '—(विचारपूर्वक पाहतां) खरोखर, ' दृश्य आहे '—हें अनंतकोटींचें विश्व बनला आहे, (ही एक दृष्टि.) (दुसऱ्या दृष्टीनें पाहतां) ' हा '—परमात्मा ' कोण्ही न होनि '—कांहीं एक न होतां, तो द्रष्टा, दृश्य असा विकाररूप न होतां ' आइता सिद्धान्त '—आयता सिद्धच, केवळ निर्विकार असाच आहे. ॥ १० ॥

ययापरौतें कांहीं । संविद्रहस्य नाहीं ।
आणि हें तया आधींही । असतचि असे ॥ ११ ॥

पदयुक्त भावार्थ—' ययापरौतें '—(मागील नऊ प्रकरणांत केलेल्या) या सिद्धान्तापलीकडे ' कांहीं '—अधिक, ' संविद्रहस्य ' = ' संवित् '— ज्ञानस्वरूप-परमात्म्याचें ' रहस्य '—गुप्त सिद्धान्तस्वरूप ' नाहीं '—असें कांहीं नाहींच. (व तें रहस्यस्वरूप या आमच्या वर्णनानें सिद्ध झालें असेंहि नाहीं) ' आणि '—कारण ' हें '—परमात्म्याचें हें ज्ञानस्वरूप ' तया आधींही '—या आमच्या प्रतिपादना-पूर्वीहि ' असतचि असे '—होतें तसेंच आहे; तें पूर्वी होतें तसेंच तें आतांहि आहे. ॥ ११ ॥

तऱ्ही ग्रंथप्रस्तावो । न घडे हें म्हणों पावो ।
तऱ्ही सिद्धानुवाद लाहों । आवडी करूं ॥ १२ ॥

पदयुक्त भावार्थ—' तऱ्ही '—यास्तव, ' ग्रंथप्रस्तावो '—ग्रंथाचें आरंभण, प्रयोजन ' न घडे '—घडत नाहीं, ' हें म्हणों पावो '—असें म्हणणें जर प्राप्त झालें, जर संभवलें, ' तऱ्ही '—तर (त्याचें उत्तर हेंच कीं,) ' सिद्धानुवाद '—(सिद्धमेव यत् आत्मवस्तु ताद्विषयकं यत् यथार्थकथनं) जें नित्यसिद्ध असें आत्मस्वरूप त्याविषयींचें जें यथार्थ वर्णन, जो हा अनुवाद तो ' आवडी करूं लाहों ' – निज प्रेमभरांत मीं केला आहे. म्हणून या ग्रंथाचें प्रयोजन, आवश्यकता योग्यच आहे. ॥ १२ ॥

पढियंतें सदा तेंचि । परी भोगीं नवी नवी रुची ।
म्हणोनि हा उचितुचि । अनुवादु सिद्धु ॥ १३ ॥

पदयुक्त भावार्थ—' पढियंतें '– आवडती वस्तु ' सदा तेंचि '– नेहमीं तीच असली ' परी '– तथापि ' भोगीं '– तिच्या उपभोगांत ' नवी नवी '– नवीन नवीन ' रुचि '– गोडी, आवड उत्पन्न होत असते. (दररोजचें जेवण

तेंच–भात, भाकरी, भाजी, आमटी पण तीच रोज रोज नव्या आवडीनें मनुष्य खात असतो, तसेंच दररोजचें तेंच धुतलेलें नेसतें वस्त्र पण त्याचा दररोजचा उपभोग तो मोठ्या आवडीनें घेत असतो.) ' म्हणोनि '–तसेंच, त्याच न्यायानें हें आमचें ' सिद्धु '– नित्यसिद्ध अशा परमात्मस्वरूपाविषयींचें ' हा अनुवादु '– यथार्थ वर्णन ' उचितुचि '– उचितच होय. ॥ १३ ॥

याकारणें मियां । गौप्य दाविलें बोलूनियां ।
ऐसें नाहीं आपसया । प्रकाशुचि ॥ १४ ॥

पदयुक्त भावार्थ—' याकारणें '– यास्तव, ' मियां '– मीं ज्ञानेश्वरानें ' गौप्य '– गुह्य, अगदीं गुततत्त्व, गूढ, न कळणारी गोष्ट, ' बोलूनियां दाविलें '– बोलून दाखविली, वर्णन केली ' ऐसें नाहीं '– असें मुळींच नाहीं. ' आपसया '– मूळचीच, सहजच ' प्रकाशुचि '– प्रकट असलेली, स्वयंप्रकाश ती परमात्मवस्तु होय. (सूर्य कोणाच्याहि प्रयत्नावांचून स्वतांच आपोआप सदैव प्रकाशलेला असतो तद्वत् तो नित्य, ज्ञानघन परमात्मा होय.) ॥ १४ ॥

आणि पूर्ण अहंता वेठलों । सैंघ आम्हींच दाटलों ।
मा लोपलों ना प्रगटलों । कोणा होउनी ॥ १५ ॥

पदयुक्त भावार्थ—' आणि '– कारण ' पूर्ण अहंता '– (अहं, मी) ' पूर्ण '– सर्वव्यापी ' अहंता '– मीपणाच्या अशा व्यापकतेला ' वेठलों '– प्राप्त झालों. ' सैंघ '– सर्वत्र, जिकडे तिकडे 'आम्हींच'–आमचेंच आम्ही ' दाटलों '– भरून राहिलों, ओतप्रोत कोंदाटलों आहों. ' मा '– म्हणून ' कोणा होउनी '– कोणाच्यामुळें ' लोपलों '– आम्ही लय पावलों, अस्त पावलों किंवा ' प्रगटलों '– उदयास आलों, ' ना '– हें कांहींच नाहीं. कारण मी आतां सर्वव्यापी अशा मीपणाच्या व्यापकतेला प्राप्त झालों आहे, तो इतका कीं सर्वत्र माझा मीच भरून राहिलों आहे. म्हणून आतां कोणाच्यानें अस्त पावणें वा उदयास येणें हें कांहीं एक नाहींच. ॥ १५ ॥

आपणया आपणपें । निरूपण काय ओपे ।
मा उगेपणें हरपे । ऐसें आहे ? ॥ १६ ॥

पदयुक्त भावार्थ—' आपणया '– आपणच आपल्याला ' आपणपें '– आपलेंच ' निरूपण ' – ग्रंथरसाचें वर्णन, स्वस्वरूपवर्णन ' ओपे ' – काय (विकावयाचें) प्राप्त करून द्यावयाचें आहे ? ' मा '– बरें तर, मग 'उगेपणें'–

स्वस्थ राहिल्यानें तरी 'हरपे'– तें नाहींसें होईल, 'ऐसें आहे!'– असें आहे काय!॥ १६ ॥

म्हणोनि माझी वैखरी । मौनाचेंहि मौन करी ।
हें पाणियावरी मकरी । रेखिली पां ॥ १७ ॥

पदयुक्त भावार्थ—'म्हणोनि'–यामुळें 'माझी वैखरी'–(निरूपण करणारी ही) माझी वाणी हिनें 'मौनाचेंहि'–वर्णनातीत मौनरूप परमात्म्याचेंच 'मौन'–वर्णनरहित स्वरूपच 'करी'–जरी वर्णन केलें असलें, तथापि 'हें'–हें वर्णन 'पाणियावरी'–पाण्यावर 'मकरी'–मगरीचें 'रेखिली'–चित्र रेखाटल्यासारखें 'पां'–तें खरोखर आहे. पाण्यावरचा काढलेला मगरीचा आकार पाण्याहून जसा भिन्न नसून केवळ पाणीरूपच तो जसा तशी माझी वाणी व हें निरूपण परमात्मरूपच. परमात्माच माझ्या वाणींतून निरूपणरूपानें प्रकट होऊन तो आपणच आपलें स्वरूप वदला. ॥ १७ ॥

एवं दशोपनिषदें । पुढारीं न ढळतीं पदें ।
देखोनि बुडी बोधें । येथेंचि दिधली ॥ १८ ॥

पदयुक्त भावार्थ—'एवं'–याप्रमाणें या आमच्या वर्णनावरून पाहतां 'दशोपनिषदें' = (दश + उपनिषदें) – दहा जीं उपनिषदें मुख्य अशीं [उपनिषत्= उप+निषत् (उप निषण्णं यस्याः सा) ओतप्रोत परमात्मस्वरूप ज्यांत (वर्णिलें) आहे असें. वेदांतील कर्म, उपासना, ज्ञान या तीन कांडांपैकीं अग्रभागीं असणारें ज्ञानकांड, जें वेदपुरुषाचें उत्तमांग जो वेदान्त, तीं हीं उपनिषदें. त्यांतील मुख्य ज्यांवर भगवान् श्रीशंकराचार्यांनीं भाष्यें केलीं, तीं ईश, केन, कठ, प्रश्न, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, मुंडक, मांडुक्य, बृहदारण्यक हीं तीं दशोपनिषदें होत.] यांचीं 'पुढारीं'–पुढचीं (आमच्या या अनुभवामृतग्रंथांतील वर्णनाहून कीं 'ऐकमवाद्वितीयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन' या श्रुतिसिद्धान्तानुरूप कीं 'एकच अद्वितीय परब्रह्म त्यावांचून हें जें अनेक प्रकारांनीं भासणारें अनंतरूपविश्व असें या स्वरूपीं कांहींहि दुसरें नाहींच नाहीं'–अधिक पुढचीं 'पदें'–पावलें (शब्दांनीं केलेलें वर्णन) 'न ढळतीं'–पडलेलीं नाहींत. (आमच्यापेक्षां अधिक वर्णन दशोपनिषदांतून आलेलें नाहीं. दशोपनिषदांमध्यें जरी परब्रह्मस्वरूपाचें विस्तृत वर्णन असलें तरी त्या सर्व विस्ताराचें सार परब्रह्मस्वरूपाचें वर्णन करणें एवढेंच आहे.) 'देखोनि'–हें पाहून 'बोधें'–परमात्म-

स्वरूपाच्या निजज्ञानानें 'येथेंचि'–येथें या आमच्या ग्रंथांतहि 'बुडी दिधली'–(स्वतांचें) ठाण दिलें, तळ दिला. तो बोध आमच्या या ग्रंथांतदेखील ओतप्रोत भरलेला आहे. ॥ १८ ॥

ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत । हें अनुभवामृत ।
सेवोनि जीवन्मुक्त । हेंचि होतु ॥ १९ ॥

पदयुक्त भावार्थ—श्रीज्ञानेश्वरमहाराज आदेशपूर्वक म्हणतात 'हें श्रीमंत'–परमश्रेष्ठ 'अनुभवामृत'–हें अनुभवरूप परमात्मस्वरूपाचें प्रत्यक्ष प्राप्तीरूप 'अमृत'–अजर, अमरस्वरूप 'सेवोनि'–सेवन करून प्रत्यक्ष अनुभवून 'जीवन्मुक्त'–स्थितप्रज्ञ (देह, प्राण, इंद्रियें, मन, बुद्धि यांच्या स्फुरणरहित झालेली जीवदशा जगद्भावविवर्जित स्वस्वरूपीं समरसून गेलेली ज्यांची ते) 'हेंचि'–हें असलें जें अमृतस्वरूपांतील अनुभवरूप तेंच ते 'होतु'–होऊन राहोत. अशी ही ज्ञानेश्वरमाउलींनीं प्रेमळ भक्तांना आशीर्वादात्मक प्रसादपूर्ण शब्दशक्ति आत्मनिवेदनपूर्वक देऊन ठेविली आहे. ॥ १९ ॥

मुक्ति कीर वेल्हाळ । अनुभवामृत निखळ ।
परी अमृताही उठी लाळ । अमृतें येणें ॥ २० ॥

पदयुक्त भावार्थ—'मुक्ति'–जीवन्मुक्तदशा 'कीर'–तर 'वेल्हाळ'–चांगली खरीच. तथापि 'अनुभवामृत'–हें स्वरूपप्राप्तीचें स्वानुभवाचें अमृत तर त्या जीवन्मुक्तदशेपेक्षांहि 'निखळ'–अतिशुद्ध होय. जिथें ही जीवन्मुक्तदशेची जाणीव उरतच नाहीं. कारण तिचीहि परिपक्वता व्हावयास हवी. 'परी'–म्हणून 'येणें अमृतें'–या आमच्या. अनुभवामृतग्रंथांतल्या स्वानुभवरूप परमात्मस्वरूपांतल्या तन्मयतेंतील या अमृताच्या परमप्रेमसुखाच्या परमानंदप्राप्तीमुळें 'अमृताहि'–मुक्तिरूप अमृताच्याहि 'लाळ उठी'–तोंडाला पाणी सुटेल. ॥२०॥

नित्य चांदु होये । परी पुनवे आनु आहे ।
हें का मी म्हणों लाहे । सूर्यदृष्टी ॥ २१ ॥

पदयुक्त भावार्थ—'नित्य चांदु होये'–नेहमींच चंद्र असतोच. 'परी'–पण 'पुनवेला'–पौर्णिमेला 'आनु आहे'–तो तर कांहीं वेगळाच होतो खरा, तथापि तें सुद्धां 'सूर्यदृष्टी'–सूर्याची ती दृष्टि, नित्यपूर्ण, निर्विकार अशा सूर्याचा तो उदय होईपर्यंतच 'हें मी कां म्हणों लाहे'–हें मी का सांगावयास हवें? ॥२१॥

प्रिया सांवयिली होये । तैं अंगीचें अंगीं न समाये ।
येऱ्हवीं तेथेंचि आहे । तारुण्य कीं ॥ २२ ॥

पदयुक्त भावार्थ—' येऱ्हवीं '–एरवीं सहजच ' तारुण्य '–तरुणपणाचा तो भर ' तेथेंचि '–त्या ठिकाणींच, त्या स्त्रीच्या अंगांतच ' आहे कीं '–असतोच खरा; तथापि ' प्रिया '–प्रिय पतीचें ' सांवयिली होय तैं '–साहाय्य, आलिंगन होतांच, समागम होतांच ' अंगिचें '–तो अंगांतला तारुण्याचा उत्साह ' अंगीं '–त्या अंगांतच ' समाये न '–मावेनासा होतो. ॥ २२ ॥

वसंताचा आला । फळीं फुलीं आपला ।
गगनाचिया डाळा । पेलती झाडें ॥ २३ ॥

पदयुक्त भावार्थ— ' वसंताचा आला '–वसंतऋतूचें आगमन होतांच ' झाडें '–वृक्ष ' आपला '–आपल्याच ' फळीं फुलीं '–फळांनीं व फुलांनीं 'गगनाचिया डाळा (होऊनि) '–आकाशापर्यंत उंच होऊन 'पैलती'–डोलतात, झुलत असतात. ॥ २३ ॥

ययालागीं हें बोलणें । अनुभवामृतपणें ।
स्वानुभूतिपरगुणें । वोगरिलें ॥ २४ ॥

पदयुक्त भावार्थ—' ययालागीं '–यासाठींच (जशीं झाडें वसंताच्या आगमनानें आपल्या वैभवांत उचंबळत राहून डोलत असतात तसेंच) ' अनुभवामृतपणें '– परमात्मस्वरूपप्राप्तीच्या अनुभवरूप अमृतानें ओथंबलेल्या या ग्रंथांतल्या स्वानंदाच्या रहस्यमय ' हें बोलणें '–अशा वर्णनानें युक्त असलेलें ' स्वानुभूतिपरगुणें '–हें आमचें अनुभवरूप पक्वान्न ' वोगरिलें '–वाढून ठेवलें आहे; परमानंदांतल्या स्वानुभवरूप पक्वान्नाची ही मेजवानी आम्ही (संतांना) दिलेली आहे. ॥ २४ ॥

आणि मुक्त मुमुक्षु वद्ध । हे तंववरी योग्यताभेद ।
अनुभवामृतस्वाद । विरुद्ध जंव ॥ २५ ॥

पदयुक्त भावार्थ—' जंव ' – आणि जोंपर्यंत ' अनुभवामृतस्वाद ' – (अनुभव + अमृत + स्वाद)–हा ' अनुभव '–ही परमात्मस्वरूपाची प्रत्यक्ष प्राप्ति, तिचा अपरोक्ष अशा अनुभूतिरूप अमृताचा आस्वाद, या गोडीचा आनंद ज्यास ' विरुद्ध आहे '–दूर आहे, प्राप्त झाला नाहीं, ' तंववरी '–तोंपर्यंत ' मुक्त '–जो देहभावरहित, ' मुमुक्षु '–जो देहभावरहित होण्याची इच्छा करणारा

'बद्ध'–देहभावयुक्त 'हे योग्यताभेद'– हे असे अधिकारभेद असतात. पण खरोखरच जेव्हां एखाद्यास या अमृतानुभवांतल्या परमानंदाचा आस्वाद प्राप्त होईल, तें सुख घेतां येईल, त्या वेळीं त्या व्यापक अनुभूतींतल्या अत्युत्कट परमावस्थेंत त्यास हें मुक्त, मुमुक्षु, बद्धपणाचें असलें हें भेदाचें भान न राहतां सर्व विश्व परब्रह्मरूप होऊन जाईल. ॥ २५ ॥

हें खालील दृष्टान्तांनीं अधिक स्पष्ट करतातः—

गंगावगाहना आली । पाणिये गंगा झाली ।
कां तिमिरें भेटलीं । सूर्या जैशी ॥ २६ ॥

पदयुक्त भावार्थ—'गंगावगाहना'–(गंगा + अवगाहन) गंगेच्या स्नानाला, गंगेला मिळावयाला 'आली'–आलेलीं 'पाणिये'–उदकें, जे नाले, ओढे, नद्यांचीं जळें 'गंगा झाली'–तीं सर्व गंगामय होऊन जातात, गंगेशीं एकरूपच होतात. 'कां'–किंवा 'तिमिरें'–अंधार 'जैशीं'–जसा 'सूर्या भेटलीं'–सूर्याला भेटतांच तेजोमय होतो. ॥ २६ ॥

नाहीं परिसाची कसवटी । तंववरीच वानियाच्या गोठी ।
मग पंधरावयाच्या पटीं । बैसावें कीं ॥ २७ ॥

पदयुक्त भावार्थ—(जंववरी) जोंपर्यंत 'परिसाची'– लोखंडाला सोनें बनवणाऱ्या दगडाशीं 'कसवटी'– सोनें पारखण्याच्या दगडाप्रमाणें लोखंडाचें घर्षण, ती घासण्याची क्रिया 'नाहीं'– घडली नाहीं 'तंववरीच'– तोंवरच 'वानियाच्या गोठी'– सोन्याच्या हिणकसाची गोष्ट. 'मग'– नंतर लोखंडाचें परिसाशीं घर्षण होतांच 'पंधरावयाच्या'– पंधराव्याच्या, तोळ्याला पंधरा रुपयांच्या (श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वेळीं सोनें पंधरा रुपये तोळ्याच्या दराचें होतें) 'पटीं'– पट्टींत, दराच्या ठिकाणीं 'बैसावें कीं'– त्या लोखंडाला बसतां येतेंच ना! तसेंच एकसारख्या स्वरूपाच्या सतत अनुसंधानानें जीवाचें परमात्मस्वरूपाशीं ऐक्य होतांच त्याला त्यांत समरसून जातां येतेंच कीं. ॥ २७ ॥

तैसें जे या अखरा । भेटती गाभारां ।
ते बोध जैसे सागरा– । आंतु आले ॥ २८ ॥

पदयुक्त भावार्थ—'तैसें'– तसे 'जे'– जे कोणी 'या अखरा'– या ग्रंथांतील शब्दांच्या 'गाभारां'– गाभाऱ्यांत, खोल अर्थांतल्या गूढाशीं 'भेटती'– एकरूप होतील, 'ते'– असला अधिकार प्राप्त होणारे अधिकारी 'जैसे'– जसे

'वोघ'– महानद्यांचे प्रवाह, ओघ 'सागरा आंतु'–समुद्राच्या अंतरांत 'आले'– पोंहचून समुद्ररूप होतात, तसे हे अधिकारी पण या ग्रंथांतल्या परमामृतांतल्या अनुभवाशीं एकरूप होऊन समरसून जातील. ॥ २८ ॥

जैशा अकारादि अक्षरां । भेटती पन्नासही मात्रा ।
तैसें या चराचरा । दुसरें नाहीं ॥ २९ ॥

पदयुक्त भावार्थ— 'जैशा'– जशा 'अकारादि'– अवर्णापासून 'पन्नासही मात्रा'– सर्व पन्नासवर्ण, (सोळा स्वर व 'ळ' पर्यंतचीं चवतीस व्यंजनें मिळून सर्व) 'अक्षरा' (सप्तमी)– ओंकाराच्या ठिकाणीं (अ + उ + म् = ओम्, ॐ कार, ज्याला श्रीगीतेंत 'ॐ' 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म', 'ओम् इति'– ओम् हें एक 'अक्षर', 'ब्रह्म' होय असें म्हटलें आहे, अशा 'ओं' या एकाच अक्षराच्या ठिकाणीं) 'भेटती'– एकरूपानें असतात; 'तैसें'–तसेंच 'या चराचरा'– (या चर + अचर, चेतन व जड अशा)– या अनंतकोटि ब्रह्मांडाच्या विश्वरूपांत 'दुसरें नाहीं'– परब्रह्माशिवाय कांहींहि नाहीं. ॥ २९ ॥

तैसी तये ईश्वरीं । अंगुळी नव्हेची दुसरी ।
किंबहुना सरोवरीं । शिवेंशिचि ॥ ३० ॥

पदयुक्त भावार्थ— 'तैसी'– त्याप्रमाणें 'तये ईश्वरीं'– त्या परब्रह्म परमेश्वराच्या स्वरूपीं 'अंगुळी'– बोटानें असें तसें निर्देश करून दाखविण्यासारखें 'दुसरी'– असें दुसरें कांहींहि 'नव्हेचि'– नाहींच. 'किंबहुना'– फार काय सांगावें ? 'सरोवरीं'– सर्व कांहीं, सर्वच, सर्व विश्वच 'शिवेंशिचि'– शिवमयच, केवळ परब्रह्मपरमात्मामयच होय. ॥ ३० ॥

म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें ।
सणु भोगिजे सणें । विश्वाचेनि ॥ ३१ ॥

पदयुक्त भावार्थ—'म्हणोनि'– म्हणूनच 'विश्वाचेनि'– विश्वाकडून सर्व विश्वानें, सर्व जनांनीं, 'येणें अनुभवामृतें'– या अनुभवरूप अमृताचा, या अमृतानुभवाचा, या परमामृताच्या अनुभवरूप ग्रंथांतला 'सणु'–आनंद 'सणें'– प्रेमभावानें परमभक्तीच्या उल्हासानें 'भोगिजे'–उपभोगावा असें 'ज्ञानदेवो म्हणे'– श्रीज्ञानेश्वरमहाराज अत्यंत कळकळीनें प्रेमपूर्वक सांगत आहेत. ॥ ३१ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीमदमृतानुभवे ग्रंथपरिहारसहितं ग्रंथमाहात्म्यकथनं नाम दशमं प्रकरणं समाप्तम् ॥

असें श्रीसिद्धानुवादरूप परब्रह्मपरमात्मस्वरूपाचें ओतप्रोत वर्णन असलेलें श्रीमदनुभवामृत तोच श्रीमदमृतानुभवग्रंथ त्यामधील हें ग्रंथपरिहारासहित ग्रंथ-माहात्म्यकथन नामक दहावें प्रकरण समाप्त.

उपसंहार—वेदान्तप्रकरणग्रंथांच्या आरंभीं ज्या सूत्ररूपवाक्यानें तात्पर्य-निर्णयाचें स्वरूप दर्शित केलेलें असतें, तो ' उपक्रम ' व तसाच तात्पर्यनिर्णय ग्रंथसमातीसहि असावा लागतो, तो ' उपसंहार ' असा पूर्वाचार्यांच्यापासून चालत आलेला वैदिक उपनिषत्संप्रदाय आहे. त्याला अनुसरूनच संतश्रेष्ठ भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं या ग्रंथाचा उपक्रम केला, तो—"यदक्षरमनाख्येयमानन्द-मजमव्ययम् ॥ श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥ १ ॥ "—निर्विकार, वर्णनातीत, अनादि, अविनाशी असें ' आनंदघन ' परमात्मस्वरूप ' श्रीमन्नि-वृत्तिनाथ ' नांवानें प्रसिद्ध असलेलें जें दैवत त्या दैवतरूप मी ' ज्ञानेश्वर ' आहें. ' जीवो ब्रह्मैव नापरः '—जीव हा ब्रह्मरूपच, निराळा नाहीं असेंच वरील नमनानें श्रीगुरुनिवृत्तिनाथ जो अक्षररूप परमात्मा त्या आनंदघनाशीं आपलें ऐक्यरूप तादात्म्य महाराजांनीं दर्शविलें आहे. असा ग्रंथाचा उपक्रमरूप आरंभ केलेला असून या ' अमृतानुभव—अनुभवामृत ' ग्रंथद्वारां अधिकारी साधनचतुष्टयसंपन्न मुमुक्षूंच्या तें जीवब्रह्माचें ऐक्य प्रतीतीला यावें असा या ग्रंथनिर्मितीतला महाराजांचा उद्देश आहे. मुमुक्षु हा या आनंदमय सत्स्वरूपाची ओळख करून देणाऱ्या जीवन्मुक्त विदेही महापुरुष सद्गुरूंस शरण जाऊन त्यांच्या सान्निध्यांत त्याला ' तत्त्वमसि ' या महावाक्याचा, जीवब्रह्माच्या ऐक्यज्ञानाचा उपदेशहि घडला, व त्याला ब्रह्मज्ञानहि झालें. म्हणजे निज आत्मस्वरूपाची ओळखहि झाली. तथापि त्या उपदेशवाक्यातील ऐक्यज्ञानाच्या दृढ अपरोक्षाचा निश्चय होऊन आनंदाची प्राप्ति झालेली नसते, ती व्हावी म्हणून त्यासाठीं त्याचा पुन्हा पुन्हा श्रवणद्वारां मननपूर्वक निदिध्यासनाचा सतत अभ्यास व्हावयास पाहिजे. "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः " या श्रुतिवचनानुरूप तसेंच " तैसा मनाचा मार न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्ष असे आयता । श्रवणाचिमाजीं (ज्ञाने. ४—२२४) " " तैसेनि आइतेपणें । कवित्वा जालें हें उपेणें (विश्रांतिस्थान) । मनन निदिध्यास श्रवणें । जिंतिलें आतां ॥ (ज्ञाने. १८—१७४७) " यांत निवेदिल्याप्रमाणें एकसारखा वारंवार सत्स्वरूपप्राप्तीच्या आनंदाचा अभ्यास व्हावयास पाहिजे. " तेविं सदभ्यासें निरंतर । चित्तासी परमपुरुषाची मोहर । लावीं मग शरीर । राहो अथवा जावो ॥ (ज्ञाने·

८–८–८२)" " जें नाना गतीतें पावविते । तें चित्त वरील आत्मयातें । मग कवण आठवी देहातें । गेलें कीं आहे ॥ (ज्ञाने. ८–८–८३)" " पैं सरितेचेनि ओघें । सिंधुजळा मीनलें घोंघें । तें काय वर्तत आहे मागें । म्हणोनि पाहीं येती (ज्ञाने. ८–८–८४)" " ना तें समुद्राचि होऊनि ठेलें । तेविं चित्ताचें चैतन्य जाहलें । जेथ यातायात निमालें । घनानंद जें ॥ (ज्ञाने. ८–८–८५)" असें सत्स्वरूपाच्या प्राप्तीरूप आनंदाच्या दृढीकरणाचें महाराजांनीं दिग्दर्शन केलें आहे. मनःसंकल्पविवर्जित प्राणस्पंदनरहित देहविस्मृतींतल्या त्या स्वानंदाच्या ऐक्यप्रतीतीचें तें परमसुख अविद्येच्या ज्या आवरण व विक्षेपशक्ति त्या शक्तींचा विद्येच्या ज्या अन्वयव्यतिरेकशक्ति त्या आत्मानात्मविवेकनिर्मित शक्तींच्या प्रभावानें 'अन्वयव्यतिरेकाभ्यां तत् ज्ञातव्यं' याप्रमाणें अविद्येचा पूर्ण निरास झाल्यामुळें असंभवादि प्रतिबंध दूर होऊन गेल्यानें निश्चयपूर्वक दृढ अभ्यास व्हावा म्हणून संतश्रेष्ठ सद्गुरुनाथ भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं या अमृतानुभवग्रंथभर तो आनंदघनपरमात्मा श्रीहरिच सर्वत्र ओतप्रोत एकच एक भरलेला आहे, असा उपनिषत् तत्त्वनिर्णयाचा सिद्धान्त केला आहे. तसेंच ग्रंथारंभींचे नमनाचे जे पांच संस्कृत श्लोक आहेत, ते संपतांच पाहिल्या प्रकरणाच्या प्रारंभींची नमनाची ओवीहि अशीच तत्त्वनिर्णयाची आहे. या ओवीमध्येंहि मागील पांचहि संस्कृत श्लोकांचा समन्वय केला आहे, " ऐसी इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें । तियें वंदिलीं मियां मूळिकें । देवोदेवी ॥ १ ॥" – जग, त्याला निर्माण करणारीं मूळचीं जनकें, जें ईश्वरमायेचें जोडपें जी देव–देवी हीं सर्व निरुपाधिक, उपाधिरहित म्हणजे द्वैतरहित, दुसरेंपणावांचून असें एकमेवाद्वितीय एकच एक ओतप्रोत असें परब्रह्म, त्याला माझें हें ऐक्यरूप वंदन होय. हा जो आरंभीं ग्रंथाचा उपक्रम केला आहे, त्याच सिद्धान्ताला अनुसरून आतां हा उपसंहार म्हणजे ग्रंथसमाप्तिहि केलेली आहे. " तैसी तये ईश्वरीं । अंगुळी नव्हेचि दुसरी । किंबहुना सरोवरीं । शिवेशिंचि ॥ (प्र. १०–३०)" तद्वतच या परमात्मस्वरूपाच्या ठिकाणीं तो एवढा तेवढा असा तसा बोटानें दाखवून अंगुलिनिर्देश करतां येत नाहीं. फार काय सांगावें ? सर्व विश्व केवळ शिवमय एकमेव अद्वितीय असें एकच एक परब्रह्मरूप परमानंदमय आहे. तिथें दुसरेपणाचा संबंध नाहींच नाहीं (१०–३०). "म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें । सणु भोगिजे सगें । विश्वाचेनि ॥ (प्र. १०–३१)" असें मोठ्या प्रसादपूर्ण आशीर्वादपूर्वक श्रीज्ञानराज सांगतात कीं बाबांनो, या अनुभवामृतांतील अमृता-

नुभवमय सणाचा म्हणजेच परब्रह्मरूप होऊन राहण्याचा निजनित्यपरमानंदाचा सर्व विश्वानें, सर्व जनांनीं या सहजावस्थेंतल्या स्थितप्रज्ञेंतलें परमप्रेमरूप भक्तिसुख मोठ्या सोहळ्यानें परमात्म्याशीं एकरूप होऊन जाऊन अनुभवावें. मुनिराज भक्तश्रेष्ठ श्रीनारद आपल्या भक्तिसूत्रांत म्हणतात कीं " सा त्वस्मिन् परमप्रेमरूपा अमृतस्वरूपा च "— या परमात्म्याचें भक्तिसुख परमप्रेमरूप अविट अमृतस्वरूप परमानंदमय आहे.

समालोचन—ही सद्गुरुचरणांची प्राप्ति परमात्म्याच्या सगुणस्वरूपाच्या दृढ उपासनेनें लाभणाऱ्या प्रसादानेंच होत असते. " यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् । तावन्न सद्गुरुः कश्चित् सच्छास्त्रमपि लभ्यते ॥." असें योगवासिष्ठांत मुनिवसिष्ठांनीं श्रीरामरायाला उपदेशिलें आहे कीं—रामराया, परमेश्वराच्या उपासनेनें जोंपर्यंत त्याची प्रसन्नता लाभलेली नसते तोंपर्यंत सद्गुरुप्राप्ति व सच्छास्त्राचा लाभ प्राप्त होत नाहीं. " तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोषालागीं ॥ (ज्ञाने. १८–९१७) म्हणोनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें । वैराग्यसिद्धि देयिजे पसाय तया ॥ ९१८ ॥ " जिये वैराग्य दशे । ईश्वराचेनि वेधवशें (छंदानें) । हें सर्वहि नावडे जैसें । वांत होय ॥ ९१९ ॥ " " सम्यक्ज्ञान नुदैजतां । वेधेंचि तन्मयता । उपजे ऐसी योग्यता । बोधाची लाहे ॥ ९२१ ॥ " " तैसा मी एकवांचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोऽहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्य होय ॥ (ज्ञाने. १८–१३९७) " " पैं आपलेनि भेदेंवीण । माझें जाणिजे एकपण । तयाचि शरण । मज येणें गा ॥ (ज्ञाने. १८–१३९८) " अशी शरणागतीनें भगवत्कृपा संपादून होतांच परमात्म्याच्या अक्षर–अविनाशी स्वरूपाची ओळख म्हणजे जीवाचें देहतादात्म्यानें आलेलें जीवपण जाऊन त्याची परमात्मस्वरूपाशीं एकतानता होणें होय. त्या एकतानतेंत भगवदैश्वर्याच्या लीलेचा आविर्भाव " एकमेवाद्वितीयं " अशा एकच एक परब्रह्मस्वरूपाचा " एकोऽहं बहु स्याम् " अशा अनंतकोटिब्रह्मांडरूपानें होत असला तरी मूळचें एकपण असतें तसेंच अक्षररूप निर्विकारच असतें; हें कसें याचा अनुसंधानपूर्वक एकसारखा तो चिंतनाचा अभ्यास होत राहावा म्हणून या अमृतानुभव ग्रंथाचें प्रकरणवारीं संक्षेपानें थोडक्यांत समालोचन पुढीलप्रमाणें केलें आहे तें असें—

मंगलाचरण— यदक्षरमनाख्येयमानंदमजमव्ययम् । श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥ १ ॥ गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्याहि शांकरी । जयत्याज्ञा

नमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम् ॥ २ ॥ (पान ११), सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः । ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः ॥ ३ ॥ (पान १४), अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् ॥ तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥ ४ ॥ (पान १४–१५), मूलायाग्रायमध्याय मूलमध्याग्रमूर्तये । क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥ ५ ॥ (पान १५–१६).

शिवशक्तिसमावेशन प्रकरण पहिलें— ऐसीं इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें । तियें वंदिलीं मिया मूळिकें । देवोदेवी ॥ १ ॥ (पान १७), जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोवरीं । चारुस्थळीं येकाहारी । येकांगाची ॥ २ ॥ (पान २१), आवडीचेनि वेगें । येकयेकातें गिळिती अंगें । कीं द्वैताचेनि पांगें । उगळिते आहार्ती ॥ ३ ॥ (पान २२), कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपणा मिळोनि येकी । नेदितीचि कवतुकीं । येकपण फुटों । ५॥ (पान २८), हा ठाववरी वियोगभेडें । जें बाळ जगायेवढें । वियालीं परी न मोडे । दोघुलेंपण ॥ ६ ॥ (पान २८), जयां येक सत्तेचें वैसणें । दोवां येका प्रकाशाचें लेणें । जे अनादी येकपणें । नांदतीं दोघें ॥ ८ ॥ (पान २९), स्त्रीपुरुष नामभेदें । शिवपण येकलें नांदे । जग सगळें आधार्धें– । पणें जिहीं ॥ १७ ॥ (पान ३४), गोडी आणि गुळु । कापुरु आणि परिमळु । निवडुं जातां पांगळु । निवाडु होये ॥ २३ ॥ (पान ३७), कां कस्तुरीसकट परिमळु । कां उष्मेसकट अनळु । तैसा शक्तीसि केवळु । शिवुचि जो ॥ ४२ ॥ (पान ४८), राति आणि दिवो । पातलीं सूर्याचा ठावो । तैसीं आपुला साची (शुद्ध स्वरूपावर) वावो । दोघेंहि जियें ॥ ४३ ॥ (पान ४८), नातरी नीद जात खेंवो । पावे आपुला ठावो । तैशीं बुद्धित्यागें देवीदेवो । वंदिलीं मियां ॥ ६२ ॥ (पान ५६) शिवशक्तिसमावेशें । नमन केलें म्यां ऐसें । रंभागर्भ आकाशें । रिगाला जैसा ॥ ६४ ॥ (पान ५७).

श्रीगुरुस्तवन प्रकरण दुसरें—" आतां उपायवन वसंतु । जो आशेचा आहेव तंतु । अमूर्ताचे परि मूर्तु । कारुण्याचा ॥ १ ॥ (पान ५९), "अविद्येचे आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे । तया चैतन्याचे धावे । कारुण्यें जो कीं ॥ २ ॥ (पान ६०), मोडूनि मायाकुंजरु । मुक्तिमोतयाचा वोगरु । जेवविता सद्गुरु । निवृत्ति वंदूं ॥ ३ ॥ (पान ६०), जयाचेनि अपांगपातें । बंध मोक्षपणीं आते । भेटे जाणतया जाणतें । जयापाशीं ॥ ४ ॥ (पान ६१), कैवल्यकनकाच्या दाना । जो न कडसी थोर साना । द्रष्ट्याच्या दर्शना । पालाउ जो ॥ ५ ॥ (पान ६२),

सामर्थ्यांचेनि बिकें। जो शिवाचेंहि गुरुत्व जिंके। आत्मा आत्मसुख देखे। आरसा जिये ॥ ६ ॥ (पान ६३), बोधचंद्राचिया कळा। विखुरलिया येकवळा। कृपापुनीव लीळा। करी जयाची ॥ ७ ॥ (पान ६३), जो भेटोलियाचि सवे। पुरति उपायांचे धांवे। प्रवृत्तिगंगा स्थिरावे। सागरीं जिये ॥ ८ ॥ (पान ६३), जयाचेनि अनवसरें। द्रष्टा ले दृश्याचें मोहिरें। जो भेटतखेंव सरें। बहुरूपचि हे ॥ ९ ॥ (पान ६४), अविद्येचें काळवंखें। कीं स्वबोधसुदिनें फांके। सीतळें प्रसादाकें। जयाचेनि ॥ १० ॥ (पान ६५), जयाचेनि कृपासालिलें। जीउ हा ठाववरी पाखाळें। जें शिवपणाहि वोंविळें। अंगीं न लवी ॥ ११ ॥ (पान ६६), राखों जातां शिष्यातें। गुरुपणाहि धाडिलें थितें। तन्ही गुरुगौरव जयातें। सांडीचिना ॥ १२ ॥ (पान ६६), एकपण नव्हे सुसास (सुखास)। म्हणोन गुरुशिष्यांचें करोनि मिस। पाहणेंचि आपली वास। पाहतसे ॥ १३ ॥ (पान ६७), उपास्तिवरि राबतिया। उपाय फळीं येती मोडोनियां। वरिपडले जयाचिया। अनुज्ञा कां ॥ १७ ॥ (पान ७०), आकाश हें सावेव। न बंधे आकाशाचि हांव। ऐसें कोण्ही येक भरींव। आकाश जो ॥ २२ ॥ (पान ७३), चंद्रादि सुसीतळें। घडलीं जयाचेनि मेळें। सूर्य जयाचेनि उजाळें। कडवसेनि ॥ २३ ॥ (पान ७३), जेथें शब्दांची लिही पुसे। तेणेंसि चावळों बैसें। दुजयाचा गगीं रुसे। येकपणा जो ॥ २८ ॥ (पान ७६), कांहीं बाहीं अळुमाळु। देखिजे येखादे वेळु। तरी देखे तेंहि विटाळु। जया गांवीं ॥ ३० ॥ (पान ७७), तेथें नमनें कां बोलें। केऊतीं सुयें पाउलें। आंगीं लाऊनि नाडिलें। नावेंचि येणें ॥ ३१ ॥ (पान ७८), नव्हे आत्मया आत्मप्रवृत्ति। वाढवितां कें निवृत्ति। तरी या नामाचि वायबुंथि। सांडीचिना ॥ ३२ ॥ (पान ७९), निवर्त्य तंव नाहीं। मा निवर्तवी हा काई। तरी कैसा बैसें ठाईं। निवृत्ति नामाच्या ॥ ३३ ॥ (पान ७९), सूर्यासि अंधकारु। कैं झाला होता गोचरु। तन्ही तमारि हा उगरु। आलाचि कीं ॥ ३४ ॥ (पान ८०), ऐसें करणियाधीण। स्वयंभाचि जें निवृत्तिपण। तयाचे श्रीचरण। वंदिले ऐसे ॥ ७९ ॥ (पान ९८).

वाचाऋणपरिहार प्रकरण तिसरें— " ययांचेनि बोभाटें। आत्मयाची झोंप लोटे। पूर्ण तन्ही ऋण न फिटे। जें चेणेंचि नीद कीं ॥ १ ॥ (१००), येन्हवीं पन्हादिक चौघी। जीवमोक्षाच्या उपेगीं। अविद्येसवें आंगीं। वेंचती कीर ॥ २ ॥ (पान १०१), तेवीं अविद्येसवें। चौघी वेंचती जीवें। तत्त्वज्ञानाचेनि

नांवें । उठतीचिया ॥ ७ ॥ (पान १०३), हा तत्त्वज्ञानदिवा । मरोनि इहीं लावावा । तरी हाही शिणलेवा । बोधरूपेंची ॥ ८ ॥ (पान १०४), जिती अविद्या ऐसी । अन्यथां बोधातें गिंवसी । तेचि यथार्थबोधेसीं । निमाली उठी ॥ १० ॥ (पान १०६), परी जीत ना मेली । अविद्या हे जाकळी । बंध मोक्षी घाली । बांधोनियां ॥ ११ ॥ (पान १०७), मोक्षुचि बंधु होये । तरी मोक्ष शब्द कां साहे । अज्ञाना घरीं त्राये । वाउगीचि ॥ १२ ॥ (पान १०७), बागुलाचेनि मरणें । तोषावें कीं बाळपणें । येरा तो नाहीं मा कोणें । मृत्यु मानावा ॥ १३ ॥ (१०७), आणि ज्ञानबंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसें । म्हणितलें असे । सदाशिवें ॥ १६ ॥ (पान १०९), आणि वैकुंठींचेहि सुजाणें । ज्ञानपाशीं सत्त्वगुणें । बांधिजे हें बोलणें । बहु केलें ॥ १७ ॥ (पान १०९), परि शिवें कां श्रीवल्लभें । बोलिलें येणेंचि लोभें । मानूं तें, हें लाभे । न बोलतांचि ॥ १८ ॥ (पान ११०), जें आत्मज्ञान निखळ । तेंहि घे ज्ञानाचें बळ । तैं सूर्य चिंती सबळ (सकाळ) । तैसें नोहे ! ॥ १९ ॥ (११०), नातरि माध्यान्हकाळीं । छाया न दिसे वेगळी । असे पायातळीं । रिवोनियां ॥ ३० ॥ (११६), तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें । आपलेपण उरे । बोधु जो कां ॥ ३१ ॥ (पान ११६), तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां । पाया पडोनि मियां । सोडावला ॥ ३२ ॥ म्हणोनि परा पश्यन्ती । मध्यमा हन भारती । या निस्तरालिया लागती । ज्ञानीं अज्ञानींचि ॥ ३३ ॥ (पान ११९).

ज्ञान-अज्ञान-भेदकथन, प्रकरण चौथें—तैसें अज्ञान आटोनियां । ज्ञान येतें उवाया । ज्ञानाज्ञान गिळूनियां । ज्ञानचि होय ॥ १४ ॥ (पान १२६), म्हणोनि ज्ञानें उजळे । कां अज्ञानें रुळे । तैसें नव्हे निर्वाळे । ज्ञानमात्र जें ॥१७॥ (पान १२७), परी दोन्ही हे भाग । न सिवति भूमीचें आंग । तेव्हेळीं भूमि तैसें चांग । चोख जें असणें ॥ ४३ ॥ (पान १३७).

सच्चिदानंदपदत्रयाविवरण, प्रकरण पांचवें—सत्ता प्रकाश सुख । या तिहीं उणे लेख । जैसें विखणेंचि विख । विखा नाहीं ॥ १ ॥ (पान १३८), कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक येक । द्राव गोडी पीयूख । पीयूखाचि जेवीं ॥ २ ॥ (पान १३९), येन्हवीं सच्चिदानंदभेदें । चालली तिन्ही पदें । परि तिन्ही उर्णी आनंदें । केलीं येणें ॥ ६ ॥ (पान १४०), सत्ताचि कीं सुख प्रकाशु । प्रकाशुचि सत्ता उल्हासु । हे न निवडे मिठांशु ।

अमृतीं जेवीं ॥ ७ ॥ (पान १४१), एवं वस्तुसि जाणों जातां । जाणणेंचि वस्तु तत्वतां । मग जाणणें आणि जाणतां । कैंचा उरे ॥ १८ ॥ (पान १४५) म्हणोनि सच्चित्सुख । हे बोल वस्तुवाचक । नव्हती हे शेष । विचाराचे ॥१९॥ (पान १४५), म्हणोनि बंध मोक्षाचें व्याज । नाहीं, निमालें काज । आतां निरूपणाचें भोज । वोळगे जन्ही ॥ ६६ ॥ (पान १६१)

शब्दखंडन, प्रकरण सहावें—आणि पुढिला कां आपणापें । वस्तु विसराचेनि हातें हारपे । मग शब्देंचि घेपे । आठवूनियां ॥६७॥ (पान १६२), "एतुलियाही परौतें । चांगावें नाहीं शब्दातें । जन्ही स्मारकपणें कीर्तितें । मिरवी हा जगीं ॥ ६८ ॥ (पान १६२)," "तैसा आत्मा सच्चिदानंदु । आपणया आपण सिद्धु । आतां काय दे शब्दु । तयाचें तया ॥ ९३ ॥" आतां अविद्या नाहींपणें । नाहीं तयेतें नासणें । आत्मा सिद्धुचि मा कोणें । काय साधावें ॥ ९७ ॥" "एवं शब्दैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें । साचपणें वनें । चित्रींचीं जैसीं ॥ १०२ ॥."

अज्ञानखंडन, प्रकरण सातवें—जैसी स्वप्नीं स्वप्ना महिमा । तमीं मानु असे तमा । तेवीं अज्ञान गरिमा । अज्ञानींचि ॥ ३ ॥ प्रकाश तो प्रकाश कीं । यासि न वचे घेई चुकी । म्हणौनि जग असकी । वस्तुप्रभा ॥ २८९ ॥ म्हणोनि अज्ञान सद्भावो । कोण्हे परी न लाहो । अज्ञान कीर वावो । पाहों ठेलियाही ॥ २९३ ॥

ज्ञानखंडन, प्रकरण आठवें—तैसे आमुचेनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे । आम्हांलागीं गुरुदेवें । आम्हीच केलों ॥ १ ॥ परी आम्हां आम्ही आहों । तें कैसें पाहों जावों । तंव काय कीजे ठावो । लाजिजे ऐसा ॥ २ ॥ हा ठावोवरी गुरुरायें । नांदविलों उवायें । जे आम्ही न समाये । आम्हांमाजीं ॥ ३ ॥ एवं ज्ञानअज्ञानें दोन्ही । पोटीं सूनि अह-नीं । उदैला चिद्गगनीं । चिदादित्यु हा ॥ १९ ॥ (अहः—दिवस, नी—रात्र) ॥

जीवन्मुक्तदशाकथन, प्रकरण नववें—आतां आमोद सुनास जालें । श्रुतीसी श्रवण रिघाले । आरिसे उठले । लोचनेसी ॥ १ ॥ तैसें भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता । हें सरलें अद्वैता । अफुटामाजीं ॥ ७ ॥ म्हणोन तोंडाआड पडे । तेंहि वाचा वावडे । परि समाधी न मोडे । मौनमुद्रेची ॥ २० ॥ व्यापाराचे गाडे । मोडतांहि अपाडें । अक्रियेचें न मोडे । पाऊल

केंही ॥ २१ ॥ जाली स्वेच्छाचि विधि । स्वैर झाला समाधि । दशे ये मोक्षऋद्धि । बैसों घापे ॥ ३४ ॥ शिवशिवा समर्था स्वामी । येवढीये आनंद-भूमि । घेपे दीजे एकें आम्हीं । ऐसें केलें ॥ ६५ ॥

ग्रंथपरिहार, प्रकरण दहावें—परी गा श्रीनिवृत्तिराया । हातातळीं सुखविलें तुं या । तरी निवांतचि मियां । भोगावें कीं तें ॥ १ ॥ परी महेशें सूर्याहातीं । दिधली तेजाची सुती । तया भासा अंतर्वर्ती । जगचि केलें ॥ २ ॥ म्हणोनि हें असंवर्य । हें दैविकीचें औदार्य । वांचोनि स्वातंतर्य । माझें नाहीं ॥ ६ ॥ जनातें जनीं देखतां । द्रष्टेंचि दृश्य तत्त्वतां । कोण्ही न होनि आइता । सिद्धान्त हा ॥ १० ॥ तऱ्ही ग्रंथप्रस्तावो । न घडे हें म्हणों पावों । तऱ्ही सिद्धानुवाद लाहों । आवडी करूं ॥ १२ ॥ पाढियंते सदा तेंचि । परी भोगीं नवी नवी रुची । म्हणोनि हा उचितुचि । अनुवाद सिद्धु ॥ १३ ॥ एवं दशोपनिषदें । पुढारी न ढळती पदें । देखोनि बुडी बोधें । येथेंचि दिधली ॥ १८ ॥ ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत । हें अनुभवामृत । सेवोनि जीवन्मुक्त । होचि होतु ॥ १९ ॥ तैसे जे या अखरां । भेटती गाभारां । ते बोध जैसे सागरा । आंतु आले ॥ २८ ॥ तैसी तये ईश्वरीं । अंगुळी नव्हेंचि दुसरी । किंबहुना सरोवरीं । शिवेसींचि ॥ ३० ॥ म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें । सणु भोगिजे सणें । विश्वाचेनि ॥ ३१ ॥

ग्रंथाचा उपक्रम जीव, जगत्, ईश्वर, माया हीं परब्रह्मरूप एकच एक नित्य आनंदमय आहेत असें साधनचतुष्टयसंपन्न अशा अधिकारी मुमुक्षूनें जाणून तसें त्यानें अनुभवरूप होऊन असावें असा जसा केला, तसाच उपसंहारहि बद्ध, मुमुक्षु, जीवन्मुक्त असा तो कोणीहि असो त्यानें नित्य या अनुभवामृतरूप अमृतानुभवग्रंथाच्या सेवनानें सर्व विश्व आनंदघन ब्रह्ममय आहे अशा अभेदांतल्या स्वानंदसुखप्राप्तींतल्या उन्मनींतल्या परमप्रेमभक्तीचा लाभ सतत घेत राहावें, असा केला आहे. तथास्तु. श्रीकृष्णार्पणमस्तु.

या ग्रंथांतील पदांचे अर्थ व भावार्थ यांसह सुबोधविवरणाचें हें हस्तलिखित हरिभक्तिपरायण वारकरीभागवतसंप्रदायनिष्ठ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे समकालीन संतश्रेष्ठ कान्होबा पाठक घराण्यांतील दत्तात्रय केशव पाठक यांनीं निज समाधानासाठीं तयार करून आज कार्तिक वद्य ५ शके १८७८, शुक्रवार, तारीख २३, नव्हेंबर सन १९५६ रोजीं संपवून श्रीज्ञानोबामाउलींच्या चरणीं सादर अर्पिलें असें.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
७	२५	वाचाक्रंभणं	वाचारंभणं
२२	८	आवडीच्या	आवडीचेनि
२४	१७	अपरेयमित्यनां	मितस्त्वन्यां
२४	२०	प्रवृति	प्रकृति
२४	२०	श्रेष्ठ	श्रेष्ठ
४४	११	तें कसें ते	तो कसा तें
६०	३	होऊन	होऊन जी
७८	३	हे बोला ऐसें नोहे। अनुभवायाची जोगें	हे अनुभवायाची जोगे, नव्हें। बोला ऐसें ॥
८०	ग्वालून ३	पस्मात्य	परमात्म
८४	१३	त्याचे	त्यांचे
९१	१७	निर्शी	निशी
९६	११	पोखितसें	पोखितसे
९७	१	" निवृत्त "	निवृत्ति
९७	१४	(कीळमिरेव)	(कीळमिरवें)
१०१	२८	उपेगीं (ओघी)	उपेगी (ओवी)
११७	१९	ब्रह्मवृत्तीनें	ब्रह्मवृत्तीतें
१२९	१५	घेतें	घेतो
१२९	२३	ते	तें जाणणें
१३३	शेवटची	आह	आहे
१४३	२५	ज्या	त्या
१५६	१८	अनुभवांतील	अनुभवतील
१६७	९	मरण	मारण

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१६८	१६	त्याही	त्यांही
१७२	५	पिर्से	पिसें
१७३	१६	२९ च्या	२९ व्या
१७६	२८	जाग्रतींल्या	जाग्रतींतल्या
२१४	३	तवं	तव
२२०	१८	नुमसूं	नुमसूं आतां (ओवी ८५)
२२३	१५	वाचाऋंभणं	वाचारंभणं
२४४	१७	मेर (ओवी)	भरे (ओवी)
२५४	९	विश्वासाच्या	विश्वाच्या (आभासाच्या)
२८५	६	एकवूटन	एकवटून
२९४	७	कीं जो तो	कीं तो
३०३	१७	गारेव (ओवी)	गौरव
३०६	२३	असवर्य	असंवर्य
३१२	१२	पैलती	पेलती